# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

### दि.१४-०३-२००१ ते ०६-०७-२००१

### रजिष्टर क्र. ०३

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा

| अ.क्र. | सर्वसाधारण सभा | विषय क्रमांक व ठराव |
|---|---|---|
| १. | १४/०३/२००१ | ३३८/१ |
| २. | २०/०३/२००१ | ३३९/१ ते ३५८/२ |
| ३. | १६/०४/२००१ | ३५९/१ |
| ४. | २०/०४/२००१ | ३६०/१ ते ३८८/११ |
| ५. | १९/०५/२००१ | ३८९/१ ते ४०७/६ |
| ६. | २०/०६/२००१ | ४०८/१ ते ४४३/१९ |
| ७. | ३०/०६/२००१ | विशेष सभा |
| ८. | ०६/०७/२००१ | ४४४/१ |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १४.३.२००१ रोजी संपन्न झालेल्या विशेष (अर्थसंकल्पीय) सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बुधवार दिनांक १४.३.२००१ रोजी मा.महापौर श्री.डॉ.भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात सकाळी ११.३० वाजता वंदे मातरम् गीताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

१. स.स. श्री. अशरफ मोतीवाला
२. स.स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३. स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
४. स.स. श्री. तांबे गणेश रामचंद्र
५. स.स. सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
६. स.स.श्री. शे.इलियास किरमानी शे.ऊमर
७. स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
९. स.स.श्री.कावडे रावसाहेब ममतु
१०. स.स.श्री. मंदाबाई प्रभाकर पवार
११. स.स.श्री.घायतिलक लिलावती बाळासाहेब
१२. स.स.श्री.जगताप मोतिलाल रघुनाथ
१३. स.स.सौ.शिंदे रुख्मिणी राधाकिसन
१४. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१५. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोखंडे
१६. स.स.श्री.शे.शकील पटेल शे.बुढन पटेल
१७. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे
१८. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२०. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
२१. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२३. स.स.सौ.ॲड.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२४. स.स.श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२५. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२६. स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
२७. स.स.श्री.घोडके नंदकुमार राधाकिसन
२८. स.स.श्री.अय्युब खान सरदार खान
२९. स.स.श्री.अ.रशिद अ.सत्तार
३०. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
३१. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
३२. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडुरंग
३३. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर

३४. स.स.सौ.रशिदा बेगम गफ्फार यारखान
३५. स.स.श्री.वडागळे सुनिल बुथवेल
३६. स.स.श्री.शिंदे किशोर रावसाहेब
३७. स.स.श्री.स.मुमताज अली मोज्जम अली
३८. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३९. स.स.श्री.नासेर खान सरदार खान
४०. स.स.श्री.थोरात दत्तात्रय रामराव
४१. स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४२. स.स.सौ.खरात कुसुमबाई दौलत
४३. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४४. स.स.सौ.नुसरत बानो फिरोज खान
४५. स.स.श्री.तायडे पांडुरंग यशवंतराव
४६. स.स.सौ.जयश्री कुमारराव मोरे
४७. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४८. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४९. स.स.श्री.सुरगोनीवार नारायण चंद्रय्या
५०. स.स.सौ.राजपुत विमलाबाई भिकनसिंग
५१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५२. स.स.श्री.अ.कदीर मौलाना सय्यद
५३. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजुरकर
५४. स.स.श्री.गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५५. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५६. स.स.श्री.नसीर खान अ.रहेमान खान कुरैशी
५७. स.स.सौ.शाहीन जफर महमुद जफर
५८. स.स.दाणे चंद्रभागाबाई भागिरथ
५९. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
६०. स.स.श्री.स.सलिम स.युसुफ
६१. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
६२. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहेमद
६३. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
६४. स.स.श्री.शेख ईसाक शेख जैनोद्दीन
६५. स.स.श्री.अफसर खान यासीन खान
६६. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६७. स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
६८. स.स.श्री.तुळशिबागवाले किशोर बाबुलाल
६९. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७०. स.स.सौ.बबीता सुभाष कागडा
७१. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
७२. स.स.श्री.तनवानी किशनचंद लेखराज
७३. स.स.सौ.निखत परवीन ईआन अली

***चस्विकृत सदस्यछ***

१. स.स.श्री.भगवान देविदास घडामोडे
२. स.स.श्री.कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४. स.स.सौ.सलमा बानो मीर मो.अली

**विषय क्र. ३३८/१ :** सन २०००-२००१ चे सुधारीत व २००१-२००२ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

मा.महापौर : आजची सभा विशेष सर्वसाधारण सभा असुन सन २०००-२००१ चे सुधारीत व सन २००१-२००२ चे मुळ अंदाजपत्रास मंजुरी देणार आहोत सर्व प्रथम मुख्य लेखाधिकारी यांनी या अंदाजपत्रका संदर्भात थोडक्यात माहिती द्यावी.

मुख्यलेखाधिकारी : सन २०००-२००१ चे सुधारत व सन २००१-२००२ चे मुळ अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९५ नुसार स्थायी समितीकडे मा.आयुक्तांनी अर्थसंकल्प तयार करुन सादर केलेला होता. त्यानसार चर्चा करुन कलम ९६ नुसार मा.स्थायी समितीचे सभापती यांनी सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवलेला आहे. मा.सभापती हा अर्थ संकल्प महानगरपालिकेकडे सादर करणार आहे त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मा.महापौर यांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत करावे व अर्थसंकल्प सादर करावा. (मा.सभापती अर्थसंकल्प मा.महापौरांकडे सादर करतात या नंतर मा.विरोधी पक्षनेता, मा.सभागृहनेता, मा.सभापती, मा.आयुक्त यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात येते.)(पुष्पगुच्छ देऊन स्वागत समारंभाचा कार्यक्रम होतो.)

मा.महापौर : मा.सभापती स्थायी समिती यांनी सन २०००-२०१ चे सुधारीत व २००१-२००२ चे मुळ अंदाजपत्रक महानगरपालिकेपुढे सादर केलेले आहे त्यांनी हा अर्थसंकल्प काळजीपुर्वक, अभ्यास करुन तयार केलेला आहे. त्यांनी आता अर्थसंकल्पातील निवेदन वाचून दाखववावे.

मा.सभापती : (मा.सभापती स्थायी समिती हे निवेदन हिंदी भाषेतून वाचुन दाखवतात)

औरंगाबाद महानगरपालिकेचे सन २०००-२००१ चे सुधारीत व सन २००१-२००२ चे मुळ अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समितीसमोर सादर केले आहे. अंदाजपत्रकातील तरतुदीवर विचार विनिमय करण्यासाठी दि.१४ फेब्रुवारी २००१ रोजी स्थायी समितीची विशेष सभा घेऊन तीत अंदाजपत्रकावर सर्वकष चर्चा करण्यात आली व त्यामध्ये काही फेरबदल सुचवून मा.आयुक्तांनी सादर केलेल अंदाजपत्रक ठराव क्रमांक १०१/१ दि.१४ फेब्रुवारी २००१ अन्वये पारित करुन ते मा.सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेची सन १९८२ साली स्थापना झाल्यानंतरचा हा एकोणाविसावा अर्थसंकल्प असुन लोकनियुक्त पदाधिकारी यांचे कालावधीतील आठरावा अर्थसंकल्प सादर करतेवेळी मला मनस्वी

आनंद होत आहे. शहरातील नागरिक प्राथमिक सुखसुविधा पुरविण्याकरिता या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेले विशेष प्रस्तावातील काही ठळक बाबी नमुद करण्यात येत आहे व त्या प्रामुख्याने अर्थसंकल्पात दर्शविलेल्या आहेत.

१. प्रभाग समित्यांची स्थापना करुन कामकाजाचे विकेंद्रीकरण करणे.
२. अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करणेकरीता अभय योजना राबविणे.
३. सिडको प्रभागात हस्तांतरणानंतर नाट्यगृह बांधणे
४. नैसर्गिक आपत्तीच्या आपतग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लागणारी मुलभूत सोपी उपलब्ध करुन देणे
५. शहरामध्ये बीओटी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर व्यापारी, संकुले उभारणे.
६. अनाधिकृत वसाहती नियमाप्रमाणे व अनुज्ञयतेनुसार अधिकृत करणे व सिडकोचे संभाव्य हस्तांतरण विचारात घेऊन संपूर्ण क्षेत्रामध्ये मालमत्ता कर आकारणी करणे.
७. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेटसमोर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे.
८. कांचनवाडी गट क्र.७ येथे अंदाजे तीन एकर क्षेत्रात आयुर्वेदिक उद्यानाची उभारण करणे.
९. बीओटी च्बांधा, वापरा व हस्तांतरीत कराछ या तत्त्वावर स्मृतिवन उद्यान परिसरात अंदाजे दहा एकराच्या क्षेत्रात खाजगी तत्त्वावर वॉटर पार्क विकसीत करणे.
१०. महानगरपालिकेच्या सर्व विभागाचे संपूर्ण कामे संगणकाद्वारे करण्याकरिता कामकाजाचे संगणकीकरण करणे.
११. औरंगाबाद महानगरपालिकेचे अग्निशमन दल अधिक बळकट करण्याकरिता, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन रेस्क्यु व्हॅन खरेदी करणे.
१२. शासन आदेशानुसार महिला व बालकल्याणाच्या योजना राबविण्यासाठी पाच टक्के रक्कम राखून ठेवून त्यांचेसाठी कल्याणकारी योजना राबविणे.
१३. प्रशासकीय खर्चामध्ये काटकसर करण्यास्तव स्टेशनरी, फर्निचर, टेलिफोन, चहापान व इतर अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवुन काटकसर करणे.
१४. शहरात विविध रुंदीच्या रस्त्यांवर ७० ते २५० वॅट पर्यंतचे सोडीयम व्हेपर दिवे लावणे व अरुंद गल्ल्यात ट्युब लाईट लावून विद्युत खर्चावर होणाऱ्या भरमसाठ खर्चावर नियंत्रण ठेवणे व तसेच सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात शहागंज येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्या जवळ हायमस्ट लावणे.
१५. २००१-२००२ या आर्थिक वर्षात प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३चे बांधकाम पूर्ण करुन त्यात नविन विभागाचे स्थलांतर करुन इमारत कार्यान्वीत करणे.

**तसेच खालील फेरबदल समितीने सुचविलेले आहेत**

१. सिडको प्रभागात नाट्यगृह बांधण्यासाठी ५० लाखाच्या तरतुदीत कपात करुन त्यासाठी फक्त ५ लाखाची तरतुद निश्चित करण्यात आली.
२. ज्योति नगर भागात नविन जलतरण तलाव बांधण्यासाठी ५० हजाराची प्राथमिक तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली.

३. दगडी महल येथे उड्डाण पुल बांधण्याकरिता रु.१ लाखाची नविन तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली.

४. विकास योजनेअंतर्गत मोकळ्या जागेचे/भूखंडाचे संरक्षण आणि वृक्षरोपणसाठीच्या तरतुदी १० लाखाची वाढ करुन ५५ लाखाची तरतुद निश्चित करण्यात आली.

५. शहरामध्ये नविन पोल बसविण्याच्या तरतुदीत ५ लाखाची वाढ करुन रु.३० लाखाची तरतुद निश्चित करण्यात आली.

६. सुलभ शौचालय व मुताऱ्या बांधण्याच्या तरतुदीत रु.५ लाखाची वाढ करुन रु.३५ लाखाची तरतुद निश्चित करण्यात आली.

७. विद्युत वायरींग व गार्डन फिटींगच्या कमावरील तरतुदीत रु.५ लाखाची वाढ करुन रु.१५ लाखाची तरतुद निश्चित करण्यात आली.

८. रस्ते देखभाल दुरुस्तीसाठी पॅचवर्क कामाकरीताच्या तरतुदीतुन १० लाखाची तरतुद कमी करुन फक्त ५० लाखाची निश्चित करण्यात आली.

९. पुर्नडांबरीकरणाच्या कामाकरिताच्या तरतुदीत रु.५० लाखाची वाढ करुन रु.२.५० कोटीची तरतुद निश्चित करण्यात आली.

१०. जायकवाडी मुख्य जलवाहिनीवरील ग्राहकांची संख्या व जोडणी बाबत समिती गठीत करण्यात येऊन ती समिती आपला अहवाल विशेष अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेच्या बैठक पुर्वी देईल.

या व्यतिरिक्त प्रशासनाने सादर केलेले सिध्दार्थ उद्यान प्रवेश फि वाढ प्रस्ताव, अनाधिकृत बांधकाम सोबत जमिनीच्या कराची आकारण करणे, मालमत्ता कराची आकारणीत स्वतःच्या वापरासाठी निश्चित केलेल्या दरात वाढ प्रस्ताव, टँकर द्वारे पाणी पुरवठा वाढ प्रस्ताव प्रशासकीय खर्चामध्ये काटकसर प्रस्ताव व इतर प्रस्तावावर सर्वकष विचार विनिमय व चर्चा होऊन मान्यता प्रदान करण्यात आली.

तसेच या व्यतिरिक्त प्रशासनाने सादर केलेले पाणीपट्टीच्या दराच्या वाढ प्रस्तावावर सर्वकष विचार विनिमय करुन खर्च व उत्पन्नाच्या तुलनेत वाढत जाणाऱ्या तुटीत काही प्रमाणात घट करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन सदरील प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून विचार करता व खर्चात होणारी वाढ लक्षात घेता काटकसरीचे प्रशासनाने सादर केलेले इतर सर्व प्रस्तावावर विचार विनिमय करुन त्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात आली.

लोकनियुक्त प्रतिनिधींचा हा अकरावा अर्थसंकल्प सर्व स्थायी सदस्यांच्या अभ्यासपूर्ण सहकार्याने व प्रशासनातर्फे सादर केलेल्या अर्थसंकल्पात काही फेरबदलासह सन २०००-२००१ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००१-२००२ चे मुळ अंदाजपत्रक रक्कम रुपये १४१ कोटी ६६ लाख ५५ हजार जमा व रुपये १४१ कोटी ४५ लाख २० हजार खर्चाच्या आणि रुपये २१.३५ लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार सर्वानुमते स्विकृतीसह मान्यता देण्यात येऊन ते सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. यावर सर्वकष विचार होऊन मान्यता प्रदान करण्यात यावी.

श्री. नंदकुमार फुलारी : हिंदी भाषेतून वाचून दाखले आहे काही स.सदस्यांना समजले नाही पुन्हा मराठी भाषेतून वाचून दाखवावे.

मा.महापौर : मा.स्थायी समिती सभापती यांनी त्यांचे निवेदन हिंदी भाषेतून वाचून दाखवले सदर निवेदन मराठी भाषेतून समजून घेण्यात यावे तरी सुध्दा स.सभासदांच्या भावना लक्षात घेत मा.सभापती यांनी वाचून दाखविलेले निवेदन मराठी भाषेतून नगरसचिव वाचून दाखवतील.

नगरसचिव : (मा.सभापती यांनी वाचून दाखवलेले निवेदन नगरसचिव मराठी भाषेतून वाचून दाखवतात)

मा.महापौर : मा.सभापती, स्थायी समिती श्री.अशरफ युनुस मोतीवाला यांनी ११ वा लोकप्रतिनिधींनी केलेला अर्थसंकल्प महानगरपालिकेकडे सादर केला आहे व माझ्या काळातील २ रा अर्थसंकल्प आहे. मा.आयुक्त यांनी अधिकारी/कर्मचारी तसेच ज्येष्ठ स.सदस्य पत्रकार या सर्वांचे सहकार्याने हा अर्थसंकल्प अभ्यासपूर्वक असा स्थायी समिती समोर ठेवलेला होता. स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर आता सर्वसाधारण सभेत मा.सभापती यांनी सर्वांच्या सहकार्याने सादर केलेला आहे. या अर्थसंकल्पात जी ठळक वैशिष्ट्ये दिलेली आहे ती कामे या वर्षी पार पाडावयाची आहे. गेल्या वर्षी काय काय समस्या उद्‌भवल्या ही कामे करणे गरजेचे आहे. हा दृष्टीकोन समोर ठेवून ही ठळक वैशिष्ट्ये ठेवलेली आहे. यावर आपण चर्चा करणारच आहोत. वार्डातील समस्या बाबत आजच्या बैठकीत चर्चा करुन नये वैशिष्ट्ये मध्ये अनाधिकृत वसाहतींना मुलभूत सुविधा देणे व सिडकोचे संभाव्य हस्तांतरण विचारात घेऊन संपूर्ण क्षेत्रामध्ये मालमत्ता कर आकारणीचा महत्त्वाचा विषय सादर झालेला आहे. सिडको हस्तांतर १ एप्रिल नंतर होणार. हस्तांतरण झाल्यास सिडको मध्ये महानगरपालिकेला सुखसुविधा देणे आवश्यक आहे. लवकरच शासनाच्या जी.आर. येईल. असे वाटते या अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करुन आपणांस निर्णय घ्यावयाचे आहे. सर्व स.सदस्य अभ्यास करुन आलेले असतील यात शंका नही. म्हणुन सविस्तर चर्चा करुन अर्थसंकल्प मंजुर करण्यास सर्वांचे सहकार्य लाभेल अशी अपेक्षा करतो. प्रथमतः आपण पान क्र.२० वर जकात या विषयावर चर्चा करावी. या अर्थसंकल्पात ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. त्यावर अगोदर चर्चा करण्यात यावी.

श्री. स.अली मिरा सलामी : अर्थसंकल्पात जी ठळक वैशिष्ट्ये दिलेली आहे. त्यावर अगोदर चर्चा करुन नंतर इतर विषयावर चर्चा करावी.

मा.महापौर : स.सदस्य श्री.सलामी यांनी उपस्थित केलेला प्रश्न बरोबर आहे. परंतु अगोदर उत्पन्नाच्या बाबीवर चर्चा करण्यात येईल. नंतर वैशिष्ट्येवर चर्चा करण्यात येईल.

श्री.स.अली मिरा सलामी : मा.सभापती यांनी अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यावर सुध्दा चर्चा करणे गरजेचे आहे. खर्च बाजू व जमा बाजू या दोन्हीवर सविस्तर चर्चा करुनच निर्णय घेण्यात यावे. अगोदर वैशिष्ट्येवर चर्चा व्हावी.

मा.महापौर : स.सदस्य श्री.सलामी यांनी केलेल्या सुचनाची इतिवृत्तात नोंद घेतलेली आहे. ठळक वैशिष्ट्येवर सुध्दा आपण सविस्तर चर्चा करणार आहोत. अगोदर उत्पन्नांच्या बाबींवर चर्चा करणे आवश्यक आहे. चर्चेला पुर्ण वेळ दिला जाईल.

श्री. अंबादास दानव : मा.सभापती स्थायी समिती श्री.अशरफ मोतिवाला यांचे प्रथम अभिनंदन. स्थायी समिती अर्थसंकल्पीय बैठकीत चर्चा होऊन जायकवाडी

मुख्य जलवाहिनीतून किती नळ कनेक्शन देण्यात आली याची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली होती. त्याचा अहवाल या सभेत देण्याचे ठरले होते. अहवाल आलेला आहे काय माहिती देण्यास यावी.

मा.महापौर : अहवालांची माहिती देण्यात येईल आता उत्पन्नाच्या बाबींवर चर्चा करावी नंतर खर्चाच्या बाबींवर चर्चा करण्यात येईल.

श्री. प्रकाश निकाळजे : अर्थसंकल्पात चालू वर्षाची आवक १४१ कोटीचे दाखवले आहे. मागील वर्षाचे १२३ कोटीचे उत्पन्न येणार असे दाखवले होते तेवढे उत्पन्न झाले नाही जे अर्थसंकल्पात दाखवले होते तेवढी वसुली झालेली आहे का? गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात माझ्या मते जकातीचे जे उत्पन्न मिळावयास पाहिजे होते ते मिळालेले नाही आतापर्यंत ४७.७५ कोटी जकात पोटी वसुली झालेली आहे मालमत्ता कराचे ५ कोटी मिळालेले आहे. जकात वसुली ७० टक्के च होण्याची अपेक्षा आहे. मालमत्ता करापोटी १५ कोटी पैकी ७ कोटी सुध्दा वसुली होणे शक्य नाही म्हणजे ५० टक्के सुध्दा वसुली होते किंवा नाही याची खात्री नाही. जेवढी वसुली होण्याची अपेक्षा आहे. तेवढेच उद्दिष्ट ठेवावे नसता मोठ्या रकमेला मंजुरी देण्यात येत `व वसुली होत नाही. जनतेची कोणतीच कामे होत नाही. मागील अर्थसंकल्पातील वैशिष्ट्ये कोणतीच पूर्ण झालेली नाही. अर्थसंकल्पात नेहमीच आकडा फुगवून दाखवला जातो. तेवढी वसुली होत नाही. म्हणून उत्पन्न नेमके किती येणार खर्च किती करणार कोणत्या कामासाठी करणार, नविन काय कामे हाती घ्यावयाची यासाठी जी अर्थसंकल्पातील आकडा पाहून या शहरातील नागरीक विकास कामे होण्याची अपेक्षा करतात. व वसुली कमी झाल्यास विकास कामे होत नाही व म्हणून वसुलीचा विचार करता उद्दिष्ट ठेवावे व या अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा, विचार होऊन निर्णय घेण्यात यावा.

श्री.तकीहसन खाँन : जकात असो किंवा मालमत्ता कर वसुली असो वसुली होणे गरजेचे आहे. अर्थसंकल्प समोर आलेला आहे. परंतु त्यामध्ये काळजीपुर्वक तपासणी केल्यास आकड्यामध्ये कमी जासत करण्यात आलेचे दिसून येते. यामुळे मी स्वतः विचारात पडलो होतो. आपण जकातवर चर्चा करणार आहोत परंतु मालमत्त कराची वसुलीमध्ये फार मोठी तफावत झालेली दिसते. दुसरे असे की, अर्थसंकल्पातील आकडे जरी लेखा विभागामार्फत सादर झालेला असेल तरी मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर हे संबंधित विभाग प्रमुखांनी द्यावयास पाहिजे. लेखाधिकारी यांचा काहीही संबंध येत नाही. मालमत्ता कराच्या संदर्भात मागील वर्षाच्या वसुली व देण्यात आलेले आकडे व प्रत्यक्ष वसुली व अथसंकल्पात देण्यास आलेले आकडे यात तफावत येत आहे. मागील वर्षाची वसुलीचा विचार करता मागील वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये पान क्र.६ मध्ये झोन क्र.१ मध्ये एकुण थकबाकीसह चालू मागणी २,१४,३२,५७४ या रक्कमेमधून वसुली होऊन २,१६,१९,०२८ थकबाकी दाखवली आहे याचा अर्थ गेल्या वर्षी ७८ हजार रुपये फक्त वसुल केलेले आहे. म्हणजेच २७ टक्के वसुली झालेली आहे. झोन क्र.२ मध्ये मागील वर्षाची थकबाकीसह चालू मागणी ३,७५,१३,९३८ इतकी होती वसुली करता चालू अर्थसंकल्पात ३,७१,१९,२८४ इतकी आहे. वसुली होता थकबाकी ९६,०९,६३८ इतके दाखविले म्हणजेच एकुण वसुली १,२५,९९,६४६ इतकी झालेली आहे

जवळपास ८५ टक्के वसुली झालेली दिसून येते ज्या झोनमध्ये झोपड्या बाजार, गरीब जनता तेथे वसुली जास्त झालेली दिसून येते. आता झोन क्र.४ मध्ये मागील अर्थसंकल्पामध्ये थकबाकीसह चालू मागणी ४,३१,७६,९९० इतकी होती त्यातून थकबाकी ४,३१,१०,९०० इतकी दाखवली याचा अर्थ वसुली ही १०,६६,०९० इतकी २.३ टक्के झालेली आहे. या झोनमध्ये मोठमोठ्या इमारती सर्व सिमेंट कॉंक्रेट घर असताना वसुली कमी झालेली दिसून येते. आता झोन क्र.५ मध्ये मागील थकबाकी २,२१,१३,४९६ इतकी इतकी दाखवली त्यातून या अर्थसंकल्पात थकबाकी १७,९९,८४९ इतकी दाखवली म्हणजेच ही २,०३,१९,६४४ झालेली आहे म्हणजेच ९२ टक्के वसुली झालेली आहे या झोनमध्ये सर्व औद्योगिक एरिया येतो सर्व कारखाने बंद पडू लागले व अशा झोन मध्ये ९२ टक्के वसुल हाते व गुलमंडी सारख्या ठिकाणी फक्त १ टक्के वसुली झालेचे दाखविण्यात आले यावरुन जी  आकडेवारी दाखविली ही दोन्हीही चुकीची आहे. असे वाटते. २,०४,८६,७५७ इतकी दाखवली म्हणजेच वसुली ही वजा १३ टक्के दाखवण्यात आली म्हणजेच १०० टक्के वसुली झालेली नाही. असे दिसून येते. यात आकडेवारी टाकतांना छपाईमध्ये चुक झालेली आहे असे प्रशासनाचे म्हणणे योग्य होणार नाही याची सर्व जबाबदारी प्रशानावर राहील. आता झोन क्र.७ मध्ये सर्व सिडको भाग भागासाठी टॅक्स न लावण्याचा निर्णय घेतला तरी नियम काय दाखवतात याकडे लक्ष देणे गरजेचे आहे व या भागातील नगरसेवकांच्या नावाने ३ लाख रुपये फंड स्वेच्छानिधी म्हणून ठेवलेला असतो. त्या नुसार त्या भागातील नागरिकांना टॅक्स लावणे गैर होणार नाही. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे शेड्युल जे नियम ७ पाहावे कॉन्ट्रीब्युशन टॅक्स लावावे. नियमाचे पुस्तक मागवून घ्यावे व सभागृहाला वाचून दाखववे यावरुन सिडको भागातील टॅक्स वसुल करावयाचा की नाही हे समजून येईल. जो टॅक्स वसुल करण्याचा मगील वर्षी दाखविण्यात आलेला आहेत तो जशाचा तसा पुन्हा या वर्षीच्या अर्थसंकल्पात दाखल केला आहे. सिडको भागात मोठमोठ्या बॅंक एम.जी.एम. दवाखाना शासनाची कार्यालये आहेत सर्व सुविधा उपलब्ध आहेत. माझ्या माहितीप्रमाणे महानगरपालिकेचे पहिले प्रशासक श्री.सतीश त्रिपाठी साहेब यांचा बंगला सिडकोत आहे, त्यांनी मलमत्ता कर भरलेला आहे. मा.रामानंद त्रिपाठी यांनी देखील मालमत्ता कर भरला आहे. सिडको भागतील लोकांनी टॅक्स भरतांना मी माझ्या स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. तेव्हापासुन टॅक्स वसुल करण्यात येत नही असे वाटते माझ्य माहितीप्रमाणे टॅक्स मिळतो परंतु दाखवण्यात आलेला नाही जोपर्यंत सविस्तर खुलासा होत नाही तोपर्यंत सर्वसाधारण सभा घेणे बरोबर नाही. या ठिकाणी प्रशासन सभागृहाची दिशाभूल करत आहे. अर्थसंकल्प चुकीच्या पध्दतीने मांडलेला आहे. चुकीचे आकडे दिले याचा जो पर्यंत योग्य खुलासा होत नाही तो पर्यंत सभागृहाला माझी विनंती की, ही सभा चालवण्यात येऊ नये व या अर्थसंकल्पाची एक प्रत महाराष्ट्र राज्याचे सचिव यांना पाठवण्यत यावी असे माझे मत आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : स.सदस्य श्री.तकीहसन खाँन यांनी जी आकडेवारीची सूचना केली ती चुकीची दाखवली असे म्हटले ओ. मा.सभापती यांनी हे बजेट सादर केलेले आहे या संदर्भात खुलासा करावा.

श्री.तकीहसन खाँन : बजेट सादर करीत असताना याची जबाबदारी सभापती, महापौर अयुक्त यांची नसून जे विभाग प्रमुख आहे त्यांनीच या संदर्भात खुलासा करावा.

श्री. सुदाम सोनवणे : माईकची व्यवस्था करण्यात यावी. नेहमीच सभागृहामध्ये माईकचा आवाज येत नाही.

श्री. कदीर सय्यद मौलाना : स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयावर सर्वसाधारण सभेला आवश्यक तो बदल व दुरुस्ती करण्याचा अधिकार पोहचतो.

श्री.स.अली मिरा सलामी : स्थायी समिती समोर ऑफिशअली आकडे सादर झालेले असतील चर्चा झाली असेल किंवा नसेल स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयावर आवश्यकतेनुसार काय दुरुस्ती करायची ती चर्चा करुन करण्यात यावी. माईकमध्ये आवाज येत नाही. याबाबत देखील संबंधितांना सूचना द्याव्यात.

श्री. तकीहसन खाँन : मी केलेल्या प्रश्नाचा व्यवस्थीत खुलासा व्हावा. चुकीची माहिती देण्यात येऊ नये ज्या विभागासंबंधित माहिती विचारली, जर विभाग प्रमुख उपस्थित असतील तर त्यांनीच माहिती द्यावी.

मा.महापौर : उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा. माईकचीही दुरुस्ती करण्यात येत आहे.

उप आयुक्त (प्र) : बजेट सादर करतांना अपेक्षित वसुली गृहीत धरुन बजेट सादर केलेले आहे. जी वसुली झालेली आहे ती वाचून दाखविण्यात येत आहे. झोन क्र.१ मधील थकबाकी २,०७,०८,७१५ इतकी होती ९९-२००० ची वसुली होती ९२ लाख एकुण थकबाकी २ कोटी ९६ लाख त्यामधील न्यायालयीन प्रकरणामुळे १ कोटी २६ लाख इतकी थकबाकी आहे.

(याचवेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलण्याचा आवाज येतो)

मा.महापौर : झोन वार्डज माहिती देण्यात यावी मालमत्ता कराची जी वसुली झालेली आहे त्याची प्रत प्रशासनाकडे आहे व सर्व स.सदस्यांन त्याच्या प्रती देण्यात याव्या तोपर्यंत दुसऱ्या विषयावर चर्चा करता येईल.

श्री. अफसर खाँन : प्रशासनाकडे संपूर्ण माहिती आहे. प्रशासनाकडून सभागृहात आताच खुलासा घ्यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : गेल्या वर्षाचा सुधारीत व २००१ ते २००२ चा चालू वर्षाचा मुळ अंदाजपत्रक मा.सभाती यांनी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी ठेवलेला आहे. यामधे ज्या महत्त्वाच्या दुरुस्त्या सुचवून काही बदल करण्यात आलेले असतील व आणखी आवश्यक त्या दुरुस्त्या व बदल करण्यासाठी व अर्थसंकल्पास मुळ स्वरुप देण्यासाठी सर्वसाधारण सभेपुढे मांडलेला आहे. स्थायी समितीने या अर्थसंकल्पात जे बदल व दुरुस्त्या केलेल्या आहे त्या योग्य आहे. चांगल्याप्रकारे चर्चा करुन अर्थसंकल्प सादर केलेला आहे. म्हणून स्थायी समितीच्या सर्व सदस्यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात यावे. दुरुस्ती सुचवत असतांना वसुली व खर्च य सर्व विषयावर चर्चा होऊन निर्णय घ्यावयाचे असतात. अर्थसंकल्पात एकुण १४१ कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. सुली कमी झालेली असेल तर मुळ बजेट ठेवतांना त्यात कमी उद्दिष्ट

ठेवता येईल. अर्थसंकल्पात जी आकडेवारी दिली त्यात थकीत रक्कम व वसुली होऊन थकित असलेली रक्कम यात तफावत येत आहे. असे आताच स.सदस्य श्री.तकीहसन खांून यांनी सूचना मांडली. स्थायी समितीने १५ कोटीचे उद्दिष्ट दिलेले होते. सुधारीत मान्यता दिल्यानुसार ५ कोटी वसुली झालेली आहे. इतर कोणत्या हेडमध्ये लुट झालेली आहे. त्यानुसार त्या हेडमध्ये तशी तरतुद करता येईल. प्रशासनाने या संदर्भात खुलासा करणे अपेक्षित आहे. ज्या हेडमध्ये दुरुस्ती बदल करुन मुळ अंदाजपत्रक सादर केले त्यात आणखी काय बदल करुन दुरुस्ती सुचवून कार्यवाही करता येईल यावर चर्चा करुन हा अर्थसंकल्प मंजूर करावा.

तकीहसन खाँन : यात ग्रॅण्ड रक्कम एकुण ३१ कोटी ४८ लाख इतकी येते. त्यातुन १२ कोटी ८५ लाख सिडकोची थकबाकी गेल्यावर उर्वरीत १८ कोटी राहतात. त्यातून सिडकोची थकीत रक्कम १२.८५ वसुल केलेली नाही. उर्वरीत गृहीत १३.७५ कोटी राहिलेली आहे. सिडकोची थकबाकी वगळता उर्वरीत १८ कोटी मधून ७ कोटी गेल्यानंतर ११ कोटी वसुली बाकी राहते तर १३.७५ मधून ११ कोटी वजा केल्यास २.७५ लाख कोठून आणले असा प्रश्न निर्माण होते. त्यांचा खुलासा झाला पाहिजे.

श्री. जयवंत ओक : सविस्तर खुलासा करावा आकडेवारी बरोबर दिलेली नाही. कोण जबाबदार राहणार आहे.

मा.आयुक्त : स.सदस्य श्री.तकीहसन खाँन यांनी अभ्यासपूर्वक निवेदन करुन सुचना मांडली आहे. त्याबद्दल प्रशासनाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो मी सुध्दा माझेकडील कागदावर लक्ष देवून पाहत होतो. मालमत्ता कराची वसुली ही २६.६० कोटी राहील अशी मिळती जुळती रक्कम आहे असे सांगण्यात आले. मालमत्ता कराचे उद्दिष्ट्ये किती व निव्वळ मागणी किती व वसुली किती असा यासह स्थायी समितीला बजेटच्या वेळी सादर केलेले होते व त्यास स्थायी समितीचे मंजुरी जास्त दिलेले असून त्यानुसार १० कोटींचे उद्दिष्ट आपण गाठणार आहोत. २०००-२००१ साठी ११.५२ कोटीचे उद्दिष्ट वाटप केलेले होते. २६.६० कोटी जी रक्कम दिलेली आहे ती ३१ मार्च २००१ पर्यंत येणे अपेक्षित आहे. यास स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. १० कोटीच्या उद्दिष्टाचा अखेर जास्तीत जास्त वसुली होण्याची शक्यता असते याच महिन्यात शासनाचे व विविध कंपन्याचे ग्रॅण्ड कामात जे कर्मचारी हलगर्जीपणा करतील त्याचेवर निलंबणाची सुध्दा कार्यवाही करेल. आजही माझ्याकडे ४ कर्मचाऱ्यांच्या निलंबणाचे आदो तयार आहेत. वसुलीच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना १५ दिवसाची आणखी संधी देण्यात येत आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीच्या बाबतीत कठोरपणे कार्यवाही चालू आहे. १५ दिवसांची अंतिम संधी देतो. ज्यांना वसुलीचे काम दिलेले होते व ठरल्याप्रमाणे वसुली केलेली नसेल व त्याची कारणे काय होती याची सर्व चौकशी करुन त्या कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त शिक्षा देण्यात येईल. आता अतिरिक्त कर्मचारी तर्ग दिल्यास जवळपास ८ कोटी म्हणजेच उद्दिष्टाच्या जवळपास आपली वसुली होणार आहे. गेल्या वर्षी मार्च अखेर ५.२२ कोटी वसुली झालेली होती आता आणखी १६ दिवस बाकी असून जवळपास ८ कोटीपर्यंत वसुली जाईल अशी अपेक्षा आहे. एकुण कार्यप्रणाली अशी की, झोन वाईज माहिती देण्यात येत आहे. झोन क्र.१

मध्ये मालमत्ता कर उद्दिष्टाच्या ५६ टक्के, झोन क्र.२ मध्ये ५८ टक्के, झोन क्र.३ मध्ये ५१ टक्के, झोन क्र.४ मध्ये ६५ टक्के, झोन क्र.५ मध्ये ५९ टक्के, झोन क्र.६ मध्ये ६६ टक्के, झोन क्र.७ मध्ये मालमत्ता कर नाही झोन क्र.८ मध्ये ६३ टक्के इतकी वसुली मालमत्ता करापोटी झालेली आहे. पाणी पट्टी मागच्या वर्षी ५.२२ कोटी होती यावर्षाची आतापर्यंत ५.२९ कोटी झालेली आहे. झोनवाईज माहिती अशी की, झोन क्र.१ मध्ये ६९ टक्के, झोन क्र.२ मध्ये ४७ टक्के, झोन क्र.३ मध्ये ५८ टक्के, झोन क्र.४ मध्ये ७८ टक्के, झोन क्र.५ मध्ये ५० टक्के झोन क्र.६ मध्ये ५४ टक्के, झोन क्र.७ मध्ये ७२ टक्के, झोन क्र.८ मध्ये ७८ टक्के उद्दिष्टाच्या इतकी वसुली केलेली आहे. मागील वर्षी एकुण वसुली ७.२८ कोटी इतकी होती. यापुर्वी ७.०८ कोटी इतकी दि.१२.३.२००१ पर्यंत झालेली आहे. आणखी १५ दिवस बाकी आहे. १० कोटी पर्यंतचे टारगेट पूर्ण होईल. वसुली करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न चालू आहे. वसुली चांगल्याप्रकारे व जास्तीत जास्त होण्यासाठी स.सदस्यांनी सुध्दा झोन अधिकारी यांना मदत करावी अशी अपेक्षा ठेवतो. कर्मचाऱ्यांकडून वसुलीच्या बाबतीत हलगर्जीपणा आढळून आल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही होईल मी माझ्या शब्दास कायम आहे. आज सुध्दा ४ कर्मचाऱ्यांच्या ऑर्डर तयार आहेत. त्यात झोन अधिकारी आहेत. या वर्षाचा हा शेवटचा वसुलीचा महिना असल्याने ऑर्डर थांबवून आहेत. नियमाने सर्वावरच कार्यवाही होणार आहे.

श्री. तकीहसन खाँन : झोन वाईज वसुली पाहिली असता झोन क्र. ४ मध्ये २.३ टक्के वसुली तर झोन क्र.५ मध्ये ५८ टक्के वसुली झालेली आहे. एका झोनमध्ये कमी व दुसऱ्या झोनमध्ये जास्त वसुली असे का?

श्री. कोकाटे काशिनाथ : स.सदस्य श्री.तकीहसन खाँन यांनी काही झोनमध्ये ९ टक्के वसुली तर काही झोन मध्ये ५९ टक्के उद्दिष्टाच्या जवळपास वसुली झालेली आहे. हे खरे आहे का सविस्तर खुलासा प्रशासनाकडून मिळावयास पाहिजे.

मा.महापौर : आताच मा.आयुक्तांनी सांगितले की, गेल्या वर्षीपेक्षा या वर्षीचे वसुलीचे प्रमाण वाढलेले आहे. आता विभाग प्रमुख या संबंधी खुलासा करतील.

श्री. प्रशांत देसरडा : मागील वर्षाच्या बजेटमध्ये घरगुती नळांची पाणपट्टी २०० रुपयाने वाढलेली होती तसेच व्यावसायिक वापरासाठी नळपट्टीमध्ये सुध्दा वाढ कायम करण्यात आलेली होती. ठरलेल्या उद्दिष्टाच्या टक्केवारीनुसार वसुली कमी झालेली आहे असे सभागृहाचे म्हणणे आहे.

मा.उपआयुक्त (प्र) : मालमत्ता कराची निव्वळ मागणी २६.२७ कोटीची आहे. उद्दिष्ट ११.५२ कोटी त्यातून वसुली ६.७२ कोटी झालेली आहे. कालच्या तारखेपर्यंत ७ कोटी ८ लाखा वसुली झालेली आहे. झोनवाईज विचार केल्यास झोन क्र.१ ची वसुली उद्दिष्टीच्या २२ टक्के वसुली झालेली आहे. डिमांड ५५ टक्के झोन क्र.२ ची वसुली डिमांडस ५७ टक्के वसुली ३५ टक्के झालेली आहे. संपूर्ण झोन वाईज ३१ मार्च पर्यंतची वसुली गृहीत धरुन आकडेवारी दिलेली आहे.

मा.महापौर : सिडकोचे थकबाकी १२.८५ कोटी इतकी थकबाकी असुन अपेक्षित मागणी ४ कोटीची आहे. मागणी केल्यानुसार वसुली केलेली नाही सिडको महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईपर्यंत तेथील घरांचा टॅक्स वसुल

करण्यात येऊ नये. हस्तांतरण झाल्यानंतरच ४ कोटीची अपेक्षित मागणी वसुली करावी.

श्री. अविनाश कुमावत : १ एप्रिल पासुन सिडको रहिवाशांना मालमत्ता कर लागू करण्यात यावा. त्याप्रमाणकानुसार सुविधा सुध्दा देण्यात याव्यात.

श्री. काशिनाथ कोकाटे : सर्वसाधारण सभेत ठराव पास केल्यानंतर सुध्दा १२ कोटी मालमत्ता करासंदर्भात प्रशासनावतीने थकबाकी दाखविण्यात येते. जे उद्दिष्ट ठेवण्यात येते ते फुगवून दाखविले जाते म्हणावी तशी वसुली होत नाही. म्हणून सिडकोने १२ कोटी तसेच २००१-२००२ साठी ४ कोटी अपेक्षित मागणी केली. करता चालू मागणी धरुन त्या प्रमाणाकानुसार या वर्षीचे उद्दिष्ट ठेवावे. सभागृहात निर्णय घेतांना वास्तवादी निर्णय घ्यावा. सभागृहाने एक निर्णय घ्यायचा व प्रशासनाने बदल करायचा हे योग्य नाही. सिडको हस्तांतरणाबाबतची सविस्तर टिप्पणी ठेवावयास पाहिजे होती. त्यानुसार निर्णय घेता येऊ शकेल. उद्दिष्टाचा विचार करता मालमत्ता करामधे मोठी लुट दिसून येते तसेच पाणी पुरवठ्याची सुध्दा ३ ते ४ कोटीची तुट येत आहे. सिडको भागात २.५० ते ३ लाख लोक राहतात. त्यांचे सर्व व्यवहार कपडा अन्न इतर लागणारे साहित्य औरंगाबाद जुन्या शहरातून विकत घेतात येणाऱ्या मालावर महानगरपालिका जकात लावते म्हणून महानगरपालिकेस सिडकोच्या जनतेकडून सुध्दा उत्पन्न मिळते हे विसरुन चालणार नाही. असे उत्पन्न १९८२ पासुन सिडको भागातील नागरिकांच्या माध्यमातून महानगरपालिकेस मिळत असून सुध्दा १ ही पैसा सिडको नागरिकांच्या विकास कामासाठी महानगरपालिका खर्च करत नाही. जवळपास १/३ हिस्सा जकात पोटी सिडकोच्या माध्यमातून मिळतो. हस्तांतरण होणार म्हणून सध्या खर्च करण्याचे बंद आहे. शासनाने अनुदान दिल्यास ते सुध्दा सिडको वासीयांसाठी खर्च होत नाही. २५ लाख रु.खर्चून नाट्यगृह केले जाईल ती सुध्दा अद्याप कार्यवाही झालेली नाही. नाट्यगृहाचा खर्च सोडला तर इतर काहीही खर्च सिडकोमध्ये करण्यात आलेला नाही. म्हणून ४ कोटीच वसुली उद्दिष्ट ठेवावे अशी विनंती आहे.

श्री. रतनकुमार पंडागळे : सिडकोच्या नागरिकांकडून टॅक्स वसुल करणे महानगरपालिकेचा हक्क असुन नागरिकांकडून टॅक्स न घेता सिडको कार्यालयाकडून टॅक्स वसुल करावा.

श्री. भगवान घडामोडे : सिडकोकडून १२.८५ कोटीची थकबाकी प्रशासनाच्या माध्यमातून दाखवण्यात आलेली आहे. सिडकोकडून वसुल करावी. सर्वसाधारण सभेने हस्तांतरण व्हावे म्हणून ठराव पास केलेला असून या संबंधी नियम व अटीची पुर्तता करुन प्रस्ताव शासनाकडे पाठवलेला आहे. मंत्रीमंडळाची बैठक झाली त्या बैठकीमध्ये हस्तांतरण झाले म्हणून जाहीर केले वृत्तपत्रात बातम्या झळकल्या परंतु प्रत्यक्षात काहीही कार्यवाही नाही. कसे झाले कोत्या अटीवर झाले काहीही माहिती हाती आलेली नाही. मागील वर्षाचे उद्दिष्ट १५ कोटीचे ठरवले. ते कमी करुन १० कोटीचे ठेवण्यात आले. १२ कोटीची मागणी सिडकोकडून होत आहे. मागील जी मागाणी होती ती का वसुल करण्यात आलेली नाही. मागणी केल्यास १२ कोटी वसुल होणार आहे का याचा सुध्दा खुलासा व्हावयास पाहिजे. शासनाचे अनुदान येते, नगरसेवकाचा स्वेच्छानिधी असतो परंतु हा सर्व पैसा सिडकोतील २ ते २.५०

लाख नागरीकांच्या विकासासाठी वापरण्यात येत नाही. सामान्य जनतेस समजावयास पाहिजे. सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण होत असेल तर १२ कोटीचा मुद्दा बाजूला ठेवून ४ कोटी रुपयाचा टॅक्स वसुल करावा.

श्री. जयवंत ओक : सिडको अंतर्गत अनेक भूखंड आहेत. त्या ठिकाणी सिडकोने विक्री करुन अनेक विकास कामाचा माध्यमातून पैसा कमविला. जी १२.८५ कोटीची थकबाकी आहे. ती नागरिकाकडून न घेता सिडकोकडून वसुल करण्यात यावी सिडकोने नाही दिली तर महाराष्ट्र शासनाकडून याची मागणी व्हावी.

श्री. किशोर तुळशिबागवाले : सिडको हस्तांतरण होणार त्यावेळी सिडकोने महानगरपालिकेस १५ कोटी द्यावे असे ठरले असतांना १० कोटी रुपये देण्याचे मान्य केले. आता टॅक्सची मागणी केल्यास १० कोटी सिडकोच्या मालकीच्या असलेल्या इमारती महानगरपालिकेस हस्तांतरण करण्यासाठी वजा करणार उर्वरीत २ कोटीच रुपये देणार सिडको प्रशासन जनतेने टॅक्स भरला नाही तर जाहिरात देऊन कारवाई करतात. टॅक्स वसुल न झाल्यास घराचा लिलाव करतात म्हणून सिडकोकडून १२ कोटी रुपये टॅक्स पोटी वसुल करण्यात यावे.

श्री.स.अली मिरा सलामी : सिडको नागरिकांवर टॅक्स बोजा पडणार नाही याची सुध्दा काळजी घेणे गरजेचे आहे. सिडकोची जनता ही आपलीच असुन तेथील रहिवाशांनी सिडकोला टॅक्स भरलेला आहे. आता टॅक्स पोटी १२ कोटी रक्कम सिडको महानगरपालिकेस देईल का? असा प्रश्न निर्माण होतो आहे. महानगरपालिकेने तसा प्रस्ताव पाठवावा, नाही दिले तर न्यायालयात याची दाद मागावी. सिडकोकडून १२ कोटी रुपये मिळावे सिडको नागरीकांकडून सिडकोने वसुल केलेले आहे. असे सभागृहाचे मत आहे.

श्री. नारायण सुरंगोणीवार : सिडकोतील म्हाडा कॉलनी महानगरपालिकेकडे ९५ ला हस्तांतरण झालेली असुन ९१ पासुन टॅक्स लावण्यात आलेला असुन ही चुकीची पध्दत आहे. जेव्हापासुन हस्तांतरण झाले तेव्हापासुन टॅक्स लावण्यात यावा. सिडकोतील नागरीकांनी सिडकोला टॅक्स भरलेला असुन १२ कोटी रुपये वसुल करण्यात यावे.

श्री. अंबादास दानवे : मालमत्ता कराची चालू वर्षाची वसुली उद्दिष्ट १० कोटीचे असुन येणाऱ्या वर्षासाठी २४ कोटी ठेवलेले आहे. त्यातुन १२ कोटी सिडकोच्या माध्यमातून येणार असे दाखवले आहे. प्रत्यक्षात चालू मागणीनुसार येणारी रक्कम किती व तेवढी वसुली होती का? मागील बजेटच्या वेळी चर्चा झाली शहरातील जेवढ्या मालमत्ता आहेत त्याची तपासणी करण्यात यावी परंतु कार्यवाही झालेली दिसून येत नाही शहरात मोठमोठ्या इमारतीच्या माध्यमातून ज्या मालमत्ता आहेतत्या २.२५ लाखापेक्षा कमी नसतील आणि मालमत्ता कर फक्त १.२५ लाख मालमत्तेवरच लावण्यात आलेला असून १ लाख मालमत्तेवर अद्याप टॅक्स लावण्यात आलेला नाही. इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेचे प्रमाणपत्र ५ वर्षापुर्वीच देण्यात आले परंतु आजपर्यंत त्या इमारतींना टॅक्स लावलेला नाही दुर्दैवाची बाब आहे. प्रशासन याकडे लक्षत देत नाही काय? म्हणून ज्या दिवशी कम्प्लेशन प्रमाणपत्र दिले त्याच दिवसापासून टॅक्स आकारणी करण्यात यावी. याच अनुषंगाने सिडकोचा विषय महत्त्वाचा आहे. सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले

वृत्तपत्रात आले कार्यवाही काहीच नाही. आता १२ कोटीची मागणी केलेली सिडकोकडून सिडकोचया मालकीच्या असलेल्या इमारतीच्या मोबदल्यात १० कोटी टॅक्स देण्याच्या बदल्यात वजा करुन फक्त महानगरपालिकेस २ कोटी रुपये मिळणार असून महानगरपालिकेची सिडकोकडून फसवणूक होईल ज्या दिवसापासून सिडको महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल त्या दिवसापासून महानगरपालिकेने टॅक्स आकारणी करावी. महानगरपालिकेमार्फत सिडको वासियांना फक्त पाणी देण्यात येते सुविधा काहीही नाही. सिडको नागरीकांमुळे महानगरपालिकेस जकात मिळते. मालमत्ता कराची जास्तीत जासत वसुली होणे गरजेचे असून ज्या झोन मधून वसुली जास्त झाली अशा कर्मचाऱ्यांचें अभिनंदन करण्यात यावे व ज्या झोनची वसुली ८० टक्के वर झाल्यास अशा कर्मचाऱ्यांना विशेष असे पुरस्कार देण्यात यावे. घर तेथे कर लावला गेलाच पाहिजे.

मा.महापौर : १२.८५ कोटी टॅक्स सिडकोकडून वसुल करावा अशी स.सभासदांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत. शहरामध्ये ज्या नविन प्रॉपर्टी झालेल्या आहेत अशा प्रॉपर्टीजला नव्याने एन.आर.व्ही. काढली जाईल व त्या पध्दतीने टॅक्स वसुल करण्यात येईल्.

श्री.तकीहसन खॉंन : अ,ब,क,ड नुसार वर्गवारी करावी त्यानुसार एन.आर.व्ही निश्चित करुन टॅक्स वसुल करण्याची कार्यवाही व्हावी. बी ॲण्ड सी ज्याप्रमाणे टॅक्स लावते त्याप्रमाणे कार्यवाही केली गेली पाहिजे.

मा.आयुक्त : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर १/४ मालमत्तेची एन.आर.व्ही नव्याने काढणार आहोत. १२.८५ कोटीची आपली मागणी असून येणारे उत्पन्न आहे. नविन मालमत्त असेल तर नविन एन.आर.व्ही. लागणार आहे. त्यानुसार टॅक्स लावण्यात येईल. हस्तांतरण नंतर लवीन एन.आर.व्ही. नविन टॅक्स मालमत्ता धारकाकडून वसुल करण्यात येणार आहे. प्रस्तावित जी वाढ करण्यात आलेली आहे ती विद्यमान घरांना कर आकारणी केलेली नाही. ८९-९० जे रेट होते त्याच रेटने आकारणी होत आहे. १.४९ प्रति चौ.मी. इतक्या फरकांने लहान मोठ्या मालमत्ताच्या कर आकारणी मध्ये फरक आहेत. नविन घरांना तसेच जुने घराचे केलेले वाढीव बांधकामांना नविन कर लागेल.

श्री. प्रकाश निकाळजे : सिडको कडून येणारी थकबाकी वगळून मान्यता देण्यात यावी.

श्री. सुदाम निकाळजे : १२.८५ कोटीची थकबाकी सिडकोकडून वसुल करावी म्हणून सर्वसाधारण सभेने ठराव पास केलेला आहे. त्या ठरावानुसार सिडकोकडून मालमत्ता कर मिळाला तर नवीन दराने हस्तांतरण झाल्यानंतर महानगरपालिकेला आकारणी करता येणार नाही. सिडको कडून १२.८५ कोटी वसुल करावे. सिडकोने महानगरपालिकेस थकीत करापोटी रक्कम दिल्यास जुनेच रेटचे कर आकारणी करावी लागेल.

मा.महापौर : स.सभासद श्री. सोनवणे यांनी नविन प्रश्न उपस्थित केलेला आहे. एखाद्या घराला जुना कर लावला असेल तर त्या घराला पुन्हा नविन कर लावता येणार नाही. सिडको हस्तांतरणासंदर्भात बऱ्याच वेळा बैठकी झालेल्या आहे. मी स्वतःच्या बैठकीत हजर होतो. काही स.सदस्यांचा सुध्दा बैठकीमध्ये समावेश होता. त्यावेळेस असली मागणी ठरावात नाही. सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यास अनाधिकृत डिनोटीफाईड

एरियामधील बांधकामापोटी १५ कोटी रुपयाची मागणी महानगरपालिकेची आहे. या संदर्भात सिडको प्रशासन यांची सुध्दा हस्तांतरण करण्याच्या संदर्भात विशेष बैठक झाली.

या संदर्भात सिडकोचे काही स.सदस्य माझ्याकडे आले व महानगरपालिकेस मालमत्ता कर मिळणार नाही. सिडको रहिवाशांच्या माध्यमातून महानगरपालिकेस जकात मिळते. हस्तांतरणा नंतर सिडको मध्ये मुलभूत सुविधा द्याव्या लागणार आहे असे मत मांडले. सभागृहाची १२ कोटीची जी मागणी आहे त्याप्रमाणे सिडकोकडून वसुल करावे. आपल्या भावना महाराष्ट्र शासनास कळविण्यात येतील आपण मागील थकबाकी वसुल केल्यास नविन एन.आर.व्ही.प्रमाणे कर लावता येणार नाही व येणाऱ्या बजेटमध्ये १२ कोटीची थकबाकी ठेवता येणार नाही. मालमत्ता कर वसुली २४ कोटीच्या उद्दिष्टास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. आता महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबींवर म्हणजेच जकात या विषयावर चर्चा करावी.

## १) जकात

मा.महापौर : जकातीचे खाजगीकरण झाले नाही तर रिवाईज बजेटमध्ये कमी होईल ६१ कोटीचे टारगेट असून खाजगीकरण झाले नाही तरी प्रशासनाने ६१ कोटीचे उद्दिष्ट समजून वसुली करण्याचा प्रयत्न करावा.

श्री. कुमावत अविनाश : खाजगीकरण होण्या संदर्भात उद्या निविदा भरण्याची शेवटची तारीख असुन ३१ मार्च पर्यंत उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. त्यासाठी महानगरपालिकेने ५० कोटीची वसुली ३१ मार्च पर्यंत करणे आवश्यक आहे. तेवढी वसुली होणार आहे का? खुलासा करावा.

श्री. सोनवणे सुदाम : महानगरपालिकेचा जकात हा उत्पन्नाचा कणा समजला जातो. मागील वर्षी बजेटमध्ये ५३ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यापैकी आतापर्यंत किती वसुली झाली व ५० कोटीचे उद्दिष्ट पूर्ण होणार असे गृहीत धरुन ६१ कोटीचे खाजगीकरणाठी उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. उद्या निविदा भरण्याची शेवटची तारीख आहे. म्हणून ३१ मार्च पर्यंत ५० कोटीचे टारगेट पूर्ण होणार आह काय याचा खुलासा व्हावा. वसुली होत नसेल त्याची कारणे काय त्याचा पण खुलासा द्यावा.

श्री. अफसर खॉंन : ५३ कोटीचे उद्दिष्ट होते आतापर्यंत ४४ कोटी वसुली झालेली आहे. अशी माहिती हाती आलेली आहे. खाजगीकरण करायचे असेल तर ६१ कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले त्यासाठी ५० कोटी रुपये वसुल होणे गरजेचे आहे नसता निविदा कमी काढण्यात आली याचा सुध्दा खुलासा प्रशासनाने करावयास पाहिजे. ५३ कोटीवरुन ५० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले असतांना सुध्दा मार्च अखेर ५० कोटी रुपये वसुल होण्याची चिन्हे दिसत नाहीत. ४७ कोटीपर्यंत वसुली होईल अशी अपेक्षा आहे. म्हणजेच चालू वर्षात जकातपोटी महानगरपालिकेला ५ कोटीचा तोटा झाल्याचे दिसून येते. ५० कोटीचे उद्दिष्ट पूर्ण होण्याच्या अटीवर ६१ कोटीचे उद्दिष्ट खाजगीकरणासाठी काढलेल आहे. म्हणून ५० कोटी वसुल झाले नाही तर

संबंधीत अधिकाऱ्यावर योग्य ती कडक कार्यवाही करण्यात यावी. ६१ कोटीच्या निविदा का काढण्यात आल्या त्याचा सुध्दा खुलासा व्हावयास पाहिजे. अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरल्यास जकातीमध्ये नक्कीच वाढ होईल यात शंका नाही.

जयवंत ओक : जकात खाजगीकरण होणार, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल, विकास कामे होतील अशी ६ महिन्यापासुन चर्चा चालू आहे. मालमत्ता, पाणीपट्टी ज्याप्रमाणे वसुली होते. त्याप्रमाणे जकातीची वसुली झाली पहिजे. जे उद्दिष्ट निश्चित कले ते पूर्ण झालेच पाहिजे. यावरच जकात खाजगीकरण करण्यासंदर्भात ६१ कोटीचे उद्दिष्ट ठरवण्यात आलेले आहेत. जकातीचे उत्पन्न वाढले तरच विकास कामे करता येतील यात शंका नाही. ६१ कोटीचे उद्दिष्ट होणार व विकास कामे होणार नाही असे होता कामा नये. जकात खाजगीकरण न होण्याची कारणे का? याचा सुध्दा खुलासा मा.आयुक्तांनी केला पाहिजे. सभागृहात चुकीची माहिती देण्यात येऊ नये. जे ५३ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले ते कमी करुन ५० कोटी निश्चित केले व त्यावरच खाजगीकरण होण्याचा अवलंबून आहे. आतापर्यंत ४४ कोटीचेच टारगेट ठरवण्यात यावे व ६१ कोटीच वसुले झाले पाहिजे असे ध्येय प्रशासनाने ठेवावे जाकतीचे उद्दिष्ट पूर्ण न होण्यामागे जकातीमध्ये काही प्रकार चालतो काय असे होत असेल तर मा.आयुक्तांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. खाजगीकरण करण्याची का गरज पडली याचा सुध्दा खुलासा झाला पहिजे. सभागृहाच्या व प्रशासनाच्या भावना काय आहेत या जनतेला सुध्दा समजल्या पाहिजे. माझ्या मुद्दा लक्षात घ्यावा. खाजगीकरण झाले पाहिजे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल व विकास कामे होतील. आजची परिस्थिती अशी की, १ वर्षापासून संगणक प्रशिक्षण, ड्रायविंग प्रशिक्षण देण्याबाबतचा निर्णय झाला असतांना १ वर्षापासून संचिका सही विना टेबलावर पडून आहे. बजेट नाही असे सांगितले जाते हे योग्य नाही. म्हणून खाजगीकरण होईल न होईल ६१ कोटीच वसुल करण्याचे प्रशासनाला आदेश करावे व ६१ कोटीच वसुली पुढील वर्षात पाहिजे. यामुळे शहरातील विकास कामे होण्यास मदत होईल.

श्री. प्रशांत देसरडा : जकातीचे खाजगीकरण होण्यासाठी ६१ कोटीचे उद्दिष्ट देण्यात आले. मागील वर्षाची मार्च महिन्यातील काही तारखाची वसुली व चालू वर्षातील मार्च महिन्याची त्याच तारखेच वसुली पाहता आकडेवारी खालीलप्रमाणे आहे. दि.६.३.२००० रोजी १३.२३ लाख तर दि.६.३.२००१ रोजी ८.३९ लाख वसुली झालेली आहे. तसेच दि.९.३.२००० रोजी १३.०७ लाख तर दि.९.३.२००१ रोजी ८.७६ लाख वसुली झालेचे दाखवण्यात आले. दि.१०.३.२००० रोजी १२.२० लाख तर दि.११.३.२००१ रोजी ७.५१ लाख वसुली झालेली आहे. यावरुन असे दिसून येते की, या वर्षी पेक्षा मागील वर्षी मार्च महिन्यातील काही तारखाची वसुली जास्त प्रमाणात झालेली आहे. खाजगीकरणाचे जे उद्दिष्ट दाखवले ते नुसते फुगवून दाखविलेले आहे. असे वरील आकडेवारीनुसार दिसून येते. जिकात विभागामार्फत ट्रान्सफर डिलेवरी कशी घेतली जाते याचा खुलासा व्हावा. ट्रान्सफर डिलेवरी जकत नाक्यावर वसुल करावयास पाहिजे. नमुना म्हणून ४ ते ५ दिवसाचा आढावा घेतला असता यात जवळपास ५० टक्के वसुली कमी झाल्याचे दिसून येत

आहे. वसुली का कमी झालेली आहे याचा खलासा व्हावा. ५० कोटीचे उद्दिष्ट पूर्ण होणार का होत नसेल तर ६१ कोटीचे खाजगीकरणसाठी ठेवलेले उद्दिष्ट कोणता निकष लावून ठेवण्यात आले माहिती देण्यात यावी.

श्री. प्रकाश निकाळजे : जकातीचे खाजगीकरण होणार म्हणून जानेवारीपासून जकात वसुली कमी होत आहे. कर्मचारी यात फायदा उचलत आहे. जालना नाक्यावर मागील महिन्यात सिमेंटच्या गाड्या जकात न भरता आलेल्या होत्या. त्याचप्रमाणे फेब्रुवारी महिन्यात ४० गाड्या जकात न भरता आलेल्या आहेत. सातारा परिसरात नुसती पाटी मा सिमेंट औरंगाबादमध्ये यावरु कर्मचारी प्रशासनाच्या डोळ्यात धूळफेक करीत आहे. गाडीमध्ये कोणता माल व किती माल आला याची खरी पाहणी होत नाही त्यामुळे जकात बुडवण्याचा प्रकार वाढलेला आहे. ट्रान्सपोर्ट यांच्या गाड्या सोडून देण्यात येतात हे योग्य नाही. जकातीचे खाजगीकरण होणार व या विभागातून आपल्या बदल्या होणार म्हणून जेवढी सुट देता येईल तेवढी देण्यात येत असून आपआपले खिसे भरण्याचे काम जकात विभागातील कर्मचारी करत आहे. म्हणून जानेवारी २००० ची आकडेवारी पाहिली असता १४ ते १५ लाख दररोजची वसुली होत असे परंतु आज आकडेवारी ७ ते ८ लाख वसुली होत आहे. जवळपास ५० टक्के वसुलीत घट येत आहे. यास कोण दोषी याचा शोध घेतला पाहिजे व विशेषतः मा.आयुक्तांनी योग्य ते लक्ष देणे गरजेचे आहे. काही सना निमित्त वसुली जास्त येण्या ऐवजी कमी वसुली झाल्याचे दाखवलेले आहे. शहरामध्ये १००-१०० गाड्या येत असतांना ५ ते १० गाड्या आल्याची नोंद होत आहे. यामध्ये जे कर्मचारी दोषी असेल त्यांना प्रशासनाने धडा शिकवावा. दि.१२.३.२००१ पर्यंत मागील वर्षाची वसुली पाहता ७० लक्ष रुपयाची तुट येत आहे. जकातीमध्ये चोरी होत आहे. हे सर्व जाणून आहे. कर्मचाऱ्यांवर वचक असावा यासाठी मा.आयुक्तांनी पावले उचलावी आताच मा.आयुक्तांनी सांगितले की, ४ कर्मचाऱ्यांच्या ऑर्डर्स तयार आहे. जे कर्मचारी दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करतेवेळी व ज्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे अशा कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केल्यास कुणीही पाठीशी घालणार नाही. या संबंधीची सविस्तर सखोल चौकशी व्हावी व जकातीचे उत्पन्न कसे वाढवता येईल व विकास कामास मदत होईल याकडे पाहावे.

श्री. कोकाटे काशिनाथ : जकात या महत्त्वाच्या विषयावर चर्चा चालु असून बरेच स.सदस्यांनी जकात विषयावर वेगवेगळ्या प्रकारचे चर्चा केली जकातीमध्ये जी आकडेवारी दिली ती चुकीची दाखविण्यात येत आहे. असे मत मांडले. गेल्या वर्षीचे उद्दिष्ट ५३ कोटीचे होते. कालपर्यंत ४४ कोटी वसुली झालेली आहे व ८ दिवसाची आकडेवारी पाहता बाकी असलेल्या यापुढील १५ दिवसामध्ये ४६ ते ४६.५ कोटीपर्यंत जकात वसुल होईल असे दिसून येत आहे. म्हणजेच ७० ते ७२ टक्के वसुली होईल. मालमत्ता कराची वसुली कमी होण्याची कारणे म्हणजे बरीच प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत याचा ते वगळल्यास ८० ते ८५ टक्के वसुली होते. दरवर्षी जकातीपोटी तुट येत आहे. यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न कमी होते व विकास कामे सुध्दा होत नाही. यावर्षी सुध्दा खाजगीकरण करणार व ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. खाजगीकरण होऊ नये म्हणून कर्मचारी व इतर काही हितचिंतक

लोकांनी षडयंत्र तयार केले. आकडा खाजगीकरणासाठी फुगवून दिला व टेंडर काढले आहे कर्मचारी कामाल लागले. पुन्हा निविदा काढून ६१ कोटीचेच खाजगीकरणासाठी उद्दिष्ट निश्चित केले. ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवतांना कोणता निकष लावला गेला आज जकात पोटी वसुलीचा विचार करता मार्च अखे ४६ कोटी वसुली होणार आहे. त्यामध्ये जकात विभागातील कर्मचाऱ्यांना खर्च स्टेशनरी इ.मिळून २ कोटी खर्च होणार. उर्वरीत ४४ कोटी रुपये महानगरपालिकेचे उत्पन्न येते असे गृहीत धरुन ६१ कोटी वसुली खाजगीकरण माध्यमातून करायची असेल तर चालू वर्षाचे तेवढे उद्दिष्ट प्रशासन पूर्ण करु शकेल काय? ६१ कोटीचे उद्दिष्ट द्यायचे असेल तर त्या प्रमाणाकानुसार वसुली झाली पाहिजे महानगरपालिकेस ७ कोटीचा भूर्दंड सोसावा लागतो आहे याचे कारणे कोणती? ६१ कोटीचे उद्दिष्ट खाजगीकरणासाठी निश्चित केले. खाजगीकरण होईल न होईल ६१ कोटी वसुल करण्याचा निर्णय व्हावा. आज वेळ गेला तरी चालेल परंतु मुळ शोधात जाण्याची गरज आहे. वसुली होत नाही म्हणून विकास कामे होत नाही व जकात वसुल होत नाही यास कारणीभूत नगरसेवक आहेत असा कट रचण्याचा काहीही प्रयत्न चालू आहे. १ दिवसामध्ये बजेट मंजुर करायचे अशी अपेक्षा न ठेवता सविस्तर यावर चर्चा होऊन निर्णय घेतले गेले पाहिजे. अताच स.सदस्यांनी सूचना केली की, कुठे तरी पाणी मुरते हे पाणी उंदराचे बिळात मुरत नसून घुशीचे बिळात मुरत आहे. ते बिळ आज येथे बंद करण्याची आवश्यकता आहे. म्हणून सविस्तर चर्चा होऊन हा अर्थसंकल्प मंजूर करावा. ६१ कोटीचे उद्दिष्ट कसे ठेवले आकडेवारी चुकीची दिली का? मागील वर्षाचे उद्दिष्ट पूर्ण न होण्याची कारणे या सर्वांचा खुलासा प्रशासनाने करावा.

भगवान घडामोडे : जकात उत्पन्नाच्या संदर्भात चर्चा चालु असून जकात वसुली चांगल्याप्रकारे झाल्यास विकास कामे होण्यास मदत होईल. मध्येच खाजगीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. खाजगीकरण करायचे असेल तर ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवले होते व महानगरपालिकेने वसुली करायची असेल तर आता ५३ कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. तर महानगरपालिका ६१ कोटीचे उद्दिष्ट पुर्ण करण्यास सक्षम नाही. आपले अधिकारी अकार्यक्षम आहे का? असा प्रन निर्माण होतो. काही दिवसापुर्वी पहाडे नावाच्या एका जवानास निलंबीत करण्यात आलेले होते. एक ट्रक जकात चुकवून शहरात गेल्यानंतर दुसरे कर्मचाऱ्यांनी तपास करुन संबंधित ट्रक मालकाकडुन १० पट दंड म्हणुन वसुल करण्यास आल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन होते चांगली बाब आहे. परंतु सुरुवातस जर ट्रक विना जकात सोडला नाही तर अशी वेळ येत नाही म्हणुन असे कुणी कर्मचारी नाक्यावर असेल त्यांना प्रशासनाचे अधिकाऱ्यांचा धाक असला पाहिजे. जेणेकरुन जकात वाढवण्यास मदत होऊ शकते एखाद्या कंपनीचे ऑफिस शहरामध्ये असुन गोडावुन बाहेर व त्याचा माल बाहेर जात असतांना आपण जकात आकारणी करणे योग्य आहे काय? या सर्व बाबीचा प्रशासनाने ताळमेळ राखला पाहिजे. जेणे करुन कुणावर अन्याय होणार नाही. व जाकत विभागामध्ये जे कर्मचारी कामचुकार पणा करतील भ्रष्टाचार करतील अशा कर्मचाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे बदल्या सुध्दा करण्यात आल्या पाहिजे. जकात हा

महानगरपालिके्चा उत्पन्नाचा कणा असुन महत्त्वाच्या विषयावर चर्चा चालु आहे. खाजगीकरण व्होवो अगर न व्होवो ६१ कोटीचे उद्दिष्ट पुर्ण करण्याची प्रशासनाची तयार असावी व तशी कार्यवाही प्रशासनाने करावी. जे कर्मचारी चांगल्याप्रकारे कामे करतील त्यांचे अभिनंदन केले गेले पाहिजे. ६१ कोटीचे उद्दिष्ट महानगरपालिकेचे आहे. असे जनतेच्या मनात भावना व्यक्त केलेल्या आहेत व आता या उद्दिष्टानुसार पुढील वर्षात होणारी विकास कामे करायची आहे व जे उद्दिष्ट ठेवलेले आहे ते पुर्ण झाले नाही तर विकास कामे होणार नाही व त्यामुळे जनता ही महानगरपालिकेला बदनाम करील व त्यात नगरसेवक ही बदनाम होतील आता सध्या ज्या ज्या संचिकेवर बजेट नाही असे लिहुन येत आहे व कोणतीच कामे वेळेवर होत नाही म्हणुन या विषयावर सविस्तर चर्चा होऊन चांगल्याप्रकारे निर्णय व्हावा व भविष्यात चांगल्याप्रकारे विकास कामे होतील अशी अपेक्षा बाळगतो.

श्री. दानवे अंबादास : महानगरपालिकेस जकातीपोटी १२ मार्च पर्यंत ४४,४४,१४६४५/- रुपये वसुली झालेली आहे. जकातीचे खाजगीकरण करणार आहोत ६१ कोटीचे उद्दिष्ट त्यात ठेवलेले आहे. खाजगीकरण होईल न होईल हा धोरणात्मक निर्णय आहे. सध्या जी वसुली होत आहे ती ३१ मार्च पर्यंत ५० कोटी होईल या अपेक्षेवर ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. वसुली झालेली आकडेवारी व दररोजची होणारी वसुली याचा विचार करता ३१ मार्च पर्यंत जवळपास ४७ ते ४८ कोटी वसुली ही जकातीपोटी होईल असा अंदाज येतो. ३१ मार्च पर्यंत ५० कोटीचे उद्दिष्ट पुर्ण होणे गरजेचे आहे कारण प्रशासनातर्फे ५० कोटीच्या भरवशावर ६१ कोटीचे टेंडर काढण्यात आलेले होते. म्हणजेच कायद्यानुसार ५० कोटी रुपये ३१ मार्च पर्यंत येणे गरजेचे आहे. शासनाच्या नियमाची आपण अंमलबजावणी करत आहोत जर ४७ ते ४८ कोटी रुपयेच वसुल झाल्यास २० टक्के वाढ धरता ५७ ते ५८ कोटीचे उद्दिष्ट होऊ शकले. जकात वसुली कमी होण्याची कारणे रविवार, धुलीवंदन, महावीर जयंती, शिवजयंती होती अशी विविध जयंत्यांची कारणे सांगण्यात आलेली आहे. परंतु दरवर्षी जयंती साजरी होत असते. धुलीवंदन दर वर्षीच होते. गेल्या रविवारी म्हणजेच ११ तारखेला ७ लाख ५१ हजार वसुली झाली आहे. वसुली कमी झाली त्याचे कारण रविवार असल्यामुळे वसुली कमी आल्याचे प्रशासनराचे म्हणणे आहे परंतु त्या मागचा रविवार वसुली झालेचे मी आणले आहे. दि. १ ला ११ लाख ८१ हजार वसुली झाली आहे परंतु रविवारची ११ लाख ३४ हजार त्या मागच्या रविवारी सुध्दा ११ लाख ९४ हजार त्या मागच्या रविवारी सुध्दा १२ लाख ४४ हजार मागील प्रत्येक रविवारी जास्त वसुली झाली फक्त गेल्या रविवारचीच वसुली ७ लाख झाल्याचे दाखवले हा रविवार काही विशेष होता काय? महाराष्ट्रामध्ये या शहराला सेलटॅक्स मध्ये सर्वात जास्त वसुली झालेली आहे. महाराष्ट्रामध्ये पहिला क्रमांक आहे. असे वृत्तपत्रात दिलेले आहे. त्याची नोंद सुध्दा प्रशासनाने घेणे गरजेचे आहे. मराठवाड्यातील संपुर्ण जेवढा सेलटॅक्स आहे त्यापैकी ३५ टक्के सेलटॅक्स या शहरातुन भरल्या जातो तर त्या प्रमाणात जकात वसुली झालेली आहे का? याची माहिती द्यावयाची झाल्यास सेलटॅक्स विभागाकडुन माहिती घेतल्यास नेमकी किती वसुली झाली हे दिसुन येईल. हे सर्व काम जकात विभागाला हाती घ्यावे लागेल जकात

विभागातील काही अधिकाऱ्याकडे प्र.झोन अधिकारी म्हणुन दोन दोन चार्ज देण्यात आलेले आहे. त्यामुळे वसुली होण्यास अडचण येऊ शकते. तसेच न्यायालयात सुध्दा बऱ्याच केसेस पेंडींग आहेत त्या संदर्भात सुध्दा गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. आताच ४ दिवसापुर्वी मा.आयुक्तांनी सांगितले की, आपल्याकडे खूप करार पत्रक झालेले आहे. ती वसुली कशी होणार त्याचे नियम काय आहे. याकडे सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे. जकातीचे वसुली व्हावी म्हणुन मा.आयुक्तांनी वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न केलेले आहेत. अनेक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या तरी सुध्दा म्हणावे तसे यश मिळालेले नाही. मधल्या काळात १४ ते १५ लाख दररोजची वसुली होत असे आता सध्या १०,११,१२ लाख वसुली होत आहे. एवढी तफावत येणे योग्य वाटत नाही. मध्यंतरी गुजरात मध्ये त्यातल्या त्यात भूजमध्ये फार मोठा व्यापार चालत नाही. १ ते २ टक्के व्यापार तेथे होतो. सर्वात जास्त व्यापार मुंबई आणि भुटो मध्ये होत आहे. येथे कोणत्याही व्यापरात कमतरता आलेली नाही. उलट व्यापार वाढलेला आहे. य सर्व बाबींवर अभ्यास केल्यास मा.आयुक्तांना सांगु इच्छितो की, यावर गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. ३१ मार्च पर्यंत ५० कोटी रुपये वसुली होणे आवश्यक आहे. त्यानुसारच ६१ कोटीचे खाजगीकरणासाठी उद्दिष्ट आपण ठेवू शकतो. ५० कोटी उद्दिष्ट होऊ नये व ६१ कोटीचे खाजगीकरणाचे टेंडर निघु नये अशी भावना समोर ठेवून अधिकारी/कर्मचारी यांनी यात मदत केलेली आहे काय याची सुध्दा शहानिशा झाली पाहिजे. बरेच लोकांनी सेलटॅक्स भरलेले याची सुध्दा क्रॉस चेंकींग केल्यास महानगरपालिकेला जकात पोटी उत्पन्न वाढवू शकेल व येणाऱ्या वर्षासाठी ६१ कोटीचे उद्दिष्ट कसे ठेवता येईल याकडे मा.आयुक्तांनी गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे व उद्दिष्ट साध्य झाल्यास विकास कामे आपणांस करता येतील याचीसुध्दा जाणीव ठेवूनच कार्यवाही केली पाहिजे.

मा.महापौर : चालु वर्षाचे उत्पन्न आपण ५३ कोटीचे ठेवलेले होते. ते ५० कोटीवर आणलेले आहे. आता ५० कोटी सुध्दा वसुली होत नसल्याची शंका सभागृहाने व्यक्त केली व त्यानुसार विभाग प्रमुख जकात अधिक्षक व संबंधीत अधिकारी यांनांच जबाबदार धरावे असे मत सभागृहाने व्यक्त केलेले आहे. दुसरी बाब अशी की जकात खाजगीकरण करावे कारण त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल दरवर्घी महानगरपालिकेला ५ ते ६ कोटी रुपयाचा तोटा सहन करावा लागत आहे. यावर्षी उद्दिष्ट ५३ कोटी होते ५० कोटीवर आणले आता ५० कोटी सुध्दा वसुली होत नाही ४८ कोटीपर्यंत जाईल असे मत सभागृहाने व्यक्त केलेले आहे. ६१ कोटीचे टारगेट कसे ठेवले या संबंधी मुख्यालेखाधिकारी यांनी खुलासा करायचा आहे. त्या अगोदर ५० कोटीचे टारगेट पुर्ण का झाले नाही व ते पुर्ण करण्यासाठी प्रशासन काय प्रयत्न करणार आहे.

मा.उपआयुक्त (प्र) : जकात वसुलीमध्ये गेल्या १२ तारखेपासुन घट झालेली आहे. त्याची विविध कारणे् आहे ती कारणे अशी की,

चालु वर्षाचे उद्दिष्ट सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार ५३ कोटीचे ठेवलेले होते. स्थायी समितीमध्ये ते ५० कोटी करण्या आलेले आहे. त्यानुसार प्रशासनामार्फत ५० कोटीच वसुल करण्याची कार्यवाही चालु होती.

गेल्या १२ मार्च पर्यंत ४४ कोटी ४४ लाख रुपये वसुली झालेली आहे व आज पासुन १६ दिवसामध्ये अपेक्षित वसुली ही २ कोटी ५२ लाख होईल अशी अपेक्षा आहे. आणखी काही शहरातील चालु खातेदार आहेत त्याची तपासणी चालु काही शहरातील चालु खातेदार आहेत त्याची तपासणी चालु असुन एकणुा ३८ लाख रुपये वसुल होतील अशी अपेक्षा आहे. एम.एस.ई.बी. कडुन २० लाख, वेगवेगळ्या कंपन्याकडुन २५ लाख येणार आहे. एकंदरीत हिशोब केल्यास संपुर्ण वसुली ४८ कोटी होईल अशी अपेक्षा आहे. या शिवाय १ कोटी ९६ लाखाचे पुन्हा आणखी टारगेट आहे. मागील दोन दिवसापुर्वी मा.आयुक्तांनी आम्हाला आदेश दिलेले आहे वा त्यानुसार प्रशासनाच्या वतीने वेगवेगळ्या पध्दतीने उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी प्रयत्न होणार आहे. शहरात आणि शहराच्या बाहेर काही कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या असुन चालु वर्षाचे ५० कोटी रुपये जकातीपेटी वसुली करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. असे सभागृहाला आश्वासन देत आहे. मागील वर्षी मार्च महिन्यात ४.६५ कोटी रु. वसुली झालेली होती. याहीवेळेस त्रास काढुन धावपळ करावी लागणार आहे व जे उद्दिष्ट ठरलेले होते ते पुर्ा करणे आवश्यक राहील.

श्री. दानवे अंबादास : जकात विभाग प्रमुख म्हणुन उपआयुक्त (प्र) यांनी जो खुलासा केलेला आहे तो योग्य नाही कारण जे ६१ कोटीचे टारगेट दिलेले आहे त्यासाठी ३१ मार्च पर्यंत कोणत्याही परिस्थितीत ५० कोटी रुपये जकातीपेटी वसुल होणे गरजेचे आहे. अमुक रक्कम येणार १० लाख २० लाख येणार त्यावर अवलबून राहणे योग्य नाही. ५० कोटी वसुल झालेच पाहिजे यावर सर्व भवितव्य अवलंबून आहे. वसुली होणार की नाही, का नाही होणार याचा खुलासा द्यावा खाजगीकरण होणार म्हणुन जकात वसुली १४ ते १५ लाखाहुन ७ ते ८ लाखावर आलेली अहे.

श्री. अफसरखॉंन : जकातीचे खाजगीकरण होणार म्हणुन ३ ते ४ महिन्यापासुन जकात वसुली कमी येत आहे. ११ ते १२ लाख येत आहे. त्यापुर्वी १५ ते १६ लाख येत. जकात वसुलीचे उद्दिष्ट ५० कोटी होणार नाही व त्यानुसार ६१ कोटीचे खाजगीकरणासाठी उद्दिष्ट ठेवता येणार नाही. खाजगीकरण होऊ नये म्हणुन प्रयत्न होत असल्याचे कळते.

श्री. दानवे अंबादास : जकातीचे खाजगीकारण होणार व जेव्हा दुसऱ्यांदा टेंडर निघाले तेव्हापासुन जकात वसुलीत घट आलेली आहे. जे उद्दिष्ट ठेवलेल आहे ते पुर्ण होणे गरजेचे आहे कारण त्यावरच पुढील सर्व बाब अवलंबुन आहे. इतकी रक्कम येणार यावर अवलंबून न राहता या सभागृहातर्फे स्पष्ट सूचना मांडू इचिछतो की, मा.महापौर यांनी संबंधीत विभाग प्रमुख उपआयुक्त (प्र) यांचेकडुन स्पष्ट खुलासा घ्यावा की ५० कोटीचे टारगेट पुर्ण होणार आहे ते पुर्ण होणार आहे का होत नसल्यास का होत नाही व झाले नाही तर काय कार्यवाही करणार याचा खुलासा आजच झाला पाहिजे.

मा.महापौर : गेल्या १२ मार्च पर्यंत जकाती पोटी ४४ कोटी लाख वसुली झालेली असुन आणखी १८ दिवसामध्ये ५० कोटीपर्यंत वसुली होईल का? काय उपाययोजना केली त्याचा खुलासा द्यावा.

मा.उपआयुक्त (प्र) : जकात विभागामध्ये गेल्या १२ तारखेपासुन ३ पथक तयार केले असुन तिन्ही पाळीत कामे करणार आहेत.

श्री. अफसरखाँन : या अगोदर अशी पथके का केली नाही संपुर्ण वर्ष संपलेल आहे. प्रशासन चुकीची माहिती देत असुन टारगेट पुर्ण होणार नाही अशा अधिकाऱ्यांवर जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांवर कडक कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत.

श्री. जयवंत ओक : जकातीचे खाजगीकरण होऊ नये म्हणुन वसुली कमी दाखवण्यामागे अधिकारी / कर्मचाऱ्यांचा यात हात असावा असे स्पष्ट होत आहे. मा.आयुक्त भोगे साहेब असतांन दररोजची वसुली ही १७ ते १८ लाख होत असे कुठेतरी पाणी मुरते आहे. ५० कोटीचे टारगेट प्रशासनाने करुन द्यायचे आहे. जकात खाजगीकरण होवो अगर न होवो ५० कोटी वसुली जकातीपोटी महानगरपालिकेस मिळावयास पाहिजे. व पुढील वर्षासाठी ६१ कोटीचे टारगेट ठेवण्यात यावे व तेवढी वसुली करण्याची जबाबदारी प्रशासनावर टाकावी. गेल्या ६ महिन्यापासुन खाजगीकरण होणार म्हणुन १ ले त्यानंतर दुसऱ्यांदा टेंडर काढलयापासुन ६,७,८ लाख जकात वसुली होण्यास सुरुवात झाली. याची चौकशी झाली पाहिजे व जबाबदार जे असतील त्यांचेवर कडक कार्यवाही झाली पाहिजे. जकात चुकवून बरेच व्यापारी शहरात माल आणतात शहरातील मोठमोठ्या दुकानावर धाडी टाकाव्या कुणावरही दया दाखवू नये वसुली करण्यात यावी व टारगेट पुर्ण करावे. एका महिलेला माल धरला तेथे यंत्रणा कार्यक्षम आह असे दाखवले जाते. इतर ठिकाणी का नाही संबंधीत महिलाकडून १० टक्के प्रमाणे् जकात वसुल केली. २ दिवसानंतर एक कर्मचारी शहरात जाऊन माल पकडतो व वसुली करतो कशासाठी त्याचे अभिनंदन करायचे पहिल्यांदाच नाक्यावरुन हा माल का सोडण्यात येतो तेथील कर्मचाऱ्यांवर कडक कार्यवाही झाली पाहिजे. त्यामुळे जकातीच्या चोरीस आळा बसेल व खाजगीकरण नाही झाले तरी महानगरपालिका प्रशासनाने आपल्या कर्मचाऱ्यामार्फत ६१ कोटीचे जकातीपोटी वसुली या वर्षापासुन वसुल झालीच पाहिजे असे ध्येय ठेवून कार्यवाही करावी.

श्री. अफसरखाँन : जकात विभागामध्ये बरेच कर्मचारी १० ते १२ वर्षापासुन कार्यरत आहे त्यांचे बदल्या करण्यासंदर्भात निर्णय झालेला असतांना अद्याप कार्यवाही केलेली नाही

श्री. जयवंत ओक : शासनाकडे बदल्या करण्यासंदर्भात परवानगी घ्यावी त्यानुसार अधिकाऱ्यांच्या सुध्दा बदल्या या विभागातुन दुसऱ्या विभागामध्ये झाल्या पाहिजे.

मा.महापौर : कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येऊ नये असा शासनाचा जी.आर. होता यासंबंधी प्रशासनाचा खुलासा घेतला जाईल. जकात वसुलीत काय अडचण आहे याबद्दल प्रशासनाचे म्हणणे आपण ऐकुण घ्यावे.

श्री. दानवे अंबादास : जकात वसुली होत नाही म्हणुन मी वेगवेगळे प्रश्न उपस्थित केलेले होते. त्यामध्ये सेलटॅक्स नुसार वसुली व दुसरा करार पत्रकानुसार वसुली परंतु अनेक धनादेश सुध्दा बाऊन्स झालेले आहेत यातून खुप मोठी रक्कम येणे बाकी आहे. एक महिन्यापुर्वी मी स्वतः तक्रार केली होती की, एक पेट्रोलचे टँकर गरवारे पॉलियस्टर कंपनीच्या नावाने आलेले होते. सदर टँकर गरवारे कडे न जाता शहरात येऊन एक पेट्रोल पंपावर पेट्रोल उतरतांना पाहिले. रिकामे झाल्यानंतर टँकर निघून गेले व याची माहिती उपआयुक्त जकात अधिक्षक यांना दिली तसेच पर्चेस मॅनेजर गरवारेचे

यांचेशी सुध्दा संपर्क साधला असता त्यांनी असे सांगितले की, अशी कोणत्याही प्रकारची ऑर्डर आम्ही पेट्रोल बाबतीत दिलेली नव्हती. अशा किती जकात चुकविण्याच्या घटना होत असतील गरवारे कंपनीने रितसर तक्रार जे कुणी कंपनीच्या नावाने पेट्रोल घेऊन आले होते. त्यांचेवर केलेली आहे व मी लेखी तक्रार दिलयानंतर सुध्दा काहीही दखल घेतली गेली नाही. असे प्रकार जकातीत घडत आहे. अधिकाऱ्यांना सर्व माहिती असते. परंतु कार्यवाही करत नाही. जी ४४ कोटी वसुली झालेली आहे यात सुध्दा काही चेकद्वारे रक्कम देणार म्हणुन आले असतील जर ते चेक वटले गेले नाही तर त्याचा काय उपयोग, इतकी रक्कम येईल हे उत्तर या सभागृहाला नको आहे किती वसुली होईल आणि जर उद्दिष्ट पुर्ण होत नसेल तर का होत नाही याचा सुध्दा सविस्तर खुलासा उपआयुक्ताकडुन घेण्यात यावा. न झाल्यास काय कार्यवाही करणार याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

श्री.स.अली मिरा सलामी : यापुर्वी ५३ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. ते कमी करुन ५० कोटी करणार असे निश्चित झाले. एकीकडे खाजगीकरणाचा प्रश्न उपस्थित केला त्यात ६१ कोटी मिळावे म्हणुन उद्दिष्ट ठरविले. खाजगीकरणासाठी ६१ कोटी ठेवले जर महानगरपालिकेने वसुल करायचे असेल तर ६१ कोटीच वसुली का होऊ शकणार नाही. चालु वर्षाचे ५३ कोटीचे उद्दिष्ट ५० कोटीवर आणले आता ४४ कोटी वसुली झाली येत्या १५ दिवसा ५० कोटी होणार की नाही यावर चर्चा चालु आहे. का वसुल होत नाही आणि ५० कोटी वसुल झाले तरच ६१ कोटीचे उद्दिष्ट खाजगीकरण करण्यासाठी कार्यवाही करावी लागणार आहे. खाजगी संस्था ६१ कोटी वसुल करणार तर महानगरपालिकेतर्फे का वसुल होणार नाही अशी काय उपाययोजना खाजगी संस्था मालक वापरणार याचा सुध्दा प्रशासनाने विचार केला पहिजे. सध्या उपआयुक्त यांचेकडे तीन चार पदाचे चार्ज दिलेले असल्याने त्यांचे जबाबदाऱ्या वाढलेल्या आहेत. त्यामुळे जकात वसुली होण्यात दुर्लक्ष होत असेल. येत्या १६ दिवसात जकातीचे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न त्यांचेकडुन होणार की नाही याचा सुध्दा खुलासा घेण्यात यावा. एकाच अधिकाऱ्यांकडे प्र.चार्ज देण्यात येत आहे. नियमानुसार याचा सुध्दा खुलासा घेण्यात याव. एकाच अधिकाऱ्यांकडे प्र.चार्ज दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे ठेवता येत नाही. उपआयुक्त यांचेकडे तीनचार प्र.चार्ज दिले ते सुध्दा दुसऱ्यांनी चार्ज देण्यात तयार नाही व त्यांची जबाबदारी पार पाडण्यास तयार नाही असे होत असेल तर योग्य नाही. जकतीचे खाजगीकरण होणार नाही असे म्हटले जात आहे. येत्या १६ तारखेला टेंडर गेले नाही तर वसुलीसाठी कठोर उपाय योजना काय करणार याचा सुध्दा विचार होणे गरजेचे आहे.

श्री. तकीहसन खाँन : जकातीमध्ये कशाप्रकारे चोरी होते हे सर्वांना माहिती आहे. मुंबई व नगरनाका येथून करार पत्रक करुन २ महिन्यापासुन जवळपास २०० गाड्या जकात न भरता सेंट्रल नाक्यावर पोहचले नाही. त्यावेळी असे समजले की शहरात माल जकात चुकवून गेलेला आहे. कुठे गेलेला आहे याची तपासणी करावी रेकार्ड तपासणी करावे. किती वसुली करण्यास आलेली आहे. तपासणी केल्यास बाब निदर्शनास येऊ शकते.

मा.महापौर : ३१ मार्च पर्यंत ५० कोटी रुपये जकात पोटी कसे वसुल करणार याचा खुलासा विभाग प्रमुख यांनी द्यावा. करारपत्रक करुन सुध्दा काही गाड्या जकात न भरता शहराबाहेर निघून गेलेल्या आहेत. असे स.सदस्य श्री.तकीहसन खान यांनी सांगितले आहे.

उपआयुक्त (प्र) : शहरातील संपुर्ण नाक्यावरील २०२ करारपत्रक आमच्याकडे आलेले आहे. प्रत्येक जकात निरिक्षक निहाय काढलेले आहे. गाडी नगर नाका किंवा मुंबई नाक्यावर आल्यानंतर संबंधित ड्रायव्हर किंवा जो कोणी व्यक्ती गाडी बरोबर असेल त्यांचेकडे जकात भरण्यासाठी पैसे नसतात म्हणुन करारपत्रक करुन ती गाडी सेंट्रल नाक्यावर आणली जाते व तो माल ज्य मालकाचा असेल त्या मालकाने त्याच दिवशी जकात भरुन ती गाडी घेऊन जायची असते. असे २०२ करारपत्रक केलेले असुन त्याची सविस्तर चौकशी चालु आहे. ४८ कोटीपर्यंत वसुली होणार आहे. आणखी जे विशेष पथक तयार करण्यात आलेले आहे त्यांचेमार्फत २ कोटी रुपये वसुल करण्याचे प्रयत्न आहे. म्हणजेच ५० कोटी रुपये जकात पोटी वसुल करण्याचे प्रयत्न चालु आहे.

श्री. अफसर खॉंन : प्रशासनातर्फे सभागृहाची दिशाभुल होत आहे. जे ५० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे ते वसुल होणार नाही. चुकीची माहिती देण्याचे प्रयत्न चालु आहे. वर्षभ्रापुर्वीच अशी पथके निर्माण केले असती तर ५३ कोटी वसुल झाले असते या अगोदर प्रशासनाने का कार्यवाही केली नाही.

मा.उपआयुक्त (प्र) : २६ जानेवारी रोजी गुजरात राज्यात भूकंप झाल्यापासुन या शहरात येणारा कपडा व इतर साहित्य, मशिनरी आयात होत होता तो येण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. तोच गरवारे कंपनीकडून महानगरपालिकेला दर दिवशी १ ते १ ह (एक ते दीड) लाख जकात मिळत असे ती कपंनी बंद आहे माझेकडे जे विवरण पत्र आले त्यामध्ये १ फेब्रुवारी ते १२ मार्चपर्यंत ६६३ तपासावे. वाहनांनी शहरात आयात कमी झालेली आहे. २३८ वाहने कमी आलेली आहे. जानेवारी जो जकातीचा ओघ होता तो कमी झालेला आहे.

मा.महापौर : २०००-२००१ या वर्षाचे जकातीचे टारगेट ५३ कोटीचे होते. त्यानंतर ५० कोटी करण्यात आले म्हणजेच ३ कोटीचे नुकसान महानगरपालिकेचे झालेले आहे आणि आता सुध्दा ५० कोटी जकात पोटी मिळणार नाही अशी शंका या सभागृहाने व्यक्त केलेली आहे. परंतु प्रशासनातर्फे ५० कोटीचे टारगेट पुर्ण करण्याचे आश्वासन उपआयुक्त (प्र) यांनी दिलेले आहे. मा.आयुक्तांनी सुध्दा विभाग प्रमुखांना पत्र देऊन सुचित केले की, ५० कोटी वसुल व्हावयास पाहिजे. आताच मा.आयुक्तांनी सांगितले चार लोकांच्या ऑर्डरर्स तयार आहे. ही कार्यवाही करतांना आपले जे उद्दिष्ट ठरलेले आहे ते पुर्ण करणे गरजेचे आहे. जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे सभागृह त्यास विरोध करणार नाही सेलटॅक्सची वसुली किती झाली किंवा करारपत्राद्वारे होणारी वसुली किंवा इतर माध्यमातुन कशाप्रकारे ५० कोटीचे टारगेट पुर्ण करता येईल ते प्रशासनाने पहावे. नसता मा.आयुक्ततर्फे संबंधीत जकात विभागाचे विभाग प्रमुख, जकात अधीक्षक इनचार्ज क्लार्क यांचे व जे आणखी कुणी कर्मचारी दोषी असतील त्या सर्वावर योग्य ती कार्यवाही केली जाईल. जकात खाजगीकरण होण्यासाठी ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. उद्या टेंडर गेले तर ६१ कोटीचे टेंडर जाण्यासाठी ५० कोटी

जकात पोटी वसुली होणे गरजेचे आहे व जकात खाजगीकरण झाले नाही तर प्रशासनाच्या माध्यमातुन पुढील वर्षासाठी ६१ कोटीचेच टारगेट राहील व ६१ कोटी वसुली झाले पाहिजे. असे हे सभागृह निर्णय घेत आहे.

श्री. गणेश तांबे : मागील बैठकीत चर्चा होऊन जकात अधीक्षकांची बदली करण्यात आलेली आहे. त्यावेळी १६ लाख रुपये दररोजची वसुली होत असे सभागृहात चर्चा होऊन दुसऱ्या अधिकाऱ्यांना चार्ज देण्यात आलेला आहे. आता वसुली १६ लाख वरुन ७ ते १० लाख पर्यंत आलेली आहे. याचं कारण काय जे सक्षम अधिकारी होते त्यांना काढून टाकून अकार्यक्षम अधिकाऱ्यांची नेमणुक करणे हे योग्य केले असते वाटत नाही. जे सक्षम अधिकारी आहे असे असतांना त्यांना मागे करुन त्याचे खच्चीकरण करत असाल तर योग्य नाही व जकात वसुलीसाठी यापुढे काय प्रयत्न होणार जे उद्दिष्ट ठेवण्यात आले ते पुर्ण होणार की नाही या सर्व बाबींचा आज खुलासा होणे गरजेचे आहे व वसुली झाली नाही तर अधिकाऱ्यांवर कार्य कार्यवाही करणार याचा खुलासा आयुक्तांनीच करावा.

मा.महापौर : मा.आयुक्तांनी खुलासा करावा या विभागामध्ये सक्षम अधिकारी / कर्मचारी नेमावे.

मा.आयुक्त : जकातीची आवक कमी झालेली आहे. याबद्दल कुणाच्याही मनात शंका नही. जकात कमी झाली याची कारणे विभागप्रमुखाकडून सांगण्याचा प्रयत्न झालेला आहे. सभागृहाच्या भावनाशी मी सहमत आहे. विभाग प्रमुख व जकात अधिक्षक यांना माझ्याकडून एक दिवसाआड पत्र देऊन ५० कोटी पेक्षा कमी एकही पैसा जकात वसुलीत ३१ मार्च पर्यंत यायला नको म्हणजेच ५० कोटीच वसुली यावयास पाहिजे असे पत्र दिलेले आहे. ३१ मार्च पर्यंत ५० कोटी वसुल झाले नाही तर विभागप्रमुख तसेच जकात अधिक्षक व संबंधित कर्मचारी यांचेवर १ एप्रिल नंतर पहिल्याच आठवड्यामध्ये आढावा घेऊन कडक कार्यवाही करण्यात येईल. निलंबनसहीत कार्यवाही करण्यात येईल अशा सुचना विशेष स्वरुपामध्ये विभाग प्रमुख यांना दिलेल्या आहेत. जकात वसुलीत जी घट होत आहे यात मी समाधानी नाही. कोणतेही कारण मान्य झालेले नाही. भूकंपाचे कारण दाखवून विभाग प्रमुख यांनी खुलासा केलेला आहे तो मला मान्य नाही कारण इतर महानगरपालिकेमध्ये जी वसुली व्हायची ती झालेली आह. तर याच महानगरपालिकेला भूकंपामुळे जकात वसुली कमी झालेली आहे असे कारण होऊ शकत नाही. जकात खाजगीकरण व्हायचे आहे व जकात वसुली कमी झाली तर खाजगीकरण होणार नाही अशी शंका माझ्या मनामध्ये आल्याने मी सक्त आदेश विभागप्रमुख यांना दिलेले आहे आणखी १६ ते १७ दिवस बाकी आहे विभाग प्रमुखांनी रात्र दिवस फिरुन ५० कोटी वसुली करणे गरजेचे आहे. शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज एका शिक्षकाकडे दिलेला होता परंतु या सभागृहाने पुन्हा तो जकात विभाग प्रमुख यांचेकडे द्यावयास सांगितल्यामुळे निर्णय घेतलेला होता व चार्ज सभागृहाने निर्णय घेऊन इतर अधिकाऱ्यांकडे देता येईल जेणे करुन जकात विभाग प्रमुख यांना जकतीचे उत्पन्न राहिलेल्या कालावधीत वाढता येईल. यावर निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर : शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज मा.आयुक्तांनी योग्य वाटेल अशा अधिकाऱ्याकडे देण्याची कार्यवाही करावी.

श्री. अफसर खाँन : शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज इतर अधिकाऱ्यांकडे न देता शाळेच्या ज्येष्ठ मुख्यध्यापकास द्यावा

(याच वेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालु असते.)

मा.महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज कुणाला द्यायचा मा.आयुक्त निर्णय घेतील आजची सभा १५ मिनिटासाठी तहकुब करण्यात येत आहे. (वेळ ३.३० वाजता सभेला सुरुवात ४.१० वाजता)

मा.महापौर : जकात विषयावर चर्चा चालु आहे. ६१ कोटी कसे ठेवले, मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : खाजगीकरण संदर्भात शासनाकडून अभिप्राय मागविलेला होता व शासन नियमाप्रमाणे मागील ३ वर्षातील ज्या वर्षाची जास्तीत जास्त वसुली व त्यावर २० टक्के अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व इतर खर्च असे मिळून ९ महिन्याचा आढावा घेऊन तसेच पुढील ३ महिने म्हणजे ३१ मार्च २००१ पर्यंत अपेक्षित वसुली विचारात घेता ५० कोटी वसुली होईल असे विचारात घेवूनच कार्यवाही होईल.

मा.महापौर : खाजगीकरण होईल न होईल जकातीचे पुढील वर्षाचे उद्दिष्ट ६१ कोटीचे राहिल व प्रशासनाने ६१ कोटीच जकात वसुल करावे असा निर्णय हे सभागृह घेत आहे.

## ३) पाणीपट्टी वसुली

श्री. जयवंत ओक : जनतेला मुबलक पाणी द्या नंतरच पाणीपट्टी वाढ करा.

(वरीलप्रमाणे लिहिलेले एक फलक सभागृहात आणतात)

मा.महापौर : स्थायी समितीने पाणीपट्टी दर वाढी संदर्भात काहीच निर्णय घेतलेला नाही जशाच्या तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये पाठवला असुन यावर सविस्तर चर्चा करुन आपणांस निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : आहे तच दर कयम ठेवावे वाढ करण्यात येऊ नये.

श्री. अविनाश कुमावत, श्री.नंदकुमार घोडेले : निवासी वापरासाठी लागणारे पाण्याचे दर आहे तेच ठेवावे परंतु पृष्ठ क्र.२६ वर जे मुख्य जलवाहिनी वरील पाणी ग्राहक यांचे दरात जी वाढ केलेली आहे ती कायम करण्यात यावी.

श्री. प्रकाश निकाळजे : घरगुती वापरासाठी लागणाऱ्या पाणीपट्टीत वाढ करु नये कारण आज जी पाणीपट्टीत वसुल करण्यात येते त्या प्रमाणकानुसार पाणी जनतेला दिले जात नाही म्हणुन घरगुती वापरासाठी पाणीपट्टीत वाढ करु नये. काही भागात २ दिवसाआड पाणी येते अशी परिस्थिती आहे जे व्यावसायिकदार आहे. पृष्ठ क्रृ.२५ वर जे अ आणि ब दर्शविलेले त्यांची पाणीपट्टी वाढवीव.

श्री.स.अली मिरा सलामी : १२ कोटीचे चालु वर्षाचे उद्दिष्ट दिलेले होते. त्यातुन ८ कोटी वसुल झाले. पुढील वर्षासाठी २१ कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. २१ कोटीच वसुल झालेच पाहिजे. घरगुती पाणीपट्टी वाढ करु नये. जी थकीत वसुली आहे ते वसुल करण्याची कर्यवाही करावी पाणीपट्टी दर वर्षी वाढवून चालणार नाही तर त्या प्रमाणात जनतेला पाणी सुध्दा दिले गेले पाहिजे. पाण्याची आवक वाढवावी. पृष्ठ क्र.२५ वर मुख्य जलवाहिनी वरुन काही ग्रामपंचायतीना पाणी दिलेले आहे. त्यात पुढील वर्षासाठी २.२० ऐवजी

२.९०, ३.१० प्रति एक हजार लिटर पाण्यासाठी दर दिलेले आहे. ते रुपये प्रति एक हजार लिटरसाठी करण्यात यावे. जे व्यावसायिकासाठी सुधारीत दर दिले ते कायम करावे. काही औद्योगिक वसाहतीत पाणी जास्त दिले जाते . त्यात काटकसर करुन कार्यवाही करावी. ज्यांचेकडे बाकी आहे ती वसुल करावी बिडकीन ग्रामपंचायतीकडे पाणीपट्टी ३.५० कोटी रुपये बाकी आहे. कधी वसुल करणार खुलासा करावा.

मा.महापौर : पैठणहुन शहराकडे येणाऱ्य जलवाहिणीमधून २० नळ कनेक्शन दिलेले आहे. ग्रामपंचायतकडे पाणीपट्टी थकबाकी आहे. काय त्याची माहिती द्यावी जे कंपनीसाठी पाणी देत होतो ते कमी करता येईल काय याचा सुध्दा खुलासा करावा.

श्री. जयवंत ओक : जायकवाडी पासुन शहराकडे येणाऱ्या पाईपलाईनवर २० अधिकृत तर अनाधिकृत नळ कनेक्शन किती आहे. वृत्तपत्रात तशी बातमी आलेली आहे. अनाधिकृत नळ घेतलेले असतील तर किती पाणी घेतात त्यामुळे शहराला होणारा पाणी पुरवठा यात कमतरता जाणवते का याची तपासणी झाली पाहिजे. बऱ्याच कंपन्या पैठण रस्त्यावर आहेत एक ऐवजी दोन-दोन नळ कनेक्शन आहे असे समजते दिवसभर म्हणजेच २४ तास पाणी चालु राहते अशी शंका येते.

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) : जायकवाडी ते औरंगाबाद या रस्त्यावर असलेल्या चार ग्रामपंचायतींना मुख्य जलवाहिनीतुन पाणी दिले जाते. बाळानगर यांचेकडे ३.५० लाख थकबाकी आहे तसेच बिडकीन ११.२५ लाख तसेच ढोरकीन ३.५० लाख इसारवाडी, ग्रामपंचायतीकडे ९.२५ लाख सध्या इसारवाडी, ग्रामपंचायतीचे पाणी बंद आहे २० अधिकृत नळ कनेक्शन त्यातील ४ ग्रामपंचायती आहेत. त्यापेक्षा एकही नळ कनेक्शन जास्त नाही. चोरुन नळ कनेक्शन घेता येत नाही जे पाणी घेतात त्यासाठी वेळ दिलेला असून एकुण ७ एक.एल.डी. पाणीपुरवठा केला जातो.

श्री. कुमावत अविनाश : २४ तास पाणी चालु असते चालु बंद कोण करतात याची माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) : जे कनेक्शन दिलेल आहे त्यास वॉल मिटर बसवलेल आहे यावर लाईनमन नेमलेले आहे. ते स्वतः बंद करतात. चालू करतात.

मा.महापौर : नळ कनेक्शन तपासणीसाठी समिती नेमण्यात आलेली होती त्या समितीने समाधन व्यक्त केलेले आहे. महानगरपालिकेस या ग्राहकापासुन ३ कोटीचे उत्पन्न आहे.

श्री. जयवंत ओक : ३ कोटीपेक्षा जास्त किंमतीचे पाणी जाते असा माझा आरोप आहे पाणी बंद करण्यात यावे. शहरात जास्तीत जास्त पाणी पुरवठा व्हावा जी थकबाकी आहे ती तात्काळ वसुल करण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : ट्रिटमेंटमध्ये ४ एम.एल.डी. पाणी वाया जाते. रीसाक्लींग केल्यास ४ एमएलडी पाणी वाचवू शकतो. त्यासाठी वॉटर ट्रिटमेंट प्लॅनचे काम करावे लागणार आहे.

मा.महापौर : वाटर ट्रिटमेंट केल्यानंतर ४ एमएलडी पाणी वापरासाठी रिसाक्लींग करुन पुन्हा उपोगात येईल म्हणुन नविन वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट बांधण्याची कार्यवाही करावी.

श्री.स.अली मिरा सलामी : : वर्तमान पत्रात अशी बातमी आलेली आहे की, शहरातील नळ कनेक्शन सर्वेक्षण बाबतची संचिका गायब झालेली आहे. प्लंबरवालेच नळ कनेक्शन करतात. म्हणुन त्यांना देवू नये.

श्री. अंबादास दानवे : अशी माहिती मिळाली की, प्लंबर असोसिएशन नळ कनेक्शन लिगल करतात. शहरामध्ये २० हजार पेक्षा जास्त नळ कनेक्शन आहे. तर शहरात एकु किती एमएलडी पाणी येते.

कार्यकारी अभियंता : संचिका गहाळ नाही आमच्या विभागात आहे. नळ सर्वेक्षणासाठी करारनामा प्रक्रिया येत आहे. ३ टेंडर आलेले होते.

श्री. तकिहसन खाँन : प्लंबर असोसिएशन महानगरपालिकेनेच परवानगी दिलेली आहे. संबंधी लोक सर्वे करतात त्यांना सर्व माहिती आहे. ते जास्त पकडतील. शहरातील जेवढे अनाधिकृत नळ कनेक्शन आले त्याची तपासणी प्लंबर वालेच करु शकतात. आपण निविदा मागवली. नियमाप्रमाणे त्यांना मंजुरी देता येईल.

श्री.शे.इसाक जैनोद्दीन : अर्थसंकल्प दर्शविल्याप्रमाणे् जायकवाडी मुख्य जलवाहिनीवरुन नळ कनेक्शन ग्राहकांची संख्या व जोडणी बाबत समिती गठीत करुन अहवाल सर्वसाधारण सभेत देण्यात येईल. असे सांगितलेले आहे. परंतु मुख्य जलवाहिनीवरील ग्राहकांची संख्या दर्शविलेल्या संख्येपेक्षा जास्त आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होण्याचा संशय आहे. पाणी प्रश्ना संदर्भात गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. शहराला पाणी पुरवठा होत नाही हा यंत्रणेचा दोष आहे. असे सांगितले जाते. ५० कि.मीटर अंतरावरुन पाणी पुरवठा होतो त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले गेले पाहिजे. येथील नागरिक पाणी पट्टी भरत नाही म्हणुन महानगरपालिकेला आर्थिक झळ सोसावी लागते. ही वस्तुस्थिती आहे. ती नाकारता येणार नाही. पाणी पुरवठा सदोष आहे. म्हणुन शहरात होणारा पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे. सध्या या जायकवाडी धरणामध्ये पाण्याची पातळी पुरेशी आहे जर एखाद्या वर्षी पाऊस कमी पडल्यास पाणी पातळी कमी होऊ शकते. म्हणुन सध्या तरी यंत्रणेतील दोष यामुळे पाणी मिळण्याचे कारण आहे असे दिसून येते. मी स्वतः यांची पाहणी केलेली आहे. जे तीन ठिकाणाहून पाणी पंपिंग केले जाते तेथे गळती होते. बरेचशे पाणी वाया जाते व एम.एस.ई.बी.चे तील महानगरपालिकेस भरावे लागते म्हणुन यंत्रणेतील जो दोष आहे तो सुधारण्याची कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : मुख्य जलवाहिनीवर जे नळ कनेक्शन दिलेले आहे त्याची पाहणी करण्यासाठी कमेटी नेमण्यात आलेली होती आपण स.सदस्य श्री.शे.इसाक शे.जैनोद्दीन कुठल्याही कमेटीचे सदस्य नसतांना त्यांनी वेळ काढून जायकवाडी येथील जलवाहिनीची पाहणी केली त्याबद्दल त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते. कमिटीमध्ये श्री.सिध्द, श्री.सलीम पटेल, श्री.गणेश तांबे, सौ.विजया रहाटकर इ.सदस्यांची नेमणुक केलेली होती.

श्री. शे.इसाक श्री.जैनोद्दीन : जी कमिटी नेमण्यात आलेली होती त्यातील कुणीही सदस्य पाहणीसाठी गेलेले नाही फक्त सलीम पटेल गेलेले होते. अहवालामध्ये तसे दिलेले आहे.

श्री. जगदीश सिध्द : जी कमिटी नेमण्यात आलेली होती जलवाहिनीवर किती नळ कनेक्शन आहेत याची पाहणी कुणीही केलेली नसुन अहवाल चुकीचा सादर केलेला आहे.

श्री. मीर हिदायत अली : कमेटीतील सदस्य सांगतात अहवाल खोटा आहे यावर सविस्तर खुलासा व्हावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : जायकवाडी धरणातुन औरंगाबाद शहरासाठी किती पाणी पुरवठा होतो तसेच नळ कनेक्शनची संख्या, मुख्य जलवाहिनी वरील नळ संख्या या संबंधीची संपुर्ण यादी प्रशासनाच्या माध्यमातून दिलेली आहे. जवळपास १/२ नळ इंच कनेक्शनची ७८९३३ इतकी संख्या असेल या नळांना जे पाणी येते कुठल्याही भागामध्ये १ तास पाणी येत नाही. सर्वसाधारण ४५ मिनिटे पाणी येते. म्हणजेच प्रत्येक घराला ७०० ते ७२५ लिटर पेक्षा जास्त पाणी कुणालाही देण्यात येत नाही. वरील नळ कनेक्शनच्या संख्येच्या तुलनेत जवळपास ६० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो त्याचप्रमाणे पाऊन इंच असलेली नळ कनेक्शनची संख्या १००० पर्यंत आहे. १ इंच कनेक्शनची संख्या ४९१ आहे असे नमुद केलेले आहे परंतु अनाधिकृत नळाची संख्या जायकवाडी ते औरंगाबाद हद्दीपर्यंत जे येणारे पाणी आहे ते ८५ एमएलडी पेक्षा जास्त पाणी मिळत नाही. जर दोन्ही जलवाहिन्यामधुन ११५ एमएलडी पाणी येत असेल तर जवळपास दोनही जववाहिनी मिळून ३० ते ३५ एमएलडीचा फरक यामध्ये जाणवतो आहे. ४५ मिनिटापेक्षा कुणाकडेही जास्त पाणी येत नाही. म्हणुन अधिकृत नळाची संख्या पाहता ११५ ते १२० एमएलडी पाणी पुरवठा या शहरास होतो. आताच कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, ४ एमएलडी पाणी गळती होते परंतु ४ एमएलडीच नाही तर १० ते २० एमएलडी पाणी चोरी जाते असे दिसून येते. ज्याप्रमाणे खर्चाचे ऑडीट होते त्याप्रमाणे शहरासाठी येणारे पाण्याचे सुध्दा ऑडीट झाले पाहिजो यामध्ये किती लुट येते हे निश्चितपणे पाहिले पाहिजे. महानगरपालिकेस ३ ते ४ कोटी रुपये मिळू शकतील. जी लुट दाखवली ती कमी होईल. शहराला होत असलेले पाणी पुरवठा हे तीन ठिकाणी पंपींग करावे लागते व दरवर्षी एमएसईबी ने विद्युत बिला संदर्भाने झालेली दराची वाढ व थकीत बिल रक्कम याचा भार महानगरपालिकेस पडत असून म्हणून दरवर्षी पाणीपट्टीत महानगरपालिकेला वाढ करावी लागते. सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये अशी शंका निर्माण होते की, महानगरपालिका दरवर्षी पाणीपट्टीत वाढ करणे. महानगरपालिकेकडे असलेली थकबाकी कमी करण्यासाठी वेळोवेळी महानगरपालिकेमार्फत तक्रारी एमएसईबीकडे जात आहे परंतु तक्रार करतांना मा.मुख्यमंत्री किंवा एमएसईबी ची एक वेगळी संस्था आहे. या संस्थेकडे महानगरपालिकेमार्फत कसल्याही प्रकारची अद्याप अपिल केलेली नाही व या संस्थेकडे महानगरपालिकेने अपील केल्याशिवाय पर्याय नसुन महानगरपालिकेकडे जे थकीत १०० कोटी ते १०६ कोटी रुपये एमएसईबी चे देणे आहे ते देणे कमी होईल. महानगरपालिकेला जे ३ ठिकाणी पाणी पंपिंग करुन आणावे लागते रात्रदिवस पंपींग चालू असते व रात्रीच्या वेळीचे एमएसईबी मार्फत जे बील आकारले जाते ते दिवसाप्रमाणे असते रात्र व दिवसासाठी आकारण्यात येणाऱ्या विद्युत दरामध्ये १५ ते २० टक्के चा फरक येतो. असे केल्याने महानगरपालिकेला ते परवडणरे नाही.

पपिंगसाठी रात्रपाळी मध्ये जी विज वापरली जाते त्यासाठी मीटर बसवण्याचा मागे मा.आयुक्तांनी प्रस्ताव सादर केलेला होता व मीटर बसवण्याचे आदेश केलेले होते. परंतु अद्याप तेथे रात्रपाळीतील वापरण्यात येणाऱ्या विजेवर मिटर बसविण्यात आलेले नाही असे वाटते. म्हणून २० कोटीची जी तुट पाणी पुरवठ्यामुळे येत आहे ती तुट कमी करता येऊ शकते व कमी दराने विद्युत दर कसे लावून घेता येईल या बाबींवर चर्चा व्हावी. या संदर्भात जेवढी सभागृहाला तळमळ वाटते तेवढी प्रशासनाला आहे असे मला वाटत नाही. शासनाकडे प्रशासनामार्फत काही पत्रव्यवहार झाले असतील त्या बाबत प्रशासनास काही शंका वाटत असेल त्याची माहिती सभागृहाला देण्यात यावी. डिसेंबर महिन्यामध्ये आंदोलन वगैरे झाली. एमएसईबीकडे जाण्याचे निश्चित झाले होते. त्यानंतर प्रशासनामार्फत काही पत्रव्यवहार झाले का? याचा सुध्दा खुलासा व्हावा या शहराला पाणी पुरवठा होण्यासाठी लागणारा विद्युत पुरवठा हा कृषी दराने कसा मिळेल या बाबत प्रयत्न झाले पाहिजे. या बाबत जाणीव पुर्वक सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. आणि शहरामधील जे अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत ती अधिकृत करण्याचा सुध्दा विचार झाला पाहिजे. पाणी पट्टीत तुट येत आहे. म्हणून आहे त्याच नळ कनेक्शवनवर सुध्दा बोजा वाढवणे योग्य होणार नाही व शहराल जे पाणी येते किती पाणी येते याचे ऑडीट झालेच पाहिजे. पाण्याच्या संदर्भात जवळपास १ वर्षापासून जनतेच्या तक्रारी आहेत व या संदर्भात एक विशेष बैठक बोलावून कार्यवाही करणार होतो परंतु अद्याप बैठक बोलावली नाही व त्यामुळे आज अर्थसंकल्पामध्ये प्रशासनाच्या माध्यमातुन जी पाणीपट्टी वाढ सुचविली आहे ती प्रशासनास नाइलाजाने सुचवावी लागलेली आहे. या संदर्भात अगोदर कार्यवाही झालेली असती तर आज हि वेळ आली नसती. म्हणुन आज तरी आपण सर्वांनी जागे होऊन शहरास मुबलक पाणी व येणाऱ्या एमएसईबीचे विद्युत बिल या बाबतीत योग्य ती कार्यवाही करावी. यानंतर किती तुट पाणी पुरवठ्यामुळे येते याचा हिशोब काढूनच पाणीपट्टी वाढ करता येईल. तोपर्यंत कुठल्याही प्रकारची पाणीपट्टीत वाढ करु नये.

श्री. अंबादास दानवे : सिडको हडको भागामध्ये किती नळ कनेक्शन व शहरात किती नळ कनेक्शन आहे असा मी प्रश्न विचारलेला होता. माझ्या माहितीप्रमाणे २८,५००/- नळ कनेक्शन आहेत व पाणी किती प्रमाणात दिले जाते आणि संपुर्ण शहरामध्ये जवळपास ५८,५००/- नळ कनेक्शन आहेत व पाणी किती प्रमाणात दिले जाते असा माझा प्रश्न होता. होणारा पाणी पुरवठ्याचे प्रमाण पाहिले असता शहरातील भागात पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात चोरी होत आहे. यामध्ये पाणी वाया जात असेल किंवा १० ते २० हजार नळ कनेक्शन अनाधिकृतपणे झालेली असेल अशी शंका आहे. नळ कनेक्शनची कार्यवाही प्लंबर असोसिएशन मार्फत होत होती त्यांनी मागील वर्षामध्ये एक पत्र देऊन कळविले की, संपुर्ण शहरामध्ये २५ हजारपेक्षा जास्त अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत. म्हणुन पाण्याचे ऑडीट होण्याची आवश्यकता आहे. मागील बेठकीमध्ये मी मा.आयुक्तांकडे माहिती दिली होती की, शहरामध्ये ६७२ व्यावसायिक नळ कनेक्शनस आहेत कामगार उपआयुक्त यांचेकडील एक पत्र माझ्याकडे आहे त्या विभागाकडून दुकानाची परवानगी दिली जाते

या पत्रातील माहितीनुसार २००० अखेर या शहरामध्ये २७,०००/- दुकाने रजिष्टर्ड आहेत, व्यापारी संस्था, १०,९५८ रजिष्टर्ड, शहरातील हॉटेल्स ३३२४ आहेत थेटर व अल्प करमणुकीची साधने ८३ अशी असुन जवळपास ४१००० व्यावसायिकांची नोंद कार्यालयाकडे आहेत. दवाखान्याची वेगळी नोंद आहे. शहरामध्ये व्यावसायिक नळ कनेक्शन फक्त ६७२ दाखवलेले आहे. यावरुन व्यावसायिक नळ कनेक्शन हे निवासी नळ कनेक्शनचे बिल लावले असावे अशी शंका येत आहे. अर्थसंकल्पाच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये पाणीपट्टी कसल्याही प्रकारची चर्चा न करता जशाच्या तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे सादर झालेला आहे. प्रशासनाच्या वतीने १९०० रुपये घरगुती वापरासाठी लागणाऱ्या पाण्याची दर वाढलेले आहे. दर वाढलेस हरकत नसावी परंतु जे शहराला पाणी येते त्याचे ऑडीट झाले पाहिजे. त्यामुळे आताच मी सांगितल्याप्रमाणे जवळपास १० ते २० हजार अनाधिकृतपणे नळ कनेक्शन आहे व ४१ हजार व्यावसायिक या शहरामध्ये असुन किमान ४१०० निघाले व्यावसायिक धारकाचे नळ पट्टीचा हिशोब केल्यास फार मोठ्या प्रमाणात पाणीपट्टी वसुलीत वाढ होईल. जायकवाडीहून येणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर अनेक प्रकारचे ग्राहक आहेत. त्यामुळे २० लोकांची यादी दाखवलेली आहे. त्यांचेकडून पैसा मिळतो. ही बाब वेगळी परंतु महानगरपालिका काही व्यवसाय करत नाही. आतापर्यंत दिलेले व्यावसायिकांना नळ कनेक्शन ठिक आहे परंतु मुख्य जलवाहिनीतून नळ कनेक्शन देण्याची अशी कार्यवाही होऊ देऊ नये जे की शहराला पाणीपुरवठा कमी पडेल पाणीपट्टीत कोणत्याही प्रकारची दरवाढ करण्यात येऊ नये अशी विनंती आहे.

मा.महापौर : पाणीपट्टीत वाढ करण्याच्या प्रस्तावावर आपण चर्चा करत आहोत. शहरामध्ये नळ कनेक्शन किती व त्या नळाद्वारे देण्यात येणारे पाणी किती या विषयावर चर्चा झालेली आहे. सभागृहाने अशी भावना व्यक्त केली की जवळपास ३५ ते ४० एमएलडी पाणी वाया जाते किंवा चोरी होत असेल म्हणुन जे पाणी वाया जाते किंवा चोरी जाते ते थांबण्याची आज गरज आहे. यातुन महानगरपालिकेस मोठे उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली शहरामध्ये किती अनाधिकृत व अधिकृत नळ कनेक्शन आहे याचे सर्वेक्षण चालू असुन लवकरच अहवाल सादर होईल त्यानुसार कार्यवाही करावी लागणार आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : झोनवाईज नळ कनेक्शनचा सर्वे करण्यात यावा. आपल्या कर्मचाऱ्यामार्फत सर्वे व्हावा. जे कामात हलगर्जीपणा करत असतील त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

मा.महापौर : एमईआरसी च्या संदर्भात सेवानिवृत्त श्री. कावळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी प्रशासनानी ३ वेळेस बैठक झालेली आहे व त्याचा अहवाल तयार झालेला असुन २० तारखेला ठेवण्यात येणार आहे असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आलेले आहे.

मा.आयुक्त : पाणीपुरवठ्यापोटी येणारे विद्युत बील कमी येण्यासाठी टोड मशीन बसवण्याचा निर्णय आपण घेतलेला होता त्याची किंमत जवळपास २.४५ लाख आहे. त्यांची मंजुरी देण्यात अली होती परंतु एमएसईबी मधील अधिक्षक अभियंता श्री. शेटजी यांचेकडून असे सांगण्यात आले की, मीटर

बसवून बील कमी होणार नाही व सुरुवातीस असे सांगण्यात अले की, मिटर बसवल्यास २० ते २२ लाख रुपये बील कमी होईल. म्हणुन आता मिटर बसवायचे व बील कमी नाही आहे तर का? असा प्रश्न निर्माण झाला व होणारा खर्चाचे काय? यासाठी संपुर्ण बील तपासणी केल्यानंतर कार्यवाही करावी लागणार आहे. टोड मशिन बसवयचे असेल तर सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : टोड मशिन बसवण्याचा सल्ला एमएसईबीचे अधिकारी यांनीच दिला आता बसवण्याची वेळ आली व पुन्हा त्यांना सल्ला विचारण्याची गरज नव्हती. मिटर मशीन बसवल्यानंतर रात्रीचे वेळी कारखाने व पंपींगसाठी खर्च होणार विज पुरवठा यात नक्कीच कपात येणार आहे. म्हणुन मीटर बसवण्यास महानगरपालिकेचा फायदाच होईल. या दृष्टीने कार्यवाही करावी.

मा.महापौर : जायकवाडी ते औरंगाबाद शहरापर्यंत येणाऱ्या जलवाहिनीवर बरेच पंप आहेत रात्रदिवस विद्युत पुरवठ्याचा वापर होतो रात्री व दिवसा वापरण्यात येणारी लाईट यासाठी वेगवेगळे मीटर बसवावे असा प्रस्ताव आपण मागे ठेवलेला होता. त्याच एमएसईबीचे एक पत्र आल्यानुसार ते प्रस्ताव स्थगित करण्यात आलेला आहे. परंतु २ ते ३ लाख जो मीटर बसवण्यासाठी खर्च येत असेल तो करण्यास हरकत नाही मिटर ताबउतोब बसवण्यात यावे. वेगवेगळ्या वापरासाठी महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा केला जातो. खरे पाहता महानगरपालिकेची पाणी पुरवठा योजना तोट्यात चालु आहे. महानगरपालिकेस ३२.८० कोटी रु. दरवर्षी खर्च येत आहे. त्या खर्चाचा विचार केल्यास घरगुती ह इंच नळासाठी जितका खर्च होतो तितकी पाणीपट्टी अकारायची झाल्यास रु.३२५५/- प्रतिवर्षी इतकी आहे. परंतु सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन गोरगरिब जनतेला पाणी मिळावयास पहिजे. विजेचा जास्त भार महानगरपालिकेस पडू पये म्हणून आपण जकात खाजगीकरण करण्याचा निर्णय घेत आहोत. खाजगीकरण होईल न होईल आपण ६१ कोटी रुपयेच वसुल करण्याचा निर्णय घेतलेला आहे व उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न आपण जकातीमध्ये केलेले आहे. म्हणुन घरगुती वापरासाठी लागणाऱ्या पाणीपट्टीत मग ते कोणतेही नळ कनेकशन असेल त्यात वाढ करण्यात येत नाही. अ.क्र. ५ मधील व्यावसायिकासाठी, बांधकामासाठी व मुख्य जलवाहिनीमधून दिल्या गेलेल्या ग्राहकांना टँकरद्वारे होणारा पा.पु.यांचेसाठी जी वाढ प्रशासनाने प्रस्तावित केली आहे ती कायम करण्यात येते.स शासनाकडुन एक परीपत्रक महानगरपालिकेस आलेले आहे असे असतांना सुध्दा आपण घरगुती वापरासाठी लागणाऱ्या पाणी पट्टीत वाढ केलेली नाही. सदर पत्र मुख्य लेखाधिकारी सभागृहात वाचून दाखवतील.

मुख्यालेखाधिकारी : शासन परिपत्रक क्र.जी ए एल/१०/२००० दिनांक २८ फेब्रुवारी २००१ नुसार नागरी संस्था या बाबत केलेल्या शिफारशीस अनुसरुन राज्यातील सर्व महानगरपालिकेने करावयाच्या कार्यवाहीबाबत परिपत्रक निर्गमित केलेले आहे. यामध्ये महानगरपालिकेने अपयश टाळण्यसाठी विशेष प्रयत्न करावे व सार्वजनिक नळाची संख्या मर्यादित ठेवावी. त्याचप्रमाणे पाण्याचा काटकसरीने उपयोग होण्यासाठी जनतेच्या मनात जागृती निर्माण करावी पाणी वितरण व्यवस्थेत किमान १५ टक्के पाणी राहील याची दक्षता घ्यावी.

पाणी पुरवठा योजना ना नफा तोटा या तत्त्वावर चालली पाहिजे. त्यासाठी वेळोवेळी आवश्यक त्या सुधारण करण्यात याव्यात. किमान देखभाल दुरुस्ती, सेवा करत असलेल्याचा खर्च निघून येईन अश पध्दतीने दर ठेवावे यावरुन ही योजना ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालली पहिजे असे शासनाने परिपत्रक आलेले आहे व ते सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर केलेले आहे.

मा.महापौर : शासनाच्या परिपत्रकाची सर्वांनी नों घेतलेली आहे. मुख्य जलवाहिनीवर एक नविन नळ कनेक्शन होऊ नये. ट्रिटमेंट प्लॅण्ट बांधण्यात यावा. यास मंजुरी देण्यात येते व अ.क्र. ५ प ६ ला सुध्दा यास अनुसरुन मंजुरी देण्यात येते.

## ४) सिध्दार्थ उद्यान प्रवेशासाठी फी आकारणे

सौ. साधना सुरडकर : महानगरपालिकेच्या उद्यानामध्ये पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हिवाळ्यातील दोन महिने व उन्हाळ्यातील ४ महिने यामध्ये पर्यटकांची सध्या जास्त असते. उद्यानामध्ये प्राणी संग्रहालय, मत्सालय यामधून महानगरपालिकेस मोठे उत्पन्न मिळते. प्रवेश शुल्क आकारणी बाबत जो प्रस्ताव ठेवलेला आहे. त्यात प्रोढासाठी रु.२.०० ठेवावे व १२ वर्षाखालील मुलांना मोफत ठेवावे जेणे करुन या उद्यानातील मुलांची संख्या कमी होणार नाही. मुलांसाठी मोफत ठेवावे.

मा.महापौर : मुलासाठी शुल्क आकारणे हे बरोबर होणार नाही म्हणुन प्रोढासाठी २.०० रुपये व मुलांसाठी मोफत राहील. मुलासाठी फिस आकारण्यात येणार नाहीत.

श्री. देसरडा प्रशांत : जलतरण तलावाचे दर वाढले तर तेथील खरी परिस्थिती काय आहे. सर्व मेंबर आहेत का सोडून गेले उत्पन्न कमी झाले काय खुलासा करावा.

अतिरिक्त शहर अभियंता : जलतरण तलावाचे होणारे उत्पन्न सध्या कमी झालेले आहे. १० वी १२ वी च्या परिक्षा संपल्या त्यामुळे मेंबर्स थोडे कमी झाले आहे.

## ७) अनाधिकृत बांधकाम सोबत जमिनीच्या कराची आकारणी करणे.

श्री.स.अली मिरा सलामी : रुपये ६६९१/- २० x ३० च्या भूखंडावर कर जास्त होतो.

मा.महापौर : ५ समान हप्त्यात आपण कर वसुल करणार आहोत आणि त्या भागात पाणी, ड्रेनेज, रस्ते या सर्व मुलभूत सुविधा देणार आहोत.

श्री. जयवंत ओक : महानगरपालिकेस उत्पन्न मिळवण्याच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा असुन जवळपास ४ कोटी रुपये महानगरपालिकेत उत्पन्न होईल अशी खात्री आहे. यासंदर्भात ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे या शहरात ६० अनाधिकृत वसाहती आहेत. या व्यतिरिक्त जाधववाडी, पडेगाव, मिटमिटा तसेच पुंडलिकनगर या वसाहतीत नोटीफाईड आहेत. या ६० अनाधिकृत वसाहती सोडून अशा एकुण शहराभोवती व शहरातील ४० ते ५० अनाधिकृत वसाहती आहेत. महत्त्वाचा विषय आजच्या बजेटच्या बैठकीत आपण मंजुर करत आहोत १२० चौमी असे २० x ३० च्या प्लॉटसाठी ६६९१/- मालमत्ता कर आकारणार जनता कर भरण्यास तयार असून यापुढे एखादा गरीब

असेल त्यांना दुसरा मजला बांधण्याची गरज पडल्यास १० x २०, २० x ३०, १५ x ३० असे वेगवेगळे प्लॉट असतील दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करावयाचे पुर्ण एफ एस आय वापण्यास परवानगी देणार का? त्या बदल्यात पैसा महानगरपालिकेस मिळणार काय? याच खुलासा करावा. आपल्याला १० कोटी रुपये मिळू शकतील. ज्याप्रमाणे पाणीपट्टी जकात वसुल करणार त्याचप्रमाणे ही सुध्दा वसुली झाली पाहिजे वसुल करतांना जनतेला त्रास होता कामा नये त्यांना पैसे भरण्यास संधी देण्यात यावी.

श्री. अविनाश कुमावत : शासनाकडून अलीकडचे एक जी.आर. प्राप्त झालेला आहे. त्यात असे दिले की कोणत्याही अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे करायची नाही आपण अशा वस्त्यावर कर लावणार विकास कामे करता येतील का?

मा.महापौर : सिडको हस्तांतर होण्यासाठी पदाधिकारी व मा.आयुक्तांसह मुंबई बैठक झालेली होती. या संदर्भात नगर विकास विभागाचे सचिव श्री. सिन्हा यांचेसह चर्चा केलेला आहे. शासनाचे या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. फक्त राज्यपालाच्या सहीसाठी गेलेले आहे. आपण १२० चौ फुट ठेवले यापेक्षा आणखी जास्त सुध्दा कर आकारण्यात येऊ शकतो आणि तो निर्णय आपणांस घ्यावयाचा आहे तो आदेश लवकर आपल्याला प्राप्त होणार आहे. दि.०९/०१/९५ च्या अगोदरचे जी घरे असतील त्यांना टॅक्स लावण्याची कार्यवाही होईल व ९५ च्या नंतर घराना सुध्दा टॅक्स लाऊ घेणार आहे. त्या प्रकारचा शहरामध्ये सर्वे चालू आहे.

श्री. अविनाश कुमावत : जी रक्कम जमा होईल ती बेटरमेंट चार्जेस म्हणून लावण्यात यावी. नंतर परवानगी देऊ नये.

मा.महापौर : स.सदस्य यांनी केलेल्या सुचनेस मान्यता देण्यात येते. यास मंजुरी देण्यात येते.

श्री.शे.ईसाक शे.जैनोद्दीन : हा प्रस्ताव गरीब लोकांवर अन्यायकारक आहे. महानगरपालिकेतर्फे परवानगी मिळत नाही. अनाधिकृत जागेवर बांधकाम करतांना अतिरिक्त कर वसुल करु नये परंतु अल्प प्रमाणात दंड वसुल करुन त्यामधून नागरी सुविधा पुरवण्यात याव्यात. तसेच कर आकारणी करतांना एप्रिल २००१ च्या नंतरचा हस्तांतरणाचा प्रस्ताव घेऊन नोटरी खरेदी खत असणाऱ्या नागरिकाकडून वसुल करावी. त्यापुर्वीच्या मालमत्ता धारकाकडून अशा प्रकारचा अतिरिक्त कर वसुल करु नये.

मा.महापौर : हा विषय सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**८) मालमत्ता कर आकारणीस स्वतःच्या वापरासाठी निश्चित केलेल्या दरात वाढ करणे.**

मा.महापौर : सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**<u>सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात काही महत्त्वाच्या बाबींवर होणारा खर्चाचा तपशिल</u>**

**१) प्रशासकीय खर्च :**

श्री. काशिनाथ कोकाटे : मलेरीया विभागामार्फत महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा यांचेकडून कुटुंब कल्याण कार्यक्रम अंतर्गत महानगरपालिकेमार्फत वेगवेगळे सेंटर

चालवले जातात आणि नागरीकांना ज्या सुविधा द्याव्या लागतात त्याचा खर्च म्हणुन शासनाकडून अनुदान मिळत असतो. जवळपास १.८३ कोटी रुपये मिळण्यासाठी १९९५ पासून प्रशासनालामार्फत काही पाठपुरावा झालेला नाही. ९४-९५ पासुन हे अुनदान प्रस्तावित आहे. दि.१७/१२/९४ मध्ये शासनाकडे एक पत्र दिलेले होते. त्यानंतर ५ वर्षानंतर म्हणजेच ०९/०९/१९९८ ला पुन्हा एक पत्र पाठवण्यात आले एक पत्र पाठवले म्हणजे सर्व जबाबदारी संपली असे होत नाही. महानगरपालिकेचा महसुली उत्पन्न ज्या ज्या ठिकाणी वाढवण्याचा प्रयत्न होता व उत्पन्नात भर पडते त्या दृष्टीकोनातून निश्चितपणे महानगरपालिका प्रशासनाकडून शासनाकडे अनुदानासाठी प्रयत्न झाले पाहिजे. शासनाकडून अशा प्रकारचे अनुदान मिळण्यासाठी आपल्या विभागातील एक विशेष अधिकाऱ्यांचे नियुक्ती करण्यात यावी. १ महिन्यातुन १ ते २ वेळेस मुंबई येथे जाऊन अनुदान मिळण्याबाबत कार्यवाही केल्यास निश्चितपणे अनुदान मिळण्यास इतका उशिर होणार नाही. शाळेसाठी ज्या इमारती आपण भाड्याने घेतलेल्या आहेत त्यांचे सुध्दा भाडे म्हणून शासनाकडुन अनुदान मिळते. जवळपास शिक्षण विभागाचे अनुदान १ कोटी व इतर सर्व अुनदान मिळून ४-५ कोटी रुपये मिळणे बाकी आहे. या संदर्भात आजच्य बेठकीत ठोस निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर : शासनाकडुन मलेरीया, कुटुंब कल्याण तसेच महानगरपालिका शाळेसाठी लागणाऱ्या इमारतीचे भाडे शासनाकडुन अनुदानापोटी मिळत असते. मागे मा.मुख्यमंत्री यांचेशी बैठक घेण्याचे मान्य केले होते. त्यावेळेस प्रशासनाच्या वतीने हे विषय ठेवण्यात आलेले होते. व सदर विषय अर्बन डेव्हलपमेंट सेक्रेटरी यांचेकडे गेलेले होते. त्यावर सदर विषय शासनाकडे मंजुरीसाठी दिलेले आहे. यासंबंधी अधिकारी डॉ.देशपांडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच मुख्यलेखाधिकारी श्री.खैरनार यांनी यांनी पाठपुरावा करावा व सर्व अनुदान मिळण्याची कार्यवाही करावी. तसेच शाळेच्या इमारतीचे भाडे सुध्दा शासनाकडुन मंजुर करुन द्यावे.

श्री. अविनाश कुमावत : नागपुर महापालिकेस शासकीय अनुदान १० ते १५ कोटी पर्यंत मिळते. औरंगाबाद महानगरपालिकेसाठी सुध्दा १० कोटीची मागणी शासनाकडे अनुदान पोटी करावी.

श्री.स.अली मिरा सलामी : महानगरपालिकाच्या उत्पन्नाच्या काही बाबीवर चर्चा करणे बाकी आहे. महानगरपालिकाच्या मालकीचे संत एकनाथ मंदीर, नेहरु भवन, व्यापरी संकुलन आहेत, आठवडी बाजार, टपऱ्या व त्यांचे भाडे हाल्डींगस् इ.बाबींवर चर्चा करावी. ४-५ वर्ष झाले टपरी कमेटीचा अहवाल आलेला आहे त्याची अंमलबजावणी होत नाही. टपरी धारक भाडे देयास तयार आहे वसुल न करण्याचे कारणे काय? शहागंज येथील दुकानांचे भाडे का वसुली करत नाही.

श्री. अविनाश कुमावत : शहागंज येथील मंडईचे बांधकाम करणार आहोत. भाडे वसुल करण्यात येऊ नये.

श्री.स.अली मिरा सलामी : क्रांतीनगर येथील टपरीचे भाडे महानगरपालिकेमार्फत वसुल केले जात नाही म्हणुन लोक न्यायालयात प्रकरण दाखल करुन

न्यायालयात टपरीचे भाडे भरत आहे. प्रत्यक्ष वसुली करावी यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे.

मा.महापौर : क्रांतीनगर भाग सोडला तर शहरातील संपुर्ण टपऱ्याचे भाडे वसुल करण्यात येते. यासंदर्भात मालमत्ता अधिकारी खुलासा करतील.

श्री.स.अली मिरा सलामी : महानगरपालिकेने १९९५ मध्ये टपरी समिती केली. शहरामध्ये अनाधिकृत ७५० तर अधिकृत टपऱ्या ४५० असुन एकुण टपऱ्या १२०० आहे या संपुर्ण टपऱ्यांचे भाडे वसुल झालेले आहे का? खुलासा करावा. क्रांतीनगर व शहागंज येथील दुकानाचे भाडे का वसुल करत नाही.

मालमत्ता अधिकारी : ४५६ टपऱ्याचे भाडे आपण वसुल करतो. जो टपऱ्याचा सर्वे केला त्यास टपरी कमेटीची मन्यता नसल्याने भाडे वसुल करण्यात येत नाही. महानगरपालिकामार्फत त्यांना परवानगी दिलेली नसल्याने भाडे स्विकारत नाही.

मा.महापौर : हा विषय अर्थसंकल्पात न घेता सर्वसाधारण सभेत घेतला जाईल त्यावेळी सविस्तर चर्चा करण्यात येईल.

(याच वेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालु असते काही ऐकु येत नाही)

मा.महापौर : महानगरपालिकातील आस्थापनावरील खर्च ३४.६५ कोटीचा असुन सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

श्री. अफसरखाँन : ३४.६५ कोटी खर्च होतात खुलासा करावा.

मुख्यालेखाधिकरी : ३४.६५ कोटीचा खर्च हा संपुर्ण कर्मचाऱ्यांच्या १२ महिन्याचा वेतनाचा खर्च म्हणुन नमुद केलेला आहे. किती व कसा खर्च होतो याचे सविस्तर विवरण मागील बाजूस दिलेले आहे. सदर खर्च हा वेतनावरील असून बजेट वाढले तरी हा खर्च कमी होणार नाही.

मा.महापौर : हा विषय मंजुर करण्यात येत आहे.

श्री. रतनकुमार पंडागळे : महानगरपालिका हा एकोणिसावा अर्थसंकल्प सादर केला असुन या अगोदरच्या अर्थसंकल्पात कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याची तरतुद करण्यात आलेली होती आणि या वर्षीच्या अर्थसंकपात त्या संबंधीची तरतुद करण्यात आलेली नाही जे कर्मचारी सकाळ पासुन दिवसभर या शहराची साफसफाई करतात साफसफाईमुळे जवळपास १० लाख लोकांचे आरोग्य धोक्यात न येण्याच्या दृष्टीने सफाईच तसेच वसुलीचे कामे करतात. म्हणुन अशा कर्मचाऱ्यांना आपण सानुग्रह अनुदानाचे तरतुद करावी अशी सभगृहाच्या वतीने विनंती करतो.

श्री. अविनाश कुमावत : या संदर्भात बोनस न देण्याचा न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. पुढील वर्षापासुन लागू करावे.

श्री. रतनकुमार पंडागळे : मुंबई महानगरपालिकाचे कर्मचारी बोनस मिळत नाही म्हणुन संपावर गेलेले होते म्हणुन तसा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. सध्या नाशिक महानगरपालिका बोनस देण्याबाबत निर्णय घेत आहे तर आपल्या महानगरपालिकाने का घेऊ नये.

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिका ही स्वंयसेवी संस्था आहे नियम बनवण्याचा महानगरपालिकास अधिकार असुन शासनाचे निर्देशाप्रमाणे् या महानगरपालिका कारभार चालतो परंतु काही वेळेस शासनाचे नियम आपण धाब्यावर बसवतो. दरवर्षी आपण वर्ग-४ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना बोनस देत आलेलो आहोत. सदर कामगार दिवसभर साफसफाईचे कामे तसेच

वसुलीचे कामे करतात. त्यांचे कामास प्रोत्साहन वाढवण्यासाठी व त्यांनी केलेल्या कामाचे कौतुम म्हणुन सानुग्रह अनुदान देत असतो. मुंबई महानगरपालिकाच्या संदर्भात निदर्शनास आणून दिले की महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने देऊ शकत नाही. न्यायालयाने तसा निर्णय दिलेला होता. आपल्या महानगरपालिकाची सध्या तरी आर्थिक परिस्थिती चांगली आहे. म्हणुन कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यासंदर्भात तरतुद करावी.

श्री. किशोर तुळशिबागवाले : वर्ग-३ वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना दरवर्षी बोनस देण्यात येते या वर्षीसुध्दा तरतुद करावी. सदर कर्मचारी शहराची दिवसभर साफसफाईचे कामे करतात. कामात त्यांचा उत्साह वाढावा म्हणुन बोनस रुपाने भत्ता आपण त्यांना दरवर्षी देत असतो.

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रशासकीय खर्च दाखवल्यानंतर सुध्दा काही कपात व तुट्या या ठिकाणी दिलेल्य आहे. महाराष्ट्र शासनाच्या गेल्या वर्षीच्या धोरणानुसार महाराष्ट्रातील नगरपालिका, महानगरपालिका यांनी त्यांचे उत्पन्नाचा दृष्टीकोन समोर ठेवून कर्मचाऱ्यांना बोनस द्यावा असे म्हटले होते. शासनाने आदेश असतांना गेल्या वर्षी आपल्या महानगरपालिकामध्ये सर्वांच्या संम्मतीने कर्मचाऱ्यांना बोनस वाटप करण्यात आलेला होता म्हणुन, तशी दुरुस्ती अर्थसंकल्पात टाकण्याची गरज नव्हती. कर्मचाऱ्यांनी जिद्दीने कामे केली पाहिजे. वातावरण चांगले असावे, कर्मचाऱ्यांसाठी नेहमी प्रशासनाचे दवाजे खुले पाहिजेत. म्हणुन आज बोनस देणार नाही अशी भूमिका मांडणे बरोबर होणार नाही. म्हणुन कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत तरतुद करण्यात यावी.

श्री. भगवान घडामोडे : सभागृहात स.सदस्यांनी गोलमोल सुचना मांडल्या. स्थायी समितीने या प्रस्तावास बोनस न देण्याचा निर्णय घेतलेला असुन त्या प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर झालेला आहे. एकाने एक दुसऱ्या स.सदस्याने एक बोलायचे हे बरोबर होणार नाही. बोनस द्यायचा की नाही या बाबत सर्वांनी एकमत करुन निर्णय घ्यावा. प्रशासनाने न देण्याबाबत मत मांडलेले आहे. सर्वसाधारण सभेने योग्य तो निर्णय घ्यायचा आहे.

श्री. जयवंत ओक : गेल्या वर्षी शासनाचा आदेश (परवानगी) नसतांना आपण सर्वांनी मिळून मा.आयुक्तांशी चर्चा करुन कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत निर्णय घेतलेला होता. सभागृहात कोणीही राजकारण आणू नये. स.सदस्य श्री. पंडागळे यांनी कर्मचाऱ्यांच्या भावनेचा आदर ठेवून प्रश्न उपस्थित केलेला आहे. आज नाही द्यायचे ठरले तरी उद्या द्यावेच लागणार म्हणुन मा.आयुक्तांशी चर्चा करुन आज याचा निर्णय या ठिकाणी आहोत सर्वांचे एकमत करुन निर्णय घेण्यात यावा. किती दिवसांचा बोनस द्यायचा याचा निर्णय नंतर घ्यावा. आताच निर्णय घेतल्यास वर्षभर कर्मचारी चांगल्याप्रकारे काम करतील.

मा.महापौर : बोनस द्यायचा नाही असे प्रशासनाने अर्थसंकल्पात नमुद केले होते. त्यास स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. स्थायी समितीने काही चर्चा न करता जशाच्या तसे सर्वसाधारण सभेपुढे आलेले आहे तरी सुध्दा स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन बोनस दिला जाईल. त्यावेळी किती दिवसाचा बोनस वाटप करायचा त्याबाबत सविस्तर बैठक घेऊन चर्चा करण्यात येईल. सध्या प्रशासकीय खर्चात ५ लाख रुपये बोनस तरतुद म्हणून टोकन अमाउंट

ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. प्रशासकीय खर्चास मान्यता देण्यात येते.

## २) पाणी पुरवठा व्यवस्था :

मा.महापौर : १. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडाळास विद्युत बिलापोटी ७५ लाख रु.दरमहा व २ कोटी रुपये इंटरनल पंपींग चार्जेस आहेत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

२. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण पाणी पुरवठा योजनेस थकबाकी म्हणुन रक्कम रु.२ कोटी देण्यास मान्यता देत आहे.

३. पाणी पुरवठा योजनेकरिता घेतलेल्या कर्जाची परतफेड रु.२ कोटी २० लाख देण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. काशिनाथ कोकाटे : पाणी पुरवठा व्यवस्था यामध्ये क्र.४ मध्ये सुधारीत पाणी पुरवठा योजना पुंडलिक नगर येथे जलकुंभ उभारण्यासाठी ४५ लाखाची तरतुद केलेली आहे. गेल्या ५ ते ६ वर्षापासुन जलकुंभाचे भूमिपुजन झाले परंतु ती योजना कार्यरत होत नाही जनतेला उपयोगी पडत नसेल तर योग्य नाही. झालेल्या खर्चावर महानगरपालिकेस व्याज भरावे लागते सध्या तेथे ३० ते ४० टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो ही योजना ताबडतोब कार्यान्वीत करावी. वेळेचे काही बंधन आहे का? खुलासा करावा. अंदाजपत्रकानुसार या कामासाठी किती वेळ दिला याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : महानगरपालिकेतर्फे सिडकोकडे या संदर्भात ४७ लाख रुपयाची संचिका सादर केलेली आहे. पुंडलिक नगर या भागात जलकुंभ करण्यासाठी ४७ लाख रु. कर्ज घेत आहे. लवकरच लवकर जलकुंभ बांधण्याची कार्यवाही करण्यात यावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : संचिका कधी पाठवली याचा खुलासा व्हावा.

मा.कार्यकारी अभियंता (पा.पु.) : पुंडलिक नगर मध्ये जी ६७ कोटीची स्कीम होण्यासाठी या सर्वसाधारण सभेने सन ९४ मध्ये एक प्रस्ताव जीवन प्राधिकरण मार्फत महाराष्ट्र शासनाकडे पाठवलेला होता. त्यामध्ये एल.आय.सी. कडून कर्ज घ्यावे असे होते. एल.आय.सी. ने कर्ज देण्यास नाकारले. हडकोकडून कर्ज घ्यायचे व तसा ठराव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठवलेला आहे. महानगरपालिकाचा कारभार कसा चालतो या संदर्भात एक पुस्तिका हडको कडून आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा अर्ज दिलेले आहे व दोन वेळा ठराव मांडावा लागतो.

श्री. काशिनाथ कोकाटे : या योजनेसाठी किती बजेट लागणार? महाराष्ट्र जीवन प्राधीकरण ही योजना राबवण्यास विलंब करत असेल तर महानगरपालिकेकडून राबवण्यात येईल का याचा विचार व्हावा.

मा.महापौर : आपण कर्ज घेणार आहोत. महानगरपालिकेमार्फत जलकुंभ बांधण्याचे काम केल्यास लवकर होईल असे वाटते कारण आपल्यावर जास्त जबाबदारी राहील. आपण हडकोकडून कर्ज घेत आहोत. महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाकडे एक पत्र पाठवून १ १/२ (दिड) वर्षाच्या आत हे काम करण्याची कार्यवाही व्हावी. असे नमुद करावे.

५. शहरात नविन भागात जलवाहिण्या टाकणे साठी तसेच जुन्या लहान आकाराच्या जलवाहिण्या काढून नविन जलवाहिण्या टाकण्यासाठी ५ कोटीच्या तरतुदीस मान्यता देण्यात येते.

६. शहरातील अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या देखभाल करिता व जायकवाडी प्रकल्प पाईप लाईन देखभाल करिता येणारा खर्च रु.३.५० कोटीस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

७. इतर किरकोळ खर्च रसानिक / मशिनरी खर्च रु.३.१५ कोटी.

श्री. काशिनाथ कोकाटे : यामधून १ कोटी रुपये वजा करुन फारोळा येथे रिट्रिटमेंट प्लॅण्ट बांधण्यासाठी १ कोटीची तरतुद करावी व २.१५ कोटी रुपये सामुग्री / मशिनरीसाठी ठेवण्यात यावे.

मा.महापौर : यामधून १ कोटी वजा करुन फारोळा येथे रिट्रिटमेंट प्लॉण्ट बांधण्यासाठी १ कोटीची तरतुद करण्यात येते.

**भूमिगत जलनिःसारण व्यवस्था :**

मा.महापौर : ड्रेनेज सिस्टीमसाठी आपण एसटीपीसाठी ७५ लाख रुपये तरतुद करण्यात आलेली आहे. मंजूर करण्यात येत आहे.

श्री. अफसरखॉंन : अगोदरही सभागृहात या संदर्भात चर्चा झालेली होती. एकुण १ कोटी ३५ लाखाचे हे काम असुन तत्कालीन आयुक्त यांनी या कामाबाबतचा फेर निविदा काढाव्या असे सुचविले होते. परंतु तशी कर्यवाही करण्यात आलेली नाही.

मा.महापौर : स्थायी समिती मध्ये हा विषय मंजुर होऊन आलेला आहे.

श्री.शेख ईसाक शे.जैनोद्दीन : प्रस्तावित झाल्या ट्रिटमेंट प्लॅण्ट बांधण्यासाठी जी निविदा काढण्यात आली होती. निविदामधे जास्तीचे निविदा दर यामुळे तात्कालीन आयुक्त श्री.बलदेवसिंग यांनी दिनांक २७/७/२००७ रोजी झालेल्या सभेत सदरील काम फेर निविदा मागून करण्याची विनंती सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेले होते. सदरचे काम १ कोटी ३५ लाखाचे असतांना काम कसे देण्यात आले तसेच स्थायी समितीने या प्रस्तावास मंजुरी कशी दिली तसेच स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत खुलासा द्यावा.

मा.महापौर : गेल्या वर्षीच्या सर्वसाधारण सभेत हा विषय चर्चेला आलेला होता. त्यानंतर प्रशासनातर्फे व स्थायी समितीकडून या प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे. महानगरपालिकेचा ३५ लाख रुपयाचा आर्थिक फायदा आहे. सभागृहाला सर्व माहिती व्हावी म्हणुन संबंधीत अधिकारी माहिती देत आहे.

कार्य.अभियंता (पा.पु.) : झाल्टा येथील ट्रिटमेंट प्लॅण्ट बांधण्यासाठी जी निविदा होती १ कोटी ३५ लाख अशी होती. त्यामध्ये रिवाईज इस्टिमेंट करावे असे ठरले असता त्या कामाचा खर्च १ कोटी ७० लाख झाला सदरील काम करण्यास तयार झाले असल्याने १ कोटी ३५ लाख मध्येच ते काम होणार असल्याने सदरचे कामास प्रशासनाने तसेच स्थायी समिती सभेने मंजूरी दिलेली आहे.

श्री. अफसरखॉंन : समजा एखाद्या कामाचे २ कोटीचे टेंडर भरण्यात आले त्यामध्ये ४ टेंडर त्यामध्ये ४० ते ५० टक्के कमी दराने काम करण्याचे दाखविल्यास आपण त्यास मंजुरी देणार काय? खुलासा द्यावा.

श्री. शेख ईसाक शे.जैनोद्दीन : स्थायी समितीने यास मंजुरी कशी दिली याचा खुलासा पाहिजे आहे.

श्री. मोतीवाला अशरफ : स्थायी समितीमध्ये या विषयावर चर्चा होऊन सदरील कामचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर झालेला आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार निविदा स्विकारण्याचे अधिकार स्थायी समितीला प्रदान करण्यात आलेले आहेत. त्या अधिकाराचा वापर करुन सदरील कामाचा प्रस्ताव सर्वानुमते स्थायी समितीत मंजुर करण्यात आला आहे.

श्री. अफसरखाँन : जे काम चालू आहे ते बं करावे.

मा.महापौर : काम चालू आहे किंवा काय यासंबंधी अधिकारी यांनी खुलासा द्यावा.

कार्य.अभियंता (पा.पु. व जलनिःसारण) : मुळ कामास सुरुवात झालेली नाही, परंतु साईडचे किलअरींग करण्याचे काम चालू आहे. जे याच कामाचा एक भाग आहे.

श्री. अंबादास दानवे : प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करुन संबंधीत गुत्तेदारास कामाचे वर्कऑर्डर दिलेले आहे. म्हणुन बी-१ निविदा नियमानुसार काम थांबवता येणार नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : सदरील कामास स्थायी समितीने सुध्दा मंजुरी दिलेली आहे. स्थायी समितीचा अपमान होणार आहे. म्हणुन काम चालू ठेवावे.

श्री. अविनाश कुमावत : मा.आयुक्तांनी सर्वसाधारण सभेत संवाद केलेला आहे. निर्णय घेतलेला नाही अथवा ठराव झालेला नाही. उलट सदरचे कामात ३५ लाख रुपयाने वाढ होत होता तो पैसा महानगरपालिकेचा शिल्लक राहिले आहे. यात महानगरपालिकेचा आर्थिक फायदा झालेला आहे. म्हणुन जे काम सध्या चालू आहे ते बंद करु नये व काम चालुच ठेवावे यात कोणताही भ्रष्टाचार होऊ शकत नाही.

श्री. भगवान घडामोडे : जर स्थायी समितीने मान्यता दिली असेल तर जे काम सध्या चालू आहे ते चालूच ठेवावे.

मा.महापौर : सदरील झाल्टा येथे एस.टी.पी. बांधणेच्या कामामध्ये महानगरपालिकेचा रु.३५ लाखचा आर्थिक फायदा लक्षात घेता सध्या त्या ठिकाणी काम चालु असेल तर ते चालूच ठेवावे. झाल्टा या गावची परिस्थिती पाहता तेथे मलनिःसारण व्यवस्थेचा मोठा प्रश्न आहे. शहरातील संपुर्ण ड्रेनेजचे पाणी त्या ठिकाणी जाते आहे. करीता झाल्टा येथे एस.टी.पी. (ट्रिटमेंट प्लॅण्ट) बांधण्याबाबत प्रशासनातर्फे कार्यवाही व्हावी. विषय क्रमांक ३ मंजुर करण्यात येत आहे.

## ४) झोपडपट्टी विकास कार्यक्रम :

श्री. काशिनाथ कोकाटे : झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत मुलभूत सेवा / सुविधा देण्यासाठी रु. ५.२५ कोटीची तरतुद असून यामध्ये आणखी १ कोटी वाढ करण्यात यावी कारण १/१/९५ च्या शासन निर्णयानुसार काही वसाहती अधिकृत करण्याचा निर्णय घेणार आहेत त्याचा सर्वे झाल्यानंतर कार्यवाही होणार व खर्च वाढणार आहे. म्हणुन १ कोटी रुपयाचे आणखी तरतुद करता येत असेल ती करण्यात यावी.

मा.महापौर : आपली सूचना लक्षात घेतलेली नोंद केली. आवश्यकतेनुसार कार्यवाही होईल मंजुर करण्यात येत आहे.

**५) मेमोरीयल व संशोधन केंद्र :**

मा.महापौर : या विषयास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**६) रस्ते तयार करणे :**

श्री. काशिनाथ कोकाटे : फुटपाथसाठी तरतुद करण्यात यावी.
मा.महापौर : रस्ते तयार करणे, यामधील क्र.४ मधील १०० लाख फुटपाथसाठी तरतुद करण्यात येते. ज्या रस्त्यावर फुटपाथ करायचे तेथे करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**७) विद्युत :**

मा.महापौर : यामध्ये शहरामध्ये ६०० वेगवेगळे पॉईटस् आहेत. त्यामध्ये विद्युत दिवे कन्ट्रोल करण्यासाठी काही ठिकाणी महानगरपालिका व काही ठिकाणी टायमर आहेत तरी सुध्दा मुंबई सारख्या मोठ्या ठिकाणी जसे सेट, लाईट कन्ट्रोल आहे त्याचप्रमाणे या शहरामध्ये सुध्दा तसेच सेट लाईट कन्ट्रोलची व्यवस्था असावी म्हणुन २५ लाखाची तरतुद करण्यात येत आहे.
श्री. काशिनाथ कोकाटे : नविन पोलसाठी २५ लाख ठेवले परंतु या अगोदर नविन पोल साठी एम.एस.ई.बी. कडे पैसे भरलेले आहे अद्याप पोल दिलेले नाही ते अगोदर मागवावे नंतर या तरतुदी मधून खर्च करावे.
मा.महापौर : अगोदरचे पैसे भरलेल्या पोलची मागणी करण्याची कार्यवाही करावी. या विषयास मंजुरी देण्यात येते.

**८) सुलभ शौचालय आणि स्त्री, पुरुषकरीता मुतान्या बांधणे :**

मा.महापौर : या प्रस्तावस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**९) नविन उद्याने :**

मा.महापौर : या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**१०) इतर विकास इमारती :**

मा.महापौर : सिडकोच्या नाट्य गृहासाठी ५ लाख फारच कमी होते म्हणुन विकास इमारती व शाळा दवाखाने यातून १ कोटीची तरतुद करण्यात येते.

**११) इतर भांडवली कामे :**

मा.महापौर : यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**१२) कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना :**

मा.महापौर : या विषयामध्ये नियमाने कार्यवाही करावी हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**१३) कर्ज परतफेड :**

मा.महापौर : यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**१५) स्वेच्छा निधी :**

श्री. जयवंत ओक : गेल्या वर्षी बजेटनुसार स्वेच्छा निधी मधील सर्व कामे झालीत का? कोणती कामे बाकी आहे, ती का झाली नाही. स्वेच्छानिधीला शहरात नुसता प्रचार केला परंतु विकासाची कोणतीच कामे झालेली नाही. स्वेच्छानिधीत वाढ झाली पाहिजे. ५ लाख स्वेच्छानिधी करण्यात यावा. जेणे करुन आवश्यकतेनुसार नगर सेवकांनी सुचवला नुसार वार्डातील विकास कामे करता यावी म्हणुन स्वेच्छानिधी वाढवणे आवश्यक आहे.

श्री. किशोर तुळशिबागवाले : ५० लाख ऐवजी १ कोटीची तरतुद नाट्य गृहासाठी ठेवण्यात आली हे बरोबर नाही म्हणुन आम्ही कॉग्रेसचे सर्व सदस्य सभागृहाबाहेर जातात.

(त्याच वेळी काही स.सदस्य सभागृहाबाहेर जातात)

श्री. काशिनाथ कोकाटे : सिडको वासीयांच्या सोयीसाठी व फायद्यासाठी नाट्यगृहास १ कोटीची तरतुद ठेवण्यास कुणाचे दुमत नाही. परंतु स्थायी समितीमध्ये बजेट सादर करतांना ५० लक्ष रुपयाची ठेवली. परंतु अद्याप ते नाट्यगृह बांधण्याची निविदा निघालेली नाही. जवळपास १.५० कोटी रु. यासाठी लागणार असुन या अगोदर शासकीय निधी मधुन ५० लक्ष रुपये दिलेले आहे. २५ लक्ष रुपयाचा चेक सिडकोकडुन महानगरपालिकेस मिळणार याची सुध्दा माहिती सभागृहाला द्यावयास पाहिजे होती. स्थायी समितीने ५० लक्ष तरतुद केलेली आहे. त्यास मंजुरी द्यावी.

मा.महापौर : सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता सिडकोतील नगरसेवकांना त्यांचा स्वेच्छानिधी वापरता येत नाही. प्रशासनातर्फे काही विकास कामे करता येत नाही म्हणुन १कोटी रुपये नाट्यगृहासाठी तरतुद ठेवलेली आहे.

श्री. जयवंत ओक : सिडको हडको प्रशासनाकडून ११ नगरसेवक निवडून आलेले आहे. स्थायी समितीच्या बजेट ५० लक्ष ऐवजी ५ लक्ष रु. तरतुद बजेटमध्ये करण्यात आलेली होती. आता सभागृहाच्या भावना लक्षात घेता व तेथील नागरीकांच्या मागणीनुसार नाट्यगृहासाठी १ कोटी केलेत त्याबद्दल अभिनंदन करतो. नाट्यगृह बांधल्यानंतर तेथील जनता तेथील निवडून आलेल्या नगरसेवकांना धन्यवाद देतील. ५० लक्षचे १ कोटी केले तो अधिकार महापौरांचा आहे. मी सभापती असतांना २ कोटी रुपये ठेवलेले होते.

श्री. पांडुरंग तायडे : सिडकोच्या नाट्यगृहासाठी १ कोटी ठेवले त्याबद्दल महापौरांचे स्वागत करतो.

श्री. काशिनाथ कोकाटे : ५० लक्ष तरतुद करुन तात्काळ निविदा काढण्याचे आदेश व्हावेत.

मा.महापौर : १ कोटी मंजुर केलेले आहे. स्वेच्छानिधीवर चर्चा करावी.

श्री. जयवंत ओक : शासनाचे परिपत्रक येईल तेव्हा वापरणार आहे. तो जर गैर मार्गाने वापरण्यात येत असेल तर तेथील काम बंद करण्याचा अधिकार प्रशासनाला आहे. म्हणुन कुणीही चांगल्या कामासाठीच स्वेच्छा निधी वापरणार आहे. इतर महानगरपालिकामध्ये नगर सेवकांचा स्वेच्छा निधी ५,६,७ लाखापर्यंत आहे. आपल्याही महानगरपालिकेमध्ये प्रत्येकी ४ लाख स्वेच्छानिधी करावा अशी सभागृहाच्या वतीने विनंती आहे. शासनाचे स्वेच्छानिधी वापरण्यासंदर्भात परिपत्रक आले त्याची प्रशासनामार्फत सभागृहात थोडक्यात माहिती द्यावी.

मा.महापौर : स्वेच्छानिधी वापरासंबंधी निधीच्या संदर्भातील संचिका एक महिन्याच्या आत निकाली काढाव्यात अशी विनंती सभागृहात नुसता निर्णय घ्यायचा व कामे काहीच नाही हे योग्य नाही.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : एक वर्ष उलटले तरी सुध्दा मागील वर्षाच्या स्वेच्छानिधीची कामे अद्याप झाली नसून सहीसाठी संचिका थांबवून आहेत. मागील स्वेच्छानिधी मधील कामे व्हावी यासंदर्भात एक पत्र सुध्दा मा.आयुक्तांना दिलेले आहे.

श्री. जयवंत ओक : सामान्य नागरीकांच्या भावना लक्षात घ्याव्यात विकास कामे होत नाही म्हणुन वार्डातील जनता नाराज आहे. स्वेच्छा निधीचा गैर वापर होत असेल तर नगरसेवकांवर कार्यवाही करावी. परंतु स्वेच्छानिधीच्या जेवढ्या संचिका थांबवून असतील त्या तात्काळ मंजुर करुन कामास सुरुवात करावी अशी विनंती आहे. स्वेच्छानिधीच्या काही संचिका गायक होतात अशा अधिकाऱ्यांवर मा.आयुक्तांनी कार्यवाही करावी.

मा.महापौर : स्वेच्छानिधीच्या जास्त प्रमाणात संचिका थांबवून नाही. लवकर प्रशासन मंजुरी देणार आहे. संबंधीत अधिकारी यांनी कोणकोणत्या कामाची संचिका थांबवून आहेत त्यावर ताबडतोब मा.आयुक्त यांची स्वाक्षरी घ्यावी.

श्री. जयवंत ओक : वर्ष झाले संगणक प्रशिक्षण व वाहन चालक प्रशिक्षण स्वेच्छा निधीतुन देण्याचे ठरवले होते. अद्याप कार्यवाही नाही. प्रत्येक स.सदस्यांचा २५ हजार रु. निधी विकास कामे न होता गायब झाले. यासंदर्भात खुलासा करावा.

मा.महापौर : यासंदर्भात येणाऱ्या सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा करता येईल स्वेच्छानिधी किती ठेवायचा याचा आपण ४ लाख सांगितलेले आपले मत मांडले.

श्री. काशिनाथ कोकाटे : स्थानिक विकास अंतर्गत नगर सेवक स्वेच्छानिधीतुन जी काही कामे करायची त्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने पाठवलेल्या परिपत्रकानुसार १४ महानगरपालिकांस हे परिपत्रक लागू करण्याच्या दृष्टीने संपुर्ण कामाची यादी सादर केलेली आहे. या कामाच्या यादीमध्ये सभागृह, समाज मंदिर, व्यायामशाळा, स्मशानभूमी, सार्वजनिक वाचनालये, प्राथमिक शाळेच्या नविन खोल्या, विविध भागात पाणी पुरवठ्याची कामे या संदर्भात माहिती दिलेली आहे. कोणती कामे करायची कोणती करु नये त्यांचे नियमावली प्रशासनाच्या वतीने सादर होणार आहे परंतु अंदाजपत्रक सादर करत असतांना मोठमोठ्या वास्तु स्वेच्छानिधीतून आपण करु शकतो.

उदा.शाळेच्या नवनि खोलीचे बांधकाम कराचे झाल्यास २ ते २.५० लाख व त्यापेक्षा जास्तीत जास्त ३ लाख रुपये सुध्दा खर्च येऊ शकतो किंवा एखादे वाचनालय करायचे निर्णय झाला तर स्वेचछानिधीतुन ते काम पुर्ण व्हावे असा स्वेच्छानिधी ठेवावा कमीतकमी ४ लाख प्रत्येक नगर सेवकांना स्वेच्छानिधी असावा.

श्रीमती लिलावती घायतिलक : वाहन चाहक तसेच संगणक प्रशिक्षण देण्याचे स्वेच्छानिधीतुन वगळण्यात येऊ नये कारण दारिद्रय रेषेखालील मुलांना याचा फायदा घेता येईल.

मा.महापौर : स्वेच्छानिधी वापरण्यासंदर्भात शासनाचा जी.आर. नुसार कार्यवाही होणार नाही. स्वेच्छानिधी ५० हजाराने वाढवून देण्यात येत आहे.

श्री.स.अली मिरा सलामी : स्वेच्छानिधी ३ लक्ष ऐवजी २.५० लक्ष ठेवावे परंतु शासनाच्या नियमावलीचा वापर होऊ नये स्वतःची नियमावली तयार करावी आपण स्वतः निर्णय घेवू शकतो. कारण हा पैसा शहरातील नागरिकांचा असुन विकास कामासाठी प्रत्येक वेळेस शासन नियमावली वापर करणे बरोबर होणार नाही. महानगरपालिकाची स्वतंत्र नियमावली तयार करावी इच्छेप्रमाणे नगरसेवक वार्डातील गरिबांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य कॉम्प्युटर प्रशिक्षण, वाहन चालक प्रशिक्षण, देता येईल बऱ्याच गरिब मुलांची नगर सेवक स्वेच्छानिधीमधून वाहन चालक प्रशिक्षण इतर काही गरिबांसाठी कामे होण्याची अपेक्षा असते. अशी गरीब मुलांसाठी मदत नगरसेवकांकडून होत असेल तर चांगली बाब आहे. स्वेच्छानिधी वाढवू नये परंतु पहिल्या बजेटमध्ये ज्या प्रमाणे सुविधा देण्याचे ठरवले त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. महानगरपालिकाची स्वतंत्र नियमावली करावी जरुरी पडल्यास शासन मंजुरी घ्यावी. वाहन चालक तसेच संगणक प्रशिक्षणासाठी निधीचा वापर करण्यास मंजुरी द्यावी अशी सभागृहाच्या वतीने विनंती करण्यात येते.

मा.महापौर : हा विषय सर्वसाधारण सभेत होऊन निर्णय घेतला जाईल व तसे शासनास कळवले जाईल.

श्री. जयवंत ओक : शासनाचे परिपत्रक काय आहे वाचून दाखवावे. स्वेच्छानिधीतून गैरवापर होत असेल तर कार्यवाही करावी त्या वार्डातील कामे बंद करावी. परंतु वार्डातील विकास कामे व्हावी म्हणून जनतेनी नगरसेवकांना निवडून दिलेले आहे. नियम घालून अडथळा आण असेल तर अशा शासनाचा आम्ही निषेध करतो.

(याच वेळी स.सदस्य श्री. जयवंत ओक व इतर काही सदस्य सभागृहाबाहेर जातात)

मा.महापौर : जी शासनाची नियमावली आहे ती सभागृहासमोर ठेवली जाईल त्यात दुरुस्ती बदल करुन नविन नियमावली तयार करुन शासनाकडे पाठवली जाईल. स्वेच्छानिधीत ५० हजाराची वाढ करण्यात येते.

**१६) पुरनियंत्रण कामे :**

श्री. नंदकुमार घोडेले : १५ लाखाची तरतूद फारच कमी होते.

मा.महापौर : यामध्ये ५ लक्ष रुपयाची वाढीव म्हणजेच २० लक्ष तरतुद करण्यात येते.

**१७) क्रिडा संकुले व बांधकाम :**

मा.महापौर :   यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**१८) विविध क्रिडा स्पर्धा आयोजित करणे :**

मा.महापौर :   यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**१९) विशेष शासकीय अनुदान :**

मा.महापौर :   १० कोटीपैकी ४ कोटी शासनाकडुन मिळालेले असुन जालना रोडसाठी ३ कोटी दिलेले आहे. एकुण १० कोटी यावयास पाहिजे यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**२०) सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे :**

मा.महापौर :   यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**२१) घर बांधणी / वाहन खरेदी अग्रीम :**

मा.महापौर :   यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**२२) शिक्षण :**

श्रीमती लिलावती घायातिलक : शाळेतील गरीब व मागासवर्गीय मुलांच्यासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमासाठी नियोजन केले नाही व खर्चाची काही तरतुद करण्यात आलेली नाही.

मा.महापौर :   पान क्र.७० वर आपण शिक्षण विभागासाठी ९ कोटी ७६ लाख २५ हजाराची तरतुद केली. या विभागामार्फत सर्व कार्यक्रमह राबवले जाईल. हा विषय मंजुर करण्यात येत आह.

**२३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणेश योजना :**

सौ. संगिता मैंद : ही योजना अत्यंत चांगली असुन वेळेचे बंधन पाळता राबवण्यात यावी. १५ ऑगस्ट पर्यत गणवेश विद्यार्थ्यांना मिळावयास पाहिजे.

मा.महापौर :   प्रत्येक वर्षी शालेय मुलांना गणवेश देण्यास ४ ते ५ महिने उशीर होतो परंतु या वेळेस मा.आयुक्तांनी सांगितले की लगेच पुढल्या महिन्यात गणवेशाचे टेंडर काढण्यात येईल म्हणजे जुन/जुलै मध्ये विद्यार्थ्यांना कपडे मिळतील या संदर्भात तात्काळ कार्यवाही करावी. ३५ लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे आणि या संदर्भात काही स.सदस्यांनी मागे सूचना केल्या होत्या जे गणवेश शिलाई केली जाते त्याचे माप बरोबर नसते म्हणून तो गणवेश विद्यार्थ्यांना येत नाही असे होता कामा नये. योग्य ती मापाची शिलाई करुन मुलांना गणवेश वाटप करण्यात यावा.

### २४) विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी जमीन आणि इतर स्थावर मालमत्ता संपादन करणे :

श्री. काशिनाथ कोकाटे : यासाठी जे बजेट ठेवले ते फारच कमी आहे. शहराची वाढती लोकसंख्या, वाढता व्याज लक्षात घेता शहरातील बरेच महत्त्वाच्या रस्त्याचे बाजुचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. टाऊन हॉल ते मौलाना आझाद चौक ते सिडको मार्गे चेलीपुरा पोलिस चौकी ते शहाबाजार चौक, रोषनगेट, राममंदीर रस्त्याचे भूसंपादन करण्याची कार्यवाही केल्यास योग्य होईल. केवळ नागरीकांना रक्कम द्यावी लागणार म्हणून कार्यवाही होत नाही. त्याचप्रमाणे संस्थान गणपती ते जाफरगेट, लेबर कॉलनी ते शहागंज, नेहरु भवन ते औरंगपुरा, जालना रोड वर सेंट फ्रान्सीस, बुढ्ढी लाईन ते जुना बाजार इ. रस्त्याचे भुसंपादनाची कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच पंचायत समिती कार्यालय औरंगाबाद जवळील पुलाचे नविन काम करण्याची गरज आहे. १ लाख टोण रक्कम ठेवली यात वाढ करावी. यासर्व रस्त्याची भूसंपादन दुरुस्ती करण्याची गरज आहे. तसा उल्लेख अर्थसंकल्पात करावयास पाहिजे.

श्री. जयवंत ओक : शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून जाधववाडी येथील महानगरपालिकाच्या मालकीच्या जागा डेवलोपमेंट करणे गरजेचे आहे. आताच स.सदस्य श्री.कोकाटे यांनी रस्त्याच्या संदर्भात सूचना केल्या. महानगरपालिकेचा जो विकास आराखड्यानुसार जो प्लॅन तयार करण्यात आला त्या जागा महानगरपालिकाच्या ताब्यात आहे का? शहरातील विविध भागातील जमीन व स्थावर मालमत्ता संपादन करायच्या आहेत म्हणुन ६ कोटी ऐवजी १० कोटीची तरतुद करावी. महानगरपालिकाच्या ज्या आरक्षीत जागा आहे त्यावर अतिक्रमण होत आहे. अशा जागा महानगरपालिकाने ताब्यात घेण्यासाठी खर्च येणार नाही.

मा.महापौर : मंजुर करण्यात येत आहे. महानगरपालिकाच्या मालकीच्या जागेवर कुणी अतिक्रमण केलेले असेल अशा महानगरपालिकाच्या मालकीच्या जागा ताब्यत घ्याव्यात. आवश्यकतेनुसार शहर विकास आराखड्याचे रुंदीकरण व जमीन व मालमत्ता संपादन करण्याची कार्यवाही करावी. आता अर्थसंकल्पातील पान क्र.१४ वर बोलावे.

## <u>सन २००१-२००२ च्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये</u>

मा.महापौर : पान क्र.१४ वर अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये दिलेली आहे त्यावर चर्चा करावी.

श्री. अंबादास दानवे : प्रभाग समितीसाठी लागणाऱ्या खर्चाची तरतुद करण्यात आलेली नाही. नियमाने तरतुद करावयास पाहिजे.

मा.महापौर : प्रभाग समित्या कार्यान्वित झाल्यानंतर तरतुद करण्यात येईल.

श्री. अंबादास दानवे : ११ नंबरवर दिले अग्निशमन दल बळकट करणे यामध्ये जमा बाजूत २ कोटी रुपये दाखवले. आताच भूकंपाची परिस्थिती निर्माण झाली होती.

पुर वादळ इ.आपत्तीच्या घटना घडू शकतात. या २ कोटी मधुन आपतग्रस्तांना काही मुदत देता येणार नाही. यात आणखी तरतुद करावी.

मा.महापौर : ५० लाखाची तरतुद अग्निशमन दल बळकट करणे यामध्ये करण्यात येते. आवश्यकतेनुसार खर्च करता येतील.

श्री. अंबादास दानवे : ५० लक्ष ऐवजी १ कोटी करावे.

मा.महापौर : १ कोटीची अग्निशमन विभागासाठी रेस्क्यु व्हॅन व इतर खर्चासाठी आणखी तरतुद करण्यात येते. रेस्क्यु व्हॅनमुळे जनतेसाठी काय करु शकतो व आवश्यकता काय याचा खुलासा संबंधीत अधिकारी देतील.

मुख्य अग्निशमन अधिकारी : महाराष्ट्रात औरंगाबाद महानगरपालिका वगळता सर्व महानगरपालिकामध्ये रेस्क्यु व्हॅन आहेत. आता आपल्या महानगरपालिकामध्ये मागणी करत आहोत या अगोदर १९९६ पासुन वैधानिक विकास महामंडळाकडे रेव्क्यु व्हॅन खरेदीसाठी रकमेची मागणी केलेली होती. अद्याप रक्कम मिळालेली नाही. रेस्क्यु व्हॅनमध्ये प्रत्येक साहीत्य असेल आर.सी.सी. कटर असती, लाईटसाठी जनरेटर असते, रस्ता बनवू शकू असे साहित्य यामध्ये असते. केमिकल किंवा धुरामध्ये काम करता येते. ड्रायविंग सुटस् असतात त्याची किंमत १२ ते १५ लाखापर्यंत आहे. अशा एकुण ६ सुटस् त्या गाडीवर असणे आवश्यक आहे. असे सर्व मिळून २०० ते २५० साहित्य या गाडीत असते महाराष्ट्र शासनाने आपतकालीन साठी विशिष्ट अशा योजना करण्यासाठी त्यामध्ये ७ क्वॉलिटीन दिलेल्या आहे त्यापैकी ६ क्वॉलिटीन पर्यंत अग्निशमन दलाने काम करावे असे दिलेले आहे. ज्यामध्ये भूकंप, रोड अपघात, महापूर, चक्रीवादळ, आग असे अशा ६ घटनावर अग्निशमन दलाने करावे असे दिले आहे. भविष्यात अशा घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन रेस्क्यु व्हॅन खरेदी करणे आवश्यक आहे.

श्री. दत्तात्रय थोरात : सर्वसाधारण सभेत गणेश कॉलनी भागात विश्रामगृहाचा प्रस्ताव पास केलेला असुन टोकन अमाउंट ५ लाख ठेऊन कामास सुरुवात करावी.

श्री. जयवंत ओक : महानगरपालिकाच्या वतीने एक ॲम्ब्युलन्स व्हॅन खरेदी करावी. गोरगरिबांचा प्रश्न आहे. ट्रस्टवाले सेवा पुरवतात तर महानगरपालिकाने का पुरवू नये चांगले काम आहे. शहराचा प्रश्न आहे. १० लाखाची तरतुद करावी. ३ ॲम्ब्युलन्स गाड्या येतील.

मा.महापौर : मागच्या वर्षीच ॲम्ब्युलन्स गाडी खरेदी करण्याचे ठरले होते. कार्यवाही झाली नाही म्हणुन एक ॲम्ब्युलन्स गाडी खरेदी करण्याची कार्यवाही व्हावी. ५ लाखाची तरतुद करण्यात येते.

श्री. तकीहसन खॉंन : वैशिष्ट्ये मध्ये क्र.५ मध्ये शहरामध्ये बोल्ट पध्दतीने विकास कामे करणे, मागील बजेटमध्ये बोल्ट (बी.ओ.एल.टी.) असे होते याच बोल्ट ऑपरेट लीज ट्रान्सफर असा होतो. या बजेटमध्ये बोट (बी.ओ.टी.) असे दिले. 'एल' काढून टाकले कारण काय?

मुख्यालेखाधिकारी : बोल्ट आणि बोट यामध्ये संभ्रम निर्माण झाला आपण बोल्ट लीज ट्रास्फरचाच आपण वापर केलेला आहे. काही ठिकाण बिल्ड ऑपरेटर ॲण्ड ट्रान्सफर या दोन्हीचा अर्थ एकच होतो.

श्री. तकीहसन खॉंन : लिज चा अर्थ काय भाडे पट्टीने द्या असा होतो.

मुख्यलेखाधिकारी : लिज म्हणून भाडे पट्टीने आपण दिलेले आहेतच बांधा, वापरा व हस्तांतरिक करा असा अर्थ यातून निघतो.

श्री. किशोर तुळशिबागवाले : ही पध्दत चुकीची आहे. महानगरपालिकाच्या १०० टक्के जागेवर बांधकाम करुन दिले जाते व २५ टक्के बांधकाम महानगरपालिकेला देतात. जेवढी महानगरपालिकाची जागा व्यापार संकुलनासाठी ठेवल्या आहे त्या महानगरपालिकेनेच स्वतःहून डेव्हलेटपमेंट कराव्यात.

श्री.स.अली मिरा सलामी : बोल्ट आणि बोट या दोन्ही पध्दती बरोबर नाही. माझा यास विरोध आहे.

मा.महापौर : बोल्ट पध्दतीने शहरामध्ये विकास कामे करण्याचा निर्णय मागच वर्षीच्या बजेटमध्येच घेतलेला होता. यासंदर्भात माहिती घेण्यासाठी आपल्या महानगरपालिकेतील अधिकारी मुंबईला पाहणी करुन आलेले आहेत. मागील बैठकीस आपण निर्णय सुध्दा घेतलेला आहे. समजा एका ठिकाण १०० कमानी बांधायच्या असेल ते करीत असतांना सुशोभिकरण करणे, शहर स्वच्छ दिसावे, मार्ग दर्शक फलक लावण्यात यावे. याला येणारा खर्च महानगरपालिका करु शकत नाही. यामध्ये महानगरपालिकेस ५/६ वर्षानंतर ठरल्याप्रमाणे परत घेता येईल व महानगरपालिकेच्या उपयोगासाठी वापर करता येईल.

श्री. अब्दुल रशिद अ.सत्तार : रेल्वे स्टेशन येथील शॉपिंग सेंटर करण्याबाबत रुलींग द्यावे शासकीय अनुदानातून करण्यात यावे.

मा.महापौर : शासकीय अनुदान मिळाले नाही तर बोल्ट पध्दतीने शॉपिंग सेंटर करण्याची कार्यवाही करावी लागणार आहे. वरीलप्रमाणे दुरुस्त्यासह जमा व खर्च बाजुमध्ये लेखा विभागाने आवश्यक ते फेरबदल करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :** स्थायी समितीने शिफारस करुन सर्वसाधारण सभेपुढे दाखल केलेल्या सन २०००-२००१ चे सुधारीत व सन २००१-२००२ चे मुळ अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकावर सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे दुरुस्त्या करुन सन २००१-२००२ च्या मुळ अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| अ. क्र. | विवरण | स्थायी समितीने सम्मत केलेली तरतुद | सर्वसाधारण सभेने मंजुर केलेली तरतुद | फरक | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **जमा बाजु** | | | | |
| १ | पाणी पट्टी | २१०००० | १५०००० | ६०००० | - |
| | | २१०००० | १५०००० | ६०००० | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **खर्च बाजु** | | | | |
| १. | सानुग्रह अनुदान | - | ५०० | - | ५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | स्वेच्छा निधी | २६४०० | ३०८०० | - | ४४०० |
| ३. | सिडकोमध्ये नाट्य गृह बांधणे | ५०० | १०,००० | - | ९५०० |
| ४. | सरकारी कर्ज परतफेड | ८२५०० | २२००० | ६०००० | - |
| ५. | विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी जमिन आणि इतर स्थावर मालमत्ता संपादन करणे | ६२५०० | ५०००० | १२५०० | - |
| ६. | इंधन व दुरुस्ती (वाहन) | १६००० | १४००० | २००० | - |
| ७. | पुतळे खरेदी व दुरुस्ती | ५५०० | ४५०० | १००० | - |
| ८. | ॲम्ब्युलन्स खरेदी | - | ५०० | - | ५०० |
| | | १९२९०० | १३२३०० | ७५५०० | १४९०० |

**इतर दुरुस्ती :**

१. पाणी पट्टी दर वाढीत स्थायी समितीने घरगुती वापरासाठीच्या दरात सुचविलेली वाढ रद्द करुन पुर्वीच्या दराची मान्यता देण्यात आली मात्र व्यावसायिक व बांधकामासाठीच्या पाणीपट्टी दरात फक्त रु.५००/- प्रमाणे वाढीस मान्यता देण्यात आली.

२. शहरात नविन जलवाहिन्या टाकणे तसेच काही भागातील जुन्या लहान आकाराच्या जलवाहिन्या काढून त्या ठिकाणी नविन जलवाहिन्या टाकण्याकरिता येणारा खर्च तरतुद रु.५ कोटी पैकी फारोळा जल शुध्दीकरणसाठीच्या कामाकरिता रु.१.५ कोटी वर्ग करण्यात यावे.

३. शहरातील डांबरी पुर्नडांबरीकरणासाठी ठेवण्यात आलेली तरतुद रु.२.५ कोटी पैकी रु.५० लाख शहरातील फुटपाथ तयार करणेसाठी वापरण्यात यावी.

४. शहरातील जनतेच्या आरोग्याची व रुग्णांची सोयासाठी या आर्थिक वर्षात रुग्णवाहिनी खरेदी करणेसाठी रु.५ लाखाची विशेष तरतुद ठेवण्यात यावी.

५. सेटलाईट कन्ट्रोल ऑफ लाईट सिस्टीम प्रकल्प राबविण्यात यावे.

६. ‘महापौर चषक’ स्पर्धेत हॉकी, जलतरण स्पर्धा ह्या खेळांचा पण समावेश करण्यात यावा.

७. यानंतर स्वेच्छा निधीतील सर्व कामे शासनाकडे निर्गमीत केलेल्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावे.

उपरोक्त दुरुस्ती व फेरफारासह सन २००१-२००२ चे मुळ अंदाजपत्रक रु.१३५ कोटी ६६ लाख ५५ हजार जमा व रु. १३५ कोटी ३९ लाख २० हजार खर्चाच्या व रु.२७-३५ लाखाच्या शिल्लकी अर्थसंकल्पास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०.३.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**मंगळवार दिनांक २०.३.२००१ रोजी मा.महापौर श्री.डॉ.भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात सकाळी ११.३० वाजता वंदे मातरम् गीताने सुरुवात झाली.**
**या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

१. स.स. श्री. अशरफ मोतीवाला
२. स.स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३. स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
४. स.स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५. स.स. श्री. तांबे गणेश रामचंद्र
६. स.स.श्री. शे.इलियास किरमानी शे.ऊमर
७. स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८. स.स.श्रीमती शकुंतला सांडुजी इंगळे
९. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
१०. स.स.श्री. शिंदे राजु रामराव
११. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
१२. स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३. स.स.श्री. मंदाबाई प्रभाकर पवार
१४. स.स.श्री.घायातिलक लिलावती बाळासाहेब
१५. स.स.श्री.जगताप मोतिलाल रघुनाथ
१६. स.स.सौ.शिंदे रुख्मिणी राधाकिसन
१७. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१८. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोखंडे
१९. स.स.श्री.शे.शकील पटेल शे.बुढन पटेल
२०. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे
२१. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२२. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
२३. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२५. स.स.सौ.ॲड.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२६. स.स.श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२७. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२८. स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
२९. स.स.श्री.घोडके नंदकुमार राधाकिसन
३०. स.स.श्री.अय्युब खान सरदार खान
३१. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
३२. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडुरंग
३३. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर

३४. स.स.सौ.रशिदा बेगम गफ्फार यारखान
३५. स.स.श्री.वडागळे सुनिल बुथवेल
३६. स.स.श्री.शिंदे किशोर रावसाहेब
३७. स.स.श्री.नासेर खान सरदार खान
३८. स.स.श्री.थोरात दत्तात्रय रामराव
३९. स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४०. स.स.सौ.खरात कुसुमबाई दौलत
४१. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४२. स.स.सौ.नुसरत बानो फिरोज खान
४३. स.स.सौ.जयश्री कुमारराव मोरे
४४. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४५. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४६. स.स.सौ.राजपुत विमलाबाई भिकनसिंग
४७. स.स.श्री.अ.कदीर मौलाना सय्यद
४८. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजुरकर
४९. स.स.श्री.गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५०. स.स.श्री.नसीर खान अ.रहेमान खान कुरैशी
५१. स.स.सौ.शाहीन जफर महमुद जफर
५२. स.स.दाणे चंद्रभागाबाई भागिरथ
५३. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५४. स.स.श्री.स.सलिम स.युसुफ
५५. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५६. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहेमद
५७. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
५८. स.स.श्री.शेख ईसाक शेख जैनोद्दीन
५९. स.स.श्री.अफसर खान यासीन खान
६०. स.स.सौ.सुलताना बेगम चाँदखाँ
६१. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६२. स.स.श्री.शे.मुनाफ शे.यासीन
६३. स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
६४. स.स.श्री.तुळशिबागवाले किशोर बाबुलाल
६५. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६६. स.स.सौ.बबीता सुभाष कागडा
६७. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
६८. स.स.श्री.तनवानी किशनचंद लेखराज
६९. स.स.सौ.निखत परवीन ईजाज अली

## ***<u>स्विकृत सदस्य</u>***

१. स.स.श्री.भगवान देविदास घडामोडे
२. स.स.श्री.कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३. स.स.श्री.खुगर सुरजितसिंग तिलकराज

४.	स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५.	स.स.सौ.सलमा बानो मीर मो.अली

**संवाद :**

श्री.स.अली मिरा सलामी : आपल्या देशावर वेगवेगळ्या प्रकारातून कालांतराने एक-एक संकट कोसळत आहे जसे या अगोदर कारगील युध्द त्यानंतर गुजरात मधील भुकंप व आता केंद्रातील एका बड्या नेत्याचा तहलका डॉट कॉम मधील मोठ्या प्रमाणात झालेला घोटाळा अशा नेत्याचा निषेध करण्याचा ठराव पास करावा.

मा.महापौर : आपण उपस्थित केलेला प्रश्न हा सभागृहाचा विषय होत नाही आपण खाली बसावे किंवा दुसऱ्या विषयावर बोलावे.

(याचेवेळी निषेधाचा ठराव पास करावा म्हणुन आघाडीच्या स.सदस्य मा.महापौराच्या डायस जवळ जाऊ बोलतात मोठमोठ्याने बोलणे चालू असते काहीही ऐकु येत नाही)

श्री. अंबादास दानवे : हा विषय सभागृहाचा होत नाही चर्चा करणे चुकीचे आहे.

मा.महापौर : केंद्र सरकारच्या अखत्यारातील तो प्रश्न आहे. आपण त्या विषयावर बोलू शकत नाही सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. विषय क्र.१ वर चर्चा करावी.

श्री.स.अली मिरा सलामी : भ्रष्टाचार कोठे झाला तरी आपल्या देशातच झालेला आहे. देशातील जनतेचा प्रश्न आहे. जनतेचा पैसा आहे. म्हणुन भ्रष्टाचार करणाऱ्या विरुध्द निषेध झालाच पाहिजे.

(पुन्हा काही स.सदस्य मा.महापौर यांच्या डायस जवळ जवळ जाऊन निषेध करण्या बाबतची मागणी करतात मोठमोठ्याने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.)

मा.महापौर : सदर प्रकरण केंद्राचे अंतर्गत झालेले आहे. आपल्या त्यासी काहीही संबंध येत नाही सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. हा विषय आपल्या सभागृहाचा होत नाही. आता विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

(सभागृहात स.सदस्य घोषणा प्रति घोषणा करतात काही ऐकू येत नाही.)

श्री. राधाकृष्ण गायकवाड, श्री. दानवे अंबादास : 'तालिबान' मध्ये १०० गायीची कत्तल केलेली असुन हिंदू धर्माच्या भावना दुखावल्या असुन तेथील गौतमबुध्दाच्या मोठमोठ्या मुर्त्या पाडून टाकलेल्या आहे. त्याबद्दल निषेध करण्यात यावा.

(याच वेळी तालिबान संघटनेचा निषेध असा अशा घोषणा सभागृहात चालू असतात मोठमोठ्याने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.)

मा.महापौर : तालीबानमध्ये गौतमबुध्दाच्या अमानवी कृत्य करुन मोठमोठ्या मुर्ती पाडलेल्या त्याबद्दल हे सभागृह निषेध करत आहेत. आता विषय क्र.१ वर चर्चा करावी सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

(सर्व स.सभासद आपआपल्या जागेवर बसतात)

श्री. अफसरखाँन : मागील बैठकीत चर्चा चालू असताना मोठमोठ्याने स.सदस्य बोलत होते. आपण सर्वांना माहित आहे एखाद्या विषयावर चर्चा चालू असतांना शांतता पाळणे जरुरी असते. त्यावेळी विषय पत्रिकेवर जे विषय आलेले होते ते सर्व विषय मंजुर केलेले आहे. म्हणून विषय क्र.१ इतिवृत्त कायम करण्यासाठी ठेवण्यात आलेले आहे. आपणांस काय ज्या सूचना या विषयावर करायच्या असतील त्या आपण कराव्या. चर्चेसाठी नंतर वेळ दिला जाईल.

श्री.स.अली मिरा सलामी : यापूर्वी अर्थसंकल्पात जकातचा प्रश्न राहिलेला आहे. महानगरपालिका व नगरसेवकांच्या नावाचा उल्लेख करुन बातम्या छापून येत आहे त्यावर चर्चा करावी नंतरच विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

मा.महापौर : आपण विषय पत्रिकेवर विषय क्र.१ वर चर्चा करावी. इतर चर्चा करण्यास वेळ दिला जाईल. विषय पत्रिका संपल्यानंतर चर्चेला आपण सांगतात तेवढा वेळ दिला जाईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : अगोदर चर्चा करावी नंतर विषय पत्रिका मंजूर करावी.

(विषय पत्रिकेवर चर्चा न करता अगोदर सर्वसाधारण चर्चा करावी. म्हणुन बरेच स.सदस्य मागणी करतात)

श्री. सुदाम सोनवणे, श्री. दानवे अंबादास : मागील बैठकीत विषय मंजूर झालेले नसताना इतिवृत्त विषय क्र.१ मंजुरीसाठी आले असा काही स.सदस्यांनी आरोप केला परंतु मागील बैठकीत जे विषय पत्रिकेवर विषय होते तेच मंजुर केलेले आहे. विषय पत्रिका मंजुर झाल्यानंतर चर्चा होत नाही अशी सर्वांची भावना आहे. म्हणुन अगोदर चर्चा व्हावी व नंतर विषय पत्रिका मंजुर करावी.

मा.महापौर : सर्वाच्या भावना लक्षात घेऊन अगोदर चर्चा करावी नंतर विषय पत्रिका घेण्यात येईल. नियमाने विषय पत्रिका अगोदर मंजुर करणे आवश्यक आहे तरी सुध्दा सर्वांच्या भावना लक्षात घेऊन आता चर्चेला सुरुवात करावी

श्री. प्रकाश निकाळजे : मागील बैठकीत चर्चा होऊन शहरातील अनाधिकृत (ए टी एन टी) टावर्स पाडण्या बाबत आदेश देण्यात आलेले होते त्या संबंधी प्रशासनाने काय कार्यवाही केली त्याचा खुलासा द्यावा.

मा.महापौर : नगररचना अधिकारी श्री. खन्ना यांनी खुलासा करावा.

श्री. नंदकुमार घोडेले : उपसंचालक नगररचना हे नेहमीच सभागृहात हजर नसतात त्याचे खालचे अधिकारीच नेहमी खुलासा देतात. काही प्रकार घडल्यास कुणास जबाबदार धरणार :

मा.महापौर : संबंधीत अधिकारी व मालमत्ता अधिकारी यांचा मला फोन होता परवानगी घेऊन गेलेले आहेत. यापुढे उपसंचालक नगर रचना यांनी सभेस उपस्थित राहावे. व त्यांनीच खुलासा करणे गरजेचे आहे. उपअभियंता श्री. खन्ना यांनी खुलासा करावा.

उप अभियंता (नगररचना) : शहरातील टॉवर्स संदर्भात संबंधीत कंपनीला नोटीस दिल्यानंतर ते न्यायालयात गेलेले आहे व न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेला आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : नोटीस देण्याची गरज नव्हती. सदर टॉवर्स अनाधिकृत असल्याची चर्चा आहे व परवानगी घेतलेली नाही म्हणुन मा.महापौरांनी मागील बैठकीत

तात्काळ तोडण्याचे आदेश दिले असतांना संबंधीत कंपनी मालकास नोटीस देऊन त्याला वेळ देण्यात आलेला आहे. म्हणुन ते न्यायालयात गेलेले आहे व कोर्टाचा स्टे मिळालेला आहे. स.सदस्यांनी अतिक्रमण असलयाचे ते तात्काळ पाडण्याची सूचना केल्या व मा.महापौरांनी आदेश दिल्यानंतर सुध्दा कार्यवाही न होणे म्हणजे महापौर व या सभागृहाचा अवमान आहे.

श्री. तकीहसन खॉंन : एनटीएनटीच्या टॉवर्स मालकास नोटीस दिलेली नसून अधिकारी चुकीचा खुलासा करत आहे. संबंधीत मालकास अधिकाऱ्यांनी न्यायालयात जाण्यास वेळ दिला म्हणून न्यायप्रविष्ट प्रकरण झाले. जर सभागृहात निर्णय झाल्यानुसार कार्यवाही होत नसेल तर ते सभागृह नुसती चर्चा करण्यासाठी आहे काय? त्याचा अंमलबजावणी करण्यासाठी नाही काय? निर्णय घेतल्यानंतर ताबडतोब होणे आवश्यक आहे.

श्री. सुदाम सोनवणे : शहरात परवानगी दिलेले व विना परवानगीचे किती टॉवर्स आहेत. याची माहिती आम्ही ३ महिन्यापुर्वी विचारलेली होती. संबंधीत अधिकारी यांनी मागील बैठकीत गोलमोल उत्तर दिले व आज सुध्दा खुलासा व्यवस्थित होत नाही.

(याचवेळी सभागृहात स.सदस्य श्री.सुनिल वडागळे रिकामा पाण्याचा माठ घेऊन येतात पाणी द्या. पाणी द्या. म्हणतात यावेळी सभागृहात सदस्यांचे बोलणे चालू असते काही ऐकू येत नाही. वेळ दुपारी १२.०५ वा.)

मा.महापौर : स.स.श्री.वडागळे यांचे वार्डात पाणी नसेल हे सभागृहाला मान्य आहे परंतु आपण सभागृहात माठ आणणे हे कृती बरोबर नाही. आपल्या वार्डात पाणी येत नाही म्हणुन तक्रारी द्यावयास पाहिजे होती आपण आपल्या जागेवर बसावे. आपण तक्रार कार्य.अभियंता यांचेकडे द्यावयास पाहिजे होती.

श्री. सुनिल वडागळे : आजपर्यंत मी ८ वेळेस लेखी तक्रारी दिलेल्या आहे. झोन अधिकारी यांना सुध्दा सांगितलेले आहे. वार्डात पाणीच बंद आहे. नागरिक त्रास देत आहे.

मा.महापौर : स.सदस्य यांनी तक्रारी दिलेल्या आहे यासंबंधी कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

श्री. तकीहसन खॉंन, श्री.स.अली मिरा सलामी : सभागृहात टावर्स संदर्भात चर्चा चालू होती. मध्येच स.सदस्यांनी माठ आणला व चालू असलेल्या चर्चेत खंड पडला असे कृत्य करणे बरोबर नही. यात सभागृहाचा अपमान होतो.पत्रकार बसलेले आहे. स.सदस्यांवर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री. सोनवणे सुदाम, श्री. दानवे अंबादास : स.सदस्य श्री. वडागळे यांच्या वार्डात पाणी नाही तेथील नागरिक पाणी म्हणून स.सदस्याकडेच तक्रारी करणार म्हणून त्यांनी सभागृहात माठ आणून त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहे. त्यांच्या वार्डातील पाण्याच्या संदर्भात अगोदर खुलासा द्यावा.

मा.महापौर : आता टॉवर्स संदर्भात बोलावे पाणी प्रशनावर चर्चा करण्यास नंतर वेळ देण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : इतर स.सदस्या सभागृहात सूचना करुन भावना व्यक्त करतात त्याप्रमाणे त्यांनी वार्डात पाणी अले नाही म्हणून सभागृहात माठ आणून भाना व्यक्त केली. त्यात गैर काय? स.सदस्य वडागळे यांना सभागृहात माठ आणण्याची वेळ का येऊ दिली याचा विचार सभागृहाने करावयास पाहिजे. इतराच्या वार्डात पाणी आले नाही तर असाच प्रकार इतर स.सदस्य

करतील त्यात वाईट काय? म्हणून वार्डात लाईट, ड्रेनेज, पाणी, रस्ते इ. सुविधा देणे महानगरपालिकाचे कर्तव्य आहे. कोणतीही वार्डातील समस्या असेल ती तक्रार दिल्यानंतर सोडवली गेली पाहिजे. पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यावर अगोदर खुलासा व्हावा.

मा.महापौर : स.सदस्यांच्या भावना लक्षात घेतल्या अगोदर टावर्स संदर्भात चर्चा चालू होती त्या विषयावर बोलावे. पाण्याच्या संदर्भात नंतर खुलासा घेतला जाईल.

श्री. तकीहसन खाँन : संबंधीत टॉवर्स मालकास नोटीस दिली नाही अधिकारी चुकीचा खुलासा आहे. संबंधीत मालकास कोर्टात जाण्यास वेळ दिला गेला.

उपअभियंता (नगररचना) : दोन्ही कंपन्या मालकास नोटीस दिलेल्या आहेत बीपीएल कंपनी मालकाने कोर्टाचा स्टे आणलेला आहे व एटीएनटीच्या संदर्भात कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. मा.आयुक्तांच्या मान्यतेनुसार नियमाने कार्यवाही करण्याम येईल. सविस्तर माहिती संचिका बघूनच देता येईल.

श्री. तकीहसन खाँन : महानगरपालिकाची नियमावली आहे व अनाधिकृतपणे कुणी कामे करत असेल तर कार्यवाही होणे आवश्यक आहे. सर्वसाधारण सभेत टावर्स पाडण्याबाबत निर्णय झालेला असतांना अधिकारी कार्यवाही करत नाही. पर्यायी नोटीसच्या माध्यमातून सवलत देण्याचा प्रयत्न केला आहे. एखाद्या गरिबाने पाणीपट्टी दिली नाही तर कनेक्शन तोडले जाते परंतु जे लाखो रुपये कमवितात त्यांचे तर प्रशासन काहीच कार्यवाही करत नाही.

श्री.स.अली मिरा सलामी : सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला असतांना कार्यवाही तात्काळ केली नाही. ज्या सभेत निर्णय झाला त्यानंतर संबंधित टॉवर्स मालकास नोटीस केणत्या तारखेस दिली. स्थगिती आदेश कधी प्राप्त झाले व सभागृहात कधी निर्णय झाला ही माहिती द्यावी.

श्री. प्रकाश निकाळजे : वृत्तपत्रात बातम्या येतात अशा विषयावर सभागृहात चर्चा होणार हा दृष्टीकोन समोर ठेवून अधिकाऱ्यांनी सर्व माहिती बरोबर आणणे आवश्यक आहे.

श्री. सुदाम सोनवणे : नियमाने प्रश्न विचारुन उत्तर मागवले होते. शहरात किती टॉवर्स आहेत. किती टॉवर्सला परवानगी दिलेली आहे. तसेच ज्या टॉवर्सला परवानगी दिली अशा टॉवर्सला व्यावसायिक दराने मालमत्ता कर लावला जातो काय? ज्या ज्या ठिकाणी टॉवर्स आहेत तेथील परिसरातील नागरिकांचे मत काय? असे विविधी प्रश्न करुन माहिती मागविली होती. उत्तर मिळते परंतु व्यवस्थित नाही. मागील बैठकीत या संदर्भात प्रश्न उपस्थित केला गेला होता. अधिकारी यांनी व्यवस्थित उत्तर दिलेले नाही. पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला तो विषय ही महत्त्वाचा आहे. परंतु टॉवर्सचा प्रश्नही उत्पन्नाच्या विचार केल्यास महत्त्वाचा आहे. जनतेचे प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी स.सदस्य पोटतिडकीने आपआपले प्रश्न मांडतात उत्तर बरोबर मिळत नाही. जे उत्तर मला प्राप्त झाले त्यामध्ये असे दिले की, एकुण शहरात ९ टॉवर्स असुन ७ टॉवर्सला महानगरपालिकाने परवानगी दिलेली असुन मोबाईलची सुविधा ४ वर्षापासून सुरु असून २ टॉवर्सला परवानगी दिली नाही. विना परवानगीने लाखो रुपये संबंधीत टॉवर्स मालक कमवीत आहे. याची दखल तात्काळ घेतली गेली पाहिजे. ज्या टावर्सला परवानगी दिली तेथील घरांना आपण रहिवासी दराप्रमाणे कर वसुल करत

आहोत असे आताच संबंधीत अधिकारी यांनी सांगितले. शहरात एटीएनटी व बीपीएलचे माध्यमातून संबंधीत मालकीस महिन्याला जवळपास ४.५० ते ५ लाख रुपये उत्पन्न असुन वर्षाला ५ कोटी रु. उत्पन्न असुन महानगरपालिकेला कराच्या पोटी वर्षाला फक्त १ लाख ४६ हजार १ लाख ४७ हजार रुपये प्रत्येकी येतात. मला दिलेल्या प्रश्नाचे उत्तर व मी सांगितलेली माहिती यांस फारसा फरक दिसून येते असुन अधिकाऱ्याच्या संगनमतानी कार्यवाही झालेली दिसून येते. तेथे ५ कोटीचे उत्पन्नावर फक्त महानगरपालिकेस ३० लाख रुपये वर्षाला कर येतो शरमेची बाब आहे. आताच संबंधीत अधिकारी आयुक्तांनी सांगितले संबंधीत मालकास टावर्स पाडण्यासाठी नोटीस दिलेली होती. परंतु त्यांनी न्यायालयात प्रकरण गेल्यानंतर न्यायालयाची स्थगिती आदेश दिले. स्थगिती आदेश देऊन १२ दिवस झाले. टावर्स पाडण्याचे आपण ३ महिन्यापुर्वीच आदेश दिले तेव्हा ताबडतोब कार्यवाही का झाली नाही. महापौरांनी आदेश दिल्यानंतर कार्यवाही झालीच पाहिजे. जर आदेशाचे पालन होत नसेल तर चर्चा करुन उपयोग नाही. योग्य नाही. वृत्तपत्रात अधिकाऱ्याची जुगलबाजी येत आहे. टावर्स आज पाडणार उद्या पाडणार नोटीस दिल्या परंतु सभागृहाच्या निर्णयाला अधिकारी मानत नाही. दिशाभूल होते आहे. म्हणून काही तरी कार्यवाही करण्याचा निर्णय आज झाला पाहिजे व ज्या टावर्सला परवानगी दिली अशा टावर्सला व्यावसायिक मालमत्ता कर लावावा. संबंधीत मालकाकडून महानगरपालिकेस महिन्याला कमीत कमी प्रत्येक मालकाकडून २ लाख रुपये उत्पन्न होईल.

श्री. तकीहसन खाँन : दोन्ही कंपनी मालकास नोटीस दिलेली होती का? अपेक्षा आहे मा.आयुक्त, उपआयुक्त किंवा विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

श्री. नंदकुमार फुलारी : खुलासा करण्याबाबत आपण अधिकाऱ्यांना सूचना दिल्यानंतर अधिकारी आपल्याकडे येतात काहीतरी बोलतात नंतर खुलासा करतात हे योग्य नाही.

मा.महापौर : करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी खुलासा द्यावा कि सदर टावर्स किती कर आकारला जातो.

करमुल्य निर्धारण अधिकारी-१ : शहरामध्ये एटीएनटीचे जे टावर्स धारक आहेत, ज्या इमारतीवर टावर्स उभे आहे, या इमारतीला पुर्वी कर लागलेला होता तोच आहे. परंतु टावर्स धारक इमारत मालकास घर भाडे देतात. त्या घर भाड्यावर आपण निवासेत्तर दराने आकारणी केलेली आहे.

श्री. तकीहसन खाँन : व्यावसायिक दर का निवासी दराप्रमाणे कर आकारणी करण्यात येते. तसेच अ,ब,क,ड या वर्गापैकी कोणता प्रकारचा कर आकारला जातो. संपुर्ण इमारतीत व्यावसायिक दराप्रमाणे कर आकारावा निवासी दराने कर आकारु नये.

मा.महापौर : इमारत मालकास व्यावसायिक दराने कर आकारलेला आहे. असे अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. व्यावसायिक दराने कर लावला तर त्याची माहिती देण्यात यावी.

श्री. तकीहसन खाँन : इमारत मालक वर्षाला ९० हजार रुपये टावर्स मालकाकडून किराया देत असून महानगरपालिकेकडे काय रेकार्ड आहे दाखवावा.

करमुल्य निर्धारण अधिकारी-१ : घराची माहिती सांगता येणार नाही. टावर्सचे जे रेट आहे त्या संबंधी माहिती अशी की, जालना रोड सेंट्रल पॉईट येथील टावर्सला ८६ हजार ४०० रु. रिटेबल व्हॅल्युएशन आहे व ४७ हजार ५२० रुपये प्रत्येक वर्षाचा टॅक्स आहे. फक्त टावर्स टॅक्स आहे. घराचा टॅक्स वेगळा आहे. रविराज हॉटेल येथील टावर्सला ४४ हजार ५७० रुपये प्रत्येक वर्षाला टॅक्स लावण्यात येतो. सादर कर हा टावर्स धारक व घर मालक यांचेच ज्या रेटचे ॲग्रीमेंट झालेले आहे. त्यानुसार कर आकारणी होतो.

श्री. तकीहसन खॉंन : ॲग्रीमेंट चुकीचे व दिशाभूल करणारे असू शकते. कमी भाडे दाखवून ॲग्रीमेंट केलेले असू शकते त्यास अधिकाऱ्यांनी बळी पडू नये आपल्या नियमाने व्यावसायीक दराने किती टॅक्स लावू शकतो ते पाहावे. अधिकाऱ्याने मनमानी करुन त्याप्रमाणे टॅक्स आकारु नये महानगरपालिकाचा फायदा काय आहे ते पाहावे.

मा.महापौर : स.सदस्यांनी वेगवेगळ्या प्रकारे सूचना केल्या एका टावर्स ५० हजार दुसऱ्यास ३० हजार काहीना २० हजार यापेक्षा टावर्सची कंपनी एक व एरिया सुध्दा एकच आहे म्हणुन समसमान टॅक्स असावा म्हणून हायस्ट जो टॅक्स आहे तो लावण्यात यावा असे सूचित करण्यात येते.

श्री. जयवंत ओक : टावर्स मालक व जमिन मालकाचा काय करार झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाली का? जर निवासी दराने मालमत्ता कर आकारणी झाली असेल तर तो व्यावसायिक दराने लावण्याबाबत निर्णय घ्यावा. संबंधीत संचिका मागवून घ्यावी करार काय झाला सभागृहाला वाचून दाखवावा. कराराप्रमाणे अधिकाऱ्यांनी कार्यवाही केलेली नसेल तर कार्यवाही व्हावी. तसेच जो कर लावण्यात आला तो केव्हापासुन लावण्यात आला त्याची सुध्दा माहिती देण्यात यावी. तसेच संबंधीत टावर्स मालक यांनी परवानगी घेतली का? केलेली असल्यास महानगरपालिकाने किती वेळा उत्तरे दिली. घेतलेल्या परवानगीला नुतनीकरण का करण्यात आले नाही. या सर्व प्रश्नांचा खुलासा व्हावा.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : विना परवानगीने उभे असलेले एटीएनटी व बीपील टावर्स पाडण्यात यावे असे सर्वांचे एकमत होऊन मागील बैठकीत आपण आदेश केले. तसे आज पाडणार, उद्या पाडणार अशा बातम्य सुध्दा वृत्तपत्रात झळकल्या या संबंधी काही तरी लपंडाव चालू आहे. म्हणुन वृत्तपत्रात वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या छापून येतात. मा.महापौरांचे आदेशाचे अधिकारी पालन करत नाही, तर सर्वसामान्य व स.सदस्यांना त्यांचे कामासाठी किती यातना सहन कराव्या लागत असतील यांचा अंदाज येतो. सर्वसाधारण सभा महिन्यापासुन एकदा होते. या बैठकीत काही निर्णय होतात. त्याची अंमलबजावणी होईल काय? असे शहरातील जनतेचे लक्ष असते जर निर्णय झालेला असताना कार्यवाही होत नसेल तर भविष्यात या सर्वसाधारण सभेत महत्त्व राहणार नाही. आणि उत्पन्नाचा विचार केल्यास ज्या इमारतीवर जेव्हापासुन टावर्स आहेत त्या इमारतीला व्यावसायिक दराने कर आकारणी करावी तसेच एकुण ११ टावर्स पैकी ९ टावर्सची परवानगी महानगरपालिकाने दिली. पुढील नुतनीकरण का करण्यात आले नाही यास कोण दोषी याची चौकशी व्हावी. नुतनीकरण केलेले नाही विना परवानगीने टावर्स चालू आहे म्हणुन सभागृहात मागील बैठकीत चर्चा झाली व असे

टावर्स पाडण्यात यावे असे ठरले असतांना अधिकाऱ्यांनी वेळ काढूपणा केला व समोरच्या पार्टीला न्यायालयात जाण्यात वेळ दिला त्यानुसार न्यायालयाचे स्थगीत आदेश झाले. तरी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने ताबडतोब या प्रकरणाविषयी कॅव्हेट दाखल करुन अनाधिकृत टावर्स पाडयाची कार्यवाही आजच्या आज करावी.

श्री.स.अली मिरा सलामी : सर्वसाधारण सभेचा या संबंधी निर्णय केव्हा झाला तसेच निर्णय घेतल्यानंतर संबंधीत टावर्स मालकास नोटीस कोणत्या तारखेत दिली व याबाबतीत न्यायालयाचा स्थगीत आदेश केव्हाचा आहे खुलासा द्यावा. त्याची प्रत सुध्दा सभागृहाला दाखववावी. कोणत्या न्यायालयातून स्थगिती आदेश मिळाले त्य संबंधीही माहिती द्यावी.

उपअभियंता (नगररचना) : टावर्स पाडण्या संबंधी दिनांक १६.२.२००१ च्या बैठकीत निर्णय झालेला होता त्यांनतर संबंधीत दोन्ही कंपनीना २३.२.२००१ रोजी नोटीस देऊन सदर टावर्स स्वतःहून काढावे म्हणून कळविले आहे. त्यानंतर बीपीएल कंानी मालक या संबंधी उच्च न्यायालयात जाऊन त्यांनी १५ मार्चला स्थगिती आणलेला आहे. एटीएनटी कंपनी संबंधीची कार्यवाही चालू आहे.

श्री.स.अली मिरा सलामी : १६.२.२००१ च्या बैठकीत टावर्स पाडण्याबाबत निर्णय झाला दिनांक १७.२.२००१ रोजीच नोटीस देण्याऐवजी २३.२.२००१ ला नोटीस दिली गेली यात ५-६ दिवसाची संधी संबंधीत टावर्स मालकास देण्यात आली. १५ मार्चला न्यायालयाचा स्थगीती आदेश प्राप्त झाला तोपर्यंत आपले अधिकारी काय करत होते. या दिवसामध्ये टावर्स पाडण्याची कार्यवाही केली नाही याचा अर्थ संबंधीत टावर्स मालकास सवलत देण्यात आली व मा.महापौर याची सभागृहाची व जनतेची दिशाभूल करण्याचे काम अधिकारी करतात. न्यायालयाचे स्थगीती आदेश प्रत दाखववावी.

मा.महापौर : स.सदस्यांना स्थगिती आदेशाची प्रत दिली जाईल.

श्री.स.अली मिरा सलामी : सभागृहाची दिशाभूल होत आहे. एटीएनटी कंपनी मालकास स्थगिती आदेश दिलेला नाही. एटीएनटीचे विना परवानगीने टावर्स का पाडण्यात आले नाही.

श्री. सोनवणे सुदाम : एटीएनटी व बीपीएलचे शहरात किती टावर्स परवानगीने आहे. अनाधिकृत किती याचा खुलासा द्यावा. तसेच ज्यांनी अगोदर परवानगी घेतली होती त्यांनी गेल्या वर्षी व चालू वर्षाची नुतनीकरण केले का? किती वसुली झाली याची माहिती द्यावी.

श्री.स.अली मिरा सलामी : ५ टावर्सला परवानगी दिलेली नाही अशी माहिती मिळते. केवळ कर लावण्यात आला म्हणुन अधिकृत झाली याची माहिती द्यावी.

उपआयुक्त (प्र.) (प्र.आयुक्त) : शहरामध्ये एटीएनटीचे एकुण ४ टावर्स तर बीपीएलचे ३ टावर्स आहेत सद टावर्स मालकास सन ९९ मध्ये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. १६.२.२००१ च्या सर्वसाधारण सभेत अनाधिकृत व जे कर भरत नाही असे टावर्स पाडण्या बाबत निर्णय झाला त्यानुसार दिनांक २३.२.२००१ रोजी प्रशासनामार्फत तशी नोटीस संबंधीत टावर्स मालकास देण्यात आली. सर्व कागदपत्राची पाहणी केल्यानंतर कोकण विभागाचे कार्यकारी अभियंता यांची टावर्ससाठी एन.ओ.सी. असणे आवश्यक आहे असे आढळले त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र दाखल नाही म्हणुन नोटीस दिली.

ना हरकत प्रमाणपत्र आणावे नसता टावर्स स्वतःहून १ मार्च पर्यंत काढावे अशी नोटीस देण्यात आली होती. नसता महानगरपालिका या संबंधीची पुढील कार्यवाही करेल असेही कळविले आहे. नोटीसच्या अनुषंगाने संबंधीत टावर्स मालक यांनी माहिती दिली की, एनओसी मागणीसाठी आम्हाला तीन महिन्याचा अवधी देण्यात यावा. त्यानुसार नगररचना विभागाकडून संचिका सादर झालेली आहे व त्यावर एनओसी विना टावर्स चालवल्याबद्दल प्रत्येक टावर्स मालकाकडून २५ हजार रुपये दंडात्मक कार्यवाही म्हणून टिप्पणी मा.आयुक्तांकडे सादर झालेली आहे. बीपीएल कंपनीचे म्हणजे एकुण उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. महानगरपालिकेस बाजू मांडण्यासाठी वेळ दिला तोपर्यंत कार्यवाही थांबवावी असा आदेश आहे. तसेच महानगरपालिकाने त्या कन्टोशन दिल्या त्यानुसार कंपनी मालकाने पुर्तता करावी असे न्यायालयाने म्हटले आहे.

श्री. सोनवणे सुदाम : कोकण बोर्ड स्ट्रक्चरल इंजिनिअरची एन.ओ.सी. नसतांना महानगरपालिकाने ९८-९९ मध्ये परवागी कशी दिली?

मा.महापौर : महानगरपालिकाने सुरुवातीची नाहरकत दिल्यानंतर कोकण भवनचे स्ट्रक्चरल इंजिनिअरचे पत्र आलेले आहे त्या पत्रानुसार महानगरपालिकाने कंपनी मालकास तसे कळविले गेले नाही. असे टावर्स मालकाचे म्हणणे आहे व त्यांनी महानगरपालिकाकडे परवानगीसाठी आवक विभागामध्ये अर्ज दिलेला आहे. त्यानुसार नगररचना विभागामार्फत कोण कोणत्या कागदपत्राची पुर्तता करावी असे पत्र दिलेले नाही म्हणुन टावर्स मालक तसेच प्रशासनाची अशी दोन्ही बाजूकडून चुक झालेली आहे. सुरुवातस सुध्दा एटीएनटी व बीपीएल कडून प्रत्येकी २५ हजार रुपये दंडापोटी वसुल केलेले होते व आता सुध्दा दोन्ही कंपनीमालकाकडुन १ लाख रुपये दंड वसुल करण्याचे पत्र दिले आहे.

श्री. सुदाम सोनवणे : टावर्स मालकाने २००० पासुन नुतनीकरण केलेले नाही. आपल्या अधिकाऱ्यांनी त्यांचेवर कार्य कार्यवाही केली.

मा.महापौर : सविस्तर माहिती उपअभियंता श्री. खन्ना यांनी द्यावी.

श्री.स.अली मिरा सलामी : प्रश्न महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा येतो. विना परवानगीने टावर्स झाले त्याची गॅरंटी काय? नियमाने परवानगी दिली गेली असती तर कर वसुल झाला असता व वेळोवेळी हा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला नसता नियमाने कार्यवाही होत नाही. अनाधिकृत झाल्याबद्दल सभागृहाने पाडण्याबाबत निर्णय घेतला असता त्याची कार्यवाही होत नाही याचा अर्थ अधिकारी व संबंधीत टावर्स मालक यांचेत काहीतरी संगनमत झालेली दिसते. दुसरी बाब अशी की मा.प्र.आयुक्त यांनी सांगितले ४ टावर्स आहे. माझ्या माहितीप्रमाणे ५ टावर्स आहे. १) स्टेट ऑफ इंडिया क्रांतीचौक, २) बग्गा टावर्स जालना रोड, ३) पुष्पनगरी, ४) राना इमारत जिल्हाधिकारी कार्यालय समोर, ५) शाहू इंडस्ट्रीज बिल्डींग, एम.आय.डी.सी. चिकलठाणा असे ५ टावर्स आहेत. अधिकारी ४ टावर्स सांगतात १ मार्च पर्यंत टावर्स काढले नाही तर महानगरपालिका ते पाडणार अशा प्रकारची नोटीस दिल्यानंतर २ तारखेपासुन १५ मार्चपर्यंत प्रशासनाने का कार्यवाही केली नाही हा महत्त्वाचा सभागृहाने प्रश्न केला आहे. त्याबद्दल खुलासा द्यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : विनापरवानगीने टावर्स उभे आहे. ते पाडण्यात यावे असे सभागृहात चर्चा चालू आहे. अधिकारी यांनी प्रशासनाच्या वतीने खुलासा केला. चर्चा करुन किती वेळ गेला तरी निर्णय काय घ्यावयाचा याचा अधिकार सभागृहाला आहे. म्हणुन जास्त वेळ घालता मा.महापौर या नात्याने एकदा आदेश दिल्यानंतर कार्यवाही होणे गरजेचे आहे जर अधिकारी दोषी असेल तर त्यांचेवरही काय कार्यवाही करावयाची याचा सुध्दा अधिकार या सभागृहाला आहे. वृत्तपत्रात सुध्दा वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या टावर्स पाडण्या संदर्भात आल्या. स.सदस्य काही पदाधिकाऱ्याचा त्यात हात आहे अशा सुध्दा उलटसुलट बातम्या आलेल्या आहेत. ९८ मध्ये या शहरात हि सुविधा उपलब्ध झाली ज्यावेळेस ज्या दोन टावर्सला दर लावला गेला होता तोच दर इतर ५ टावर्सला लावणे आवश्यक होते. म्हणजेच एका टावर्सला ७० हजार रुपये कर लावणे आवश्यक होते. जे अनाधिकृत आहेत त्यांचेकडून पॅनल्टी सहित कर वसुल केला पाहिजे. कोकण भवन येथील स्ट्रक्चरल इंजीनिअरचे पत्र महानगरपालिकाकडे प्राप्त झाल्यानंतर टावर्स योग्य इमारतीवर आहे किंवा काय? याची पाहणी झालेली आहे का? आताच अधिकाऱ्यांनी सांगितले वरच्या मोकळ्या जागेवर टावर्स असतात म्हणुन ओपन जागेलाच व्यावसायिक दर लावण्यात आलेला आहे. एखाद्या इमारतीला कम्पेशन प्रमाणपत्र दिले जाते त्यावेळी एफ.एस.आय. पुर्ण वापरल किंवा काय हे पाहिले पाहिजे. जर वरच्या मोकळ्या जागेत जर एखादा घरमालक ९० हजार रुपये कमवत असेल तर वरच्यामजल्यावरील जागा अधिकृत करुन घेतली गेली पाहिजे. हे सर्व करतांना या संबंधी एक नियमावली तयार करावी. त्याप्रमाणे अधिकारी कार्यवाही करतील नसता शहरामध्ये या सभागृहाविषयी उलटसुलट बातम्या छापून येत आहेत. दिनांक १३.३.२००१ च्या सभेत ३ दिवसाच्या आत टावर्स काढण्यात आले असा निर्णय झालेला असतांना कार्यवाही केलेली नाही. आताच प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले दंडात्मक कार्यवाही करुन २५ हजार रुपये कार्यवाही प्रस्तावित केली. नियमानुसार सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्यानुसारच दंडात्मक कार्यवाही प्रशासन करु शकते. २३.२.२००१ ला नोटीस दिली कोकण भवन स्ट्रक्चरल इंजिनिअरचे पत्र आले. ही सर्व सभागृहाची दिशाभूल होत आहे. त्यासाठी सभागृहाने एक टिप्पणी तयार करावी व त्यानुसार काय निर्णय घ्यावयाचा ते ठरवावे. अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नाही तर त्यांना जबाबदार धरावे.

मा.महापौर : टावर्स संबंधीत संचिका पाहिल्यानंतर यात दोन तीन बाबी आढळून आल्यात त्यात प्रामुख्याने १) कोकण भवन स्ट्रक्चरल इंजिनिअरचे पत्र महानगरपालिकाकडे आल्यानुसा संबंधीत टावर्स मालकास एनओसी बाबत कळविलेले नाही. २) कंपनीतर्फे आपल्याकडे अर्ज आलेले आहे. इनवर्ड सुध्दा आपल्याकडे आलेले आहे. पाहणी करुन काय कमतरता आहे. त्यांनी पत्र दिले आपण पत्रव्यवहार केलेला आहे ती कार्यवाही प्रलंबीत आहे. ३) मागे अशाच प्रकारच्या काही चुका टावर्स धारकाकडून झालेल्य होत्या त्यावेळी सभागृहात काही स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केल्यानुसार प्रशासनाने त्या टावर्सला २५०००/- रु. प्रस्तावित करण्यात आलेला होता. आता जो काही हायेस्ट टॅक्स असेल तो महानगरपालिकेतर्फे लावण्यात

यावा. टावर्स किती या संदर्भात चर्चा झाली परंतु प्रशासनाचे म्हणणे असे की ४ टावर्स महानगरपालिका हद्दीत आहे. त्याप्रमाण हायेस्ट टॅक्स लावण्यात यावा चीफ इंजीनिअर कोकण भवन यांचेकडून ताबडतोब एनओसी आणखी म्हणून टावर्स धारकांना कळविले आहे. त्यांना पुन्हा कळवून कार्यवाही करावी. इएसआय संपलेला आहे किंवा काय हे सुध्दा बघून महानगरपालिकाला उत्पन्न मिळेल या दृष्टीने कार्यवाही करावी.

श्री. तकीहसन खाँन : एकुण टावर्स ५ आहेत प्रशासन ४ सांगतात. सिडको एमआयडीसी चिकलठाणा भागात एक टावर्स आहेत. परवानगी घेतलली आहे काय?

मा.महापौर : सिडको एमआयडीसी भागात असेलेल्या टावर्स सुध्दा इतर टावर्सप्रमाणे टॅक्स आकारावा. तेथील टावर्सला एम.आय.डी.सी. परवानगी पाहिजे टॅक्स लावता येतो. इतर टावर्स प्रमाणे याही टावर्सला नियम लागू राहतील.

श्री. जयवंत ओक : शहरातील जनतेला व्यवस्थितस सुखसुविधा मिळाव्या म्हणुन स.स.सभागृहात चर्चा करतात मग ती पाणी प्रश्न, लाईट प्रश्न, ड्रेनेज प्रश्न, रस्ते कोणती समस्या असू शकते. आजच्या सभेत पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला त्या अनुषंगाने मी पाणी प्रश्नावर बोलत आहे. एखाद्या वार्डात पाणी आले नसेल कमी दाबाने पाणी असेल खड्ड्यातुन कोण पाणी भरत असेल. काही पाणीच मिळाल नसेल तर तेथील जनता सरळ नगरसेवकांच्या घरी घागर मोर्चा काढतात. झोन मध्ये जात नाही. महानगरपालिकेत येत नाही कारण झोन क्र १ ते ८ यासर्व झोनमध्ये नागरीकांनी वेगवेगळ्या प्रकारच्या तक्रारी देऊन सुध्दा कार्यवाही झालेली नाही. असे माझे मत आहे. कारण या सभागृहामध्ये स.सदस्यांनी माठ घेऊन येण्याची वेळ का आली हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो कारण संबंधीत वार्डात १५ दिवसापासून पाणी येत नाही. या सभागृहाने असा निर्णय घ्यावा की, झोन क्र.१ ते ८ मध्ये जे जे नागरिक ज्या ज्या कामासाठी तक्रारी करतील त्यात प्रामुख्याने लाईट ड्रेनेज, पाणी साफसफाईच्या बाबतीत कुणाची तक्रार असेल त्यावर ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे. अधिकारी तक्रारीचे निवारण करत नाही म्हणुन स.सदस्य यांच्या वार्डातील समस्या बाबत सभागृहात सूचना मांडतात यात गैर काय? नगरसेवकास जनतेच्या प्रश्न सोडविण्यासाठी निवडून दिलेले असते. स.सदस्यांनी किंवा नागरिकांनी तक्रार केल्यानंतर अधिकाऱ्यांना ताबडतोब १-२ दिवसात कार्यवाही केली पाहिजे अशी सभागृहातील सर्वांच्याच भावना आहे. झोनमध्ये कुणी नागरिक तक्रार घेऊन गेल्यानंतर कर्मचारी चांगली वागणूक देत नाही हा माझा अनुभव आहे. नगरसेवक गेल्यानंतर लगेच कार्यवाही होते. पाण्याचा प्रश्न विचारात अधिकाऱ्याच्या चुका नसतात परंतु त्यांचे खालचे जे.ई. दुय्यम अवेक्षक पाणी सोडणारे लाईनमन हे खोडसळपणा करतात. लाईनमन नगरसेवक अधिकाऱ्यामध्ये भांडण लावण्याचा प्रयत्न करतात. ड्रेनेज, लाईट व पाण्याच्या संदर्भात संबंधीत अधिकारी यांना जास्त रक्कमेपर्यंत कमी करण्याचे अधिकार द्यावे. फक्त २५ हजार रुपयेपर्यंत आपण अधिकार दिलेल कोणती कामे होत नाही. नुसत्या सूचना करुन अधिकाऱ्यांना सांगितल्या नुसार अधिकारी कामे करु शकत नाही. म्हणून जे पाणी ड्रेनेज व लाईट च्या अधिकाऱ्यांना एक ठराविक रक्कमेपर्यंत विकासाची कामे करण्याकरीता अधिकार द्यावे जेणेकरुन १-२ दिवसात तातडीचे कोणतेही कामे झाली पाहिजे.

मा.महापौर : कार्यकारी अभियंता यांना तातडीची कामे करण्यासाठी याच सभागृहाने जास्तीच्या रकमेचे अधिकार दिलेले आहेत. तातउीचे कामासाठी अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही केली पहिजे.

सौ. रुख्मीणी शिंदे : माझ्या वार्डात विकास कामासाठी लोकांना १ लाख ८३ हजार रुपये भरलेले असुन ३ वर्ष झाले कधी काम करणार १ शिवजयंतीच्या दिवशी महिलांनी मला घेराव घातला होता. १ वर्षापासुन नुसते आश्वासन देत आहे.

मा.महापौर : आता सर्व्हेक्षण झाले आहे. घोषित झाल्यानंतर वार्डातील ड्रेनेज व इतर कामे करण्यात येईल.

श्री. अंबादास दानवे : रक्कम कशा बद्दल जमा केलेली आहे खुलासा द्यावा.

मा.महापौर : मागे सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला होता की, अनाधिकृत वस्त्यामध्ये नागरिकांकडून २५ टक्के व ७५ टक्के महानगरपालिकेतर्फे रक्कम खर्च करुन कोणतीही विकास कामे करता येतील. परंतु शासनाकडुन ऑक्टोबर महिन्याच्या दरम्यान जी.आर. आला की अशा वस्त्यामध्ये कामे करता येणार नाही म्हणुन मागील बैठकीत मा.आयुक्तांनी सुध्दा यावर खुलासा केलेला होता पैसे जरी जमा केले असेल तर त्याच वार्डात सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर खर्च करण्यात येईल.

सौ. जयश्री मोरे : माझ्या वार्डातील १५ दिवसापासून कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे. सर्व वार्डातील जनता पाणीपट्टी भरतात पाणी वेळेवर देणे गरजेचे आहे. पाणी भरपूर दिले नाही तर तेथील नागरिकासह आम्ही मोर्चा काढणार आहोत. आंदोलन करणार आहे.

सौ. खरात कुसूम : माझ्या वार्डात १ महिला साफसफाईसाठी आहे व १ पुरुष कामगार गटार साफ करण्यासाठी आहे. १ महिला संपुर्ण वार्ड साफसफाई करु शकत नाही. या संदर्भात मी ६ महिन्यापुर्वी प्रश्न उपस्थित करुन सुध्दा कार्यवाही केली नाही. रोजाबाग मध्ये उर्दूची शाळा असुन ७ वर्ग व ३ शिक्षक तसेच शाळेत विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही. शाळेचा हॉल लहान आहे. मुलांना संडासची सोय नाही. या संदर्भात लेखी सूचना केलेली आहे. तसेच शाळेमध्ये लाईटची सुध्दा सोय नाही आता सध्या परिस्थितीत एक सुध्दा लाईट शाळेत नाही. संबंधीत अधिकऱ्यांना सांगितल्यास लाईटचे मटेरीयल नाही तर अशा प्रकारची कामे करणार की नाही. त्याचा खुलासा आजच करावा.

श्री. भगवान रगडे : स.सदस्या सौ. खरात यांनी या सभागृहात २-३ वेळेस प्रश्न उपस्थित केला कार्यवाही झाली नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : माझ्या वार्डातील शाळेत सुदा शिक्षक कमी आहेत.

मा.महापौर : स.सदस्या सौ. खरात यांनी केलेली सूचना मी लक्षात घेतलेली आहे. अधिकाऱ्यांना तशा सूचना करण्यात येईल. शाळेमध्ये शिक्षक का कमी आहेत या संदर्भात उपआयुक्त (प्र.) हे खुलासा करतील.

श्रीमती घायातिलक लिलावती : वार्ड क्र.१२ मधील महानगरपालिके च्या शाळेत पाण्याची सोय नाही. त्या शाळेत शिपाई नाही. शाळेच्या बाजूला घाण पडलेली असुन मुलांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. दुर्गंधी सुटली आहे. मा.आयुक्तांनी प्रत्यक्ष येऊन पाहणी सुध्दा केलेली आहे. या शाळेत गरीब विद्यार्थी शिक्षण घेतात. स्लम भागातील गरीब विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा महानगरपालिका सुधारणार की नाही? या संदर्भात लेखी पत्र दिले होते. वॉचमनची जागा

भरली तर शिपाई काढून घेतले, हे योग्य नाही. या शाळेत पाण्याची व एक शिपाई देण्याबाबत कार्यवाही व्हावी. शाळेतील लहान मुलांना बाहेरुन पिण्याचे पाणी आणावे लागते. हा वार्ड वाळीत टाकल्या सारखा झाला आहे.

मा.महापौर : प्रशासनाने या संदर्भात खुलासा करावा.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : माझ्या वार्डातील शाळेमध्ये सुध्दा शिक्षक कमी आहे. इतर शाळेप्रमाणेच वार्डातील व परिसरातील साफसफाई व्यवस्थित होत नाही. आपले शहर एक ऐतिहासिक शहर आहे. वार्ड स्वच्छ असणे गरजेचे आहे. तेथील मंजुर कामगार यांना विचारणा केली असता मी या वार्डाचा साफाईदार नाही असे सांगून साफसफाई टाळटाळ करतात व ९ वाजले की सफाई कामगार निघुन जातात जी घाण आहे ती तशीच पडून राहते.

श्री. प्रकाश निकाळजे : शहरामध्ये बरेच स्लम भाग असून तेथे महानगरपालिकाच्या शाळा आहेत. गरीब विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या वाढलेली आहे. एकाच हॉल मध्ये ५० ते ८० विद्यार्थी बसतात. परंतु त्यांना शिकवण्यासाठी शिक्षक कमी आहेत. सन २००० मध्ये बरेच शिक्षक सेवा निवृत्त झालेले आहेत. त्यानंतर शिक्षकाची नेमणुक केलेली नाही. म्हणुन प्रशासनाने शिक्षक भरती लवकरात लवकर करावी तसेच जेथे आवश्यकता नसतांना जास्तीचे शिक्षक दिलेले असतील ते काढून इतर शाळेत द्यावे. तसेच शाळेत शिपाई कर्मचारी वर्ग सुध्दा भरावा. सफाई कामगार संख्या आपल्याकडे भरपूर आहे कारणे भोगे साहेब आयुक्त असतांना त्यांनी काही कामगार कमी केल्यानंतर सुध्दा साफसफाईचे कामे व्यवस्थित होत होती. त्याप्रमाणे प्रशासनाने कडक पध्दतीने साफसफाईचे योजना राबवावी. महानगरपालिकाकडे जवळपास २७००/- सफाई व इतर वर्ग-४ चे कर्मचारी आहेत. तरी सुध्दा साफ सफाईचा प्रश्न उपस्थित होतो हे योग्य नाही. तरी मा.महापौरांनी ज्या ज्या सुचना आजच्या सभेत स.सदस्यांनी केल्या त्या संबंधी तात्काळ कार्यवाहीचे आदेश द्यावेत.

उप आयुक्त (प्र) : शिक्षण विभागामध्ये जवळपास ५० पदे सेवा निवृत्तीने रिकामी झालेली आहे. ही पदे भरण्यासाठी शासनास मंजुरी घेण्यासाठी विनंती केलेली असुन मंजुरी मिळाल्यानंतर सर्व शाळेतील सर्व शाळेतील समतोल लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार नविन वर्षामध्ये शिक्षकाची पदे भरण्यात येतील. साफसफाईसाठी १९८२ पासुन कायम स्वरुपी मंजुर नाहीत. जे आहे ते दैनिक वेतनावर कार्यरत आहे. एप्रिल नंतर सर्व विभाग आयुक्तांकडून अहवाल घेऊन कोणत्या झोनमध्ये किती कर्मचारी पाहिजे किती कमी पडतात. माहिती घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.

मा.महापौर : ज्या ज्या वार्डात महानगरपालिकेच्या शाळा आहे व त्या शाळेत विद्यार्थ्यांना पाण्याची सोय नसेल तर ती शहर अभियंता यांनी तात्काळ यासंबंधी कार्यवाही करावी व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा. ज्या शाळेत व लाईट, स्वच्छता गृह, नसेल त्या संबंधी सुध्दा कार्यवाही करावी. तसेच ज्या शाळेमध्ये कमी शिक्षक आहे तथे रिक्त झालेल्या पदावर ताबडतोब शासन मंजुरी येऊन नविन शैक्षणिक वर्षात शाळेवर शिक्षक नेमावेत साफसफाई बाबत बऱ्याच स.सदस्यांच्या तक्रारी आलेल्या त्यासाठी कोणत्या झोनमध्ये कर्मचाऱ्यासाठी आवश्यकता आहे. किती कर्मचारी कमी पडतात याची प्रशासनाने माहिती घेऊन सफाई कामगार देण्याबाबत कार्यवाही करावी.

स.सदस्या छायातिलक यांच्या वार्डातील शाळेत एक शिपायाची तात्काळ भरती करावी. आता पाण्याच्या विषयावर चर्चा करावी.

श्री. सुनिल वडागळे : शहरातील पाणी टंचाईत जबाबदार कोण तसेच हर्सुल तलावात व जायकवाडी जलाशयास किती पाणी आहेत शहरात पिण्याचे पाणी किती एम.एल.डी. येते व शहरात विशिष्ट भागातच पाणी टंचाई का? लेखी सूचना करुन सुध्दा कार्यवाही नाही. सभागृहात माठ घेऊ आलो त्या मागचा उद्देश आपण समजावून घ्या व पाणी का आले नाही याचा खुलासा द्यावा.

मा.महापौर : स.स.वडागळे यांच्या वार्डात १५ दिवसापासून टंचाई असून तेथील वार्डातील जनतेनी त्यांना त्रास दिला म्हणून ते सभागृहात माठच घेऊन आले. त्यांनी कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांना पाणी टंचाई संदर्भात ८-१० वेळेस तक्रारी करुन सुध्दा कार्यवाही का केली नाही खुलासा द्यावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : स.स. यांनी पाण्यासंदर्भात ज्या सूचना केल्या त्यानुसार दि.५.३.२००१ रोजी भावसिंगपुरा या भागात पाणी पुरवठा होत नाही म्हणून एक तक्रार अर्ज प्राप्त झालेला होता. स.सदस्य वडागळे याचा वार्ड लगतच असून तक्रारी नुसार भावसिंगपुरा भागात पाहणी केली असता तेथील नागरिकांनी कमी दाबाने पाणी येते असे त्यांचेच अर्जावर लिहून दिले. मागे सुध्दा सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन शांतीपुरा नंदनवन कॉलनी येथील भागात पाणी येत नाही. तक्रारी होत्या त्यानुसार पाहणी केली असता असे दिसून आले ती पाणी भरुन खाली पाहताना दिसून आले. आता स.सदस्य सांगतात पाणी नाही तक्रार दिली त्यानुसार पाहणी करुन तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

श्री. सुनिल वडागळे : वार्डात पाणी कमी येत असुन ५ ते ६ वाजता पाण्याची वेळ असतांना पाणी केव्हाही येते त्यामुळे पाणी खाली जात असेल आजची परिस्थिती पाहता पाणी येत नाही. आपण प्रत्यक्ष पाहणी करावी.

मा.महापौर : स.सदस्य वडागळे यांचे वार्डात वारंवार पाणी टंचाई भासत असून त्यांनी वेळोवेळी तक्रारी दिलेल्या आहे सर्व सभागृहास सदस्याच्या पाठीशी आहे. कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी उद्या सकाळी स.सदस्य यांच्या वार्डामध्ये त्यांचे सोबत पाण्या संदर्भात पाहणी करावी व दुसरा प्रश्न हर्सुल व जायकवाडी जलाशयात पाणी किती आहे व उन्हाळ्यामध्ये शहराला पाणी पुरवठा व्यवस्थित होईल काय? त्याचा खुलासा द्यावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : हर्सुल तलावात ८ फुट पाणी साठा आहे. मे-२००१ पर्यंत पाणी राहु शकेल जून मध्ये पाऊस पडला नाही तर पाणी पुर्णतः कमी होईल तलावामध्ये २ (दोन) मीटर पर्यंत जिवत पाणी पुरवठा आजपर्यंत आहे. पावसाळा सुरु होई पर्यंत पाणी पुरवठा होऊ शकेल परंतु शेतीसाठी पाणी घ्ेतात ते जर घेतले नाही तर शहरास पाणी पुरवठा होईल.

श्री. वडागळे सुनिल : माझ्या वार्डात पाणी येत नाही. वार्डातील वसाहत ५०-६० वर्षापासुनची असून पूर्वी काही ठिकाणी लहान लहान पाईपलाईन टाकलेल्या आहेत त्यातुन सध्या पाणी पुरवठा होत नाही विचारणा केली असतना वार्डात अनाधिकृत भाग येत असल्याचे सांगण्यात येते.

मा.महापौर : ज्या ज्या वार्डात पाणी येत नाही. तेथे आपण मागणी करावी तपासणी करुन टँकरद्वारे पाणी पुरवठा करता येईल. स.सदस्य श्री. सुनिल वडागळे यांच्या

वार्डात पाणी नाही संबंधीत अधिकारी यांनी तात्काळ पाहणी करुन पुढील कार्यवाही करावी.

सौ. रुख्मिनी शिंदे : एन-२ जयभवानीनगर मध्ये सुध्दा पाण्याची टंचाई आहे. तेथील कुपनलिकेस सुध्दा पाणी राहिलेले नाही. तेथील नागरीकांना पाणी देण्यात यावे.

श्री. राजु शिंदे : एम.आय.डी.सी. एरियामध्ये अग्निशमन दलाचे केंद्र उभारण्यात आले असून अद्याप चालू करण्यात का आले नाही.

(याचवेळी स.सदस्य सुनिल वडागळे यांनी सभागृहात रिकामा असलेला माठ फोडला)

मा.महापौर : अग्निशमन अधिकारी यांनी खुलासा करावा. स.सदस्य श्री. वडागळे यांनी केलेल्या प्रश्नावर त्यांना खुलासा देण्यात आलेला होता माठ सभागृहात फोडण्याची गरज नव्हती. ते बेजबाबदारीने वागले त्यांची ही पध्दत बरोबर नाही म्हणून स.सदस्य श्री. वडागळे यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते व आजची सभा १५ मिनीटासाठी तहकुब करण्यात येत आहे.

(वेळ १.४० वाजता सभेला सुरुवात २.२५ वाजता)

मा.महापौर : स.सदस्य श्री. राजु शिंदे यांनी अग्निशमन केंद्र संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नावर अग्निशमन अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. जयवंत ओक : अग्निशमन विभाग महत्त्वाचा विभाग असून महत्त्वाच्या विषयावर चर्चा होत आहे. शहरामध्ये कुठेही आग लागल्यानंतर भूकंप सारख्यादुर्घटना झाल्यांनतर या विभागातील कर्मचाऱ्यांना अत्यंत चोख रितीने कामगीरी पार पाडावी लागते. एमआयडीसी भागामध्ये महानगरपालिकेच्या मालकीची इमारत झालेली आहे. ताबडतोब कर्मचारी वर्ग देऊन सुरु करण्यात यावे कारण मागे एकदा या भागामध्ये एक मुलगा विहिरीमध्ये पडला होता. बन्सीलाल नगर तसेच सिडको येथील अग्निशमन दलाची गाडी जाईपर्यंत सदर मुलाचे निधन झाले अशा घटना तात्काळ हाताळता येण्यासाठी केंद्र सुरु करावे.

अग्निशमन अधिकारी : एमआयडीसी चिकलठाणा येथे अग्निशमन केंद्र सुरु करण्याबाबत वेळोवेळी कार्यवाही झालेली आहे. गरवारे येथे अपघात होऊन १३ लोक ठार झाले त्यावेळी लवकरात लवकर हे केंद्र सुरु करण्यात यावे अशी मागणी जनतेची होती. सदरचे केंद्र सुरु करण्यासाठी जवळजवळ ५५ ते ५७ कर्मचारी आपणांस आवश्यक आहे. तात्काळ सुरु करण्याची कार्यवाही करावयाची असेल तर कमीत कमी २७ ते ३० कर्मचारी तरी भरणे आवश्यक आहे.

मा.महापौर : एमआयडीसी चिकलठाणा येथील अग्निशमन केंद्र चालू करण्यासाठी ५५ ते ६० कर्मचारी आवश्यक आहे. किमान २५ कर्मचारी तरी पाहिजे. परंतु शासनाच्या परिपत्रकानुसार कर्मचारी भरती करता येत नाही यावर सभागृहाने चर्चा करुन मार्ग काढावा.

श्री. जयवंत ओक : ४ वर्षापासून इमारत बांधून झाले या अगोदर पदे भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केलेला नाही का? शासनाचा जी.आर. ४ वर्षापासून नाही.

मा.उपआयुक्त (प्र) : १९९२ ला शासनाकडे नविन पदे भरण्याबाबत प्रस्ताव पाठविलेला असून अद्याप शासनाची मंजुरी नाही. मंजुरी आल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. अग्निशमन दलासाठी लागणारी पदे असे फायरमन व इतर पदास मंजुरी देण्यासाठी शासनाकडे पाठवलेले आहे.

मा.महापौर : १९९२ ला सर्वसाधारण सभेत काही पदे मंजुर करुन शासनाकडे पाठवीलेली आहे. शासन मंजुरी आलेली नाही म्हणून पदे भरता येत नाही असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आलेले आहे.

श्री. जयवंत ओक : १९९२ पासून वास्तू उभी आहे. शासनाचा भरत संदर्भातील जी.आर. काही महिन्यापुर्वी आला असेल त्या अगोदर का कार्यवाही झाली नाही. ८ वर्षापासून प्रकरण चालू का ठेवण्यात आले.

मा.महापौर : अग्निशमन विभागाचीच पदे नाही तर सफाई कामगार ते अधिकारी यांचे पदापर्यंत एकुण १४०० पदे शासन मंजुरीसाठी पडून आहे. यासंबंधी मी स्वतः मा.विरोधी पक्ष नेते, मा.सभापती, मा.सभागृह नेते वारंवार पदास मंजुरीसाठी प्रयत्न करत आहेत.

श्री. जयवंत ओक : सदर केंद्र त्वरीच चालू करण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी भरती करण्यासाठी तसे शासनास कळवावे. १४०० पदातून जी जी पदे भरणे आवश्यक आहे तसे शासनास कळवावे. १०-१२ वर्षापासून पदास शासन मंजुरी देत नाही. यासंबंधी आपले अधिकारी काय प्रयत्न करतात का नाही. पाठपुरावा होतो की नाही काही पदांना शासनाने मंजुरी दिल्यानंतर सुध्दा पदे भरण्यात येत नाही. उदाहरण द्यावयाचे झाल्यास रिक्षा चालकाची पदे शासनाने मंजुरी दिल्यानंतर सुध्दा त्या जागेवर रिक्षा चालकास कायमस्वरुपी करण्यात आले नाही. त्या संबंधीची प्रत माझ्याकडे आहे. प्रत्यक्ष तुम्हाला मी दाखवू शकतो. शासनाचे पत्र आल्यानंतर ६ महिन्यात प्रशासनाच्या वतीने रिक्षा चालक भरती संदर्भात कार्यवाही झालेली नाही. अग्निशमन केंद्रासाठी पदास शासनाकडून उशिर लागत असेल तर अस्थायी कर्मचारी भरण्यात यावे. तसे प्रशासनास आदेश द्यावे व अग्निशमन कैंद्र त्वरीत सुरु करण्यात यावे.

श्री. सुदाम सोनवणे : स.सदस्य श्री. सुनिल वडागळे यांचे सदस्यत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात आले होते तो निर्णय रद्द करुन त्यांना सभागृहात येण्याची परवानगी द्यावी.

मा.महापौर : स.सदस्य श्री. सुनिल वडागळे यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले होते तो निर्णय रद्द करण्यात येत असून त्यांनी सभागृहात येऊन बसावे. एमआयडीसी मध्ये अग्निशमन कंद्र सुरु करण्यासंदर्भात चर्चा चालू आहे. नविन पदे भरण्यास शासनाची मंजुरी आवश्यक आहे. तो पर्यंत पदे भरता येत नाही दोन गाड्या आलेल्या आहेत. इमारत तयार आहे फक्त स्टाफ नाही करीता जे कर्मचारी वर्ग आपल्याकडे आहे त्यातुनच काही कर्मचारी यांची या कैंद्रासाठी नियुक्ती करावी व केंद्र ताबडतोब सुरु करण्यात यावे आणि जी पदे या सभागृहाने मंजुर करुन शासनाकडे पाठविलेली आहे. त्याकरिता प्रशासनातर्फे योग्य ती कार्यवाही व्हावी. पदाधिकारी यांनी सुध्दा या बाबतीत प्रयत्न करावे विशेषतः सभापती तसेच विरोधी पक्ष नेते यांनी लोकशाही आघाडीचे सरकार आहे विशेषतः त्यांनी शासनाकडे प्रयत्नक करावे.

श्री. जयवंत ओक : १९८२ पासून महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. तेव्हापासून जी जी पदे महानगरपालिका अस्थापनेवर भरण्यात आली ती शासनाच्या मंजुरीनेच घेण्यात आलेली आहे काय त्याचा प्रशासनाने खुलासा करावा.

मा.महापौर : मी जेव्हा महापौर पदावर आले तेव्हापासुन एकही कामगाराची भरती करण्यात आलेली नाही. कारण शासनाचा जी.आर. आपल्याकडे तसा आलेला नाही. माझ्या अगोदर जर भरती केलेली असेल त्या संबंधी मा.आयुक्त हे खुलासा करतील.

श्री. जयंवत ओक : मा.आयुक्तांनी खुलासा करतांना जबाबदारीने करावा चुकीचा खुलासा केल्यास मा.आयुक्त जबाबदार रहतील व या संदर्भात मी न्यायालयात जाईल. त्यासाठी योग्य तो खुलासा झाला पाहिजे.

मा.उपआयुक्त (प्र) : नविन पदे भरण्यासाठी शासनाने सध्या स्थगीती दिलेली असल्यामुळे नविन कोणतेही पदे भरण्यास आलेली नाही. १९८२ पासून वेळोवेळी शासनाचे मंजुरीनुसार शासनाने पद निर्मिती केल्यानुसार पदे भरलेली आहे.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसारच ठराविक वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन देण्याबाबत मी चर्चा करत आहे.

१. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२०९/१० दि.१८.१.९९ नुसार वर्ग-४ च्या सर्वच कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन ६५ रुपये लागू करण्यात यावा असे ठरले. ठराव पास झाल्यानुसार वर्ग-४ च्या दैनिक/ठराविक वेतनावरील सर्वच कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेऊन दैनिक वेतन रुपये ६५/- करण्यात आलेला असून फरकासहीत रक्कम सुध्दा देण्यात आलेली आहे.

२. त्याचप्रमाणे वर्ग-३ च्या दैनिक/ठराविक वेतनावरील सर्वच कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ५२/- ऐवजी ९४ रुपये करण्यात यावा असा ठराव पास झालेला होता. त्या ठराव नुसार प्रशासनाने तडजोड करुन रुपये ७५/- देण्याचे मान्य केले. त्यानुसार दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यंना फेब्रुवारी-मा.महापौर पासुन दैनिक वेतन रुपये ७५/- लागू करण्यात आलेला आहे. यामधून वर्ग-३ चे ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन का लागू करण्यात आलेला नाही. त्यांना दैनिक वेतन लागू करुन दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना ज्या तारखेपासून दैनिक वेतन लागू करण्यात आला तेव्हापासून वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना सुध्दा दैनिक वेतन फरकासहीत लागू करण्यात यावा.

मा.महापौर : स.सदस्या सौ. दाणे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी उपआयुक्त (प्र) यांनी ताबडतोब कार्यवाही करावी. वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांचा काय जो प्रश्न असेल तो तात्काळ सोडवण्यात यावा. आता चर्चा संपलेली असुन विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

श्री.स.अली मिरा सलामी : जकातीच्या संदर्भात चर्चा होऊ द्यावी नंतर विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : मोंढा भागामध्ये एका ठाकुरदास गिरणीमध्ये एक शरदचंद्र शहा भाडेकरु असुन सन ८६ मध्ये टॅक्स भरला नाही म्हणुन महानगरपालिकाने ती जागा ताब्यात घेतलेली होती. परंतु आज संबंधीत

व्यक्ती त्या ठिकाणी राहतो व तेथील जागा विक्री करत आहे. दुसरा प्रश्न असा की सिल्लीखाना ते लक्ष्मण चावडी या रस्त्यामध्ये लक्ष्मी माता मंदिर येत होते. त्यासाठी पर्यायी जागा म्हणून मोंढा भागामध्ये मिलच्या बाजूला जागा दिलेली होती त्या जागेवर महानगरपालिकेचे तार फेसिंग सुध्दा होते. परंतु आता सध्या त्या जागेवर एका व्यक्तीने अतिक्रमण करुन २५ ते ३० हजार रुपये भाडे वसुल करत आहे. या संदर्भात महानगरपालिका प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

मा.महापौर : मालमत्ता अधिकारी सध्या रजेवर आहे. ते त्यांची आई आजारी असल्याने तशी त्यांनी माझी परवानगी घेतलेली आहे. त्या संदर्भात आपली काय तक्रार असेल ती उपआयुक्त (प्र) यांचेकडे करावी.

श्री.स.अली मिरा सलामी : मागील बैठकीत जकातवर चर्चा होऊन उद्दिष्टा प्रमाणे ५० कोटी रुपये ३१ मार्च २००१ पर्यंत वसुल न झाल्यास संबंधीत अधिकाऱ्यांवर मा.आयुक्तांनी कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले आहे. या निर्णयावर मा.आयुक्त कायम राहतील तो भाग वेगळा. कारण या सभागृहात चर्चा होते आदेश दिले जातात. परंतु प्रशासन काहीच कार्यवाही करत नाही. स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभेत बऱ्याच वेळा जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या इतरत्र ठिकाणी बदल्या कराण्यात याव्या अशी चर्चा झालेली असतांना त्यावर मा.महापौर सभापती यांनी आदेश केल्यानंतर सुध्दा कार्यवाही झालेली नाही. या विभागात १०-१० ते १५-१५ वर्षापासुन कर्मचारी त्याच विभागात कार्यरत आहे. बदल्या होणार वृत्तपत्रात बातम्या येतात. परंतु ते सर्व पोकळ असते. तेथील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणार नाही तोपर्यंत उत्पन्न वाढणार नाही हा त्यामागचा उद्देश आहे. काही ठराविक कर्मचारी ठराविक नाक्यावर काम करण्यात तयार आहे. लिडर, पायलट, हायजॅक इ.टोकन नावाने काही कर्मचारी ओळखले जातात. ठराविक नाक्यावर जसे मुंबई, नगर नाक्यावर ते काम करण्यात इच्छुक आहे. जकात खाजगी करण होणार म्हणुन जकातीत घट येत होती. आता खाजगीकरण होणार नाही हे कळल्यानंतर सुध्दा जकातीत मोठ्या प्रमाणात घट येत आहे. सध्या जी वसुली होत आहे ती कायम ठेवण्याचा प्रशासनाचा इरादा आहे असे वाटते अधिकारी व कर्मचाऱ्यांचे यात काही तरी मिलीभगत आहे. गेल्या १४ तारखेला महानगरपालिकेच्या अर्थ संकल्पीय बैठकीस जकात वसुली योग्य होत नाही म्हणुन चर्चा झाली. ५० कोटीचे टारगेट न झाल्यास कार्यवाही करण्यात येईल असे मा.आयुक्तांनी सांगितल्यानुसार दुसऱ्या दिवशीपासुन जकातीत वाढ झाली व तेव्हापासुन जकातीत वाढ झालेली आहे. असे चित्र आहे. सभेत चर्चा तसेच वृत्तपत्रात आजपर्यंत किती वसुली झाली याची दररोजची आकडेवारी सांगण्यात यावी. नक्कीच वसुली जास्त झाल्याचे दिसून येईल. कर्मचारी चांगल्याप्रकारे वसुल करत नाही व त्यामुळे पेपरमध्ये या विभागातील बातम्या नगरसेवकांच्या विषयी येतात व यात नगरसेवकांची बदनामी होत आहे. म्हणुन या विभागातील सर्वच कर्मचाऱ्यांच्या इतर विभगामध्ये बदल्या करणे गरजेचे आहे व या संबंधीची कार्यवाही आजच करण्याचा निर्णय घेण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री. सुदाम सोनवणे : वृत्तपत्रात जकातीच्या वसुली संदर्भात तसेच कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मोठी बातमी छापून आलेली आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, १०-१५

वर्षापासुन ठान मांडुन बसलेल्या त्या विभागातील कर्मचाऱ्यांमुळे जकातीत मोठी घट येत आहे. आताच स.सदस्य श्री. सलामी यांनी जकातीवर प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपले उद्दिष्ट ५३ कोटीचे होते आजपर्यंत किती वसुली झालेली आहे व कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत वेळोवेळी या सभागृहात चर्चा होऊन सुध्दा का कार्यवाही होत नाही. अधिकाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या म्हणजे काही शिक्षा नव्हे. बदल्या करव्या असे माझे म्हणणे नाही. बदल्या न करता ते करीत असलेल्या कामाची कसुन चौकशी व्हावी व दोषी आढळल्यास त्यांचे वेतनवाढ थांबवावी. पर्यायी आणखी काय शिक्षा करता येईल ती करावी आयुक्त म्हणून भोगे साहेब असतांना दररोज नाक्यावरील जकात १६ ते १७ लाख येत असे आता दररोज जकात ८-९ लाख येत आहे. शहरातील जनतेच्या प्रतिक्रिया बघितल्या तर नगरसेवक पदाधिकारी मा.महापौर मिळून नाका कमी करतात अशा अफवा होत आहेत. मी महापौर होतो मला माहिती आहे काय परिस्थिती आहे. यामुळे नगरसेवकांची महापौरांची जनतेसमोर बदनामी होत आहे. म्हणून प्रतिमा ढासळत चालली आहे. यासाठी संबंधीत कर्मचाऱ्यांवर योग्य ती चौकशी करण्यासाठी पावले उचलली पाहिजे. वृत्तपत्रात कर्मचाऱ्यांच्या संदर्भात नावाचा उल्लेख न करता असे दिले की, काही नगरसेवकांच्या आसऱ्याखाली जकात विभागातील कर्मचारी यांचे बदल्या होत नाही. कोण नगरसेवक आहे व एका नगरसेवकामुळे इतर सर्वाचीच बदनामी होत असेल तर आम्ही सहन करणार नाही. जकातीचे उद्दिष्ट या वर्षीचे ५३ कोटीचे ठेवलेले आहे असे दिसते. ज्यांनी सर्व्हे केलेले आहे की, त्यांनीही कबुल केले ३० ते ४० टक्के जकात चोरी होत आहे असे सांगितलेले आहे. ६१ कोटीचे उद्दिष्ट फार जास्त होत आहे म्हणून टेंडर कोणीही घेतलेले नाही म्हणुन जी वसुली होईल त्यावर २० टक्के प्रमाणे वाढ करुन नियमाने जी रक्कम येईल त्याप्रमाणे खाजगीकरण करण्याचे टेंडर काढावे असे माझे मत आहे.

श्री. शेख ईसाक शे.जैनोद्दीन : जकात खाजगीकरण होणार म्हणून जकातीचे दररोजचे उत्पन्न १६ लाखाऐवजी ८ लाख येत आहे. कट रचलेला दिसतो. जवळपास ८ लाखाची चोरी होत आहे असे दिसून येते. यात कोण दोषी आहे त्याची सखोल चौकशी करुन दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

श्री. जयवंत ओक : महानगरपालिकेचे जकातीचे उत्पन्न म्हणजे शहराच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. आताच स.सदस्यांनी जकात उत्पन्न ने पहिल्यापेक्षा कमी येत आहे त्या मागचे कारणे काय अशी विचारणा केलेली आहे. महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना या अगोदर टारगेट ठरवून दिले जात असे. जकात कमी येण्याची कारणे काय त्याची चौकशी झाली पाहिजे. ३१ मार्च २००१ पर्यंत आणखी उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी ५ कोटी मिळणार आहे का हा पहिला प्रश्न.

२. वृत्तपत्रात बातम्या झळकतात जकात विभागामध्ये १०-१२ वर्षापासुन जे कर्मचारी एकाच विभागात आहे. त्यांचे बदल्या होणार त्यांचेवर कारवाई होणार अशा बातम्या येतात त्यात नगरसेवकांना बदनाम करण्याच्या सुध्दा बातम्या येत आहे. अर्थसंकल्पीय बैठकीत या विषयावर चर्चा झाली त्या अगोदर ८-९ कोटीचे उत्पन्न येत असे चर्चा केल्यानंतर म्हणजेच बैठक झाल्यानंतर येत उत्पन्न १२-१३ कोटी रुपये पर्यंत गेले असे का होते याची

कसुन चौकशी होणे गरजेचे आहे. जकात खाजगीकरण होईल ना होईल जे खाजगीकरण होण्यासाठी उद्दिष्ट ठेचलेले होते. याची कसुन चौकशी होणे गरजेचे आहे. जकात खाजगीकरण होईल ना होईल जे खाजगीकरण होण्यासाठी उद्दिष्ट ठेवलेले होते. ६१ कोटीचे तेच टारगेट खाजगीकरण झाले नाही तरी ठेवण्यात यावे. जेवढी जास्त वसुली तेवढी विकास कामे होतील. जे कर्मचारी उत्पन्न वाढवण्यात दोषी ठरत असतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. जकातीचे उत्पन्न वाढविण्यासाठी ज्याप्रमाणे चर्चा होते त्याचप्रमाणे मालमत्ता कर, पाणीपट्टी कर याची सुध्दा उद्दिष्टाप्रमाणे वसुली झाली पाहिजे.

श्री. कोकाटे काशिनाथ : अर्थ संकल्पीय बैठकीत जकातीचे उत्पन्न वाढवण्याबाबत चर्चा झालेली होती, जकात उत्पन्न व खाजगीकरण जे ६१ कोटीचे टारगेट ठेवलेले होते ते ५३ कोटीचे या वर्षीउद्दिष्ट ठरवून केलेले होते. परंतु ५३ कोटी ऐवजी सभागृहात चर्चा होऊन सुधारणा करुन आपण ५० कोटीचे टारगेट ठेवलेले आहे व तोही पुर्ण होते किंवा नाही अशी शंका सर्व स.सभासदांच्या मनात आहे. म्हणुन मागच्या वेळी या विषयावरस चर्चा झालेली होती. मागील सभेत प्रशासनाच्या वतीने ५० कोटीचे उद्दिष्ट कोणत्याही परिस्थिती पुर्ण करणार आहोत असे सांगण्यात आले व न झाल्यास संबंधीत अधिकाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्याचे मा.आयुक्त महोदय यांनी सांगितलेले आहेच म्हणुन ३१ मार्च पर्यंत जकात विभागातील कर्मचाऱ्यांवर कसल्याही प्रकारची कार्यवाही करुन नये नसता काही कार्यवाही केल्यास त्यामुळे जकात वसुली कमी आलेली आहे असे कारण होईल व ३१ मार्च पर्यंत ५० कोटीचे उद्दिष्ट पुर्ण न झाल्यास त्याचे काय कार्यवाही करता येईल ती करावी. स.सदस्यांच्या बाबतीत वृत्तपत्रात उलटसुलट बातम्या येतात. परंतु जकात उत्पन्नाच्या बाबतीत अधिकारी / कर्मचाऱ्यांच्यामध्ये कुणीही नगरसेवक मध्ये पडत नाही. जर कुणी यात हस्तक्षेप करीत असेल तर त्याची चौकशी करुन नोंद व्हावी. व अशा सदस्यांना हे सभागृह माफ करणार नाही मग अधिकारी असो किंवा पदाधिकारी तसेच स.सदस्य असो. ३१ मार्च पर्यंत किती जकात पोटी रक्कम प्राप्त होते त्यानुसारच जकात खाजगीकरणाचा विचार करता येईल व उद्दिष्टापेक्षा कमी जकात आल्यास मा.आयुक्तांनी नियमाने काय कारवाई कर्मचाऱ्यांवर करावयाची ती करण्यात यावी. तोपर्यंत कार्यवाही थांबवावी.

श्री. तकीहसन खॉंन : ऑक्टोंबर मध्ये जकातीचे उत्पन्न कमी झाले. भरारी पथक ठेवले होते तोपर्यंत वाढले ते का काढण्यात आले उत्पन्न घटत चालले आहे. याची चौकशी व्हावी.

श्री. अंबादास दानवे : मागील बैठकीत जकात या विषयावर चर्चा होऊन उद्दिष्ट कसे साध्य करता येईल या संदर्भात मा.आयुक्तांनी योग्य तो खुलासा केलेला आहे. वृत्तपत्राच्या माध्यमातुन जकातीचा पंचनामा करण्यात आला आहे. जकातीचे उत्पन्न कमी होण्याचे कारण म्हणजे अधिकारी/कर्मचारी यांना स.सदस्यांच्या पाठींब्यामुळे कमी येत आहे असे दिले. कोणत्या नगरसेवकांचा जकात कमी येण्यासाठी पाठिंबा आहे. त्यांना खुलासा करण्यात आला पाहिजे. एक नगरसेवक पठिंबा देत असतील परंतु सर्वच महानगरपालिका सदस्यांची यात बदनामी होत आहे यासाठी प्रतिबंधनात्मक कार्यवाही प्रशासनाने

करावी. एका नामांकित वृत्तपत्रात अशी बातमी छापून येत आह यावर विश्वास ठेवण्यास हरकत नसावी. वारंवार या सभागृहात चर्चा होऊन वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्या अशा सूचना केलेल्या असतांना कार्यवाही झालेली नाही. एक आरोप मोठ्या जबाबदारीने मी करतो आहे. या संदर्भात जकात अधिक्षक, उपआयुक्त (प्र) यांना तीन वेळेस सूचना केलेली आहे की, उस्मानखाँन पठाण, निरीक्षक हे कालपर्यंत ५ ते ८ लोकांच्या घरी जाऊन असोसिएशनच्या माध्यमातून व्यापाऱ्यांकडून वेगवेगळ्या प्रकारची रकमेची मागणी करत होते. या संदर्भात माझ्याकडे लेखी ३ ते ४ तक्रारी आलेल्या आहे. त्याची माहिती उपआयुक्त (प्र) यांना लेखी स्वरुपात देणार आहोत. पैसे दिले नाही तर तपासणी करतो अशी धमकी संबंधीत कर्मचारी त्या व्यापाऱ्यांना करतात. नियमाने जे अधिकारी तपासणी आपल्याकडे आहे ते करावे परंतु पैशाची मागणी करुन धमकी देणे बरोबर नाही. याची सखोल चौकशी करुन संबंधीत कर्मचाऱ्यांवर कार्यवाही व्हावी.

श्री. अफसरखाँन : जकातीचे उत्पन्न वाढविण्यासंदर्भात मागील बैठकीत चर्चा झालेली होती. माझ्या माहितीप्रमाणे १२ ते १४ लाख रुपये दररोज जकात पोटी येत आहे. जकात अधिक्षक उपआयुक्त यांनी जातीने लक्ष दिलयास जकातीत निश्चितपणे वाढ होईल. जकात निरीक्षक व्यापाऱ्यांना धमक्या देऊन रक्कम काढत असतील तर योग्य नाही या अगोदर ही मी विरोधी पक्ष नेतेपदी असतांना एका नाक्यावर ३ गाड्या विना जकात वसुल करता सोडण्यात आलेल्या होत्या श्री. लोखंडे इन्स्पेक्टर यांना त्या संदर्भात कळविण्यात आलेले हाते व लेखी पत्र सुध्दा मी दिलेले होते. संबंधी कर्मचारी श्री. लोखंडे हे सध्या मोंढा भागात जाऊन पैसे वसुल करतात. त्याची बदली करण्या संदर्भात मी कळविले होते परंतु अद्याप कार्यवाही केलेली नाही. जे कर्मचारी दोषी आढळून आल्यास त्यांचेवर नियमाने कडक कार्यवाही केली गेली पाहिजे.

श्री. अब्दुल कदीर मौलाना : शहरातील इलेक्ट्रीकल्सचे किती दुकाने आहेत याची माहिती देण्यात यावी. दुसरे असे की, जकातीत चोरी लपविण्यासाठी वृत्तपत्राच्या माध्यमातून नगरसेवकांना बदनाम करण्याच्या बातम्या छापून येत आहे. खरोखरच यामध्ये सत्य असेल तर चौकशी करुन कडक कार्यवाही व्हावी परंतु चुकीच्या बातम्या एखाद्या दै.वृत्तपत्रात येत असेल तर या सभागृहातर्फे अशा दैनिकाचा निषेध करण्यात यावा. सभागृहात जकात वसुली संदर्भात चर्चा होते, निर्णय घेतले जातात परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही खेदाची बाब आहे. त्यासाठी ८ ादस्यींी एक कमिटी नेमावी सदर कामाची योग्य ती चौकशी करेल व होणारी जकात चोरी थांबविण्यात मदत होईल.

श्री. गणेश तांबे : कालच वृत्तपत्रात बातमी आली की स.सदस्य श्री. सलिम पटेल, तांबे इतर सदस्यांनी संगणमत करुन अहवाल सादर केलेला आहे. पत्रकारांना व्यवस्थित माहिती नसेल तर चुकीच्या बातम्या छपाई करु नये अशा वृत्तपत्रांचा आम्ही निषेध करतो.

श्री.स.अली मिरा सलामी : जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्या अशी वारंवार सभागृहात चर्चा झालेली आहे. बदल्या केल्यानंतर सुध्दा चौकशी करता येते. मजी महापौर श्री. बारवाल असतांना काही कर्मचाऱ्यांच्या

तात्काळ बदल्या करण्यात आलेल्या होत्या परंतु परिस्थिती आता अशी नाही. बदल्या होत नाही म्हणून वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यामागे नगरसेवकांच्या हात आहे अशी चर्चा होत आहे. या सभागृहात नियमाप्रमाणे शहरातील आम नागरिकांना सभा कामकाज ऐकण्यासाठी बसण्याचा अधिकार आहे. एखाद्या वृत्तपत्रामध्ये चुकीची बातमी येत असेल तर त्यांचे विरुध्द न्यायालयात जाण्यासाठी दरवाजे खुले आहे. या सभागृहात निषेध करण्याची आवश्यकता नाही.

श्री. तुळशिबागवाले किशोर : वर्तमान पत्रातून छापले तो खोटा अहवाल नसून यात सभागृहात १४ तारखेला श्री. जगदीश सिध्द यांनी हा अहवाल फाडला. आपसात भांडणे लावण्याचे काम होत आहेत.

मा.महापौर : जकातीवर खूप चर्चा झालेली असून बरेच प्रश्न उपस्थित केलेले आहे. सध्या जकत वसुली किती हा पहिला प्रन आहे. किती वसुली अंदाजे होईल या संदर्भात प्रशासन खुलासा करेल. दुसरा प्रश्न असा की, बदल्या का झालेल्या नाही व बदल्या करणार आहात की नाही? तिसरा प्रश्न असा की, जकात संदर्भात टेंडरचे काय झाले, चौथ प्रश्न उपस्थित केलेला आहे. असे एकुण ५ प्रश्नावर खुलासा घेण्यात येईल. पहिल प्रश्न जकातीलचा असून मागील अर्थ संकल्पाच्या बैठकीत प्रशासनातर्फे ५० कोटीचे टारगेट होईल असे सांगण्यात आलेले आहे. व ३१ मार्चला आणखी अवधी आहे म्हणून त्या विषयावर चर्चा करणे योग्य नाही. दुसरा प्रश्न बदल्या संदर्भात आहे. कर्मचाऱ्यांच्या बदल्या, भरती करण्या संदर्भात शासनाचा जी.आर. प्राप्त झालेला आहे. म्हणून बदल्या करता येत नाही. आता जरी शासनाचा बदल्या करण्यासंदर्भात जी.आर. आला असेल तरी जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या आता बदल्या कसरणे योग्य होणार नाही कारण ३१ मार्च नंतर जी कार्यवाही करावयाची ती आपणांस करता येणार नाही परंतु एका विभागात वर्षानुवर्षे जो कर्मचारी कार्यरत आहे त्यांच्या बदल्या १ एप्रिल नंतर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : मागील बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, जकातीचे उद्दिष्ट पुर्ण झाले नाही तर अधिकारी / कर्मचारी यांचेवर कार्यवाही करणार त्याप्रमाणे कर्यवाही होणार की नाही याचा खुलासा द्यावा.

मा.महापौर : या संदर्भात उपआयुक्त (प्र) हे खुलासा करतील.

श्री. सुदाम सोनवणे : सभागृहातील माईक सिस्टीम नेहमी बंद असते. स.सभासद काय चर्चा करतात ऐकावयास येत नाही प्रत्येक बैठकीत अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर संबंधी कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी. सभागृहातील ए.सी.चालू नाही.

मा.महापौर : स.सदस्य तसेच माजी महौपार सुदाम सोनवणे यांनी माईक सिस्टीम बाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. सभागृहातील ए.सी. चालू नाही. तरी याबाबती संबंधीत अधिकारी यांनी यापुढे सभागृहातील लाईट सिस्टीम व्यवस्थित ठेवावी. अडचण येणार नाही याची दक्षत घ्यावी.

मा.प्र.आयुक्त : मागील बैठकीत जकातीच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. गेल्या १२ मार्च पर्यंत जकातीचे वसुली ४४ कोटी ४४ लाख पर्यंत होती व १९ मार्च पर्यंत ४५ कोटी २३ लाख पर्यंत वसुली झालेली आहे. मागच्या बैठकीत मी निवेदन केलेले आहे की ४८ कोटी उद्दिष्ट आम्ही करणार आहोतच वरील दोन

कोटीची म्हणजे ५० कोटीपर्यंतह वसुली करण्याचे आमचे प्रयत्न राहील. दुसरा प्रश्न या विभागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उपस्थित झालेला असुन वृत्तपत्रात जी बातमी छापून आली त्या संदर्भात बोलू इच्छितो की, जकात विभागाचा चार्ज माझ्याकडे २ वर्षापासुन असुन या कालावधीत कुणीही नगरसेवक कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात मला संकेत दिलेले नाही. शासनाने बदल्या करण्यासंदर्भात स्थगिती दिलेली होती ती स्थगिती आदेश आता शासनाने रद्द केलेला असून एप्रिल नंतर ज्या कर्मचाऱ्यांना एका विभागामध्ये जास्त कालावधी झाला असेल त्यांच्या बदल्या करण्यात येतील.

मा.महापौर : कर्मचाऱ्यांच्या बदल्या करता येणार नाही असा शासनाचा जी.आर. आलेला होतास तो जी.आर. आता शासनाने रद्द केलेला आहे. तसे पत्र आपल्याकडे आलेल असुन त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या बदल्या आता करता येतील त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी. तसेच वृत्तपत्रात ज्या बातम्या येतात त्य संदर्भात तसेच आताच स.सदस्य यांनी श्री. उस्मान पठाण, श्री. लोखंडे यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला जर कुणी जकात उत्पन्नाच्या बाबतीत अडथळा आणतील तर याची प्रशासनाने सखोल चौकशी करुन पुढील कार्यवाही करावी व जकातीचे ५० कोटीचे उद्दिष्ट पुर्ण करण्याचा प्रयत्न करावा आता जकातीचा प्रश्न संपलेला असुन विषय क्र. १ वर बोलावे.

## <u>चर्चा</u>

**विषय क्र. :**

दिनांक३०.१.२००१ ची विशेष सर्वसाधारण सभा व दिनांक १६.२.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवादः**

श्री. अफसरखाँन : दिनांक १६.२.२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र.२० वर मी खरवडकर यांना पदोन्नती दिल्या बाबतची चर्चा चालू होती व या संदर्भात न्यायालयात कस चालू आहे असे सांगण्यात आले. त्यांचा सविस्तर खुलसा देण्यात यावा. स्थगिती आदेश आहे किंवा काय? किती कर्मचारी न्यायालयात गेलेले आहे. सर्व माहिती देणार होते.

मा.महापौर : या संदर्भात जी माहिती आपणांस पाहिजे तसे लेखी पत्र देऊन माहिती पुरविण्यात येईल.

श्री. दानवे अंबादास : या विषयावर आता चर्चा करणे योग्य होणार नाही यात दुरुस्ती कय करावयाची ती सुचवावी.

श्री. अफसरखाँन : न्यायालयात काय केस चालू आहे याची थोडक्यात माहिती पाहिजे आहे. दोन कर्मचाऱ्यांना प्रमोशन कसे दिले जाते हा आमचा प्रश्न आहे. सभागृहात चुकीची माहिती देण्यात येऊ नये खरी माहिती देण्यात यावी.

श्री. दानवे अंबादास : विषय क्र.१ वर दुरुस्ती काय आहे ती करता येईल. चर्चा करता येणार नाही.

मा.महापौर : मागील बैठकीत प्रशासकीय अधिकारी पदासंबंधी काय रुलींग आहे ते सचिव वाचून दाखवतील.

नगरसचिव : मा.महापौर यांचे रुलींग असे की, या पदासंदर्भात न्यायालयात केस चलू आहे म्हणून यावर चर्चा करणे योग्य होणार नाही. न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल या विषयावर आता चर्चा करु नये दुसरा प्रश्न बदल्या संदर्भात उपस्थित केलेला आहे. मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा. प्रशासकीय अधिकारी पदाच्या सदंर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यचे चर्चा करणे योग्य नाही. आपल्या सर्वांचे काय जे म्हणणे असेल त्याची नोंद इतिवृत्ता घेतलली आहे. सर्व स.सभासदांनी आपल्या आपल्या जागेवर बसावे. चर्चेचा वेळ संपलेला आहे.

मा.महापौर : रुलींग असे आहे की, प्रशासकीय अधिकारी पदा संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने आता चर्चा करणे योग्य नाही. स.सदस्य श्री. अफसरखॉंन यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले आहे.

श्री. सलिम पटेल : मी दोन महिन्यापुर्वी प्रश्न दिलेला आहे त्याचे उत्तर मला मिळालेले नाही.

श्री. अफसरखॉंन : प्रश्न केल्यानंतर उत्तर किती दिवसात मिळावयास पाहिजे. नियम काय आहे खुलासा द्यावा.

नगरसचिव : स.सदस्यांनी प्रश्न ज्या सभेसाठी विचारला आहे त्या सभेत उत्तर देणे अशी सर्वसाधारण धारणा आहे. जर प्रशासनास मुदत वाढवून दिलेली असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर येणाऱ्या सभेत द्यावे अशी अपेक्षा असते.

मा.महापौर : प्रश्न केल्यानंतर जी सर्वसाधारण सभा येईल त्या सभेत उत्तर देणे आवश्यक आहे. जर मुदत वाढवून दिलेली असल्यास पुढील सर्वसाधारण सभेत तरी उत्तर देणे गरजेचे आहे. परंतु २-२ महिने प्रश्न विचारुन झाल्यानंतर उत्तर न दिल्यास संबंधीत अधिकारी त्यास जबाबदार राहतील व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास येईल. ज्या ज्या स.सदस्यांनी प्रश्न विचारलेले आहे त्या प्रश्नाची प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. स.सदस्य श्री. सलीम पटेल यांचा ९ जानेवारी जो प्रश्न होता त्यांचे उत्तर दिलेले आहे . फक्त १२ फेब्रुवारी जो प्रन केला होता त्याचे उत्तर बाकी आहे. मा.आयुक्तांची सही राहिलेली आहे.

श्री. दानवे अंबादास : विषय क्र.१ वर चर्चा करता येणार नााही. दुरुस्ती काय कारावयाची ती करण्यात यावी. दि.१६.२.२००१ च्या इतिवृत्तात पान क्र.२५ वर प्रभाग समिती क्र. क मध्ये समिती कार्यालय रेल्वे स्टेशन झोन क्र.६ फक्त सभेसाठी असे दिले आहे. त्याऐवजी झोन क्र.४ क्रांतीचौक असे ठेवावे.

मा.महापौर : दुरुस्ती मान्य करण्यात येते.

श्री. सलीम स.युसुफ : यामध्ये अ मध्ये समिती कार्यालय नेहरुभवन दिले. आहे त्या ऐवजी टाऊन हॉल करण्यात यावे.

श्री. भाऊसाहेब ताठे : चिकलठाणा येथे कार्यालयाऐवजी झोन ७ येथे प्रभाग समितीचे कार्यालय ठेवावे.

मा.महापौर : टाऊन हॉल मध्ये महानगरपालिकेचे स्वतंत्र न्यायालय स्थापन करणार आहोत. त्यासाठी ती जागा आपणांस लागणार आहे. चिकलठाणा कार्यालय झोन क्र.५ ऐवजी एन-७ मध्ये कार्यालय कार्यान्वित करावे अशी दुरुस्ती करण्यात येत असून विषय क्र.१ सर्वांनुमते मंजुर करण्यात येत आहे.

श्री.स.अली मिरा सलामी : विषय क्र.१ मंजुर करु नये चर्चा होऊ द्यावी. पान क्र.२१ वर विषय क्र.२२८/२ मध्ये शहागंज येथील दुकान धारकांना जी दुकाने दिली ती

दुकान केंद्र म्हणून आपण वापर करु  शकत नाही. कारण संबंधीत दुकानदार महानगरपालिकेकडे किराया भरतात संबंधितांस कृषी उत्पन्न बाजार समितीने ३ ते ४ लाख घेऊन दुकान दिलेली आहे. तेथे महानगरपालिकेची जागा नाही. पर्यायी जागा म्हणून महानगरपालिकेने दिलेली नाही म्हणून आपण त्यांचेकडे दुकाने काढू शकत नाही व दुकान केंद्र म्हणून बदल करणे योग्य होणार नाही.

श्री. भगवान घडामोडे : स.सदस्य यांनी बरोबर सूचना केलेली आहे. भाजी मंडई हलवाची नाही पर्यायी जागा म्हणून कोणतेही दुकान दिलेली नाही. म्हणून शहागंज येथील दुकाने आपल्या ताब्यात घेऊन त्याच योग्य त्या कामासाठी वापर करावा.

श्री.स.अली मिरा सलामी : मोंढ्यातील व्यापारी जाधव वाडीमध्ये गेलेले आहे. त्यांचे दुकाने सोडलेले नाही.

श्री. किशोर तुळशिबागवाले : कृषी उत्पन्न बाजार समितीने भाजी मंडईसाठी जाधववाडी येथे दुकाने बांधलेली आहे. शहागंज मधील भाजी मंडई जाधव वाडीमध्ये शिफ्ट झालेली आहे व तो परपज पुर्ण केलेला आहे. जो निर्णय घेतलेला आहे त्यामध्ये १९९५ च्या विकास आराखड्यानुसार जे घाऊक व्यापार भाजी मंडईतून वगळण्यात आलेले आह म्हणून जो ठराव आपण पास केलेला आहे तो कायम करुन मंजुरी देण्यात यावी.

श्री. दत्तात्रय थोरात : शहागंज मधील दुकानदारांना कृषि उत्पन्न बाजार समितीने जागा दिलेली आहे तर महानगरपालिकेच्या मालकीच्या शहागंज येथील दुकाने ताब्यात घेऊन दुसऱ्या कामासाठी उपयोगात आणाव्या. जो ठराव पास झालेला तो योग्य आहे.

श्री. तकीहसन खॉंन : यामध्ये परपज जे आहे ते बदल करावे. किरयादार बदलू नये आपण दुकाने तोडण्यास संबंधीत लोक न्यायालयात जातील व त्यानंतर त्या जागेवर लवकर कोणतेही विकास होणार नाही जे सध्या उत्पन्न महानगरपालिकेला संबंधीत दुकानधारकाकडून मिळते तेही मिळणार नाही. यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे. वापरात बदल होत असेल ठिक आहे परंतु भाडेकरु बदलू नये.

श्री.किशोर तुळशिबागवाले : शहागंज येथील दुकानाचे टेंडर पध्दतीने कार्यवाही होऊन जे दुकान घेण्यास तयार आहे त्याच लोकांना ती दुकाने देण्यात यावी. किरकोळ व्यापारी तेथेच राहतील.

श्री. शेख मुनाफ : अनेक वर्षापासून भाडे देतात त्यांची इतरत्र व्यवस्था केलेली नाही त्यामुळे त्यांचेकडून भाडे घेऊन चालू ठेवावे.

श्री. शे.ईसाक शे.जैनोद्दीन : मागील बैठकीत या संदर्भात चर्चा झालेली होती त्यावेळी मी प्रश्न केला होता की, या जागेचा १३५३ साली लोकल फंडने करारनामा कुणाकडुन केला होता त्या करारनाम्याची अट काय होती. त्या जागेचे क्षेत्रफळ किती होते या संदर्भात मी प्रश्न केला होता ६ महिने झाले त्याचे उत्तर मला अद्याप मिळालेले नाही.

मा.महापौर : हा प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेली असुन डेव्हलपमेंट व्हावा म्हणून दिलेले नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : या प्रस्तावाबाबत स.सदस्यांनी आपआपल्या परिने प्रश्न उपस्थित केलेला आहे. भाजीमंडई संपुर्ण जाधववाडीमध्ये शिफ्ट झालेली आहे किंवा

काय या संबंधी सर्व महिती सविस्तर देऊन या विषयावर चर्चा न करता हा विष सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

मा.महापौर : हा प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने आलेला होता. महानगरपालिकेचे हित लक्षात घेता दुकान केंद्र व्हावे म्हणून प्रस्ताव होता. म्हणून हा प्रस्तावास कायम करण्यात येऊन इतर दुरुस्त्यासह विषय क्र.१ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

सर्वसाधारण सभा दिनांक १६.२.२००१ च्या ठराव क्र. २३०/४ मधील प्रभाग समिती क्र. क चे समिती कार्यालय रेल्वेस्टेशन झोन क्र. ६ ऐवजी झोन क्र.४ क्रांतीचौक आणि प्रभाग समिती क्र.ड चे समिती कर्यालय चिकलठाणा झोन क्र.५ ऐवजी, समिती कार्यालय एन-७ झोन कार्यालय अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वरील दुरुस्त्यासह दि. ३०/०१/२००१ ची विशेष सर्वसाधारण सभा व दि. २६/०२/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**चर्चा**

**विषय क्र ३४०/२.**

उपसंचालक नगर रचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना १२ मी. रुंद रस्ता चौराहा किराणाचावडी पोलिस स्टेशन या रस्त्याने किराणा चावडी पोलिस चौकी संपुर्ण बाधित होते.

उपरोक्त रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही पुर्ण होऊन रस्ता वाहतुकीस खुला आहे. परंतु सदर पोलिस चौकीचे संपादना अभावी मुळे रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

करिता सदर पोलिस चौकीची जागा रस्त्यासाठी संपादित करणे आवश्यक आहे. परंतु तेथील नागरिकांनी उक्त पोलिस चौकी त्याच भागात स्थलांतरीत करावे अशी विनंती केली आहे.

सबब पोलिस चौकीसाठी पर्यायी जागा उपलब्ध होईपर्यंत शहागंज चमन येथे तात्त्पुरते चौकी (शेड) साठी जागा देणे बाबत पोलिस विभागाने मागणी केली आह. त्या अनुषंगाने तपासणी करता शहागंज चमनची जागा ही मंजुर व प्रारुप विकास योजनेत 'उद्यान' म्हणून निर्देशित आहे. त्यामुळे त्या ठिकाणी इतर वापराकरिता कायम स्वरुपी किंवा तात्त्पुरते स्वरुपाचे कोणतेही बांधकाम अथवा देय होत नाही. करिता पोलिस चौकीच्या पर्यायी जागेबाबत कार्यवाही होईस्तो व रस्ता रुंदीकरण होऊन रस्ता रहदारीस खुला व्हावा या दोहो बाबींचा विचार करता चमनच्या जागेत उत्तर बाजूस ४०० चौ.फुट क्षेत्रासाठी तात्पुरत्या स्वरुपाचे शेड उभारुन पोलिस चौकी स्थालांतरित करण्याबाबतच्या कार्यवाहीच्या निर्णयासाठी प्रस्ताव सादर करण्यात येतो.

**चर्चा :**

श्री. नंदकुमार घोडेले : नगररचना अधिकारी नेहमीच सभागृहात उपस्थित नसतात याचे कारण काय? त्यांनी परवानगी घेतलेली आहे काय?

मा.महापौर : उपसंचालक व मालमत्ता अधिकारी यांनी माझी परवानगी घेऊनच गेलेले आहे. यापुढे कोणत्याही अधिकारी विशेषतः उपसंचालक यांनी सभेला उपस्थित रहावे नगरसचिव यांनी याची नोंद घ्यावी.

श्री. जगदिश सिध्द : प्रस्ताव चांगला असून नगररचना विभागाने उद्यानाच्या जागी बांधकाम वापरास देय होत नाही असे दिले आहे. तात्पुरती पोलिस चौकी जागा घेणार आहोत. तात्पुरती जागा किती दिवस आपल्याकडे राहील त्यासाठी पोलिस चौकीवरती व खालून रस्ता या पध्दतीने कार्यवाही करावी. मी नकाशा सुध्दा सोबत आणला आहे. (मा.महापौर यांचेकडे नकाशा देतात)

मा.महापौर : स.सदस्य श्री. सिध्द यांचे वार्डातील हा प्रस्ताव असुन या संदर्भात त्यांनी अगोदर माझ्याशी चर्चा केलेली होती. त्यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, खाली रस्ता व त्यावर पोलिस चौकी बांधावी तसा प्लॅन स.सदस्यांनी तयार केलेला आहे. तो संबंधित अधिकाऱ्यांकडे देण्यात येत असून नियमाने योग्य ती कार्यवाही करावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मंजुर विकास योजना नुसार चौराहा ते किराणाचावडी पोलिस स्टेशन या १२ मी. रुंद रस्त्याने चौराहा किराणा चावडी पोलिस स्टेशन असलेली मिळकत संपुर्ण बाधीत होत असल्यामुळे आणि हा रस्ता रहदारीस खुला करुन देणे आवश्यक असल्या कारणाने सदर पोलिस चौकीसाठी जागेची व्यवस्था होईपर्यंत विशेष बाब म्हणून शहागंज चमन मधील प्रारुप विकास योजनेत उद्यानासाठी आरक्षित असलेल्या जागेपैकी उत्तर बाजूस असलेली सुमारे ४०० चौ.फुट क्षेत्रासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाचे शेड उभारुन पोलिस चौकीस स्थलांतर करुन रस्ता रहदारीस खुला करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

सदर जागेस कोणत्याही प्रकारे कायम स्वरुपी किंवा पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करु नये आणि स.सदस्य श्री. जगदिश सिध्द यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे कमान उभारुन वरती चौकी ठेवता येईल किंवा कसे याबाबत पडताळणी करण्याची सर्वानुमते ठरविण्यात आले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## चर्चा

**विषय क्र ३४१/३:**

औरंगाबाद शहराच्या प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ८७ 'प्राथमिक शाळा' व आरक्षण क्र.८८ 'खेळाचे मैदान' या प्रस्तावाने बाधीत होणाऱ्या न.भू.क्र.२०७२२/ पैकी भाग असलेल्या क्षेत्राकरिता मिळकतधारक श्री. नंदलाल गुणवानी व इतर यांनी त्याचे मालकीचे क्षेत्र ३२५८.७८ चौ.मी. करिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९९६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सूचना दिली असून शासनाने सदर खरेदी सूचना दिली असून शासनाने सदर खरेदी सूचना कायम केली आहे. शासन निर्देश व मु.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम, ४९ ची तरतुद पाहता भुसंपादन प्रस्ताव एक वर्षाच्या आत मा.जिल्हाधिकरी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. खरेदी सूचना ज्या क्षेत्रासह संपुर्ण क्षेत्र

संपादन करणे बाबत कळविले आहे. (पत्र क्र.टिपीएस ३०००/८१४/प्र.क्र.२५/२०००/नरवि/३० दिनांक ५/२/२०००) सबब आरक्षण क्र.८७ 'प्राथमिक शाळा' एकुण बाधीत क्षेत्र ०.४१ हेक्टर व आरक्षण क्र.८८ 'खेळाचे मैदान' एकुण बाधीत क्षेत्र ०.३८ हेक्टर संपादन करण्याच्या मान्यतेसाठी व भूसंपादनास लागणाऱ्या खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**चर्चा :**

श्री. सुदाम सोनवणे : नगररचना विभागापासून प्रस्ताव आलेले आहे व संबंधित अधिकारी उपस्थित नाही सदरचे आरक्षण केव्हा टाकलेले होते. तसेच पुढील कार्यवाहीसाठी प्रशासनाच्या वतीने काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

मा.महापौर : या संबंधी शासनाकडून आपल्याकडे एक पत्र आलेले आहे. सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली नाही तर आरक्षण रद्द होईल. जागा किती व कुठे आहे यासंबंधी सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री. जयवंत ओक : उपसंचालक सभागृहामध्ये उपस्थित नाही. नगररचना विभागाकडून एकुण ४ विषयपत्रिकेवर आलेले आहेत. म्हणजे १०-१० वर्षाच्या संचिका पेंडींग आता निघालेल्या असून जे अधिकारी या सभागृहात उपस्थित नाही असे प्रस्ताव मंजुर करणे योग्य नाही. एखादे अधिकारी उपस्थित नसल्यास आपण त्यांना नोटीस देऊन कार्यवाही करते म्हणून या विषयावर विषय क्र.३,४ व ६ वर चर्चा न करता संबंधीत अधिकारी आल्यावर सविस्तर माहिती घेऊन या विषयाला मंजुरी देण्यात यावी. तोपर्यंत तीनही विषय स्थगित ठेवावे.

श्री.स.अली मिरा सलामी : १० वर्षापासून काही जागा संपादन केलेल्या आहेत. १९७५ पासून विकास आराखड्याची कार्यवाही होत नाही. कोणत्या जागेचे पी.आर.कार्ड करण्यात आले कोणते करण्यात आले नाही, काही ठिकाण दुकान केंद्र करण्यात आली १९७१ ला प्रस्ताव भूसंपादनाचा येतो १९७२ साली एक्वायर केलेली जागेचे पी.आर. आजपर्यंत का करण्यात आलेले नाही. संबंधीत विभागातील अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. यात महानगरपालिकेचे नुकसान होत आहे.

श्री. जयवंत ओक : जुना बाजार मध्ये जहागीरदार यांची जागा संपादन केलेली असतांना एका व्यक्तीने कुळ म्हणून जागा ताब्यात घेतली आहे. कार्यवाही का केलेली नाही.

मा.महापौर : महानगरपालिका झाल्यापासुन कोणत्या जागेचे भुसंपादन केलेले आहे व पैसे दिलेले आहे अशा कोणकोणत्या जागा आहे त्याची नगररचना विभागातर्फे एक यादी तयार करुन सभागृहाला सादर करावी.

श्री.स.अली मिरा सलामी : १९९९ मध्ये ३-४ सभेत बरेच प्रस्ताव नगररचना विभगाकडून भूसंपादनाचे सादर झालेले होते. काही प्रस्ताव महानगरपालिकेच्या जागा वाटप करण्याचे देखिल आलेले होते. सुराणा कॉम्पलेक्सची जागा महानगरपालिकेच्या मालकीची व अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी होती ती जागा कमी रकमेत देण्यात आलेली आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, जागा भूसंपादन केल्यानंतर त्याची कार्यवाही ताबडतोब झाली पाहिजे. किती खर्च अपेक्षित आहे संबंधित अधिकारी यांचेकडून या प्रस्तावासंबंधी सविस्तर माहिती झाल्यानंतर असे प्रस्ताव मंजुर करावे.

श्री. जयवंत ओक : शहरातील मोठमोठे भूखंड विनामुल्य मध्ये लोक खाऊ लागले आहे.

श्री.स.अली मिरा सलामी : किती जागा आहे. किती जागा डेव्हलप केलेल्या आहेत. यासंबंधी एक विशेष बैठक लावण्यात ३ दिवसाच्या आत बोलविण्यात यावी व चर्चा करुन निर्णय घ्यावेत.

मा.महापौर : मा.आयुक्तांच्या नावने एक पत्र आलेले आहे. ही जागा संपादन केली नाही तर आरक्षण व्यपगत (लॅप्स) होईल त्यावर महानगरपालिकेचा हक्क राहणार नाही म्हणून सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : दर्गा रोडवर म्हाडाच्या बाजुला नाल्यालगत महानगरपालिकेच्या एका जागेवर बाजारासाठी जागा देण्याचे ठरले होते. निविदा सुध्दा काढण्यात आली होती परंतु त्या ठिकाणी दुसऱ्याच व्यक्तीने पाटी लावून जागा ताब्यात घेण्यात प्रयत्न करत आहे. याची सविस्तर माहिती मला पुढील बैठकीत देण्यात यावी.

श्री.शे.ईसाक शे.जैनोद्दीन : ६ महिन्यापूर्वी महानगरपालिकेने किती भूखंड संपादित केलेले व महानगरपालिकेच्या नावावर का करण्यात आलेले नाही. प्रस्ताव ठेवला होता ६ महिने झाले नामांतर का केले नाही.

श्री. सुरजितसिंग खुंगर : या प्रस्तावासंबंधी स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घ्यावा. एमटीडीसी लगत सिटी सर्वे नं.१९२८२ मध्ये सन १९७५ च्या विकास आराखड्यानुसार महानगरपालिकेचा रस्ता म्हणून दाखविण्यात आलेला आहे. महानगरपालिकेची जागा असून रस्त्याची जागा आहे. या बाजुला असलेल्या गायकवाड नावाच्या व्यक्तीने २८.०५ चौमी जागेचे ११६४.७२ चौमी क्षेत्राचे पी.आर.कार्ड त्यांचे स्वतःचे नावाने बनविले आहे. या जागेची मोजणी करण्यासाठी अर्ज दिला त्यानुसार पुन्हा मोजणी करण्यासाठी अर्ज दिला त्यानुसार पुन्हा मोजणीमध्ये ११६४.७२ चौमी जागा स्वतःच्या नावाने करुन घेतली व त्यानंतर भुविशेष भु-संपादन अधिकारी यांनी सदर जागा भुसंपादन करण्यासाठी संबंधितास १७,९१,७१३ रुपये द्यावयाचे आहे असे दाखविले यावरुन असे दिसून येते आहे की, महानगरपालिकेची जागा महानगरपालिकाच खरेदी करत आहे. याची चौकशी झाली पाहिजे.

मा.महापौर : आपण विषय क्र.३ वर चर्चा केलेली नाही. दुसऱ्याच विषयावर बोललेलो आहात.

श्री. सुरजितसिंग खुंगर : माझा बोलण्याचा उद्देश असा की कोणताही प्रस्ताव सादर झाल्यानंतर त्यासंबंधी सविस्तर माहिती घेऊनच मंजुर करावा नसता प्रस्ताव येतात पास होतात दुसरे लोक स्वतःच्या नावाने पी.आर.कार्ड काढतात व शासनाचे तसे पत्र घेऊन येतात. जागा भूसंपादन करण्याची कार्यवाही करावयास लावतात यात महानगरपालिकेचा पैसा जातो.

श्री.स.अली मिरा सलामी : मंजुर करुन जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावा. खाजगी तडजोड करुन नये.

श्री. जयवंत ओक : १९७५ चा नकाशा मागविला तर सदर जागा ही पुष्पनगरी मधील असावी म्हाडाच्या पुढे स्मशानभूमी जवळी ही जागा असू शकते. त्या ठिकाणी कब्रस्तान महानगरपालिकेचे आहे. महानगरपालिकेचे भूखंड येथे आहे अलिकडून पुष्पनगरीची जागा आहे व आरक्षण खेळाचे मैदान दाखविण्यात आलेले असून एका विशिष्ट व्यक्तीची जागा कशी होऊ शकते असे बोगस या शहरामध्ये ३६५ पी.आर.कार्ड करण्यात आलेले आहे व तेच भूखंड महानगरपालिका विकत घेते व पैसा वाटप करून महानगरपालिकेचे

नुकसान होते आहे. जुनाबाजार येथील जागा महानगरपालिकेला हस्तांतर झालेली असताना त्या ठिकणी एक व्यक्ती ३० वर्षापासुन कुळवहिती म्हणून जागा ताब्यात घेऊन बसलेला आहे त्याची ताबडतोब कार्यवाही व्हावी. असे शहरामध्ये बरेच भूखंड लोकांनी ताब्यात घेतलेले आहे. या प्रस्तावित जागा कमीत कमी ६० ते ७० लाखाची असेल. म्हणून अशा प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी विशेष सभा बोलवावी.

मा.महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेता हा प्रस्ताव सविसतर माहितीसह पुढील बैठकीत सादर करावा. त्यावेळी सविस्तव तोंडी माहिती देण्याची सुध्दा अधिकारी यांनी तयारी ठेवावी. हा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव स्थगित ठेवून या आरक्षणाखालील जमिनीच्या संदर्भात्तील सविस्तर माहितीसह सदर प्रस्ताव पुन्हा पुढील सभेत प्रशासनामार्फत ठेवण्यात यावा व त्यावेळी प्रशासनातर्फे सखोल माहिती देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## चर्चा

**विषय क्र. ३४२/४ :**

उपसंचालक नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे कोकणवाडी प्रभागातील उस्मानपुरा येथील महानगरपालिकेची शाळा ही जिल्हा परिषदेच्या इमारतीत भरते. जिल्हा परिषदेने सदर शाळा स्थलांतरित करण्याबाबत महानगरपालिकेस कळविलेले आहे.

त्यामुळे महानगरपालिका शाळेसाठी त्या भागातील खाजगी जमीन न.भू.क्र.१८३२५/१ क्षेत्र ९१०.९० चौ.मी. संपादन करावी असे संबंधीत वार्डाचे स.नगरसेवक व शिक्षणाधिकारी महानगरपालिका यांचे मत आहे.

या प्रस्तावित जमिनी लगत परिचय बाजुस प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र.३२० व ३२१ प्राथमिक शाळा व हायस्कुलसाठी जागा प्रस्तावित आहे. परंतु सदर जागेच्या मालकी हक्कात वाद आहे. त्यामुळे ही आरक्षित जागा संपादनासाठी विलंब होऊ शकतो.

करिता प्रस्तावित खाजगी जमिन न.भू.क्र.१८३२५/१ क्षेत्र ९१०.९० चौ.मी. ही जमीन मंजुर व प्रारुप विकास योजनामध्ये आरक्षीत नसल्याने नॉन डी.पी. भूसंपादन प्रस्ताव करावा लागेल.

तरी प्रस्तावित खाजगी जमिन नॉन डी.पी. प्रस्ताव म्हणून भूसंपादन करण्याचे मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री.जबिंदा दरबिरसिंग : या जागेवर वाद चालू आहे. सदर जागा श्री. बागडे यांची असुन मन्नालाल या नावाचे व्यक्तीने वाद घातलेला आहे. रोहिदास गृहनिर्माण संस्थेचा न्यायालयात वाद चालू आहे. चौकशी करावी.

मा.महापौर : ही जागा वेगळी आहे. आज महानगरपालिकेच्या शाळेसाठी जागा घेणे आवश्यक आहे. सध्या शाळा जि.प.च्या इमारतीमध्ये भरत आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिकेची शाळेसाठी स्वतःच्या मालकीची इमारत असणे आवश्यक आहे. म्हणून आपण पर्याय म्हणून स्वतःच्या मालकीची जागा असावी म्हणून जागा भूसंपादन करत आहोत. या जागेवर वाद जरी असला तर ज्यांचेकडून निकाल लागेल त्यांना महानगरपालिकेच्या माध्यमातून नियमाने रक्कम देण्यात यावी.

मा.महापौर : शाळेसाठी जागा स्वतःच्या मालकीची असणे गरजेचे आहे. म्हणून हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कोकणवाडी प्रभागातील उस्मानपुरा येथील महानगरपालिकेची शाळा ही जिल्हा परिषदेच्या इमारतीत भरत आहे. आणि जिल्हा परिषदेने त्यांचे इमारतीमधून महानगरपालिकाची शाळा स्थलांतरित करण्यासाठी कळविले असल्याने आणि य भागात महानगरपालिकेची जागा उपलब्ध नसल्यामुळे याच भागातील विकास योजना व्यतिरिक्त नॉन डी.पी. असलेली खाजगी जमीन न.भु.१८३२५/१ क्षेत्र ९१०.९१ चौमी जमिन भूसंपादन करण्यास भूसंपादनाच्या संभाव्य खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## चर्चा

**विषय क्र. ३४३/५ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की शहरातून निरनिराळया रुग्णालयातून व आरोग्य केंद्रातून निघाणारा कचरा (बायो मेडिकल वेस्ट) याची शास्त्रीय दृष्टीने विल्हेवाट लावणे महानगरपालिकेला सर्वोच्च न्यायालयाने व केंद्र शासनाने बंधनकारक केले असून त्यानुसार शहरातुन अशा प्रकारची विल्हेवाट लावणे जरुरीचे आहे. (भारत राजपत्र दि.७ मार्च २०००)

औरंगाबाद महानगरपालिकाच्या हद्दीत १९० रुग्णालय व ४०० पेक्षा जास्त वैद्यकीय व्यवसाय करणारे खाजगी संस्था आहे. या सर्वापासून निघणारा कचरा दररोज साधारणतः ५० टक्के कचरा गोळा केला जातो. याची स्वतंत्रपणे शहरातून गोळा करणे व शास्त्रीयदृष्ट्या योग्य रितीने विल्हेवाट लावणे जरुरी आहे. म्हणून बायोमेडिकल वेस्ट नस्ट करणेसाठी खालील दोन ठिकाणी इनसिनेटर बसविणे, चालू करते व अशा प्रकारचा कचरा गोळा करणे जरुरी आहे.

१. बेगमपुरा स्मशानभुमी जवळ (मनपाच्या जागेत)
२. नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड जवळ (मनपाच्या जागेत)

या प्रकल्पाला प्रत्येक २ एकर जमीन लागणार असून त्यामध्ये प्लँट व सेग्रीगेशनसाठी खुली जागा, ऑफिस इ. करणे जरुरी आहे. यासाठी साधारणतः ३० लाख रुपये प्रत्येकी खर्च येईल.

महानगरपालिकेने इतका खर्च करणेपेक्षा बिल्ट, ऑपरेट, लिज, ट्रान्सफर (बोल्ट) या पध्दतीने हा प्रकल्प तयार करणे, चालविणे, लिज करणे व मनपास हस्तांतर करणेसाठी निविदा काढणे योग्य राहील.

हा प्रकल्प सक्षम व कार्यान्वीत राहणेसाठी म्हणून प्रकल्पाच्या अटी व शर्ती लिजपिस अथवा रॉयल्टी व स्वतःची वाहने व वाहनावरील होणारा खर्च संबंधित करेल. तसेच वीज, पाणी इ. सर्व सोयी संबंधिताला करावे लागतील. मनपा फक्त नाममात्र लिजवर जागा देईल. याचपध्दतीने शर्ती व अटीवर निविदा मागविणे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेचे मंजुरीस्तव सादर.

श्री. सुरजितसिंग खुंगर : शहरात विविध दवाखाने, हॉटेल असून वेगवेगळ्या ठिकाणी कचरा साचला जातो. व या कचऱ्यची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी नारेगाव येथे जागा दिली. तेथे कचऱ्यापासून खत निर्मितीचा कारखाना सुरु करण्यात आला शहरातील संपुर्ण कचरा विल्हेवाट लावण्यासाठी नारेगाव येथे सत्यम कंपनीला ६ एकर जागा दिलेली आहे. त्याचे काय झाले. त्या प्रोजेक्ट पासुन महानगरपालिकेचा काय फायदा झाला व त्यांचे काल मर्यादा किती देण्यात आलेली होती. त्या प्रकल्पावर महानगरपालिकेची किती रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. वर्ष निहाय महानगरपालिकेला त्यांचा किती फायदा व्हावा असे गृहीत धरले होते. या प्रोजेक्ट बाबत महानगरपालिकेच्या कोणत्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी तपासणी करुन मा.आयुक्तांकडे अहवाल सादर केलेला आहे. केलेला असेल तर काय अहवाल दिला त्याची माहिती देण्यात यावी. तेथिल जमीन १ रुपया प्रमाणे दिलेली असुन जे ॲग्रीमेंट केले त्यापासुन काय फायदा होणार नाही झाला तर काय कार्यवाही होणार झाला तर पुढील उपाययोजना काय या संबंधी ॲग्रीमेंटमध्ये काहीही दिलेले नाही. उलट जमिनीचा भूभाग सपाट करण्यासाठी जे.सी.बी. मशिन दिली जाईल. असे ॲग्रीमेंट मध्ये दिलेले आहे. सर्व काही करुन महानगरपालिकेला काय फायदा होतो आहे व ॲग्रीमेंट करतांना तज्ञ लोकांचा सल्ला घेण्यात आला किंवा काय याचा खुलासा करावा.

मा.महापौर : संबंधीत अधिकारी डॉ.देशपांडे यांनी माहिती द्यावी.

आरोग्य वै.अधिकारी : नारेगांव येथील खत निर्मितीचा जो करारनामा आपण सुरु केला तो जाहीर टेंडर काढून कार्यवाही केलली आहे. महानगरपालिकेने या प्रकल्पासाठी ६ एकर जागा, संबंधीत मालकास पाणी विज व रस्ता करुन देण्याचा करार केलेला आहे. हा संपुर्ण प्रकल्प त्यांनी स्वतः करावयाचा व जमलेला संपुर्ण कचऱ्यावर बायोटेक्नॉलॉजी सग्रीगेशन प्लॅन्ट त्यांनी उभा करावयाचा आहे. त्यावर महानगरपालिकेने ५ टक्के रॉयल्टी व १/- रुपया प्रति एकर प्रमाणे रक्कम घेण्याचे ठरलेले आहे. पाणी, वीज सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. हा प्रकल्प मा.महापौर मध्ये श्री. व्ही.रंगनाथन साहेब यांचे हस्ते शुभारंभ करण्यात आलेला आहे. शहरातून ३०० टनापर्यंत कचरा जमा होतो व सदर प्रोजेक्टची कॅपॅसीटीसुध्दा तेवढीच आहे. परंतु सत्यम कंपनी मालकाने ३०० टन सुरु केलेली नाही. म्हणून कचरा तसाच पडून राहिलेला आहे. बऱ्याच वेळा कचऱ्यावर आग लागलेली आहे. संबंधीताने महानगरपालिकेवर आरोप करुन पाणी भरपुर नाही वगैरे तक्रार केली मनपाकडून नोटीस दिलेली आहे व त्यानुसार संबंधीताने ७१ हजार रुपये रॉयल्टी म्हणून आपल्याकडे भरलेले आहे. यावर पुर्णतः लेखपरिक्षण झाल्याशिवाय पुर्ण सांगता येणार नाही. तरी सुध्दा संबंधितास नोटीस देऊन जो करार झालेला होता. त्याप्रमाणे कचऱ्याची विल्हेवाट लावत नाही व

महानगरपालिकेची जी पहिल्यांदा परिस्थिती होती ती त्याच स्थितीत राहणार म्हणून आपल्या बरोबर झालेला करार महानगरपालिकेला रद्द का करु नये. अशी कारणे दाखवा नोटीस दिली आहे. व त्यांना शासनाकडून यावर जो ग्रॅण्ड मिळणार होता त्यासंबंधी सुध्दा शासनाकडे आपण पत्र देवून कळविले आहे की, संबंधितास एकही पैसा देऊ नये. त्यांनी केलेल्या कराराप्रमाणे कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत कार्यवही केलेली नाही. जो खर्च झालेला आहे त्यात महानगरपालिकेचा काहीच खर्च नाही. संबंधीतांनीच १ कोटी ६५ लाख रुपये खर्च केलेले आहे. हा प्रकल्प एकुण ३ कोटी ६५ लाखाचा हा प्रकल्प आहे. अंतिम नोटीस देऊन करार रद्द करण्याबाबत कार्यवाही करणेत येईल.

मा.महापौर : जे ॲग्रीमेंट झालेले आहे ते रद्द करता येते किंवा काय याबाबत विधी सल्लागार यांचा सल्ला घेण्यात येईल.

श्री. सुरजितसिंग खुंगर : एकुण ३ कोटी ६५ लाखाचा प्रकल्प असून महानगरपालिकेने केलेल्या करारानुसार का कार्यवाही होत नाही. संबंधीतांनी ॲग्रीमेंट सरेंडर केले. अर्बीट्रेडर नेमता येईल.

श्री. भगवान रगडे : ६ एकर जमिन कचऱ्याखाली दिलेली असतांना कचरा रस्त्यावर पडत आहे. व संबंधीत गुत्तेदार त्या जमिनीत पीक काढून खात आहे. अशी परिस्थिती आहे. जी जमिन दिलेली आहे त्याबाजुला गृहनिर्माण सोसायटी झालेली आहे. संबंधीत आजुबाजुच्या लोकांना दुर्गंधी येते त्यांचे आरोग्य धोक्यात येईल म्हणून हा कचरा तेथून उचलण्यात यावा व शहराच्या बाहेर ४-५ कि.मी. पर्यंत दुरवर टाकण्यात यावा. जेणेकरुन आजुबाजुच्या वार्डातील जनतेला त्रास होणार नाही.

श्री. साहेबराव कावडे : या संबंधी मी आपणांकडे ४-५ वेळेस प्रश्न उपस्थित केलेला आहे. जे ॲग्रीमेंट झालेले आहे ते चुकीचे झालेले आहे. या कचऱ्याची विल्हेवाट लागत नसुन कचरा रस्त्यावर पडलेला आहे जो करार झाला तो रद्द करण्यात यावा अशी विनंती आहे. महानगरपालिकेच्या भाड्याने कचरा दुसऱ्यास शेतात जातो.

श्री. सुरजितसिंग खुंगर : जी देखरेख ठेवावयास पाहिजे ती ठेवलेली नाही. म्हणुन कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी जास्तीत जास्त प्रयास करत नाही. ठाणे महानगरपालिकेने गृहनिर्माण संस्थांनी त्यांचा कचरा स्वतः विल्हेवाट लावायचा व त्यासाठी त्यांनी एक जागा सोडायची ही योजना या महापालिकेने देखिल राबवावी. ५० टन कचरा कमी होईल. यासंबंधी लोकांमध्ये एन जी ओ मार्फत प्रशिक्षण देता येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : संपुर्ण शहराचा कचरा नारेगांव येथे टाकला जातो कराराप्रमाणे संबंधीत व्यक्ती कार्यवही करत नाही असे स.सदस्यांनी मत व्यक्त केले कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी कराराप्रमाणे ३०० टन क्षमता आवश्यक आहे. परंतु आज तेथे १५० टन कचऱ्याची विल्हेवाट संबंधीत व्यक्ती लावू शकत नाही व सदर कारखाना २५ दिवस सुध्दा चालत नाही. या संदर्भात सभागृहात वेळेवेळी चर्चा सुध्दा झालेली असून या कारखान्याच्या आजुबाजुला जी गावे आहेत तेथील लोकांना व रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना त्रास होतो व तशा तक्रारी सुध्दा आपल्याकडे आलेल्या आहेत. तसेच पावसाळ्यामध्ये नदी / नाल्यातुन हा कचरा वाहून जातांना दिसतो व

पाण्यात कुजतो व दुर्गंधी सुटते व नाल्याच्या कडेला जे स्थानिक जनता आहे त्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यावर वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा के ला होता की, कार्यवाही करण्यात येईल, तेथील बाजुबाजुच्या कुठल्याही नागरिकांना त्रास होणार नाही असे पत्राने सुध्दा कळविण्यात आले होते. सध्या ज्या ठिकाणी कचरा पडलेला आहे तेथील आजुबाजुच्या लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे व आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. म्हणून जे ॲग्रीमेंट करण्यात आले ते ज्या पध्दतीने करावयास पाहिजे होते तसे झालेले नाही त्यात मोठ्या त्रुटी आढळून येत आहे. संबंधिताने करारप्रमाणे काम केलेले नसेल तर झालेला करार आपण रद्द करु शकतो हा कचरा कुणी नेण्यास तयार असेल तर त्यासंबंधी जाहीर निवेदन देऊन तसे कळवावे असे ठरले असतांना प्रशासनाच्यावतीने का कार्यवाही केलेली नाही. यावर महानगरपालिकेचे हित व जनतेचे आरोगय या दृष्टीने विचार करुन प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी प्रशासनाच्या वतीने काही सुचवल्यास त्यास या सभागृहातर्फे अनुमती देण्यात येईल.

मा.महापौर : सदर कारखान्यांची कॅपेसिटी १५० टन कचऱ्याची आहेत बाकीचा १५० टन कचरा तसाच पडून राहिल्यास इतर आजुबाजुच्या लोकांना त्रास होत असेल यावर संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वै.अधिकारी : २००० ते २५०० टन कचरा दररोजचा जातो बायोटॅकसाठी कचरा एका ठिकाणी ४५ दिवस टाकून त्यावर प्रक्रिया केल्यानंतर खत तयार होते. परंतु दररोजचा कचरा टाकण्यासाठी संबंधीतास जागा असतांना व ३०० टनाची कॅपॅसीटी असतांना विल्हेवाट लावत नाही.

श्री. भगवान घडामोडे : संबंधीतास जागा पाणी विनामुल्य दिलेले असतांना सुध्दा कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. कचऱ्याला आग लागत नाही मुद्दामहून आग लावण्यात येते व कचरा विकला जातो म्हणून केलेला करार रद्द करुन दुसरे टेंडर काढावे त्या अगोदर योग्य ती चौकशी व्हावी नसता अर्ध्या कचऱ्यांचे काम दुसऱ्यास द्यावे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : कचरा कारखान्यावर प्रत्यक्ष आपण भेट द्यावी परिस्थिती काय आहे समजेल ते ॲग्रीमेंट केले त्यात कोण दोषी आहे. संबंधीतावर काय कार्यवाही करता येऊ शकेल यात महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. नविन ॲग्रीमेंट करणार असेल तर कसे करणार त्याची सुध्दा सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री. साहेबराव कावडे : जे ॲग्रीमेंट झालेले आहे. ते रद्द करणे.

मा.महापौर : सभागृहांच्या भावना लक्षात घेता नारेगाव येथिल कचऱ्याची विल्हेवाट योग्य रितीने लावली जात नाही म्हणून स.सदस्यांनी वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले आहेत म्हणून याची योग्य चौकशी व सदर ठिकाणी पाहणी करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात येत आहे या समितीमध्ये स.स.श्री सुरजितसिंग खुंगर, स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड हे राहतील तसेच अधिकारी वर्गापैकी मुख्य लेखाधिकारी तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.देशपांडे हे सर्व या कमिटीने सदस्य म्हणून राहतील सदर कमिटीचे पाहणी करुन ८ दिवसाच्या आत अहवाल सादर करावा.

श्री.स.अली मिरा सलामी : प्रस्ताव वेगळ्या पध्दतीने असलेला आहे. असे स.स.श्री खुंगर यांचे म्हणणे आहे. ॲग्रीमेंटमध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातुन काय प्रस्तावामध्ये वेगळे दाखवले.

मा.महापौर : सादर झालेला प्रस्ताव व चालू असलेली चर्चा या प्रस्तावाशी निगडीत नाही. महाराष्ट्र प्रदुषण बोर्ड कंट्रोलर नविन नियमान्वये हा प्रस्ताव आलेला आहे. शहरातील प्रत्येक हॉस्पीटल व हॉटेल्स मधील जो कचरा येतो त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रस्ताव आहे. तो कचरा जाळला पाहिजे म्हणून हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालय व केंद्र शासनाने शहरातुन निरनिराळ्या रुग्णालयातुन व आरोग्य केंद्रातुन निघणारा कचरा (बायोकेमिकल वेस्ट) याची शास्त्रीय दृष्टीने विल्हेवाट लावणेसाठी बंधन घातलेले असल्यामुळे शहरातील बायोकेमीकल वेस्टचे शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावणेकरिता व ते नष्ट करण्याकरिता खालील ठिकाण इनिसिनेटर बसविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच प्रस्तावात दर्शविल्यानुसार बोल्ट (बिल्ट ऑपरेट लीज ट्रान्सफर) या पध्दतीने निविदा काढण्यास व प्रस्तावित अटी व शर्तीवर निविदा मागविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे सभागृहात प्रत्यक्ष चर्चेद्वारे ठरविल्याप्रमाणे नारेगाव येथील घाण कचऱ्याची विल्हेवाट लावणे व त्यापासुन खत तयार करणाऱ्या कारखान्या बरोबर झालेल्या करारानुसार योग्य ती कार्यवाही होते किंवा नाही यासाठी खालीलप्रमाणे चौकशी समिती गठीत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आलेली आहे.

१. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
२. स.स.श्री.साहेबराव कावडे
३. स.स.श्री.भगवान रगडे
४. स.स.श्री.प्रकाश निकाळजे
५. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
६. स.स.श्री.मुख्य लेखा अधिकारी
७. स.स.श्री.आरोग्य वैद्यकीय अधिकारी

सदर समितीने आपला अहवाल आठ दिवसांत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

## चर्चा

**विषय क्र ३४४/६.**

उपसंचालक नगर रचना यांच्यातर्फे प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मंजुर विकास योजनांची सर्व आरक्षणे समुचित प्राधिकरण म्हणून त्या त्या नगरपालिकांना/ महानगरपालिकांनी / जमिन मालकांनी सर्वच आरक्षणे पैशा अभावी विकसीत करणे शक्य होत नाही. परिस्थितीत नागरिकांना बऱ्याच सार्वजनिक सुविधापासुन वंचित राहावे लागते. विकास योजनेतील जास्तीत जास्त आरक्षणाचा विकास व्हावा यासाठी जनतेचा सहभाग असणे आवश्यक आहे. त्यासाठी जमीन मालकांना आरक्षणाचा विकास करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने (शासन निर्णय परिपत्रक १०९४/सीआर१४९४/नावि-९ दिनांक

७.४.९४) नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश देण्यात आले असून शासन धोरणानुसार विकास योजना प्रस्तांवांची अंमलबजावणी समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन करणे शक्य झाले आहे.

सदर शासनाचे निर्णयामधील निर्देशानुसार न.भू.क्र.१२८७७/अ/१ चे मिळकतधारक (१) श्री. सुंदरलाल मुरलीधर पटेल व (२) सौ.उषाबेन भ्र.विठ्ठलराव पटेल यांचे मुख्त्यार आ श्री. प्रविण शांतीलाल पटेल यांनी उक्त जागेचे क्षेत्र (उक्त न.भु.क्र.२१५३.०० चौ.मी. एवढे आहे.) सदरील क्षेत्र एकुण आरक्षण क्षेत्राच्या साधारणतः १/३ असल्याने आरक्षणाचा भागशः विकास होईल उर्वरीत क्षेत्र ते जमीन मालक एकाच पध्दतीने विकसीत करु शकतील. अथवा महानगरपालिका ते क्षेत्र भूसंपादन करुन विकसीत करु शकेल. सदरील जमिन पुर्वीच्या मंजुर विकास योजना (१९७५) नुसार 'औद्योगिक वापरा करिता' दर्शविलले असून प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र.२१८ 'दुकान केंद्र व वाहनतळ यामध्ये बाधित होते.

शासन निर्णयानुसार अर्जदार हे २५ टक्के क्षेत्राइतके भूखंड वेगळा करत तो एक चटई निर्दशकासाठी महानगरपालिकेस बांधून देणार आहेत. उर्वरित ७५ टक्के भूखंडावर शासन निर्देशनानुसार खालील अटीवर विकास परवानगी देण्यास हरकत नाही. असे प्रशासनाचे मत आहे.

१. एकुण भूखंड क्षेत्रांच्या २५ टक्के दुकाने महानगरपालिकेस मोफत बांधून द्यावी त्यापेक्षा जास्तीचे बांधकाम असेल त्याचा सर्व खर्च महानगरपालिका देईन.
२. महानगरपालिकेस द्यावयाची दुकाने व अर्जदार यांची दुकाने बांधण्यास महानगरपालिके स विकास नियंत्रण नियमावलीनुसार रितसर एकत्र बांधकाम परवानगी घेऊन दोन्ही बांधकामे एकाचवेळी करण्यात यावीत.
३. महानगरपालिकेची दुकाने मा.शहर अभियंता यांचे मार्गदर्शनानुसार बांधून पुर्ण झाल्यावरच संपुर्ण इमारतीत बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र तथा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल.
४. याशिवाय महानगरपालिकेच्या इतर अटी व शर्ती संदर्भात व बांधकाम महानगरपालिकास विनामुल्य देण्याबाबतचा करारनामा बांधकाम परवानगी देण्यापुर्वी जमीन मालकाने करुन द्यावा.

करीता वर नमुद केलेल्या शासन निर्णया नुसार या समावेश आरक्षण माध्यमातुन प्रारुप विकास योजनेतील आरक्षण क्र.२१८ 'दुकान केंद्र व वाहन तळ' भागशः विकसीत करण्याचा संबंधीत जमीन मालकाने सादर केलेल्या प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

सदरील आरक्षण हे प्रारुप विकास योजनेमधील असून सदरील विकास योजनेस मंजुरी दिल्याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २८.०२.२००१ व १.३.२००१ च्या औरंगाबाद येथील मंत्रीमंडळ बैठकीसंबंधाने जाहीर केलेले आहे. म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द झालेल्या सुधारीत प्रारुप विकास योजनेत आणि कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रारुप विकास योजने सदरील आरक्षण कायम आहे. तसेच आरक्षण प्रस्तावित करण्याबाबत किंवा या आरक्षणाबाबत कोणाचाही आक्षेप नाही. याचा अर्थ विकास योजना मंजुरीचे प्रत्येक टप्प्यावर सदर आरक्षण कायम आहे. ही स्थिती विचारात घेता विकास योजना मंजुरीचा तपशिल अद्याप मनपात जरी प्राप्त झालेला नसता तरी तो (नकाश,अधिसुचना इ.) मनपास प्राप्त होईल दरम्यान विकास योजनअंतर्गत आरक्षण विकासकरिता योजनते अंतर्गत सादर केलेला प्रस्ताव तत्वतः मान्य करण्यास हरकत नाही प्रारुप विकास योजनास शासनाने दिलेल्या

मंजुरीची अधिसूचना, नकाशा प्राप्त झाले नंतर प्रस्तावाची पडताळणी करुन या प्रकरणी परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मान्यतेस्वत सादर.

श्री. किशोर तुळशिबागवाले : यामध्ये मंजुर विकास योजना १९७५ दिले आहे. नविन आराखडा सन १९९५ अद्याप आलेला नाही.

मा.महापौर : यामध्ये शासनाने नविन धोरणानुसार डी.पी.प्लॅन मंजूर केलेला आहे.

श्री. जयवंत ओक : १९७५ नुसार प्रस्तावात दाखविलेले आहे. सन ९५ चा नकाशासुध्दा आलेला नाही. योग्य माहिती घेण्यासाठी उपसंचालक उपस्थित नाही. मुख्यमंत्र्यांनी विकास आराखड्यास मंजुरी दिलेली आहे काय मंजुरी दिली ते दाखविण्यात यावे.

उपअभियंता नगररचना : प्रारुप विकास योजनामधील दुकान केंद्र व वाहनतळ यासाठी बाधीत होणाऱ्या जमिनीतील काही क्षेत्रातील जमिन मालकाने समावेशक आरक्षण विकास साठी विकासाचा प्रस्ताव ५.१.२००० रोजी दिलेला होता त्यानंतर प्रारुप विकासास मान्यता नसल्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनी विकास योजना आराखड्यास मान्यता दिलेली आहे. यास आपण तत्वतः मान्यता घेत आहोत व शासनाकडून जे गॅझेट येईल त्यानुसारच कार्यवाही होईल.

श्री. जयवंत ओक, श्री. सुरजितसिंग खुंगर : शासनाचा जी.आर. आलेला नसतांना प्रस्ताव सादर करण्यात येतो हे योग्य नाही. मुख्यमंत्र्यांनी फक्त डिक्लेअर केलेले आहे. अधिकारी यास जबाबदार राहतील. अद्याप नकाशेही आलेले नाहीत.

उपअभियंता नगररचना : १९७५ च्या विकास योजनामध्ये आरक्षण नव्हते औद्योगिक वापरासाठी दाखविलेले होते. १९९५ च्या विकास योजना आराखड्यामध्ये दुकान केंद्र व वाहनतळ वापर म्हणुन दर्शविलेला आहे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : विकास आराखडा शासनाकडून मंजुर होऊन आलेला नाही म्हणून त्या अगोदर असे प्रस्ताव येऊन त्यावर निर्णय घेणे योग्य होणार नाही.

श्री. जयवंत ओक : यात काहीतरी गौडबंगाल दिसते. १९७५ च्या विकास आराखड्यानुसार काही अधिकाऱ्यांनी लोकांना नियमबाह्य जागा दिलेल्या आहेत. त्यामुळे तात्कालीन आयुक्त श्री. बलदेवसिंग यांनी त्यांना निलंबित केलेले आहे.

श्री. सुरजिंसिंग खुंगर : शहानुरवाडी येथे मालखरे बिल्डर यांचे बरोबर महानगरपालिकेने एका जागेसंदर्भात ॲग्रीमेंट केले व २५ टक्के जागेवरील दुकाने इतरांना देण्याअगोदर महानगरपालिकेला देण्यात येईल असे ठरले असतांना महानगरपालिकेला दुकाने दिलेली आहे का?

श्री. प्रकाश निकाळजे : सदर प्रस्तावित जागा ही एक खाजगी व्यक्तीची असून महानगरपालिकेची नाही सदर व्यक्ती महानगरपालिकेला २५ टक्के दुकाने मोफत बांधून देणार असल्याने हा प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नसावी.

श्री. दलबिरसिंग जबिंदा : शासनाची १९९५ च्या विकास योजना आराखड्यास मंजुरी येत नाही तोपर्यंत असे प्रस्ताव मंजुरी देणे योग्य नाही.

श्री. जयवंत ओक : या जागेचे आरक्षण १९७५ पासून दाखविलेले आहे. म्हणूनच मोठमोठ्या भूखंडावर २० x ३० ची अनधिकृतपणे प्लॉटिंग होते. ती अशा प्रकारच्या ठरावामुळे होत आहे.

श्री.स.अली मिरा सलामी : बऱ्याच जागेवर आरक्षण असलेले काढण्यात आलेले आहे. जेथे आरक्षण नाही तेथे आरक्षण करण्यात आलेले आहे. शासनाची विकास

आराखड्यास मंजुरी नसतांना असे प्रस्ताव विकास आराखड्यास मंजुरी नसतांना असे प्रस्ताव मंजुर करणे योग्य नाही या अगोदर सरस्वती भूवन कॉलेज जवळ एका व्यक्तीला जागा देण्यात आली व २५ टक्के जागेवरील दुकाने दुसऱ्यांना देण्याच्या अगोदर महानगरपालिकेला देण्यात येईल असे करारझालेला असतांना अद्यापपर्यंत दुकाने महानगरपालिकेस हस्तांतर करण्यात आलेला नाही. तसेच शहानुरवाडी येथील जागेच्या संदर्भात स.सदस्यांनी आत्ताच सांगितले आता तिसरा प्रस्ताव सादर केलेला आहे. महानगरपालिकेचे हित लक्षात घ्यावयाचे नसेल तर प्रस्ताव मंजुर करावा. अशा प्रस्तावासंबंधी कुणी न्यायालयात गेले तर प्रशासन यास जबाबदार राहील व आम्ही हा प्रस्ताव मंजुर केल्यास, महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. म्हणून न्यायालयात जाणार आहोत. याची इतिवृत्ता नोंद व्हावी.

श्री. अंबादास दानवे : ही जागा एका खाजगी व्यक्तीची असून २५ टक्के जागेवरील दुकान केंद्र संबंधीत मालक बांधून देणार आहे. यात अटी व शर्ती दिलेल्या आहे. १९९५ नुसार औद्योगिक विकासासाठी आरक्षण दिले परंतु जे नागरिकरण वाढल्यानंतर आरक्षण कमी करता येते. म्हणून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता कुणी मोफत दुकाने बांधून देत असेल तर हा प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नसावी.

श्री. कदीर मौलाना : शासनाची प्रारुप विकास योजना आराखड्यास मंजुरी आलेली नसल्यास हा प्रस्ताव मंजुर करु नये. आमचा यास विरोध आहे तशी नोंद व्हावी.

श्री. शे.ईसाक, श्री.जैनोद्दीन, श्री.स.अली मिरा सलामी : शासनची विकास आराखड्यास मंजुरी नसतांना नगररचना विभागातर्फे असे प्रस्ताव कसे येतात. यात महानगरपालिकेच नुकसान होते आहे. संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली पाहिजे. या प्रस्तावास आमचा विरोध आहे.

मा.महापौर : महानगरपालिकेचे हित लक्षात घेता महानगरपालिकेला २५ टक्के दुकाने मिळणार आहे. शासनाच्या जी.आर.नुसार अधिन राहून हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

(याच वेळी आघाडीतील का स.सदस्य ठराव मंजुर केला म्हणून निषेध करतात व सभागृहाच्या बाहेर जातात व थोड्या वेळानंतर परत येतात.)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय परिपत्रक १०९४/सीआर-१४/९४/नवि-९ दिनांक ७.४.९४ चे मंजुर विकास योजनांची समावेशी आरक्षणाच्या माध्यमातुन अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये दिलेल्या निर्देशात अनुसरुन प्रस्तावित न.भू.क्र.१२८७७/अ/१ क्षेत्र २१५३ चौमी. हे मंजुर विकास योजनेत औद्योगिक वापराकरिता असून प्रस्तावित जमिन मालक २५ टक्के क्षेत्राचे भूखंड वेगळा करुन एक चटई क्षेत्र निर्देशंकानुसार दुकाने मोफत महानगरपालिकेस बांधून दिल्यानंतर प्रस्तावात नमुद केलेल्या १ ते ४ अटीस पात्र राहून सर्वानुमते मंजूरी देण्यात येते तसेच प्रारुप विकास योजना मंजूरीचा तपशिल जसे नकाशा अधिसूचना इ. महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने प्रस्तावाची पडताळणी करुन समाविष्ट आरक्षणाच्या विकास योजनेअंतर्गत वापर अनुज्ञेय झाल्यानंतर प्रस्तावाची पडताळणी करुन

या प्रकरणी पुढील विकास परवानगी देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## चर्चा

**विषय क्र ३४५/७.**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत महानगरपालिका तर्फे बांधण्यात आलेल्या व प्रस्तावित सभागृहास व व्यायाम शाळांना नांव देणे बाबत मा.आमदार श्री.शालिग्राम बसैय्ये (बंधु) विधान परिषद सदस्य यांनी त्यांचे पत्र दि.२३.११.२००० अन्वये विनंती पत्र दिले आहे व सभागृहास व व्यायाम शाळेस खालीलप्रमाणे नांवे सुचविली आहेत.

१. माजी सैनिक कॉलनी नागेश्वरवाडी - तात्यासाहेब उर्फ रंगनाथ पारगांवकर
२. मोतीकारंजा व्यायामशाळा - छत्रसाल व्यायाम शाळा
३. नक्षत्रवाडी येथील सभागृह - अहिल्याबाई होळकर सभागृह
४. मुकुंदवाडी येथील सभागृह - छत्रपती शाहू सभागृह

सदर प्रस्तावाबाबत धोरणात्मक निर्णय घेणेस्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिल्यानुसार व मा.आमदार शालिग्राम बसैय्ये (बंधु) ह्यांचे पत्रास अनुसरुन उपरोक्त सभागृहास व व्यायाम शाळांना नांवे देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ सादर.

श्री. नंदकुमार घोडेले : प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे जे सभागृह व्यायाम शाळा स्थानिक विकास निधीतुन बांधलेली असली तरी जागा महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत म्हणून अशी कार्यवाही करतांना संबंधीत नगरसेवकांना विश्वासात घेऊन करणे योग्य आहे.

मा.महापौर : यापुढे अशा प्रकारचे प्रस्ताव सादर होण्याअगोदर करावी. या विषयातील क्र.३ नक्षत्रवाडी येथील सभागृहाचे नांव देण्याबाबत स्थगित ठेवण्यात येत आहे. उर्वरीत प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नावे देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स्थानिक विकास कार्यक्रमा निधी अंतर्गत महानगरपालिका तर्फे बांधण्यात आलेल्या खालील सभागृह व व्यायाम शाळांना त्यांचे समोर दर्शविलेली नावे देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१. माजी सैनिक कॉलनी नागेश्वरवाडी - तात्यासाहेब उर्फ रंगनाथ पारगांवकर
२. मोतीकारंजा व्यायामशाळा - छत्रसाल व्यायाम शाळा
३. मुकुंदवाडी येथील सभागृह - छत्रपती शाहू सभागृह
४.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ३४६/८.**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.आमदार श्री.शालीग्राम (बंधु) यांचे निधीतुन विठ्ठलनगर येथे बांधण्यात आलेल्या सभागृहास महाराणा प्रताप सभागृह असे नाव देण्यात यावे

मा.आमदार श्री. शालिग्राम बसैय्ये बंधु यांनी लेखी पत्राद्वारे असे सुचविलेले आहे. त्यानुसार विठ्ठलनगर येथील सभागृहास 'महाराणा प्रताप सभागृह' असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव सादर.

मा.महापौर : सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.आमदार श्री. शालिग्राम बसैय्ये (बंधु) यांचे निधीतुन विठ्ठलनगर येथे बांधण्यात आलेल्या सभागृहास 'महाराणा प्रताप सभागृह' असे नाव देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>चर्चा</u>

**विषय क्र ३४७/९.**

आयुक्त, महानगरपालिक ,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, शासन परिपत्रक क्र.एएमसी/१४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि-२४, मंत्रालय मुंबई दि.२६.२.२००१ अन्वये शासनाने राज्यातील महानगरपालिकेतील नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून महानगरपालिका अंदाजपत्रकात करण्यात येत असलेल्या तरतुदीचा विनियोग योग्य असा नागरी सेवा सुविधावर व्हावा यास्तव कोणती कामे घेण्यात यावी यासंबंधी प्रपत्र 'अ' मध्ये उल्लेख केलेला असुन प्रपत्र सोबत जोडले आहे. तसेच कोणती कामे घेण्यात येऊ नयेत या संबंधी प्रपत्र 'ब' मध्ये उल्लेख केलेला आहे त्याची प्रत सुध्दा सोबत जोडली आहे. सोबतच्या प्रपत्र 'अ' मध्ये नमुद केलेली कामेच नगरसेवक स्वेच्छा निधीतुन करावयाची असुन या कामापैकी कोणती कामे आपआपल्या स्वेच्छा निधीतुन घेण्यात यावीत हे ठरविण्याचा स्वेच्छा निर्णय संबंधीत नगरसेवकांना राहील. मात्र अशा कामाची अंदाजित किंमत दोन लाख रुपयापेक्षा जास्त असता कामा नये. स्वेच्छा निधीतुन करावयाची कामे ही इतर विकास कामे ज्या विहित नियम व कार्यपध्दतीनुसार करण्यात येतात त्याच नियम व कार्यपध्दतीनुसार महानगरपालिकेतर्फे करण्यात येतील. प्रपत्र 'क' मध्ये उल्लेख केलेल्या बाबींवर खर्च मंजुर केला जाणार नाही. अशा पध्दतीने नगरसेवक स्वेच्छानिधीतुन नियमावली शासनाने तयार केलेली असुन औरंगाबाद महानगरपालिकेने यापुर्वी तयार केलेली नियमावली रद्दबातल होईल व शासनाने दिलेल्या मार्गदर्शक, तत्वानुसारच यापुढे नगरसेवक स्वेच्छानिधीची कामे प्रस्तावित करावे लागतील करिता माहितीस्तव
(सोबत शासन परिपत्रक दिनांक २६.२.२००१ ची प्रत जोडण्यात येत आहे.)

श्री. जयवंत ओक : नगरसेवकांचा स्वेच्छानिधी अनाधिकृत वसाहतीमध्ये न वापरण्याबाबतच्या शासनाचा जी.आर. आलेला आहे. परंतु मला असे निदर्शनास आणून द्यायचे की, या शहरामध्ये अनाधिकृत वसाहती जवळपास ६० आहेत. काही सरकारी जमिनीवर अतिक्रमण झालेले आहेत. या वसाहती नगरपालिका अस्तित्वात असतांना झालेल्या असून सन ८८ च्या बॉडीने

सुध्दा व आताच्या बॉडीने गेल्या वर्षीपासून अनाधिकृत वसाहतीमधे स्वेच्छानिधी खर्च केलेला आहे व आता शासनाने जी.आर.कडून स्वेच्छानिधी वापरल्यासंदर्भात आपणांस बंधन टाकलेले आहे. इतर विकास कामासाठी मनाई आहेत त्यात आताच्या जी.आर.ने भर घातलेली आहे. ज्या वसाहती झालेल्या आहेत त्या ३०,२०,१५ वर्षापुर्वीच्या आहेत. शासनाच्या जी.आर. नुसार वार्डातील विकास कामे कमी करावी.

मा.महापौर : या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनातर्फे एक नियमावली प्राप्त झालेली आहे. त्यानुसार स्वेच्छानिधी वापरावयाचा आहे. त्या नियमावलीस मंजुरी देऊन त्यात काही ॲडीशनल काय करता येईल ते आपण करणार आहेत.

श्री. जयवंत ओक : ॲडीशन हेच की, डी.नोटीफाईड एरिया तसेच अनाधिकृत वसाहतीमध्ये स्वेच्छानिधीतून कामे करण्याची परवानगी देण्यात यावी.

मा.महापौर : ज्या ज्या अनाधिकृत वसाहती आहेत त्याचे सर्वेक्षण आपण केलेले आहे व लवकरच आपणच या वसाहतीमध्ये कामे करण्याची परवानगी देणार आहोतृ

श्री. जयवंत ओक : अनाधिकृत वसाहतीमध्ये या अगोदर स्वेच्छानिधीतुन खर्च केलेला असून रस्ते, लाईट, पाणी साठी खर्च केलेला आहे. ३० ते ४० नगरसेवक डी.नोटीफाईड व अनाधिकृत वसाहती मधून निवडून आलेले आहे. कामे झाली नाही तर जनता रस्त्यावर येतील. धरणे, आंदोलने करतील.

मा.महापौर : दुरुस्तीसाठी पुन्हा शासनाचे परिपत्रक आपल्याकडे आलेले आहे. ज्या ठिकाणी अगोदर स्वेच्छानिधीतुन कामे झालेली आहे तेथे निधी वापरता येईल. आता नियमावलीस मंजुरी द्यावी.

श्री. जयवंत ओक : नियमावलीमध्ये अशी दुरुस्ती करावी की, महानगरपालिकेचा निधी, स्वेच्छानिधी, शासनाचा निधी, खासदार निधी, आमदार निधी अनाधिकृत वसाहतीमध्ये वापरता येईल. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा.महापौर : नियमावली मध्ये नियम क्र. ३४ मध्ये असे दिले की, दि.२७ जाने.२००१ पुर्वी अनाधिकृत वसाहतीमध्ये केलेल्या कामासाठी मेन्टनस खर्च म्हणून निधी वापरता येईल.

श्री. जयवंत ओक : 'ब' मध्ये दिलेले आहे की, अनाधिकृत वसाहतीमध्ये कोणत्याही स्वेच्छानिधी वापरता येणार नाही.

मा.महापौर : जे 'ब' मध्ये उल्लेख केलेला आहे. त्या अनाधिकृत वसाहतीचे आपण सर्व्हेक्षण केलेले आहे. त्याचे एकत्र पुस्तक तयार करुन शासनाच्या मंजुरीसाठी पाठवणार असून ताबडतोब मंजुरी घेणार आहे. जेणे करुन संपुर्ण वसाहतीमध्ये निधी वापरता येईल. ज्या ठिकाणी अगोदर स्वेच्छानिधीतुन विकास कामे झालेली आहे त्यावर देखभाल दुरुस्तीसाठी निधी खर्च करता येईल.

श्री. जयवंत ओक : जे जे इस्टिमेटस् तयार आहेत अंतिम मंजुरीस आहेत अशी सर्व अनाधिकृत वसाहती मधील व डी नोटीफाईड एरिया मधील विकास कामे तात्काळ करण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी नसता वार्डातील जनता रस्त्यावर येतील आंदोलने, उपोषणे, दगडफेक करतील.

श्री. प्रकाश निकाळजे : ज्या गरीब लोकांना मोठमोठे आजार होतात व त्यांची परिस्थिती गरिबीची असते म्हणून औषधोपचार करु शकत नाही त्यासाठी नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन आपण मदत करत होतो आता सुध्दा मंजुरी

देण्यात यावी तसेच ज्या थोर महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यासाठी निधी देत होतो ते बंद केलेले आहे. जयंती निमित्त निधी देण्याची सुध्दा मंजुरी देण्यात यावी तसेच मागच्या वर्षी बेरोजगारांना संगणकच्या माध्यमातुन सुशिक्षित बेरोजगारांना स्वेच्छा निधीतुन प्रशिक्षण देण्याबाबत मंजुरी दिलेली होती त्याच प्रमाणे वाहन चालक, असे प्रशिक्षण स्वेच्छानिधीतुन देण्याची परवानगी देण्यात यावी.

मा.महापौर : नियमावलीप्रमाणे आपणांस कार्यवाही करावी लागणार आहे. परंतु या अगोदर आपण ज्या गरिब नागरिकांस मोठा आजार आहे किंवा राष्ट्रीय पुरुषांच्या जयंती निमित्त खर्च करतो तसेच गोरगरीब विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण वाहनचालक प्रशिक्षण टंकलेखन प्रशिक्षण देण्यासाठी ही स्वेच्छानिधीतुन खर्च करता येईल. अशी मंजुरी घ्यावी लागणार असून शासनाची मंजुरी आल्यानंतर पैसे खर्च करता येईल. स्वेच्छानिधी खर्च करण्यासाठी शासनाकडून तात्काळ मंजुरी आणण्यासाठी विशेषतः सभापती, विरोधी पक्ष नेता यांनी प्रयत्न करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन परिपत्रक क्र.ए.एम.सी./१४२००/२२६४/प्र.क्र. १४४/नवि-२४, दिनांक २६.२.२००१ चे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई कडील परिपत्रकासोबत महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छानिधीमधून करावयाची कामे मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट 'अ' व 'ब' यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

तसेच विद्यमान स्वेच्छानिधी नियमावलीतील विशिष्ट आजारासाठी रुग्णांस आर्थिक मदत करणे गरजु गोरगरिब विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण वाहन चालक प्रशिक्षण, टंकलेखन प्रशिक्षण देणे, राष्ट्रीय पुरुषांच्या जयंती निमित्त अनुज्ञेय होणार कामे करण्यास मंजुरी देण्यात येते, परंतु शासनाकडून यास मंजुरी मिळाल्यानंतर यासाठी स्वेच्छानिधीतून खर्च करता येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# चर्चा

**विषय क्र. ३४८/१० :**

उपसंचालक नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, न.भु.क्र.९२३३/१ व ९२३३/२ चे मालक श्री. गुलाबराव देशमुख यांनी सदर जमिनी संबंधाने शासनास मु.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सूचना बजावलेली अहे. सदर खरेदी सुचना शासनाने कायम केलेली आहे. सदर मिळकती आरक्षण क्र.३४ 'माध्यमिक शाळा' या आरक्षणाने बाधीत आहे. बजावलेली अधिसूचना शासनाने कायम केलेली असल्याने भूसंपादन कार्यवाही सुरु होणे आवश्यक आहे.

तसेच उक्त परिसरातील महानगरपालिकाची उर्दू व मराठीची जिन्सी शाळा ही विकास योजनाच्या १०० फुट व ५० फुट रुंद रस्त्याने बाधीत आहे. या रस्त्यांची भूसंपादन कार्यवाही सुरु आहे. करिता शाळेसाठी पर्यायी जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे.

जिन्सी परिसरातील आरक्षण क्रमांक ३३ 'ए.एम.सी.परपज' आरक्षण क्रमांक ३४ ''हायस्कूल' व आरक्षण क्रमांक ३५ ''क्रिडांगण'' ही एकमेकांना पुरक आरक्षणे आहेत.

प्रस्ताव मंजूरीनंतर भूसंपादन कार्यवाही मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

करिता संबंधितांनी बजावलेल्या अधिसूचनेतील मिळकतिीसह संपूर्ण आरक्षण क्रमांक ३३,३४ व ३५ खालील जमीन क्षेत्र भूसंपादनाचे मंजुरीस्तव सादर. प्रस्ताव मंजुरीनंतर भूसंपादन कार्यवाही मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात येईल.

प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

श्री. जयवंत ओक : जागा कोठे काय माहिती द्यावी. शाळेसाठी जागा घेणार महानगरपालिका किती रक्कम देणार आहे.

श्री. गणेश तांबे : जातीचा दावा करुन ज्या स.सदस्यांनी निवडणुकीत भाग घेऊन निवडून आलेले आहे. अशा स.सदस्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द ठरविले त्याची माहिती मागविली होती अद्याप माहिती मिळालेली नाही.

मा.महापौर : हा विषय या सभागृहाचा नाही विषय क्र.१० वर बोलावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : स.सदस्यांनी हा विषय चर्चेच्या वेळी बोलावयास पाहिजे होता जे जातीचे प्रमाणपत्र विषयी न्यायालयात प्रकरण चालु आहे. ते न्यायालयाच्या अधिन राहून त्यावर कार्यवाही होणार आहे.

मा.महापौर : ज्यावेळी चर्चा चालू होती त्यावेळेस हा विषय उपस्थित करावयास पाहिजे होता. आता विषय क्र.१० वर बोलावे.

श्री. अशरफ मोतिवाला : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जागा घेणे अत्यंत जरुरी आहे. कारण जिन्सी येथील शाळेची जागा ही ८० फुट रस्त्याने बाधीत आहे भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. जर कार्यवाही झाल्यास ६०० ते ७०० विद्यार्थ्यांना त्रास होईल. त्यासाठी पर्यायी जागा घेणे गरजेचे आहे. म्हणून हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे व पुढील कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवण्यात येत आहे. आता पुरवणी विषय क्र.१ वर बोलावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.३४ 'माध्यमिक शाळा' ते बाधीत असलेली मिळकत न.भू.क्र.९२३३/१ व ९२३३/२ चे मिळकत धारकांनी मु.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये दिलेली खरेदी सुचना शासनाने कायम केलेली आहे. त्यामुळे आणि जिन्सी येथील उर्दू व मराठीची शाळा ही १०० फुट व ५० फुट रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून या रस्त्याची भूसंपादनाची कार्यवाही चालू असल्याकारणाने व शाळेसाठी पर्यायी जागा उपलब्ध होणे गरजेचे असल्याने जिन्सी परिसरातील आरक्षण क्र.३३ 'ए.एम.सी. परपज आरक्षण क्र.३४ 'हायस्कुल' व आरक्षण क्र.३५ 'क्रीडांगण' या आरक्षणाने बाधीत होणाऱ्या संपुर्ण मिळकतीचे भूसंपादन करण्यास येणाऱ्या संभाव्य खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच सदर प्रस्ताव भूसंपादनासाठी म.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. ३४९/१**

वार्ड क्र.३४ कोटला कॉलनी येथे महानगरपालिकेचा हॉल आहे. या भागात एक वाचनालय असावे अशी तेथील नागरिकांची इच्छा आहे. 'जनकल्याण समिती' ही संस्था देशातील राष्ट्रीय स्तरावरील काम करणारी एक अग्रगण्य सेवा भावी संस्था आहे. तरी ह्या संस्थेस वरील हॉल वाचनालयाकरिता भाडे तत्वावर देण्यात यावा.

सुचक : सौ. विजया किशोर रहाटकर
अनुमोदक : श्रीमती पार्वताबाई मानकापे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.३४ कोटला कॉलनी येथील महानगरपालिकेचा हॉल 'जनकल्याण समिती' ह्या अग्रगण्य सेवाभावी संस्थेस भाडेतत्वावर वाचनालयाकरिता देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५०/२ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत वार्ड क्र.४६ मध्ये महानगरपालिका पाणी टाकीजवळ सुमारे ३ (तीन) एकर जमीन महानगरपालिकेची मोकळी पडलेली आहे. त्या जागेत सध्या लायब्ररी बांधण्यासाठी महानगरपालिकेतर्फे टेण्डर काढण्यात आलेले आहे. त्याच जमीनीवर महानगरपालिकातर्फे ऊर्दू व मराठी माध्यमासाठी शाळेची इमारत बांधण्यात यावे कारण सदरील वार्डात कोणतेही प्रकारचे शाळा नाही या ठिकाणी महानगरपालिकाची जागा ही उपलब्ध आहे. म्हणून शाळा इमारत बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेस मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. नुसरत बानो फिरोज खान
अनुमोदक : श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.४६ मधील महानगरपालिकेच्या पाणी टाकी जवळील सुमारे ३ (तीन) एकर मोकळ्या जमिनीवर महानगरपालिकेतर्फे बांधण्यात येणाऱ्या लायब्ररी लगतच्या जागेवर महानगरपालिकेतर्फे ऊर्दू व मराठी माध्यमासाठी शाळा इमारत बांधण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## चर्चा

**विषय क्र ३५१/३.**

शहरात पत्रकार बंधुसाठी जागा उपलब्ध नाही ज्यामुळे पत्रकार परिषद घ्यावयाची झाल्यास विविध ठिकाणी आयोजन करण्यात येते. तथापि पत्रकार भवनाची इमारत पुर्ण झालेली नसल्यामुळे व मित्रनगर येथील सभागृह हे आमदार बसैय्ये बंधुच्या निधीमधून बांधलेले असल्यामुळे दर्पण पत्रकार संघास ही जागा उपलब्ध करुन द्यावी. अशी विनंती

त्यांनी केलेली आहे. तरी कृपया मित्रनगर/सन्मीत्र कॉलनी येथील सभागृह दर्पण पत्रकार संघ यांना देणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ

**चर्चा :**

श्री. अंबादास दानवे : सन्मीत्र कॉलनीची जागा देण्यात यावी.
मा.महापौर : सन्मीत्र कॉलनी येथील जागा देण्यात मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर्पण पत्रकार संघ यांना सन्मीत्र कॉलनी येथील सभागृहाची जागा देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५२/४**

कोकणवाडी भागातील जय टॉवर समोरील चौकात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' यांचा पुतळा उभारण बाबत या प्रभागामधील रहिवाशांनी मागणी केलेली आहे. अहिल्यादेवी होळकर यांना पुतळा या चौकात उभारणे बाबत विविध सेवाभावी संघटनांनी तसेच पक्ष कार्यकर्त्यांनी सुध्दा मागणी केलेली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अविस्मरणीय कार्य लोकप्रियता व सामाजिक कार्य विचारात घेता नागरिकांची मागणी विचारात घेऊन व लोक भावनेचा आदर राखून कोकणवाडी येथील जय टॉवर समोरील चौकात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' भव्य पुतळा उभारुन सदर चौकाचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरण करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. संजय शिरसाट, श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. विकास जैन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी येथील जय टॉवर समोरील चौकात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' यांचा भव्य पुतळा उभारणेस व चौकाचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरण करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ३५३/५.**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. १७ गारखेडा येथील जवाहर नगर पोलिस स्टेशन ते हॉटेल अभिरुची पर्यंत नाला असुन त्यात संरक्षण भिंत नसल्याने कोणतीही अप्रिय घटना होऊ शकते म्हणून तेथे संरक्षण भिंत बांधून वली मामु दर्गा जगल हनुमान नगरकडे जाणाऱ्या रोडवर बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शेख शकील पटेल
अनुमोदक : सौ.शाहीन जफर, श्री. शेख ईसाक शे.जैनोद्दीन

**चर्चा :**

श्रीमती आशा बिनवडे : प्रस्ताव चांगला असून यात दर्शविलेला नाला हा संबंधीत नगरसेवकांच्या वार्डातुन जात असून पुढे माझ्या वार्डातून म्हणजे जवाहर

कॉलनीमधून तसेच पुढे स.सदस्या सौ. लोखंडे यांचे वार्डतुनही जात आहे. आणि मागच्या बाजूचे जय विश्वभारती कॉलनी अणि ज्योतीनगर मधून सुध्दा जात आहे तरतुद असेल तर संपुर्ण नाल्याची संरक्षित भिंत बांधण्यात यावी.

मा.महापौर : स.सदस्या श्रीमती बिनवडे यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे तरतुद असेल तर या नाल्यास संरक्षित भिंत बांधण्यासाठी कार्यवाही व्हावी. हा विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१७ गारखेडा येथील जवाहर नगर पोलिस स्टेशन ते हॉटेल अभिरुची हॉटेल पर्यंत असलेल्या नाल्यावर संरक्षित भिंत बांधणेस व मामु दर्गाजवळ हनुमान नगर कडे जाणाऱ्या रोडवर पुल बांधणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच या कामासाठी तरतुद उपलब्ध असेल तर हा नाला जवाहर कॉलनी ते जयविश्वभारती कॉलनी व लगतच्या परिसरातुन जातो तेथे देखिल संरक्षित भिंत बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५४/६**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.१७ गारखेडा, येथील प्रिय दर्शनी इंदिरा नगर येथील महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असून ते दोन्ही पुतळे उघड्यावर असून त्याला कसल्याही प्रकारचे संरक्षित भिंत किंवा छत नसल्याने त्या दोनही ठिकाणी संरक्षण भिंत बांधून त्यावर छत (स्लॅब) टाकण्याचा प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शेख शकील पटेल
अनुमोदक : सौ.शाहीन जफर, श्री.शेख इसाक शेख जैनोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१७ गारखेडा येथील मो.प्रियदर्शनी इंदिरा नगर येथील महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास संरक्षक भिंत व त्यावर छत (स्लॅब) टाकण्याचे काम स्वेच्छा निधीतुन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५५/६ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.१७ येथील गारखेडा गावाला लागून मस्जीदच्या बाजूला सर्वे नं.५७ मधील महानगरपालिकेची ओपन स्पेस येथे सार्वजनिक लायब्ररी व हेल्थ क्लब यासाठी जागा ओपन स्पेसचा वापर करण्यात यावा व त्वरीत नागरिकांच्या सुविधासाठी लायब्ररी व हेल्थ क्लब बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शकील पटेल
अनुमोदक : श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
श्री. अशरफ मोतीवाला

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रथम क्र.१७ गारखेडा गावाला लागून मस्जिदच्या बाजुला सर्व्हे नं.५७ मधील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेवर महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक लायब्ररी व हेल्थ क्लब बांधणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५६/७ :**

समर्थ नगर भागातील न्यु समर्थ नगर येथील मुख्य रस्ता लागत महानगरपालिकेची खुली जागा असून सदर जागेवर 'नेताजी सुभाषचंद्र बोस' यांचा पुर्णाकृती भव्य पुतळा उभारणे बाबत प्रभागातील नागरिकांनी मागणी केली आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग-त्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी दिलेले योगदान तसेच त्यांचे ज्वलंत विचारांचे भावी पिढीला स्मरण राहावे व त्यांची प्रेरणा मिळावी यासाठी महापुरुषाच्या पुतळा महानगरपालिका हद्दीत कुठेही अद्याप बसविलेला नसल्यामुळे या खुल्या जागेवर बसविण्यास त्यांचे महानगरपालिकेस मिळेल. 'नेताजी सुभाषचंद्र बोस' यंचा भव्य पुर्णाकृती पुतळा सदर जागी उभारण तसेच पुतळ्याच्या परिसराचे सौदर्यीकरण तथा सुशोभीकरण करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे,
श्री. भाऊसाहेब वाघ,
श्री. किशोर तुळशिबागवाले

## चर्चा

श्री. जयवंत ओक : एक अभिनंदनाचा ठराव पास करावा हिंदुस्थानच्या संघामध्ये हरभजनसिंग यांनी हॅट्ट्रीक केलेली आहे. तसेच क्रिकेटपटू श्री. व्ही.व्ही.एन लक्ष्मण याने ३०० धावा पुर्ण केलेल्या आहे. तसेच श्री. गोपीचंद यांनी बॅडमिंटन स्पर्धेत विजेते पद प्राप्त केलेले आहे. आपल्या देशाचे नाव वाढवले आहे. म्हणून या सर्वाचा अभिनंदनाचा ठराव पास करावा

श्री. जगदिश सिध्द : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु समर्थनगर येथील मुख्य रस्त्यालगत असलेल्या महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर 'नेताजी सुभाषचंद्र बोस' यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा उभारणेस व पुतळ्याच्या परिसराचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरण करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ३५८/२ .**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, १) कासारीबाजार चौकास सत्य अहिंसा चौक व कासारी बजा रस्त्यास सत्य अहिंसा मार्ग असे नामकरण करण्यात यावे. २) किराणाचावडी चौकात श्री. भगवान शांतीनाथ मार्ग तसेच ३) कुंभारवाडा रस्त्यास आनंद ऋषिजी मार्ग असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक : श्री. विकास जैन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कासारीबाजार चौकास सत्य अहिंसा चौक व कासारी बाजार रस्त्यास सत्य अहिंसा मर्ग असे नामकरण करण्यात यावे व किराणा चावडी चौकास श्री. भगवान शांतीनाथ चौक व किराणाचावडी रस्त्यास श्री. भगवान शांतीनाथ मार्ग तसेच कुंभारवाडा रस्त्यास आनंद ऋषिजी मार्ग असे नामकरण करण्याच्या प्रस्तावास याच सभेत स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलिस कमिशनर कार्यालय औरंगाबाद यांचेतर्फे औरंगाबाद शहरामध्ये दिनांक २६ फेब्रुवारी २००१ ते ३ मार्च २००१ या कालावधीमधे '४९ वी ऑफ इंडिया पोलिस क्रॉस कन्ट्री चॅम्पीयनशिप-२०००' ही स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धेमध्ये संपुर्ण देशामधील स्पर्धक भाग घेणार आहेत. स्पर्धा आयोजनासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च अपेक्षित आहे. औरंगाबाद शहरामध्ये अशा प्रकारच्या स्पर्धेचे पोलिस आयुक्तांलयमार्फत करण्यात आलेल्या आयोजनामुळे शहराचे नाव भारताचे कानाकोपऱ्यात नावलौकिक होणार आहे. या स्पर्धेसाठी महानगरपालिकेतर्फे सहाय्य देण्यात यावे. तरी ऑल इंडिया पोलिस क्रॉस कंट्री चॅम्पीयनशिप-२००० या स्पर्धेसाठी १ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री. अशरफ युनुस मोतिवाला,
श्री. काशिनाथ कोकाटे
अनुमोदक : श्री. सुदाम सोनवणे
श्री. अंबादास दानवे
श्री. अफसर खान यासीन खाँ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २६ फेब्रुवारी २००१ ते ३ मार्च २००१ पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या '४९ वी ऑल इंडिया पोलिस क्रॉस कंट्री चॅम्पीयनशिप-२०००' या स्पर्धेकरिता महानगरपालिकेतर्फे रु.१ लाख ५० हजार रुपयाची आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर 'जन गण मन' या राष्ट्रगीताने सभा संपलचे मा.महापौर यांनी घोषित केले

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १६.४.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**सोमवार दिनांक १६.४.२००१ रोजी मा.महापौर श्री.डॉ.भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात सकाळी ११.०० वाजता वंदे मातरम् गीताने सुरुवात झाली.**
**या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

१. स.स. श्री. अशरफ मोतीवाला
२. स.स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३. स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
४. स.स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५. स.स. श्री. लांबे गणेश रामचंद्र
६. स.स. सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
७. स.स.श्री. शे.इलियास किरमानी शे.ऊमर
८. स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९. स.स.श्रीमती शकुंतला सांडुजी इंगळे
१०. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
११. स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१२. स.स.श्री.कान्हे साहेबराव राणुबा
१३. स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४. स.स.श्री. मंदाबाई प्रभाकर पवार
१५. स.स.श्री.घायातिलक लिलावती बाळासाहेब
१६. स.स.श्री.जगताप मोतिलाल रघुनाथ
१७. स.स.सौ.शिंदे रुख्मिणी राधाकिसन
१८. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोखंडे
२०. स.स.श्री.शे.शकील पटेल शे.बुढन पटेल
२१. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे
२२. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२३. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२४. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
२५. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२६. स.स.सौ.ॲड.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२७. स.स.श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२८. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२९. स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
३०. स.स.श्री.घोडले नंदकुमार राधाकिसन
३१. स.स.श्री.अय्युब खान सरदार खान
३२. स.स.श्री.अ.रशिद अ.सत्तार
३३. स.स.श्री.जैन विकास रतनलाल

३४. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
३५. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडुरंग
३६. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३७. स.स.सौ.रशिदा बेगम गफ्फार चारखान
३८. स.स.श्री.वडागळे सुनिल बुथवेल
३९. स.स.श्री.शिंदे किशोर रावसाहेब
४०. स.स.श्री.स.मुमताज अली मोज्जम अली
४१. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
४२. स.स.श्री.नासेर खान सरदार खान
४३. स.स.श्री.थोरात दत्तात्रय रामराव
४४. स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४५. स.स.सौ.खरात कुसुमबाई दौलत
४६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४७. स.स.सौ.नुसरत बानो फिरोज खान
४८. स.स.श्री.तायडे पांडुरंग यशवंतराव
४९. स.स.सौ.जयश्री कुमारराव मोरे
५०. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
५१. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
५२. स.स.श्री.सुरगोनीवार नारायण चंद्रय्या
५३. स.स.सौ.राजपुत विमलाबाई भिकनसिंग
५४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५५. स.स.श्री.अ.कदीर मौलाना सय्यद
५६. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजुरकर
५७. स.स.श्री.गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५८. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५९. स.स.श्री.नसीर खान अ.रहेमान खान कुरैशी
६०. स.स.सौ.शाहीन जफर महमुद जफर
६१. स.स.दाणे चंद्रभागाबाई भागिरथ
६२. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
६३. स.स.श्री.स.सलिम स.युसुफ
६४. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
६५. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहेमद
६६. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
६७. स.स.सौ.नफिशुन्नीस बेगम हबीब खाँ
६८. स.स.श्री.शेख ईसाक शेख जैनोद्दीन
६९. स.स.श्री.अफसर खान यासीन खान
७०. स.स.सौ.सुलताना बेगम चाँदखाँ
७१. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
७२. स.स.श्री.शे.मुनाफ शे.यासीन
७३. स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
७४. स.स.श्री.कैसरखॉन बद्रोद्दीन खॉन
७५. स.स.श्री.तुळशिबागवाले किशोर बाबुलाल

७६. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७७. स.स.सौ.बबीता सुभाष कागडा
७८. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
७९. स.स.श्री.तनवानी किशनचंद लेखराज
८०. स.स.सौ.निखत परवीन ईआन अली
८१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर

## ***<u>स्विकृत सदस्यछ</u>***

१. स.स.श्री.भगवान देविदास घडामोडे
२. स.स.श्री.खुगर सुरजितसिंग तिलकराज
३. स.स.सौ.सलमा बानो मीर मो.अली

श्री. राधाकृष्ण गायकवाड : राष्ट्रातील विविध क्षेत्रातील व्यक्तींना 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन गौरविण्यात आले. उस्ताद अमजद अली शहनाई वादक उस्ताद बिसमिल्ला खॉन अशा सर्व एकुण ४५ नामवंत व्यक्तीचे सभागृहातर्फे अभिनंदन करावे.

श्री. सुदाम सोनवणे : स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड यांनी सूचना केल्यानुसार यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : अभिनंदनास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये स्थायी समितीच्या आठ (८) सदस्यांची निवड करणे.

**चर्चा :**

मा.महापौर : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये स्थायी समिती सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक ३.४.२००१ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५ व ४७ अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यात आला त्यानुसार दिनांक ३ एप्रिल २००१ ते ९ एप्रिल २००१ पर्यंत नामनिर्देशित पत्र वाटप करणे व स्विकारणे कार्यवाही पुर्ण झाली असुन दिनांक ९ एप्रिल २००१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सदस्य पत्रासाठी खालील प्रमाणे २७ उमेदवारांची नामनिर्द्शन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावली नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात झाली असून खालील सर्व उमेदवारांचे नामनिर्देशित पत्र वैध ठरलेले आहेत.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नाव | सुचकांचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ४१ | श्री. नासेरखॉन सरदार खॉन | सौ.मुमताज अली स.मोज्जम अली | सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन |

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नाव | सुचकांचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| २ | ६९ | श्री. मीर हिदायत अली मीर वसालत अली | श्री. अशरफ युनुस मोतिवाला | श्री. तकीहसन कासीन हसन खॉन |
| ३ | १७ | श्री. शेख शकील बुढन पटेल | १. श्री.अशरफ युनुस मोतिवाला<br>२. सौ.खरात कुसुम दौलत | १. श्री.तुळशिबागवाले किशारे बाबुलाल<br>२. श्री. तुळशिबागवाले किशोर बाबुलाल |
| ४ | ७१ | श्री.शेख ईसाक शेख जैनोद्दीन | १. श्री.सलिम पटेल समशेर पटेल<br>२. श्री.सलिम पटेल समशेर पटेल | १. सौ.दाणे चंद्रभागाबाई भागीरथ<br>२. श्री.तुळशिबागवाले किशोर बाबुलाल |
| ५ | ७२ | श्री. अफसरखॉन यासीनखॉन | सौ. चंद्रभागाबाई भगीरथ दाणे<br>श्री. सलिम पटेल समशेर पटेल | श्री. सलिम पटेल समशेर पटेल<br>सौ.दाणे चंद्रभागाबाई भगीरथ |
| ६ | २७ | श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | श्री. साळवे माणिक लक्ष्मण<br>श्री. सलिम पटेल समशेर पटेल | सौ.दाणे चंद्रभागाबाई भगीरथ<br>श्री.साळवे माणिक लक्ष्मण |
| ७ | ०७ | श्री. रगडे भगवान दगडूजी | सौ.खरात कुसुम दौलत<br>सौ.खरात कुसुम दौलत<br>सौ.दाणे चंद्रभागाबाई भगीरथ | सौ.इंगळे शकुंतलाबाई सांडूजी<br>सौ.इंगळे शंकुंतलाबाई सांडूजी<br>सौ.इंगळे शंकुंतलाबाई सांडूजी |
| ८ | ६८ | श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहेमद | श्री. तुळशिबागवाले बाबुलाल | श्री. सलिम पटेल समशेर पटेल |
| ९ | ५५ | श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद | श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | सौ.नुशरतबनो फिरोजखान |
| १० | ८३ | सौ.निखत परवीन ईजाज अली | श्री. अशरफ मोतिवाला | श्री. सय्यद अली सलामी<br>स.मिरा सलमी |
| ११ | ४० | श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | श्री. कोकाटे कशिनाथ हरीभाऊ |
| १२ | ३८ | श्री. शिंदे किशोर रावसाहेब | श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ | सौ.साजेद बेगम विखार अहेमद<br>सौ.शाहीन जफर व महमद जफर<br>श्री. शेख ईसाक जैनोद्दीन शेख |
| १३ | ४७ | श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव | श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | श्री. अशरफ मोतिवाला |
| १४ | ३० | श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार | सौ.छायातिलक लिलावती भाऊसाहेब | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| १५ | ६१ | श्री. नासिरखॉंन रहेमनखॉन कुरेशी | श्री. वाणी ठगुजी रामसिंग | श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ |
| १६ | ०५ | श्री. औताडे रावसाहेब ममतु पाटील | श्री. तुळशिबगवाले किशोर बाबुलाल | श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ |
| १७ | ४८ | सौ.मेरे जयश्री कुमारराव | सौ.जयश्री विजय कुलकर्णी | श्रीमती जयश्री सारंग किवळेकर |
| १८ | ०४ | श्री.शे.इलियास किरमाणी शे.ऊमर | श्री. सय्यद अली सलामी<br>स.मिरा सलामी<br>श्री. कैसरखान बद्रोद्दीन खॉन | श्री. शेख मुनाफ शेख यासीन<br>श्री. सलीम स.युसुन |
| १९ | ६५ | श्री. ओक जयवंत केशवराव | श्री. जैन विकास रतनलाल<br>श्री. लकडे भरत श्रीपती | श्री. थोरात दत्तात्रय उर्फ बाबासाहेब रामराव<br>श्री.थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव |
| २० | ५० | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | श्री. सिरसाठ संजय पांडुरंग<br>श्री. वडागळे सुनिल बुथवेल | श्री. अंबादास एकनाथराव दानवे<br>श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| २१ | २८ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | श्री. वडागळे सुनिल बुथवेल | श्री. गााकवाड राधाकृष्ण राजाराम |
| २२ | ३५ | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | श्री. अंबादास एकनाथराव दानवे | श्री. सिरसाठ संजय पांडुरंग |

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नाव | सुचकांचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| २३ | ५९ | सौ.संगिता बाळू मैंद | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक<br>श्रीमत मानकापे पार्वत लहानु | सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे<br>सौ.बबिता सुभाष कागडा |
| २४ | २१ | सौ.साधना गणेश सुरडक | सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे<br>सौ.कुलकर्णी जयश्री विजय | श्री. सावंत मधुक दामोधर<br>श्रीमती किवळेक जयरी सारंग |
| २५ | ५४ | श्री. देसरडा प्रशांत सुभाष | सौ.बबित सुभाष कागडा<br>श्री.सावंत मधुकर दामोधर | सौ.विजय किशोर रहाटकर<br>श्री. कावडे साहेबराव राणुबा |
| २६ | १८ | डॉ.आशा उत्तम बिनवडे | सौ.विजया किशोर रहाटकर<br>श्रीमती मानकापे पार्वती लहानु | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक<br>सौ.कुलकर्णी जयश्री विजय<br>श्रीमत किवळेकर जयश्री सारंग |
| २७ | ०८ | श्री. शिंदे राजु रामराव | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग |

मा.महापौर : वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेत यईल.

सभेत सूचक किंवा अनुमोदक यापैक एकदा उपस्थित नसेल तर इच्छुकाला दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्याच्या संमतने ३० मिनिटाच्या अवधित म्हणजेच १२.३५ वाजेपर्यंत आपले नाव परत घेता येईल. तरि कृपया ज्यांना स्थायी समिती सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे त्यांना आपले नांवे ०२.३५ वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर स्थायी समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वानुमते नोंद घ्यावी.

श्री. अविनाश कुमावत : वेळ संपलेले आहे.

मा.महापौर : दुपारचे १२.३५ वाजले असून नामनिर्देशन पत्र परत घेण्याची वेळ संपलेली आह. स्थायी समिती सदस्य पदासाठी २७ खालीलप्रमाणे १४ उमेदवारांची आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवारी परत घेणाऱ्यांनी नांवे** |
|---|---|
| १ | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| २ | श्री. शेख ईसाक जैनोद्दीन शेख |
| ३ | श्री. गाजी सापोद्दीन गाजी जहिर अहेमद |
| ४ | श्री. अफसरखाँ यासिन खाँ |
| ५ | श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव |
| ६ | श्री. नासेरखाँ अब्दुल रहेमानखाँ कुरैशी |
| ७ | श्री. शेख शकिल शेख बुटन पटेल |
| ८ | श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार |
| ९ | श्री. शिंदे राजु रामराम |
| १० | सौ.संगिता बाळु मैंद |
| ११ | सौ.साधना गणेश सुरडकर |
| १२ | श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव |
| १३ | श्री. नासेरखॉन सरदारखॉन |
| १४ | सौ.निखत परवीन ईजान अली |

आता स्थायी समिती सदस्य निवडणुकीसाठी खालीलप्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांची नावे |
|---|---|
| १ | श्री. मिर हिदायम अली मिर बसालत अली |
| २ | श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे |
| ३ | श्री. भगवान दगडूजी रगडे |
| ४ | श्री. अब्दुल कदिर मौलाना सय्यद |
| ५ | श्री. किशोर रावसाहेब शिंदे |
| ६ | श्री. औताडे रावसाहेब ममतु पाटील |
| ७ | सौ.जयश्री कुमारराव मोरे |
| ८ | श्री.शेख इलियास किरमाणी शेख ऊमर |
| ९ | श्री. जयवंत केशवराव ओक |
| १० | श्री. नंदकुमार माधवराव फुलारी |
| ११ | श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले |
| १२ | श्री. प्रशांत सुभाष देसरडा |
| १३ | श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे |

मा.महापौर : मतदानाबाबत गोपनियता पाळत यावी म्हणून मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्या येईल. तसेच स्थळप्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका सव्वा तासात तयार होतील व मतदानाला सुमारे २.१५ वाजता सुरुवात होईल तरी मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांनी सव्वा तासात मतपत्रिका तयार करुन घ्यावी व त्यानंतर नगरसचिव यांनी सर्व स.सदस्यांच्या माहितीसाठी नमुना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

मा.महापौर (पिठासीन अधिकारी) : मतपेटी जवळ नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी आल्याचे सभागृहात दाखवून द्यावे व मतपेटी मोहोर बंद करुन घ्यावी. (पिठासिन अधिकारी स्वतःच्या सहीने मतपेटी मोहोरबंद करुन घेतील.)

सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरिता एखाद्या सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स.सभासदांनी कृपया गर्दी करु नये.

नगरसचिव यांनी कृपया मतदाना संबंधीत सुचन सभागृहाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

नगरसचिव :

१. मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स.सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.

२. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

३. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा.पिठासन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

४. नियम क्र.६२ प्रमाणे जितक्या जागा भरावयाच्या असतील तितकी मते देण्याचे प्रत्येक सभासदाला अधिकार आहे. आता (आठ) ८ स्थायी समिती सदस्य पदासाठी निवडणुक होत असल्यामुळे प्रत्येक सदस्यांना ८ मते देण्याचा अधिकार आहे मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजूला ज्या इच्छुकाला मते द्यावयाची असतील त्यांच्या नावासमोर गुणाकाराची (x) फुली करावी. तसेच सदरची मते एकाच उमेदवारास किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारास आपल्या इच्छेनुसार देता येतील. मात्र ८ पेक्षा जास्त मते देवू नयेत.

५. सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र.४५ (जे) मधील तरतुदी नुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैध समजली जाईल.

१. जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नाव किंवा शब्द लिहला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खूण केलेले असेल अथवा

२. जी छिद्रांकित (परफोरटेड) नसेल अथवा

३. जीच्यावर मत नोंदविले नसेल अथवा

४. जी संदिग्धतेमुळे निरुपयोगी आहे.

श्री. अविनाश कुमावत : मतदानाच्या बाबतीत मागील वेळेस मी सूचना केलेली होती त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. मतदान प्रक्रियावर मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही व्हावी. मा.उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

मा.महापौर (पीठासन अधिकारी) : सभागृहात मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून पुढील बैठकीनंतर अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री. अविनाश कुमावत : माझ्या सुचनेप्रमाणे प्रशासन कार्यवाही करीत नाही त्या घटनेचा निषेध म्हणून मी सभात्याग करीत आहे.

(वेळ २.४० वा.)

मा.महापौर (पीठासन अधिकारी) : नमुना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यांत आलेला आहे.

आता मतदानाल सुरुवात होत आहे. प्रभागनिहाय स.सभासदांची नांवे पुकारण्यात येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी एक तासांचा कालावधी देण्यात येत असून सभागृहातील घड्याळाप्रमाणे आता २.४० वाजले असून मतदान ३.४० वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर स्थायी समिती सदस्य पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स.सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेल व सुरळीतपणे पार पाडण्यांस सहकार्य करावे. अशी सर्वांना विनंती आहे.

मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतुदी प्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा-नस-२७८-२०००-दिनांक १०.४.२००१ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यात येत असून सदर आदेशाद्वारे ज्यांना ज्यांना जी कामे नेमून देण्यात आलेली आहेत त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावीत.

जनसंपर्क अधिकारी : मतदान प्रक्रियेसाठी स.नगरसेवकांचे वार्डनिहाय नांवे पुकारतात.

मा.महापौर (पीठासन अधिकारी) : स.सदस्य श्री. दत्तात्रय थोरात वार्ड क्र.४२ व सुनिल वडागळे वार्ड क्र.३७ यांनी विनंती अर्ज दिलेला आहे. यानुसार त्यांना अगोदर मतदान करण्यास अनुमती देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी : वार्ड क्र.४२ ते ३७ चे सदस्य मतदान करतात. याच वेळेस सभागृहात प्रवेश करतात. वार्ड क्र.१,२,३,४,५,६,७,८,९,१० यांनी मतदान केले. वार्ड क्र.५७ चे स.स.श्री.मोतिवाला यांनी विनंती केल्यानुसार त्यांना अगोदर मतदान करण्याची परवानगी पिठासन अधिकारी यांनी दिल्याने ते मतदानात भाग घेऊन मतदान करुन गेले. वार्ड क्र. ११,१२,१३ यांनी मतदान केले तर वार्ड क्र.१४ चे स.सदस्य यांचे विनंतीवरुन मतदान करतेवेळी मदतीची लेखी मागणी केली त्यानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सहकार्य केले. वार्ड क्र.१६ चे सदस्य यांनी लेखी विनंती केल्यानुसार त्यांना उपआयुक्त (प्र) यांनी मदत केली व मतदान केले वार्ड क्र.१७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२ व ३३ चे सदस्यांनी मतदान केले. तर वार्ड क्र. ४६ चे सदस्यांनी अगोदर मतदान केले. वार्ड क्र. ४६ चे सदस्यांनी अगोदर मतदान केले. वार्ड क्र.३५, ३६, ३८, ३९, ४० यांनी मतदान केले तर वार्ड क्र. ४१ चे सदस्यांनी त्यांचे विनंती अर्जानुसार त्यांना मतदानासाठी मदत म्हणून श्री. मुळे लघुटंकलेखक यांना सहकार्य करणेस सांगितले. त्यानुसार मतदान केले वार्ड क्र. ४३, ४४, ४५, ४७, ४८, ४९, ५०, ५२ चे सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र.५३ चे स.सदस्यांनी त्यांचे लेखी विनंती अर्जानुसार मतदानासाठी मदत म्हणून मुख्य लेखा परिक्षक यांना सहकार्य करणेस सांगितले. त्यानुसार मतदान केले. वार्ड क्र. ५४, ५५, ५६ व ५८ चे स.सदस्यांनी मतदान केले. तर वार्ड क्र.५९, ६०, ६१, ६२, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९ चे सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र. ८० चे स.स.चे लेखी विनंती अर्जानुसार सहा.आयुक्त-१ यांना मतदानासाठी झाले. तर वार्ड क्र.८१, ८२ चे सदस्यांनी मतदान केले व वार्ड क्र.८३ चे स.सदस्यांचे विनंती अर्जानुसार त्यांनला मतदानासाठी मदत म्हणून कार्यकारी अभियंता (पापु) यांना मदतीसाठी सांगण्यात आले. त्यानुसार मतदान झाले व सर्वात शेवटी मा.पिठासन अधिकारी व वार्ड क्र.३४ चे सदस्य यांनी मतदान केले. (एकुण ८२ स.सदस्यांनी मतदानासाठी भाग घेतला.) त्यावेळी तात्पुरते पिठासन अधिकारी म्हणून श्री. जयवंत ओक यांनी काम पाहिले. मतदानानंतर मा.महापौर डॉ.भागवत कराड यांनी पिठासन अधिकारी म्हणून काम पाहिले.

मा.महापौर (पिठासन अधिकारी) : आता ३.४० वाजले असून मतदान संपले आहे असे मी घोषित करतो. मतदान अधिकारी यांनी आपण मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांना प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स.सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणुक प्रक्रिया पुर्ण करण्यास सहकार्य करावे ही विनंती.

मा.महापौर (पिठासन अधिकारी) : मतमोजणीचे काम पुर्ण झाले असुन उमेदवारांना पडलेली मते खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| एकुण मतदान | - | ६५५ |
| अवैध मते | - | - |
| वैध मते | - | ६५५ |

| अ.क्र. | उमेदवारांची नावे | पडलेली मते | निर्णय |
|---|---|---|---|
| १ | श्री. मिर हिदायत अली मिर बसलत अली | ८० | विजयी |
| २ | श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | ५६ | पराभूत |
| ३ | श्री. भगवान दगडूजी रगडे | निरंक | पराभूत |
| ४ | श्री. अब्दुल कदिर मौलाना सय्यद | निरंक | पराभूत |
| ५ | श्री. किशोर रावसाहेब शिंदे | ८० | विजयी |
| ६ | श्री. रावसाहेब ममतु औताडे | ७७ | विजयी |
| ७ | सौ.जयश्री कुमारराव मोरे | निरंक | पराभूत |
| ८ | श्री. शेख इलियास किरयाणी शेख ऊमर | ७९ | विजयी |
| ९ | श्री. जयवंत केशवराव ओक | ७४ | विजयी |
| १० | श्री. नंदकुमार माधवराव फुलारी | ७३ | विजयी |
| ११ | श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले | निरंक | पराभूत |
| १२ | श्री. प्रशांत सुभाष देसरडा | ६४ | विजयी |
| १३ | श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे | ७२ | विजयी |

८ सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणून विजयी घोषित करण्यात आले.

मतदानाच्या निकालावरुन मी असे घोषित करतो की, स्थायी समिती सदस्य पदासाठी खालील सदस्यांनी निवड झाली असून मी त्या सर्वांचे अभिनंदन करतो.

| अ.क्र. | विजयी उमेदवारांचे नावे |
|---|---|
| १ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| २ | श्री. किशोर रावसाहेब शिंदे |
| ३ | श्री. रावसाहेब ममतु औताडे |
| ४ | श्री. शेख इलियास किरमाणी शेख ऊमर |
| ५ | श्री. जयवंत केशवराव ओक |
| ६ | श्री. नंदकुमार माधवराव फुलारी |
| ७ | श्री. प्रशांत सुभाष देसरडा |
| ८ | श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे |

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये स्थायी समिती सदस्यांसाठी झालेल्या मतदानानुसार सर्वात जास्त मते मिळालेले खालीलप्रमाणे ८ (आठ) सदस्य विजयी झाल्याचे पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

| **अ.क्र.** | **विजयी उमेदवारांची नावे** |
|---|---|
| १ | श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली |
| २ | श्री. किशोर रावसाहेब शिंदे |
| ३ | श्री. रावसाहेब ममतु औताडे |
| ४ | श्री. शेख इलियास किरमाणी शेख ऊमर |
| ५ | श्री. जयवंत केशवराव ओक |
| ६ | श्री. नंदकुमार माधवराव फुलारी |
| ७ | श्री. प्रशांत सुभाष देसरडा |
| ८ | श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे |

मा.महापौर व मा.आयुक्त यांनी विजयी उमेदवारांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

याच बरोबर 'जन गण मन' या राष्ट्रगीताने सभा संपली असे मा.महापौर यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचि
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा.महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०.४.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शुक्रवार दिनांक २०.४.२००१ रोजी मा.महापौर श्री.डॉ.भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात सकाळी ३.०० वाजता वंदे मातरम् गीताने सुरुवात झाली.**
**या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

१. स.स. श्री. अशरफ मोतीवाला
२. स.स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३. स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
४. स.स. श्री. लांबे गणेश रामचंद्र
५. स.स. सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
६. स.स.श्री. शे.इलियास किरमानी शे.ऊमर
७. स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८. स.स.श्रीमती शकुंतला सांडुजी इंगळे
९. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
१०. स.स.श्री. शिंदे राजु राजाराव
११. स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२. स.स.श्री. मंदाबाई प्रभाकर पवार
१३. स.स.श्री.घायातिलक लिलावती बाळासाहेब
१४. स.स.श्री.जगताप मोतिलाल रघुनाथ
१५. स.स.सौ.शिंदे रुख्मिणी राधाकिसन
१६. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोखंडे
१७. स.स.श्री.शे.शकील पटेल शे.बुढन पटेल
१८. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे
१९. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
२१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२२. स.स.सौ.ॲड.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२३. स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
२४. स.स.श्री.घोडले नंदकुमार राधाकिसन
२५. स.स.श्री.अय्युब खान सरदार खान
२६. स.स.श्री.अ.रशिद अ.सत्तार
२७. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
२८. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
२९. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडुरंग
३०. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३१. स.स.सौ.रशिदा बेगम गफ्फार चारखान
३२. स.स.श्री.शिंदे किशोर रावसाहेब

३३.	स.स.श्री.स.मुमताज अली मोज्जम अली
३४.	स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३५.	स.स.श्री.नासेर खान सरदार खान
३६.	स.स.श्री.थोरात दत्तात्रय रामराव
३७.	स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३८.	स.स.सौ.खरात कुसुमबाई दौलत
३९.	स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४०.	स.स.सौ.नुसरत बानो फिरोज खान
४१.	स.स.श्री.तायडे पांडुरंग यशवंतराव
४२.	स.स.सौ.जयश्री कुमारराव मोरे
४३.	स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४४.	स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४५.	स.स.श्री.सुरगोनीवार नारायण चंद्रय्या
४६.	स.स.सौ.राजपुत विमलाबाई भिकनसिंग
४७.	स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४८.	स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजुरकर
४९.	स.स.श्री.गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५०.	स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५१.	स.स.श्री.नसीर खान अ.रहेमान खान कुरैशी
५२.	स.स.सौ.शाहीन जफर महमुद जफर
५३.	स.स.दाणे चंद्रभागाबाई भागिरथ
५४.	स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५५.	स.स.श्री.स.सलिम स.युसुफ
५६.	स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५७.	स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
५८.	स.स.सौ.नफिशुन्नीस बेगम हबीब खाँ
५९.	स.स.श्री.शेख ईसाक शेख जैनोद्दीन
६०.	स.स.श्री.अफसर खान यासीन खान
६१.	स.स.सौ.सुलताना बेगम चाँदखाँ
६२.	स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६३.	स.स.श्री.शे.मुनाफ शे.यासीन
६४.	स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
६५.	स.स.श्री.कैसरखॉन बद्रोद्दीन खॉन
६६.	स.स.श्री.तुळशिबागवाले किशोर बाबुलाल
६७.	स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६८.	स.स.सौ.बबीता सुभाष कागडा
६९.	स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
७०.	स.स.श्री.तनवानी किशनचंद लेखराज
७१.	स.स.सौ.निखत परवीन ऐजाज झैदी

## *स्विकृत सदस्य*

१.	स.स.श्री.भगवान देविदास घडामोडे
२.	स.स.श्री.कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३.	स.स.श्री.खुगर सुरजितसिंग तिलकराज

**संवाद :**

मा.महापौर : अगोदर विषयपत्रिकेवर चर्चा करावी नंतर १ तासासाठी चर्चेला वेळ दिला जाईल.

श्री. अंबादास दानवे : सर्व प्रथम आताच बांगला देशाच्या सिमेवर काही बांगला देशातील जवानांनी हिंदुस्थानच्या सिमेवर घुसखोरी केली त्यामध्ये २१ भारतीय जवान मृत्युमुखी पडले त्यांना सभगृहात ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करावी. त्याचप्रमाणे माजी कुलगुरु श्री. शंकरराव खरात यांचे निधन झाले त्यांना पण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा.महापौर : श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी कृपया सर्वांनी उभे रहावे.

याच वेळी सभागृहातर्फे बांगलादेशाच्या सीमेवर जे भारतीय जवान मृत्युमुखी पडले त्यांना तसेच विद्यापीठाचे माजी कुलगुरु कै.श्री.शंकररावजी खरात यांचे दुखःद निधन झाल्याने त्यांना ०२ मिनीटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ३०७/१ :**

दिनांक १.३.२००१ आणि २०.३.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**चर्चा :**

श्री. आनंद तांदुळवाडीकर : दि.२०.३.२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. ४० वर विषय क्र.३४१/३ या प्रस्तावार मागील बैठकीत खूप चर्चा होऊन स्थगित ठेवण्यात आलेला होता तो मंजुर करण्यात यावा.

मा.महापौर : ठराव क्र.३४१/३ मागील बैठकीत स्थगित ठेवण्यात आलेला होता या ठरावावर बरीच चर्चा होऊन सविस्तर माहितीकडे प्रस्ताव प्रशासनामार्फत ठेवण्यात यावा असे ठरले होते. यात दुरुस्ती करता येत नाही म्हणून हा प्रस्ताव पुन्हा सविस्तर माहितीसह सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवण्यात यावा.

श्री. नंदकुमार घोडेले : पुन्हा प्रस्ताव मंजुरीसाठी येणार कार्यवाही करण्यासाठी तेवढा वेळ आहे काय? खरेदी सूचना दिलेली आहे.

श्री. भगवान घडामोडे : इतिवृत्तातील पान क्र.५२ वर ठराव क्र.३४६/८ यामध्ये विठ्ठलनगर येथे सभागृह बांधलेले आहे. त्यास नेताजी सुभाषचंद्र बोस नाव देण्याबाबत बोललो होतो. या ठरावात समावेश करावा. तसेच सभागृहात असलेले क्रिडांगणास १०-१२ वर्षापासून वापरात आहे व त्यासही नेताजी सुभाषचंद्र बोस क्रिडांगण म्हणूनच ओळखले जाते.

मा.महापौर : या ठरावामध्ये नांवे देण्याबाबतचा हा ठराव असून शहरातील विठ्ठल नगर येथील सभागृहास नेताजी सुभाष चंद्र बोस असे नांवे देण्यात यावे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. अंबादास दानवे : इतिवृत्तातील पान क्र.२४ वर महानगरपालिकेत सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २०९/१० दि.१८.१.९९ नुसार वर्ग-४ च्या ठराविक / दैनिक वेतनावरील सर्व कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ६५/- लागू केलेले असून फरकासहीत रक्कम देण्यात आलेली आहे. याच प्रमाणे वर्ग-३ च्या ठराविक / दैनिक वेतनावरील सर्वच कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ९४/- लागू करवा असा ठराव क्र.२४२/३ दि.२१३.९९ ला मंजुर झालेला आहे. प्रशासनामार्फत तडजोड होऊन ९४/- ऐवजी ७५/- रुपये दैनिक वेतन वर्ग - ३ च्या कर्मचाऱ्यापैकी फक्त दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांनाच फरकासहीत रक्कम देऊन दैनिक वेतन लागू करण्यात आलेला आहे. यातून सर्वसाधारण सभेच ठरावानुसार ठराविक वेतनावरील वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन ७५/- लागू करण्यात आलेली नाही त्यांना वगळण्यात आले. म्हणून मागील बैठकीत यावर चर्चा झालेली आहे. काय कार्यवाही केली याचा खुलासा द्यावा.

मा.महापौर : मागील बैठकीत या विषयावर चर्चा झालेली आहे. प्रशासन कार्यवाही करेल.

श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. अंबादास दानवे : वर्ग-३ सर्वच कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेऊन दैनिक वेतन रुपये ७५/- देण्याचे प्रशासनाने कार्यवाही करावी असा ठराव पारित केलेला आहे. वर्ग-३ ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन न देता फक्त वर्ग-३ मध्ये जे दैनिक वेतनावर होते त्यांना ७५/- रुपये फरकासहीत लागू करण्यात आला असून ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला आहे. ठराविक वेतनावरील कर्मचारी जास्त नसून थोड्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न आहे. त्यांना दैनिक वेतन फरकासहीत लागू करण्यात यावा.

मा.महापौर : असे किती कर्मचारी आहेत त्याबद्दल प्रशासनातर्फे खुलासा करण्यात यावा.

मा.उपआयुक्त (प्र) : मागील बैठकीत या संदर्भात चर्चा झालेली आहे व तसा ठराव सुध्दा पास झालेला आहे मागील बैठकीचे इतिवृत्त आजच कायम होत असून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

मा.महापौर : वर्ग-३ च्या ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना तात्काळ दैनिक वेतन लागू करण्याची कार्यवाही प्रशासनाने १ महिन्याच्या आत करावी. काही कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन लागू होतो काहींना नाही हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. आता विषय क्र.१ सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

सर्वसाधारण सभा दिनांक २०.३.२००१ इतिवृत्तातील विषय क्र.३४६/८ मध्ये महाराणा प्रताप सिंह सभगृह ऐवजी 'नेताजी सुभाषचंद्र बोस सभागृह' अशी दुरुस्ती करण्यात व इतर दुरुस्त्यासह दिनांक १.३.२००१ व २६.३.२००१ चे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ३६१/२ :**

उपसंचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा

पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी त्या लगतच्या मिळकती स.नं.१, २ व ३ मौजे भावसिंगपुरा व न.भू.क्र.३०८/पै. ची जागा संपादन करणे आवश्यक आहे.

उक्त ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा दि.१.४.२००१ रोजी उभारावयाचा असल्याने तत्पुर्वी वरील मिळकती त्वरीत संपादन करणे व सध्याचे रस्त्यावर वाहतुक बेट विकसीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी बाधित मिळकतधारकाकडून खाजगी वाटाघाटीने संपादन करणे आवश्यक आहे. पुतळा उभारण्याची तारीख लक्षात घेता बाधित मिळकतीचा आगाऊ ताबा देणेबाबत संबंधीत मिळकतधारकास पत्र देता येईल.

करिता उक्त मिळकती संपादन करणेसाठी व त्याकरिता भूसंपादन लागणाऱ्या खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**चर्चा :**

श्री. नंदकुमार घोडेले : खर्चासह भूसंपादनाचा प्रस्ताव सादर केलेला असून किती खर्च् येणार हे प्रस्तावामध्ये दिलेले नाही. तरी यापुढे असे अपुर्ण प्रस्ताव नगररचना विभागामार्फत सादर होऊ नये व किती खर्च येणार याचा खुलासा करावा.

मा.महापौर : डॉ.बाबासाहेब आंबेकर पुर्णाकृती पुतळा उभारण्याचे काम चालू आहे. आवश्यक तेवढी जागा भूसंपादन करणे गरजेचे आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : एक तासात माहिती मिळेल का? किती खर्च येणार आहे व किती जागा घेणार आहोत.

श्री. प्रकाश निकाळजे : जिल्हाधिकारी हे जागेचे किंमत काढणार आहे.

मा.महापौर : संबंधित विभागामार्फत या पुतळा उभारणीसाठी किती खर्च येणार किती जागा लागणार याची माहिती पुढील बैठकीत द्यावी. हा विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. यानंतर असे प्रस्ताव ठेवतांना जागा किती व खर्च किती यासह ठेवण्यात यावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी मौजे जयसिंगपुरा येथील स.न.१,२ व ३ पैकी आणि न.भु.क्र. ३०८ पैकी आवश्यक असलेली जागा भूसंपादन करण्यास आणि तेथे वाहतुक बेट विकसीत करणेस व त्याचप्रमाणे संबंधीत मिळकत धारकाकडून खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यास भूसंपादनाकरिता लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६२/३:**

उप अभियंता (महसुल) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकाच्या ८२ शाळेमध्ये सध्या १३५ बालवाडी शिक्षिका कार्यरत आहेत. खालील भागामध्ये त्या ठिकाणी असलेली गरज व उपलब्धी लक्षात घेता बालवाडी व पहिलीचा वर्ग प्रस्तावित करणेत आला आहे. खालील प्रभागात महानगरपालिकेच्या ऊर्दू/मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळा नाहीत. या भागात अतिशय गरिब लोक असल्याने शिक्षणापासून ही मुले वंचित राहतात.

करिता त्या ठिकाणी विद्यार्थी उपलब्धे बाबत सर्व्हेक्षण केले असता इयत्ता बालवाडी ते पहिली इयत्तेसाठी अंदाजे ५० ते ६० विद्यार्थी उपलब्ध होऊ शकतात त्या अनुषंगाने जून २००१ पासून

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सिल्क मिल्स कॉलनी | : | बालवाडी (उर्दू) व ई.१ली |
| २. | नारेगाव | : | बालवाडी (उर्दू) व ई. १ ली |
| ३. | यशोधरा कॉलनी | : | बालवाडी (उर्दू) |
| ४. | समतानगर | : | बालवाडी (उर्दू) |
| ५. | रमानगर | : | बालवाडी (मराठी) |
| ६. | मिसारवाडी | : | बालवाडी (उर्दू) |
| ७. | गारखेडा | : | बालवाडी (उर्दू) |
| ८. | जमनज्योत हर्सुल | : | बालवाडी (मराठी) |
| ९. | आंबेडकर नगर | : | बालवाडी (उर्दू) |

भागत बालवाडी व इयत्ता पहिलीचा वर्ग सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ् व मंजुरीस्तव सादर.

**चर्चा :**

मा.महापौर : या प्रस्तावानुसार माझ्या वार्डामध्ये सुध्दा १ बालवाडी (मराठी) सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. पंडागळे रतनकुमार : माझ्या वार्डामध्ये सुध्दा एक बालवाडी सुरु करण्याचे या प्रस्तावात घेण्यास मंजुरी देण्यात यावी.

मा.महापौर : सभागृहात बरेच स.सदस्यांनी मागणी केल्याने श्री. घोडेले नंदकुमार, श्री. पंडागळे रतनकुमार, श्रीमती मानकापे, सौ.लोखंडे, सौ.शिंदे तसेच स.सदस्य श्री.भरत लकडे, श्री.राजु शिंदे यांचे वार्डात आवश्यकतेनुसार बालवाडी सुरु करण्यासाठी या ठरावात समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात येते. हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र १ ते ९ या ठिकाणी प्रस्तावित केल्यानुसार बालवाडी उर्दू व मराठी आणि इयत्ता १ लीचे वर्ग सुरु करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वार्ड क्र.३४ येथे आणि स.सदस्य श्री.रतनकुमार पंडागळे, श्रीमती पार्वती मानकापे, सौ.कचराबाई लोखंडे, सौ.रुख्मीनी शिंदे व श्री.भरत लकडे आणि श्री.राजु शिंदे यांच्या प्रभागात देखील आवश्यकतेनुसार बालवाडी सुरु करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३/४:**

नगरसचिव यांनी प्रस्ताव सादर केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ प्रमाणे स्थापन झालेल्या प्रभाग समितीने कामकाज यशस्वीरित्या पार पाडता यावे म्हणून सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६६/५ दिनांक ३.१२.१९९८ अन्वये मंजुर करण्यात आलेल्या प्रभाग समितीचे कामकाजबाबत नव्याने सभागृह करावयाचे प्रारुप नियमांना अद्याप शासनाची मंजुरी मिळाली नसल्याने ...........

१. स्थायी समिती सभपती पदाचे नामनिर्देशन व निवड आणि स्थायी समिती सभा कमकाजासाठी जे नियम लागू आहेत ते नियम, आवश्यक त्या दुरुस्ती व तरतुदीसह प्रभाग समितीचे सभापती पदाचे नामनिर्देशन निवड कार्यपध्दती आणि कामकाजासाठी लागू करणे.
२. महाराष्ट्र महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायती (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता निवडणुका व नियुक्त्या) नियम १९६६ नुसार असलेले नियम प्रभाग समितीसाठी नामनिर्देशीत सदस्याचे नामनिर्देशन पत्र निवडून कार्यपध्दती व मतमोजणी ई.पध्दत (अर्हता वगळून) यासाठी लागू करणे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**चर्चा :**

मा.महापौर : प्रभाग समितीचे नव्याने आपण निवडणुका घेणार आहोत त्यासाठी जे काही नियम तयार केले ते या प्रस्तावानुसार मान्यता द्यायची आहे म्हणून हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे व प्रस्तावित १ व २ मधील नियम प्रभाग समितीत नेहमी करीता लागू राहतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६६/५ दिनांक ३.१२.९८ अन्वये मंजुर झालेल्या प्रभाग समितीचे कामकाजाबाबत नव्याने सामविष्ट करावयाच्या प्रारुप नियमांना मिळणारी शासनाची मंजुरी आणि प्रभाग समितीचे कामकाजासाठी स्थायी समिती सभापती पदाचे नामनिर्देशन पत्र व निवड आणि स्थायी समिती सभा कामकाजाबाबत जे नियम लागू आहेत त्या नियमाप्रमाणे प्रभाग समितीचे सभापती पदाचे नामनिर्देशन निवड कार्यपध्दती आणि कामकाजासाठी लागू करण्यास आणि महाराष्ट्र महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायती (नामनिर्देशित सदस्याची अर्हता निवडणुका व नियुक्त्या) नियम १९९६ नुसार असलेले नियम प्रभाग समितीचे नामनिर्देशीत सदस्यांचे नामनिर्देशन पत्र निवडणुक कार्यपध्दती व मतमोजणी पध्दत इत्यादी (अर्हता वगळून) साठी लागू असलेले नियम नेहमी करिता लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६४/५ :**

उपसंचालक नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराच्या मंजुरी योजनेनुसार ३० मिटर रुंद जाफरगेट ते लक्ष्मण चावडी मोंढानाका जालना रोड या रस्त्याने बाधीत मिळकती या भागातील वाढती रहदारी व त्या भागातील जडवाहनांची वर्दळ विचारात घेता संपादीत करुन रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक असल्याने सदरील रस्त्याने रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या मिळकती व रितसर भूसंपादन कायद्यातहत भूसंपादन करणे आवश्यक आहे. प्रस्ताव भूसंपादन करण्यास लागणाऱ्या खर्चासह मान्यतेसाठी सादर.

भूसंपादन प्रस्ताव मान्यतेनंतर रितसर भूसंपादन कार्यवाहीस्तव प्रस्ताव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**चर्चा :**

श्री. अंबादास दानवे : या अगोदर याच जागेचे भूसंपादनाचा प्रस्ताव संबंधीत वार्डाच्या सदस्या सौ.संगिता मैंद ठेवलेला होता. मंजुरीही देण्यात आलेली आहे. पुन्हा

प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर झाला चांगली बाब आहे. याच रस्त्यापासून कैलास स्मशाभूमीकडे जाणारा रस्ता आहे. या रस्त्यांचे सुध्दा भूसंपादनाची कार्यवाही करण्यासाठी या प्रस्तावात तसे समाविष्ठ करण्यात यावे.

श्री. देसरडा प्रशांत : लक्ष्मण चावडी ते स्मशानभूमी रस्त्याचे मोजमाप करण्याचे बाकी असून महानगरपालिकेतर्फे १९९३ ला ९ हजार रुपये संबंधीत विभागाकडे भरलेले आहे तरी पुन्हा स्मरण पत्र देऊन पुढील कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत.

सौ. सुवर्णा चंदात्रे : ९५ च्या डी.पी. प्लॅननुसार या रस्त्याची रुंदी कमी आहे. तसेच प्रस्तावित भूसंपादनास किती मिळकती बाधित होतात यात किती पक्के, कच्चे मोडके बांधकाम याच सुध्दा खुलासा व्हावा. मोकळ्या जागा तसेच अनाधिकृत, अधिकृत बांधकामे किती त्याचप्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही केल्यास किती मिळकती ताब्यात घेतल्या जातील याची माहिती द्यावी.

मा.महापौर : उपसंचालक यांनी या संदर्भात सविस्तर माहिती द्यावी.

उपसंचालक (नगररचना) : औरंगाबाद शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार ३० मिटर रुंदीचा रस्ता आहे. जागेवर प्रत्यक्ष जी रुंदी ५० ते ७० फुट येते. भूसंपादनाची कार्यवाही करायची झाल्यास ३० मिटर रस्ता रुंदीकरण करुन काही मिळकती संपादीत कराव्या लागतील.

मा.महापौर : हा प्रस्ताव आता मंजुर केल्यानंतर पुन्हा खर्च किती येतो या संदर्भात पुनहा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी येईल.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : मी मागे एक मा.आयुक्तांना पत्र दिलेले होते हा रस्ता १०० फुट रुंद कण्याचे विकास आराखड्यानुसार आहेत. पत्र दिल्यानंतर अद्याप काहीही कार्यवाही केलेली नाही. नुसता रस्ता मोठा करायचा व ट्रान्सपोर्टच्या गाड्या त्या रस्तयावर उभ्या राहतील. असे होऊ देऊ नये. कारण नागरिकांच्या सोयीसाठी व येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांना त्रास होऊ नये या हेतुने रस्ता रुंदीकरण करत आहोत. मोंढानाका ते जाफरगेट मधील जे अतिक्रमण झाले त्याची सुध्दा कार्यवाही केली पाहिजे.

मा.महापौर : स.सदस्य श्री. राधाकृष्ण गायकवाड यांनी केलेल्या सूचनेची संबंधीत अधिकारी यांनी नोंद घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी हा विषय मंजुर करण्यात येत आहे याच बरोबर लक्ष्मण चावडी ते स्मशानभूमी या रस्त्याचे सुध्दा रुंदीकरणाची कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार जाफरगेट ते लक्ष्मण चावडी मोंढा नाका जालना रोड या ३० मिटर रुंदीच्या रस्त्याने बाधित होणाऱ्या मिळकतीचे रितसर खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच याबरोबर लक्ष्मण चावडी ते स्मशान भूमी या रस्त्याने बाधित होणाऱ्या मिळकतीचे रितसर भूसंपादन करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६५/६ :**

उपसंचालक नगर रचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेतील रस्ता विकासाचे प्रस्तावा व्यतिरिक्त ७.५ मी. (२५ फुट) रुंद रस्ता विद्यापीठ गेट ते खामनदी पर्यंत नॉन डि.पी. रस्ता विकसीत

करण्याबाबत सर्व साधारण सभा दिनांक १९.८.२००० ने ठराव क्र.५०/९ ने मान्यता झालेली आहे. त्यासंदर्भात रस्त्याचे भूसंपादन करण्याच्या कार्यवाही करिता सदरील प्रस्ताव सादर करण्यात येतो.

विद्यापीठ गेटपासुन पुर्वेस खामनदीकडे असलेल्या वस्तीकडे जाण्यास रस्ता नसल्यामुळे नॉन डि.पी. २५ फुट रुंद रस्ता नं.भू.क्र.३०५, ३०६ व २८७ च्या दक्षिणेकडील सर्वे क्र. २ व ३ जयसिंगपुरा मधून क्षेत्र सुमारे अनुक्रमे २९७ व ६० चौ.मी. संपादन केल्यास विद्यापीठ गेट ते खामनदी पर्यंत रस्ता विकसीत करण्यात येईल.

करिता वरील मिळकती सर्वे क्र.२ व ३ क्षेत्र सुमारे अनुक्रमे २९७ व ६० चौ.मी. संपादस करणेस व त्यासाठी लागणाऱ्या भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर भूसंपादन कार्यवाही जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेमार्फत करण्यात येईल प्रस्ताव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**चर्चा :**

श्री. तकीहसन खान : हा प्रस्ताव या अगोदर मंजुर करण्यात आलेला असुन कार्यवाही असुन कार्यवाही न होता पुन्हा प्रस्ताव मंजुरीसाठी आलेला आहे कारण काय?

मा.महापौर : प्रशासनामार्फत प्रस्ताव आलेला आहे. विषय क्र.६ सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्यापीठ गेट पासुन पुर्वेस खामनदीकडे असलेल्या वस्तीकडे जाण्यास रस्ता नसल्यामुळे नगर भूमापन क्रमांक ३०५, ३०६ व २८७ च्या दक्षिणेकडील जयसिंगपुरा सर्वे क्र. २ व ३ मधून अनुक्रमे २९७ व ६० चौ.मी. क्षेत्र संपादन करुन विद्यापीठ गेट ते खामनदी पर्यंत २५ फुट रुंद नॉन डी.पी. रस्ता तयार करण्यास व भूसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६६/७:**

उपसंचालक नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र.२३ मटन मार्केटचा विस्तार (एक्स टी.ट्र.एम.एम.) करिता बाधित असलेली मिळकत नगर भूमापन क्र.६७३४ पुर्णतः बाधित आहे.

उक्त मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे.

उपरोक्त कलमान्वे भूसंपादन प्रस्ताव उक्त खरेदी सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्याचे आत म्हणजेच दि.१५.५.२००१ पुर्वी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच उक्त मिळकती शिवाय न.भू.क्र.६७३३ सुध्दा बाधित आहे. त्यामुळे वरील दोन्ही मिळकती संपादन केल्यास संपुर्ण आरक्षण विकसीत केला जाईल.

करिता वरील दोन्ही मिळकती संपादन करण्यासाठी भूसंपादन कायद्यातहत रितसर कार्यवाही करण्याकरिता व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या मंजूरीसह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यांत येत आहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव रितसर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यांत येऊन त्यांचे मार्फत भूसंपादन करण्यात येईल प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>चर्चा :</u>**

**श्री.तकीहसन खान :** या प्रस्तावामध्ये सिटी सर्वे नंबर दिलेला आहे. जागा किती कोणत्या वार्डात येते. याची सविस्तर माहिती प्रस्तावामध्ये दिली जात नाही.

**मा.महापौर :** ऐरिया प्रस्तावामध्ये नमूद केल्यास सि. सर्वे कार्यालयाकडून संयुक्त मोजणी नंतर तफावत होण्याची शक्यता असते.

**श्री.नंदकुमार घोडेले :** संपूर्ण तपशिलासह प्रस्ताव ठेवावा. जागेची परिस्थिती काय आहे. सध्या तेथे भाडेकरु आहेत का? जागेमध्ये अतिक्रमण झालेले आहे काय. सविस्तर माहितीसह प्रस्ताव सादर करावा, असे आदेश करावेत.

**सौ.सुवर्णा चंद्रात्रे :** भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे का? मटन मार्केटमध्ये अस्तित्वात असलेले सध्याचे क्षेत्रफळ किती? या जागेवर अन्य इमारत बांधून विकास करु शकत नाही का? दिलेली खरेदी सूचना कायद्याच्या चौकटीमध्ये बसते काय? या सर्व बाबींचा खुलासा व्हावा.

**श्री प्रकाश निकाळजे :** प्रस्ताव मंजूर करावा महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.

**श्री.स.अली मिरा सलामी :** जवळपास ४ ते ५ प्रस्ताव नगररचना विभागामार्फत सादर केलेले आहे. मागील सर्वसाधारण सभेच्या वेळी अशा प्रकारचे प्रस्ताव होते. त्यावर खूप चर्चा झालेली होती. शासनाकडून विकास योजना आराखड्यास मंजूरी नाही तर असे प्रस्ताव सभागृहाच्या मंजूरीसाठी आणण्याची गरज काय? नियमात बसते का? खुलासा करावा. अशा सर्व जागा भूसंपादन करण्यास महानगरपालिकेकडे पैसा आहे का? कणीही वाटेल त्या पध्दतीने अर्ज दाखल करतात व त्याप्रमाणे प्रस्ताव सभागृहात मंजूरी साठी येतात हे योग्य नाही. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासनाकडून संबंधित व्यक्ती मंजूरी घेऊन येतात. यात महानगरपालिकाचे नुकसान होत आहे. ज्या ठिकाणी आरक्षण नको पाहिजे तेथे आरक्षण करण्यात आलेले आहे. ज्या खुल्या जागा आहे त्याचे आरक्षण काढून कुणासही विकासासाठी देण्यात येत आहे. हे योग्य नाही. म्हणून शहराचा विकास आराखडा शासनाकडून मंजूर होऊन येत नाही. तोपर्यंत अशा प्रस्तावास मान्यता देणे योग्य नाही असेल तर संबंधित अधिकारी यांनी खुलासा द्यावा.

**उपसंचालक, नगररचना :** महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियमामध्ये जे १२७ कलम आहे. त्यानुसार विकास योजना मंजूर झाल्या पासून १० वर्षाच्या आत मध्ये एखादे आरक्षण विकसीत झाले नसेल तर ते जमीन मालक महानगरपालिकेला नोटीस बजाऊ शकतात. आणि ही नोटीस महानगरपालिकेस आल्यानंतर ६ महिन्याच्या आत भूसंपादनाची कार्यवाही सुरु झाली. तर ते आरक्षण रद्द होऊ शकेल. ही तरतूद कायद्यामध्ये आहे. आज महानगरपालिकेत जो मंजूर विकास आराखडा लागू आहे. त्यास अनुसरुन मालमत्ताधारक नोटीस देवून पुढील कार्यवाही करु शकतात. बजेट प्रोव्हीजन मध्ये आपण तरतूद केलेली असून अशा प्रकारचे भूसंपादनाचे प्रस्तावास मान्यता देण्यास हरकत नसावी कारण ६ महिन्याच्या आत कार्यवाही करणे गरजेचे आहे. नसता ते आरक्षण रद्द होते व या प्रस्तावानुसार संबंधित मालकाने आपणांस नोटीस दिलेली आहे. म्हणून १४.०५.२००१ पर्यंत आपणांस कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** जी कार्यवाही चालू आहे. १९७५ च्या विकास आराखड्यानुसार होत आहे. सन १९९५ मध्ये शासनाकडे शहराच्या विकास आराखड्यास

मंजूरीसाठी पाठवलेला असतांना व ६ वर्षापासून शासनाची त्यास मंजूरी आलेली नाही. विकास आराखडा मंजूरीसाठी वेळ लागल्यास कुणी न्यायालयात जाईल व आरक्षण काढावे म्हणून महानगरपालिकेस नोटीस देईल. जे परवानगी मागतात त्यांना महानगरपालिकेमार्फत आरक्षण आहे. म्हणून दाखवले जाते. यामध्ये जे सामान्य व्यक्ती आहेत. त्यांना अडचण निर्माण होत आहेत. त्यांचे आरक्षण १९७५ पासून थांबवून ठेवलेले आहे. परवानगी देत नाही. त्यांचे परिस्थिती नुसार ते न्यायालयात सुध्दा जाऊ शकत नाही. २०-२५ वर्षापासून विकास आराखड्याची कार्यवाही पूर्ण होत नसेल तर जुन्या शहरातील सर्व मालमत्ता डिलीट करुन विकास करावा. पैसा वाया घालू नये.

**मा.महापौर :** सदर प्रस्ताव मंजूर करावयाचा किंवा नाही याबद्दल मत द्यावे. आरक्षित जागेवर विकास करण्याची गरज पडत असेल तर त्या जागा भूसंपादन करावे लागेल.

**श्री.स.अली मिरा सलामी :** एक-एक प्रस्ताव येतात. जुने शहर पूर्ण डिलीट करण्यात यावे. माझ्या वार्डामध्ये सर्व वाल्मीक समाजाचे लोक राहतात. अशा गरीब लोकांच्या जागेच्या संदर्भात परवानगी मिळत नाही. आरक्षणात येते म्हणून घरे पाडली जातील. न्यायालयात जाण्यासाठी त्यांचेकडे पैसा नाही. म्हणून गरीब लोकांवर या प्रस्तावाच्या अनुषंगाने होत असलेली कार्यवाहीमुळे अन्याय होत आहे. हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**मा.महापौर :** आपण हरकती व सूचना मागवल्या आहेत. आपण रद्द करण्याबाबतची सूचना केली. त्यांची नोंद घेतलेली आहे.

**श्री.नंदकुमार घोडेले :** यासाठी किती तरतूद ठेवण्यांत आलेली आहे. याचा खुलासा करावा.

**श्री.स.अली मिरा सलामी :** निवाससाठी असलेल्या जागाचे आरक्षण ठेवले परवानगी देत नाही. गार्डन आणि खेळाचे मैदान यातून किती विकास का महानगरपालिकाने केला महानगरपालिकेच्या मालकीच्या जागवेर महानगरपालिका विकास का करत नाही. काही जागा स्वत:हून महानगरपालिकेने आरक्षणामध्ये टाकलेल्या आहेत. किती गार्डन, खेळाचे मैदान आहेत.

**मा.महापौर :** आपण जी माहिती पाहिजे ती दिली जाईल या विषयावर बोलावे. संबंधित मालकांनी पर्चेस नोटीस महानगरपालिकेस दिलेली आहे. १५.०५.२००१ पर्यंत ही मिळकत भूसंपादनाची कार्यवाही न केल्यास हे आरक्षण राहणार नाही. ही जागा कुठे आहे, भूसंपादन करणे गरजेचे आहे का, जागा कुणाची आहे, क्षेत्रफळ किती, भूसंपादन केल्यानंतर नागरिकांना काय सुविधा दिल्या जातील. याची माहिती देण्यात यावी. आवश्यकता आहे का? नसेल तर नामंजूर करुन विकास केला जाईल.

**उपसंचालक, नगररचना :** लोटाकारंजा येथे मटन मार्केटचे विस्तारासाठी आरक्षित असून दैनंदिन गरजेचा भाग आहे. सविस्तर माहितीसह प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवून त्याची संयुक्त मोजणी होते. हा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे दि.१५.०५.२००१ पुर्वी पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षण व्यपगत होईल.

**मा.महापौर :** हा प्रस्तावास मान्यता देऊन जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवायचा आहे. जिल्हाधिकारी भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत जागेचे भूसंपादन करुन

महानगरपालिकेस जागा हस्तांतर करुन देतील आज हा प्रस्ताव मंजूर करणे गरजेचे आहे.

**श्री.प्रकाश निकाळजे :** मटन मार्केटच्या विकासासाठी जागा भूसंपादन करणार जागा कुणाची व किती आहे.

**उपसंचालक, नगररचना :** मटन मार्केट हे महानगरपालिकेच्या मालकीचे असून त्यांचे विस्तारासाठी लगतच जागा मेन रोडला लागून असून विकास योजनेमध्ये आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्याची प्रसिध्दी देऊन हरकती व सूचना मागवून सुनावणी नंतर नियोजन समितीने आरक्षण कायम ठेवले आहे. म्हणून जी जागा भूसंपादन करायची आहे. मटन मार्केटच्या विकासासाठी ही जागा घेत असून पुढे भविष्यात त्याचा उपयोगच होणार आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** जागेचे मालक कोण आहे किती जागा आहे त्याचा खुलासा करावा.

**उपसंचालक, नगररचना :** शे.अनीस शे.अहमद तांबोळी, हर्षनगर यांचेकडून नोटीस आलेली आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** सध्या त्या ठिकाणी महानगरपालिकाचे मटन मार्केट आहे. जागा घेणे आवश्यक नाही. महानगरपालिकेचा पैसा विनाकारण खर्च होईल. तेथे सध्या हॉल कार्यान्वित आहे. आवश्यकता नसतांना प्रश्नच आणण्याची का गरज भासली, तांबोळी कोण संबंधित मालकास कोठून पैसा देणार मटन मार्केटच्या दुकानासाठी किती लोकांनी अर्ज दिलेले आहे. मटनाची म्हणावी तशी मागणी या भागात नाही. म्हणून जागा भूसंपादन करुन नये असे माझे मत आहे.

**श्री.तकी हसन खान :** जे मटन मार्केट होते ते आता राहिलेले नाही. मटन विकले जात नाही. तेथे ११ दुकाने आहेत. एकही परवाना नाही. १९७२ पासून भाडेकरुन दुकानदाराकडून फक्त रु.१०/- महानगरपालिकेस उत्पन्न होते. निविदा निघाल्या परंतू दुकानासाठी कोणीही आले नाही. जागा घेण्याची आवश्यकता नाही. मार्केटची आवश्यकता नाही. म्हणून ज्या ठिकाणी हे मार्केट नसून मुतारी झाली आहे. तोडण्याच्या निविदाही निघाल्या व ते स्विकारण्यात आले.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** आताच स.सदस्य श्री. तकीहसन खॉन यांनी सांगितले की, १९७२ पासून ते मटन मार्केट ७२ ते २००१ पर्यंत आपला महानगरपालिकेचे अधिकारी काय करतात. का कार्यवाही केलेली नाही. या मार्केटपासून महानगरपालिकेस काय उत्पन्न मिळाले जे मार्केट होते ती जागा आहे का, दुसरे कुणी वापरतात याचा सुध्दा खुलासा करावा.

**पशुधन विकास अधिकारी :** मार्केट संबंधिची सर्व कार्यवाही मालमत्ता विभागाकडे असून परवानगी संबंधात आरोग्य विभागाच्या अंतर्गत ही बाब आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** संबंधित दुकानधारकास महानगरपालिकेने एक लायसन्स दिलेले नाही. कारण महानगरपालिकाच्या नियम व अटीची पूर्तता न केल्यामुळे लायसन्स दिलेले नाही.

**मा.महापौर :** लायसन्स दिले नसतांना दुकान मार्केट कसे चालू आहे. प्रस्ताव ठेवत असतांना नगररचना विभागाकडून सविस्तर माहितीसह आलेल्या असावा. जागा किती, आवश्यकता आहे किंवा काय काय सुविधा देणार, ई. सर्व माहिती प्रस्तावात देणे गरजेचे आहे. म्हणून एकंदरीत सभागृहाच्या भावना

लक्षात घेता येथे मटन मार्केटची गरज नाही. म्हणून हा प्रस्ताव रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.२६७/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील शहर अभियंता हे पद श्री.आय.टी.गायकवाड यांचे सेवानिवृत्तीमुळे दि.०१.०९.२००० पासून रिक्त झालेले आहे. अतिरिक्त शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे आणि शहर अभियंता ही तीन पदे एकाच वेतनश्रेणीची असल्यामुळे तसेच सध्या खुला व मागावर्गीय प्रवर्गातून एक उमेदवार वरील पदावर कार्यरत असल्यामुळे शासन निर्णयानुसार शहर अभियंता पद खुल्या प्रवर्गातून भरावे लागेल. अतिरिक्त शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचेत जेष्ठ अधिकारी श्री.सी.एस.सोनी अतिरिक्त शहर अभियंता व श्री.एम.डी.सोनवणे, कार्यकारी अभियंता यांचेत जेष्ठतेनुसार श्री.सी.एस.सोनी, अतिरिक्त शहर अभियंता यांना शहर अभियंता या संविधानिक पदावर नेमणूक करण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येते.

शहर अभियंता हे पद महानगरपालिका आस्थापनेवर शासनाने संविधानिक पद असून मान्य केलेले आहे. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५ (४) नुसार पदाची भरती, पदोन्नती किंवा बदलीने भरल्यानंतर या करिता प्रशासकीय ठराव महानगरपालिका सर्वसाधारण सभेने पारित झाल्यानंतर शासनाकडे नावानिशी मंजूरीसाठी पाठवावा लागेल.

तसेच श्री.सी.एस.सोनी यांची शहर अभियंता या पदावरील नियुक्तीस शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर रिक्त होणाऱ्या अतिरिक्त शहर अभियंता या पदावर जेष्ठता व गोपनिय अहवाल यांच्या आधारावर सक्षम उपअभियंता या संवर्गातून पदोन्नतीने नेमणूकीची कार्यवाही करण्यांत येईल.

<u>**चर्चा :**</u>

**श्री.तकी हसन खॉन :** शहर अभियंता या पदासाठी नावासहीत प्रस्ताव सादर झालेला असून कलम ४५ (४) नुसार सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्या नंतर हा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावयाचा आहे. शहर अभियंता पदावर श्री.सोनी यांना नियुक्त केल्यानंतर शासनाने या ठरावास ६ महिन्याच्या आत मंजूरी दिल्यास संबंधित अधिकारी यांना पुन्हा त्यांचे जागेवर यावे लागेल. ४५ (७) नुसार एखादी जागा रिक्त झाल्यास ती ताबडतोब भरण्यात यावी असे दिले आहे. श्री.सोनी यांना शहर अभियंता केल्यानंतर त्यांचे जागेवर अति.शहर अभियंता म्हणून ताबडतोब सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती ३ दिवसाच्या आत करण्यात यावी असे करायचे असेल. तर आजच या प्रस्तावास स्विकृतीसह मंजूरी देणे आवश्यक आहे. ४५ (४) नुसार शहर अभियंता पद भरायचे असेल तर ४५ (७) नुसार रिक्त होणाऱ्या जागेवर सक्षम अधिकाऱ्यांनी नियमाने नियुक्ती तात्काळ करणे आवश्यक आहे. ४५ (७) मधील नियम वाचून दाखवावे.

**मा.महापौर :** नगरसचिव यांनी नियम क्र.४५ (७) वाचून दाखववे.

**नगरसचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४५ चे कलम ४५ (७) ची तरतूद पुढील प्रमाणे आहे. पोट कलम (१) किंवा पोट कलम (५) अन्वये नेमणूकीची व्यवस्था होईपर्यंत महानगरपालिकेस एखाद्या व्यक्तीची नेमणूक करुन ती जागा तात्पुरती भरण्यांत येईल. आणि अशा रितीने नेमणूक केलेल्या व्यक्तीला पोट कलम (इ) अन्वये त्यावेळी निश्चित केलेल्या कमाल मर्यादेहून अधिक नसेल इतके महानगरपालिकेस योग्या वाटेल असे मासिक वेतन व भत्ते मिळतील असा निर्देश देता येईल. परंतू अशी कोणतीही नेमणूक ज्या तारखेस ती जागा रिकामी झाली असेल त्या तारखेपासून सहा महिन्याहून अधिक मुदतीसाठी करता येणार नाही किंवा ती अशा तारखेपासून सहा महिने झाल्यानंतर करता येणार नाही.

**श्री.तकी हसन खान :** दोन्ही पदासाठी जे सक्षम आहेत. त्यांना पद देण्यांत यावे. ६ महिने वाट पाहणे व तोपर्यंत अतिरिक्त शहर अभियंता यांचे पद रिक्त ठेवणे योग्य नाही. श्री.सोनी यांना शहर अभियंता केल्यानंतर त्यांचे जागी सक्षम अधिकीर यांना ताबडतोब नियुक्ती करणे गरजेचे आहे. व आजच शहर अभियंता पदी श्री.सोनी यांची नियुक्ती केल्यानंतर रिक्त होणारे अति.शहर अभियंता हे पद सुध्दा ३ दिवसाच्या आत भरण्याची कार्यवाही व्हावी व तसे दोन्ही प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत यावे.

**श्री.निकाळजे प्रकाश :** शहर अभियंता या पदास शासनाची मान्यता आहे. परंतू आता हे पद रिक्त झाल्याने व त्या पदावर श्री.सोनी यांनी नियुक्ती करायची असल्याने नावानिशी प्रस्ताव शासनाकडे पाठविणे गरजेचे आहे. व तसा ठराव शासनाकडे पाठविण्यास हरकत नसावी. व त्यांचे जागेवर सक्षम अधिकाऱ्यांची ताबडतोब नियुक्ती करावी प्रत्येक वेळी सर्वसाधारण सभेची मंजूरी घेऊन रिक्त पदावर नेमणूक करणेत वेळ जातो. ही प्रशासकीय बाब म्हणून मा.आयुक्तांनीच सक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक करावयास पाहिजे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** अनेक महिन्यापासून शहर अभियंता पदाची जागा खाली असून त्यामुळे शहरातील विकास कामे ठप्प झालेली आहे. ज्याप्रमाणे श्री.सोनी यांना शहर अभियंता पदी नियुक्त करत आहात. त्याचप्रमाणे अति.शहर अभियंता या रिक्त झालेल्या जागेवर सुध्दा सक्षम अधिकाऱ्यांची ताबडतोब नियुक्ती करण्यात यावी व दोन्हीही प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत यावे. दोन्ही अधिकाऱ्यांचे नियुक्तया ताबडतोब २-३ दिवसांमध्ये करण्यात याव्या जेणेकरुन शहरातील विकास कामे वेळेवर होतील. व तसे रुलींग मा.महापौरांनी द्यावी अशी अपेक्षा करतो.

**श्री.पंडागळे रतनकुमार :** महानगरपालिकेत शहर अभियंता, अति.शहर अभियंता, कार्यकारी अभियंता या तिन्ही जागा सारख्याच दर्जाच्या आहेत. म्हणून वेतनश्रेणी मध्ये कमी जास्तपणा होईल हा प्रश्न निर्माण होत नाही. शहर अभियंता हे पद रिक्त असल्याने प्रशासकीय स्थरावर बदलीने करण्यात यावे. त अति.शहर अभियंता पदावर निवड समितीने सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

**श्री.शे.ईसाक जैनोद्दीन :** महानगरपालिका आस्थापनेवर किती रिक्त पदे आहेत. शिक्षणाधिकारी पद दीड वर्षापासून रिक्त आहे. अशी रिक्त पदे ताबडतोब न भरल्यास मी उपोषणास बसेल, याची नोंद घ्यावी.

**श्री.नंदकुमार घोडेले :** सादर केलेला ठराव मंजूर करावा व अतिरिक्त शहर अभियंता या पदावर जे सक्षम अधिकारी नेमावा.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** शहर अभियंता हे पद ६ महिन्यापासून रिक्त असतांना व मा.आयुक्त यांना या पदावर अधिकार नेमण्याचे अधिकार असतांना कार्यवाही झालेली नाही. ६ महिने विलंब लावला या पदावर अधिकारी नसल्याने शहरातील विकास कामे थांबवून आहेत. शहर अभियंता पदास यापुर्वीच मान्यता आलेली आहे. म्हणून या पदावर मा.आयुक्त अधिकारी नेमू शकत होते व होणारे अति.शहर अभियंता पदावर कार्यवाही करण्यासाठी प्रशासनामार्फत तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवून कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. परंतू ती कार्यवाही केलेली नाही. उशिरा का होईना प्रशासनाला जाग आलेली आहे म्हणून या प्रस्तावास मान्यता द्यावी व रिक्त होणारे अति.शहर अभियंता पदावर जे सक्षम अधिकारी असतील व जी कमेटी गठीत करण्यात आलेली आहे. त्या कमेटीचे जे अधिकारी सक्षम, जेष्ठ व ज्यांचे सी.आर.चांगले आहे. अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, असे माझे मत आहे.

**श्री.गणेश तांबे :** सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतरच अति.शहर अभियंता हे पद भरण्यात यावे असे काही शासनाचे आदेश आलेले आहेत काय?

**उपआयुक्त (प्र.) :** अति.शहर अभियंता पदावर सिडको हस्तांतरण झाल्यानंतर पद भरावे असे आदेश होते. त्या आदेशाला उच्च न्यायालयात चालेंज झालेले असून उच्च न्यायालयाने सदरचे पद हे कायदेशीर भरलेले असून त्यात बदल करण्याची काहीही गरज नाही असे आदेश दिले आहे.

**श्री.सुदाम सोनवणे :** अति.शहर अभियंता या पदावर जेष्ठ जे अधिकारी असतील त्यांना चार्ज देण्यात यावा. व शासनाची तशी मंजूरी घेण्यांत यावी.

**श्री.अंबादास दानवे :** अति.शहर अभियंता पदावर असलेले श्री.सी.एस.सोनी यांना शहर अभियंता पदावर नियुक्ती झाल्यास वेतन श्रेणीमध्ये फरक पडतो काय? तसेच रिक्त झालेले अति.शहर अभियंता या पदावर कमेटीच्या सल्ल्या नुसार जेष्ठ व कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी व तसा प्रस्ताव शासन मंजूरीसाठी पाठवावा लागणार आहे का? त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी व श्री.सी.एस.सोनी यांना शहर अभियंता पदावर नियुक्ती करण्याच्या या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता द्यावी.

**मा.महापौर :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (४) नुसार ठराव सादर केल्याप्रमाणे शहर अभियंता या पदासाठी सध्याचे अति.शहर अभियंता श्री.सी.एस.सोनी यांची शहर अभियंता या पदावर बदलीने पदस्थापना करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे अति.शहर अभियंता हे रिक्त होणाऱ्या पदावर मा.आयुक्तांच्या वतीने निवड समितीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करुन अतिरिक्त शहर अभियंता हे पद ५ दिवसाच्या आत भरण्यात यावे जेणेकरुन शहरातील सर्व विकास कामे होण्यास मदत होईल. या प्रस्तावास याच सभेत स्वीकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (४) अन्वये श्री.सी.एस.सोनी अतिरिक्त शहर अभियंता याची शहर अभियंता या पदावर

बदलीने पदस्थापना करण्यास व शासनास मंजूरीसाठी पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येऊन रिक्त होणारे अतिरिक्त शहर अभियंता हे पद निवड समितीने पात्र उमेदवारांची निवड करुन ५ दिवसांत भरण्यात यावे. असे सर्वानुमते ठरविण्यांत आले. त्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६८/८ :**

उपसंचालक, नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता जालना रोड ते गजानन महाराज मंदिर या रस्त्याने बाधित मिळकत धारक श्री.पी.एस.संचेती व इतर न.भू.क्र.१५१८७ मौजे गारखेडा या मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे.

उपरोक्त रस्त्याचा संपूर्ण विकास झालेला असल्याने अर्जदाराचे बाधित मिळकतीचा ताबा महानगरपालिकाने १९८७ ला घेतलेला आहे. परंतू त्या बाधित क्षेत्राचा संबंधित मोबदला मिळकत धारकास अद्याप पावेतो महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेला नाही. त्यामुळे अर्जदाराने खरेदी सूचना दिलेली आहे.

सबब अर्जदाराने उपरोक्त वि.यो.रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र ताबा पावती (पंचनामा) नुसार ९११० चौ.मी. आहे. करिता उक्त मिळकतीस संपादनाच्या रितसर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव व त्या करिता लागणाऱ्या भूसंपादन खर्चाचे मंजूरीसह मान्यतेस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यांत येईल.

<u>चर्चा :</u>

**श्री.नंदकुमार घोडेले :** प्रस्तावात खर्च किती होणारे दाखवले नाही. जे बजेट ठेवण्यात आलेले आहे. ते ४-५ प्रस्ताव सभागृहात मंजूरीसाठी आणून बजेट संपवायचे का? असा प्रश्न निर्माण होतो त्यासाठी खर्च किती, क्षेत्रफळ किती, विकास करण्याची गरज आहे का सविस्तर माहितीसह प्रस्ताव यापुढे मंजूरीसाठी आणावे तसे आदेश द्यावेत.

**मा.महापौर :** अशा प्रकारचे प्रस्ताव यापुढे सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावे या विषयावर काय निर्णय घ्यावयाचा मत मांडावे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** आज हा प्रस्ताव आणण्याची गरज का भासली. खुलासा द्यावा. सदर रस्ता मुळातच रुंद आहे.

**श्री.तकीहसन खॉन :** आज तेथे १०० फुट रुंद रस्ता आहे. सदर रस्ता १९८७ मध्ये ॲक्वायर करण्यात आलेला होता. रस्ता झालेला आहे. आता हा प्रस्ताव का आलेला आहे. कोणाची मिळकत आहे. तेथे बांधकाम परवानगी देतांना विकास खर्चाची रकम वळती केलेली आहे. असा घोटाळा होण्याची शक्यता आहे. यापुर्वी असे प्रकरण झालेले आहे. ज्या रस्त्याचा विकास करणे गरजेचे नाही अशा रस्त्याचे भूसंपादन करुन महानगरपालिकेचा पैसा खर्च करणे योग्य नाही. म्हणून या संदर्भात योग्य चौकशी झाली पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे दोन वेळेस भूसंपादनाची कार्यवाही होऊन पैसे दिलेले आहे. पुन्हा त्या

मिळकत धारकांना एफ.एस.आय. वाढवून दिलेला असावा याची योग्य ती चौकशी व्हावी. तयार रस्त्यावर पैसा वाया घालवणे योग्य नाही.

**सौ.सुवर्णा चंद्रात्रे :** ज्यावेळेस भूसंपादनाची कार्यवाही झाली. त्यावेळेस या मिळकतीचा समावेश नव्हता काय?

**मा.महापौर :** ज्यावेळेस भूसंपादाची कार्यवाही झाली. त्यावेळेस या मिळकत धारकांना पैसे देण्यात आलेले होते काय? वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात आले का? जागा किती आहे, खर्च किती लागणार याची सविस्तर माहिती नसल्याने हा प्रस्ताव पुढच्या बैठकीत फेर दुरुस्तीसह ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव सविस्तर माहितीसह व फेर दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

## पुरवणी विषय

**विषय क्र.३६९/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मो.हर्सुल भागात महानगरपालिकेचे दोन उद्याने आहेत. त्या उद्यानाला खालील प्रमाणे नांवे देण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

१) जटवाडा रोडवर असलेल्या तलावालगत उद्यानाला "स्व.इंदिरा गांधी उद्यान" असे नांव देण्यांत यावे.

२) खाम तलावा लगत असलेल्या उद्यानाला "छत्रपती शिवाजी महाराज उद्यान" असे नांव देण्यात यावे.

**सुचक :** श्री.रावसाहेब पा.औताडे,
**अनुमोदक :** श्री.माणिक साळवे.

**संवाद :**

**मा.महापौर :** प्रस्तावाचे सुचक असलेले स.सदस्य श्री.रावसाहेब औताडे यांचे वार्डातील हा प्रस्ताव नसल्याने व संबंधित वार्डातील नगरसेवक श्री.इलियास किरमाणी यांचा अर्ज माझ्याकडे आलेला आहे. त्यांना माहिती न देता हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला असून सध्या सभागृहात अनुमोदक उपस्थित नसल्याने हा प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात या प्रस्तावाचे अनुमोदक उपस्थित नसल्याने सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३७०/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ठाणे महानगरपालिकाने नविन उदयास येणाऱ्या वसाहती गृहनिर्माण संस्थेमध्ये त्यांनी स्वत:चे घन कचऱ्याचे व्यवस्थापन करावे, विल्हेवाट लावावी अशी व्यवस्था केलेली आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेने घन कचऱ्याचा पुर्नउपयोग करण्यासाठी नवीन वसाहतीमध्ये सर्वांना गरजेचे व आवश्यक असल्याचे ठरवून दिलेले आहे. सदर गृहनिर्माण संस्थांनी घन कचऱ्यासाठी त्यांच वसाहतीत जागा नेमून त्यांचे कंपोष्ट इ.संदर्भात पुर्उपयोग करता यावा म्हणून समाजलक्षी (एन.जी.ओ.) संघटनाकडून रहिवाश्यांना प्रशिक्षीत करण्यात यावे. याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेनही योजना राबवावी. करिता सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सुरजितसिंग खुंगर,

**अनुमोदक :** श्री.किशोर शिंदे.

**संवाद :**

**श्री.सुरजितसिंग खुंगर :** ठाणे महानगरपालिकेने नवीन उदयास येणाऱ्या गृहनिर्माण संस्थेमध्ये त्यांनी स्वत:चे घन कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याचा ठराव पास केलेला असून त्याचप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने सुध्दा होणाऱ्या नवीन वसाहतींच्या रेखांकनात एक जागा ठरवून प्रत्येक सोसायटीमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची उपाययोजना करण्याचा निर्णय घ्यावा. शहरातील बऱ्याच जनतेच्या कचऱ्या संदर्भात तक्रीर आहेत. कचऱ्याची योग्य तऱ्हेने विल्हेवाट लागत नाही. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची सुध्दा कचऱ्याच्या संदर्भात तक्रार आहे. करिता प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने सुध्दा तशी कार्यवाही करावी. यामुळे महानगरपालिकेवर जो खर्चाचा बोजा आहे. तो कमी होईल व कुणाच्या तक्रारी सुध्दा राहणार नाही.

**मा.महापौर :** या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. यापुढे नगर रचना विभागाने कुठलेही रेखांकन मंजूर करत असतांना कचरा टाळण्यासाठी व्यवस्था करावी. रेखांकन मंजूर करतांना नकाशात अशी जागा दाखविण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ठाणे महानगरपालिकेप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने उदयास येणाऱ्या वसाहती/गृहनिर्माण संस्थांमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता त्या त्या वसाहतीमध्ये जागा नेमून त्याचा पुनउर्पयोगकरता यावा म्हणून समाजलक्षी (एन.जी.ओ.) संघटनाकडून रहिवाश्यांना प्रशिक्षीत करण्याची योजना राबविण्यांस तसेच यापुढे नगररचना विभागाने कुठलेही रेखांकन मंजूर करतांना कचरा टाकण्यासाठी रेखांकन नकाशात अशी जागा दर्शविण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७१/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मो.गारखेडा येथील गट क्रमांक १ गारखेडा परिसरामध्ये ओपन स्पेस (खुली जागा) आहे. ही जागा जामा

मस्जीद लगत असल्यामुळे या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे शादीखाना बांधण्यांत यावे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** श्री.शेख शकील पटेल,
**अनुमोदक :** श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ,
श्री.शेख ईसाक जैनोद्दीन शेख.

<u>**चर्चा :**</u>

**मा.महापौर :** सभागृहात सूचक उपस्थित नसल्याने हा विषय स्थगित करण्यात येत आहे. (काही वेळानंतर सुचक सभागृहात येतात.)

**श्री.काशिनाथ कोकाटे :** पुरवणी विषय पत्रिकेवर विषय क्र.३ स्थगित ठेवण्यता आलेला आहे. सदरील प्रस्तावाचे सूचक सभागृहात हजर आहेत. प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

**मा.महापौर :** ज्या वेळेस विषय मंजूर करायचा होता. त्यावेळी सुचक सभागृहात हजर नव्हते. म्हणून प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे. तसा तो विषय होऊ शकत नाही. कारण या वर्षी महानगरपालिकेने कुठेही नविन इमारत बांधण्याचे ठरवलेले नाही. खुल्या जागेमध्ये शादीखाना बांधायचा हा विषय होऊ शकत नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** या अगोदर मा.आमदार श्री.बसैय्ये बंधू यांच्या निधीतून ओपन - स्पेसवर १०%, १५% जागेमध्ये सभागृह बांधण्यात आलेले आहे.

**मा.महापौर :** हा विषय पुढच्या बैठकीत मंजूर करण्यांत येईल. आता ऐनवेळच्या विषयावर बोलावे. (याचवेळी विरोधी पक्ष नेता तसेच इतर स.सदस्य मा.महापौर यांचे डायस जवळ जाऊन प्रस्ताव मंजूर करण्यासाठी मोठमोठ्याने मागणी करतात. काहीही ऐकू येत नाही.)

**मा.महापौर :** सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.
(सर्व स.सभाद आपआपल्या जागेवर येऊन बसतात.)

**श्री.अंबादास दानवे :** सभागृहात सूचक उपस्थित नव्हते म्हणून विषय क्र.३ स्थगित ठेवण्यांत आलेला आहे. परंतू सभा संपलेली नसून आता सूचक सभागृहात आलेले आहेत. म्हणून तो विषय मंजूर करण्यास हरकत नाही.

**मा.महापौर :** नियमाप्रमाणे प्रस्तावाचे सूचक व अनुमोदक यापैकी कुणीही एक उपस्थित नसेल तर तो प्रस्ताव मंजूर करता येत नाही. स.सदस्य त्या प्रस्तावाचे सूचक होते त्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते. म्हणून हा प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे. मंजूर करण्यासाठी काही स.सदस्यांनी गैरवर्तन केलेले आहे. यापुढे असे गैरवर्तन करणे योग्य नाही.

**श्री.भगवान घडामोडे :** संबंधित प्रस्तावाचे सूचक सभागृहात आलेले आहे. प्रस्ताव मंजूर करावा. परंतू यापुढे असे अशासकीय प्रस्तावासंबंधी प्रशासनाची भूमिका काय आहे हे विचारात घेऊन मंजूर करावे. नसता प्रस्ताव मंजूर होतात व कामे काहीच नाही. कोणता प्रस्ताव ठेवणे योग्य आहे, कोणता योग्य नाही याचा सुध्दा स.सदस्यांनी विचार करावयास पाहिजे. हा विषय मंजूर करावा परंतू यापुढे असे प्रस्ताव मंजूर करतांना प्रशासनाचे मत काय आहे ते घेण्यांत यावे.

**श्री.अंबादास दानवे :** असे प्रस्ताव ठेवतांना यापुढे प्रशासनाचे मत घ्यावे.

**मा.महापौर :** बजेटच्या बैठकीत आपण तरतूद करतो. सांस्कृतिक हॉल बांधला जातो, वाचनालय बांधले जाते. शादीखाना बांधले आहेत. या सर्वांना कर्मचारी नसल्याने बंद करुन ठेवलेले आहे. यामुळे मनपाचा पैसा वाया गेलेला असून उत्पन्न काहीच नाही. म्हणून आपण धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. जोपर्यंत पाहिले हॉल, बांधलेल्या इमारती उपयोगात येईपर्यंत हा प्रस्ताव मंजूर करुन काय करणार? तरतूद ठेवलेली नाही तर कसे बांधणार असा प्रश्न निर्माण होतो.

**श्री.स.अली मिरा सलामी :** आपली सही होऊन प्रस्ताव पुरवणीमध्ये येतात. या अगोदरच विचार करुन प्रस्ताव ठेवणे योग्य आहे.

**मा.महापौर :** स.सदस्य सहीसाठी प्रस्ताव माझ्याकडे घेऊन आल्यानंतर हा प्रस्ताव योग्य नाही असे म्हटले तरी सही झाल्याशिवाय माझ्या केबीनमधून जात नाही. या अगोदर आपण संबंधित विभाग प्रमुखांकडे अशासकीय प्रस्ताव अभिप्रायासाठी पाठविण्यांची पध्दत सुरु केलेली होती. परंतू त्यावेळी काही प्रस्ताव आपण मंजूर केल्यानंतर या ठिकाणी आक्षेप घेण्यांत आले की, ठरविकच प्रस्ताव मंजूरीसाठी येतात. म्हणून स.सदस्य नाराज झाले होते. म्हणून सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूर झाला म्हणजे कार्यवाही होईल. अशी परिस्थिती आपल्या महानगरपालिकेची राहिलेली नाही. म्हणून आपण जे बजेट ठेवलेले आहे. त्यानुसार कोणते प्रस्ताव ठेवणे योग्य आहे, कोणते योग्य नाही याचा विचार स.सदस्यांनीच करावयाचा आहे. विषय क्र.३ सर्वानुमते आता मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मो.गारखेडा येथील गट क्र.१ गारखेडा परिसर मध्ये खुल्या जागेत शादीखाना बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतील आरोग्य विभागात काम करणारे वैद्यकीय अधिकारी यांना दरमहा रु.५०००/- रुपये ठराविक वेतन सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले असून हे वेतनसर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना लागू केलेले आहे. परंतू त्याच महानगरपालिकेत काम करणारे वैद्यकीय अधिकारी (होमियोपॅथी) या पदांना लागू केलेले नाही. ते त्याही वैद्यकीय अधिकारी यांना लागू करावे व त्यानुसार ठराविक वेतन मंजूर करणेसाठी प्रस्ताव सादर करत आहे.

**सुचक :** सौ.चंद्रभागाबाई दाणे,

**अनुमोदक :** सौ.रशिदा बेगम.

**विषय क्र.३७२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतील आरोग्य विभागात काम करणारे वैद्यकीय अधिकारी यांनी दरमहा ५०००/- रुपये ठराविक वेतन सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले असून हे वेतन सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना लागू केलेले आहे. परंतू त्याच

महानगरपालिकेत काम करणारे वैद्यकीय अधिकारी (होमियोपॅथी) या पदांना लागू केलेले नाही. ते त्याही वैद्यकीय अधिकारी यांना लागू करावे व त्यानुसार ठराविक वेतन मंजूर करणेसाठी प्रस्ताव सादर करत आहे.

**सुचक :** सौ.चंद्रभागाबाई दाणे,

**अनुमोदक :** सौ.रशिदा बेगम.

**मा.महापौर :** या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावास दर्शविल्याप्रमाणे आरोग्य विभागातील इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणेच "वैद्यकीय अधिकारी" (होमियोपॅथी) या पदावर काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना दरमहा रुपये ५०००/- ठराविक वेतन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७३/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.३८ येथील बेगमपुरा स्मशानभूमी असून त्या ठिकाणी विधी संपल्यावर लोकांना शोकसभा ही रोडवर आयोजित करण्यात येते. ज्यामुळे वाहतुकीस फार अडथळा निर्माण होत आहे.

तरी वरील ठिकाणी असलेली मोकळी जागा लेवल करुन त्या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे "शोकसभा मंडप" बांधण्यात यावे. ज्यामुळे वाहतुक व रहदारी अडथळा होणार नाही. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.किशोर रावसाहेब शिंदे,

**अनुमोदक :** श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ,

श्री.ठकुजी रामसिंग वाणी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म.न.पा. हद्दीतील वार्ड क्र.३८ बेगमपुरा स्मशानभूमीच्या ठिकाणी असलेली मोकळी जागा लेवल (सपाटीकरण) करुन त्या ठिकाणी म.न.पा.तर्फे "शोकसभा मंडप" बांधण्यांत सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७४/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बन्सीलालनगर भागात महानगरपालिकेमार्फत शालेय इमारत उभारण्यांत आली आहे. या वसाहती लगतचे पदमपुरा येथील मोची समाज बांधवानी या शाळेला "संत शिरोमणी गुरु रविदास महाराज महापालिका शाळा" असे नांव देणे बाबत लेखी पत्र सादर केले आहे. गुरु रविदास हे राष्ट्रीय संत असून त्यांनी सर्व धर्म स्वभावाची शिकवण दिलेली आहे, ते सर्व स्तरातील व समाजातील लोकांन पुजनिय आहे. पदमपुरा येथील मोची समाज बांधवाची मागणीचा विचार करुन बन्सीलालनगर येथील शाळेला "संत शिरोमणी गुरु रविदास महाराज महानगरपालिका शाळा" असे नांव देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.अंबादास दानवे,

श्री.विकास जैन

**अनुमोदक :** श्री.संजय शिरसाट,
श्री.नंदकुमार घोडेले,
सौ.निर्मला कांबळे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर भागात महानगरपालिकेतर्फे उभारण्यांत आलेल्या शालेय इमारतीस "संत शिरोमणी गुरु रविदास महाराज महानगरपालिका शाळा" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७५/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, जगत ज्योती महात्मा बसवेश्वर हे एक थोर क्रांतीवीर व थोर विचारवंत, समाजसुधारक होऊन गेले आहेत. त्यांच्या स्मृत्यर्थ आकाशवाणी येथील चौकास सदरील थोर महात्मा जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांचे नांव देण्याबाबत प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.भरत लकडे,
**अनुमोदक :** श्री.अंबादास दानवे,
श्री.किशोर शिंदे,
श्री.सुनिल वडागळे.

**संवाद :**

**श्री.भगवान घडामोडे :** विषय ठेवत असतांना संबंधित वार्डातील नगरसेवकांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. व यापुढे असे प्रस्ताव आल्यास संबंधित वार्डातील नगरसेवकांना सूचक म्हणून नांव प्रस्तावामध्ये समाविष्ट असावे.

**मा.महापौर :** हा विषय स्विकृतीसह मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आकाशवाणी येथील चौकास "जगत ज्योती महात्मा बसवेश्वर चौक" असे नांव देण्यास सर्वानुमते स्वीकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७६/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभागातील न्यु समर्थनगर येथील तापडिया सर्कल येथील चौकास "शिवराम चौक" असे नांव देणे बाबत प्रभागातील नागरिकांनी मागणी केली आहे. शिवराम प्रतिष्ठान या संस्थेमार्फत देखील सदर चौकास असे नांव देणे बाबत सतत मागणी होत आहे. रहिवाशी तसेच शिवराम प्रतिष्ठान या संस्थेची मागणी विचारात घेता सदर चौकास "शिवराम चौक" असे नांव देणे अत्यंत आवश्यक आहे. करिता न्यु समर्थनगर भागातील तापडिया सर्कल येथील चौकास "शिवराम चौक" असे नांव देणे बाबत प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**सुचक :** श्री.आनंद तांदुळवाडीकर,
श्री.अंबादास दानवे,

**अनुमोदक :** श्री.दत्तात्रय थोरात,
श्री.भरत लकडे,

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु समर्थनगर येथील तापडीया सर्कल येथील मुख्य चौकास "शिवराम चौक" असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७७/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मौजे कांचनवाडी येथील गट नं.११ येथे श्री.संजय पंडीतराव, राजकुमार, ऋषीकुमार व लतादेवी, नवीनकुमार यांचे संयुक्त मालकीचे असून यापैकी सुमारे २७१०० चौ.मी. इतके क्रिडांगणाचे आरक्षण क्र.एस-२/ई साठी आरक्षित ठेवलेले असून आजच्या बाजार भावाने या आरक्षणाखालील जमिनीची किंमत सुमारे २.७५ कोटी इतकी होते. विकास योजनाचे अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेचे अर्थसंकल्पात मुबलक तरतूद उपलब्ध होत नाही. त्यामुळे अंमलबजावणीसाठी परिणामकारक रित्या अंमलबजावणी होत नाही व ही विकास योजना मंजूर होऊन जवळपास १० वर्षे पूर्ण होत आहेत व अंमलबजावणी मात्र २% ही झालेली नाही. सबब सदरील जमीन मालक त्यांच्या आरक्षीत असलेल्या जागेतून निम्मी जागा (५०% जागा) म्हणजेच १३५८५ चौ.मी. जागा महानगरपालिकेस विना मोबदला देण्यात तयार आहे. तरी १३५८५ चौ.मी.जागा महानगरपालिकेने क्रिडांगणाच्या आरक्षणासाठी ताब्यात घेऊन ते विकसीत करण्यात यावे व उर्वरित १३५८५ चौ.मी. जमीन आरक्षणातून वगळून निवास भागात सामील करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये जागा फेरबदल करण्याची कार्यवाही करण्यास व या संबंधीचे अधिसूचना काढण्यास, सुनावणी देणे व अंतिमरित्या प्रस्ताव शासनास सादर करणे ई. अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे करिता प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**सुचक :** श्री.सुदाम पाटील सोनवणे,
**अनुमोदक :** श्री.पांडुरंग तायडे पाटील.

**<u>संवाद :</u>**

**श्री.खुंगर सुरजितसिंग :** या अगोदर बरेच प्रस्ताव पास झालेले आहे. परंतू महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारची जागा मिळालेली नाही. काहीही फायदा झालेला नाही. आतापर्यंत किती करारनामा केलेले आहेत. याची नगररचना विभागाकडून माहिति घ्यावी. कुणाच्या ॲग्रीमेंटनुसार २५%, ५०% मिळालेली आहे का? याचा सुध्दा खुलासा घेण्यात यावा.

**सौ.सुवर्णा चंद्रात्रे :** प्रस्ताव चांगला आहे. परंतू कोठे नाला, नदी, डोंगर, सपाट आहे हे सविस्तर माहिती नगर रचना विभागाकडून नकाशासह घ्यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** जागेबाबतचा ठराव असून विकास आराखड्यानुसार जागा उपलब्ध आहे. परंतू महानगरपालिका विकास करीत नाही. जागा घेऊन मनपा काय करणार म्हणून हा प्रस्ताव प्रशासनाकडून यावा.

**श्री.सुदाम सोनवणे :** हे आरक्षण ठेवून सप्टेंबर २००१ ला १० वर्षे होतात. कलम १२७ खाली खरेदी सूचना दिल्यावर जागा आरक्षणातून सुटेल. त्या मालकाचे अभिनंदन

करावे. ज्या जमिनीचे मनपाने आरक्षण केले आहे. त्यापैकी पुर्वेकडील अर्धा भाग सोडून अर्ध्या भागाची किंमत सुध्दा संबंधित मालक मनपाकडून घेणार नाही. कांचनवाडी भागातील मंजूर विकास आराखड्यातील हा प्रस्ताव सादर केलेला असून संबंधित मालकास २ ते २.५० कोटी रुपये देण्याची गरज पडणार नाही. म्हणून हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** अभिनंदन करण्यासारखे आहे. आरक्षणात १० वर्षे होत आहेत. संबंधित मालकाने महानगरपालिकेकडे लेखी दिलेले आहे काय? जमिन मालक कोण आहे. संमती पाहिजे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** या प्रस्तावास माझा विरोध नाही. भूसंपादनासाठी बजेटमध्ये जी तरतूद ठेवलेली आहे. ती अत्यंत कमी असू अशा रस्त्याचे रुंदीकरणासाठी केलेली तरतूद कमी पडेल.

**मा.महापौर :** आरक्षण उठवले तर संबंधित मालक ५०% जागा मनपात मोफत देण्यास तयार आहे. परंतू संबंधित मालकाने तसा अर्ज केलेला आहे. किंवा काय याबाबत माहिती देण्यात यावी.

**उपसंचालक, नगररचना :** संबंधित मालकाने महानगरपालिकेस अर्ज केलेला नाही. तथापि शासनाकडे अर्ज दाखल केलेला होता व शासनाकडून अभिप्राय मागवलेले होते. उपसंचालक नगर रचना यांचा अभिप्राय शासनाकडे गेलेला आहे.

**श्री.प्रकाश निकाळजे :** आपल्या नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास संबंधित मालक तयार असेल तर हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी. ४-५ दिवसात अर्ज करुन नगररचना विभागाकडे संपर्क साधून करारनामा करुन पूर्तता करावी.

**श्री.अंबादास दानवे :** मुळ मालकाकडून ॲग्रीमेंट करण्यांत येऊन पुन्हा सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे.

**श्री.नंदकुमार घोडेले :** अटीसह मंजूर करावा. त्रुट्या असतील तर पूर्ण करुन घ्यावे.

**मा.महापौर :** हि जागा घेत असतांना कोणत्या नियम व अटींचे पालन करणे गरजेचे आहे. नगररचना विभागाने खुलासा करावा.

**उपसंचालक, नगररचना :** ही जागा क्रिडांगणासाठी आरक्षित आहे. संबंधित मालकाची जी जागा आहे. ती जागा ५०% विना मोबदला हस्तांतरीत करण्यास तयार असून तसा प्रस्ताव आपल्यापुढे आलेला आहे. असा प्रस्ताव मान्य करतांना संबंधित मालकांचा अर्ज असणे आवश्यक आहे. ५०-५० टक्के जे प्रपोजल आहे. त्यास शासनाची मान्यता होणे आवश्यक आहे. व कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन शासनाची यास मान्यता घेणे गरजेचे आहे.

**मा.महापौर :** संबंधित मालकाने शासनाकडे अर्ज दिलेला आहे. मनपाकडे अर्ज दिलेला नाही. संबंधित मालकाने मनपाकडे अर्ज द्यावा. मनपाने ५०% जागा अगोदर ताब्यात घ्यावी, राजिष्ट्री करुन घ्यावी. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे कांचनवाडी येथील गट नं.११ मधील श्री.संजय पंडीतराव, राजकुमार ऋषीकुमार व लतादेवी, नवीनकुमार यांचे संयुक्त मालकीच्या सुमारे २७१७० चौ.मी. च्या आरक्षण क्र.एस-२/ई "क्रीडांगणासाठी" आरक्षीत जागेपैकी पूर्वेकडील निम्मी (५०% जागा) म्हणजेच १३५८५ चौ.मी. जागा महानगरपालिकेस विना मोबदला देण्यास संबंधित जमीन मालक तयार असल्यास त्यांनी मनपाकडे अर्ज द्यावा. मनपाने प्रथम ५०% जागा रजिष्ट्री करुन ताब्यात घ्यावी. सदरील प्रकरणास कलम ३७ अन्वये कार्यवाही

करुन शासनाची मान्यता घेणे गरजेचे असल्याने त्याप्रमाणे मान्यता घेण्यांत यावी. वरीलप्रमाणे सर्व बाबींची कायदेशीर पूर्तता करुन घेऊन यापैकी उर्वरीत (१२५८५ चौ.मी.) निम्मी जागा आरक्षणातून वगळून निवास भागात सामील करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिथ्यम १९६६ चे कलम ३७ अन्वये जागा फेरबदल करण्याची कार्यवाही करण्यास व या संबंधीचे अधिसूचना काढणे, सूनावणी देणे व अंतिम रित्या प्रस्ताव शासनास सादर करणे इत्यादी अधिकारी मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७७-अ/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पानदरीबा ते किराणा चावडी या रोडला आचार्य तुळशीमार्ग असे नांव देण्यात यावे. आचार्य तुलशी हे जैन समाजाचे थोर संत होते व ते आचार्य होऊन गेलेले आहे.

तरी सदरील रोडला "आचार्य तुलशी मार्ग" असे नांव देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.किशनचंद तनवाणी,
श्री.जगदिश सिध्द,
श्री.प्रशांत देसरडा, श्री.विकास जैन.
**अनुमोदक :** श्री.भगवान घडामोडे,
सौ.निखत परवीन इजाज अली.

**मा.महापौर :** विषय क्रमांक १० सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पानदरीबा ते किराणा चावडी या रोडला "आचार्य तुलशी मार्ग" असे नांव देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र.३७८/१ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी शहरातील काही विकसीत भागाच्या पाणीपुरवठ्या संदर्भात एक प्रस्ताव सादर केला आहे.

आज शहरात ११५ ते १५० द.ल.लि. निव्वळ पाणी पुरवठा जायकवाडी उद्‌भवाद्वारे हेत आहे. शहराची लोकसंख्या अंदाजे ९.५० लाखावर असल्याने उपरोक्त पुरवठा तोकडा पडत आहे. त्यामुळे शहरा व्यतिरिक्त विस्तारीत भागाचा पाणी पुरवठा करणे शकय होत नसल्याने त्या भागाच्या रोज तक्रारी येत आहेत. सदरचा विकसीत भाग म्हणजे पुंडलिकनगर, न्यायनगर, मातोश्रीनगर, हुसैननगर, एन-२/३, म्हाडा कॉलनी मुर्तीजापूरा वगैरे भाग येतो. सदर भाग हा स्थित विवरण पातळीपासून उंचावर असून आज पाणी पुरवठा सुध्दा करण्याची परिस्थिती नाही.

हया करिता दरम्यानच्या काळात म.औ.वि.मंडळाकडे विचारणा केली असता, त्यांचे जे ७५.०० द.ल.लि. क्षमतेचे शुध्दीकरण आहे. त्यापासून निघणाऱ्या उर्ध्वनलिकेद्वारे उपरोक्त भागाची साधारण ७.०० द.ल.लि. ची गरज भागवू शकेल अशी संपत्ती दिली आहे. हया करिता त्यांनी पाणी दरपत्रक दिले आहे. त्यानुसार रु.५.०० प्रति/घ.मी. दराने पाणी देण्याची तयार दर्शविली आहे. या दराने प्रतिदिनी ७.०० द.ल.लि. परिमाणासाठी प्रती महिन्यासाठी ७०००X५.००X३०=१.५० लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे.

याबाबत त्यांच्या मुख्य जलवाहिनीवर (६६० मी.मी.) पोलादी दोन ठिकाणी आडव्या जोडण्या (उपरोक्त भागाकरिता) तांत्रिक दृष्ट्या कशा घेता येतील. याबाबत सविस्तर अंदाजपत्रक प्रस्ताव मंजूरीनंतर केला जाईल. यामध्ये दोन जलमापक, योग्य व्यासाच्या जलवाहिन्या व जोडण्याबाबतचा खर्च येईल. पातळीनुसार पाणी कसे घेता येईल व नागरिकांना कसा फायदा होईल याचा अहवाल व अंदाजपत्रक देण्यात येईल.

हया प्रस्तावामध्ये अपेक्षित वार्षिक खर्च १२६.०० लक्ष येणार आहे. व त्याचा जो आर्थिक बोजा म.न.पा वर पडणार आहे. त्याचा महसुल ग्राहककडून १२००/- प्रति १/२ "नळ जोडणीद्वारे तसेच व्यावसायिक असल्यास योग्य त्या प्रस्तावित दराद्वारे वसुल करण्यात येईल.

पाणी प्रश्न पाहता व आर्थिक बोजा न पडता जर "पाणी पुरवठा योजना" स्वयंपूर्ण होत असले तर हा प्रस्ताव करणे ईष्ट राहील. मंजूरीस्तव सादर.

<u>संवाद :</u>

**श्री.कोकाटे काशिनाथ :** उशीरा का होत नाही प्रशासनामार्फत प्रस्ताव सादर झाल्याबद्दल धन्यवाद. परंतू प्रस्ताव मंजूर केल्यानंतर त्यांची अंमलबजावणी कधी होणार कारण पाण्याच्या संदर्भात बरेच नागरिकांच्या तक्रारी आहे. काही भागात २-२ दिवस पाणी सोडण्यात येत नाही. म्हणून नियमित पाणी पुरवठा होत नसल्याने रात्री बेरात्री कधी पाणी सोडण्यात येते हे योग्य नाही. काही भागात मुबलक व काही भागात २०-२५ मिनिटे पाणी सोडण्यात येते. यावरुन प्रशासनाने पाण्याविषयी नियोजन आहे. असे वाटत नाही. हा प्रस्ताव मंजूर करण्यात हरकत नाही. परंतू याची अंमलबजावणी कधी करणार.

**मा.महापौर :** हा प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर करण्यांत येत आहे. अंमलबजावणी कधी होणार याचा खुलासा संबंधित अधिकारी यांनी करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** एम.आय.डी.सी. कडून पाणी विकत घेण्याचा हा प्रस्ताव आहे. यामध्ये महानगरपालिका व एम.आय.डी.सी. यांचेत करारनामा करुन घेतला जाईल. संबंधित संस्थेत मार्फत तांत्रिक दृष्ट्या कोठे जोडणी देतील त्यांचे सर्वेक्षण केले जाईल. यासाठी १५ ते २० दिवस लागतील. त्यानंतर इतर जलवाहिन्या जोडण्यासाठी देखील वेळ लागेल असा एकूण १ महिन्याचा कालावधी यासाठी लागण्याची शक्यता आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** एम.आय.डी.सी. च्या सॅम्प पासून टाऊन सेंटर पर्यंतच्या पाईपलाईन तयार आहे. इतका अवधी लागणार नाही. म्हणून ७ दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**श्री.भगवान घडामोडे :** सिडको-हडको जनतेला पाण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागत आहे. कधी पाणी येईल. किती वेळ राहील हे निश्चित सांगता येणार नाही. त्यासाठी या प्रस्तावानुसार ताबडतोब जोडणीचे काम करुन ७-८ दिवसात

कार्यवाही करावी नसता उन्हाळा संपेल नंतर पाण्याची व्यवस्था होईल त्याचा काहीही उपयोग होणार नाही.

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. परंतू प्रशासनाच्या वतीने १ महिन्याचा वेळ दिला तरी लवकरात लवकर ७ ते ८ दिवसात कार्यवाही करण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** यामध्ये पाईप लाईनचे जोडणीचे काम करावे लागणार. त्यासाठी टेंडर काढून कार्यवाहीस वेळ लागणार आहे. शक्य तितक्या लवकर कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** माझ्या माहितीप्रमाणे एम.आय.डी.सी. ते एन-१ च्या टाकीपर्यंत पाणी आणण्यासाठी खर्च येणार त्याचा खर्च सिडको करणार असे पत्र महानगरपालिकेस आले आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** सिडको जे काम करणार आहे. म्हाडासाठी करणार आहे. विमानतळाजवळ म्हाडाची घरे आहे. त्यासाठी काम करणार आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** म्हाडासाठी सिडको पाईप लाईनचे काम करत नाही. अधिकारी चुकीची खुलासा करत असून माझी या संदर्भात सिडकोचे अधिकारी यांचेशी चर्चा झालेली आहे. विनाकारण महानगरपालिकेचा पैसा खर्च होईल. सिडको एम.आय.डी.सी. भागातून टाऊन सेंटर येथे असलेल्या संप मध्ये पाणी येते. माननीय श्री.रोहिदास पाटील यांचे दालनामध्ये बैठक झाली त्या बैठकीत या खर्चास सिडकोने मान्यता दिलेली आहे. म्हणून महानगरपालिकेमार्फत सिडकोला तसे कळविण्यांत यावे व कार्यवाही करावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** मुर्तजापूरला जी म्हाडाची घरे झालेली आहे. म्हाडाने सिडकोकडे पाण्यासाठी पैस भरलेले आहे. त्या पाईपलाईनशी आपला संबंध येत नाही.

**श्री.पांडुरंग तायडे :** सिडको-हडको मध्ये वेळेवर पाणी येत नाही. आले तरी १० ते १५ मिनीटे पाणी येते. भरपूर पाणी मिळत नसल्याने भांडणे होतात. या प्रस्तावानुसार कार्यवाही करण्यास ३० दिवसाचा वेळ जास्त होतो. पाण्याचा प्रश्न असल्याने ८ दिवसाच्या आत कार्यवाही करण्यात यावी.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी ताबडतोब अंदाजपत्रक तयार करुन अल्पमुदतीची निविदा घेऊन कार्यवाही करावी. ३० दिवसांचा वेळ जास्त होता. जनतेच्या पाण्याचा प्रश्न आहे. १० दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या ७५.०० द.ल.लिटर क्षमतेच्या शुध्दीकरणातून निघणाऱ्या उर्ध्वलिकेद्वारे पुंडलिकनगर, न्यायनगर, मातोश्रीनगर, हुसैननगर, एन-२/३, म्हाडा मुर्तीजापूर इत्यादी भागात साधारण: ७.०० द.ल. लिटरची गरज भागणार असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडून प्रति घ.मी. रु.५/- या दराने प्रतिदिन ७.०० द.लि. मिटर म्हणजेच प्रतिमहा ७००० x ४.०० x ३० = १०.५० लक्ष याप्रमाणे वार्षिक रक्कम रु.१२६ लक्ष अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३७९/२ :**

सिडको नियोजन प्राधिकरण औरंगाबाद यांनी औरंगाबाद जालना रस्त्याच्या दक्षिणेकडील सिडको अधिसूचित क्षेत्राचा नियोजन प्रस्ताव तयार करुन शासनाच्या

मंजूरीकरिता सन १९९१ मध्ये सादर केला होता. सदर प्रस्तावास शासन मंजूरी प्रलंबित असतांना मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी एक जनहित याचिकेवर आदेश देतांना महाराष्ट्र शासनाने ०६ महिन्याच्या विहीत मुदतीत (मा.न्यायालयाचा आदेश दिनांक १०.११.२००० पासून) सदर नियोजन प्रस्ताव मंजूर करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने शासनाने सिडकोने सादर केलेल्या नियोजन प्रस्ताव मंजूर न करता काही तांत्रिक त्रुटीमुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ वे कलम ११५ (२) अन्वये पुहा शासन राजपत्रातून व स्थानिक वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देऊन या प्रस्तावानर जनतेच्या हरकती व सूचना मागवून व नियोजन समितीद्वारे सदर हरकती/सूचनांना सुनावणी देऊन शासनाच्या मंजूरीस्तव सादर करणे बाबत अधिसूचना दिनांक १२.०१.२००१ अन्वये आदेश पारित केले आहे. या आदेशानुसार सिडको नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र, प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतूदीनुसार नियोजन समितीची नियुक्ती केली. सदर नियोजन समितीमध्ये सदस्य म्हणून १) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, २) मुख्य प्रशासक (नवीन शहरे) सिडको औरंगाबाद व ३) अतिरिक्त मुख्य नियोजनकार (नवी मुंबई/नवी शहरे) सिडको मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली होती. नियोजन समितीपुढे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/सुचनावर सुनावणी होऊन समितीने आपला अहवाल सिडको प्राधिकरणाच दिनांक ०७.०३.२००१ रोजी सादर केला असून हा अहवाल सिडको संचालक मंडळाने ठराव क्रमांक ८३१८ दिनांक १२.०३.२००१ अन्वये मंजूर केला आहे. या अनुषंगाने सिडकोला शासनाने दिलेल्या आदेशानुसार सदर भागाचा नियोजन प्रस्ताव उपरोक्त अधिनियमाच्या तरतूदीचे पालन करुन सिडकोने दिनांक १२.०३.२००१ रोजीच्या पत्रान्वये शासन मंजुरीस्तव सादर केला आहे.

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशान्वये शासनास आदेश दिला आहे की, सिडकोच्या औरंगाबाद जालना रस्त्याच्या दक्षिणेकडील भागाचा नियोजन प्रस्ताव मंजूर करते वेळी औरंगाबाद महानगरपालिकेचा सल्ला घ्यावा. या अनुषंगाने मा.उपसचिव, नगरविकास विभाग, यांनी पत्र दिनांक ०७.०४.२००१ अन्वये महानगरपालिकेचे अभिप्राय मागविले आहे. सिडकोने सादर केलेला उपरोक्त भागातील १९४.२८ हेक्टर क्षेत्राचा सुधारित नियोजन प्रस्ताव उपरोक्त अधिनियमातील तरतूदीनुसार पूर्ण करुन कार्यवाही केलेली असल्यामुळे सिडकोने शासनास सादर केलेल्या सुधारित नियोजन प्रस्तावावर औरंगाबाद महानगरपालिकेची कोणतीही हरकत नसावी असे प्रस्तावित करण्यात येते, मंजूरीनंतर तसे शासनास आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी कळविले बाबत प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :</u>**

**मा.महापौर :** आतापर्यंत सिडकोने जो विकास केलेले आहे. जे विकसीत झालेले आहे. त्यास महानगरपालिकेची हरकत नाही असे पात्र सिडकोला पाहिजे आहे. थोडक्यात माहिती मी दिलेली आहे. या शिवाय हस्तांतरण होणार नाही. हस्तांतरणापुर्वी सिडकोचे नगरसेवका समवेत बैठक घेतली जाईल. त्यानंतर सिडकोचे अधिकारी आपले यांची बैठक व हस्तांतरण वेळी आपण विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करुन कार्यवाही करणार आहोत. परंतू आता एन.ओ.सी.चे पत्र देणे गरजेचे आहे. म्हणून सिडकोचे श्री.जाधव तसेच श्री.शिंदे साहेबत हे दोघे येथे आलेले आहे. सिडको व महानगरपालिकेचे अधिकारी यांची सिडको कार्यालयामध्ये हस्तांतरणा संबंधी बैठक झालेली असून त्यामध्ये सिडकोने महानगरपालिकेस १०.४७ कोटी रु. देण्याचे मान्य

केले परंतू ज्या सिडको अंतर्गत मालमत्ता आहेत. त्यांची किंमत म्हणून सिडकोने ८ कोटी रुपये लावलेले आहे. त्याची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात येईल. परंतू आता ना हरकत प्रमाणपत्र देण्याची गरज आहे. यामध्ये उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. सिडकोचा डेव्हलपमेंट प्लॅनला महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन शासनाकडे पाठवावे असे शासनाकडून पत्र आलेले आहे. सिडको हे महानगरपालिकेच्या हद्दीत असल्याने व हस्तांतरणाची कार्यवाही चालू असल्याने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे तसे ना हरकत प्रमाणपत्र शासनाकडे पाठवणे आवश्यक आहे. सविस्तर प्रस्ताव सचिव यांनी सभागृहात वाचून दाखवावा.

**नगरसचिव :** (प्रस्ताव वाचून दाखवतात.)

**श्री.सुदाम सोनवणे :** जालना रोडच्या दक्षिणेकडील भागाचे नियोजन केलेले आहे असे दिले कशा पध्दतीने नियोजन केले त्याची माहिती सभागृहाला व्हावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** जो विकास आराखडा तयार करण्यात आला त्यास महानगरपालिकेची मंजूरी घेऊन अहवाल शासनास पाठवावयाचा आहे. जालना रोडच्या दक्षिणेस जो विकास आराखडा तयार केला त्यास सिडकोने महानगरपालिकेची मंजूरी घेतलेली होती काय? हा एक खुलासा करावा. मंजूरी घेतलेली नाही. म्हणून आज तसा प्रस्ताव सादर झालेला आहे असे वाटते. या भागात ८०% वसाहती झालेल्या असून अधिकृत काही अनाधिक आहेत. कोणत्या जागा आरक्षित आहेत. किती जागा शिल्लक आहे. शाळा, खेळाचे मैदानासाठी किती याची सविस्तर माहिती सिडकोच्या अधिकाऱ्यांनी द्यावी नुसते चार ओळीचे प्रमाणपत्र देऊन पुढे हस्तांतरणाच्या वेळी महानगरपालिकेस अडचण येईल यासाठी सविस्तर, स.सदस्यांच्या सुचनेनुसार कार्यवाही करावी.

**मा.महापौर :** उच्च न्यायालयाचे तसे आदेश आहे म्हणून प्रस्ताव सादर झालेला आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश हे महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र देण्या बाबतचा काहीही संबंध येत नाही. आरक्षण असेल तर प्रश्न निर्माण होईल म्हणून सविस्तर माहिती घेण्यात यावी.

**श्री.जयवंत ओक :** उच्च न्यायालयाचे डायरेक्शन मध्ये टाकून महानगरपालिकेची फसवणूक होता कामा नये. सिडकोने जमिनीचा व्यवसाय केलेला आहे. हस्तांतरणाच्या वेळी किती जागा खुल्या आहेत. भूखंड, डिमोटीफाईड भाग, अनाधिकृत येरिया, जी आरक्षणे ठेवली आहे ती काढलेली आहे काय, येथे जनतेचा प्रश्न निर्माण होतो. महानगरपालिकेने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे की, आरक्षण असलेल्या जागा भूखंड सिडकोने विकलेले आहे. १३०० ते १४०० एकर जमीन या भागात सिडकोची आहे. डि-नोटीफाईड भागामध्ये २ ते २.५० लक्ष लोक राहतात. याचा विचार सिडकोने का केलेला नाही. विकास आराखडा ऐनवेळी आणून मंजूर करुन शासनाकडे पाठवायचा ही तर सभागृहाची दिशाभूल करणे आहे. या विषयावर सविस्तर बैठक बोलवावी. सविस्तर चर्चा करण्यांत येऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी. त्याचा सर्व प्रति नगरसेवकांना देण्यात याव्यात. आराखडा कसा आहे. सभागृहात आराखडा लावण्यात यावा. म्हणजे सर्वांना माहिती समजेल किती जागा शिल्लक आहे. पुढील भविष्यात शाळा गार्डन, वाचनालय, अशा सोयी

सुविधा नागरिकांना देता आल्या पाहिजे. या ठरावास आमचा विरोध आहे. म्हणून मंजूर करण्यांत येऊ नये.

**श्री.सोनवणे सुदाम :** सिडकोने या अेरीयामध्ये नियोजन हे पॉपलेशनच्या प्रमाणेच केलेल असेल यात दुमत नाही. ज्या आराखड्याची मंजूरी पाहिजे त्या आराखड्यात क्षेत्रफळ किती ज्या सुखसोयी नागरिकांना घ्यावा लागतात त्याचे आरक्षण केलेले आहे. किंवा नाही केलेले असेल तर त्या जागा तशाच आहे काय. यात काही दुरुस्ती करता येईल या दृष्टीने व या शहराचा विकास झपाट्याने होत आहे व आता पासून नियोजन केले नाही तर पुढे अवघड परिस्थिती निर्माण होईल.

**श्री.स.अली सलामी :** ऐनवेळी प्रस्ताव घेऊन "सिडकोला ना हरकत" प्रमाणपत्र देणे बाबत मंजूरी देणे योग्य होणार नाही. कारण हस्तांतरणाचा प्रश्न १०-१२ वर्षापासून चालू आहे. महानगरपालिकेने सिडको नागरिकांकडून जोपर्यंत हस्तांतरण होत नाही. तोपर्यंत टॅक्स लावणार नाही. असा निर्णय घेतलेला आहे. म्हणून हस्तांतरण होणार त्यावेळी सिडकोने किती जागा आरक्षण ठेवल्या, गार्डन, शाळा, दवाखाने, वाचनालयासाठी किती याची पाहणी करुन कार्यवाही होणार आहे. म्हणून विकास आराखडा बाबत सर्व स.सदस्यांना प्रती देण्यात याव्यात. जेणेकरुन स.सदस्य त्याबाबतीत अभ्यास करतील. त्यानंतर एक विशेष बैठक बोलावण्यात यावी व त्यानंतर निर्णय घेण्यांत यावा. या प्रस्तावात मंजूर करण्यास माझा विरोध आहे.

**मा.महापौर :** हा हस्तांतरणाचा प्रस्ताव नाही. एन.ओ.सी. द्यायची की, नाही. संबंधित अधिकारी खुलासा करतील त्यानंतर आपण निर्णय घेऊ.

**श्री.भगवान घडामोडे :** हा हस्तांतरणाचा विषय नसून जालना रस्त्याच्या दक्षिण बाजुला जो विकास आराखडा आहे. त्यास महानगरपालिकेची एन.ओ.सी. घेऊन शासनाकडे पाठवायची आहे. म्हणून हा प्रस्ताव आलेला आहे. काही. सदस्यांचा या प्रस्तावानुसार गैरसमज झालेला आहे. तरी सुध्दा या विकास आराखड्याच्या प्रती सर्व स.सदस्यांना देण्यांत याव्या व यावर अभ्यास करुन नंतर एन.ओ.सी. देण्यात यावी.

**श्री.स.अली मिरा सलामी :** हा विषय समजण्यासाठी आम्हाला लेखी माहिती देण्यात यावी. या प्रस्तावास आमचा विरोध आहे. नगररचना विभागाने जो आराखडा तयार केलेला आहे तो सभागृहात दाखवण्यात यावा.

**श्री.शिंदे (नियोजनकार, सिडको) :** जालना रोडच्या दक्षिणेकडील जो काही भाग होता व पूर्ण सिडकोचा विकास आराखडा शासनाने १९९६ साली मंजूर केलेला होता. दक्षिणेकडील भाग हा ग्रीन झोन म्हणून ठेवण्यात आलेले होते. १९९१ साली ही योजना शासनाकडे सादर केलेली असून जो प्लॅन होता त्यात एअरपोर्ट एक्झपॉन्शनमुळे क्षेत्रात वाढ झाली. १९९५ साली पासून जो प्लॅन शासनाकडे थांबवून होता त्याप्रमाणे होता त्या ठिकाणी ले-आऊट करुन सिडकोने गृहनिर्माण सोसायटी केलेला आहेत. या स्वरुपात जालना रोडच्या दक्षिणेकडील प्लॉट विकले गेले व एक व्यक्तीने उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली व शासनास कळवून ६ महिन्याच्या आत या प्लॅनला मंजूर देण्याचे कळविले होते. यात शासनाने सुध्दा काही भागात डिनोटीफाईड जमीन यामधील केलेली आहे असे न्यायालयाच्या निर्देश आलेले आहे. म्हणून सल्ला मसलत करुन कार्यवाही करा.

महानगरपालिकेशी सल्ला मसलत करुन परंतू ताबडतोब या डेव्हलपमेंट प्लॅनला मंजूर द्यावी. पुन्हा शासनाच्या लक्षात आले त्यांनी असे कळविले की, सल्ला मसलत करण्यापेक्षा वृत्तपत्रात जाहिरात देऊन सगळे प्लॅन खुला करावा. माहितीसाठी म्हणनू १ फेब्रुवारी २००१ मध्ये वृत्तपत्रात प्रसिध्द करुन कुणाची तक्रार असेल त्याची नोंद करावी म्हणून दिले होते. यात जनतेच्या काही हरकती आलेल्या आहे. या कमिटीमध्ये मा.आयुक्त महानगरपालिका सदस्य म्हणून आहे. ज्याचे हरकती आल्या त्यावर सर्व सदस्यांनी मिळून खुलासा केलेला आहे. व त्या खुलाशाची सर्व प्रासीजन करुन शासनास कळविले व शासनास तो प्लॅन मंजूरीसाठी सादर केला. यात सिडकोने प्लॅन महानगरपालिकेकडे ठेवलेला नाही. शासनाने तात्पुरती एन.ओ.सी. ची मागणी केलेली आहे. यामध्ये जो डी.नोटीफाईड येरिया आहे. २०९ हेक्टर झालेला असून आरक्षणाच्या बाबतीत लोकसंख्येवर म्हणजेच ३० हजार लोकसंख्येवर आरक्षण दाखवली आहे. यातील काही आरक्षणाचा विकास झ ाालेला आहे. प्रत्येक ३० हजार लोकसंख्या असलेल्या भागात ३ बालवाड्या प्राथमिक शाळा-४, हायस्कुल-३ कॉलेज-१, खेळाचे मैदान-८, दवाखाना-१, वाचनालय-२, कमेनिटी सेंटर-३, क्रिडा मैदान-१, इन्सिटट्युट आहे. मार्केटसाठी, पोलिस चौकीसाठी आरक्षण केलेले आहे.

**श्री.जयवंत ओक :** जो डी.नोटीफाईड ऐरिया आहे. ग्रीन मधून एलो म्हणून आपल्या नियोजन आराखड्यात आलेला आहे काय?

**सिडकोचे श्री.शिंदे साहेब :** जो डि.नोटीफाईड ऐरिया आहे तो या प्लॅन मध्ये येत नाही. तो आराखडा करण्यासाठी शासनाने महानगरपालिकेस पत्र दिलेले आहे.

**श्री.जयवंत ओक :** यावरुन असे दिसते की, तेथील जनता सोयी सुविधा पासून वंचित राहणार म्हणून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येवू नये. विकास आराखड्याच्या प्रती सभागृहात दाखवण्यात याव्यात म्हणजे खरी परिस्थिती काय आहे. समजेल.

**श्री.स.अली मिरा सलामी :** अग्निशमन कार्यालयाजवळील आरक्षित जागेवर राज-हॅट झालेले आहे. आरक्षण कशासाठी होते. सिडकोने परवानगी कशी दिली त्याचा खुलासा घ्यावा. ती जागा आरक्षित वेगळ्या कामासाठी होती. वेगळेच काम केलेले आहे. म्हणून यावरुन यामध्ये सिडकोने किती जागेवर काय गैररित्या कार्यवाही केली हे समजून येईल. यासाठी विकास आराखडा सभागृहास दाखवावा. बैठक बोलावून चर्चा करुन निर्णय घेण्यांत यावा.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** सिडको हे वेगळी प्लनींग ऑथर्टी असून त्यामुळे वेगळा प्लॅन करुन महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिल्यानुसार त्या वसाहतीमध्ये सिडकोने आपली योजना राबविलेली आहे. हस्तांतरणाचा हा विषय नाही. शासनाने महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र मागविलेले आहे. सन १९९५ ला शासनाकडे जो प्लॅन पाठवलेला होता. त्यास अद्याप मंजूरी नाही. ज्या सर्वे नंबर व त्यातील भूखंड बाबत वाद न्यायालयात गेला व त्या संबधित माहिती म्हणून त्या सर्वे मध्येच आरक्षण टाकले होते काय असेल तर विकास केली काय? नसेल तर त्यात टाकण्यात यावे. अशी माहितीच फक्त संबंधित अधिकाऱ्यांकडून घ्यावी. व मंजूरी देण्यात यावी.

**श्री.अंबादास दानवे :** हा ठराव मंजूर झाला नाही. तर हस्तांतरणाचा विषय लांबेल.

**मा.महापौर :** हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको संचालक मंडळाने ठराव क्र.८३१८ दिनांक १२.०३.२००१ अन्वये मंजूर करुन नियोजन प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे तरतूदीनुसार शासनास सादर केला आहे. सिडकोच्या औरंगाबाद जालना रस्त्याच्या दक्षिणेकडील १९४.२८ हेक्टर अधिसूचित क्षेत्राचा सुधारित नियोजन प्रस्ताव, अधिनियमातील तरतूदीनुसार पूर्ण करुन कार्यवाही केलेली असल्यामुळे सिडकोने शासनास सादर केलेल्या सुधारित नियोजन प्रस्तावास औरंगाबाद महानगरपालिकेची कोणतीही हरकत नाही. ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८०/३ :**

मा.आयुक्त यांच्या मंजूरीनुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेतर्फे राजनगर येथे आरोग्य केंद्र बांधून तयार आहे. ते कार्यान्वित करण्यासाठी खालील कर्मचारी वृदांची पदे आरोग्य सेवा देण्याकरिता निर्मिती करणे जरुरी आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | १ | एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस. | रु.८०००-१३५०० |
| २. | ए.एन.एम. | २ | ए.एन.एम.चा दोन वर्षाचा कोर्स पास | रु.४०००-६००० |
| ३. | मिश्रक | १ | "डी" फार्म पास | रु.४५००-७००० |
| ४. | नोंदणी लिपीक | १ | १२ वी पास | रु.२५००-३२०० |
| ५. | सेवक | २ | ४ थी पास | रु.२२५०-३२०० |

वरील ठिकाणी आरोग्य केंद्र सुरु करण्यास मंजूरी देऊन वरील पदे निर्मिती करुन या आरोग्य केंद्रास लागणारे औषधी/साहित्य साठी रुपये १० लाखाच्या खर्चास प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**मा.महापौर :** हा प्रस्ताव प्रशासकीय आहे. विश्वभारती कॉलनी मध्ये आरोग्य केंद्र बांधून दीड वर्ष झाले. कर्मचारी नसल्यामुळे आपण आरोग्य केंद्र चालू केलेले नाही. म्हणून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येऊन शासनाच्या मंजूरीसाठी पाठवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे राजनगर येथे बांधण्यात आलेले आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याकरिता प्रस्तावातील अ.क्र.१ ते ५ ची पदे निर्माण करण्यास त्याचप्रमाणे या आरोग्य केंद्रासाठी लागणारे औषधी/साहित्य यासाठी रक्कम रु.१० लाख खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८१/४ :**

मा.आयुक्तांच्या मंजूरीनुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरातून विशेष आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा देण्यासाठी शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांची पदे मानद विशेष वैद्यकीय तज्ञ (ऑनररी) म्हणून प्रतिमहा रु.३०००/- (रुपये हजार मात्र) मानधनावर पद निर्मिती करणे जरुरी आहे. यासाठी खालील पदे निर्मिती करणेसाठी प्रस्ताव मंजूरीसाठी सादर.

| अ.क्र. | तज्ञ | शैक्षणिक पात्रता | पद संख्या | मानधन रु.(प्रतिमहा) |
|---|---|---|---|---|
| १ | मेडीसीन तज्ञ | एम.डी.मेडीसीन | ०१ | रु.३०००/- |
| २ | हृदयरोग तज्ञ | एम.डी.मेडीसीन | ०१ | रु.३०००/- |
| ३ | स्त्री रोग तज्ञ | एम.डी./डी.जी.ओ. | ०१ | रु.३०००/- |
| ४ | बालरोग तज्ञ | एम.डी./डी.सी.एच. | ०१ | रु.३०००/- |
| ५ | भुलरोग तज्ञ | डी.ए. | ०१ | रु.३०००/- |
| ६ | क्ष-किरण तज्ञ | डी.एम.आर. | ०१ | रु.३०००/- |
| ७ | दंतरोग तज्ञ | बी.डी.एस. | ०१ | रु.३०००/- |
| ८ | नेत्ररोग तज्ञ | डी.ओ.एन.एस. | ०१ | रु.३०००/- |
| ९ | सर्जन तज्ञ | एम.एस. | ०१ | रु.३०००/- |

वरीलप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार शहरातून विशेष आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा देण्यासाठी शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांची पदे मानद विशेष वैद्यकीय तज्ञ (ऑनररी) म्हणून प्रतिमहा रक्कम रुपये ३०००/- (रुपये तीन हजार मात्र) मानधनावर पद निर्मिती करणे जरुरी आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** संबंधित डॉक्टर किती वेळ काम करणार यांची काही नियमावली असेल त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. यासाठी शासनाची मंजूरी लागेल काय? याचा सुध्दा खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** यासंबंधी नियमावली तयार करण्यात येईल. त्याप्रमाणे कार्यवाही होईल. हा प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातून विशेष आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा देण्यासाठी शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांची प्रस्तावातील अ.क्र.१ ते ९ करिताची पदे प्रतिमहा रु.३०००/- (तीन हजार मात्र) मानधनावर मानद विशेष वैद्यकीय तज्ञ (ऑनररी) म्हणून निर्माण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८२/५ :**

औरंगाबाद शहराचा प्रारुप विकास आराखडा (जुनी हद्द सुधारणा) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३० नुसार राज्य शासनाच्या मंजूरीसाठी सादर केला आहे. सदरील विकास आराखड्यास उक्त अधिनियमाच्या कलम ३१ नुसार राज्य शासनाकडून मंजूरी अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांनी दि.२६ फेब्रुवारी २००१ रोजी विकास आराखडा मंजूर केल्याची घोषणा सुध्दा केली आहे.

तथापि शासन स्तरावर विकास आराखड्यातील कोणतेही आरक्षण वगळले जात नसते व आरक्षण वगळणे आवश्यक असल्यास ते सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य असल्याने समाधान करणे आवश्यक असते.

औरंगाबाद शहराच्या जुन्या हद्दीतील प्रारुप विकास आराखड्यात वाणिज्य वापराची काही अरक्षणे ठेवण्यात आली आहेत. ज्यामध्ये दुकन केंद्र, उप विभागीय केंद्र, व्यापारी संकुल, विस्थापितांचे पूर्नवसन इत्यादी बांधीव आरक्षणाचा समावेश आहे. या आरक्षणाचा विकास महानगरपालिकेने केला तरी त्यामध्ये महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचे नवीन साधन निर्माण होते. या आरक्षणाचा समावेश आरक्षणाच्या माध्यमातून अंमलबजावणी केल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेला किमान २५ प्रतिशत बांधकाम विनामूल्य ताब्यात मिळते व कायमचे उत्पन्नाचे साधन तयार होते. याकरिता महानगरपालिकेच्या हिताचा विचार करता राज्य शासनाने प्रारुप विकास आराखड्याला मान्यता देताना बांधीव आरक्षणे ज्यांना समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकास होतो अशी आरक्षणे जसे दुकान केंद्र, उपविभागीय केंद्र, आपल्या स्तरावर वगळण्यांत येऊ नयेत. अथवा वगळणे आवश्यक असल्यास आरक्षणातील किमान २५ प्रतिशत क्षेत्र महानगरपालिकेस विना मोबदला हस्तांतरीत करावे अशी अट घालणे आवश्यक आहे.

शासनास सादर करण्यात आलेल्या प्रारुप विकास आराखड्यास मान्यता देतांना प्राथमिक शाळा, क्रिडांगण, स्टेडीयम इत्यादी सुविधा केंद्राच्या आरक्षणाच्या बाबतीत संपूर्ण खुल्या व भूसंपादनासाठी अडचण नसलेल्या कोणत्याही आरक्षणाचा शासन स्तरावर परस्पर निवास उपयोगी क्षेत्रात समावेश करण्यात येऊ नये असे राज्य शासनास कळविणे आवश्यक आहे.

**सुचक :** श्री.अंबादास दानवे,

**अनुमोदक :** श्री.बाळासाहेब थोरात.

**ठराव :**

औरंगाबाद शहराचा प्रारुप विकास आराखडा शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत आलेला असून सा.विकास आराखड्यामध्ये शासन स्तरावर मान्यता देतांना बांधीव आरक्षणे ज्यांना समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकास होतो. अशी आरक्षणे जसे दुकान केंद्र, उपविभागीय केंद्र, आपल्या स्तरावर वगळण्यांत येऊ नये. यासाठी हा प्रस्ताव मान्य करुन शासनास तशा प्रकारे कळविण्यास सर्वानुमते मंजूरी शासनास तशा प्रकारे कळविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच अशी आरक्षणे वगळणे आवश्यक असल्यास आरक्षणातील किमान २५ प्रतिशत क्षेत्र महनगरपालिकेस विनामोबदला हस्तांतरीत करण्याचा बाबतची संपूर्ण खुल्या व भूसंपादनासाठी अडचण नसलेल्या कोणत्याही आरक्षणाचा शासनस्तरावर परस्पर निवास उपयोगी क्षेत्रात समावेश करण्यात येऊ नये, असे राज्य शासनास कळविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८३/६ :**

वरील विषयी विनंती करण्यांत येते की, स.नं.२६ पेठेनगर येथे रस्त्याचे (४५ मीटरे) खडीकरणाचे काम चालू आहे. सदरील काम जवळपास पुर्ण होण्याच्या स्थितीत आहे. तथापि सदरील रस्त्यामध्ये बाधीत झालेल्या जमिनीचा मोबदला संबंधितास देण्यात आलेला नाही. करिता सदरील स.नं.२६ मधील रस्त्यामध्ये बांधित होणाऱ्या जमीनीस संपादन करुन कॉम्पेन्सेशन देण्याबाबत मंजूरी देण्यांत यावी. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.गणेश तांबे,

**अनुमोदक :** श्री.प्रशांत देसरडा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.नं.२६ पेठेनगर येथील रस्त्यामध्ये बाधित होणारी जमीन संपादन करुन संबंधित जमिन मालकास या जमीनीचा मोबदला देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८४/७ :**

वार्ड क्रमांक २ मधील पेठेनगरचे नांव बदलून साकेतनगर असे नामकरण करणे बाबत नागरिकांची बऱ्याच दिवसापासूनची मागणी आहे. नागरिकांनी केलेली मागणी विचारात घेता पेठेनगरचे नांव साकेतनगर असे नामकरण करण्यात यावे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.गणेश तांबे,

**अनुमोदक :** श्री.प्रशांत देसरडा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक २ मधील पेठेनगरचे नांव बदलून साकेतनगर असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८५/८ :**

औरंगाबाद मनपा हद्दीतील सिध्दार्थ उद्यानापुढील चौकास लोकनेते मा.बाळसाहेब पवार (स्वर्गीय) यांचे नांव देण्यांत आलेले आहे. स्व.बाळासाहेब पवार हे महाराष्ट्राचे पुढारी होते. त्यांनी कामगार व शेतकरी वर्गासाठी स्वतःचे आयुष्य वाहून घेतलेले होते.

तरी वरील चौकास स्व.बाळासाहेब पवार यांचे नांव देण्यांत आलेले आहे. त्याच चौकात त्यांचा पुतळा बसविण्यांत यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.काशिनाथ कोकाटे

**अनुमोदक :** श्री.आनंद तांदुळवाडीकर,

श्री.अंबादास दानवे,

श्री.मोतीलाल जगताप,

श्री.सुरजिंसिंग खुंगर,

श्री.रावसाहेब औताडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यानापुढील स्व.बाळासाहेब पवार चौकामध्ये "स्व.बाळासाहेब पवार" यांचा पुतळा बसविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८६/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जवळपास ८ ते ९ महिन्यापुर्वी ४२८० पी.आर.कार्ड बाबत मा.जिल्हाधिकारी यांनी चौकशी सुरु असल्याबाबत कळविले व मा.आयुक्त यांनी पी.आर.कार्डच्या मालकीच्या घराच्या परवानग्या थांबविला आहेत. परंतू मा.जिल्हाधिकारी आजही पी.आर.कार्ड निर्गमित करीत असल्याने व जागा व मालकी हक्काबाबत वाद नसल्याने परवानगी नियमानुसार देण्यांत यावी.

**सुचक :** श्री.नंदकुमार घोडेले.

**अनुमोदक :** श्री.सुदाम सोनवणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ४२८० आखिव पत्रिकेच्या प्रती महसुल विभागातून निर्गमित होत असल्याने व मालकी हक्कात वाद नसल्यामुळे नियमाप्रमाणे अनुज्ञेय बाबींची पुर्तता होऊन विकास परवानगी देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८७/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद मनपा हद्दीत जेव्हा सार्वजनिक नागरिकांना मनपाची मोकळी जागा नियमानुसार भाडे तत्वावर ८% दर आकारुन देण्यात येत आहे. परंतू शहरातील पत्रकार किंवा दैनिक वर्तमानपत्र चालविण्यासाठी जेव्हा मनपाची मोकळी जागा भाडेतत्वावर देण्याचे ठरविण्यांत येईल. अशा प्रकरणात फक्त पत्रकार व दैनिक वर्तमानपत्रात चालविण्यासाठी देण्यात येणारी जागा ८% ऐवजी कमीत-कमी दराने देण्यात यावे. कारण पत्रकार व दै.वर्तमानपत्र चालविण्याचे काम म्हणजे सामाजिक काम असल्याने व पत्रकार व दैनिक वर्तमानपत्र कार्यालयास कोणत्याही प्रकारचे आर्थिक उत्पन्न नसल्यामुळे मनपाची जागा कमीत कमी दराने देण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.काशिनाथ कोकाटे,

**अनुमोदक :** श्री.अंबादास दानवे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसामान्यपणे नियमानुसार महानगरपालिकेची मोकळी जागा ८% दर आकारुन भाडे तत्वावर किती जाते. पत्रकार किंवा दैनिक वर्तमानपत्र चालविण्याकरिता देण्यात येणारी जागा ८% दराऐवजी कमीत कमी दर आकारुन भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८८/११ :**

साईनगर (म्हाडा कॉलनी) सिडको येथील खुल्या जागेमध्ये २२ दुकानांचे बांधकाम चालू आहे. त्याच ठिकाणी पूर्व पश्चिम रोडवर आणखी वाढीव दुकानांचे बांधकाम म.न.पा.तर्फे करण्याच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**सुचक :** श्री.नारायण अण्णा सुरगोणीकर,
**अनुमोदक :** श्री.काशिनाथ कोकाटे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईनगर, म्हाडा कॉलनी, सिडको येथील सध्या बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी पूर्व पश्चिम रोडवर आणखी वाढीव दुकानांचे बांधकाम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**सौ.शिंदे रुख्मिणी :** माझ्या वार्डातील नागरिकांकडून महानगरपालिकेने ड्रेनेज लाईन टाळण्यासाठी १.८३ लाख रुपये जमा करुन महानगरपालिकेकडे भरलेले आहे. ४ वर्ष झाले अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही.

**मा.महापौर :** कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** ३ वर्षापुर्वी सर्वसाधारण सभेने ठराव पास करुन अनाधिकृत वस्त्यामध्ये २५% रक्कम नागरिकांकडून भरुन घ्यावी. त्यानुसार रक्कम भरुन घेण्यात आलेली आहे. नंतर शासनाचा निर्णय झाला की, अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे करु नये. त्यामुळे तेथील काम थांबलेले आहे. पुन्हा सर्वसाधारण सभेने ठराव पास करुन सन १९९५ च्या अगोदरच्या वस्त्यामधील सर्वेचे काम करुन विकास कामे करण्यात येईल. असा ठराव पास केलेला आहे. लवकरच सर्वेचे काम पूर्ण होईल व त्यानुसार या भागात ड्रेनेजचे काम करण्याची कार्यवाही करता येईल.

**मा.महापौर :** सर्वेचे काम सुरु केलेले होते. किती काम बाकी आहे व किती दिवस लागतील याची प्रकल्प संचालक यांनी माहिती घ्यावी.

**श्री.अंबादास दानवे :** या वसाहतीत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी महानगरपालिकेकडे पैसे भरुन ४ वर्ष झाले. शासनाचा जी.आर.येऊन ६ महिने झाले. अधिकारी चुकीची माहिती देतात ६ महिन्यापुर्वी का कार्यवाही केलेली नाही. या कामासाठी जो खर्च येणार त्युनसार २५% रक्कम जमा झालेली आहे का?

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** तीन वर्षापुर्वी जो खर्च येईल. त्यांचे अंदाजपत्रक तयार करुनच २५% रक्कम वसुल करण्यात आलेली होती. परंतू आता पुन्हा अंदाजपत्रक तयार करुन त्यात खर्चात वाढ होईल. त्यानुसार कार्यवाही करावी लागेल.

**श्री.जयवंत ओक :** सदरचे काम ९८-९९ च्या अगोदरचे असेल व ती वसाहत ९५ च्या अगोदरची म्हणजे १०-१५ वर्षापासून कार्यान्वित असेल तर तेथे विकास कामे करण्यास हरकत नसावी. असे जी.आर.मध्ये शेवटी दिले आहे. त्या नुसार कार्यवाही करण्यात यावी. त्या वसाहतीमध्ये अगोदर कामे केलेली असेल तर कार्यवाही करता येईल असे मा.आयुक्तांनी जाहिर केले होते.

**प्रकल्प संचालक :** मा.महापौर यांनी आदेश केल्यानुसार शहरातील अनाधिकृत वसाहतीतील सर्वेचे काम चालू असून आतापर्यंत ९९ वसाहतीचे सर्वेक्षण झालेले आहे. यानंतर काही नगरसेवकांनी पत्र देऊन विनंती केलेली होती की, आणखी काही वसाहतीचा सर्वे करण्यात यावा. यात स.सदस्य व मा.सभापती

श्री.मोतीवाला अशरफ यांनी ३ ते ४ वसाहतीचे सर्वे करावे म्हणून पत्र दिले या सुध्दा वसाहतीचे मंजूरी घेऊन सर्वेक्षण करण्यात येईल. सध्या ९९ वसाहतीचे परिपूर्ण सर्वेक्षण झालेले आहे. उर्वरित वसाहतीचे सर्वेक्षण करण्यासाठी ८ दिवस लागतील.

**मा.महापौर :** ज्या वसाहतीचे सर्वेक्षण झाले ती नावे वाचून दाखववावी.

**प्रकल्प संचालक :** ज्या वसाहती १९९५ च्या अगोदर अस्तित्वात आलेल्या आहे. अशा ठिकाणी राष्ट्रीय झोपडपट्टी गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम राबवायचा असे शासन आदेश आहे. यानुसार ज्या झोपडपट्ट्या आपण घोषित करणार आहोत. तेथे सुविधा देण्याची प्रोबीजन आहे. परंतू ज्या अनाधिकृतपणे झालेल्या वसाहतींना तेथील नागरिकांना सोयी सुविधा देण्यासाठी तेथील नागरिकांकडून सुधार शुल्क वसुल करुन सुविधा द्याव्यात असे मा.मुख्यमंत्र्यांनी आदेशित केलेले आहे. व तसे पत्र महानगरपालिकेकडे १५ दिवसापुर्वीच आलेले आहे. शासनाच्या नियमानुसारच ९९ वसाहतीचे आपण सर्वेक्षण केलेले आहे. याचे नोटिफिकेशन शासनाकडे पाठवून व वृत्तपत्रात प्रसिध्द करुन कार्यवाही होईल.

**श्री.घोडेले नंदकुमार :** सर्वेक्षण केलेल्या भागाची (येरीयाची) यादी सभागृहात वाचून दाखववावी.

**प्रकल्प संचालक :** ज्या वसाहतीचे सर्वेक्षण झाले त्या वसाहतींची नावे पुढील प्रमाणे विष्णुनगर, शहाबाजार भोईवाडा, संतोषी मातानगर, चिस्तीया कॉलनी, भानुदासनगर, मिलींदनगर, पुंडलिक नगर, भोईवाडा, अंबिकानगर, मिसारवाडी, न्ययानगर, जयभवानीनगर, जाधववाडी, बोरीबाग, खतरीनगर, चेतनानगर, साठेनगर, राजेंद्रनगर, शहानगर, चौधरी कॉलनी लॉयन्स क्लब कॉलनी, रीठे कॉलनी, न्यु शांती निकेतन, वसंतनगर, दुर्गानगर, नेताजी नगर, विश्रांतीनगर, भिमपुरा, लोकशाही कॉलनी, राजीव गांधी नगर, नागेश्वरवाडी, किलेअर्क, नुर कॉलनी, हुसेन कॉलनी, नागसेन नगर, महेमूदपूरा, जहाँगिर कॉलनी, एकतानगर, गाडगेनगर, धनगरवाडा, आम्रपालीनगर, श्रावस्ती कॉलनी, शांतीपूरा, हनुमाननगर, गणेश कॉलनी, कोतवालपूरा, माणिकनगर, काचीवाडा, फाजीलपूरा, अलीला हल कॉलनी, शंभूनगर, रहिमानियाँ कॉलनी, आशानगर, सुंदरनगर, भारतनगर, नुर कॉलनी, धनमंडी, नारायणनगर, म्हाडा कॉलनी, प्रगती कॉलनी, भुजबळनगर, अण्णाभाऊ साठेनगर, सैनिक कॉलनी, पडेगांव, तक्षशिलनगर, कोतुबपुरा, मुजफर नगर, पानचक्की, आब्रार कॉलनी, भिमराज नगर, हिमायत बाग, गजानन नगर, कबीरनगर, विजयनगर, नारळीबाग, त्रिवेणी कॉलनी, रशिदपूरा, हत्तीसिंगपूरा, न्यु सिल्लेखाना, सरफर कॉलनी, प्रभातनगर, शिवपूरी, न्यु नंदनवन कॉलनी, हिनानगर, काश्मीरनगर, नक्षत्रवाडी, नवामातानगर, पुष्पानगरी, भाग्यनगर, नवीवस्ती, पदमपुरा, शिवनगर, रमननगर, पाणी नगर, पडेगांव, मिरानगर, काचीवाडा, क्रांतीनगर, नेहरुनगर ई. वसाहतींचा सर्वेक्षणचे काम झालेले आहे.

**मा.महापौर :** सर्व स.सदस्यांनी संबंधित कार्यालयात जाऊन कोणत्या वसाहतीचे सर्वेक्षण झाले, कोणते राहिले याची पाहणी करुन जे वसाहतीचे नावे आलेली नसतील तशी नावे प्रकल्प संचालक यांचेकडे घ्यावी. त्यानुसार सर्वेक्षणचे काम

करण्यात येईल आता यापुढील कार्यवाही काय करणार यांचा खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** ज्या वसाहतीचा सर्वेक्षण काम राहिलेले आहे ते ताबडतोब करण्यात येईल.

**श्री.प्रकाश निकाळजे :** वार्ड कमेट्याची स्थापना करण्यात यावी. असे शासनाचे आदेश असतांना सुध्दा गेल्या ५ वर्षापासून या संबंधी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसून नव्याने सार्वत्रिक निवडणूका होऊन एक वर्ष झाले तरी सुध्दा वार्ड कमेटीची स्थापना करण्यात आलेली नाही. वार्डाचा सर्वे झालेला आहे. आताच महिला व बालकल्याण समितीचे सदस्य निवडलेले आहे. शहरातील सर्व नागरिकांना सोयी सुविधा पुरविल्या गेल्या पाहिजे. म्हणून मा.आयुक्तांना वार्ड कमेट्याची स्थापना करण्या संदर्भात आदेश द्यावेत. हे करत असतांना ज्या काही सोयी सवलती प्रशासनामार्फत पुरवायच्या त्या देण्यात याव्यात.

**मा.महापौर :** महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून वार्ड कमेटी तसेच महिला व बालकल्याण समितीची आपण नव्यानेच स्थापना केलेली आहे. प्रभाग कमेटीस मागील बैठकीत मान्यता दिलेली असून आजच्या बैठकीस नियम काय असावेत यास मान्यता दिलेली आहे. महिला बालकल्याण समिति सभापती पदाची निवडणूक ३० तारखेच्या आत तसेच प्रभाग समित्यांची निवडणूक मे-२००१ मध्ये घेण्यात येतील.

**श्री.भगवान रगडे :** मिसारवाडी स्लम घोषित भाग म्हणून सर्वसाधारण सभेत ठराव पास झ ाला होता. या संदर्भात मा.मुख्यमंत्री, त्याचे गृहनिर्माण विशेष सहाय्यक यांना पाठविले प्रत मलाही दिले व महापालिकेस ही दिली आहे. परंतू अद्याप स्लम घोषित करण्याच्या बाबतीत कार्यवाही झालेली नाही. खुलासा करण्यात यावा.

**प्रकल्प संचालक :** या संदर्भात नगर रचना विभागाकडून जी संचिका माझ्याकडे अभिप्रायासह प्राप्त झाली हा भाग जो डेव्हलपमेंट झोन मध्ये येतो. ठराव मंजूर झालेला आहे. शासनाच्या स्थरावर कार्यवाहीस्तव आहे.

**श्री.भगवान रगडे :** स्लम घोषित करण्याच्या बाबतीत शासनाकडे महानगरपालिका मार्फत काही पत्र व्यवहार झालेला आहे काय?

**प्रकल्प संचालक :** या संबंधिची माहिती नगर रचना विभागाकडून मिळेल. या विभागाने अनुसूचित जाती, जमाती ई. चे सर्वेक्षणचे काम केलेले आहे.

**मा.महापौर :** सर्वससाधारण सभेने ठराव मंजूर केलेला असून यामध्ये कार्यवाहीसाठी नगररचना विभाग तसेच प्रकल्प संचालक या विभागाचा समावेश येतो. म्हणून नगररचना विभागाने या संबंधि माहिती द्यावी.

**उपसंचालक, नगररचना :** स्लमच्या बाबतीत नगररचना खात्याची भूमिका, सदर भाग कुठे येतो, कोणत्या झोन मध्ये येतो. सदर वसाहत ही नो डेव्हलपमेंट झोंनमध्ये येते. झोपडपट्टी सुधारणा कायद्याप्रमाणे तेथे सुविधा पुरवल्या जाऊ शकतात व विकास योजनेमध्ये ती जागा कुठे आहे याची माहिती घ्यावी लागेल. तसा प्रस्ताव या विभागाकडून पाठवला जात नाही.

**श्री.प्रकाश निकाळजे :** ठराव पास केला शासनाकडे कार्यवाहीस्तव पाठवलेला आहे. व पुढील कार्यवाही केली नाही. असे स.सदस्य यांचे म्हणणे आहे. दोन्ही विभागाचे अधिकारी यांनी मिळून ते आरक्षण कोणत्या कामासाठी होते व मंजूर झालेल्या ठरावाची प्रत सोबत जोडून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**उपसंचालक, नगररचना :** सदर वस्ती कुठल्याही आरक्षणाने बाधीत नाही जो डेव्हलपमेंट झ ोन येते.

**मा.महापौर :** नगर रचना विभागाचे अधिकारी तसेच प्रकल्प संचालक यांनी पुन्हा शासनाकडे प्रस्तावाची प्रत पाठवून पुढील कार्यवाही करावी.

**श्री.भगवान रगडे :** ठराव पास झाला. त्या संबंधी मी मा.आयुक्तांना पत्र दिले महानगरपालिकेने शासनाकडे या संबंधी काय कार्यवाही केली हा खुलासा मी मागविलेला आहे. सर्वेक्षणाचे काम किती दिवस चालणार आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** स.सदस्यांचा उद्देश असा की, या भागामध्ये तेथील नागरिकांना मुलभूत सुविधा देण्याचा आहे. या दृष्टीने वेगवेगळ्या भागांचा सर्वेक्षणचे काम चालू आहे. त्यामध्ये मिसारवाडीचा सुध्दा समावेश आहे. सर्वेक्षणाचे काम पूर्ण झ ाल्यानंतर सर्व अहवाल शासनाकडे पाठवला जाईल व मंजूरी मिळाल्यानंतर सर्व विकास कामे करता येतील.

**मा.महापौर :** सर्वेक्षणाचे काम २ महिन्यापुर्वी पासून सुरु झालेले आहे. ९९ वस्त्यांचा सर्वेक्षणाचे काम झालेले असून ५ ते ६ वस्त्यांचा सर्वेक्षणाचे काम बाकी आहे. लवकरच शासनाकडे या बाबतीत माहिती देऊन कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.बाळासाहेब थोरात :** गणेश कॉलनी भागात ३ वर्षापासून व त्या अगोदरपासून सुध्दा काहीही विकास कामे झालेली नाही. जनतेच्या अपेक्षेप्रमाणे सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतर तरी विकास होईल, परंतू १ वर्षापासून अद्याप वार्डात कोणतीही विकास कामे झालेली नाही. नगररचना विभागाने खुलासा करावा की, हा वार्ड अधिकृत आहे की, अनाधिकृत, अनधिकृत असेल तर तेथे नगररचना विभागामार्फत बांधकामे व इतर परवानगी कशी दिली जाते. अनाधिकृत कामाची परवानगी दिल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होतो व पावसाळ्यांमध्ये काही लोकांच्या घरांमध्ये पाणी जाते. पावसाचे पाणी जाण्यास रस्ता नाही. बरेच लोकांची घरे पडून वित्तहानी, मानहानी सुध्दा झ ालेली आहे. उपआयुक्त (प्र.) यांनी स्वत: येऊन तेथे पाहणी केली. या संदर्भात संबंधित विभागाशी चर्चा करण्याबाबत मी आपणांस सूचना दिलेल्या होत्या. अद्याप काहीही कार्यवाही नाही. मा.महापौरांनी दिलेले निवेदनावर संबंधित अधिकार कार्यवाही करत नसतील त्यांचेवर कार्यवाही करावी आता पावसाळ्याचे दिवस येतील. पुन्हा जी परिस्थीती आहे. ती राहील. यापुढे काही झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे व पुढील कार्यवाही करावी. आता पावसाळ्याचे दिवस येतील पुन्हा जी परिस्थिती आहे. ती राहील. यापुढे काही झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे व पुढील कार्यवाही करावी. पाणी जाण्यास रस्ता नव्हता म्हणून रस्त्याचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्व कार्यवाही झालेली असतांना पुन्हा रस्त्यांच्या बाजुला काही लोकांना बांधकामाची अनाधिकृत परवानगी कशी दिली यास कोण जबाबदार संबंधित विभागाचे अधिकारी भ्रष्टाचार करुन कामे करत आहेत. ताबडतोब अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी.

**उपअभियंता-१, नगररचना :** गणेश कॉलनी वसाहतीत लगत मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या निवासाच्या बाजुच्या पट्ट्यासाठी निवासी क्षेत्र म्हणून परवानगी दिलेली आहे. स.सदस्य जे म्हणता तो उत्तरेकडील भाग असून तेथे अनाधिकृतपणे घरे झालेली आहे.

**मा.महापौर :** जो भाग अधिकृत आहे तेथे सुविधा देण्याची कार्यवाही करावी. या भागात नगररचना, तसेच पाणी पुरवठा अधिकारी यांनी ड्रेनेज तसेच रस्त्याचे संबंधी, संबंधित विभाग प्रमुखांनी प्रत्यक्ष जाऊन स.सदस्य यांचेसोबत पाहणी करुन काय सुविधा देता येतील, त्या देण्यात याव्यात व तसा रिपोर्ट सभागृहात सादर करावा.

**श्री.थोरात बाळासाहेब :** जिल्हाधिकारी कार्यालया समोर रस्त्याच्या ओपन जागेवर क्रिस्टल अपार्टमेंटला परवानगी कशी दिली. सर्व भ्रष्टाचार होत आहे. महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मधून जाण्या येण्यासाठी जागा दिलेली आहे.

**मा.महापौर :** क्रिस्टल अपार्टमेंटला अधिकृत परवानगी दिलेली आहे काय व महापालिकेच्या खुल्या जागेमधून जाण्यायेण्यास रस्ता दिला आहे काय याची माहिती घ्यावी.

**उपअभियंता-१, नगररचना :** क्रिस्टल अपार्टमेंटच्या बाबतीत पुढील सभेत सविस्तर माहिती देण्यांत येईल, या बाबतची संचिका बघूनच योग्य खुलासा करता येईल.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी ३ दिवसाच्या आत स.सदस्यांना माहिती घ्यावी. उपअभियंता, नगररचना-१ यांनी ३ दिवसाच्या आत उत्तर दिले नाही. तर मा.आयुक्तांनी त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री.तायडे पांडुरंग :** समर्थनगर येथील एका विधवा माहिलेची जमिन महानगरपालिकेने विकासासाठी घेतलेली असून संचिकेबाबत श्री.खन्ना यांना विचारणा केली असता २ महिन्यापासून उडवाउडवीची उत्तरे देतात. दि.१६.०३.२००१ रोजी या संचिकेवर आयुक्तांची सही झालेली असतांना, माहिती घेण्यासाठी श्री.खन्ना उपअभियंता यांची काही पैशाची मागणी होती. असा अंदाज येतो. जेणेकरुन त्यांनी मला अनेक वेळा विचारणा करुनही माहिती दिलेली नाही. श्री.खन्ना यांना समज द्यावी की, नगरसेवकांबरोबर कसे रहावे.

**मा.महापौर :** श्री.खन्ना उपअभियंता, नगररचना यांचे विषयी बऱ्याच स.सदस्यांच्या तक्रारी आहेत. मला स्वत: सुध्दा अनुभव आलेला असून श्री.डी.पी.कुलकर्णी व श्री.खन्ना यांना ताकीद देण्यात येते की, स.सदस्यांनी माहिती मागवली असेल ती तात्काळ देण्यात आली पाहिजे. फाईल इकडे-तिकडे अशी उत्तरे नगरसेवकांना देणे योग्य नसून यापुढे अशा तक्रारी येता कामा नये याची नोंद घ्यावी.

**सौ.घायतिलक लिलावती :** माझ्या वार्डातील प्राथमिक शाळेची मी पाहणी करुन ज्या वस्तुंची साहित्याची आवश्यकता आहे. त्याची माहिती शिक्षणाधिकारी यांनी लेखी, तोंडी दिलेली आहे, तसेच २० सप्टेंबरमध्ये सभागृहात सुध्दा मी सूचना मांडली होती. परंतू अद्याप कार्यवाही नाही. या शाळेत एक वॉचमेनची आवश्यकता असून आता शाळा बंद होतील. त्यामुळे त्या शाळेतील सामानाची चोरी होऊ शकते. दि.८ एप्रिल रोजी रात्री कुणीतरी खिडकीच्या फटीतून आतमध्ये प्रवेश करुन शाळेतील कपाट उघडले, तेथे असलेली सतरंजी तसेच बकेट चोरीस गेलेली आहे. व काही सामानाची नासधूस करण्यात आलेली आहे. तसेच शाळेभोवती सध्या आजुबाजूचे लोक संडासला बसतात म्हणून खूप घाण होते. मुलांचे आरोग्य धोक्यात येईल, यासाठी काहीतरी व्यवस्था करण्यात यावी, या शाहेत गरीब लोकांची मुले शिक्षण घेतात. मा.आयुक्तांनी सुध्दा शाळेची पाहणी केलेली असून ताबडतोब

वॉचमेनची नेमणूक करावी. शाळेत मुलांना पिण्याचे पाणी नाही. आपण स्वतः जातीने लक्ष द्यावे. नसता या शाळेत चोरी होण्याची शक्यता टाळता येत नाही.

**मा.महापौर :** उपआयुक्त (प्र.) यांनी जातीने लक्ष देऊन या शाळेमध्ये ताबडतोब एक वॉचमन किंवा एक सेवक देऊन कार्यवाही करावी. शाळेमध्ये मुलांना पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. येत्या ८ दिवसांत कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.प्रशांत देसरडा :** हर्षनगर येथे महानगरपालिकेच्या वतीने व्यापारी संकुल बांधण्यांत आले. सन ९७-९८ मध्ये व्यापारी संकुल बांधून झाले. अद्याप ते देण्याबाबत टेंडर निघालेले नाही. तेथील परिस्थिती पाहता आताच त्या दुकानाचे दरवाजे (शेटर) खराब झालेले दिसून येत आहे. कुणाला द्यायचे नसेल तर महानगरपालिकेचे १५ ते २० लाख रुपये खर्च झाले यास जबाबदार कोण? खुलासा करावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** या प्रश्नाच्या अनुशंगाने दुसरा एक प्रश्न असा की, महानगरपालिकेच्या मालकीची कर्मचाऱ्यांसाठी काही निवासस्थाने असून किती निवासस्थाने किती दिवसापासून रिकामी आहे व का रिकामी ठेवण्यात आली आणि केंव्हापासून रिकामी आहे, किती भाडे येणार होते तेवढे भाडे संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारामधून वसुल करण्यांत यावे.

**मालमत्ता अधिकारी :** हर्षनगर येथील व्यापारी संकुलनाची दुकाने २ महिन्यापुर्वी या विभागाकडे ताब्यात घेण्यात आलेली आहे. भाडे निश्चितीसाठी संचिका नगररचना विभागाकडे जानेवारीमध्ये पाठविण्यांत आलेली आहे. भाडे निश्चिती झाल्यानंतर निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.प्रशांत देसरडा :** दिनांक १०.१२.९९ ला भाडे निश्चितीचा करारनामा करण्यासाठी नगररचना विभागाकडे संचिका गेलेली असून अद्याप आलेली नाही.

**मालमत्ता अधिकारी :** संचिका भाडे करारनामा करण्यासाठी पाठवलेली नसून भाडे निश्चितीसाठी पाठवलेली असून भाडे निश्चिती झाल्यानंतर भाडे समितीसमोर ठेवून टेंडर पध्दतीने दुकाने वाटप करण्यात येतात.

**मा.महापौर :** त्या ठिकाणी १५-२० लाख रुपये महानगरपालिकेचे खर्च झालेले आहे. कार्यवाही करण्यास उशीर झालेला असून महानगरपालिकेचे येणारे उत्पन्न घटले आहे. गरीब लोकांचा प्रश्न सुटू शकला नाही. हर्षनगर येथील व्यापारी संकुलाचे टेंडर वगैरे कार्यवाही करण्यास उशीर झालेला असून महानगरपालिकेने उत्पन्न कमी झाले. महानगरपालिकेने त्या ठिकाणी खर्च केलेला होता. यास जबाबदार कोण म्हणून जे संबंधित अधिकारी यात दोषी असतील. त्यांचेवर कार्यवाही करुन त्या अधिकाऱ्यांचे वेतनवाढ बंद करावी. आता निवासस्थाना बद्दल माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** महानगरपालिकेच्या वर्ग-२ ची ४ निवासस्थाने रिकामी होती. वर्ग-२ अधिकाऱ्यांची मागणी नव्हती ही बाब लक्षात घेता. वर्ग-३ मधील जेष्ठताक्रम असलेल्या कर्मचाऱ्यांची आणि त्यांची वेतनश्रेणी निश्चित करुन निवासस्थान वाटप कमेटीसमोर प्रकरण ठेवलेले आहे. निवासस्थान वाटप कमेटीची बैठक झालेली आहे.

**मा.महापौर :** बैठक केव्हा झालेली आहे. तारिखसह माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** सुरवातीस वर्ग-२ च्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना वाटप करण्यासंबंधीची बैठक दि.१०.१२.२००० रोजी झालेली होती. यानंतर दोन तीन वेळेस बैठका ठेवण्यात आलेल्या होत्या. बैठका होऊ शकल्या नाही.

**मा.महापौर :** यामध्ये मालमत्ता अधिकारी व संबंधित अधिकारी यांचा दिरंगाईपणा होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांना काम करावे वाटत नसेल तर अशा अधिकाऱ्यांवर मा.आयुक्तांनी कडक कार्यवाही करावी. कर्मचाऱ्यांची मागणी आहे तर कर निवासस्थाने देण्यात येत नाही.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** गेल्या २ वर्षापासून निवासस्थाने रिकामी आहे. असे माझे मत आहे. किती दिवसापासून रिकामे आहे. यामुळे जे काही नुकसान झाले ते संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतनामधून वसुल करुन घ्यावे. तरच अधिकारी या बाबतीत कार्यवाही करतील.

**मा.महापौर :** महानगरपालिकेच्या मालकीची निवासस्थाने असून मागणी असतांना देण्यात येत नाही. रिकामी असतात ही बाब योग्य नाही. यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न कमी झालेले असून यास जे अधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर मा.आयुक्तांनाही कार्यवाही करावी.

**श्री.प्रकाश निकाळजे :** कर्मचाऱ्यांची मागणी आहे का? त्याचा खुलासा करावा.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** मागणी आहे किंवा नाही याचाखुलासा संबंधित अधिकारी यांनीच करावा. कर्मचाऱ्यांची मागणी आहे. अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.

**उपआयुक्त (प्र.)** : निवासस्थाने मिळण्या बाबत वर्ग-१,२,३,४ असे मिळून बऱ्याच कर्मचाऱ्यांची मागणी आहे. ही कार्यवाही २ वर्षापासून प्रलंबित आहे. कमेटीची बैठक मागच्या १५ दिवसापूर्वी झालेली आहे. कमेटीचा अहवाल तयार झालेला असून ८ दिवसात कार्यवाही होईल.

**मा.महापौर :** याचा अर्थ दोन वर्षापासून निवासस्थाने रिकामी आहे. तरी सुध्दा यात महानगरपालिकेचे नुकसान झालेले असून दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर मा.आयुक्तांनी कार्यवाही करावी व पुढील सभेत याची माहिती द्यावी.

**सौ.कुसूमताई खरात :** माझ्या वार्ड रोजाबाग येथे साफसफाईसाठी एकच महिला मंजूर असून गटार साफ करण्यासाठी एक पुरुष मजूर आहेत. दोनच कर्मचारी असल्यामुळे वार्डातील स्वच्छता व्यवस्थित होत नसून या भागात उर्दू/मराठी माध्यमाची शाळा आहे. शाळेतील मुलांना सुविधा दिल्या जात नसून या संदर्भात मी मागील बैठकीत सूचना केली होती व ताबडतोब सफाई साठी मजूर कर्मचारी दिले जाईल असे प्रशासनातर्फे सभागृहात सांगण्यात आले असतांना अद्याप कार्यवाही झालेली नाही.

**मा.महापौर :** स.सदस्या सौ.खरात यांनी या संदर्भात बऱ्याच वेळा प्रश्न उपस्थित केलेला असून स्थायी समिती सभेमध्ये सुध्दा प्रश्न उपस्थित केलेला होता. प्रशासनाला आदेश दिल्यानंतर कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही. उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** मागील बैठकीत चर्चा झाल्यानंतर संबंधित झोन अधिकारी यांना तसे लेखी आदेश दिलेले आहे. कार्यवाही झालेली आहे किंवा नाही तपासणी करण्यात येईल.

**मा.महापौर :** मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार उपआयुक्तांनी संबंधित झोन अधिकारी यांना रोजाबाग येथे मजूर देण्यासाठी लेखी आदेश दिलेले असतांना झोन अधिकारी का कार्यवाही केली नाही याची चौकशी करुन झोन अधिकारी यांचेवर कार्यवाही करुन मजूर कर्मचारी देण्याची ताबडतोब कार्यवाही करावी.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** माझ्या वार्डातील नाला अरुंद झालेला असून संरक्षित भिंत असणे आवश्यक आहे. कारण पावसाळ्याचे दिवस आलेले असून जनतेला त्रास होणार आहे. म्हणून नाल्यातील साफसफाई तसेच संबंधित संरक्षित भिंतीचे काम करण्यात यावे.

**मा.महापौर :** स.सदस्या श्रीमती मानकापे ताई यांचे वार्डातील नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याचा त्यांचा प्रश्न असून तेथील काही भाग अधिकृत काही अनाधिकृत असून अनाधिकृत भागाचा आताच सर्वेक्षण झालेले असून लवकरच संरक्षित भिंतीचे काम करण्यात येईल. तसेच शहरातील संपूर्ण नाल्याचे साफसफाईचे टेंडर सुध्दा प्रशासनाने लवकरात लवकर काढण्याची कार्यवाही करावी.

**श्री.अयुबखॉ सरदारखॉ :** राष्ट्रवादी कॉंग्रेस मार्फत एक पत्र दिलेले आहे. सध्या आपल्याकडे किती मान्यताप्राप्त पक्ष आहेत.

**मा.महापौर :** राष्ट्रवादी कॉंगेस, आर.पी.आय.सर्वच पक्ष मान्यताधिन आहे. विशेष आपल्याकडे तिसरी आघाडी पक्ष सुध्दा तयार झालेला असून या संबंधिची सविस्तर माहिती प्रशासनामार्फत घेण्यास सांगितलेले आहे.

**श्री.अंबादास दानवे :** नियम क्र.५ (१) (अ) नुसार मी नगरसचिव यांचे मार्फत प्रश्न विचारुन माहिती मागविली की, केंद्र शासनाने मेघा सिटी प्रोजेक्ट जाहिर केलेला आहे जे की, एक एकर पेक्षा जास्त जागेवर ज्यांनी कुणी बांधकामे केल्यास तेथे वेगवेगळ्या प्रकारच्या सवलती देण्यात याव्यात. असे दिलेले आहे. १६ प्रोजेक्ट दाखल झालेले होते. त्यापैकी १५ प्रोजेक्टला नगररचना विभागामार्फत मंजूरी दिलेली आहे. असे प्रश्नाचे उत्तर मला प्राप्त झालेले असून एक प्रोजेक्ट दि.१८.०९.९८ सौ.प्रमिलाबाई मालखरे यांचा दाखल केलेला होता. दुसरा २८.०३.२००१ ला सादर केलेला आहे. एक प्रोजेक्ट अडीच वर्षापूर्वी तर एक प्रोजेक्ट २ दिवसापूर्वी झालेला. शहरातील बऱ्याच भागातील अधिकृत ऐरिया असतांना नगर रचना विभागाकडे २ वर्ष, ३ महिने, ६ महिने, ५ महिने पासून असे विविध बांधकाम व इतर परवानग्या प्रलंबित आहे. काही परवानगी २ दिवसात काही ८ दिवसात, तर काही परवानगी साठी अडीच वर्षाचा कालावधी लागलेला आहे. प्रोजेक्ट घेतांना सेल्प डेव्हलपमेंट मध्ये हे मेघा सिटी प्रोजेक्ट आहेत का? ही कार्यवाही करतांना बँक गॅरंटी तेवढ्या रक्कमेची आपण काही प्रमाणात घेत असते. बॅाक गॅरंटी घेतलेली असेल तर किती कालावधीची आहे. माझ्या माहितीप्रमाणे बँक गॅरंटी फक्त १ वर्षासाठी व प्रोजेक्ट करण्यासाठी २ ते ३ वर्ष केलेले आहे का? या सिटी प्रोजेक्ट नुसार प्रताप ॲण्ड डेव्हलपर्स यांनी प्रोजेक्ट केलेला होता. परंतू त्यांनी कोणत्याही नियम व अटीचे पालन केलेले नाही. प्रोजेक्टसाठी एकास २ दिवसामध्ये परवानगी मिळते व सामान्य नागरिकांनी परवानगी मागितल्यास कार्यवाही होत नाही. शेवटी अनाधिकृतपणे बरेच लोक घरे बांधून मोकळे होतात. अशी परिस्थिती नगररचना विभागामार्फत कार्यवाही होत नसल्याने निर्माण झाली आहे. माझा

स्पष्ट आरोप आहे की, उपअभियंता नगररचना श्री.खन्ना हे माहिती देत नाही. सामान्य नागरिकांना गोल घुमवतात तर उपअभियंता (नगररचना-२) श्री.डी.पी.कुलकर्णी हे गोडगोड बोलतात. कोणतीच कामे वेळेवर करत नसून योग्य ती माहिती देण्यास टाळाटाळ करतात. मेघा सिटी प्रोजेक्ट काय आहे. जी मान्यता दिली ती नियम व अटी शर्तीची पूर्तता करुनच दिल्या आहे काय? या आगेदर खिंवसरा विहाराला परवानगी दिलेली होती. या संदर्भात अनेक प्रकारचे आरोप त्या भागातील नगरसेवक श्री.संजय जोशी यांनी केले होते. त्यात असे दिले होते की, खिंवसरा विहारमध्ये ४ मिटर रस्त्याची जागा असतांना ३ मीटर रस्त्यासाठी जागा ठेवली. रस्त्याचे निष्कृष्ट दर्जाचे बांधकाम केले याची स्थायी समितीमध्ये चर्चा होऊन मा.आयुक्तांनी मान्य केले होते. त्याच प्रमाणे प्रताप बिल्डर्स यांनी सुध्दा व्यवस्थीत काम केलेले नाही. कोणत्याही नियमाचे पालन केलेले नाही. बिल्डर्स बांधकाम करतात काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र घेत नाही. त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. व त्या मागणीसाठी महानगरपालिकेकडे ही जनता धाव घेत या विभागातून दि.२७.०३ ला-२, २८.०३ ला-१, २९.०३ ला-२ तर ३०.०३ ला-१० परवानगी दिलेली आहे. एकूण ४ दिवसांच्या आत मध्ये मेघा सिटी प्रोजेक्टला परवानग्या दिलेल्या आहेत. या प्रकरणामध्ये गांभीर्याने लक्ष व चौकशी करण्याची आवश्यकता आहे. परवानगी कशी दिली, ॲग्रीमेंट कसे करण्यात आलेले आहे. २ ते ३ वर्षाचे प्रोजेक्ट असतांना बँक गॅरंटी किती दिवसाची घेतली, घेतली असेल तर बेसमेंट कम्प्लेशन करुन घेतांनास सेल्फ डेव्हलपमेंट म्हणून कार्यवाही करणार काय या सर्व प्रश्नांचा खुलासा करण्यात यावा.

**मा.महापौर :** नगररचना विभागातील उपअभियंता श्री.खन्ना तसेच श्री.कुलकर्णी डी.पी. यांचे संदर्भात सभागृह नेता यांनी गैररित्या कामे करण्यात येतात. अशी तक्रार आहे. श्री.खन्ना गोल घुमवतात तसेच श्री.डी.पी.कुलकर्णी हे गोडगोड बोलून उडवाउडवीची उत्तरे देतात, असे सभागृह नेता तसेच सभागृहातील बरेच स.सदस्यांची भावना आहे. सामान्य नागरिकांना कुठल्याही प्रकारची परवानगी लागत असेल तर ती वेळेवर देण्यात येत नसून या विभागामार्फत मेघा सिटी प्रोजेक्ट संदर्भात २ ते ३ दिवसात परवानगी दिली जाते. यावरुन बिल्डर्सचे कामे लवकरात लवकर करण्यास अधिकारी जास्त उत्सुक असतात असे दिसून येते. सामान्य नागरिकांना किती दिवसात परवानगी दिली जाते. याचा खुलासा दोन्ही अधिकाऱ्यांनी करायचा आहे.

**उपअभियंता, नगररचना (श्री.डी.पी.कुलकर्णी)** : परवानगी देतांना जे प्रस्ताव परिपूर्ण असेल त्यांना ८ दिवसाच्या आत परवानगी दिली जाते.

**मा.महापौर :** अशी किती प्रकरणे आहे की, सामान्य नागरिकांना ८ दिवसांमध्ये आपण परवानगी दिलेली आहे.

**उपअभियंता, नगररचना (श्री.खन्ना) :** कागदपत्राची पूर्तता असेल तर ८ दिवसांमध्ये परवानगी दिली जाते.

**श्री.अंबादास दानवे :** मेघा सिटी प्रोजेक्टला अनधिकृतपणे परवानगी दिलेली आहे. याचा सविस्तर खुलासा करावा.

**उपसंचालक, नगररचना :** मेघा सिटी प्रोजेक्टची योजनाही विशिष्ट कालमर्यादेसाठी असून ही प्रकरणे निकाली काढण्यात आली. ही वस्तुस्थिती आहे. अशी प्रकरणे ३१ मार्च पर्यंत निकाली काढणे जरुरी होते व या प्रत्येक प्रकरणांमध्ये मा.आयुक्तांची परवानगी घेण्यात आलेली आहे. निव्वळ नगररचना विभागाच्या स्तरावर परवानगी देण्याची प्रकरणे निकाली काढण्यात आलेली नाही. यात नियम व अटीचे पालन करुनच परवानगी दिलेली आहे. बरेच लोकांच्या परवानगीची प्रकरणे लवकर निकाली काढण्याचा प्रयत्न होत आहे. कारण माझेकडे आलेली कोणतीही संचिका एक दिवसाच्या वर प्रलंबित नसते मग ती कोणती ही संचिका असो. बँक गॅरंटी हा प्रोसिजरचा भाग आहे. सेल्फ डेव्हलपमेंट केले नाही तर सेक्युरिटीचा भाग आहे. परवानगी दिली त्याद्वारे निधी जमा झाला तो ८४ लाखाच्या वर गेलेला आहे. बॅंक गॅरंटी ही ९८ लाखाच्या वर आलेली आहे. बँक गॅरंटी वाढवून घेण्यात येईल.

**श्री.नंदकुमार घोडेले :** मेघा सिटी प्रोजेक्टसाठी बेसमेंन्ट कंप्लीशन सक्तीचे करावे.

**उपसंचालक, नगररचना :** मंजूर नकाशामध्ये जे जे दाखवले आहे. त्या सर्वांचे कम्प्लेशन घेतले गेले पाहिजे. परंतू या विभागामध्ये प्रत्येक वेगवेगळी कामे करण्यास कर्मचारी कमी पडतो. माझेकडे अतिरिक्त कार्यभार आहे. इतर महानगरपालिकेचा विचार केल्यास कोल्हापूर, महानगरपालिकेत नगररचना विभागामध्ये ७० कर्मचाऱ्यांचा स्टॉफ आहे. नाशिक, महानगरपालिकेमध्ये ११० कर्मचाऱ्यांचा स्टॉफ असून या महानगरपालिकेमध्ये कर्मचारी कमी आहे. वाढण्याची गरज आहे. माझेकडे औरंगाबाद उपसंचालक नगररचना या पदाचा चार्ज असून येथे अति.चार्ज माझेकडे असतांना सुध्दा जास्त वेळ, येथील कामे करण्यास मी देत असून मला खात्री आहे की, जी प्रलंबित कामे आहे ती लवकरच पूर्ण होतील. वेगवेगळ्या पध्दतीने व लवकर कामे होण्यासाठी या महानगरपालिकेमध्ये माझे प्रयत्न चालू आहे.

**श्री.अंबादास दानवे :** प्रताप डेव्हलप यांनी कम्प्लेशन प्रमाणपत्र घेतलेले नाही, अशी माहिती मिळाली. त्यांना पुन्हा परवानगी दिली.

**उपसंचालक, नगररचना :** कम्लेशन प्रमाणपत्र देणे हे त्या बांधकाम कर्त्यांची ऐच्छिक बाब आहे.

**मा.महापौर :** इमारतीचे कामा संबंधीचे कम्प्लेशन प्रमाणपत्र दिले नसेल व त्याच इमारतीसाठी पाणीपुरवठा करण्यासंबंधी परवानगी दिली असेल ही अत्यंत चुकीची पध्दत आहे.

**श्री.पंडागळे रतनकुमार :** या महानगरपालिकेत नगररचना विभागातील होत असलेल्या कामाची चौकशी करण्याची अत्यंत गरज आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** नंदलाल कमेटी सर्व कामासाठी स्थापन करण्यात यावी. फक्त नगर रचनासाठीच नाही. ठराव पास करुन शासनाकडे द्यावे लागेल.

**मा.महापौर :** या विभागाची संपूर्ण माहिती घेण्यासाठी शहरातील झालेल्या कामाची सध्या स्थिती काय आहे. ते पहावे लागेल या बाबत प्रथम चौकशी करुन घ्यावी लागेल. व त्याबाबत या विभागातील परवानगी व इतर कार्यवाही कशी करण्यात आली याची सर्व चौकशी कमेटी मार्फत करावी लागेल.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** शहरातील सिध्दार्थ उद्यानामध्ये सकाळी काही मुले व्यायामसाठी जातात म्हणून सकाळी उद्यान ६ ते ९ पर्यंत खुले ठेवण्यात यावे.

**मा.महापौर :** यास मान्यता देण्यात येते.

या बरोबर जण-गन-मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## दिनांक १९.०५.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार, दिनांक १९.०५.२००१ रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "कै.प्रबोधनकार कैशव सिताराम ठाकरे" सभागृहात मा.महापौर डॉ.श्री.भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेची "वंदेमातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय नगरसेवक उपस्थित होते.

१. स.स.श्री. प्रशांत देसरडा
२. स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३. स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
४. स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५. स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६. स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७. स.स.श्री. शे.इलियास किरमानी शे.ऊमर
८. स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९. स.स.सौ. शकुंतला सांडुजी इंगळे
१०. स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११. स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१२. स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३. स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१४. स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१५. स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१६. स.स.सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन
१७. स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८. स.स.श्री. शे.शकील पटेल शे.बुढन पटेल
१९. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे
२०. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१. स.स.श्रीमती कुमावत अविनाश लक्ष्मण
२२. स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२३. स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२४. स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२५. स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२६. स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२७. स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२८. स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२९. स.स.श्री. अय्युब खान सरदार खान
३०. स.स.श्री. अ.रशिद अ.सत्तार
३१. स.स.श्री. जैन विकास रतनलाल
३२. स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३३. स.स.श्री. शिरसाट संजय पांडुरंग

३४. स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३५. स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान
३६. स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३७. स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३८. स.स.श्री. स.मुमताज अली मोज्जम अली
३९. स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
४०. स.स.श्री. नासरी खान सरदार खान
४१. स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
४२. स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४३. स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत
४४. स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४५. स.स.सौ. नुसरत बानो फिरोजखान
४६. स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४७. स.स. सौ. मोरे जयश्री कुमारराव
४८. स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४९. स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या
५०. स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५१. स.स.श्री. अ.कदिर मौलाना सय्यद
५२. स.स.श्री. अशरफ मोतिवाला
५३. स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५४. स.स.सौ. शाहीन जफर महमुद जफर
५५. स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगीरथ
५६. स.स.श्री. स.सलीम स.युसूफ
५७. स.स.श्री. तकीसहन खान कासीमखान खान
५८. स.स.श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहेमद
५९. स.स.श्री. मीर हिदायत अली मिर बसलत अली
६०. स.स.श्री. शे.इसाक शे.जैनोद्दीन
६१. स.स.श्री. अफसर खान यासीन खान
६२. स.स.सौ.सुलताना बेगम चाँदखाँ
६३. स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६४. स.स.श्री. शे.मुनाफ शे.यासीन
६५. स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
६६. स.स.श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान
६७. स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर
६८. स.स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
६९. स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
७०. स.स.श्री. स.अली सलामी स.मीरा सलामी
७१. स.स.श्री. तनवाणी किशनचंद्र लेखराज
७२. स.स.सौ. निखत परवनी ईजाज अली

## स्विकृत सदस्य

१. स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
२. स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

चर्चा :

**श्री.अंबादास दानवे :** सभेला सुरुवात होण्यापुर्वी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.श्री.सुधाकरराव नाईक तसेच थोर साहित्यीक स्व.श्री.पु.घ.हौजवाला तसेच फुलंब्री तालुक्यातील गणोरी येथील भारतीय संरक्षण सेवेतील जवान स्व.श्री.बाळु पेंढरकर यांचे नुकतेच निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :** कृपया सर्वांनी २ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी. (याचवेळी सभागृहातर्फे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.श्री.सुधाकरराव नाई, थोर साहित्यीक स्व.श्री.पु.घ.हौजवाला तसेच भारत सिमेचे संरक्षण करतांना मृत्यू पावलेले जवान स्व.श्री.बाळु पेंढरकर या सर्वांना ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

**मा.महापौर :** विषय क्र.१ वर अगोदर चर्चा करावी विषयपत्रिका संपल्यानंतर जनरल चर्चा घेण्यांत येईल.

**विषय क्र.३८९/१ :**

दिनांक १४.०३.२००१ ची अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १६.०४.२००१ व २०.०४.२००१ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

चर्चा :

**श्री.प्रकाश निकाळजे :** दिनांक २०.०४.२००१ च्या इतिवृत्तातील ठराव क्र.३६८/८ स्थगित ठेवण्यांत आलेला होता. त्यास मंजूरी देण्यात यावी.

**मा.महापौर :** यास मान्यता देण्यांत येते.

**सौ.चंद्रात्रे सुवर्णा :** इतिवृत्तावरील पान क्र.९,११,२०,२७ वर मी मागील वेळेस चर्चेनुसार प्रश्न उपस्थित केलेले होते. त्यांचे सविस्तर माहिती देण्यांत यावी. इतिवृत्त कायम झाल्यास उत्तरे मिळणार नाही.

**श्री.प्रकाश निकाळजे :** इतिवृत्त प्रथम कायम करुन घ्यावे जेव्हा चर्चा सुरु होईल. त्यावेळी उत्तरे घ्यावी. विषयपत्रिका संपल्यानंतर उत्तर घ्यावे.

**श्री.सुदाम सोनवणे :** स.सदस्या सौ.चंद्रात्रे यांनी पान क्र. ९ व १९९५ च्या डी.पी.प्लॅन नुसार रस्त्यांची रुंदी किती बांधीत मिळकती किती अशी वेगवेगळ्या प्रस्तावानुसार माहिती विचारलेली होती. आपण अधिकाऱ्यांना तसे आदेशित करुन त्यांना लेखी माहिती देण्याचे आदेश करावे.

**मा.महापौर :** स.सदस्या सौ.चंद्रात्रे यांनी मागील बैठकीत काही प्रश्न उपस्थित केलेले होते. त्यांची सविस्तर लेखी माहिती संबंधित अधिकारी यांनी त्यांना द्यावी.

**श्री.कुमावत अविनाश :** दिनांक २०.०४.२००१ च्या इविृत्तातील पान क्र.५ वर विषय क्र.३६१/२ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणीसाठी किती खर्च येणार याचा खुलासा करावा. माहिती या बैठकीत देणार होते.

**मा.महापौर :** पुतळा उभारण्यासाठी वेगवेगळ्या विभागा अंतर्गत जी जी कामे येतात ती कामे चालू आहे. यामध्ये रस्ता रुंदीकरण, पुतळा उभा करणे, हायमास्ट लावणे इ.कामासाठी आपण ७५ लाख रुपयाची मंजूरी दिलेली आहे. जागा भूसंपादनासाठी २ ठराव आपण मंजूर करुन मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवलेले आहे. त्यांचा खर्च काय येईल ते आताच सांगता येणार नाही. तो मंजूर प्रस्ताव आज कायम होत असून त्याची माहिती यानंतर घेता येईल. विषय क्र. इतिवृत्तातील.
१ कायम करण्यास सर्वानुमते देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक २०.०४.२००१ च्या इतिवृत्तातील स्थगित विषय क्र.३६८/८ ला सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १०० फुट रुंद जालना रस्ता ते गजानन महाराज मंदिर या रस्त्याने बाधित मिळकत न.भु.क्र.१५१८७ पैकी ९११०.०० चौ.मी. बांधित क्षेत्राचे भूसंपादन रितसर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे मार्फत कार्यवाही करण्यास भूसंपादनाच्या खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वरील दुरुस्ती व इतर दुरुस्त्यांसह दिनांक १४.०३.२००१ ची अर्थसंकल्पयी विशेष सर्वसाधारण सभा, दिनांक १६.०४.२००१ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३९०/२ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (१) अन्वये महानगरपालिकेतील तृतीय श्रेणी (निरिक्षक वर्ग, सुरक्षा कर्मचारी, वाहनचालक व तत्सम) व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या गणवेश वाटपा बाबतच्या विनियमास ठराव क्रमांक २५ दिनांक १८.०६.१९९३ अन्वये मान्यता मिळालेली असून त्यानुसार खालीलप्रमाणे साहित्य वाटप करण्यांत येते.

१. गणवेश :- प्रत्येकी दोन गणवेश दरवर्षी देणे बाबत तरतूद आहे.
२. साड्या :- प्रत्येकी दोन साड्या ब्लाऊजपीस, शर्ट सलवार व ओढणी कापड दरवर्षी संक्राती पूर्वी देण्यांत येते.
३. गरमकपडे :- दर तीन वर्षातून एकदा गरम कपड्याचा पुरवठा करणे बाबत तरतूद आहे.
४. पावसाळी प्रावरणे :- वरीलप्रमाणे
५. चप्पल, शुज :- दरवर्षी एक जोड देणे बाबत तरतूद आहे.

वरीलप्रमाणे जरी तरतूद असली तरी साड्या/शर्ट सलवार वगळता महानगरपालिकेची आर्थिक तरतूद व आर्थिक स्थिती लक्षात येवून साहित्याचा पुरवठा संबंधितास करण्यात येतो. सदरील साहित्य निविदा पध्दतीने नमुने मागवून प्राप्त नमुने हे कामगार कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी तसेच कर्मचारी/कामगारपैकी काही कर्मचाऱ्यांना प्रतिनिधी स्वरुपात बोलविण्यांत येवून त्यांची पसंती घेण्यांत येते. व त्यानुसार साहित्य मागविणे बाबतची प्रक्रिया पूर्ण करण्यांत येते. सदरील पध्दत ही गेल्या ७ ते ८ वर्षापासून

चालू आहे. तत्पुर्वी शासनाचे नियमानुसार साहित्य मागविण्यांत येवून त्याचा पुरवठा करण्यांत येत होता. परंतू काही संघटनांनी साहित्य अस्वीकृत केल्याने निविदा पध्दतीनुसार वरीलप्रमाणे पसंती घेवून साहित्य मागविण्यांत येत आहे.

सदरील पध्दतीमुळे पसंत केलेले साहित्य हे उच्च दर्जाचे व महागडे असल्याने तसेच ए.जी.नागपूर याचे लेखा परिक्षणाचे अहवालानुसार सदरील पध्दत ही योग्य नसून शासनाचे नियमानुसार साहित्य मागविणे बाबत शेरा दिला आहे. करिता खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

१. तृतीयश्रेणी कर्मचारी यांना गणवेश देण्याबाबतचे शासन निर्णय उपलब्ध नसल्याने पोलिस विभागातील अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे शासन निर्णय क्रमांक यु.एन.एफ.-९०/२५६०/(१४)/पोल-४, दि.२० ऑगस्ट, १९९२ अन्वये अशा कर्मचाऱ्यांना चार वर्षाकरिता चार गणवेश दोन वर्षाकरिता टोपी व बुट इ.साठी २५००/- रोख देण्यांत येते. तसे सोबत प्रपत्र "अ" मध्ये सविस्तर देण्यात आलेले आहे.

२. चतुर्थश्रेणी कामगार/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सी.एल.ओ.-१०८३/२५१४/२९ दिनांक २९ सप्टेंबर १९९० अनुसार अर्ध्या बाह्याचे खाकी/पांढरा/निळा बुशशर्ट ४८% पॉलिष्टर, ५२% कॉटन अशा प्रकारचे ८९ सेमी रुंद प्रति शर्ट २ मिटर, ३ शर्ट करिता, खाकी/पांढरी/निळी लांब विजार ६७% पॉलिष्टर, ३३% कॉटन १३८ सेमी रुंद प्रति विजार १.३० मीटर अशा प्रकारचे तीन विजारी २ वर्षाकरिता देण्यात येते.

३. सर्व चतुर्थश्रेणी महिला कामगार यांना शासन निर्णय क्र.सी.एल.ओ./१०८२/२५१४/२९, दि.१९ सप्टेंबर ९० अनुसार स्त्री कर्मचाऱ्यांना साड्या फिकट निळ्या रंगाच्या व काळी किनार असलेली ६७% पॉलिस्टर व ३३% कॉटन ११८ सेमी रुंदी ५ मीटर साड्या दोन वर्षासाठी देण्यात येतात. तसेच ब्लाऊज पिस फिकट जिला ४८% पॉलिस्टर ५२% कॉटनचे ८० सेमीचे (प्रति ब्लाऊज) ३ नग देण्यात येतात.

४. गरम कपडे शासनाचे निर्णयानुसार निळे अतितलम कापड १३७२/१४२२ मी.मी.रुंद एका सुटाकरिता ४ वर्षातून एकदा देणे बाबत तरतूद आहे. तथापि महानगरपालिका कामगारांना सदरील साहित्य देणे बाबत योग्य तो बदल करुन प्रपत्रात नमूद करण्यांत आलेले आहे. पावसाळी प्रावरणे देणे बाबत शासन निर्णय उपलब्ध होवू न शकल्याने सोबत प्रपत्रात नमूद केल्यानुसार प्रस्तावित करण्यांत आलेले आहे. त्याचप्रमाणे चप्पल जोड देणे बाबत शासन निर्णय उपलब्ध होवू न शकल्याने महाराष्ट्र चर्मोयोम विकास महामंडळ, मुंबई यांचे पत्रकानुसार जेंटस् कोल्हापुरी चप्पल इ. देणे बाबत सोबत प्रपत्रात नमूद केल्यानुसार एक जोड प्रत्येक दोन वर्षासाठी याप्रमाणे प्रस्तावित करण्यांत आलेले आहे.

५. दिनांक ०७.०२.२००१ रोजी झालेल्या मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मा.सभापती यांनी रुलिंग दिले की, शासनाच्या नियमानुसार कोणते ड्रेस असावेत त्यानुसार कार्यवाही व्हावी. ड्रेस पसंत करण्यासाठी महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, मा.आयुक्त तसेच मुख्य लेखाधिकारी राहतील. व पुढील वर्षापासून त्यांची अंमलबजावणी करण्यांत यावी. यापुढे संघटनेच्या किंवा कर्मचारी ड्रेस पसंत करतील. त्यानुसार कार्यवाही होऊ नये.

६. उक्त अनुषंगाने महानगरपालिकेच्या सेवा व त्यांनी कार्यपध्दती या गोष्टी लक्षात घेवून ज्या ठिकाणी शासन निर्णय उपलब्ध होऊ शकले नाही. त्या ठिकाणी सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये देण्यात येणारे गणवेश/गणवेश साहित्य इत्यादी बाबी नमूद

करण्यांत आलेल्या आहे. त्यानुसार महानगरपालिकेने यापूर्वी बनविलेले गणवेश विनिमय याची प्रत विचारार्थ सादर करण्यात येत असून सदरील साहित्य निविदेद्वारे दिलेल्या विवरणानुसार दर व नमूने मागविण्यांत येवून त्याचे शासकीय दर इ.बाबी विचारात घेवून प्रस्ताव प्रशासनाचे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर करण्यांत येईल. यामध्ये कामगार संघटनेची किंवा प्रतिनिधीची पसंती घेणे आवश्यक राहणार नाही.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

### <u>तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचारी गणवेशाबाबतचे प्रस्तावित विनिमय</u>

राज्य शासनाचे निर्णयानुसार राज्य शासकीय कर्मचारी, कामगार यांना त्यांनी वेळोवेळी पारित केलेल्या निर्णयानुसार गणवेश व तत्सम साहित्य देण्यात येते. त्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेच्या तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना देण्यांत येणारे गणवेश व तत्सम साहित्याबाबतचे प्रस्तावित प्रारुप विनिमय

१. कर्मचारी :- म्हणजे औरंगाबाद महानगरपालिका मधील कायमस्वरुपी तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचारी
२. शोल्डर बॅच :- पुरुष कर्मचाऱ्यांचा गणवेशाच्या दोन्ही खाद्यांवर परिधान करावा लागणारा "मनपा औंरगाबाद" शोल्डर बॅच.
३. चेस्ट बॅच :- महिला कर्मचाऱ्यांना परिधान करावा लागणारा मनपा औरंगाबादचा मोनोग्राम असलेला बॅच होत.
४. तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी अनुसूचि (जोडपत्र/प्रपत्र) वेगळे जोडले आहे.

### <u>प्रपत्र</u>

प्रपत्र म्हणजे पुरुष व स्त्री कर्मचाऱ्यांना गणवेश व गणवेश सोबतचे साहित्य देय असलेली (अनुसूची) प्रपत्र होय.

## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

### <u>तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या गणवेशाबाबतचे प्रस्तावित विनिमय</u>

१. या विनिमयास जोडण्यात आलेल्या यादी अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक सेवकास त्याचा समोर निर्देशलेला विशिष्ट वर्गाचा गणवेश दिला जाईल.
२. पावसाळी व हिवाळी प्रावरणे आणि गणवेशाच्या वस्तु या ठरवून दिलेल्या कालमर्यादा पुरता म्हणून दिल्या जातील आणि त्याची ती कालमर्यादा संपे पावेतो त्यांचा फेर पुरवठा केला जाणार नाही. या वस्तु नविन घेते वेळी जुन्या वस्तु परत करण्याची आवश्यकता नाही.
३. नियम म्हणून गणवेशाच्या वस्तु केवळ कायम तृतीय चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना दिल्या जातील, की ज्यांची कमीत कमी सेवा एक वर्षाची असेल.

४. सुरक्षा अधिकारी, सुरक्षा जमादार, सुरक्षा रक्षक, जकात निरिक्षक, स्वच्छता निरिक्षक, ज्ये.स्व.निरिक्षक, कर निरिक्षक, इमारत निरिक्षक, अन्न निरिक्षक, मलेरिया निरिक्षक, मुकादम, शिपाई, रखवालदार, जकात नाका शिपाई, वाहनचालक व सेवक नेहमी गणवेशामध्ये असणे आवश्यक आहे.

५. चतुर्थश्रेणी सर्व स्त्री कामगार (मजूरीन/माळीन/सेविका/शिपाई/आरोग्य परिचारिका इ.) यांना प्रपत्रात दर्शविल्यानुसार साडी, ब्लाऊज पिस व इतर साहित्य देय असेल.

६. तृतीय व चतुर्थश्रेणी पुरुष कर्मचारी/कामगार यांना शर्ट, पॅन्ट चप्पल/बुट जोड ब्राऊन शुज प्रपत्रानुसार देय असेल.

७. हिवाळी गरम कपडे चौथ्या वर्षी हिवाळा सुरु होण्यापुर्वी देण्यात येतील. स्त्री कामगारांना एक उलन चादर व एक उलन स्वेटर देय असेल, तर पुरुष कामगारांना/कर्मचाऱ्यांना (प्रपत्रानुसार उलन कोट/उलन स्वेटर देय असेल.)

८. पावसाळी प्रावरणे सर्व पुरुष मजूर व महिला मजूरीनी यांना दर ४ वर्षाला पावसाळ्यापुर्वी रेनकोट देण्यात येईल. मुकादम व जवान यांना रेनकोट/छत्री देय असेल तसेच वर्ग-३ कर्मचारी यांना प्रपत्रात नमूद केल्यानुसार रेनकोट देय असेल.

९. स्वच्छतेच्या कामासाठी अत्यावश्यक सेवा म्हणून सर्व मलेरिया मजूर, गटार (ड्रेनेज चेंबर सफाईचे) काम करणारे स्विपर सार्वजनिक बांधकाम विभागातील डांबराचे काम करणारे गॅग लेबर प्रत्येक विभागात लॉरीवर कचरा उचलणारे मजूर यांना गमबुट देय असेल.

१०. महिला कर्मचारी यांना देय साहित्य प्रपत्रात नमूद केल्यानुसार प्रत्येक विभाग प्रमुख/शाखा प्रमुख/विभागीय अधिकारी यांनी सहावारी, नऊवारी, व ड्रेसर (गणवेश) परिधान करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची यादी इष्ट नमुन्यात प्रपत्र "ब" प्रमाणे माहे सप्टेंबर अखेरपर्यंत भांडार विभागात पाठविणे बंधनकारक राहील.

११. गणवेश धारण करणाऱ्या प्रत्येक सेवकांनी स्वतःच्या गणवेश कामावर असतांना व्यवस्थिपणे वापरला पाहिजे. पुरविलेला गणवेश कोणासही देण्यास अगर त्यांची अन्य रितीने विल्हेवाट करण्यास सक्त मनाई आहे. सदर बाबत उल्लंघन घडल्यास गणवेशाची जी किंमत असेल ती संबंधित कर्मचाऱ्यांकडून वसुल केली जाऊन कर्मचारी किमान रु.१००/- दंडास पात्र होईल.

१२. गणवेश धारण करणाऱ्या प्रत्येक सेवकाने गणवेश स्वच्छ व व निटनेटका ठेवणे हे त्याचे कर्तव्य आहे. यासाठी खाते प्रमुखांनी गणवेशांची त्रैमासिक तपासणी करण्याची व्यवस्था ठेवावी.

१३. गणवेश धारण करणाऱ्या सेवकांची बिगर गणवेशाच्या जागी गणवेश मिळाल्यापासून ६ महिन्याचा आत बदली झाल्यास सदर जागेवरुन सोडले पाण्यापुर्वी संबंधित सेवकाने त्याचा गणवेश संबंधित खाते अधिकाऱ्यांकडे परत केला पाहिजे. गणवेश परत न केल्यास गणवेशाची ५०% रक्कम त्याच्या पगारातून अगर त्यास देणे असलेल्या अन्य रक्कमेतून वसुल केली जाईल. तसेच गणवेश प्राप्तीनंतर ६ महिन्यांनी बदली झाल्यास गणवेश परत घेण्याची गरज नाही. गणवेशाच्या जागेवरुन गणवेषाच्या अन्य जागेवर बदली झाल्यास गणवेश परत घेतला जाणार नाही.

१४. गणवेश धारण करणाऱ्या सर्व सेवकांनी गणवेश व गणवेषाची कोणतीही वस्तु कामाच्या वेळे व्यतिरिक्त अन्य वेळी वापरता कामा नये. गणवेश किंवा गणवेषाचे वस्तु तिच्या वापराच्या आयु मर्यादेपुर्वी खराब (निकामी) झाल्यास किंवा ठरवल्यास त्या सेवकास स्वतःच्या खर्चाने ती वस्तु खरेदी करुन भरपाई करावी लागेल.

१५. मनपातील सर्व विभाग प्रमुख यांनी विहीत नमुन्यात गणवेश रजिष्टर ठेवावे. आणि त्यामध्ये गणवेष वस्तुची जमा व खर्चाची नोंद दिनांकानिशी ठेवावी.

१६. चतुर्थश्रेणी मजूर, मजूरीन, सफाई मजूर, मजूरीन व इतर खात्यातील मनपा चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना शिलाईची रक्कम खालीलप्रमाणे वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे देय राहील. मनपाने शिलाई करुन दिलेस सदरील बाब लागू राहणार नाही.

| **गणवेश** | **शिलाई** |
|---|---|
| प्रती खाकी गणवेश | रु.१२०/- (शर्ट व पँट एक जोड) |
| प्रती पांढरा गणवेश | रु.१२०/- (शर्ट व पँट एक जोड) |
| प्रती निळा गणवेश | रु.१२०/- (शर्ट व पँट एक जोड) |
| उलन कोट | रु.२४०/- (अस्तरासह) |
| ब्लाऊज | रु.२०/- (प्रती जोड) |
| शर्ट-सलवार | रु.६०/- (प्रती जोड) |

कृपया पुढील पानावर पहावे ......

(पुढील पानावर विषय चालू)

## <u>विनिमय तक्ता क्र............ प्रपत्र "अ" तृतीयश्रेणी कर्मचारी</u>

| **अ. क्र.** | **विभागाचे नांव** | **पदनाम** | **पुरविण्यांत येणारे गणवेश** | | **पावसाळी/हिवाळी प्रावरणे व इतर** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **गणवेश** | **गणवेष सोबतचे साहित्य** | | |
| १. | आरोग्य विभाग | १) ज्ये.अन्न निरिक्षक | चार वर्षाकरिता चार गणवेश दोन वर्षाकरिता टोपी,बुट व इतर साहित्यासाठी रु.२५००/- रोख देण्यांत येतील. | | १) रेनकोट, दर चार वर्षानी, २) वुलनकोट दर चार वर्षानी वुलन जर्सी कोटा करिता प्रत्येकी १.८० मीटर कापड | |
| | | २) अन्न निरिक्षक | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |
| | | ३) मलेरिया निरिक्षक | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |
| २. | प्रशासकीय विभाग | १) इमारत निरिक्षक | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |
| ३. | जकात विभाग | १) जकात निरिक्षक | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |
| ४. | सुरक्षा विभाग | १) सुरक्षा अधिकारी | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |
| | | २) जमादार | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |
| | | ३) सुरक्षा रक्षक | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |
| ५. | साफसफाई खाते | १) ज्ये.स्वच्छता निरिक्षक | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |
| | | २) स्वच्छता निरिक्षक | वरीलप्रमाणे | | वरीलप्रमाणे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | कर वसुली विभाग | कर निरिक्षक | चार वर्षाकरिता गणवेश दोन वर्षाकरिता टोपी, बुट व इतर साहित्यासाठी रु.२५००/- रोख देण्यांत येईल. | १) रेनकोट दर चार वर्षांनी<br>२) वुलनकोट/दर चार वर्षांनी वुलन जर्सी कोटाकरिता प्रत्येकी १.८० मी.कापड अथवा एक जर्सी | |
| ७. | यांत्रिकी विभाग | १) वहन चालक (मा.सर्व पदाधिकारी, व सर्व वर्ग-१ अधिकारी यांचे कार चालक...) | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | |
| ८. | आरोग्य विभाग | १) वरीष्ठ क्षेत्र कार्यकर्ता (एस.व्ही.एन.पी. डब्ल्यु व एस.एफ.डब्ल्यु) | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे फक्त रेनकोट दर चार वर्षाला एकचा प्रमाणे देय असेल. | |
| ९. | आरोग्य विभाग | परिचारिका/नर्स/ एएनएम/पी.एच. एन. | पांढऱ्या रंगाची साडी ६७% पॉलिस्टर ३९% कॉटन, १८८ सें.मी.रुंद साडी दर दोन वर्षाला तीन साड्या.<br>ब्लाऊज पिस पांढरा रंग ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन ८० से.मी.लांबीचे तीन नग दर दोन वर्षाला | फोल्डींग छत्री, एक नग दर चार वर्षाला नेमप्लेट एक, चेस्ट बॅच दोन, स्कॉर्फ दोन, निळे बेल्ट दोन, कॅन्व्हस शुज, सॉक्स दोन दर दोन वर्षाला | |
| १०. | आरोग्य विभाग | मिश्रक (कंपाडर) | अर्ध्या बाह्यांचे पांढरे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर पुट, कॉटन ८९ से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर पांढरी लांब विजार, ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारी करिता ३.९० मीटर प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | नेमप्लेट एक, शोल्डर बॅच एक, कन्व्हास शुज एक, सॉक्स एक पेअर, पांढरी टोपी एक, दोन वर्षाला एक साधी छत्री, दर चार वर्षाला एकदा | |
| ११. | यांत्रिकी विभाग | १) फोरमन (कार्यदर्शक) | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा<br>शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २) हेड मॅकनिक | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | ३) मेकॅनिक | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | ४) हेड पंप ऑपरेटर | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | ५) पंप ऑपरेटर | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ६) अॅटो इलेक्ट्रीशियन | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | ७) विद्युत लाईनमन | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा (खाकी रंग) | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा (गमबुट) | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | ८) पा.पु.लाईनमन | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा (खाकी रंग) | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा (गमबुट) | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | ९) फिटर | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा (निळा रंग) | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १०) क्लिनर | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट शुज दोन वर्षातून एकदा | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | ११) ज्यु ऑपरेटर | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच नेमप्लेट | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | १२) ऑईन मन | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच नेमप्लेट | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| १२. | गार्डन विभाग | १३) हेडमाळी | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा (खाकी रंग) | शोल्डर बॅच नेमप्लेट, कॅप | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १४) माळी पुरुष | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | शोल्डर बॅच नेमप्लेट, कॅप | एक रेनकोट एक वुलन कोट अथवा एक वुलन जर्सी दर चार वर्षातून एकदा देय असेल | |
| | | १५) शिपाई सर्व | अर्ध्या बाह्यांचे निळे बुशशर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८० से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर निळी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन, १३८ से.मी.रुंद तीन विजारीकरिता ३.९० मी.प्रत्येकी दोन वर्षातून एकदा (पांढरा रंग) | पांढरी टोपी | | |
| | | १६) सर्व जवान | अर्ध्या बाह्यांचे खाकी बुश शर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८९ से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर इतकी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन १३८ से.मी.रुंद तीन विजारी करिता ३.९० मीटर प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | नेमप्लेट, खाकी टोपी कोल्हापुरी पंचिका चप्पल, शोल्डर बॅच, दोन वर्षातून एकदा | एक रेन कोट एक वुलन कोट अथवा एक जर्सी दर चार वर्षातून एकदा | |
| | | १७) नाका जवान | अर्ध्या बाह्यांचे खाकी बुश शर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८९ से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर इतकी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन १३८ से.मी.रुंद तीन विजारी करिता ३.९० मीटर प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | नेमप्लेट, खाकी टोपी कोल्हापुरी पंचिका चप्पल, शोल्डर बॅच, दोन वर्षातून एकदा | एक रेन कोट एक वुलन कोट अथवा एक जर्सी दर चार वर्षातून एकदा | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १८) नाका हमाल | अर्ध्या बाह्यांचे खाकी बुश शर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८९ से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर इतकी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन १३८ से.मी.रुंद तीन विजारी करिता ३.९० मीटर प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | नेमप्लेट, खाकी टोपी कोल्हापुरी पंचिग चप्पल, शोल्डर बॅच, दोन वर्षातून एकदा | एक रेन कोट एक वुलन कोट अथवा एक जर्सी दर चार वर्षातून एकदा | |
| | | १९) वॉचमन/ गार्ड | अर्ध्या बाह्यांचे खाकी बुश शर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८९ से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर इतकी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन १३८ से.मी.रुंद तीन विजारी करिता ३.९० मीटर प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | नेमप्लेट, खाकी टोपी कोल्हापुरी पंचिग चप्पल, शोल्डर बॅच, दोन वर्षातून एकदा (फक्त चप्पल ऐवजी गमबुट व एक शिट्टी) | एक रेन कोट एक वुलन कोट अथवा एक जर्सी दर चार वर्षातून एकदा | |
| | | २०) पुरुष मजूर | अर्ध्या बाह्यांचे खाकी बुश शर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८९ से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर इतकी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन १३८ से.मी.रुंद तीन विजारी करिता ३.९० मीटर प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | नेमप्लेट, कोल्हापुरी पंचिग चप्पल, शोल्डर बॅच, दोन वर्षातून एकदा | एक रेन कोट एक वुलन कोट अथवा एक जर्सी दर चार वर्षातून एकदा | |
| | | २१) मलेरिया मजूर | अर्ध्या बाह्यांचे खाकी बुश शर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८९ से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर इतकी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन १३८ से.मी.रुंद तीन विजारी करिता ३.९० मीटर प्रत्येकी दोन वर्षातून एकदा | नेम प्लेट,गमबुट, व शोल्डर बॅच दोन वर्षातून एकदा | एक रेन कोट एक वुलन कोट अथवा एक जर्सी दर चार वर्षातून एकदा | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २२) सेवक (शिक्षण विभाग) | अर्ध्या बाह्यांचे खाकी बुश शर्ट ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन, ८९ से.मी.रुंद तीन शर्ट करिता ६ मीटर इतकी लांब विजार ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन १३८ से.मी.रुंद तीन विजारी करिता ३.९० मीटर प्रत्येकी दोन वर्षातून एकदा (फक्त गणवेशाचा रंग पांढरा) | नेमप्लेट, कोल्हापुरी पंचिंग चप्पल व शोल्डर बॅच दोन वर्षातून एकदा | एक रेन कोट एक वुलन कोट अथवा एक जर्सी दर चार वर्षातून एकदा | |
| १३ | उद्यान विभाग | माळीन | फिकट निळ्या रंगाचा व काळी विजार असलेली ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन ११८ से.मी.रुंद (साडी ५ मी/मी) आवश्यकतेनुसार ३ साड्या दोन वर्षाकरिता ब्लाऊज पिस फिकट निळा रंग, ४८% पॉलिस्टर ५२% कॉटनचे ६० से.मी. ३ ब्लाऊज पीस दोन वर्षाकरिता | नेम प्लेट एक चेस्ट बॅच एक लेडीज पंचींग कोल्हापुरी चप्पल एक जोड प्रती दोन वर्षाकरिता | एक वुलन स्वेटर, एक वुलन चादर, एक छत्री/रेनकोट, दर चार वर्षातून एकदा देय | |
| १४ | साफसफाई खाते | मजूरीन | फिकट निळ्या रंगाचा व काळी विजार असलेली ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन ११८ से.मी.रुंद (साडी ५ मी/मी) आवश्यकतेनुसार ३ साड्या दोन वर्षाकरिता ब्लाऊज पिस फिकट निळा रंग, ४८% पॉलिस्टर ५२% कॉटनचे ६० से.मी. ३ ब्लाऊज पीस दोन वर्षाकरिता | नेम प्लेट एक चेस्ट बॅच एक लेडीज पंचींग कोल्हापुरी चप्पल एक जोड प्रती दोन वर्षाकरिता | एक वुलन स्वेटर, एक वुलन चादर, एक छत्री/रेनकोट, दर चार वर्षातून एकदा देय | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री स्वीपर | शर्ट सलवार कापड ६७% पॉलिस्टर व ३३% कॉटन, फिकट निळा रंगाचा २१ मीटर कापड, ओढणी फिकट निळ्यारंगाची २.५ मिटरचे तीन नग, प्रत्येकी दोन वर्षाला एकदा | नेम प्लेट एक चेस्ट बॅच एक लेडीज पंचींग कोल्हापुरी चप्पल एक जोड प्रती दोन वर्षाकरिता | एक वुलन स्वेटर, एक वुलन चादर, एक छत्री/रेनकोट, दर चार वर्षातून एकदा देय | |
| | | दाया | पांढरा रंगाच्या व फिकट निळा किनार असलेली ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन ११८ से.मी.रुंद (साडी ५ मी/८ मी.आवश्यकतेनुसार) ३ साड्या दोन वर्षाकरिता ब्लाऊज पिस पांढरा रंग, ४८% पॉलिस्टर ५८% कॉटनची ८० से.मी.३ ब्लाऊज पीस दोन वर्षाकरिता | नेम प्लेट एक चेस्ट बॅच एक लेडीज पंचींग कोल्हापुरी चप्पल एक जोड प्रती दोन वर्षाकरिता | एक वुलन स्वेटर, एक वुलन चादर, एक छत्री/रेनकोट, दर चार वर्षातून एकदा देय | |
| १५ | शिक्षण व इतर विभाग | सेविका | पांढरा रंगाच्या व फिकट निळा किनार असलेली ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन ११८ से.मी.रुंद (साडी ५ मी/८ मी.आवश्यकतेनुसार) ३ साड्या दोन वर्षाकरिता ब्लाऊज पिस पांढरा रंग, ४८% पॉलिस्टर ५८% कॉटनची ८० से.मी.३ ब्लाऊज पीस दोन वर्षाकरिता | नेम प्लेट एक चेस्ट बॅच एक लेडीज पंचींग कोल्हापुरी चप्पल एक जोड प्रती दोन वर्षाकरिता | एक वुलन स्वेटर, एक वुलन चादर, एक छत्री/रेनकोट, दर चार वर्षातून एकदा देय | |

शासनाचे वेळोवेळी गणवेश संदर्भाने प्रसिध्द होणारे शासन निर्णयानुसार योग्य ती बदल सदरील विनियमात ग्राह्य धरण्यांत येईल.

**संवाद :**

**श्री.घोडेले नंदकुमार :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे काही कर्मचारी महानगरपालिकेकडे आलेले आहेत. त्या सर्व कर्मचाऱ्यांनी गणवेशाची मागणी केलेली असून त्यांना सुध्दा गणवेश देण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री.कुमावत अविनाश :** यासंबंधी बजेटमध्ये तरतूद केलेली आहे काय? होणारा खर्च बजेटच्या मर्यादित येतो का? त्याचा खुलासा करावा.

**मा.महापौर :** काल काही अधिकारी, पदाधिकारी व काही स.सदस्य यांनी जायकवाडी येथे पाणी पुरवठ्या संदर्भात पाहणी केली या विभागात रात्रदिवस कर्मचारी काम करतात त्यांनी गणवेश द्यावेत म्हणून मागणी केलेली असून या अगोदर त्यांना ९३-९४ मध्ये गणवेश दिलेले होते. आता त्यांचे मागणीनुसार त्यांचे निवेदनावर प्रशासनाने त्यांना गणवेश देण्याची कार्यवाही करावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** पाणी पुरवठ्याचे कर्मचारी २४ तास सेवेत असतात. म्हणून बजेट मध्ये तरतूद केलेली नसेल तरी इतर कामासाठी ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून या कर्मचाऱ्यांना एक गणवेश देण्यात यावा व सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांना नेहमीच गणवेशांत काम करावे लागते म्हणून एक ड्रेस ऐवजी दोन ड्रेस देण्याची कार्यवाही करावी.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. त्यास मान्यता देण्यांत येते.

**श्री.दानवे अंबादास :** मागील वेळेत महिला मजूरांना साड्या देण्यांत आलेल्या होत्या. त्या निकृष्ट दर्जाच्या असल्याने संबंधित महिलांनी त्या साड्या माझ्याकडे घेऊन आल्या व तशी तक्रार मा.आयुक्तांकडे २-३ महिन्यापुर्वी दिलेली आहे. त्या साड्या मी स्वत: लॅब मध्ये जाऊन चेक केल्या तर ८५-९० अशी किंमत त्या साड्यांची आहे. जास्तीत जास्त १०५ परंतू, आपण ज्या एजन्सीज कडून त्या साड्या घेतल्या. त्यांची किंमत ३००/- ते ४५०/- रुपये लावण्यात आलेली आहे. अशा पध्दतीने कार्यवाही होत असेल तर चर्चा करण्यांत यावी. सविस्तर माहिती घेण्यांत यावी.

**श्री.सुदाम सोनवणे :** स.सदस्यांनी उपस्थित केलेली बाब गंभीर स्वरुपाचे आहे. मजूर महिलांसाठी खरेदी करण्यांत येणाऱ्या साड्या ४००/- ते ५००/- रुपयाचे खरेदी केल्याचे दाखवण्यात येते. खरेदी करतानां अधिकारी पदाधिकारी असतात. पुन्हा त्या साड्यांची तपासणी केल्यास त्याच साड्या ८५/- ते १५०/- रुपये किंमत असल्याचे निदर्शनास येते. याची कसून चौकशी व्हावी व त्या संबंधी सूंपर्ण माहिती सभागृहात सादर करावी. तसेच महापौर यांचे चोपदार व तेथील शिपाई यांना ४ ते ५ वर्षापासून गणवेश देण्यात आलेले नाही. या कर्मचाऱ्यांना सुध्दा गणवेश देण्याबाबत कार्यवाही व्हावी. मागील कपडा खेरदीत भ्रष्टाचार झालेला आहे. सखोल चौकशी करावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** विषय पत्रिकेवरील पान क्र.३ वर क्र.६ मध्ये गणवेश खरेदी करतांना कामगार संघटनेचा किंवा प्रतिनिधीची पसंती घेणे आवश्यक राहणार नाही. असे दिले. परंतू हे वाक्य वगळून प्रतिनिधी पसंती घेणे आवश्यक राहील. अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**श्री.मीर हिदायत अली :** झोन क्र.८ पाणी पुरवठा विभागात १० ते १२ कर्मचाऱ्यांना अद्याप स्वेटर मिळालेले नाही. थंडीवाऱ्यामध्ये काम करावे लागते. विचारणा केल्यास स्वेटर संपल्याचे सांगण्यांत येते.

**मा.महापौर :** मागील वर्षी साड्या व इतर गणवेश वाटप करण्यात आले. त्यासंबंधी पध्दत कशी होती. साड्यांची किंमत काय होती. माहिती देण्यांत यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** मागील वर्षी मजूर महिलासाठी साड्या व पुरुषासाठी गणवेश मटेरियल खरेदीसाठी एकूण ४,३७,०००/- रुपये (चार लक्ष सदुसष्ट हजार) रुपये

खरेदी केलेली होती. निविदा पध्दतीनी गणवेशषाचे मटेरियल खरेदी केले जाते. व टेंडर काढल्या नंतर कामगार प्रतिनिधी आणि कामगार यांचे समक्ष कपडा पसंत करुन तसा प्रस्ताव स्थायी समिती समोर पाठवल्या जातो. व जे मटेरियल पसंतीनुसार आणण्यात आले. व ते मुंबई येथून लॅब तपासणी करुन आल्यानुसारच संबंधितास रक्कम अदा केलेली असून अशी कसलीही तक्रार प्रशासनाकडे आलेली नाही. वाटाघाटीनुसार मटेरियलचे दर मागण्यात आले होते. त्या नुसारच कार्यवाही केलेली आहे. एका साडीची किंमत ४३०/- रुपये होती.

**श्री.पंडागळे रतनकुमार :** रोजंदारीवर जे कर्मचारी काम करतात त्यांना सुध्दा एक गणवेश देण्याची कार्यवाही व्हावी.

**मुख्यलेखाधिकारी :** दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना गणवेश द्यावे अशी तरतूद केलेली नाही. शासनाकडे मार्गदर्शन मागवले असता अशी कुठेही शासनाकडे तरतूद केलेली नाही. त्यामुळे बजेटमध्ये अशी कुठलीही तरतूद या कर्मचाऱ्यांना गणवेश देण्या बाबत करण्यात आलेली नाही.

**श्री.प्रकाश निकाळजे :** आपण सालबादा प्रमाणे दरवर्षी कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवतो. मजूर कर्मचारी शहरातील घाण उचलतात. नागरिकांना योग्य सुविधा व स्वच्छता राहण्यासाठी काम करतात. घाणीत काम करुन आपले आयुष्य कमी करतात व आपल्या कडे कामगारांची आवश्यकता असल्याचे १४-१५ वर्षापासून अस्थायी कर्मचारी म्हणून काम करतात कायम व हंगामी कर्मचारी तेव्हाचेच काम करतात, तसेच जे जे कर्मचारी थंडीवाऱ्यात काम करतात. अशा कर्मचाऱ्यांना मानवी दृष्टीकोन समोर ठेऊन अस्थायी कामगार व पाणी पुरवठ्यातील कामगारांना गणवेश देण्या बाबत कार्यवाही व्हावी. आणि प्रस्तावाच्या शेवटी संघटनेचे किंवा प्रतिनिधी यांचे प्रस्तावाच्या शेवटी संघटनेचे किंवा प्रतिनिधी यांचे पसंतीनुसार कार्यवाही करण्यात येणार नाही असे दिले यात दुरुस्ती करुन प्रतिनिधी म्हणून या अगोदर समावेश करण्यांत येत असे त्यांना राहू द्यावे या दुरुस्तीसह हा प्रस्ताव मंजूर करावा.

**मा.महापौर :** कायम स्वरुपी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याबाबतचा प्रस्ताव असलेला असून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. अस्थायी कामगारांना पुरवणी बजेटच्या गणवेश देण्याबाबत कार्यवाही करावी.

**श्री.पंडागळे रतनकुमार :** महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून काही विशेष निर्णय घेण्याचे अधिकार या सभागृहाला आहेत. म्हणून प्रत्येक वेळी शासनाचे नियमाच्या अधिन राहून कार्यवाही करणे योग्य होणार नाही. कर्मचारी आपले आहे. सर्वच कर्मचारी सारखेच कामे करतात. या अगोदर अस्थायी कर्मचाऱ्यांना गणवेश देण्यात आलेले होते. तसा सभागृहाने निर्णय घेतला होता. आताच का नको?

**मुख्यलेखाधिकारी :** मागे मजूर महिला कर्मचाऱ्यांना १ लक्ष ४० हजार रु.च्या साड्या देण्यात आलेल्या होत्या. त्यावर लेखापरिक्षणाचे आक्षेप आलेले आहे. त्यामुळे पुढील वर्ष दिले नाही.

**श्री.निकाळजे प्रकाश :** सभागृहाने एकदा निर्णय घेतला व त्यानुसार कार्यवाही झाल्यास त्यावर आक्षेप येण्याचा प्रश्न येत नाही. जर नियम बाह्य काम होत असेल तर ऑडीटचा आक्षेप ग्राह्य मानला जाऊ शकतो. दै.वेतनावरील कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याकरिता १ ते १.५० लक्ष रुपये चा प्रश्न आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** बजेट प्रोव्हीजन मध्ये तरतूद केलेली नसेल व कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना दोन गणवेश देत असतील तर त्यांना एकच गणवेश देऊन इतर अस्थायी कर्मचारी यांना त्यामध्ये समावेश करुन सर्वांना एक गणवेश वाटप करण्याची कार्यवाही व्हावी. सर्वच कर्मचारी सारख्या पध्दतीने कामे करतात.

**मा.महापौर :** कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना दोन गणवेश तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांना १ गणवेश देण्याची मान्यता देण्यात येते. तशी बजेट प्रोव्हीजन मध्ये तरतूद करण्यात यावी. व हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**टराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना वाटप करण्यांत येणाऱ्या गणवेशाबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (१) अन्वये तयार करण्यांत आलेले विनिमय आणि त्यासाठी वापरण्यात येणारी कार्यपध्दती नुसार कर्मचाऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे गणवेश वाटपा बाबत थोडाफार व आवश्यक तो बदल करुन प्रस्तावात नमूद करण्यांत आलेल्या प्रपत्र अ,ब,क, नुसार गणवेश वाटपास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या निर्णयानुसार कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना २ (दोन) अस्थायी कर्मचाऱ्यांना १ (एक) गणवेश देण्यासही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. व अस्थायी कर्मचाऱ्यांना गणवेश वाटप करण्यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद करण्यास मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९१/३ :**

उपसंचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दशनाम गोसावी समाजाच्या मागणी संदर्भाने त्या समाजाचे स्मशान भूमी करिता गट नं.४ मो.नारेगांव मधून एक एकर जमीन देण्याचे प्रस्तावीत करुन या संदर्भाने लोकशाही दिनात झालेल्या तक्रारी संबंधाने मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी मो.नारेगांव गट क्र.४ मधील महानगरपालिकास दिलेल्या एकूण क्षेत्र ५ हेक्टर ८१ आर पैकी ०.४० आर.एवढे क्षेत्र स्मशान भूमीसाठी (गोसावी समाज) देण्यात यावे अशा सूचना दिल्या आहेत. सदर जमीन शासकीय मालकीची असून शासनाने ती महानगरपालिकेस यापूर्वीच हस्तांतरीत केलेली आहे. तसेच महानगरपालिकाचे जागेपैकी काही क्षेत्र मुस्लीम स्मशान भूमीसाठीही उपलब्ध करुन द्यावे अशी ही त्या भागातील नागरिकांची मागणी आहे.

सध्या सदर गट नं.४ महानगरपालिकाच्या ताब्यात व मालकी हक्क असलेल्या या जागेवर शाळा बांधलेली आहे. व काही क्षेत्रावर स्मशान भूमीचे वापरासाठी शेडही उभारण्यात आलेले आहे.

मंजूर विकास योजना (वा.ह.) नुसार सदर महानगरपालिकास हस्तांतरीत जमीन आरक्षण क्र.८ हाऊसिंग फॉर डीस हाऊस (विस्थापतीसाठी घरे) आरक्षण क्र.४३५ शहर बस थांब्यासाठी आरक्षीत आहे.

सदर ठिकाणी बांधलेली शाळा व स्मशान भूमी असा होत आहे. सदर ठिकाणी विकास योजना भाग नकाशानुसार दोन नाले उत्तर दक्षिण वाहत आहेत. हया नैसर्गिक हद्दी व वस्तुस्थितीनुसार या जमिनीचे साधारणतः तीन तीन भाग होतात. त्यातील पश्चिमेकडील भाग स्मशान भूमी मधला भाग प्रा.शाळा व पुर्वेकडील भाग हाऊसिंग फॉर डीस हाऊस याप्रमाणे आरक्षण वापर प्रस्तावित करणे सध्या स्थिती पाहता योग्य वाटते.

करिता वर प्रस्तावित केल्याप्रमाणे मंजूर विकास योजनामध्ये फेरबद्दल करण्यासाठी म.प्रा.व.न.र.चे अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. करिता प्रस्तुत कार्यवाहीसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. मान्यतेनंतर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी शासनास सादर करण्यांत येईल. प्रस्ताव मान्यतेनंतर उर्वरीत सर्व कार्यवाही मा.आयुक्त, महानगरपालिका यांचेतर्फे करण्यात येईल.

सध्या तेथे भागशः जमीन क्षेत्राकरिता स्मशान भूमीचा वापर चालू असल्याने नाल्याच्या पश्चिमेस असलेल्या जमिनीपैकी ०.४० आर. जमीन गोसावी समाज स्मशान भूमीच्या वापरासाठी व विकसीत करण्यासाठीच्या प्रस्ताव मान्यतेनंतर लगेच सुरु करणेचेही या प्रस्ताव मान्यतेसोबत मान्यता व्हावी.

<u>संवाद :</u>

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** हा विषय मंजूर करण्यांत हरकत नाही. परंतू याच भागातील काही मुस्लीम नागरिकांनी कब्रस्थानासाठी जागेची मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे पुढील बैठकीत तसा प्रस्ताव आणून कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.प्रकाश निकाळजे :** ही जागा रिकामी आहे का? अतिक्रमण झालेले आहे काय? कारण या अगोदर नारेगांव लगत गोसावी समाजाला जागा देण्यात आलेली होती. परंतू तेथे अगोदर घरे झालेली होती.

**मा.महापौर :** मालमत्ता अधिकारी यांनी या संदर्भात खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** सदर जागा सध्या रिकामी आहे.

**मा.महापौर :** मालमत्ता विभागातर्फे सदर जागा रिक्त असल्याचे खुलासा केला. म्हणून हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**श्री.रगडे भगवान :** १९८४ मध्ये गोसावी समाजाला मा.जिल्हाधिकारी यांनी जागा दिलेली असून त्या ठिकाणी सध्या घरे आहे. व काही जागा रिकामी सुध्दा आहेत. १९९९ ला ही जागा मुस्लीम समाजाला द्यावी असा सर्वसाधारण सभेने ठराव पास केला. आता पुन्हा गोसावी समाजाला द्यावी म्हणून प्रस्ताव सादर झाला तर जागा जागा कुणाला देणार याचा प्रशासनातर्फे खुलासा व्हावा. शाळेच्या जागेवर स्मशानभूमीस जागा देण्यात येऊ नये. या शाळेत गोरगरींबांची मुले शिक्षण घेतात? वर्षापूर्वी मी पत्र देऊन मुस्लीम समाजाला कब्रस्तानसाठी जागा देण्याबाबत पत्र दिले. अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. ही जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून मुस्लीम समाजाला सुध्दा जागा देण्याची कार्यवाही व्हावी. महानगरपालिकेची नारेगांवला खूप जागा आहे. कचरा डेपो येथे स्मशान भूमीस जागा द्यावी.

**मा.महापौर :** सदर ठिकाणी ५.८१ हेक्टर एकूण जागा असून पैकी ०.४० असा जागाच गोसावी समाजाला देण्याची मागणी प्रस्तावानुसार आहे. महानगरपालिका शाळा त्यानंतर एक नाला व नाल्यानंतर ती जागा आहे. ही दिल्यानंतर महानगरपालिकेच्या शाळेला संरक्षित भिंत बांधून घेण्यांत यावी.

**श्री.रगडे भगवान :** या ठिकाणी जागा किती रिकामी आहे. हे संबंधित विभागाने सांगावे. ब्रिजवाडी येथे महानगरपालिकेची जागा असून तेथे शाळा, पुल व शौच्छालये सुध्दा झालेली असतांना संबंधित अधिकारी ती जागा आपली नाही असे सांगतात या संदर्भात मी ठराव ठेवून वाचनालय, व्यायामशाळा, मंगल कार्यालय व्हावे म्हणून प्रस्ताव ठेवला होता. जागा मनपाची नाही म्हणून

सांगितले आहे हे बरोबर नाही. किती जागा आपली आहे. किंवा नाही याबाबत माहिती मिळाली नाही.

**मालमत्ता अधिकारी :** ब्रिजवाडी येथे समाजमंदिर, सांस्कृतिक सभागृह व उद्यान विकसीत करण्यासंदर्भात प्रस्ताव आलेला होता. त्यानुसार छाननी केली सदर जागा ही शासनाच्या नावावर असून शासनाकडून हस्तांतरीत करावी लागणार आहे. त्या जागेवर शौच्छालय होते ते पाडवयास आलेले आहे. या बाबतची संचिका नगररचना विभागाकडे अभिप्रायसाठी पाठवण्यात आलेली असून आणि फेरबदल करुन उद्यान विकसीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**श्री.रगडे भगवान :** या जागेवर ९७-९८ मध्ये महानगरपालिकेची शाळा, तसेच पुल व आमदार श्री.बसैय्ये बंधू यांचे निधीतून सभागृह बांधण्यांत आले. परंतू अद्याप ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. किती दिवसात जागा आपल्या ताब्यात घेणार आहे. तीच परिस्थिती नारेगांव येथील जागेच्या संदर्भात आहे. मला माहित आहे ती जागा किती आहे. अधिकारी हे कागदावर दाखवतात प्रत्यक्षात कार्यवाही करत नाही म्हणून ब्रिजवाडी येथील जागा तात्काळ महानगरपालिकेच्या ताब्यात घ्यावी. प्रस्तावानुसार गोसावी समाजाला दुसरीकडे जागा देण्यात यावी. महानगरपालिकेच्या मालमत्ता कुठे व कोणत्या हे अधिकाऱ्यांना माहिती नसते निष्काळजीपणे अधिकारी वागतात.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** प्रस्तावानुसार एकूण १७ एकर जागा असून गोसावी समाजाला स्मशान भूमीसाठी १ एकर जागेची मागणी केलेली असून, यात स्पष्ट उल्लेख केलेला असून गोसावी समाजाला जागा देण्याबाबत संबंधित नागरिकांकडून बरेच वेळा निवेदने सादर झालेली आहे. याची कल्पना आपणांस आहेतच. स्मशान भूमी एका बाजुला असावी म्हणून सिडकोकडून तशी जागा सोडण्यात आलेल्या या लगत एक स्मशान भूमी झालेली असून गोसावी समाजाला सुध्दा स्मशान भूमीसाठी जागा देण्यात येऊन त्याचप्रमाणे मुस्लीम समाजाची सुध्दा मागणी विचारात घेता त्यांना सुध्दा जागा देण्याची मंजूरी देण्यात यावी व स.सदस्य श्री.रगडे यांनी केलेला नारेगांव ब्रिजवाडी येथील जमीन शासनाच्या ताब्यात असेल तर ती महानगरपालिकाने ताब्यात घेण्याची कार्यवाही होऊन तेथे एक सांस्कृतिक सभागृह व उद्यान विकसीत करण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.प्रशांत देसरडा :** गोसावी समाजाला स्मशानभूमी देण्याबाबत १ एकर जागेचा उल्लेख केलेला असून त्यास मान्यता देण्यात येऊन तेथे सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात व उर्वरित जागा विकसीत करण्यात यावी.

**श्री.सुदाम सोनवणे :** गोसावी समाजाला स्मशानभूमीसाठी जागा देण्याबाबत मागील बॉडीने ठराव पास केलेला होता. त्यानंतर मुस्लीम समाजाला सुध्दा १ एकर जमीन कब्रस्तानसाठी देण्याबाबत ठराव मंजूर केला. ही जमिन गायरान असून शासनाने महानगरपालिका पालिकेस ८६-८७ साली हस्तांरण केली. परंतू पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रस्तावात सविस्तर माहिती सादर करणे गरजेचे होते. या जागेवर शाळा, काही सभागृह व स्मशानभूमी झालेली असून काही जागेवर अतिक्रमण सुध्दा झालेले आहे. व आता पुन्हा स्मशान भूमीची मागणी होत आहे. या प्रस्तावात क्षेत्रफळासहीत माहिती द्यावयास पाहिजे होती. किती क्षेत्रफळासहीत माहिती द्यावयास पाहिजे होती.

किती क्षेत्राफळामध्ये जागा, सभागृह स्मशानभूमी कोणत्या बाजूने आहेत. याची सर्व माहिती का देण्यात आलेली नाही. असा गोलमोल प्रस्ताव ठेवणे बारोबर नाही. कारण हा प्रशासकीय ठराव ठेवलेला आहे. नगरसेवकांना विश्वासात न घेता प्रस्ताव ठेवलेला असून नगरसेवक अडचणीत येतात. तरी सभागृहातर्फे अशा पध्दतीने प्रस्ताव मंजूरीसाठी आणू नये. या संदर्भात संबंधित विभागाचे अधिकारी यांना ताकीद द्यावी. या प्रस्तावाच्या संदर्भाने गोसावी समाजाला व मुस्लीम समाजाला सुध्दा जागा देण्याबाबत कार्यवाही होऊन तेथील ज्या सुविधा आवश्यक आहेत. त्या सुध्दा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही व्हावी. एकूण जमीन १७ एकर १ गुंठा आहे. यात काही जागेवर अतिक्रमण झाले. महानगरपालिकाने योजना राबवावी. ब्रिजवाडी जागा हस्तांतरासाठी नगररचना विभाग जबाबदार आहे. ताबडतोब हस्तांतर करुन घ्यावी. १ एकर गोसावी समाज व १ एकर मुस्लीम कब्रस्तानास द्यावी. व हा प्रस्ताव मंजूर करावा.

**मा.महापौर :** कोणत्याही जागेबाबत ठराव ठेवतांना संबंधित नगररचना विभागातर्फे त्या ठिकाणी एकूण जमीन किती, क्षेत्रफळ किती जागा कोणत्या ऐरिया मध्ये आहे. याची सविस्तर माहिती प्रस्तावामध्ये देणे गरजेचे आहे. सभागृहातील चर्चेनुसार गोसावी समाजाच्या स्मशानभूमीसाठी एक एकर जागा देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच तेथील काही मुस्लीम समाजातील लोकांची मागणी विचारात घेता मुस्लीम स्मशान भूमीसाठी या जागेतून १ एकर जागा देण्यास मान्यता देण्यात येते. उर्वरित जागा शाळेसाठी देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या सभागृहात झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनुसार मो.नारेगांव येथील गट नं.४ पैकी औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या ५.८१ हेक्टरापैकी ० हेक्टर ४० आर एवढे क्षेत्र दशनाम गोसावी समाजाच्या स्मशानभूमी साठी व ० हेक्टर ४० आर जमीन मुस्लीम कब्रस्तानसाठी वापरण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदलाची कार्यवाही करण्याची आणि सदर कार्यवाही अंतर्गत अधिसूचना काढणे, सुनावणी देणे व प्रस्ताव शासनाचे मंजूरीसाठी सादर करण्याचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच तेथे भागशः जमिन क्षेत्रात स्मशानभूमीचा वापर चालू असल्याचे ० हेक्टर ४० आर जमीन दशनाम गोसावी समाज या स्मशानभूमीच्या वापरासाठी व सभागृहात प्रत्यक्ष चर्चा झाल्याप्रमाणे ० हेक्टर ४० आर जमीन मुस्लीम कब्रस्थान वापरासाठी व विकसीत करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेनंतर लगेच सुरु करण्याचे प्रस्तावित केल्याप्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९२/४ :**

औरंगाबाद ते जायकवाडीच्या पाणी पुरवठ्याच्या वीज देयकांबाबत महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने खालील प्रमाणे पत्र पाठविलेली आहेत.

१. पत्र क्र.२०६, दि.०४.०४.२००१.

२. पत्र क्र.१८७८, दि.१०.०४.२००१.

३. पत्र क्र.२१३८, दि.२६.०४.२००१.

वरील पत्राद्वारे मा.मुख्य अभियंता, मा.अधिक्षक अभियंता यांनी असे कळविले आहे की, महानगरपालिकेने चालू देयक जवळपास रुपये २.०० कोटी हे नियमित भरणा करावे व उर्वरित थकबाकीचा भरणा पण करण्यांत यावा.

ठरावाप्रमाणे महानगरपालिकेतर्फे प्रत्येक महिन्यात चालू देयकापोटी रुपये ७५/- लक्ष भरणा करण्यात येतो.

वरील पत्रानुसार चालू देयकाचा भरणा नाही केल्यास व उर्वरित थकबाकीचा भरणा नाही केल्यास भारतीय वीज अधिनियम १९१० सेक्शन १ च्या २४ प्रमाणे वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल व त्यामुळे जनतेच्या होणाऱ्या गैरसोयीसाठी वीज मंडळ जबाबदार राहणार नाही. असे कळविले आहे.

तरी चालू देयकाचा रु.२.०० कोटी प्रतिमाह भरणा करण्याच्या निर्णयास्तव तसेच थकीत रकमेच्या अदाई बाबत मार्गदर्शनास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>**चर्चा :**</u>

**श्री.तकीहसन खॉन :** महानगरपालिकाने एम.एस.ई.बी.ला २.०० कोटी दरमहा भरावे असे प्रस्तावात दिले. महानगरपालिकेमार्फत बिला पोटी ७५ लक्ष दरमहा भरण्यात येते. २.०० कोटी भरु शकते काय? एवढी तरतूद आहे काय? विद्युतचे दर हे महानगरपालिकेस व्यावसायिक दराने लावणे परवडणारे नसून कृषी दराने दर लावण्यात यावे. अशी आपली मागणी बरेच वेळा एम.एस.ई.बी. कडे असतांना कार्यवाही होत नाही. नळ कनेक्शनसाठी रुपये ३,३००/- खर्च व रु.१,२००/- पाणीपट्टी यास हे कमर्शियल होत नाही. एम.एस.ई.बी. ला लाईटचे दर कमी करण्यासंदर्भात महानगरपालिकेने न्यायालयात दाद मागवावी. न्याय मिळेल सर्व जनता महानगरपालिकाच्या पाठीशी आहे. ७५ लक्ष भरण्यासच महानगरपालिकेची परिस्थिती तशी नाही तर २.०० कोटी कोठून भरणार याचा विचार व्हावयास पाहिजे. शहराला येणारे पाणी हे पंपीग करुन येते व पंप ग्रामीण भागात येत असतांना व्यावसायिक दराने वीज आकारणी होते हे योग्य नाही. त्यासाठी योग्य न्याय मागणीसाठी न्यायालयात गेल्यास योग्य निर्णय लागेल. महानगरपालिकेचा यात फायदा होईल.

**श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहमद :** प्रशासकीय प्रस्ताव आहे. बील भरण्यात यावे. जनतेच्या पाण्याचा प्रश्न आहे. चांगली बाब आहे. लवकर भरावे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** दर वर्षी वीज बिल न भरल्यास वीज कनेक्शन कट करण्याबाबत एम.एस.ई.बी.कडून महानगरपालिकेस पत्र येते. त्यानुसार प्रस्ताव सादर होतात. महानगरपालिकेतर्फे पंपींगसाठी लागणारे वीज दर कृषी दराने लावावे अशी मागणी होते. परंतू एक वर्षामध्ये या संबंधी योग्य तो पाठपुरावा होत नाही व पुन्हा पत्र येते. प्रस्ताव सादर होतो. पैसे तर भरावेच लागणार आहे. त्या कमी जास्त करावे. न्यायालयात जाण्यासंदर्भात सुध्दा चर्चा झ ाालेली होती. एका वर्षात का प्रशासन न्यायालयात गेलेले नाही. असे प्रस्ताव सादर करुन शहरातील जनतेला झळ पोहचू नये. अशी आमची मागणी आहे. थकीत रक्कम वीज मंडळास भरावीच लागेल. महानगरपालिकेतर्फे इमारती होतात. काही इमारतीचे ४ दिवसांनी उद्घाटन असून वीज मंडळ मीटर देत नाही. दुकान केंद्रात विद्युत पुरवठा नाही. लोकांना दुकाने दिले

नाहीत. त्यामुळे महानगरपालिकाचे उत्पन्न कमी होत आहे. एकदा चर्चा होते. निर्णय होत नाही. पुन्हा रक्कम देण्याबाबत प्रस्ताव सादर होतात. महानगरपालिका पैसा भरते बँक मध्ये कोणत्या रेटने वीज बिल आकारणी होते. त्यांची माहिती आपल्या अधिकाऱ्यांनी घ्यावी. कोणत्या रेटने पैसे देण्यात येत आहे. सन २८,८५,९०,९५ मध्ये काय युनिटचे रेट होते. आज काय याची माहिती द्यावी. कोर्टात जाऊ नये पैसे भरावे.

**श्री.अविनाश कुमावत :** २.०० कोटी जर वीज बिलापोटी एम.एस.ई.बी. ला दरमहा दिले. तर कर्मचाऱ्यांचे पगार सुध्दा होणार नाही. विकासाची कामे होणार नाही. अशी परिस्थिती आहे. म्हणून महाराष्ट्र शासनास कळवले, भिवंडी सारख्या शहराचे ६८ कोटी वीज बिल माफ करण्यात आले तर या ऐतिहासिक शहराचे १०० कोटी का माफ करण्यात येऊ नये. शासनास तसे पत्र पाठवावे. उर्जा राज्यमंत्री या शहराचे आहे. त्यांचेमार्फत कार्यवाही करण्यांत यावी. सर्व बिल माफ करण्यात यावे व त्यापुढील येणारे बिल हे कृषी दराने द्यावयास पाहिजे तशी कार्यवाही व्हावी.

**श्री.तकीहसन खॉन :** यामध्ये महाराष्ट्र शासन किंवा केंद्र शासन किंवा केंद्र शासन यांचा संबंध येत नसून वीज मंडळाचे एम.ई.आर.सी.मुळे अडथळा येत आहे. त्यासाठी न्यायालयात जावे. वीज कनेक्शन बंद करणे तेवढे सोपे नाही. सर्व जनता महानगरपालिकाच्या पाठीशी असून एम.एस.ई.बी.ला वीज बिला पोटी ७५ लक्ष दरमहा भरल्या जाते. हा जनतेचाच पैसा आहे. ७५ लक्ष रुपये दरमहा असावे.

**श्री.सुदाम सोनवणे :** एम.एस.ई.बी. ला वीज बिला पोटी सन ९५-९६ ला ५० लक्ष दरमहा भरत होते. त्यांचे आग्रहा खातर वाढ करुन ५० ऐवजी ६० लक्ष केल्यानंतर ९७-९८ ला ६० लक्ष ऐवजी ७५ लक्ष केले. मागच्या वेळेस सुध्दा सभागृहासमोर प्रस्ताव येऊन १ कोटी दरमहा भरावे म्हणून सादर झालेला होता व सभागृहात चर्चा होऊन ७५ लक्ष भरावे म्हणून निर्णय झालेला असतांना आता त्यात भरमसाठ वाढ करुन २.०० कोटी भरण्याची मागणी होत आहे. आपण मागच्या वेळेस १३४ कोटीचे बजेट मंजूर केले. त्याची तफावत पाहिली असता महानगरपालिकाचे उत्पन्न ८० कोटीच्यावर गेलेले नाही अशी माहिती मिळालेली आहे. २.०० कोटी दिल्यास कर्मचाऱ्यांना पगार देता येणार नाही. अशी परिस्थिती होईल. वीज बिल कृषी दराने आकारणी बाबत वेळोवेळी मागणी होत असतांना कार्यवाही होत नाही. बऱ्याच वेळा यासंबंधी मंत्रालयास, महानगरपालिकेत बैठका झाल्या कार्यवाही नाही. म्हणून मागील बैठकीत आपण असा निर्णय घेतला की, शहरामध्ये एम.एस.ई.बी. चे ज्या डी.पी.पोल आहेत व विद्युत प्रवाह शहरामध्ये येतो. त्यावर जकात लावण्यात यावी असे ठरले आहे. परंतू या संबंधी अधिकाऱ्यांकडून असे उत्तर मिळाले की, जी.आर.मध्ये तशी तरतूद नाही. परंतू महानगरपालिका हि स्वायत्त संस्था असून शासन जी.आर.ची गरज नाही. म्हणून महानगरपालिकेच्या क्षेत्रात जेवढे पोल डी.पी.आहेत. त्यावर टॅक्स लावावा. सिडको वसाहत महानगरपालिका हद्दीत असतांना सिडकोसाठी येणाऱ्या मालावर जकात कर आकारला जातो. शहराला पाणी आणण्यासाठी ४ पंप ग्रामीण भागात चालतात. त्यावर येणारे वीज बिल कृषी दराने लावावे म्हणून मागणी केली असतांना सुध्दा कार्यवाही अद्याप झाली

नाही म्हणून ७५ लक्ष आपण भरतो आहोत. त्यापेक्षा एक पैसा जास्तीचा भरण्यांत येऊ नये. विषय नामंजूर करावा.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** ७५ लक्ष सध्या वीज बिलापोटी भरत आहोत. यात वाढ न करता ७५ लक्षच रुपये भरण्यात यावे.

**श्री.प्रकाश निकाळजे :** एक कोटी रुपये एम.एस.ई.बी. ला भरावे असा प्रस्ताव मागील वेळेस आलेला होता व चर्चा होऊन असे ठरले होते की, एम.एस.ई.बी.चे एम.ई.आर.सी.जी संस्था आहे. त्यांचेकडे एक महानगरपालिकेतर्फे वीज बिल कमी करण्याबाबत व दरात कमी करण्याबाबत अपील करण्याचे ठरले होते. परंतू एक वर्षाच्या काळात प्रशासनातर्फे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही असे दिसून येते. नुसतीच चर्चा करायची कार्यवाही काहीच नाही. एम.एस.ई.बी. चे वीज बिल वाढत जाऊन नेहमी की, बंद करण्यांत येऊन आठवड्यातून दोन-तीन वेळेस वीज पुरवठा खंडीत केला जातो. हे बरोबर नाही. म्हणून या बाबत लवकरच निर्णय व्हावा. पंपीगसाठी जे मिटर लावलेले आहे ते दुरुस्तीस आलेले आहे. त्यावर सुध्दा चर्चा झालेली आहे. अद्याप मीटर लावलेले नाही. आता प्रशासनाचा खुलासा न घेता यासाठी स्पेशल एक अधिकारी नियुक्त करावे ते सर्व कार्यवाही करतील असे आदेश करावे. कृषी दराने वीज आकारण्यात बाबत पुढील सर्व कार्यवाही संबंधि अधिकाऱ्यांनी करावी. अगोदर गेल्या वर्षीचे पाणीपट्टी व मालमत्ता कराची वसुली कमी झालेली आहे. १३४ कोटी पूर्ण नाही. ८८ कोटी वसुली झालेली आहेत. म्हणजे ४० कोटी कमी आलेली आहे. पुढच्या वर्षी ९० कोटीचे होईल. विकास कामात पैसा राहणार नाही अशी होत असेल तर २.०० कोटी रुपये कसे भरणार कर्मचाऱ्यांना पगार देणे अवघड जाईल. म्हणून ७५ लक्ष एम.एस.ई.बी.ला भरावे व यासर्व कार्यवाहीसाठी एक तात्पुरते अधिकाऱ्यांची नियुक्ती करावे व कृषी दराने व पंपींग वर मीटर अशीच बसवण्याची कार्यवाही व्हावी. तसेच शहरात महानगरपालिकेच्या पोलवर एम.एस.ई.बी.दुसऱ्याला शेरा देत असून व्यवसाय करीत आहे. त्यांचे सर्व्हीस वायर येतात. एम.एस.ई.बी.चे असलेले पोलवर येणाऱ्या वीज प्रवाहावर टॅक्स आकारण्याची धोरण सुध्दा आजच्या बैठकीत निश्चित करावे.

**श्री.अंबादास दानवे :** २.०० कोटी भरावे अशी मागणी वीज मंडळाने केलेली असून वारंवार हा प्रश्न सभागृहासमोर येत आहे. ३-४ वेळेस असा प्रस्ताव सादर झालेले आहेत. व मागच्या वेळेस वीज मंडळाने वीज कनेक्शन बंद करणार म्हणून सर्व नागरिकांनी गुन्हे दाखल होऊन कार्यवाही झाली. त्यानंतर आपण बैठका घेतल्या व प्रशासनातर्फे या संबंधी योग्य कार्यवाही करण्याचे निर्णय सुध्दा घेण्यात आलेले आहे. त्यात प्रामुख्याने ही टी.ओ.डी. (टाईम ऑफ डे) मशीन बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. जे की, रात्रीचा वीज पुरवठा व दिवसासाठी लागणारा वीज पुरवठ्याच्या दरात वेगवेगळे दर आहेत. रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत वेगळे दर रात्रीसाठी लागणार वीज दर कमी असून त्यासाठी मीटर (मशिन) बसवावे असे ठरले होते. काय कार्यवाही झाली त्याची माहिती द्यावी. वीज बील कमी करण्यासाठी मा.ऊर्जा राज्यमंत्री यांची आपण भेट घेतली त्यावेळी त्यांनी (एम.ई.आर.सी.) वीज नियामक मंडळाकडे अपिल करण्याची सूचना केली. परंतू अद्याप अपील दाखल झालेले नाही. असे वाटते वेळोवेळी चर्चा होत असते व दर महिन्याला एम.एस.ई.बी. चे

महानगरपालिकेस २.०४ कोटी बिल येते आणि हे थकीत बील देऊन दर महिन्याचे रेग्युलर बिल देण्यात यावे. म्हणून पत्र वारंवार महानगरपालिकेस आलेले आहे. एम.ई.आर.सी. संस्थेकडे अपील न केल्यामुळे वीज बिल रकमेत वाढ झालेली असून संबंधित अधिकाऱ्यांना दोषी ठरवावे तसेच टी.ओ.डी.मशीन का बसविण्यात आलेले नाही. संबंधित अधिकारी यांचेवर सुध्दा कडक कार्यवाही करावी. अत्यंत महत्वाच्या विषयाकडे अधिकारी दुर्लक्ष करतात. येणारे उत्पन्न हे जनतेचा पैसा असतो व त्याचा पुरेपूर उपयोग व्हावा व जनतेकडून मिळालेल्या रक्कमेतून आपण एम.एस.ई.बी. ला ७५ लक्ष रुपये भरतो व ७५ लक्ष भरावे. परंतू अगोदर वरीलप्रमाणे खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** वीज बिल किती भरणार, किती भरावे याबाबत एम.एस.ई.बी.ची वारंवार मागणी होते व तसा प्रस्ताव सभागृहात वारंवार चर्चेला येतो व मागील वेळेस वीज कनेक्शन बंद करणार म्हणून वीज मंडळासमोर नगर सेवकांनी उपोषण केले होते. त्यावेळी प्रशासनाला सूचना देऊन एम.ई.आर.सी.कडे अपील करुन कृषी दराने पंपींगचे बिल आकारण्याबाबत कार्यवाहीसाठी सांगितलेले होते व ३ वेळेस माझ्या दालनात बैठका घेऊन सुध्दा अधिकाऱ्यांना तशा सूचना केलेल्या होत्या. एका बैठकीत कार्यकारी अभियंता यांनी सांगितले टी.ओ.डी. मशीन लावल्यानंतर दर महिन्याला २२ लक्ष रुपये तर दुसऱ्या वेळेस ७ लक्ष रुपये फायदा होईल असे सांगितले नंतर सांगण्यात आले की, २ लक्ष रुपयाचा फायदा होणार त्यानंतर मा.आयुक्त यांनी संबंधित अधिकाऱ्यास माझ्या समोर यासंबंधी कार्यवाही करण्याचे सांगितले होते. म्हणून टी.ओ.डी. मशीन लावण्यांत आले किंवा काय? लावल्यास किती फायदा होणार याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा. जायकवाडी धरणात पाणी कमी आहे. प्रेसला तशी माहिती देण्यात आली धरणात पाणी मुबलक आहे. चुकीची माहिति का देण्यांत आली. सर्व वृत्तपत्रांत बातम्या आलेल्या आहेत.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** मा.महापौर यांचे दालनामध्ये बैठक घेऊन असे ठरविण्यात आले की, ग्रामीण भागास महानगरपालिकेकडे लावण्यात येणारे वीज बिल हे कृषी दराने लावण्यांत यावे. जे पंपींग पाणी पुरवठ्यासाठी वापरण्यात येतात. त्यावर टी.ओ.डी. मीटर रिंडींग मशीन बसवण्याबाबत निर्णय घेतलेला होता. एम.एस.ई.बी.चे अधिक्षक अभियंता श्री.शेटजी यांनी सुध्दा ही मागणी मान्य केली होती. त्यानुसार आपण निविदा काढल्या मंजूरही झाल्या त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी एम.एस.ई.बी. कडून पत्र आले की, त्यांचे नियमात ही तरतूद नाही व हे मशीन आपणांस बसवता येणार नाही. म्हणून कार्यवाही झालेली नाही. महानगरपालिकेतर्फे त्यांना पत्र पाठवून आपणच परवानगी दिली व आता पत्राने कळवून मशीन बसवता येत नाही. म्हणून कळवले. एन.ई.आर.सी. संस्थेस सुध्दा आपण खुलासेवार पत्र दिली आहे.

**मा.महापौर :** कोणतेही काम करताना लेखी स्वरुपात माहिती आल्या शिवाय कार्यवाही करणे योग्य येणार नाही. कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी मागच्या वेळेस सभागृहात ठराव ठेवून एम.आय.डी.सी.कडून ७ एम.एल.डी. पाणी घेऊन पुंडलिक नगर एन-३, एन-४ येथील जनतेचा पाण्याचा प्रश्न सुटेल अशा पध्दतीने ठराव मांडला त्यावर ३० मिनीटे चर्चा झाली त्यानंतर मी स्वत:

सिडकोचे मुख्य अभियंता यांचेशी चर्चा केली. त्यावर तसा प्रस्ताव आमच्याकडे नाहीच म्हणून सांगितले आता पाणी मुबलक येणार. वृत्तपत्रात आले म्हणून काही नागरिकांनी फटाके वाजवून आनंद व्यक्त केला. परंतू कार्यवाही काहीच नाही. यामुळे संबंधित अधिकारी यांनी सभागृहाची व जनतेची दिशाभूल केलेली आहे. यापुढे असे होता कामा नये.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** या संबंधी सिडको प्रशासक, महानगरपालिका आयुक्त तसेच सिडकोचे म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आयुक्त बैठक होऊन पाणी देण्याबाबत मान्य करुन मंत्रालयात सुध्दा बैठक झाली व मंत्री महोदया समोर सिडको एम.आय.डी.सी. कडून महानगरपालिकेस पाणी पुरवठा दिला जाईल म्हणून मान्य करण्यात आले. त्यांचे इतिवृत्त सुध्दा मी सभागृहाला दाखवू शकतो त्यानंतर आपण प्रस्ताव मंजूर केलेला आहे.

**मा.महापौर :** मिनीटस् सभागृहाला दाखवण्यात यावे. ठराव ठेऊन चर्चा केली. सभागृहाने ७ दिवसात कार्यवाही करावी. म्हणून मागणी केली. शेवटी १० दिवसात कार्यवाही करावी म्हणून आदेशित केली. काहीच कार्यवाही झालेली नाही. सभागृहाची आपण दिशाभूल केली. यानंतर असे झाल्यास आपणांवर योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** ठराव मंजूर झाल्यानुसार एम.आय.डी.सी. चे संबंधित अधिकारी यांचेशी संपर्क साधून ठरावाची प्रत देण्यात आली व त्यांनी लेखी असे कळविले की, सिडको एम.आय.डी.सी.कडून आपणांस रु.१०.६० प्रति हजार लिटर प्रमाणेच देता येईल. यापेक्षा कमी नाही म्हणून हे पाणी आपणांस घेण्यास परवडणारे नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही थांबलेली आहे. मंत्रालयात झालेल्या चर्चेचे वृत्तांत सुध्दा माझ्याकडे आहेत.

**मा.महापौर :** ठिक आहे काय चर्चा झाली. त्यांचे मिनिटस् दाखवण्यात यावे. महानगरपालिकाचे वीज बिल कमी करण्या संदर्भात पालकमंत्री मा.श्री.पदमसिंग पाटील, तसेच मा.उर्जा राज्यमंत्री, तसेच मा.मुख्यमंत्री यांचेशी सुध्दा पदाधिकारी, नगरसेवक यांनी जाऊन वेळोवेळी भेटी घेतल्या मुख्यमंत्री यांनी एम.ई.आर.सी.या संख्येकडे जाण्याची मागणी केली. त्यानंतर सभागृहात चर्चा होऊन एम.ई.आर.सी.कडे अपील करण्याबाबत सूचना केल्या. तरी सुध्दा प्रशासनाने कार्यवाही केली नाही व आतापर्यंत फक्त एम.एस.ई.बी.कडून आलेल्या पत्रानुसार तसा ठराव ठेवून रक्कम भरण्याबाबत सभागृहासमोर आणला जातो. एम.ई.आर.सी. या संस्थेकडे महानगरपालिकेस अपील करण्यास काय अडचणी येतात. याचा खुलासा करावा.

**श्री.अंबादास दानवे :** कोणत्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. त्यांचेवर कार्यवाही करावी.

**मा.उपआयुक्त (प्र.) :** महानगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या विरुध्द कोणतेही प्रकरण दाखल करायचे झाल्यास विधी विभागामार्फत कार्यवाही केली जाते. परंतू सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार एम.ई.आर.सी.कडे अपील दाखल करण्यासाठी निवृत्त व अनुभवी व्यक्तीचा शोध घेतला असता एम.एस.ई.बी. चे लेखाधिकारी जे वकील झाले. त्यांचेकडे हे प्रकरण दिले असता त्यांनी पत्र देऊन कळविले की, ज्यावेळेस महानगरपालिकेकडे १९७५ ला पाणी पुरवठा हस्तांतरीत झाला. त्यांचे मुळ ॲग्रीमेंट काय आहे. त्या कागद पत्राची मागणी केलेली असून मुळ ॲग्रीमेंटची प्रत आतापर्यंत आमच्याकडे आली

नाही. तरी सुध्दा त्यांचेशी सल्ला मसलत करुन अपील दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरु केलेली होती. त्यातच संबंधित वकीलाने गोपनीय पत्र सादर केले. त्यात असे म्हटले की, महानगरपालिकेने पाणी पुरवठ्याच्या वीज बिलासंबंधी नियामक मंडळाकडे प्रकरण अशा परिस्थितीत दाखल करणे योग्य नसून स्थानिक पातळीवरील संबंधित कार्यालयाच्या सक्षम अधिकाऱ्यांकडे महानगरपालिकेकडे असलेले आजपर्यंतचे दाखल झालेले विद्युत बील, दुरुस्त्या करुन कमी करुन सुधारित वीज महानगरपालिकेस देण्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांकडे प्रकरण दाखल करणे योग्य होईल. त्यांनी नकार दिल्यानंतर एम.ई.आर.सी.कडे अपिल करण्यांत येईल. त्याप्रमाणे संपूर्ण कार्यवाही झालेली असून त्यात एकूण १६ मुद्दे आपण देणार आहोत. त्याची १ आठवड्याच्या आत कार्यवाही होईल व त्यानंतर एम.ई.आर.सी. संस्थेकडे अपील दाखल करण्याची कार्यवाही करता येईल. १ आठवड्याच्या आत अपील दाखल करण्यात येईल.

**श्री.अंबादास दानवे :** टी.ओ.डी. मशीन बाबत व एम.ई.आर.सी. संस्थेकडे अपील करण्यासंदर्भात ज्या दोन अधिकाऱ्यांनी खुलासा केला तो गोलमोल केलेला आहे. आपल्याकडे विधी विभाग असतांना बाहेरील वकील अपील दाखल करण्यासाठी आवश्यकता नाही. उपआयुक्त (प्र.) हे विधी सल्लागार म्हणून काम पाहिलेले आहे. सक्षम आहे. त्याप्रमाणे एम.एस.ई.बी. ला तसे डायरेक्ट चर्चा केली का? वकील लाऊन सल्ला घेण्यात गरज आहे काय? एम.ई.आर.सी.ने तशी त्यांची नियुक्ती केली काय? यांचेच मार्फत प्रकरण दाखल झाले पाहिजे. असे काही आहे काय? त्या वकीलामार्फत जाण्याचा प्रश्न का निर्माण होतो.

**मा.महापौर :** आपल्याकडे विधी विभाग आहे. परंतू पाणी पुरवठ्या वीज बिला संबंधी एम.ई.आर.सी.कडे जाण्यासाठी अनुभवी निवृत्त व्यक्तीची आवश्यकता आहे. म्हणून एम.एस.ई.बी. मधील निवृत्त अधिकारी श्री.कांबळे हे विद्युत मंडळाचे सेवानिवृत्त अधिकारी असून आता सध्या ते वकीली करतात व महानगरपालिकाच्या बरेच केसेस त्यांनी हाताळलेल्या असून त्यांचेकडे केस देण्याबाबत मा.आयुक्त व इतर अधिकाऱ्यांबरोबर माझी चर्चा झालेली होती. आणि तो एम.ई.आर.सी.च्या बरेच केसेस, घेतात म्हणून त्यांचेकडे हे प्रकरण देण्यांत यावे असे ठरले परंतू त्या चर्चेला सुध्दा आता ७-८ महिने होत आहे. तर ७ महिन्यामध्ये श्री.कावळे यांचे कडून एकच पत्र आले का? एक पत्राचा खुलासा घेण्यासाठी ७ महिने लागू शकतात. त्याचा खुलासा घ्यावा.

**श्री.स.अली मिरा सलामी :** पाणी पुरवठा १९७५ ला महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाला त्याची मुळे ॲग्रीमेंट कॉपी आपल्याकडे नाही असे आताच उपआयुक्त यांनी सांगितले फार शरमेची बाब आहे. १९७५ ला काय ॲग्रीमेंट झाले याची कल्पना प्रशासनाला अद्याप नाही. याचा अर्थ काय होते. किती मोठा वकील लावल्यास काय फायदा होणार मुळे प्रत देणे गरजेचे आहे.

**सौ.सुवर्णा चंद्रात्रे :** अधिकारी उत्तरे व्यवस्थित देत नसून सभागृहाची दिशाभूल करणारा खुलासा होतो. हे बरोबर नाही. एकाच अधिकाऱ्यांकडे २/३ चार्ज देण्यांत येतात. वर्षानुवर्ष एक विभाग एकाच अधिकाऱ्यांकडे आहेत. त्यात बदल व्हावे. नेहमी अशीच उत्तर मिळणार काय?

**श्री.कोकाटे काशिनाथ :** या विषयावर स.सदस्यांनी अत्यंत सविस्तरपणे चर्चा केलेली आहे. त्यानंतर प्रशासनाच्या माध्यमातून झालेला खुलासा योग्य वाटत नाही. सभागृहात मागे चर्चा होऊन ज्या अधिकाऱ्यांकडे हे काम सोपवले होते. त्यांनी का कार्यवाही केली नाही. ज्या पध्दतीने कार्यवाही करावयाची होती तशी केली नाही. म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. एम.ई.आर.सी.कडे हे प्रकरण देण्यासाठी एका विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी सभागृहाच्या वतीने मी करत आहे. त्या अधिकाऱ्यांनी विशेष अशा अनुभवी एम.ई.आर.सी.मध्ये जे काय करतात अशा वकीलांशी संपर्क साधून कार्यवाही करावी. सर्व कागद सादर करुन कार्यवाही करावी. सध्या एम.एस.ई.बी.ला ७५ लक्ष्य भरण्यांत यावे.

**मा.महापौर :** या अगोदर चर्चा होऊन एम.ई.आर.सी.कडे जाण्यासाठी सूचना देऊन सुध्दा वेळेवर कार्यवाही झालेली नाही. वारंवार एम.एस.ई.बी. च्या महानगरपालिकेस पत्र येतात तसे ठराव सादर होतात. तोच तो मुद्दा उपस्थित होतो व प्रशासनामार्फत मा.आयुक्तांनी एम.ई.आर.सी. कडे प्रकरण हाताळण्यासाठी ज्यांच्याकडे दिले होते. त्या संबंधित महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांची चौकशी करावी. एक वेतनवाढ रोखण्याबाबत कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे यापुढील कामकाज पाहण्यासाठी उपआयुक्त (प्र.) काम पाहतील. एम.ई.आर.सी.कडे जाण्यासाठी उपआयुक्त (प्र.) अतिरिक्त शहर अभियंता श्री.सोनी व कार्यकारी अभियंता श्री.सोनवणे यांनी माहिती न दिल्यामुळे दिरंगाई झालेली आहे. आताच माहिती मिळाली आहे. म्हणून जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. यानंतरचे काम उपआयुक्त (प्र.) यांनी पहावे अपील तयार आहे. ७ दिवसाच्या आत दाखल करावे. कोणते वकील लावायचे श्री.कांबळे किंवा इतर मुंबईचे वकील लावायचे ते पाहावे. त्यासाठी सभागृह मान्यता देईल. व एम.एस.ई.बी. ला दरमहा ७५ लक्षच रुपये भरण्याची मान्यता देण्यात येते.

**श्री.नंदकुमार घोडेले :** उपआयुक्तकडे २ ते ३ चार्ज असून दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे यासंबंधी कार्यवाही करण्यात सोपवावे. संपूर्ण वेळ काम पाहतील.

**मा.महापौर :** उपआयुक्त (प्र.) श्री.कांबळे यांना अनुभव आहे. तसेच महानगरपालिकेच्या हद्दीत एम.एस.ई.बी.चे पोल, डी.पी.आहेत. त्यावर कर आकारता येतो का? याची प्रशासन चौकशी करेल, तसेच शहरामध्ये वीज आकारली जाते. त्यावर जकात आकारला जातो का? याची माहिती द्यावी.

**श्री.अविनाश कुमावत :** श्री.कांबळे साहेबांनी माईकवर सांगावे कुण्या अधिकारीची मदत केली नाही.

**श्री.सुदाम सोनवणे :** अधिकारी सभागृहात समाधानकारक उत्तरे देत नाही. वार्डात कोणतीच कामे होत नाही. नगर सेवकांना व्यवस्थित उत्तरे दिली जात नाही. काही अधिकाऱ्यांकडे ८ ते १० वर्षापासून एकाच विभागाचा चार्ज आहेत. पाणी पुरवठा अधिकारी सोनवणे यांचेकडे १० वर्षापासून चार्ज आहे. म्हणून जे सिनीयर अधिकारी असतील त्यांचेकडे चार्ज देण्यात यावा. श्री.सी.एस.सोनी यांना पाणी पुरवठा तसेच ड्रेनेज विभागाचा चार्ज देण्यात यावा. शहरातील समस्या सोडवण्यासाठी नागरिकांसमोर नावे लागते.

**मा.महापौर :** यासंबंधी मा.आयुक्त यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री.प्रकाश निकाळजे :** पाणी पुरवठा विभागाचे श्री.सोनवणे, श्री.कलीस अख्तर, श्री.रामटेके यांना १०-१० वर्षापासून त्याच विभागात काम करतात. नागरिकांच्या समस्यांकडे त्यांचे दुर्लक्ष होते. त्यांना काहीच फरक पडत नाही. म्हणून या अधिकाऱ्यांच्या त्वरीत बदल्या करण्यात येऊन त्यांचे जागाी जेष्ठतेनुसार ज्यांचे सी.आर. चांगले आहे. अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यांत यावी.

**मा.महापौर :** सध्या शहरात पाण्याची टंचाई आहे. म्हणून पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करता येणार नाही. वीज बिलापोटी ७५ लक्ष रुपयेच भरण्यास मान्यता देण्यांत येते. (याचवेळी सभागृहात स.सभासद मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद ते जायकवाडी या पाणी पुरवठ्याच्या वीज देयकांबाबत मुख्य अभियंता यांनी महानगरपालिकेने रु.२.०० कोटी नियमित भरणा करण्याबाबत कळविण्यांत आले असले तरी वीज बिला पोटी महानगरपालिकेतर्फे रु.७५ लाख याप्रमाणेच विद्युत बिलाची रक्कम अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९३/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतील स.सभासद श्री.स.अली मिरा सलामी व इतर मिळून आठ सदस्यांनी तिसरी आघाडी या नावाने स्वतंत्र गट स्थापन करुन त्यांचा गटनेता श्री.सय्यद अली मिरा सलामी यांची निवड केली आहे. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस अधीन राहून या गटास इतर महानगरपालिकेप्रमाणे कक्ष व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात झालेल्या आहेत.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**चर्चा :**

**श्री.जबिंदा दलबिरसिंग :** सभागृहात इतर राजकीय पक्ष आहेत. जसे राष्ट्रवादी कॉंग्रेस, मुस्लीम लिग ई. इतर पक्ष गट केल्यास त्यांना कॅबीन देता येते का? व खर्चासाठी बजेटमध्ये तशी तरतूद केलेली आहे काय?

**श्री.तकी हसन खॉन :** महानगरपालिकेला काही कायदे व नियम आहे. निवडणूक आयोगाने घालून दिलेले सर्व नियम लागू होतात. निवडणूक झाली म्हणून सर्व काही झाले असे समजू नये आजही आपण निवडणूक आयुक्त यांचे अंतर्गत काम करत आहोत. आघाडीच्या नावाखाली कुण्याही स.सदस्यांनी गट तयार करुन गटनेता म्हणून कॅबीन मागवल्यास देता येते काय याबाबत विधी सल्लागार याचा अभिप्राय घ्यावा. महाराष्ट्र लोकल ॲथॉरिटी मेंबर डीस क्वॉलिफिकेशन ॲक्ट १९८७ मधील सेक्शन ३८२ पाहावे. यात जर निवडणूक झाल्यानंतर ६ महिन्यांच्या नंतर जर एखादा गट तयार होत असेल तर त्यासाठी मा.विभागीय आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते. न केल्यास सदर प्रकरण नियम बाह्य होऊन न्यायालयीन प्रकरण होऊन शकते एखादा पक्ष किंवा आघाडी होऊ शकते का याचा खुलासा आयुक्तांनी करावा. मा.आयुक्तांना सर्व माहिती असेल माझ्या माहितीप्रमाणे जर एखादी आघाडी किंवा पक्ष तयार करायचा असेल तर विभागीय आयुक्त यांना

विचारणा झाली पाहिजे. हे नियमाचे पालन होऊ शकते. आता कॅबीनसाठी खर्च व इतर करायचा झाल्यास व मनपाचे २/- रुपये खर्च करायचे असल्यास मुख्यलेखाधिकारी यांची मंजूरी घ्यावी लागते. तर मुख्यलेखाधिकारी यांनी तसा खुलासा करावा की, यासाठी बजेट प्रोव्हीजन आहे काय? बजेट मध्ये प्रोव्हीजन नसल्यास कशाच्या आधारावर खर्च करणार खुलासा व्हावा. जर प्रत्येक नगरसेवक गट तयार करुन कॅबीन मागील तर याचा जाब देण्यासाठी मा.आयुक्त यांना सामोरे जावे लागेल. यासबंधी कडक कार्यवाही होऊ शकते.

**श्री.स.अली मिरा सलामी :** या महानगरपालिकेमध्ये किती नियमाने कामे होत आहेत. हे आम्हाला सर्व माहित आहे. तिसरी आघाडी आम्ही ८ सदस्य मिळून केलेली असून एकत्र येऊन विकास कामे करण्याचा आमचा हेतू असून तसे पत्र मा.महापौर यांना लेखी स्वरुपात दिलेले आहे. जो गट तयार केला तो रजिटर्ड नाही. फक्त एकत्र बसून कामे करण्यासाठी आम्ही तिसरी आघाडी तयार केलेली आहे. यात नियम व अटींची माहिती देण्याची गरज नाही. आमची विनंती जनतेच्या सोयी सुविधा देण्यासाठी कॅबीन उपलब्ध करुन घ्यावी नसता जर आम्ही केलेल्या आघाडी गटास कॅबीन मिळत नसले तर महानगरपालिकेमध्ये तरतूद नसलेले इतर जी अनाधिकृत पदे आहेत. जे नियमात नाही. त्यांचेही कॅबीन/सुविधा काढून घ्याव्यात. जनतेचा प्रश्न विचारात घ्यावा. महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो व या ठिकाणी २/- रुपयाचा खर्चाचा हिशोब निघतो हे बरोबर नाही. आताच पाणी प्रश्नावर चर्चा चालू असून अधिकारी योग्य खुलासा करु शकत नाही. आपले अधिकाऱ्यांना धरणामध्ये किती पाणी आहे हे सुध्दा माहित नाही रोज पेपर मध्ये उलट सुलट बातम्या येतात. पावसाळ्यासाठी ८-१० दिवस बाकी असतांना आता या पाणी प्रश्नावर चर्चा होते. हे योग्य आहे काय यावरुन कोण किती जनतेसाठी कामे करतात हे दिसून येते. हा प्रस्ताव मंजूर न केल्यास इतर पदे महानगरपालिकेमध्ये अनाधिकृत असतील ती पदे व कॅबीन सुविधा काढून घ्याव्यात.

**श्री.तकी हसन खॉन :** तिसरी आघाडी हा पक्ष होऊ शकत नाही. म्हणून कोणत्याही सोयी सुविधा आपण उपलब्ध करुन देऊ शकत नाही.

**श्री.स.अली मिरा सलामी :** अशा प्रकारची तिसरी आघाडी इतर महानगरपालिकेमध्ये स्थापित झालेल्या आहे. पुणे नाशिक, ठाणे, कल्याण, डोंबीवली, मुंबई येथे आघाडी असून प्रत्येकी कॅबीन व इतर सुविधा देण्यांत आलेल्या आहेत.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** जे सत्ताधारी नगरसेवक नाहीत त्यांना त्यांचे भूमिका किंवा पत्र व्यवहार करण्यासाठी महानगरपालिकेने सन १९८८ पासून विरोधी पक्ष पदाची प्रथा आहे. त्यांचेकडे नगरसेवक येऊन काम पाहातात व सत्ताधारी पक्षातील सदस्य सभागृह नेता यांचेकडे येऊन काम पहातात. इतरही महानगरपालिकेत सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता ही पदे आहेत. महानगरपालिकेच्या याचिकेवर न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. विरोधी पक्ष नेता हे पद योग्य आहे. त्यानुसार महानगरपालिकेमध्ये फक्त विरोधी पक्ष नेता व सभागृह नेता हे दोनच पदे ठेवण्यात यावी. अशी सभागृहास विनंती आहे.

**श्री.अंबादास दानवे :** महानगरपालिकेत संसदीय पध्दतीने कामकाज चालते जनरली संसदीय प्रथा आणि परंपरेचे पालन व्हावे याच अर्थाने महाराष्ट्रातल्या सर्व महानगरपालिकेमध्ये सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता ही पदे आहेत. तिसऱ्या आघाडीला दालन द्यायचे की नाही यासाठी सर्वसाधारण सभा मंजूरी देईल त्यानुसार कार्यवाही होऊ शकते. यावर मतदान घेण्यास काहीच हरकत नाही. हातवर करुन मतदान घ्यावे.

**मा.महापौर :** सभा १० मिनिटासाठी तहकुब करण्यात येत आहे.

(दुपारचे १.५० वाजता तहकूब व सभेला सुरुवात २.५५ वाजता)

**श्री.गणेश तांबे :** इतर पक्षाला देण्यात येत असेल तर आम्हासही द्यावे. ८ सदस्यांनी मिळून एक अर्ज दिला आहे. त्यास १५ दिवस होतात.

**श्री.प्रकाश निकाळजे :** महानगरपालिका अस्तित्वात येऊन जवळपास १२ ते १३ वर्ष झालेली असून जी पदे प्रचलित झालेली आहे. त्यास या सभागृहाची मान्यता दिल्यानुसार खर्च करत आहोत. परंतू या महानगरपालिकेमध्ये तिसरी आघाडी म्हणून गट तयार झालेला आहे. त्याचप्रमाणे आम्ही काही सदस्य सुध्दा एकत्र येऊन १५ दिवसापुर्वी दालन व इतर सुविधा मिळण्यासाठी पत्रक दिलेले आहे. म्हणून एकास न्याय द्यायचा व दुसऱ्यास नाही असे होता कामा नये. जी पदे वैधानिक पदे नसतील तर त्यास आपण मान्यता देत नाही. परंतू काही सदस्यांची मर्जी राखण्यासाठी हे करावे लागते. त्याचप्रमाणे आम्हाला सुध्दा आम्ही दिलेल्या पत्रकनुसार एक कॅबीन देण्याची कार्यवाही व्हावी. नसता नागपूर महानगरपालिकेमध्ये नगरसेवकांच्या लहरी कारभार सुरु झालेला आहे. त्याची चौकशी नंदलाल कमेटी करत आहे. त्याप्रमाणे येथे होऊ नये. आाताच कपड्याच्या विषयावर चर्चा झाली त्यावेळी ऑडीट निघते असा खुलासा मुख्यलेखाधिकारी यांनी केला तर प्रत्येक पक्षाच्या गट नेत्यांना कॅबीन, कर्मचाीर, फर्निचर दिल्यास ऑडीट निघणार नाही काय याचा सुध्दा खुलासा घ्यावा. दुसऱ्या महानगरपालिकेत दुरध्वनी, कॅबीन, फर्निचर देण्याची तरतूद आहे का?

**श्री.तकीहसन खॉन :** जिल्हा परिषद, पंचायत समिति मध्ये जर अशा प्रकार सदस्यांचा गट तयार होऊन आघाडी झाल्यास त्यांना मा.जिल्हाधिकारी यांची परवानगी घ्यावी लागते. महानगरपालिकेमध्ये जर तिसरी आघाडी होत असेल तर त्यास मा.विभागीय आयुक्त यांची परवानगी लागेल. परवानगी दिल्यानंतरच कॅबीन व इतर सुविधा आपण देऊ शकतो. नियमबाह्य एखाद्या पक्षास कॅबीन व इतर सुविधा दिल्यास आम्ही न्यायालयात दाद मागू. चुकीचे निर्णय हे सभागृह घेत असेल तर याच सभागृहाने शासनाकडे या महानगरपालिकेची योग्य ती चौकशी करण्यासाठी नंदलाल समिती गठीत करण्यासंदर्भात शिफारस करावी जेणेकरुन नागपूर येथील १९ सदस्यांवर पोलिस कारवाई झाली असून त्या प्रमाणे याही महानगरपालिकेमध्ये जवळपास २५ सदस्यांवर कारवाई होईल.

**श्री.स.अली मिरा सलामी :** नंदलाल समितीकडे या महानगरपालिकेची चौकशी करण्या संदर्भात स.सदस्यांनी भावना व्यक्त केली त्याचे स्वागत करण्यात येते. स न २००० मध्ये महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक झाल्यानंतर कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कम्युनिष्ट पक्ष, समाजवादी पक्ष इ. पक्ष मिळून एक

आघाडी तयार करण्यांत आलेली असून त्यावेळेस मा.विभागीय आयुक्त यांची परवानगी घेतलेली होती काय? त्याचप्रमाणे भाजप-शिवसेना या दोन्ही पक्षांनी सार्वत्रिक निवडणूक स्वतंत्र लढवली व आता पुन्हा एकत्र येऊन काम करतात व सभागृह नेता यांनाकॅबीन देण्यात आलेली आहे. एकत्र येतांना या दोन्ही पक्षांनी विभागीय आयुक्त यांची मंजूरी घेतलेली आहे काय? याचा सुध्दा खुलासा व्हावा. तिसरी आघाडी ही जनतेच्या कामासाठी तयार केलेली असून सभागृहाला या संबंधी निर्णय घ्यावयाचा आहे. आणि या महानगरपालिकेमध्ये कुणाचीही मनमानी चालणार नाही त्यासाठी नंदलाल कमेटी चौकशी साठी आणावी यास सर्वांची संमती राहील.

**श्री.तकीहसन खॉन :** निवडणुकीच्या अगोदरच आघाडी पक्ष कार्यान्वित होता म्हणून त्यानंतर इतर पक्ष एकत्र येऊन काम करत होते. मंजूरी घेण्याची आवश्यकता नव्हती. परंतू विरोधी बाजूच्या सदस्यांतून तिसरी आघाडी तयार होत असेल तर हे नियमानुसार योग्य नाही यासाठी तरतूद आहे का याचाही विचार करावा. या सभागृहाने नियमाने निर्णय घ्यावा.

**श्री.स.अली मिरा सलामी :** सर्व महाराष्ट्रातील महानगरपालिकेला एकच नियम असून इतर महानगरपालिकेमध्ये तिसरी आघाडी किंवा गटनेता यांना कॅबीन दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे नियमाप्रमाणे येथील महानगरपालिकेमध्ये सुध्दा कॅबीन मिळण्यास हरकत नसावी. नियमामध्ये तर मा.महापौर, उपमहापौर, मा.आयुक्त यांना सुध्दा गाडी असावी अशी प्रोव्हीजन नाही. परंतू सदर प्रतिनिधी हे जनतेची कामे करतात म्हणून अशा पदावरील व्यक्तींना सुविधा पुरविल्या जातात. दुसऱ्या महानगरपालिकेत दिलेले आहे. सभागृह जो निर्णय घेईल ते मान्य करण्यात येईल.

**श्री.पांडुरंग तायडे :** या महानगरपालिकेमध्ये नंदलाल कमेटी स्थापन केल्यास २५ सदस्यांना पोलिस कोठडी होईल असे स.सदस्य श्री. तकीहसन खॉन यांनी सांगितले त्या सदस्यांची नावे सांगावे.

**श्री.कदिर मौलाना :** २५ सदस्य कोण त्यांची नांवे सांगावी किंवा माफी मागावी.

**मा.महापौर :** नांवे सांगण्याची गरज नाही. सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे वेळ पडल्यास आपण या विषयावर निर्णय घेण्यासाठी मतदान घेऊ शकतो.

**श्री.कशिनाथ कोकाटे :** सदस्यांच्या वेगळ्या गटाला मान्यता देऊन त्यांना एक कॅबीन व इतर सुविधा देण्या संदर्भाने हा प्रस्ताव सादर झालेला आहे. हा प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव ठेवलेला असून इतर महानगरपालिकेमध्ये काय परिस्थितीत आहे. याचा विचार करुन प्रस्ताव मंजूरीसाठी झालेला असावा. प्रस्ताव येण्यापूर्वीच मान्यता दिलेली आहे. हे सभागृह निर्णय घेण्यासाठी सक्षम आहे. इतर महानगरपालिकेची परिस्थिती पाहता मा.महापौर यांनी जी तिसरी आघाडी तयार झाली त्यांना कॅबीन देण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणून इतर महानगरपालिकांचा विचार करता आपल्या महानगरपालिकेमध्ये जर असे गट तयार होऊन कॅबीनची मागणी होत असेल तर त्यामध्ये कॅबीन दिल्यास कुणीही नाराजी व्क्त करण्याची गरज नाही. मा.महापौर यांचेकडे ८,९,५ इ. स.सदस्यांच्या गटागटाने पत्रक आलेले आहे. म्हणून निर्णय घेतांना गांर्भियाने निर्णय घेणे गरजेचे आहे. धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. जे की, इतर कुणी गट तयार केल्यानंतर त्यांना सुध्दा कॅबीन देता येईल काय? देणार

असेल तर त्याप्रमाणे निर्णय घ्यावा. प्रशासनाकडून अगोदर खुलासा घ्यावा. नंतर निर्णय घेण्यात यावा.

**मा.महापौर :** महानगरपालिकेत सदस्यांच्या मार्फत तिसरी आघाडी तयार करुन वेगळी कॅबीन देण्यात यावी. यासाठी माझेकडे एक पत्रक आलेले होते. यानंतर मी मा.आयुक्त, उपआयुक्त, नगरसचिव यांचेशी चर्चा केली त्यावेळेस चर्चेमधून असा निर्णय घेण्यात आला की, दुसऱ्या महानगरपालिकेत काय परिस्थिती आहे याची माहिती मागवली ती माहिती सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे असे मला वाटते. नगर सचिव याबद्दल माहिती देतील.

**नगरसचिव :** नाशिक महानगरपालिकेकडून माहिती मागविली असता या महानगरपालिकेत सभागृह नेता, राष्ट्रीय कॉंग्रेस, विरोधी पक्ष नेता, आर.पी.आय. गट नेता भाजपा, गटनेता शिवसेना, गटनेता आर.पी.आय.गटनेता, माकप, गटनेता राष्ट्रवादी कॉंग्रेस इ.गट आहेत. गटनेता निवडीची पध्दत त्या त्या पक्षांचे प्रमुखाने करायची असते. त्या आशयाचे पत्र त्यांनी मा.आयुक्त यांना सादर करावयाचे आहे. अशा प्रकारची माहिती नाशिक महानगरपालिकेकडून मिळालेली आहे. अशा गट नेत्यांस एक कॅबीन, दुरध्वनी, एक शिपाई इ.सुविधा पुरविल्या जातात असे कळविले आहे.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** एक गट तयार करुन काही सदस्यांनी तिसरी आघाडी तयार केली व त्यांचे बरोबरच आम्ही सुध्दा कॅबीन व इतर सुविधा मिळाव्या म्हणून आपणांकडे पत्रक सादर केलेले होते. परंतू आमच्या पत्रकाचा विचार न होता एका गटाला कॅबीन देण्याचा आपण निर्णय घेतला आमचा विचार केलेला नाही म्हणून आम्ही ८ सदस्य निषेध करुन सभागृहाच्या बाहेर जात आहोत.

(याच वेळी स.सभासद बाहेर जातात.)

**मा.महापौर :** महानगरपालिकेमधील वेगवेगळ्या पक्षा तर्फे स्वतंत्र कॅबीन मिळणे बाबत पत्र प्राप्त झाले आहेत. श्री.स.अली मिरा सलामी व इतर मिळून आठ सदस्यांनी तिसरी आघाडी स्थापन केली व या गटाचे नेते श्री.स.अली मिरा सलामी यांनी नव्याने निर्माण झालेल्या तिसरी आघाडी या गटासाठी स्वतंत्र कॅबीन व इतर सुविधा मिळण्या बाबत मागणी केली होती. सर्व साधारण सभेच्या निर्णयाचे आधीन राहून इतर महानगरपालिकेप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील तिसरी आघाडी या गटास स्वतंत्र कक्ष, लागणारे आवश्यक फर्निचर व शिपाई उपलब्ध करुन देण्याबाबत तात्पुरती मंजूरी दिली आहे.

या शिवाय इतर पक्षाच्या काही सदस्यांनी स्वतंत्र कॅबीन मिळणे बाबत जे पत्रक दिले आहे. त्याबाबत महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत जशी जशी तयार होईल त्या त्या वेळी इतर पक्षाच्या मागणीनुसार त्या पक्षाकरिता स्वतंत्र कॅबीन वरील प्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये नव्याने स्थापन झालेल्या तिसरी आघाडी या गटास स्वतंत्र कॅबीन,

लागणारे आवश्यक फर्निचर व शिपाई उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच प्रशासकीय इमारत जशी जशी उपलब्ध होईल त्यावेळी इतर पक्षांसाठी देखील कॅबीन, फर्निचर शिपाई, उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र.३९४/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, आंबेडकर नगर वॉर्ड क्र.६ मधील गौतम नगर भागातील होत असलेल्या सामाजिक सभागृहासमोर सांचीचा स्तुप प्रवेशद्वार माझ्या स्वेच्छा निधीतून महानगरपालिकेच्या जागेवर बांधावयाचा आहे.

करिता विशेष बाब म्हणून सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.शकुंतला इंगळे,
**अनुमोदक :** श्री.कोकाटे काशिनाथ,
श्री.मीर हिदायत मीर बसालत अली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकर नगर वॉर्ड क्र.६ मधील गौतमनगर भागात होत असलेल्या सामाजिक सभागृहासमोर स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून महानगरपालिकेच्या जागेवर सांचीचा स्तुप प्रवेशद्वार बांधण्यास विशेष बाब म्हणून सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शांतीपुरा चौक यास "आलोक चौक" असे नामकरण करण्यास सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सुनिल वडागळे,
**अनुमोदक :** श्री.अंबादास दानवे,
श्री.आनंद तांदुळवाडीकर,
श्री.संजय शिरसाठ,
श्री.भरत लकडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीपुरा चौकास "आलोक चौक" असे नामकरण करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९६/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शांतीपुरा ईदगाह जवळ व इस्माईल गवळी यांच्या वाड्या समोरील महानगरपालिकेच्या मालकीची खुली जागा ताब्यात घेऊन त्या ठिकाणी मंगल कार्यालय व वाचनालय बांधून देण्यांत यावे, शांतीपुरा मध्ये अल्पसंख्यांकांत मागासवर्गीय गरीब नागरिक व विद्यार्थी जास्त प्रमाणात वाहात असून या परिसरामध्ये शाळा

कॉलेज विद्यापीठ जवळ असल्याने विद्यार्थी नागरिक जास्त प्रमाणात राहतात व या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने त्यांना अधिक शिक्षण व अभ्यास होण्याकरिता कुठलीही सोय सेवा उपाययोजना झालेली व केलेली नाही. तसेच शांतीपुरा ही फार जुनी वस्ती असून सांस्कृतिक कार्यक्रम व लग्न व अन्य कामासाठी मंगल कार्यालय नसल्याने नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागतो. करिता वरील दर्शविलेल्या खुल्या जागेवर ५,०००/- हजार नागरिकांची मंगल कार्यालयामध्ये बसता यावे एवढे मोठे खाली मंगल कार्यालय शादीखाना व (२) मजल्यावर मोठे व भव्य वाचनालय वार्डातील नागरिकांच्या सोई व उपयोगासाठी बांधून द्यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सुनिल वडागळे,

**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे,

श्री.अंबादास दानवे,

सौ.चंद्रभागाबाई दाणे,

सौ.सुवर्णा चंद्रात्रे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीपुरा ईदगाह जवळ व इस्माईल गवळी यांच्या वाड्या समोरिल महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेवर खाली मंगल कार्यालय, शादीखाना व दुसऱ्या मजल्यावर मोठे व भव्य वाचनालय बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९७/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची धुरा वयाच्या ८० व्या वर्षी देखील आपल्या खांद्यावर समर्थपणे वाहून नेणाऱ्या आंबेडकरी जलस्याचे संपूर्ण देशात आयोजन करुन जनमानसावर अविराज्य साम्राज्य गाजवणाऱ्या लाखो दलितांचे हृदय जिंगणाऱ्या प्रत्यक्षात बाबासाहेबांची प्रशंसा मिळविणारे, चित्रपटातून तुफान गित लेखन केलेल्या, समाज जागृतीचे कार्य म्हणजेच आपले जीवन समजणाऱ्या ज्यांना शासनातर्फेही गौरविण्यांत आले आहे अशा महान कवी आदरणीय वामनदादा कर्डक यांचा रु.५१,०००/- हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करुन महानगरपालिकेतर्फे सन्मान करण्यांत यावा. दि.२० नोव्हेंबर, २००० रोजी मंजूर ठरावानुसार अशा पुरस्कारासाठी तरतूद मंजूर केली आहे. वामनदादांना सन्मानाने शहरात बोलावून त्यांच्या येण्याजाण्याचा व औरंगाबादेत तीन दिवस राहण्याचा खर्च महानगरपालिकेने करावा. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.रतनकुमार पंडागळे,

**अनुमोदक :** श्री.गणेश तांबे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महान कवी आदरणीय वामनदादा कर्डक यांचा रु.५१,०००/- हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करुन महानगरपालिकेतर्फे सन्मान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच त्यांना सन्मानाने शहरात बोलवून तिन दिवस राहण्याचा व येण्या जाण्याचा खर्च महानगरपालिकेने करण्यासाठी मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९८/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नंदनवन कॉलनी वार्ड क्र.३७ मध्ये हनुमान मंदिर व अंबिका किराणा दुकाना समोरिल महानगरपालिकेची मालकीची खुल्या जागेवर भाजी मार्केट, कॉम्प्लेक्स व मंगल कार्यालय बांधण्यांत यावे. या करिता नागरिकांची जुनी मागणी आहे. तसेच नंदनवन कॉलनी १००% लिगल असून महानगरपालिकेतर्फे आजपर्यंत या परिसरात कुठलेही उपकेंद्र, अथवा सोय करुन दिलेली नाही. म्हणून त्या खुल्या जागेवर मोठी (२) मजली भव्य इमारत बांधून खाली शॉपींग कॉम्प्लेक्स गाळे व वर मंगल कार्यालय नागरिकांच्या सोईसाठी बांधून देण्यांत यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोरे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सुनिल वडागळे,
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे,
श्री.अंबादास दानवे,
श्री.शे.मुनाफ शे.यासीन,
सौ.सुवर्णा चंद्रात्रे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंदनवन कॉलनी वार्ड क्र.३७ मध्ये हनुमान मंदिर अंबिका किराणा दुकाना समोरील महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेवर मोठी दोन मजली भव्य इमारत बांधून खाली शॉपींग कॉम्प्लेक्स गाळे व वर मंगल कार्यालय बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९९/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महिला व बालकल्याण समितीचे सभापती व उपसभापतीस वाहन उपलब्ध करुन देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.सुवर्णा चंद्रात्रे,
**अनुमोदक :** सौ.साधना सुरडकर,
श्रीमती आशा बिनवडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महिला व बाल कल्याण समितीचे सभापती व उपसभापती यांना वाहन उपलब्ध करुन देण्यांत सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४००/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभागमधील जय टॉवर्स भागातील मुख्य चौकास "अहिल्यादेवी होळकर चौक" असे नांव देण्यांत आलेले आहे. या चौकात चारही बाजूंनी मुख्य रस्ते जोडलेले आहेत. सदर चौकात वाहनांची रात्रंदिवस सतत वर्दळ असते. या चौकात अस्तित्वात असलेली प्रकाश व्यवस्था अपुरी असून वाहन धारक व पादचारी याची अत्यंत गैरसोय होते. सुसाट वाहणाऱ्या रहदारीमुळे वारंवार अपघात होतात. परिसरातील रहिवासी तथा वाहनधारक व पादचारी यांनी या मुख्य चौकात हायमास्ट बसवून सुरु करणे बाबत वारंवार मागणी केलेली आहे. या चौकात हायमास्ट बसविल्यास पुरेसा प्रकाश पडेल

व वाहनधारक व पादचाऱ्यांची गैरसोय दूर होईल व सदर चौकाचे सौंदर्यात भर पडेल. या मुख्य चौकात हायमास्ट बसवून सुरु करणे बाबत प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**सुचक :** श्री.संजय शिरसाट,

**अनुमोदक :** श्री.नंदकुमार घोडेले,

सौ.निर्मला कांबळे,

श्री.अंबादास दानवे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभागमधील जय टॉवर्सच्या भागातील "अहिल्यादेवी होळकर" चौकात हायमास्ट बसवून विद्युत व्यवस्था करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०१/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभागात सांस्कृतिक सभागृह अद्याप बांधलेले नाही. अद्ययावत व सुसज्ज असे सांस्कृतिक सभागृह बांधणे बाबत रहिवांशी मागणी करत आहेत. प्रभागात मध्यमवर्गीय व गरीब नागरिक राहतात. कोकणवाडी येथील माता मंदिरा शेजारील फ्रेंडस कॉलनी भागात महानगरपालिकेची खुली जागा असून या जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधल्यास येथील रहिवाशांची गैरसोय दूर होईल. गरीब रहिवाशांना धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करणे शक्य होईल. फेंडस कॉलनी भागातील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर अद्ययावत व सुसज्ज असे सांस्कृतिक सभागृह बांधणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.संजय शिरसाट

**अनुमोदक :** श्री.नंदकुमार घोडेले,

सौ.निर्मला कांबळे.

**ठराव :**

प्रस्तावा दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी येथील माता मंदिरा समोरील फ्रेंडस कॉलनी भागात महापालिकेच्या जागेवर अद्ययावत व सुसज्ज असे सांस्कृतिक सभागृह बांधण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐन वेळेचे विषय</u>

**विषय क्र.४०२/१ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पशुधन विकास अधिकारी (सध्या मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय) यांना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८,०००/- ते १३,४००/- ही वेतनश्रेणी देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. शासननिर्णय अधिसूचना क्र.वित्त विभाग/क्र.वेपुर-१२०९/सुधारणा-११/९९/सेवा-१०, दि.२० मार्च, १९९९ अन्वये पाचवा वेतन आयोगानुसार पशुधन विकास अधिकारी या पदास रु.२,२००/- ते ४,०००/- सुधारित वेतन श्रेणी रु.८,०००/- ते १३,५००/- अशी वेतनश्रेणी

लागू केलेली आहे व ही वेतनश्रेणी देण्या संदर्भाने प्रस्ताव सादर करण्यांत येतो. या पदास पाचव्या वेतन आयोगानुसार व उक्त शासन निर्णयानुसार वेतनश्रेणी लागू करण्यापुर्वी खालील अटी व शर्ती राहतील.

१) जून, १९९८ मध्ये मनपाने पशुधन विकास अधिकारी या पदास रु.२,२०० ते ३,७००/- दिलेली वाढीव वेतनश्रेणी रद्द करण्यांत येईल.
२) वाढीव वेतनश्रेणी नुसार या पदास अदा करण्यांत आलेली रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यांत येईल.
३) शासन निर्णयानुसार पुढील वेतनश्रेणी/फायदे सदर पदास लागू करण्यांत येईल.
४) उक्त शासन निर्णयानुसार मुख्य पशु संवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय या पदास सुधारित वेतनश्रेणी देतांना सदरील वेतनश्रेणी मनपा कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या अटी व शर्तीनुसार राहील. त्यानुसार दि.०१.०१.९६ पासून शासन निर्णयाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणीचे फायदे वेतनश्रेणी निश्चितीस सदर पदास देय राहतील.

वरील प्रमाणे अ.क्र.१ ते ४ मध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक प्राणी संग्रहालय या पदास सुधारित वेतनश्रेणी रु.८,०००/- ते १३,५००/- लागू करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय अधिसूचना क्र.वित्त विभाग/क्र.वपुर-१२०९/सुधारणा-११/९९/सेवा-१० दि.२० मार्च, १९९९ अन्वये पाचवा वेतन आयोगानुसार पशुधन विकास अधिकारी या पदास रु.२,०००/- ते ४,०००/-सुधारित वेतनश्रेणी रु.८,०००/- ते १३,५००/- अशी वेतनश्रेणी लागू केलेली आहे. व त्याच धरतीवर औरंगाबाद महानगरपालिकेतील पशुधन विकास अधिकारी (सध्या मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक प्राणी संग्रहालय) या पदास पाचव्या वेतन आयोगानुसार व उक्त शासन निर्णयानुसार प्रस्तावात नमूद केलेल्या खालील अटीस पात्र राहून रु.२,२००/- ते ४,०००/- सुधारित वेतनश्रेणी रु.८,०००/- ते १३,५००/- वेतनश्रेणी लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१) जून, १९९८ मध्ये मनपाने पशुधन विकास अधिकारी या पदास रु.२,२०० ते ३,७००/- दिलेली वाढीव वेतनश्रेणी रद्द करण्यांत येईल.
२) वाढीव वेतनश्रेणी नुसार या पदास अदा करण्यांत आलेली रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यांत येईल.
३) शासन निर्णयानुसार पुढील वेतनश्रेणी/फायदे सदर पदास लागू करण्यांत येईल.
४) उक्त शासन निर्णयानुसार मुख्य पशु संवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय या पदास सुधारित वेतनश्रेणी देतांना सदरील वेतनश्रेणी मनपा कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या अटी व शर्तीनुसार राहील. त्यानुसार दि.०१.०१.९६ पासून शासन निर्णयाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणीचे फायदे वेतनश्रेणी निश्चितीस सदर पदास देय राहतील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मी मागील आर्थिक वर्षातील ५०,०००/- रकमेचे पत्र माझ्या प्रभागात खडी रस्ते करणेसाठी संबंधित विभागात दिलेले होते. तथापि, प्रस्तावित रस्त्यावर अतिक्रमण असल्यामुळे सदरील काम प्रलंबित राहिले. सदरचे काम माझ्या स्वेच्छानिधीतून करणे बाबत सुचविलेले होते. कृपया मागील आर्थिक वर्षातील माझी राहिलेली स्वेच्छानिधीची रक्कम दुसऱ्या कामासाठी खर्च करण्यास तीन महिने मुदत वाढवून देणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.मधुकर सावंत,
**अनुमोदक :** श्री.अंबादास दानवे,
श्री.गणेश तांबे,
श्रीमती डॉ.आशा बिनवडे,
श्री.किशनचंद तनवाणी,
श्री.राजु आर.शिंदे.

**संवाद :**

**मा.महापौर :** मुख्य लेखाधिकारी, यांचे मत घेतलेले आहे. स्वेच्छानिधी ३१ मार्च पर्यंतच वापरता येतो. त्यामुळे स्वेच्छा निधीतून हे काम करता येणार नाही. महानगरपालिका फंडातून करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मागील आर्थिक वर्षातील प्रभाग क्र.२३ मधील खडी रस्त्याचे काम रस्त्यांवर अतिक्रमण असल्याने झाले नाही. स्वेच्छा निधी हा ३१ मार्च पर्यंतच वापरता येत असल्याने त्यानंतर वापरण्यास मुदतवाढ देय होत नाही. तसेच सदरचे काम किंवा दुसरे काम महानगरपालिका फंडातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शिवनेरी कॉलनी ते एन-९ एम-२ वळणावरती चौकात जैन समाजातील श्रेष्ठ मानले जाणारे व सर्व जैन समाजाचे दैवत असलेले व इतर समाजाला सुध्दा बरोबर घेऊन जाणारे व शिकवण देणारे अशी श्रेष्ठ व्यक्ती "श्री १००८ भगवान कलिकुंड पार्श्वनाथ" चौक असे नामकरण करण्यांत यावे. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.जयश्री कुमारराव मोरे,
श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
**अनुमोदक :** श्री.प्रशांत देसरडा,
श्री.विकास जैन.

**संवाद :**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** संबंधित प्रभागाचे नगरसेवकास विश्वासात घेवून प्रस्ताव ठेवावयास पाहिजे. या प्रस्तावास माझा विरोध नाही.

**मा.महापौर :** सदर प्रस्तावात स.सदस्य श्री.काशिनाथ कोकाटे यांचे नांव सुचक म्हणून देण्यांत यावे. व प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावास दर्शविल्याप्रमाणे एन-९ सिडको परिसरातील शिवनेरी कॉलनी ते एम-२ वळणावरती चौकास "श्री.१००८ भगवान कलिकुंड पार्श्वनाथ चौक" नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०५/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गेल्या अनेक वर्षापासून महानगरपालिकेचे नगरसेवक व नगरसेविका हे आपल्या स्वेच्छा निधीतून वार्डातील गरजू व युवक युवतींना संगणक प्रशिक्षण व तीन चाकी व चार चाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देत असून हिच प्रथा पुढे अमलात आणावी जेणेकरुन शहरातील गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल. आपल्या स्वेच्छा निधीतून ५०,०००/- रु.खर्च करण्याचा अधिकार देण्यात यावे. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सय्यद अली मीरा सलामी,

**अनुमोदक :** श्री.स.सलीम स.युसूफ,

श्री.गाजी सदोद्दीन गाजी जहीर,

श्री.कैसर खान बद्रोद्दीन खान,

सौ.निखत परवीन ईजाज अली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे नगरसेवक व नगरसेविका यांच्या स्वेच्छानिधीतून गरजू युवक व युवतींना संगणक प्रशिक्षण व तीन चाकी व चार चाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्याची प्रथा चालू ठेवून स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून रु.५०,०००/- खर्च करण्याचा अधिकार देण्यास सर्वानुमते मान्यता देऊन शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०६/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२८ नक्षत्रवाडी, महानगरपालिकेच्या गोरगरीबांच्या आरोग्याच्या दृष्टीने एकही दवाखाना अथवा प्राथमिक आरोग्य केंद्र नाही. तसेच वाचनालय अथवा सांस्कृतिक सभागृह सुध्दा नाही. प्रभागाची १० कि.मी. ची व्याप्ती लक्षात घेता व महानगरपालिकेची स्वत:च्या मालकीची वरील सर्व उपक्रम राबविण्याकरिता जागा उपलब्ध नसल्याने ठराव मंजूर होऊन सुध्दा वरील उपक्रमा करिता इमारत बांधणे शक्य नाही.

प्रभागाची वाढती लोकसंख्या स्लम विभाग गरीब व होतकरु जनतेच्या हिताच्या दृष्टीने आरोग्य केंद्र वाचनालये व सांस्कृतिक सभागृह बांधणे अत्यंत आवश्यक आहे. करिता कांचनवाडी येथील नाल्यावरील पुल व पारिश्चमेकडील जागेवर विशेष बाब म्हणून इमारती बांधून उपक्रम कार्यान्वित करण्यासाठी प्रस्ताव मंजूरीसाठी सादर.

**सुचक :** श्री.नंदकुमार घोडेले,
**अनुमोदक :** श्री.अंबादास दानवे,
श्री.संजय शिरसाठ.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.२८ नक्षत्रवाडी येथे आरोग्य केंद्र, वाचनालय व सांस्कृतिक सभागृह हे कांचनवाडी येथील नाल्यावरील पुल व पश्चिमेकडील जागेवर इमारती बांधून विशेष बाब म्हणून उपक्रम कार्यान्वित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अजब नगर प्रभागमधील श्री.निकेतन कॉलनी या वसाहतीत महानगरपालिकेमार्फत सभागृहाची ईमारत बांधण्यात आलेली असून या सभागृहास "प्रबोधनकार ठाकरे सभागृह" असे नांव देणे बाबत तेथील रहिवाशांनी मागणी केलेली आहे. सदर बहुउद्देशीय सभागृहात जतनेच्या मागणीचा आदर राखून "प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे सभागृह" असे नांव देणे बाबत प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.
**सुचक :** श्री.अंबादास दानवे,
**अनुमोदक :** श्री.किशोर तुळशीबागवाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अजबनगर भागातील श्रीनिकेतन कॉलनी येथील महानगरपालिकेने बांधलेल्या बहुउद्देशीय सभागृहात "प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे सभागृह" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**सौ.कचराबाई लोखंडे :** पुंडलिक नगर भागात दरवर्षी पाण्याची टंचाई असते. प्रत्येक वर्षी एका व्यक्तींचा तरी टँकरखाली मृत्यू होतो ही परिस्थिती अशीच राहायला नको. आजच्या आज एक टँकर देण्याची व्यवस्था व्हावी.

**सौ.रुख्मिणी शिंदे :** माझ्या वार्डातील नागरिकांकडून रक्कम जमा करुन ड्रेनेज कामासाठी १.८३ लक्ष रुपये भरलेले आहे. अद्याप कार्यवाही झालेली नाही. कधी काम चालू होणार आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** मागच्या बॉडीमध्ये अनाधिकृत वसाहतीमध्ये नागरिकांकडून २५% रक्कम जमा करुन तेथे विकास कामे करण्यात यावी असा निर्णय घेतलेला होता. त्यानुसार आपले कर्मचाऱ्यांनी स.सदस्या सौ.रुख्मिनी शिंदे यांचे वार्डामध्ये ड्रेनेजचे काम करण्यासाठी २५% रक्कम जमा करण्यात आलेली आहे. परंतू लगेच त्यानंतर शासनाच्या धोरणानुसार अनाधिकृत वसाहतीमध्ये काम करु नये असे आदेश प्राप्त झाल्याने ती संचिका मंजूर होऊ शकली नाही. नुकताच या सर्वसाधारण सभेने ठराव पारित करुन अनाधिकृत वसाहतीचा सर्वेक्षण करण्याचे काम करण्याचा निर्णय घेतलेला आहे. व एकत्रित प्रस्ताव शासनाकडे जाईल व मंजूरी आल्यानंतर अशा

वसाहतीमध्ये कामे करावी असे ठरलेले आहे. त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

**मा.महापौर :** जनतेनी २५% रक्कम भरलेली आहे. त्याचे काय करणार खुलासा करावा.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** या सभागृहाचे धोरणात्मक निर्णय घ्यावा तसे आदेश व्हावे त्याप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सर्वसाधारण सभेच्या निर्णयास अधिन राहून गेल्या ४ वर्षामध्ये बरेच ठिकाणी अनाधिकृत वसाहतीमध्ये कामे केलेली आहे. शासनाचा जी.आर. ६ महिन्यापुर्वी आलेला असून त्या अगोदर या कामाबाबत का कार्यवाही झालेली नाही. त्यानंतर पुन्हा या सर्वसाधारण सभेने शासनाच्या नियमांच्या अधिन राहून सर्वेक्षण काम हाती घेतलेले आहे व त्यात या भागाचा सुध्दा समावेश असेल म्हणून सदरचे काम या सर्वसाधारण सभेच्या निर्णयाच्या अधिन राहून करता येते. तशी मान्यता आपण या कामासाठी देण्यात यावी. शासन सर्वेक्षण झालेल्या सर्व वसाहतीमध्ये विकास कामे करण्यास मान्यता देणार आहोत यात शंका नाही. सर्वेक्षणाचे काम जवळपास संपलेले असून ४ ते ५ दिवसांमध्ये सर्व सर्वेक्षणाची कामे होतील. व लवकरच त्याचा अहवाल शासनाकडे पाठवण्याची कार्यवाही व्हावी. मा.मुख्यमंत्री यांनी त्यांचे सत्काराच्या वेळी निर्णय जाहीर केला आहे. त्यास अधिन राहून सुविधा देण्यात यावे. काम करण्याचा निर्णय घेण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** स.सदस्या सौ.शिंदे यांचे वार्डात ड्रेनेजचे काम करण्यासाठी इस्टिमेंट दीड वर्षापुर्वी केलेले आहे. कोणतीही कार्यालयीन आदेश नसतांना जबरदस्तीकरुन नागरिकांनी झोन अधिकाऱ्यांकडे २५% रक्कम भरलेली आहे. १.८३ लक्ष रुपये जमा आहे. तसेच २००१-२००२ च्या अर्थसंकल्पामध्ये क्र.५ मध्ये अनाधिकृत वसाहतीमधील बांधकामासोबत जमिनीच्या कराची आकारणी करणे त्यासाठी १२०/- रु. प्रति चौरस मीटर असे विकास निधी आकारण्यांत यावे असा निर्णय झालेला आहे. आता यापुढे वरील निर्णयानुसार काम करावे लागेल. नागरिकांकडून रु.१२०/- प्रति चौरस मीटर याप्रमाणे वसुली झाल्यावर काम करता येईल.

**श्री.अंबादास दानवे :** अनाधिकृत वसाहतीमध्ये सर्व सर्वे झालेला आहे. आवश्यकतेनुसार अनाधिकृत वसाहतीमध्ये तातडीची कामे करण्यासाठी एक विशेष बैठक बोलावून त्यात निर्णय घेऊन अशी तात्काळ कामे सुरु करावी. शासनाची मंजूरी येईल कामे सुरु करावी.

**मा.महापौर :** अनाधिकृत वसाहतीचा सर्वेक्षण काम झालेले आहे. त्यास लवकरच मान्यता देऊन शासनाची मंजूरी घेतली जाईल. परंतू तो पर्यंत स.सदस्या सौ.शिंदे यांचे वार्डातील ड्रेनेजचा जो प्रश्न आहे. तो ताबडतोब सोडवण्यात यावा व मा.आयुक्तांनी या कामास मान्यता द्यावी.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** सिडको-हडकोला एक दिवसाआड पाणी येते याची माहिती देण्यात यावी.

**श्री.सोनवणे सुदाम :** सिडको-हडकोला पाण्याचा प्रश्न मोठा झालेला आहे. संबंधित अधिकारी यांनी परवाच्या बैठकीत सांगितले की, सिडको-हडकोला २८ एम.एल.डी. पाणी पुरवठा केला जातो. अधिकारी असा खुलासा करत असतील तर संबंधित उपअभियंता श्री.कलीम अख्तर हे अकार्यक्षम आहे म्हणून श्री.जावळे यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात यावे. यांना ३५ वर्षाचा अनुभव आहे.

**मा.महापौर :** सिडको-हडको येथील पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी शाखा अभियंता श्री.जावळे हे उपअभियंता श्री.कलीम अख्तर यांना मदत करतील.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** सिडको हडकोला २८ एम.एल.डी. पाणी येते. शहरासाठी ७८ एम.एल.डी. पाणीपुरवठा होतो. जुन्या शहरात जास्ती जास्त पाणी का दिले जात नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** सिडको हडकोला पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईनची क्षमता जेवढी आहे. त्याप्रमाणे पाणी पुरवठा केला जातो. त्यापेक्षा जास्त पाणी पुरवठा करु शकत नाही. नवीन पाईप लाईनची स्कीम चालू आहे. त्याद्वारे सिडकोला ५५ एम.एल.डी. पाणी दिले जाईल.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** सिडको हडकोमध्ये ३ ते ४ दिवसांमधून एकदा पाणी दिले जाते ते ३० मिनीटांच्यावर नाही. कमीत कमी २ तास पाणी दररोज घ्यावे. जुन्या शहराप्रमाणे सिडकोतील नागरिकांना सुध्दा विचार करावा. सिडकोमधील जवळपास ८०% रहिवाशी पाणी पट्टी भरतात आणि त्या भागात पाणी कमी प्रमाणात दिले जाते.

**सौ.जयश्री मोरे :** जवळपास ६ महिन्यापासून माझा वार्ड पवननगर येथे पाण्याची टंचाई भासते. पाणी कमी प्रमाणात व वेळेवर येत नाही. वार्डातील ५० ते ६० घरांना पाणीच मिळत नाही. यासंबंधी मी संबंधित अधिकारी यांना सूचना केलेली होती. टँकरची मागणी सुध्दा केलेली होती. परंतू अद्याप कार्यवाही नाही आपण प्रत्यक्ष पाहणी केल्यास समजून येईल. टँकरची मागणी केली असता दुसऱ्या वार्डमध्ये गेलेल आहे, दुरुस्तीस आहे असे सांगितले जाते. तसेच संबंधित पाणी पुरवठा विभागामध्ये फोन वरुन सांगितले जाते. तसेच संबंधित पाणी पुरवठा विभागामध्ये फोनवरुन चर्चा करण्यासाठी कुणीही फोन उचलत नाही. तात्काळ कार्यवाही न झाल्यास तेथील जनतेला घेऊन महानगरपालिकेवर मोर्चा, आंदोलन करण्यात येईल व यापुढे तेथील जनता पाणी पट्टी भरण्यास नकार देतील.

**मा.महापौर :** स.सदस्या सौ.जयश्री मोरे तसेच श्री.सुरगोणीवार यांनी जे जे पाण्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेले आहेत. ते सोडविण्यासाठी कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी ताबडतोब कार्यवाही करावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** प्रत्येक बैठकीत पाणी प्रश्नावर चर्चा होते. संबंधित अधिकारी नेहमी खुलासा करतात की, सिडको-हडको भागात २८ एम.एल.डी. पाणी देण्यात येते. अधिकारी चुकीचा खुलासा करतात. एक महिन्यापासूनची परिस्थिती पाहता सर्वच वृत्तपत्रात सिडको हडकोतील पाणी प्रश्नाबाबत वेगवेगळ्या बातम्या प्रसिध्द झालेल्या असून सदर प्रत्येक वृत्तपत्राचे पत्रकार यांनी संपूर्ण भागात सर्वे करुन त्या बातम्या वृत्तापत्रामध्ये आलेल्या आहे. सिडको हडको भागात पाण्याच्या बाबतीत शहरापेक्षा वेगळी परिस्थीती आहे. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी या सभागृहाने ठोस पावले उचलावी. प्रत्येक ठिकाणी सारख्याच प्रमाणात पाणी दिले गेले पाहिजे याची सुध्दा संबंधित विभागाने जातीने लक्ष घालून कार्यवाही केली पाहिजे. या भागात पाणी पुरवठा व्यवस्थित न होण्याचे कारण म्हणजे या विभागात कर्मचारी अपुरा आहे. कर्मचाऱ्यांच कामाचे नियोजन करणे आवश्यक आहे. म्हणून प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी एक समिती नेमावी त्या समितीने दोन दिवसात पाहणी करुन या विभागात कर्मचारी, व जेथे पाणी पुरवठा करणे शक्य नाही. त्या भागात

टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था विनाविलंब करण्याची कार्यवाही करावी.

**मा.महापौर :** सिडको-हडको तसेच पुंडलिक नगर येथे पाणी टंचाई आहे. तशी चर्चा सभागृहात झालेली आहे. या विभागात कर्मचारी वर्ग कमी असतील तर कार्यकारी अभियंता यांनी तशी यादी अस्थापना विभागाकडे द्यावी. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. माझे दालनामध्ये बैठक झालेली होती. त्यानुसार कर्मचारी देण्याबाबत मी कळविलेले आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** मा.महापौर दालनात बैठक झाल्यानंतर आपण आदेशित केल्याप्रमाणे आस्थापना विभागामध्ये या विभागात लागणारे कर्मचारी याबाबत लेखी पत्र देऊन कळविलेले आहे. त्यात ४ दुय्यम अवेक्षक, एक उपअभियंता, दोन ज्यु.इंजिनीअर आणि ४७ लाईनमन ई.कर्मचारी पाणी पुरवठा विभागात आवश्यक असून त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

**मा.महापौर :** शहरामध्ये पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी या विभागामध्ये एक उपअभियंता, २ ज्यु.इंजिनीअर, ४ दुय्यम आवेक्षक, ४७ लाईनमन देण्यासंबंधी प्रशासनामार्फत ३ दिवसात पुर्तता व्हावी. त्यानुसार संबंधी अधिकारी यांनी या कर्मचाऱ्यांची आवश्यकतेनुसार विभागणी करुन पाणी पुरवठा जास्त प्रमाणात व सुरळीत होण्यासाठी प्रयत्न करावे.

**सौ.मंदाबाई पवार :** माझ्या वार्डामध्ये पाणी वेळेवर येत नाही. रात्री बे-रात्री पाणी येते रहिवाशी झोपलेले असतात त्यामुळे काहींना पाणी मिळत नाही. तसेच कमी दाबाने पाणी पुरवठा होतो.

**मा.महापौर :** स.सदस्या सौ.पवार यांच्या वार्डात पाणी वेळेवर येत नाही, अशी त्यांची तक्रार असून संबंधित अधिकारी यांनी सकाळी ५ ते ११ वाजेपर्यंत या वेळेत पाणी पुरवठा वितरणाची व्यवस्था करण्याबद्दल प्रयत्न करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** जायकवाडीमधून ज्या पंपाद्वारे पाणी उचलले जाते ते बरोबर ९६ तास चालले तर संपूर्ण शहराला १००% पाणी पुरवठा होतो. परंतू मागील १० तारखेपासून ७२,७३,७४ तास पाणी पुरवठा या पंपाद्वारे उपसा झालेला असून त्यामुळे शहरात येणारा पाणी पुरवठा कमी झाला व सिडकोमध्ये देण्यात येणाऱ्या पाण्यामध्ये सुध्दा विस्कळीतपणा आलेला होता. त्यामुळे वेळेचे बंधन पाळता आले नाही. आताच माहिती घेतली सदरील पंप रात्री १२ वाजेपासून चालू असून आतापर्यंत चालू आहे व अशा प्रकारे झलक चालू राहिल्यास शहराला व सिडको हडको भागात पाण्याची टंचाई भासणार नाही.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी आताचे खुलासा केलेला आहे. आता उपसा करणारे पंप २४ तास चालू असून शहराला १००% पाणी पुरवठा होईल.

**सौ.निखत परवीन ईजाज अली :** सिटी चौक भागात सुध्दा २० ते २५ मिनीटे पाणी पुरवठा होतो. जनतेला वेळेवर व मुबलक पाणी पुरवठा होण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**मा.महापौर :** सिटी चौक भागात सुध्दा पाणी वेळेवर येत नसून कमी पाणी येते. म्हणून तेथे कर्मचारी नियुक्त करुन वेळेवर पाणी देण्याची कार्यवाही व्हावी. योग्य ते नियोजन करावे.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** पाणी प्रश्नावर चर्चा चालू आहे. परंतू माझा प्रश्न नाल्याच्या संबंधित भिंती बाबत आहे. माझ्या वार्डामध्ये नाला संरक्षित भिंत होण्यासाठी इस्टीमेंट तयार होऊन सुध्दा कार्यवाही केलेली नाही. बजेट नाही असे सांगण्यात येते. गेल्या वर्षभरामध्ये माझ्या वार्डात कोणतेही विकास काम झालेले नाही. अतिक्रमण झालेले आहे. अतिक्रमण होत असतांना अधिकार काय करत होते. अतिक्रमण काढण्याची सुध्दा कार्यवाही केलेली नाही. कारण महानगरपालिकेतील कर्मचारी श्री.दाभाडे यांनी नाल्याच्या बाजुला अतिक्रमण केले सध्या ते पानचक्की भागात राहतात. नाला संरक्षित भिंत न केल्यास व अतिक्रमण न हटवल्यास मी उपोषणास बसेल याची नोंद घ्यावी.

**मा.महापौर :** नाल्याच्या बाजुला महानगरपालिकेतील कर्मचारी श्री.दाभाडे व इंगोले यांनी अतिक्रमण केल्याने नाला अरुंद झालेला असून प्रशासनाने सदरचे अतिक्रमण काढण्याबाबत ताबडतोब कार्यवाही करावी. त्यानंतर सदर वार्डातील नाल्याला संरक्षित भिंत बांधण्याची कार्यवाही व्हावी. याची थोडक्यात माहिती संबंधित अधिकारी यांनी द्यावी.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** विष्णू नगर या भागातून एक नाला वाहतो. त्या नाल्याची रुंदी २० फुट होती आता सध्या २ फुट रुंदी आहे व संरक्षित भिंत बांधण्यासाठी ६० लक्ष रुपये खर्च येणार असून भिंत बांधण्यासाठी जागा शिल्लक नाही.

**मा.महापौर :** या लोकाचे डेलिगेशन मला भेटले ते लिहून देण्यास तयार आहे. संरक्षित भिंतीचे काम करण्याची कार्यवाही करावी.

**सौ.नुसरत बानो फिरोजखान :** माझ्या वार्डात नेहरु नगर किराडपुरा येथील न्यु.एस.टी.कॉलनी येथे नाला संरक्षित भिंत बांधण्या संदर्भात प्रशासनाकडे पत्र दिले माहिती घेतली असता बजेट नाही असे सांगितले जाते. पावसाळा जवळ आलेला असून लोकांच्या घरामध्ये पाणी जाईल गरीब लोकांचे नुकसान होईल.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** संरक्षित भिंत बांधण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात १५ लक्ष रु.तरतूद केलेली असून स्पील ओवरची कामे यामध्ये होत आहेत. नवीन कामे प्रस्तावित करता येणार नाही असे स.सदस्या यांना मी त्यांनी पत्र दिल्यानुसार खुलासा केलेला आहे.

**सौ.नुसरत बानो फिरोज खान :** मागच्या वर्षीच हे काम करायचे होते. त्यावेळेस बजेट नाही. असे सांगण्यात आले आता बजेट ठेवले तर काम करता येणार नाही. असे उत्तर देणे बरोबर नाही. १० लाख ६६ हजाराचे अंदाजपत्रक तयार आहे. पाऊस पडल्यानंतर संबंधित नाल्याच्या बाजुला असलेल्या रहिवाश्यांच्या घरात पाणी जाईल त्यास महानगरपालिकाच जबाबदार राहिल.

**मा.महापौर :** संरक्षित भिंत बांधण्यासाठी १५ लक्ष रुपयाची तरतूद आहे. त्यामुळे स.सदस्या श्रीमती मानकापे तसेच स.सदस्या सौ.नुसरत बानो यांचे वार्डातील संरक्षित भिंतीचे काम शासकीय अनुदान आल्यानंतर त्यातून करण्याची कार्यवाही करावी. विष्णूनगर नाल्यावरील अतिक्रमण ताबडतोब काढण्यात यावे.

**सौ.नुसरत बानो फिरोज खॉन :** माझ्या वार्डामध्ये जिवेश्वर कॉलनी मध्ये पाण्याची खूप टंचाई असून २५ वर्षापासून या वार्डात पाण्याची टंचाई जानवते. या भागात २००० जनता स्थायिक आहेत. मुख्य नळ कनेक्शन ४०० ते ५०० फुट दुरवर असून मागील बैठकीत सुध्दा पाणी या विषयावर चर्चा होऊन मुबलक पाणी देण्यात

यावे असे आपले आदेश झालेले असतांना सध्या ३० मिनीटे सुध्दा पाणी येत नसून अधिकारी तक्रार करुन ही मनमानी करतात वार्डातील जनता काही समस्या असल्यास आमच्या दारी येतात. आम्हास उत्तरे द्यावी लागतात. निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केली गेली पाहिजे.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** सिडको एन-८ च्या काही रहिवाशी यांना जवळपास ८ ते १० सोसायटींना स्वतंत्र पाणी पुरवठा हत्तेसिंगपुरा येथील पाण्याच्या टाकीमधून पाणी पुरवठा करण्यात येतो. ही पाईप लाईन टाकल्यानंतर स.सदस्या यांनी सांगितलेला परिसर अनाधिकृत विकसीत झालेला आहे व या भागात ड्रेनेजचे वेस्ट वॉटर यामुळे पाणी तुंबल्याने पाणी दुषित झाले त्यामुळे काविळ रोगाचे २५ केसेस झाले. एन-८ येथे पाणी पुरवठा करण्याच्या पाईप लाईनला छिद्रे पाडून तसेच लांबवर ३०० ते ४०० फुटापर्यंत अनाधिकृत नळ कनेक्शन करुन पाणी घेतले त्यामुळे एन-८ येथे पाणी कमी मिळत होते व तेथील नागरिकांच्या तक्रारीनुसार दुसरी पाईप लाईन टाकुन त्या जनतेला पाणी पुरवठा होईल.

**सौ.नुसरत बानो फिरोज खॉन :** जे अनाधिकृत नळ कनेक्शन असतील ते अधिकृत करावे. ती सुध्दा जबाबदारी संबंधित अधिकारी यांची आहे.

**मा.महापौर :** अनाधिकृत नळ कनेक्शन असेल तर ते काढून टाकण्याचे आले काम आहे.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** नळ कनेक्शन घेण्याबाबत माझ्याकडून आव्हान करण्यात आले आहे. कोणती यायला तयार नाही. बऱ्याच वेळा या भागात कर्मचारी व नागरिक यांचेत भांडणे झाली. पोलिस केसेस झालेल्या आहेत. कर्मचारी सुध्दा आता त्या भागात जाण्यास नकार देतात. अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** अधिकृत नळ कनेक्शन करायचे हे काम स.सदस्यांचे नसून आपले कर्मचारी आहेत. त्यांचे सोबत पोलिस पथक घ्यावे. ज्यांनी नळ कनेक्शन अनाधिकृत घेतलेले ते ताबडतोब तोडून टाकावे. जे घेण्यास तयार आहेत. त्यांचे अधिकृत करावे.

**मा.महापौर :** जे जे अनाधिकृत नळ कनेक्शन असतील ते काढून त्यांचे वर कारवाई करावी जे अधिकृत आहेत. त्यांचेकडून पाणीपट्टी वसुल करावी. नळ कनेक्शन सर्वे करण्यासाठी सभागृहाने निर्णय घेतलेला होता. त्याची कार्यवाही का झालेली नाही. त्यांचा खुलासा करावा. पूर्ण झालेले नसल्यास किती दिवस लागतील.

**श्री.अंबादास दानवे :** अनाधिकृत नळ सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी एक पथक नेमावे.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** सभागृहाने मंजूरी दिल्यानुसार शहरातील व सिडको भागातील नळ कनेक्शन सर्वेचे काम सुरु केलेले असून त्यासाठी ६ महिने तरी लागतील.

**सौ.निखत परवीन ईजाज अली :** बारुदगर नाल्याची आपण प्रत्यक्ष ऑगस्ट २००० मध्ये पाहणी केली व तेथे संरक्षित भिंत बांधण्याची आवश्यकता आहे असे म्हटले होते. त्यानुसार अद्याप पुढील कार्यवाही झालेली नाही. पावसाळ्याचे दिवस आले लोकांच्या घरात पाणी जाईल.

**मा.महापौर :** रिटेनिंग वॉलचा सर्वे झालेला आहे. इस्टिमेंट तयार करण्याचे आदेश देण्यांत येते. शासनाचा निधी उपलब्ध झाल्यावर सर्व नाला संरक्षण भिंती बांधण्याची कामे केली जातील.

**श्री.सुदाम सोनवणे :** मागील बैठकीत मेगा प्रोजेक्ट वर चर्चा होऊन यातून महानगरपालिकाचा फायदा झालेला आहे. म्हणून या प्रोजेक्टला मंजूरी देण्यांत आलेली आहे. परंतू अधिकारी यांनी चुकीची माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल केली यात. महानगरपालिकेचे जवळपास ५० लक्ष रुपयाचे नुकसान झालेले आहे. त्यासंबंधीचा अहवाल मागवला होता. अहवाल आलेला नाही. तसेच भंगार मालावर जकात कमी केली. कोणत्या नियमाप्रमाणे कमी करण्यात आली खुलासा घ्यावा. सभागृहाची परवानगी घेतली का?

**श्री.अंबादास दानवे :** महानगरपालिकेची परवानगी घेऊन पुर्वी प्रताप बिल्डर्स व खिंवसरा बिल्डर्स यांनी सेल्फ डेव्हलपमेंटची कामे केली. कराराप्रमाणे कोणतेही नियम पाळले नाही. कम्पलेशन सर्टीफिकेट सुध्दा त्यांनी घेतलेले नाही. व त्यांच बिल्डरांना मेगा सिटी प्रोजेक्ट साठी परवानगी देण्यात आली एकूण १६ लोकांना परवानगी दिली मागील बैठकीत मी हा मुद्दा चर्चेला आणलेला होता. १ दिवसामध्ये परवानगी देण्यात आलेली असून सामान्य नागरिकांना ६-६ महिने परवानगी मिळत नाही. ज्या दोन बिल्डरांनी सेल्फ डेव्हलपमेंटच्या कामासाठी महाननगरपालिकेकडे ॲग्रीमेंट केले. त्यात कोणत्या नियमाचे पालन केलेले नसतांना पुन्हा त्यांनाच कामासाठी परवानगी दिली हा एक मुद्दा आहे. दुसरे असे की, बँक गँरंटी ही १ वर्षासाठी ठेवलेली असून १ वर्षामध्ये कोणतेही काम पूर्ण होत नाही. तिसरा मुद्दा असा की, बेसमेंट झाल्यानंतर पूर्णत्याचे प्रमाणपत्र घ्यावे लागेल ही अट घालून देणार की नाही हा मुद्दा आहे, मेगा प्रोजेक्ट मध्ये अशा अटी घालणे आवश्यक आहे. कारण गरीब जनतेला ही घरे देण्यांत येणार असून केंद्र शासनाची ही मोठी योजना असून संबंधित बिल्डर्स सर्व नियम पाळणार नाही व बँक गँरंटी १ वर्षाऐवजी त्या वाढ व्हावी अशा मुद्दा मी मागील बैठकीत मांडला होता. त्याचप्रमाणे बेसमेंट पूर्ण झाल्यानंतर कम्प्लेशन प्रमाणपत्र घेतले पाहिजे. त्याचा संपूर्ण अहवाल या बैठकीत सादर करणार होते का अहवाल आला नाही. माझ्या माहितीप्रमाणे यात २० ते २५ लाख रुपयाचा गैरव्यवहार झालेला आहे. तसेच स.सदस्य श्री.सोनवणे सुदाम यांनी सांगितले आरेफ स्टील या भंगार वर २% ऐवजी प्रती टन ६०/- रु. कुणाच्या मान्यतेनुसार केले. त्याचा सुध्दा खुलासा करावा. आपण मालाच्या किंमतीवर जकात आकारते भंगारचे दर वाढतील आणि ६०/- रु.टनाने जकात आकारणार काय? महानगरपालिकेचे उत्पन्न कमी झालेले आहेत. घेतलेला निर्णय रद्द करुन पुर्वी प्रमाणेच जकात आकारावी असा निर्णय आपणास घ्यावा लागेल तसे आदेश करावे. संबंधित अधिकारी असे परस्पर निर्णय घेऊन अंमलबजावणी करत असतील तर त्यांचेवर सुध्दा कारवाई करावी.

**मा.महापौर :** भंगार मालावर जकात कमी लावण्या संदर्भात प्रशासनाने सर्वसाधारण सभेला विश्वासात न घेता ठराव घेतला, कसा निर्णय घेतला. तसेच मेगा प्रोजेक्ट बाबतचे जे नियम आहेत. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी त्या नियमाची एक-एक प्रत प्रत्येक स.सदस्यांना देण्यात यावी.

**श्री.अंबादास दानवे :** मेगा प्रोजेक्ट मध्ये लिंटल लेवलचे काम झाल्यानंतर तसे प्रमाणपत्र घेतले पाहिजे अशी अट घालावी. तसेच बँक गॅरंटी सुध्दा वाढवून घेतली

पाहिजे आणि भंगार मालावर जकात कमी करण्याचा जो निर्णय प्रशासनाने घेतला तो निर्णय या सभागृहाने रद्द करावा, तसे आदेश व्हावे.

**मा.महापौर :** मेगा प्रोजेक्ट ज्या बिल्डरांना परवानगी दिली त्यांनी प्लिन्थ लेवलचे काम झाल्यानंतर तसे प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे. तसेच बँक गॅरंटी व इतर जे नियम या प्रोजेक्टसाठी घालून दिले आहेत प्रशासनाने त्याची पूर्तता करुन घेण्याची कार्यवाही करावी.

याबरोबरच "जन-गन,मण" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका,औरंगाबाद.

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०-०६-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक २०-६-२००१ रोजी मा. महापौर श्री. डॉ. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील स. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष | स.सभासद |
| २) | स.स.श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | स.सभासद |
| ३) | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | स.सभासद |
| ४) | स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग | स.सभासद |
| ५) | स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र | स.सभासद |
| ६) | स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहमद | स.सभासद |
| ७) | स.स.श्री औताडे रावसाहेब ममतु | स.सभासद |
| ८) | स.स.सौ. शकुंतला सांडूजी इंगळे | स.सभासद |
| ९) | स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी | स.सभासद |
| १०) | स.स.श्री. शिंदे राजु रामराव | स.सभासद |
| ११) | स.स.श्री. कावडे साहेबराव रणुबा | स.सभासद |
| १२) | स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | स.सभासद |
| १३) | स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार | स.सभासद |
| १४) | स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | स.सभासद |
| १५) | स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | स.सभासद |
| १६) | स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन | स.सभासद |
| १७) | स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | स.सभासद |
| १८) | स.स.श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | स.सभासद |
| १९) | स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | स.सभासद |
| २०) | स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु | स.सभासद |
| २१) | स.स.सौ. साधना गणेश सुरडकर | स.सभासद |
| २२) | स.स.सौ. विजया किशोर रहाटकर | स.सभासद |
| २३) | स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर | स.सभासद |
| २४) | स.स.सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | स.सभासद |
| २५) | स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण | स.सभासद |
| २६) | स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | स.सभासद |
| २७) | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | स.सभासद |
| २८) | स.स.श्री. अय्युबखान सरदारखान | स.सभासद |
| २९) | स.स.श्री. अ. रशीद अ. सत्तार | स.सभासद |
| ३०) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | स.सभासद |
| ३१) | स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | स.सभासद |
| ३२) | स.स.सौ. रशिदा बेगम गप्फार यारखॉन | स.सभासद |

| | | |
|---|---|---|
| ३३) | स.स.श्री. वडागळे सुनिल बुधवेल | स.सभासद |
| ३४) | स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब | स.सभासद |
| ३५) | स.स.श्री. मुमताज अली मोज्जम अली | स.सभासद |
| ३६) | स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | स.सभासद |
| ३७) | स.स.श्री. नासेरखान सरदारखान | स.सभासद |
| ३८) | स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव | स.सभासद |
| ३९) | स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास | स.सभासद |
| ४०) | स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत | स.सभासद |
| ४१) | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स.सभासद |
| ४२) | स.स.सौ. नुसरत बानो फिरोजखान | स.सभासद |
| ४३) | स.स.सौ. मौरे जयश्री कुमारराव | स.सभासद |
| ४४) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | स.सभासद |
| ४५) | स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | स.सभासद |
| ४६) | स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय | स.सभासद |
| ४७) | स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | स.सभासद |
| ४८) | स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | स.सभासद |
| ४९) | स.स.श्री. अ. कदीर मौलाना सय्यद | स.सभासद |
| ५०) | स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | स.सभासद |
| ५१) | स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम | स.सभासद |
| ५२) | स.स.सौ. संगिता बाळू मैंद | स.सभासद |
| ५३) | स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे | स.सभासद |
| ५४) | स.स.सौ. शाहीन जफर महमुद जफर | स.सभासद |
| ५५) | स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भागीरथ | स.सभासद |
| ५६) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स.सभासद |
| ५७) | स.स.श्री. स. सलीम स. युसूफ | स.सभासद |
| ५८) | स.स.श्री. तकीहसनखान कासीमहसन खॉन | स.सभासद |
| ५९) | स.स.श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहमद | स.सभासद |
| ६०) | स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | स.सभासद |
| ६१) | स.स.सौ. नफिसुन्नीसा बेगम हबीबखॉ | स.सभासद |
| ६२) | स.स.श्री. शे. इसाक शे. जैनोद्दीन | स.सभासद |
| ६३) | स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन | स.सभासद |
| ६४) | स.स.श्री. लकडे भरत श्रीपती | स.सभासद |
| ६५) | स.स.श्री. शेख मुनाफ शेख यासिन | स.सभासद |
| ६६) | स.स.श्री. सलिम पटेल समशेर पटेल | स.सभासद |
| ६७) | स.स.श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान | स.सभासद |
| ६८) | स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | स.सभासद |
| ६९) | स.स.श्री. स.अली मिरा सलामी | स.सभासद |
| ७०) | स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज | स.सभासद |
| ७१) | स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली | स.सभासद |

<u>स्विकृत सदस्य</u>

१) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास
२) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) स.स.सौ. खुंगर सुरजितसिंग तिळकराव
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

**सवांद :**

**श्री. शेख ईसाक जैनोद्दीन :** या जिल्हयाचे पालकमंत्री डॉ. पदमसिंह पाटील यांचे आईचे नुकतेच दुःखद निधन झाल्याने त्यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्री. शिंदे किशोर :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर** : कृपया सर्वांनी ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करावी. याचवेळी सभागृहतर्फे जिल्हयाचे पालक मंत्री यांचे आईचे दुःखद निधनाबद्दल ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहू श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**श्रीमती घायतिलक लिलावती :** चर्चा करावी. माझे प्रश्न सोडवण्यात यावे. बरेच वेळा पत्र देऊनही कार्यवाही झालेली नाही. मला माझे प्रश्न मांडू दयावे.

**मा. महापौर** : चर्चेसाठी वेळ देण्यात येईल अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करावी. अगोदर चर्चा केल्यास विषयावर चर्चा करण्यास वेळ मिळत नाही.

**श्रीमती घायतिलक लिलावती :** महिन्यातून एकदा सभा होते. विषय पत्रिका मंजूर करण्यास वेळ दिला जातो व चर्चा करण्यासाठी नेहमीच वेळ नसतो. म्हणून अगोदर चर्चा करावी.

**श्री. स. सलीम स. युसूफ :** विषय पत्रिका मंजूर केल्यानंतर सभा संपवली जाते म्हणून अगोदर चर्चा घेण्यात यावी. वार्डातील लहान-मोठी कामे प्रलंबीत आहे. स. सदस्यांच्या सूचना जाणून घ्याव्यात.

**मा. महापौर** : ठीक आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेता अगोदर चर्चा करण्यात येईल व चर्चेसाठी व तासाचा वेळ देण्यात येतो. नंतर विषयपत्रिकेवर चर्चा करण्यात येईल.

**श्री. थोरात बाळासाहेब :** महानगरपालिकेला सध्या आयुक्त नाही. विकास कामे थांबवून आहेत. आयुक्त कधी येणार खुलासा करावा कोणते येणार व किती दिवसात येणार याबाबत सभागृहाने ठोस असा निर्णय घ्यावा.

**श्री. भगवान घडामोडे :** सार्वत्रिक निवडणूका होऊन नवनिर्वाचित सदस्यांना निवडून येऊन ०४ महिने झाले या कालावधीत १३ आयुक्तांनी पदभार स्वीकारत कार्यभार पाहिला वृत्तपत्रात वेगवेगळया बातम्या झळकता. या महानगरपालिकेत आयुक्त या पदावर येण्यास कुणी तयार नाही. मनमानी चाल आहे.याचा अर्थ या महानगरपालिकेला बदनाम करण्याचा प्रयत्न हे आघाडी सरकार करत आहे. अधिकाऱ्यांची सरकारने नियुक्ती केल्यास येण्यास नकार देतात हे योग्य नसून केवळ भाजप-शिवसेनेचे महापौर येथे असून सरकार बदनाम करण्याचा प्रयत्न नगर विकास विभागाचे सचिव यांना पत्र देऊन सुध्दा आयुक्त देण्याची कार्यवाही होत नाही १ वर्षापासून शिक्षणाधिकारी या महानगरपालिकेत नाही पत्र व्यवहार करुन सुध्दा अधिकारी देण्याचे टाळाटाळ हे सरकार करत आहे. सरकार सर्व गोष्टीस जबाबदार असून

अशा सरकारचा निषेध केला पाहिजे. आपण सर्व सदस्यांनी मंत्रालयाकडे मोर्चा काढावा या शहराचे विकासासाठी प्रयत्न करावे.

( याचवेळी भाजप-सेना सदस्य या महानगरपालिकेस आयुक्त नाही सरकार जबाबदार म्हणून आघाडी सरकारच्या विरोधात निषेध करुन घोषणा करतात.)

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** सरकारचा निषेध करणे योग्य नाही सरकार त्यास जबाबदार नाही.

**श्री. प्रशांत देसरडा :** सन १९८२ ला महानगरपालिका स्थापन होऊन १९ वर्ष झाले असून आतापर्यंत २१ आयुक्त या मनपास लाभले १४ महिन्याच्या काळात ४ आयुक्तांनी खऱ्या अर्थाने काम केले. अशा प्रकारे आयुक्तांच्या बदल्या होत असतील तर, विकास कामे कसे होणार ती होऊ नये म्हणून आयुक्त देत नाही अशी शंका निर्माण होते आहे. शहराचे महापौर हे आपल्या सर्वाचे आहे. महापौर, पदाधिकारी सर्व स. सदस्य आयुक्त दयावेत म्हणून सरकारकडे मागणी करतात. तरी आयुक्त देत नाही. आयुक्त देत नसतील तर, सर्व पक्षाचे नगरसेवकांनी एकत्र येऊन मंत्रालयावर मोर्चा काढावा.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** सरकार यास जबाबदार आहे म्हणून निषेध केला हे योग्य नसून सरकार यास जबाबदार नाही म्हणून आम्ही सर्व सदस्य मिळून ज्यांनी निषेध केला त्याचे विरोधात निषेध करतो. ( सभागृहात निषेधाच्या घोषणा देण्यात येतात.) आता पर्यंत १४ महिन्याच्या काळात ४ आयुक्त येऊन गेले. तत्कालीन आयुक्त श्री. जहागीरदार यांचेवर सुरुवातीला आरोप प्रत्यारोप करण्यात आले त्यामुळे कुणी आयुक्त येथे येण्यास नकार देतात. सरकारचा दोष नाही एकमेकाविरुध्द घोषणा बंजी करुन निषेधा करण्यापेक्षा या महानगरपालिकेस लवकरात लवकर आयुक्त कधी येतील यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावे शहराची विकास कामे कशी लवकरात लवकर करता येईल याकडे पहावे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** जवळपास दिड वर्षापासून या सभागृहात आयुक्तांच्या संदर्भात नेहमीच चर्चा होते. नवीन आयुक्त येतात कामे करीत नाही. म्हणून चर्चा होते. आता आयुक्तच नाही. म्हणून चर्चा होत आहे. जे येतात. त्यांची कालमर्यादा नसते. किती दिवसासाठी आयुक्त असावे याचा निर्णय घेण्यात यावा काहींनी निषेध केला त्यांच्याशी काही देणे घेणे नाही. विकास होत नाही. जनतेच्या तक्रारी येतात, तत्कालीन आयुक्ता यांनी शासनाकडे लेखी तक्रार केली म्हणून आयुक्त येत नाही. कालच्याच वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. भोगे साहेबांना आपण आयुक्त म्हणून बोलवत आहोत. पहिल्यांदाच का त्यांना येथून काढून देण्यात आले याचा सुध्दा विचार होणे गरजेचे आहे. श्री. वैद नंतर श्री. पवार साहेब आले त्यानंतर श्री. बलदेवसिंग लगेच श्री. जहागीरदार आले. त्यांची बदली झाली वा सर्व आयुक्तांच्या बदल्यामागे सर्व राजकारण झालेले आहे. म्हणून कुणी आयुक्त असो, त्यांच्याबरोबर सर्व सदस्यांनी एकत्रित येऊन कामे करुन घेतली पाहिजे, म्हणून कुण्याही सरकारचा निषेध करणे बरोबर होणार नाही. जे आयुक्त येतील त्यांना कमी, कमी ३-४ वर्ष या महानगरपालिकेमध्ये काम करावे लागेल तसा ठरावच मंजूर करुन शासनाकडे पाठवावा. नेहमीच बदल्या होतात याचा परिणाम विकास कामावर होत आहे. कायमस्वरुपी आयुक्त असेल तर,

कर्मचारी सुध्दा चांगल्या प्रकारे कामे करतील अशी अपेक्षा आहे. म्हणून यापुढे येणाऱ्या आयुक्तांच्या संदर्भात कोणतेही कुणाचेही राजकारण होऊ नये, मा. मंत्री, मा. आमदार, मा. खासदार यांनी हस्तक्षेप करु नये. त्यांना कामे करु दयाची सर्व सदस्यांनी एकत्र येऊन कामे करुन घ्यावी अशी अपेक्षा आहे. ही बॉडी जोपर्यंत आयुक्त रहावे असा ठराव करुन शासनाकडे पाठवावा शक्यतो श्री बलदेवसिंग, श्री. भोगे साहेबांना बोलवावे सर्वांना मान्य आहे.

**श्री. जयवंत ओक :** शहराचा विकास व्हावा अशी सर्व सदस्यांची भावना आहे. हे शहर वेगळया पध्दतीचे असून, १०८ अनाधिकृत वसाहती या शहरात आहे. ६० झोपडपट्टी तसेच डी-नोटी फाईड येरिया आहे. या सभागृहात अनेक सदस्य अनाधिकृत वसाहतीमधून मिळून आलेले आहेत. १ वर्षामध्ये एकही विकास काम वार्डात झालेले नाही. या अगोदर अनाधिकृत वसाहतीमध्ये स्वेच्छानिधीतून कामे होत होती. ती बंद झालेली आहे. आयुक्त कुणीही असा शहराची विकास कामे झाली पाहिजे काही सदस्य बोलू शकत नाही. परंतू ही सर्वांचीच भावना आहे. येणारे आयुक्त २-३ वर्ष राहावेत असा ठराव पास करुन घ्यावा बदली होऊ नये अशी मागणी करावी. सभागृहात चर्चा होऊन वृत्तपत्रात छापले जाते. नगरसेवक बदनाम होत आहे. स्वेच्छानिधीची कामे बदं केली. स्वतः आयुक्त असे निर्णय घेतात. शेरे मारतात. या संबंधी शासनास कळविले पाहिजे. पुन्हा नगर सेवक चांगले नाही म्हणून लेखी तक्रारी केल्या जातात. हे योग्य नाही. स्वेच्छानिधी हा नगरसेवकांचा हक्काचा असवा वाटेल तेथे विकास कामे करण्यासाठी असतो जर काम करतांना काही गैर प्रकार झाल्यास त्याची चौकशी प्रशासन करु शकते. नागपूर सारखी परिस्थिती येथे झाली तर प्रशासन चौकशी करु शकते. सभागृहाची मान्यता राहील. श्री. गुट्टे साहेबांना ३ वर्षासाठी ठेवावे तसा ठराव घ्यावा शासनाकडे पाठवावा. महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्था आहे. निर्णय घेऊ शकते. ही जनतेची भावना असून जनतेची विकास कामे झाली नाही तर, जनता काय करील याबद्दल सुध्दा प्रशासनातर्फे शासनास कळवावे. स्वेच्छनिधीमधून सुशिक्षित बेरोजगारांना, प्रशिक्षण दयायचे होते ते सुध्दा? वर्षामध्ये कार्यवाही होऊ शकली नाही. जबाबदारीने काम करणार आयुक्त आणावे. जे कि सर्वांना घेऊन विकास कामे करण्यास सोपे पडेल. शासन आयुक्तांची नियुक्ती करत नसेल तर, जे प्रभारी आयुक्त आहे यानांच आयुक्त पदी नियुक्ती करावी तसा ठराव घ्यावा शासनाकडे पाठवावा. आपल्याला अशा प्रकारे निर्णय घेता येतो. ही स्थानिक स्वराज्य संस्था असून, जनतेच्या कामासाठी स. सदस्यांना निवडून दिले आहे. नसता सर्व ८८ सदस्यांनी मंत्रालयात जाऊन मोर्चा काढून आयुक्तांची मागणी करावी. जनतेची कामे करणारे आयुक्त आणावे. ३ वर्षे आयुक्तांनी राहावे.

**श्रीमती लिलावती घायतिलक :** विकास कामे व्हावीत म्हणून सर्वच सदस्यांची भावना आहे. माझ्या मनातले सांगितले. माझा वार्ड क्र. १२ मध्ये ८०% दलित, १५% मुस्लीम व ५% इतर समाजाचे गरीब लोक राहतात. दलित वस्ती आहे. म्हणून विकास कामावर भर दिलेला नाही. लक्ष दयायला तयार नाही असा मनोगंड निर्माण होतो. ज्या ज्या समस्या आहेत. त्या सोडवल्या नाहीत. या भागात महानगरपालिकेची शाळा असून, तेथे इयत्ता १ ते ४ पर्यंत मुले

शिक्षण घेतात. परंतू मुलांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. शाळेला संरक्षित भिंत नाही. लोक शाळेच्या बाजुलाच शौच्छालयास बसतात. सर्व अस्वच्छता दिसून येते. शाळेला वॉचमन नाही. उपआयुक्त यांनी सुध्दा शाळेला भेट दिलेली आहे. या संदर्भात मी बरेच वेळा तक्रार केली अदयाप वॉचमन दिलेले नाही. इतर बाजुच्याच शाळेमध्ये वॉचमन, सेवक, शिपाई देण्यात आलेले असून, फक्त याच शाळेत का असा पक्षपात होतो. जे की शाळेत दलितांची मुले जास्त शिकतात म्हणून कार्यवाही होत नाही असा निष्कर्ष निघतो. या शाळेत योग्य सुविधा नसल्याने मुलांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असून शाळेचा दर्जा खालावत असून, यात मनपाचा दर्जा सुध्दा कमी होत जाईल. शासन गरीब-दलित मुलांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने गरीब मुलांसाठी महानगरपालिकाच्या माध्यमातून योग्य ते प्रयत्न होतांना दिसून येत नाही. या वार्डात पाणी वेळेवर व मुब्लक दिले जात नाही. या संदर्भात मी तोंडी व लेखी तक्रार सुध्दा केली. परंतू लक्ष दिले जात नाही. लवकरात लवकर कार्यवाही करावी नसता. जनता पाणीपट्टी देणार नाही व मनपाचे यामुळे उत्पन्न घटेल याकडे प्रशासनाने लक्ष दयावे व वेळेवर व मुबलक पाणी देण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** : स. सदस्या श्रीमती घायतिलक यांनी त्यांचे वार्डात व शाळेतील समस्यांबाबत बऱ्याच वेळा प्रश्न उपस्थित केले तरी सभागृहात प्र. आयुक्त म्हणून बसलेले उपआयुक्त (म.) श्री. गुट्टे साहेब यांनी उदया सकाळी स. सदस्य यांचे वार्डात ८.३० वाजता पाहणी करावी. काय ज्या समस्या असतील त्या तात्काळ सोडण्यात याव्या.

**श्री. अंबादास दानवे :** १४ महिन्यामध्ये १३ आयुक्त येऊन गेले. या अगोदर युतीचे सरकार आता आघाडीचे सरकार असून, येथे आयुक्तांवर आरोप होतात. म्हणून कुणीही येण्यास तयार नाही. श्री. सलामी यांचे मंत्री, आमदार, खासदार नाहीत त्यांना माहिती नाही. आम्हास माहिती आहे. स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी हस्तक्षेप करतात. असे आरोप झाले. दुसरी बाब अशी की दुसरे शैक्षणिक वर्ष सुरु झाले. या मनपास १ वर्षापासून शिक्षणाधिकारी नाही या संदर्भात वारंवार चर्चा झाली. लेखी तोंडी मागणी झाली परंतू शासनाकडून अदयाप शिक्षणाधिकारी मिळालेले नाही मागे सुध्दा उपआयुक्त (म.) हे पद ४ महिने रिक्त होते. उपसंचालक नगररचना हे नाहीत आत आयुक्त कोणते येतील, कसे येतील त्या संबंधी देणे घेणे नाही. आपल्याला जनतेची कामे करणारे आयुक्त पाहिजे. १४ महिन्यात १३ आयुक्त बदलतात. यास आघाडी सरकारच जबाबदार आहे. निषेध केला पाहिजे. निषेध करणे योग्य असून, आम्ही सर्व नगरसेवक निषेध करत आहे. व निषेध केला म्हणून शासनाकडे तसे कळवावे.

**श्री. सुदाम सोनवणे :** १४ महिने नविन बॉडीला येऊन झाले तेव्हा पासून येणारे एकही आयुक्त या मनपामध्ये राहण्यास तयार नाही. तशा बातम्या वृत्तपत्रात येतात. आयुक्त हे नगरसेवका बरोबर राहतात व बदनामी स. सदस्यांनी करण्याची प्रयत्न होतो. हे बरोबर नाही. १४ महिन्यापुर्वी मोठया उत्साहाने नगरसेवक निवडून आले आता विकास कामे करु अशी अपेक्षा बाळगत इच्छेनुसार नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी मधील सुध्दा कामे झालेली नाही. आयुक्त कुणी आले तरी त्यांचे नियमात बसत नसेल ती कामे करत नाही. नगरसेवक ज्या

कामांना प्राधान्य देतात. ती कामे करण्यास आयुक्त तयार नसतात. असे असेल तर, विकास कामे कशी होणार महानगरपालिका म्हणजे चोरांची आळंती अशी चांगल्या वृत्तपत्रात बातमी आली आहे. अशा वेळी कार्यरत असणाऱ्या आयुक्तांचा सत्कार केला जातो. विकास कामे होत नाही म्हणून सदस्यांनी सभागृह विरोधात नेले. निकामे आहे म्हणून सांगण्यात आले. नगरसेवक त्रास देतात म्हणून आयुक्त येत नाही. असा समज निर्माण केला आहे. अशा आयुक्तांचा येथे सत्कार केला जातो. तत्कालीन आयुक्त यांनी मेगा प्रोजेक्टला ३ दिवसामध्ये मंजूरी दिली व स. सदस्यांची कामे मात्र होत नाही. मेगा प्रोजेक्ट मध्ये जवळपास ३०-३५ लक्ष रुपयाचा भ्रष्टाचार आल्याची शंका आहे. यात कोण कोण सहभागी आहे. याची चौकशी झाली पाहिजे घेणारे आयुक्त त्यांचे स्वतःच्या फायदयासाठी येत असतील व या शहराचा विकास न करता नगरसेवकांना बदनाम करण्याचा प्रयत्न जर आयुक्तांकडून होत असेल तर योग्य नाही या शहराचा विकास व सर्वांना सोबत घेऊन चालणार आयुक्त यावेत. सर्वांनी एकत्र येऊन कम केले तर जस्तीत जास्त विकास होऊ शकेल. कोणीही येवो. त्यांचे अभिनंदन स्वतःच्या विकास करायचा व जायचे असे होऊ नये.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे :** कोणतेही काम होण्यासाठी आता आयुक्त नाही असेल उत्तर अधिकाऱ्यांकडून मिळत आहे. जे आयुक्त होते त्यांनी कोणतेही काम वार्डात केलेले नाही. स्वेच्छा निधीतून सुध्दा कामे झालेली नाही. जो पर्यंत आयुक्त येत नाही तोर्यंत सर्वसाधारण सभा होऊ नये. येणारे आयुक्त ही बॉडी असे पर्यंत असावे असा ठराव पास करावा व विकास कामे करण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे. माझ्या वार्डात पिण्यास २ हंडे पाणी नाही. कार्यकारी अभियंता यांना सांगण्यात आले आहे. परंतू काम झाले नाही.

**श्री.तकीहसन खॉन :** शहरातील विकास कामे व्हावीत म्हणून सर्वांचीच भावना आहे. विकास करायचा असेल तर एकमेकांवर आरोप करणे योग्य नाही व तशी चर्चा करणे सुध्दा बरोबर नाही या सभागृहात सर्व सदस्य सुशिक्षीत आहे. पदाधिकारी तसेच आता प्रभाग समितीचे ४ सभापती सुध्दा आहेत. सर्वांनी एकत्र येऊन आयुक्तांची ताबडतोब मागणी करावी. जर या महानगरपालिकेस आयुक्त लवकर आले नाही तर, पुढील महिन्यात आचार संचिता लागेल व आयुक्त पदावर कुणी येणार नाही आणि कोणतीही विकास कामे होणार नाही. ज्यांनी आयुक्त पदावर चांगल्या प्रकारे काम केले. अशा २-४ आयुक्तांची नावे देऊन सरकारकडे मागणी करावी. इतर चर्चा न करता सर्वांनी एकत्र येऊन शहराचा विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

**सौ. साधना सुरडकर :** महानगरपालिका एक दिवस आयुक्त नसेल तर किती नुकसान होऊ शकते याचा विचार करणे गरजेचे आहे. आय. ए. एस. अधिकारी आयुक्त म्हणून देण्यास सांगावे. आपण सर्वजण मिळून मुंबईला जाऊन मंत्रालयात आयुक्तांची मागणी करु. आपल्या सोबत आम्ही सर्व महिला सदस्या येण्यास तयार आहोत.

**श्री. घोडेले नंदकुमार :** या महानगरपालिकेस ३ वर्षासाठी आयुक्त पाहिजे म्हणून ठराव पास करु परंतू त्या आयुक्तांनी सुध्दा त्यांचे मर्यादेत काम करावे अशी अट

ठेवावी. जे कुणी येण्यास तयार असतील त्यांना बोलवावे बरीच विकास कामे खुंटलेली आहेत.

**श्री. राधाकृष्ण गायकवाड :** हे ऐतिहासिक शहर असून, मराठवाडयाची राजधानी आहे. मुंबई, नागपूर, महानगरपालिका सारख्या बदनामी कारक बातम्या वृत्तपत्रात या महानगरपालिकेच्या झळकत आहे. वार्डात कोणतेही विकास काम किंवा तात्काळ समस्या उदभवल्यास त्या सोडविण्यासाठी कुणीही व्यक्ती फोन करुन विचारणा करु शकतो. परंतू कुणी अधिकारी / कर्मचारी जागेवर नसतात. या सभागृहाला सोबत घेऊन विचार पुर्वक काम करणारे सक्षम आयुक्तांची मागणी करावी. जनतेची कामे व्हावयास पाहिजे. स.स.श्री. घडामोडे यांनी निषेध केला. त्यांच्या भावना वेगळया होत्या. ही महानगरपालिका महराष्ट्रात वेगळया पध्दतीने गाजेत.

**श्री. कदीर मौलाना :** महानगरपालिकेस आयुक्त नाही. म्हणून चर्चा चालू आहे. विकास कामे करणारे आयुक्त पाहिजे अशी सर्वांनीच मत मांडले या संदर्भात शासनाचा निषेध सुध्दा केला परंतू आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, शासन महानगरपालिका चालवते व महानगरपालिका सभागृह चालवते हे विसरुन चालणार नाही. म्हणून शासनाचा निषेध करणे योग्य नाही. जे आयुक्त चांगल्या प्रकारे कामे करतात त्याचा सत्कार करणे योग्य आहे. काही वेळ आयुक्तांच्या नियमात न बसलेल्या कामासाठी दबाव आणून ते काम करुन घेतले जाते. ही पध्दत बंद करावी. या महानगरपालिकेमध्ये कुणीही राजकारण करु नये. शासनाने या शहराचा विकास व्हावा म्हणून निधी उपलब्ध करुन दिला म्हणून निषेध करणे बरोबर नाही. निषेध केला म्हणून त्या विरुध्द त्या लक्षाचा आम्ही सुध्दा निषेध करतो.

(याचवेळी सभागृहात स. सदस्य मोठमोठयाने घोषणा देतात काही ऐकू येत नाही.)

**श्री. काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिकेस आयुक्त नाही म्हणून चर्चा होत आहे. अत्यंत खेदाची बाब आहे. महापौर व आयुक्त हे एका रथाचे दोन चाके असतात. सभागृहात वेगवेगळया प्रकारे स. सदस्यांनी भावना व्यक्त केल्या कुणाचे काय मत आहे. यापेक्षा या ठिकाणी येणारा आयुक्त यांना टिकवणे महत्वाचे आहे. पर्यायाने हे काम महापौर तसेच सर्व सदस्यांचे आहे. शासन कोणत्या पक्षाचे आहे. शासनास बदनाम करणे योग्य होणार नाही. या ठिकाणी काही सदस्य शासना विरोधात चर्चा करत असून, तशी चर्चा इतर पक्षाच्या बाबतीत मत मांडण्याचा अधिकार आम्हाला सुध्दा आहे. आताच सांगितले गेले. आयुक्त येथे राहात नाही. म्हणून शासन त्यास जबाबदार होऊ शकते असे म्हणता येणार नाही शासन अधिकाऱ्यांच्या नियुक्त करतात. त्या अधिकाऱ्या बरोबर सर्वांनी सन्मानाने वागणुक देणे, त्यांचेकडून कामे करुन घेणे ही जबाबदारी स. सदस्यांची असते असे माझे ठाम मत आहे. आयुक्त भोगे या ठिकाणी होते त्याची बदली कुणी करावयास लावली हा सुध्दा महत्वाचा प्रश्न आहे. जे काम करत होते त्यांची बदली कोणत्या कारणाने केली त्यावेळी भाजप-सेना युतीचे सरकार होते. स्वेच्छानिधी संदर्भात शासनाने जो बदला केला त्यात आपण दुरुस्ती करुन तसा ठराव पारित करुन शासनाकडे पाठवून त्यास मंजूरी आणू शकतो जेणे करुन योग्य रितीने विकास कामे स्वेच्छानिधी मधून करता येतील. शासनाकडून तात्काळ

आयुक्त मिळत नसेल तर, आपण एक शिष्टमंडळ मा. मुख्यमंत्री यांना भेटून हा प्रश्न सोडवू शकतो. आपण या संबंधी स्वत: पुढाकार घ्यावा.

**श्री शेख ईसाक शे. जैनोद्दीन :** तत्कालीन आयुक्त यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी त्यांनी " आकाशातील तारे कुणी मोजू शकत नाही व आपण दिलेले प्रेम कुणी माझे कडून हिसकावून घेऊ शकत नाही" अशी शायरी करुन शासनाकडे येथील नगरसेवकाबद्दल खोटी तक्रार करुन बदली करुन घेतली व त्यांचा स्वभाव दाखवून दिला या महानगरपालिकेस आयुक्त मिळत नसेल तर येथील ज्येष्ठ अधिकारी यांना आयुक्त पदावर बसवावे. तसा ठरावच मंजूर करुन कार्यवाही आजच करावी. आपल्या महानगरपालिकेमध्ये क. लिपिक अधिकारी होत आहे.

**श्री. अफसर खॉन :** शहरातील विकास कामे ठप्प झालेली असून, आताच स. सदस्य यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याकडे वर्ग ३ कर्मचारी वर्ग-१ च्या पदावर येतात. म्हणून तात्काळ आयुक्त येत नसतील तर, उपआयुक्त यांना आयुक्त पद देण्याचा निर्णय घेण्यात यावा व तसे शासनास कळवावे असे माझे मत आहे. या सभागृहाने कितीतरी चुकीचे निर्णय या अगोदर घेऊन अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या झालेल्या आहे. वृत्तपत्रात वेगवेगळया प्रकारच्या बातम्या छापून येतात. म्हणून आयुक्तांच्या बदल्या संदर्भात महापौर किंवा सभागृह जबाबदार आहे. असे म्हणता येणार नाही. येणारे आयुक्त हे ही बॉडी जो पर्यंत आहे तो पर्यंत त्यांची नियुक्ती करावी. आम्हास घेवून चालणारे आयुक्त हवेत. ठोस निर्णय घ्यावा. जनतेची कामे करणारा आयुक्त असावा.

**श्री. शिरसाठ संजय :** आयुक्त तात्काळ यावे म्हणून सर्वांचीच खंत आहे. आपण सुध्दा महापौर या नात्याने खूप प्रयत्ने कलेले लवकारात लवकर आयुक्त बोलविण्याबाबत प्रयत्न व्हावे व या विषयावर चर्चा संपविण्यात यावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** ज्या अधिकाऱ्यांची आयुक्त म्हणून येथे बदली झाली ते सध्या मुंबईत आहेत ते येथे येण्यास नकार देतात यांचे कारण काय अशा परिस्थितीत आपण काय निर्णय घेणार.

**मा. महापोर** : शहराची विकास कामे करायची असेल तर, कमीत कमी ३ वर्ष कायम स्वरुपी आयुक्त असणे गरजेचे आहे. म्हणून आपण दोन निर्णय येथे घेत आहोत.

१. येणारे आयुक्त यांची या महानगरपालिकेत कमीत कमी ३ वर्ष आयुक्त म्हणून राहतील त्यांना सर्व सदस्यांकडून सन्मानाची वागणुक दिली जाईल व तसा ठराव शासनाकडे पाठविण्यात येईल.

२. सध्या आयुक्त नाही म्हणून सर्व पक्षीय सर्व पदाधिकारी एक शिष्टमंडळ मा. मुख्यमंत्री यांचे भेट घेऊन तात्काळ आयुक्त देण्याबाबत मागणी करुन येणारे आयुक्त ३ वर्ष या महानगरपालिकेत काम करतील असे मुख्यमंत्र्यांना विनंती करण्यात येईल. तात्काळ आयुक्त येतील अशी खात्री आहे. आपण केलेल्या सहाकार्याबद्दल धन्यवाद. आता दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**श्री. जयवंत ओक :** स्वेच्छानिधी वापरण्यासंदर्भात शासनाने जे नियम घालून दिले व त्यामुळे स्वेच्छानिधी वापरता येत नाही. सभागृहाने ठराव घेऊन वाहन चालक, संगणक प्रशिक्षण, व रुग्णांना मदत करत होते. यासाठी स्वेच्छा वापरण्याची

परवानगी दयावी म्हणून जाणारे शिष्ट मंडळानी मा. मुख्यमंत्री यांचेशी या बाबतीत चर्चा करावी व निर्णय दयावा म्हणून अशी सूचना मांडावी.

**मा. महापौर** : रुंग्णांना आर्थिक मदत तसेच गोरगरीब मुलांना प्रशिक्षण स्वेच्छानिधीतून देण्या संदर्भात शासनाच्या नियमावलीत आपण ठराव घेऊन समावेश केलेला असून, तसा प्रस्ताव शासन मंजूरीला असून, मागील आठवडयात मुंबईला सर्व महाराष्ट्रातील महापौरांची बैठक झाली. त्यावेळी सुध्दा मी हा प्रश्न समाविष्ट केलेला असून, यास मंजूरी घेण्यासाठी नगर विकास सचिव यांचेकडे संचिका पडून आहेत लवकरच यावर निर्णय होऊन मंजूरी मिळेल अशी अपेक्षा आहे.

**श्री. अंबादास दानवे :** मागील दोन सर्वसाधारण सभेत मेगा सिटी प्रोजेक्ट संदर्भात चर्चा झालेली होती व या संदर्भात सविस्तर प्रकरणे सर्वसाधारण सभेत ठेवावी म्हणून आदेशित केलेले प्लिंम कम्पलेशन व १ कोटी बँक गॅरंटी या विषयावर चर्चा झाली. प्लिंय कम्पलेशानचे प्रमाणपत्र बांधकाम झाल्यानंतर घेणे आवश्यक आहे. असे रुलींग आपण दिलेले होते. आतापर्यंत नगररचना विभागाने परवानगी दिल्यानंतर किती प्रकरणाचे कामाचे प्लिंय कम्लेशन प्रमाणपत्र दिले. मेगा सिटी प्रोजेक्ट २-३ वर्ष चालणार असून, सेल्फ डेव्हलपमेंटची कामे आहे. बँक गॅरंटी सुध्दा वाढवून घेतली पाहिजे. असा प्रश्न होतात. सेल्फ डेव्हलपमेंट मध्ये दोन परवानगी दिलेल्या आहेत. त्यातील गारखेडा येथील सर्वे नंबर ६१/१, ६१/२, व प्रतापनगर येथील सेर्वे नंबर १६३१६, १६३१६/१, १६३१८/२ या दोन बांधकाम धारकांनी यापुर्वी सुध्दा अशा योजना राबविल्या आहेत. करारात यांनी सर्व अटींचे उल्लघंन केलेले आहे. उदाहरण दयावयाचे झाल्यास ४ ते ४ १/२ मीटरचा रस्ता केला म्हणून नियमाचे पालन न केल्याने अशा बिल्डरांच्या परवानग्या रद्द कराव्या म्हणून इतिवृत्तात उल्लेख झालेला आहे व त्या परवानग्या रद्द कराव्यात. काहीचे बांधकाम रस्ते ३ मजल्या पर्यंत गेलेले आहे अशांनी प्लिथ कम्पलेशन प्रमाणपत्र घेतले काय? तसेच बँक गॅरंटी १ कोटी पेक्षा जास्त वाटवून घेतली काय याचा खुलासा करावा. सेल्फ डेव्हलपमेंटचे काम पूर्ण केले नाही तर, बँक गॅरंटी घेणे गरजेचे आहे. मेगा सीटी साठी दिलेल्या बांधकाम परवानगी संदर्भात खुलासा व्हावी.

**श्री. भगवान घडामोडे :** मेगा प्रोजेक्ट सिटी या प्रकल्पासून महानगरपालिकेत चांगले उत्पन्न मिळाले व मिळणार आहे. परंतू कार्यवाही प्रशासनाच्या माध्यमातून केली ती पध्दत चुकीची आहे. स. सदस्य यांनी वेळोवेळी २ बैठकी पासून ही बाब आपल्या निदर्शनास आणून दिली ज्या जमिनीचा एन.ऐ. झालेला नाही अशा ठिकाणी परवानगी दिली. खेदाची बाब असून, बँक गॅरंटी कुणाच्या आदेशानुसार घेतली कोणत्या नियमाने घेतली. कोणत्या नियमाने महानगरपालिका बँक गॅरंटी घेते, त्याचा फायदा कुणाला होतो. इतर नागरिकांना ६-६ महिने परवानगी देण्यात येत नाही. या प्रोजेक्टसाठी ३-३ दिवसात परवानगी दिली नियमाने दिल्या का? याची सुध्दा चोकशी व्हावी. या मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असून, काही संचिकेवर मा. आयुक्तांची सही नसतांना परवानगी दिलेली आहे. असे समजते. अशा प्रकरणाच्या सर्व संचिका व्यवस्थित हाताळून संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करुन महानगरपालिकेचे हित जोपासले पाहिजे. तसेच बँक गॅरंटी

देताना कोणते नियम वापरले कुणी अधिकार दिले. बँक गॅरंटी जास्त रक्कमेची घेतली असती तर, महानगरपालिकेचा फायदा झाला असता परंतू कमी रक्कमेची बँक गॅरंटी घेऊन बिल्डरांचा फायदा करण्याचा अधिकाऱ्यांचा इरादा आहे असे दिसून येते. मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार काय कार्यवाही केली खुलासा दयावा.

**श्री. अंबादास दानवे :** प्रताप बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स व इतर काही बिल्डरांनी नियम व अटीचे पालन केलेले नाही. त्यांना पुन्हा परवानगी कशी देण्यात आली. एखादया ठेकेदाराने काम व्यवस्थित केले नाही तर, काळया यादीत समाविष्ट करतो. त्याप्रमाणे कार्यवाही सर्वांवरच व्हावी.

**मा. महापौर** : शहराचा विकास होत असतांना मेगा सिटी प्रोजेक्ट केंद्र शासनाने सर्व देशात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जे ४० हजार चौरस फुटा पेक्षा जास्त बांधकाम करतील त्यांना सवलती देण्यात याव्यात असे शासनाने ठरविले आहे. हे करत असतांना जे नियम व अटी घालून दिलेल्या आहे त्या पाळण्याची गरज आहे. बँक गॅरंटी घेतली परंतू डिपॉजीट का घेण्यात आले नाही. डिपॉजीट घेतले असते तर तो पैसा विकास कामासाठी वापरण्यात आला असता. बँक गॅरंटी घ्यावयाची व डिपॉजिट घ्यायचे नाही हा धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेत ठेवावयास पाहिजे होता. परंतू तसा प्रस्ताव आलेला नाही व काही प्रकरणांत बँक गॅरंटी सुध्दा दिलेली नाही. कनिष्ठ / शाखा अभियंता यांचे मत आहे. परंतू बँक गॅरंटी नाही. यावर खुलासा करावा.

**उपसंचालक नगररचना :** जे मेगा सिटीचे जी प्रकरणे आहेत प्रत्येक प्रकरणात मा. आयुक्तांची मंजूरी घेतलेली आहे. महानगरपालिकेच्या प्रचालित धोरणानुसार बँक गॅरंटी आपण स्वीकारलेली आहे. जी व्यक्ती स्वतःहून विकासाची काम करतात. त्यांचे कडून बँक गॅरंटी घेणे जरुरीचे असते. जे स्वतःहून विकास करणार असल्याने अनामत रक्कम घेत नाही.

**मा. महापौर** : हे ठरविण्याचा अधिकार कुणाला आयुक्त की सभागृह की, नगररचना विभागास खुलासा दयावा.

**उपसंचालक नगररचना :** हे धोरण पुर्वीच सभागृहाने ठरविलेले आहे. त्यात बदल करायचा असेल तर, तशी कार्यवाही करता येऊ शकते. परंतू चालत आलेल्या प्रचलित पध्दतीनुसार नियमाने कार्यवाही केलेली आहे.

**श्री. अंबादास दानवे :** प्रताप बिल्डर्स व स्विंवसरा बिल्डर्स यांनी यापूर्वी केलेले कामात ज्या ठिकाणी ६ इंची पाईपलाईन टाकायच्या जेथे ४ इंची टाकल्या, रस्ते सुध्दा ७.५ मी. ऐवजी ४ १/२ मीटर केले. त्यांना खोटे प्रमाणपत्र त्यांना दिलेले आहे. पुर्वीचेच कामे केलेली नाहीत. पुन्हा त्यांना परवानगी दिलेली आहे.

**मा. महापौर** : ज्या बिल्डरांनी या अगोदर हमीपत्र देऊन काम करुन देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी काम व्यवस्थित केलेले नसतांना पुन्हा त्याच बिल्डरांना मंजूरी देण्यात आली आहे. हा महत्वाचा प्रश्न आहे. दुसरा मुद्दा असा की, बँक गॅरंटी व डिपॉजिट घ्यावयास पाहिजे व त्याबाबत सभागृहाच्या मान्यतेने कार्यवाही करावयास पाहिजे होती तसेच ज्या जमिनीचा एन.ए. झालेला नसतांना तेथे परवानगी देण्यात आलेली आहे. एखादयाला घर बांधणी करायचे असेल तर एन. ए. मंजूर केलेला असेल तर, परवानगी आपण देतो बिना एन.ए. झालेला नसतांना परवानगी देणे चुकीच आहे. तसेच मेगा

प्रोजेक्ट सिटी यामध्ये ज्यांना ज्यांना परवानगी दिली त्यांनी प्लिथ कम्पलेशन प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. बँक गॅरंटी सुध्दा वाढवून घ्यावी. याबाबतची योग्य चौकशी होणे गरजेचे असून, टेक्नीकल विभागाचे अधिकारी तसेच प्र. आयुक्त यांनी चौकशी करुन पुढील सर्वसाधारण सभेत तसा अहवाल सादर करावा.

**श्री स. अली मिरा सलामी :** जोपर्यंत चौकशी अहवाल येत नाही. तोपर्यंत तेथील कामास स्थगिती दयावी. ते काम बंद करावे. मा. आयुक्तांची दिशाभूल करुन या प्रकरणाच्या संचिका मंजूर करुन घेतलेल्या आहेत. ज्या बिल्डरांनी चुकीची कामे या अगोदर केलेली असेल नियमाचे पालन केलेले नसेल तर, त्यांना देण्यात आलेली परवानगी रद्द करावी.

**मा. महापौर** : ज्यांना परवानगी दिली ती नियमाने बरोबर नसेल तर अशा संचिका रद्द करणार आहेत. १ वर्षाच्या आता हा प्रकल्प कार्यान्वित झाला पाहिजे. असे शासनोच धोरण आहे. म्हणून आपणांस चालू काम बंद करता येणार नाही. चौकशी करुन कार्यवाही करता येईल. काम बंद केल्यास महानगरपालिकाचे नुकसान होईल.

**श्री स. अली मिरा सलामी :** शासनाने या प्रोजेक्टसाठी कोणतीही कालमर्यादा घातलेली नाही तसे असेल तर, त्यांची प्रत दाखवावी. शासनाचे तसे काहीही धोरण नाही चौकशी होईपर्यंत काम थांबवावे. ज्यांनी नियमाने या अगोदर कामे केलेली नसेल त्यांची परवानगी रद्द कराव्यात.

**श्री. अंबादास दानवे :** मेगा सिटी प्रोजेक्ट अंतर्गत ३१ मार्च पर्यंत परवानगी घेणे गरजेचे होते. येत्या ३१ मार्च २००२ पर्यंत काम पूर्ण करावे व पुढील ३१ मार्च पर्यंत घेणाऱ्यांना घरांचा ताबा दिला गेला पाहिजे तरच यात फायदा आहे. ज्यांनी नियमाने पालन केले नाही व आता या कामात पालन करणार नाही. अशांचे परवानगी रद्द करावी. चौकशी होऊन अहवाल सादर व्हावा.

**मा. महापौर** : महानगरपालिकेमध्ये टेक्नीकल विभागाने अधिकारी असून, टेक्नीकल विंग आहे. ते डायरेक्ट आयुक्तांच्या अधिपत्याखाली कामे करतात. या संबंधी प्र. आयुक्त तसेच टेक्नीकल विभागाचे अधिकारी यांनी चौकशी करुन तसा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा. ज्यांना परवानगी दिली त्यात काही अनियमितता वाढवून आल्यास त्यांचे परवानगी रद्द करावी.

**श्री. सुरजित सिंह खुंगर :** शहरातील होर्डींग्ज बाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन योग्य तो निर्णय व्हावा अशी अपेक्षा आहे. महानगरपालिकेस उत्पन्न मिळाले तरच महानगरपालिका विकास कामावर खर्च करु शकते. शहरातील होर्डींगपासून एका वर्षात फक्त २ लाख रुपयाचे उत्पन्न येत आहे. होर्डींग पासून उत्पन्न वाढावे या दृष्टीकोनातून तत्कालीन आयुक्त यांना ४.८.२००० ला एक पत्र देण्यात आले होते. या पत्रावर मा. आयुक्त यांनी रिमार्क दिला होता. परंतू दिनांक ४.८.२००० चे पत्र महानगरपालिकेतून गहाळ झालेले आहे. असे समजते. या पत्राचे उत्तर न मिळाल्यामुळे माहे नोव्हेंबर मध्ये माझ्याकडे असलेली दुसरी प्रत दिली असता त्याबाबत दिनांक १८.१२.२००० रोजी खुलासा करण्यात आला शहरात एकुण १५८२ होर्डींग असल्याची माहिती मिळाली. शहरातील होर्डींगची माहिती घेण्याच्या दृष्टीने व्ही. डी. ओ. रेकॉर्डींग करुन सर्वे करण्यात आलेला आहे या सर्वेनुसार शहरामध्ये अंदाजे ३ हाजर पेक्षा जास्त होर्डींग आहे. असे चित्र आपल्याला सर्वे करुन केलेल्या

कॅसेट रेकॉर्डीग केल्यानुसार दिसून येईल. मी जी कॅसेट रेकॉर्डीग केलेली आहे. ती आपल्याला एका जागेवर बसून पाहता येईल. (एक कॅसेट सभागृहात दाखवितात.) शहरातील लहान लहान व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांच्या विरोधात कुणीही नाही. परंतू महानगरपालिकेची परवानगी न घेता मंबई, नागपुर या ठिकाणच्या मोठमोठया व्यावसायकिदारांनी जे होर्डीग शहरात लावलेले आहे. त्यापासून महानगरपालिकेचे उत्पन्न बुडत आहे. होर्डीग पासून महानगरपालिकेचे उत्पन्न बुडत असल्याबाबतची बाब वेळोवेळी प्रशासनाच्या लक्षात आणून देण्यात आली तरीही याकडे कुणीही लक्ष दिले नाही. तत्कालीन आयुक्त श्री. जहागीरदार यांनी होर्डीगच्या माध्यमातून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्नही केला होता व तसा ठराव आहे. मार्चच्या बैठकीत आणण्यात येईल असे आश्वासान देण्यात आले होते. जून-२००१ चालू आहे. परंतू होर्डीग बाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे आलेला नाही. शहरातील होर्डीगच्या माध्यमातून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे याबाबत शासनाकडे मी एक पत्र दिले असता शहरातील जेवढया होर्डीग आहे. त्यांना जुन्या दराच्या तीन पट या प्रमाणे आकारणी करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढणार नसून त्यासाठी संपूर्ण शहरातील होर्डीग दर निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवून मंजूर करुन घ्यावा असे शासनाने महापालिका आयुक्तांना पत्र देऊन कळविलेले आहे व त्यानुसार कार्यवाही करण्याची निर्देश दिले आहे. सदर पत्र दिनांक ७ जुन २००१ रोजी महापालिका आयुक्तांकडे आलेले आहे. मुंबई, ठाणे, नागपूर या महापालिकांना होर्डीग पासून लाखो रुपयांचे उत्पन्न मिळते. त्याच प्रमाणे औरंगाबाद महापालिकेसही होर्डीग पासून लाखो रुपयांचे उत्पन्न होऊ शकते. औरंगाबाद महापालिकेचे बजेट १२०/१२१ कोटी फक्त कागदावर असते. परंतू प्रत्यक्षात त्या मानाने उत्पन्न मिळविण्याबाबत प्रयत्न हे कमीच होतात. प्रशासन सभागृहाची नेहमीच दिशाभूल करते. या विषयावर सभागृहात वारंवार चर्चा होऊन सुध्दा कार्यवाही होत नाही. म्हणून मी आणलेली कॅसेट आपण प्रत्यक्ष पाहणी त्यासाठी आवश्यक ती परवानगी देण्यात यावी. कॅसेट पाहिल्यानंतर सत्य परिस्थिती काय आहे हे आपणांस दिसून येईल.

**मा. महापौर** : शहरातील होर्डीग बाबतचे दर व नियम निश्चित करण्याबाबतचा निविदा काढण्यासाठी प्रस्ताव प्रशासनातर्फे पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**श्री. सुरजितसिंह खुंगर** : सन १९९१, १९९२, १९९३, १९९४ या काळात महापालिकेला होर्डीगच्या माध्यमातून किती उत्पन्न आले याचा खुलासा व्हावा. तसेच उत्पन्न कमी होते तर ते वाढविण्याबाबत संबंधित विभागाने काय प्रयत्न केले. याचा खुलासा व्हावा आणि यास जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचेवर कडक कार्यवाही व्हावायास पाहिजे.

**श्री. अंबादास दानवे** : स. सदस्य श्री. सुरजित सिंह खुंगर यांनी होर्डीगच्या माध्यमातून महानगरपालिकेने उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शासनाची मंजूरी मिळविण्याबाबत प्रयत्न केले आहे. याबाबत त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. एक महिन्यात आत होर्डीगच्या माध्यमातून जास्तीत जास्त उत्पन्न कसे येईल. या दृष्टीने आवश्यक प्रस्ताव प्रशासनामार्फत आणण्यात यावा. मुंबई महानगरपालिकेस ७० कोटी, पुणे महानगरपालिकेस होर्डीगच्या माध्यमातून

१३ कोटीचे उत्पन्न मिळते. आपला महापालिकेसही होर्डींग पासून जास्तीत जासत उत्पन्न मिळाले पाहिजे.

**मा. महापौर** : होर्डींग बाबत रेकॉर्डींग केलेली कॅसेट सर्वांना दाखविण्यात येईल. होर्डींग बाबतचा आवश्यक प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर करण्यात यावा.

(सभा १५ मिनिटांसाठी तहकुब करण्यात येण्याची घोषणा मा. महापौर यांनी केली. वेळ दुपारी २.०० वाजता सभेला सुरुवात दुपारी २.५५ वाजता.)

**विषय क्र. ४०८/१ :**

दिनांक १९.५.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**चर्चा :**

**श्री. सुदाम सोनवणे :** इतिवृत्तातील पान क्र. ५१ वर आर. एल. स्टील या भंगार मालवर जकात कमी आकारण्यात येत आहे. याबाबत चर्चा झालेली होती. सर्वसाधारण सभेची परवानगी न घेता जकात कमी कशी आकारण्यात येते याचा खुलासा मागविला होता. तरी खुलासा करावा.

**मा. महापौर** : जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** दिनांक १६.३.९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक २३५/प्रमाणे आर.एल.स्टील या भंगार मालावर २% ऐवजी ६० रुपये प्रति टन प्रमाणे जकात आकारण्यात यावी. म्हणून ठराव पास झालेला होता व त्यानुसार शासनाकडे सदर ठराव मंजूरीसाठी दिला त्यावेळी त्या पत्रात असे कळविले होते की, ५१ लक्ष रुपये उत्पन्न अपेक्षित असून, एकूण २ कोटी ७२ लाखाचे नुकसान होणार आहे. सदर प्रकरण शासनाकडे प्रलंबित असून, मंजूर केलेल्या ठराव नुसार संबंधित आर. एल. स्टील यांनी न्यायालयात दावा दाखल केलेला होता. त्यानुसार मा. न्यायालयाने दि. २४.४.२००१ रोजी संबंधिताच्या अर्जावर सुनावणी होऊन मनाई हुकुमाचा अर्ज मंजूर केलेला आहे. ६० रु. प्रति टनाने जकात आकारणी करावी कोटीचे आदेश आहेत. त्यानुसार जकात आकारणी होत आहे.

**श्री. अफसरखॉन :** न्यायालयाचे कसे आदेश दिले त्याची प्रत आम्हाला दाखवावी. आदेश कोणत्या तारखेचे आहे.

**जकात अधिक्षक :** त्याची प्रत सध्या माझ्याकडे नसून विधी सल्लागार यांचे विभागामार्फत जकात विभागामध्ये प्रत आलेली होती. दि. २४.४.२००१ चे कोर्टाचे आदेश असून, त्यानुसार संचिका सादर करुन मा. आयुक्त यांची मंजूरीने दि. ११.५.२००१ पासून रुपये६०/- प्रतिटन याप्रमाणे आर. एल. स्टील या भंगार मालावर जकात आकारणी होत आहे.

**मा. महापौर** : न्यायालयाचे आदेश काय आहेत. विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** आर.एल.स्टील या कंपनीने दिवानी दावा क्र. ४८१/२००० अन्वेय दावा दाखल केला असून, सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३५ दि. १६.३.९९ भंगार मालावर रु. ६०/- प्रतिटन जकात आकारणी करण्याबाबत पारित झालेल्या प्रमाणे जकात वसुली करावी म्हणून न्यायालयात विनंती केली होती. ६० रुपये प्रति टनप्रमाणे भंगारच्या मालावर जकात वसुली करावी. असा आदेश दि. २४.४.२००१ रोजी मा. न्यायालयाने दिलेल्या आहे व त्याची प्रत जकात

विभागास घेवून मा. आयुक्तांची मान्यता घेऊन जकात विभाग त्याप्रमाणे कार्यवाही करत आहे.

**श्री. अफसरखान :** या प्रकरणाच्या किती तारखा झालेल्या आहेत. आपले वकील प्रत्येक तारखेस उपस्थित होते का, प्रकरण कधी दाखल करण्यात आले तारखे सहित सर्व माहिती देण्यात यावी. न्यायालयाचे काय डायरेक्शन आहे. सर्व खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** सदरील प्रकरण १२.४.२००१ मध्ये दाखल झालेले होते, दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर दि. २४.४.२००१ रोजी मा. न्यायालयाने आदेश पारीत केलेले असून, त्यानुसार आता कार्यवाही होत आहे. या प्रकरणामध्ये आपणातर्फे श्री. बी. आर. पांडे नावाचे वकील लावण्यात आलेले होते. त्यांनी आपली बाजू मांडलेली आहे.

**श्री. अंबादास दानवे :** सर्वसाधारण सभेत एक ठराव पारित होऊन प्रकरण न्यायालयात गेले व त्यानुसार न्यालयाने वरील प्रमाणे निर्णय दिला व यामुळे मनपाचे उत्पन्न कमी झालेले आहे असे असेल तर, पुढील बैठकीत भंगार या मालावर २% प्रमाणेच जकात आकारण्यात यावी. तसा प्रस्ताव प्रशासनाच्या माध्यमातून आणावा. त्यास मंजूरी देऊन तसे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दयावे. हा सोपा उपाय होऊ शकतो.

**मा. महापौर** : भंगार या मालावर २% प्रमाणे जकात आकारणी करण्यासंदर्भात तसा प्रशासकीय प्रस्ताव पुढील बैठकीत प्रशासनामार्फत सादर करावा.

**श्री. स. अली मिरा स. सलामी :** इतिवृत्ततील पान क्र. ४३ वर ठराव क्र. ४०५/४ मध्ये संगणक व इच्छुक उमेदवारांना वाहन चालक प्रशिक्षण स्वेच्छा निधीतून प्रशिक्षण देण्यासंदर्भात तसा प्रस्ताव शासन मंजूरीसाठी पाठविण्यात येईल असे दिले. शासनाच्या मंजूरीची आवश्यकता नाही. ही अट रद्द करावी. नगरसेवकांचा स्वेच्छा निधी आहे, प्रशिक्षणासाठी खर्च करण्यास हरकत नसावी.

**मा. महापौर** : स्वेच्छानिधी कसा खर्च करावा तशी नियमावली शासनाकडून आपल्याकडे आलेली आहे. संगणक, वाहनचालक व प्रशिक्षणासाठी मदत देण्यासंबंधी याबाबत शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. मंजूरी घेऊ त्यानुसार कार्यवाही करु मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** स्वेच्छानिधी कसा वापरायचा याबाबत महाराष्ट्रातील सर्वच महानगरपालिकेस शासनाकडून मार्गदर्शक तत्वे प्राप्त झालेले आहेत. त्या नियमावलीच्या आधिन राहूनच कार्यवाही करावी लागेल त्यात बदल म्हणजे वाढ किंवा समावेश करायचे झाल्यास शासनाची् मंजूरी घेणे गरजेचे आहे.

**मा. महापौर** : सदरील प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा. मा. सचिव नगर विभाग यांचेसह व सर्व महापौर यांची बैठक झालेली होती. त्यावेळी हा मुद्दा आपण केलेल्या २-३ बाबी स्वेच्छा निधीतून करण्यास परवानगी लवकरच मिळेल.

**श्री. स. अली मिरा स. सलामी** : २-३ तासापुर्वी संगणक प्रशिक्षण स्वेच्छा निधीतून देऊ शकतात असा निर्णय शासनाकडून आलेला आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी. खुलासा घ्यावा. शासनाचा निर्णय आला की नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** शासनाकडून ज्या निर्णयाची प्रत आली ती फक्त स.स.श्री. तकीहसन खान यांचे प्रकरणा बद्दल आहे. या पत्रात संदर्भ देऊन उल्लेख केला की, दि. ३१.३.२००१ व ११.५.२००० ला पत्र पाठविले होते. स्वत: स. सदस्य

श्री. तकीहसन खान यांचे स्वेच्छा निधी वापरण्या संदर्भात त्यांनी कळविलेले आहे. या संगणक प्रशिक्षणासाठी फीस वगैरे घेऊन जे संचालक नेमणार त्याचा खर्च भागविणार असा ठराव होता. महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. असा तो ठराव होता. त्यास शासनाने मंजूरी दिली असून, जनरल संगणक प्रशिक्षणासाठी शासनाची मंजूरी नाही.

**श्री. स. अली मिरा स. सलामी :** नावानिशी प्रस्तावास मंजूरी झालेली नाही. माझा ही प्रस्ताव होता.

**मुख्यलेखाधिकारी :** स. सदस्य श्री. तकीहसन खान यांचे प्रस्तावानुसार जे पत्र दि. ३१.३.२००१ व ११.५.२००० ला पाठविले होते त्या पत्राचा संदर्भ देऊन शासनाकडून मंजूरी आलेली आहे.

**श्री. अंबादास दानवे :** स.स.श्री. तकीहसन खान यांचे अभिनंदन करावे. त्यांनी प्रस्ताव मंजूर करुन आणला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** स. सदस्य श्री. तकीहसन खान यांनी त्यांचा स्वतःचा स्वेच्छानिधी संगणक प्रशिक्षणासाठी वापरण्याबाबत ठराव करुन शासनाकडे गेल्यावर त्यांनी स्वतःच्या बाबत पाठपुरावा करुन यास मंजूरी आणली त्याबद्दल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन.

**श्री. स. अली मिरा स. सलामी :** आचारसंहितेच्या अगोदर संगणक प्रशिक्षण स्वेच्छा निधीतून देण्याबाबत प्रस्ताव मंजूर केलेला होता. त्यानंतर शासन नियमावली आलेली आहे त्या प्रस्तावा बरोबर माझ्या सुध्दा प्रस्ताव होता लांभार्थीवर माझा सुध्दा प्रस्ताव संगणक पशिक्षण स्वेच्छानिधीतून देण्याबबत मंजूर करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** स. सदस्य श्री. सलामी यांचे स्वेच्छानिधीतून संगणक प्रशिक्षण देण्या संदर्भात संचिकेवर कोणतेही आदेश शासनाकडे हा प्रस्ताव पाठविण्याबाबत नाही म्हणून त्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला नाही. स. स. श्री. तकीहसन खान यांचा इतर स. सदस्यांचा स्वेच्छा निधी मिळून ३ लक्ष ६७ हजार एकूण स्वेच्दा निधीचा परिपुर्ण असा प्रस्ताव होता व स. सदस्य श्री. सलामी यांचा फक्त २ लक्ष रु. निधी होता. उर्वरीत निधी पुढील वर्षाचा वापरण्यात यावा असे होते, पुढील वर्षाचा निधी वापरता येणार नाही म्हणून संचिकेवर तसे नमुद केले होते सदर संचिका मा. आयुक्तांकडे गेलया नंतर त्यांनी त्यांना आश्वासन दिले होते. परंतू संचिकेवर तसे काही निर्देश दिलेले नाही. म्हणून संचिका प्रलंबित आहे.

**मा. महापौर** : पुढील वर्षाचा निधी या वर्षी वापरता येत नाही. आपण परिपूर्ण प्रस्ताव ठेवावा व त्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**श्री. भगवान रगडे :** आम्ही काही सदस्य मिळून गट तयार केला व कॅबीन व इतर सुविधा द्याव्यात म्हणून मागील बैठकीत चर्चा केली होती इतिवृत्तात आले नाही.

**मा. महापौर** : तशी नोंद करण्यात येईल.

**श्री. भगवान रगडे :** कॅबीन देण्याच्या अगोदर ज्या पध्दतीने सभागृह चालते. त्याचप्रमाणे आपण कार्यवाही करावी सभागृहाचे नियम आहे. कुठलाही ठराव पास करावयाचा असेल तर, एक सूचक दोन अनूमोदक लागतात तेव्हाच ठराव सभागृहात घेतला जातो. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, ज्या पक्षाचे तीन नगरसेवक निवडून आले असतील त्यांना कॅबीन देण्यात यावा. कारण ते सभागृहाच्या नियमाला लागू आहे, नसता याचा विचार केला गेला नाहीतर कुणालाही कॅबीन देण्यात येऊ नये.

**श्री. घोडेले नंदकुमार :** इतिवृत्ततील पान क्र. ४४ वर ठराव क्र. ४०६/५ मध्ये नाल्यावरील पुलाच्या पुर्वेकडील व पश्चिमेकडील जागेवर विशेष बाब म्हणून इमारती बांधून उपक्रम कार्यान्वित करण्यासाठी प्रस्ताव मंजूरीसाठी सादर असे दिले आहे. त्याप्रमाणे ठरावात सुध्दा पुलाच्या पुर्वेकडील व पश्चिमेकडील जागेवर असा उल्लेख ठरावात सुध्दा व्हावा.

**मा. महापौर** : दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यात येते.

**सौ. साधना सुरडकर :** इतिवृत्तातील पान क्र. १५ च्या दरम्यान मी सुध्दा चर्चा केलेली होती. इतिवृत्तात चर्चा आलेली नाही.

**मा. महापौर** : एकाचवेळी अनेक सदस्य बोलतात त्यामुळे कोण काय बोलतो ते स्पष्ट ऐकु येत नाही तरी, यापूढे इतिवृत्तामध्ये सविस्तरपणे नोंद घेतली जाईल. विषय क्र. १ सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक १९/५/२००१ च्या इतिवृत्तातील ठराव क्र. ४०६/५ मध्ये कांचनवाडी येथील नाल्यावरील पुल या वाक्यानंतर पुर्वेकडील व पश्चिमेकडील जागेवर इमारती बांधून विशेष बाब म्हणून उपक्रम कार्यान्वित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वरील दुरुस्तीसह दिनांक १९/५/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. ४०९/२ :**

उपसंचालक, नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र. ६४ कोतवालपुरा भोईवाडा प्रभागात महानगरपालिकेची शाळा मिलकॉर्नर येथे छोटया जागेत आहे. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी तसेच प्रार्थनेसाठी जागा कमी आहे. त्यामुळे प्रार्थना शाळेच्या व्हरांडयात घेण्यात येते. शाळेतील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी जागा नाही. त्यामुळे त्याच प्रभागात शाळेसाठी जागा संपादन करुन शाळा विकसित करावे अशी विनंती वार्डाचे स. नगरसेविका सौ. चंद्रभागाबाई दाणे यांनी केली आहे.

मिल कॉर्नर येथे सध्या असलेल्या शाळेच्या वापरा संदर्भाने या शाळेसह लगतच्या क्षेत्राचा आरक्षण क्र. ९३ प्रा. शाळा करीता प्रारुप विकास योजनामध्ये निर्देश केला आहे. मात्र या ठिकाणी जवळपास १००% बांधकामे असल्याने सदरील आरक्षणाकरीता भूसंपादन करणे अडचणीचे असून, त्यास विलंबही लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता, प्राप्त परिस्थिती विचारात घेता या प्रभागातच या परिसरात जवळ असलेली रिकामी / खुली जागा जी आरक्षण क्र. ९४ प्राथमिक शाळा करीता आरक्षीत आहे. या आरक्षणाचे क्षेत्र २६९५ चौ. मी. असून, बाधित जमिनीचा न.भू.क्र. २८३३ आहे, नभूक्र वरील नोंदीनुसार सध्या जमिनी मालक म्हणून औरंगाबाद मील यांची नोंद आहे. सध्याचा या भागातील सिध्द शिघ्रगणकाद्वारे जमिनीचा दर रु. २०००/- प्रति चौ. मी. इतका असून, या भूसंपादना करीता अंदाजे रक्कम रु. ५३,९०,०००/- अपेक्षित आहे. भूसंपादनाकरीता अंदाजपत्रकात तरतुद रु. ६.२५ कोटी एवढी आहे. करीता, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर अंतिम विकास योजनातील आरक्षणाची स्थिती तपासून भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात येईल.

सबब प्रारुप विकास योजना (सुधारीत) मधील आरक्षण क्र. ९४ प्राथमिक शाळा करीता, आरक्षित असलेली जमीन भूसंपादन कायद्यातहत संपादन करण्यात व त्या करीता लागणऱ्या खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

**श्री. अंबादास दानवे :** कोतवालपुरा, भोईवाडा येथील महानगरपालिकेच्या शाळेसाठी जागा संपादनाचा प्रस्ताव आहे. या शाळेत किती विद्यार्थी आहेत, शाळेची प्रगती काय आहे. खुलासा घ्यावा. प्रस्ताव नियमाने सादर केला का? एकाच शाळेसाठी जवळापास ५४ लक्ष रुपये जमीन भूसंपादनसाठी खर्च करणे आवश्यक आहे काय?

**श्री. प्रशांत देसरडा :** ज्या मिलची जागा आहे. या अगोदर टेंडर काढण्यात आलेले होते त्या मिलने बँकेकडून फायनान्स केलेले आहे. अशी माहिती मिळाली प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. याची सविस्तर माहिती घेऊनच ही जागा संपादन करावी. प्रस्तावास विरोध नाही. पुढील काळात वाद निर्माण होऊन महानगरपालिकेचे नुकसान होऊ नये.

**श्री. सोनवणे सुदाम :** प्रस्तावात दिल्याप्रमाणे शाळेभोवती १००% बांधकाम झाले आहे. जी जागा संपादन करणार त्या ठिकाणी १००% बांधकाम झाले का याचा खुलासा करावा. जर जी जागा संपादन करायची तेथे बांधकामे झालेली असेल तर जागा संपादन करुन उपयोग नाही. तसेच न्यायालयीन प्रकरण आहे काय याची सुध्दा चौकशी करावी व त्या जागेवर आरक्षण नाही व नुसता प्रस्ताव ठेऊन कार्यवाही न झाल्यास नगरसेवक बदनाम होतील.

**श्री. पंडागळे रतनकुमार :** प्रशासनामार्फत प्रस्ताव सादर झालेला असून, सर्व बाबींचा पुर्तता करुनच आलेला असेल स. सदस्यांनी आताच सांगितल्याप्रमाणे चौकशी वगैरे करावी. परंतू चौकशी होत राहील प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी. सध्या कार्यरत असलेली शाळेत मुलांना बसण्यास जागा नाही.

**मा. महापौर** : संबंधित अधिकारी यांनी तेथे जागा रिकामी आहे का? अतिक्रमण झालेले आहे का? खुलासा करावा किंवा नविन काही इमारत बांधण्याचे प्रशासनाचे धोरण आहे काय?

**उपसंचालक नगररचना :** या भागात २ विकास योजनेचे प्रस्ताव असून, प्राथमिक शाळेसाठी आरक्षण क्रमांक ९३ व ९४ असे आहेत, आरक्षण क्र. ९३ मध्ये सध्या बरेच अतिक्रमण झालेले असल्याने ती जमीन भूसंपादन करणे अवघड आहे. परंतू आरक्षण क्र. ९४ ही औरंगाबाद मील च्या नावाने नोंद असलेली जागा आहे. ही जागा बहुतांशी खुली असून, प्राथमिक शाळेसाठी आरक्षण आहे. म्हणून ती जागा आपण संपादन करु शकतो. कोर्टाच्या प्रकरणांची माहिती नाही.

**श्री. अफसरखान :** भूसंपादनसाठी जो खर्च दाखविला त्या भागात एवढे वर आहे काय? खुलासा करावा.

**उपसंचालक नगररचना :** प्रस्तावात जी रक्कम दाखवली ती शासनाच्या नियमाने जे शिघ्रसिध्द गपळ असतो त्याचे दर घेतलेले आहे. हे सर्व संबंधित शासकीय कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतलेले आहे. हा शासनाचा दर आहे त्याप्रमाणे किंमत काढलेली आहे. जागेच्या दराबाबात जे पुस्तक संबंधित कार्यालयात आहे ते आणून प्रत्यक्ष दाखवले जाईल.

**श्री. शिरसाठ संजय :** नगररचना विभागामार्फत येणारे प्रस्ताव नेहमी अर्धवट असतात त्यामुळे सभागृहात खूप वेळ चर्चा होते व नगरसेवकामध्ये वादविवाद होतात व अधिकाऱ्यांना सुध्दा व्यवस्थित उत्तर देता येत नाही. माझ्या वार्डातील प्रवास आहे म्हणून विरोध होतो अशी संबंधित नगरसेवकांच्या मनात शंका येते. म्हणून येणारे प्रस्ताव योग्य सविस्तर माहितीसह यापुढे सादर व्हावयास पाहिजे व जे प्रस्ताव सर्व माहितीसह सादर झाल्यास कुणाचाही विरोध राहणार नाही.

**उपसंचालक नगररचना :** जागा संपादन करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली माहिती जमा केलेली आहे. जसे पी. आर. कार्ड हे मालकी हक्काबाबतचे कागदपत्र आहे.

**श्री. संजय शिरसाट :** आताच स. सदस्य यांनी सांगितले या जागेच्या संदर्भात न्यायालयात वाद चालू आहे. प्रस्तावात तसे दिले नाही. वाद चालू आहे काय? या बाबत आपले विधी सल्लागार यांचे कडून माहिति घेऊन पुढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव सभागृहापुढे सादर करावा.

**श्री. जयवंत ओक :** जागेचे पी. आर. कार्डे महानगरपालिकेच्या नावाने आहे काय? जागा कुणाची आहे. खुलासा द्यावा या जागेवर वाद असेल तर, तशी माहिती घेऊन सभागृहास सादर करावी.

**मा. महापौर** : आपण ठराव मंजूर करुन भूसंपादन अधिकारी यांचेकडे पाठविला जातो व ती जागा नियमाने, त्या संबंधीचे कागदपत्र बघून कार्यवाही होते व तसे महानगरपालिकेस कळविले जाते. जर जागेचा वाद असेल तर तसे आपल्याला कळविण्यात येते. वाद नसेल तर, ज्यावेळेस जागा आपल्या ताब्यात दिली जाईल त्यावेळेस आपण त्या जागेची रक्कम देणार.

**श्री. भगवान घडामोडे :** प्रस्ताव ठेवतांना डोळसपणे चौकशी करुन व सविस्तर माहितीसह प्रस्ताव ठेवावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आरक्षण क्र. ९३ मध्ये बहुतांशी सर्वच जागेवर बांधकामे झालेली आहे असे प्रस्तावात दिले आरक्षण क्र. ९४ सध्या या जागेवर बांधकामे नाही व शाळेसाठी जागा भूसंपादन करण्याचा तसा प्रस्ताव सादर झाला हा प्रस्ताव आताच मंजूर केला नाहीतर भविष्यात या जागेवर सुध्दा अतिक्रमण होऊन बांधकामे होतील म्हणून हा प्रस्ताव मंजूर करावा. न्यायालयात प्रकरण असेल त्याची कार्यवाही करता येईल. प्रस्ताव मंजूर करुन या. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा.

**उपसंचालक नगररचना :** सार्वजनिक क्षेत्रातील जागोचे भूसंपादन करायचे असेल व न्यायालयाचा वाद जरी चालू असेल तरी फायदयानुसार जागा भूसंपादन करता येते. वाद हा मालकी हक्क व क्षेत्राबाबतचाच असतो. न्यायालयाच्या निर्णयानुसार भूसंपादन केलेल्या जागेचा सुध्दा मालकी हक्क आपल्याला मिळू शकतो. भूसंपादनाची प्रक्रिया व त्यानुसार ताबा आपल्याला मिळू शकतो त्या दृष्टीने प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आरक्षण क्र. ९४ मध्ये झालेले अतिक्रमण काढता येत का? त्याबद्दल कार्यवाही करावी.

**श्री. गायकवाड राधाकृष्ण :** या प्रस्तावातील जागे संदर्भात कुणाचा काही वाद आहे काय? यासाठी एक जाहीर प्रगटन देण्यात यावे. त्यानुसार कार्यवाही करावी.

**मा. महापौर** : ठराव मंजूर झाल्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविला जाईल त्यानंतर भूसंपादन अधिकारी याबाबत नियमानुसार चौकशी करुन ज्योवेळी

ही जागा आपणास भूसंपादन करायची त्यावेळी सर्व नियमानुसारच कार्यवाही होणार आहे. म्हणून हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ६४ कोतवालपूरा येथील महानगरपालिकेची शाळा छोटया जागेत भरत असून, या ठिकाणी विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी तसेच प्रार्थनेसाठी कमी जागा असल्याने प्रारुप विकास योजना (सुधारीत) मधील प्राथमिक शाळेकरीता आरक्षित असलेली आरक्षण क्र. ९४ ची २६९५ चौ. मी. आरक्षण क्षेत्रातील न.भू.क्र. २८३३ (औरंगाबाद मील या नावाची नोंद असलेली) जागा या भागातील शिघ्रसिध्द गणक दराप्रमाणे म्हणजेच प्रति चौ. मी. रक्कम रु. २०००/- या दराने भूसंपादन कायद्यातहत व त्याकरीता लागणाऱ्या खर्चासह संपादन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१०/३ :**

गट क्र. ७२ सातारा येथील नियोजित कपील वास्तु सरकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालकीची जागा शैक्षणिक विभागातून वगळून निवासी विभगात समाविष्ट करण्यासाठी किरकोळ फेरबदलचा प्रस्ताव कार्यान्वित करणे बाबत शासनाच्या नगर विकास शासनाच्या नगर विकास विभागाचे निर्देश पत्र क्र. टिपीएस-३०१६/२२९/प्र.क्र. १८०/९८ नवि-९ दिनांक १५.१.१९९८ अन्वये महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. सदर प्रकरणांतर्गत जागा कपिल वास्तु सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेने १९८० साली विकत घेतली. तद्नंतर विकास योजनेमध्ये ही जागा शैक्षणिक विभागात अंतर्भुत करण्यात आली. या संस्थचे सदस्य माजी सैनिक स्वातंत्र्य सैनिक, मागासवर्गीय, कामगार वर्ग इत्यादी आहेत. संस्थेने सदर जागा शैक्षणिक विभागातून वगळून विकास योजनेत रहिवासी भागात दर्शविण्याबात शासनास विनंती केली. शासनाने संस्थेच्या विनंतीचा साकल्याने विचार करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणे बाबत दि. १५ जानेवारी १९९८ चे उक्त पत्रात स्पष्ट निर्देष दिले आहे. शासनाचे निर्देष विचारात घेता फेरबदलाची कार्यवाही सुरु करणे संयुक्तीक आहे. तरी संस्थेचा प्रस्ताव मान्य करुन शासन निर्देशानुसार कलम ३७ ची कार्यवाही सुरु करण्याचे विचारार्थ सादर प्रस्ताव मंजूर झाल्यावर कलम ३७ अन्वयेची फेरबदलाची कायदेशीर कार्यवाही करुन प्रस्ताव अंति मंजूरीसाठी शासनास सादर करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**चर्चा :**

**श्री. नंदकुमार घोडेले :** हा प्रस्ताव कोणत्या विभागामार्फत सादर झाला खुलासा करावा.

**उपसंचालक नगररचना :** सदर प्रस्ताव शासन निर्देशानुसार प्रशासनामार्फत ठेवण्यात आलेला आहे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** शैक्षिणिक वापरासाठी आरक्षण ठेवतांना कोणते निकष लावले जातात व कुठल्या निकषाद्वारे आपण शासनाकडे शिफारस करतो माहिती द्यावी.

**उपसंचालक नगररचना :** बहुदा तेथील भागातील शैक्षणिक संस्थेच्या मागणी वरुन ते आरक्षण शैक्षणिक मध्ये ठेवण्यात आले असावे. हे आरक्षण जुन्या डेव्हलपमेंट प्लॅन मधील आहे. विकास योजनेमध्ये शैक्षणिक वापरसाठी झोन मध्ये आरक्षण नसते. औरंगाबाद विकास योजनेमध्ये माझ्या माहिती प्रमाणे पहिल्यांदास शैक्षणिक वापरसाठी आरक्षण ठेवण्यात आलेले असावे शैक्षणिक

वापर हा निवास वापरामध्ये ठेवणे अनुज्ञेय आहे. परंतू शैक्षणिक वापरसाठीचा झोन इतर बाजूच्या शैक्षणिक संस्थेच्या मागणी नुसार ठेवण्यात आले असावे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** शैक्षणिक विभागातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यास शासनाने आपणाकडे पाठविले आहे. खुलासा होत नाही. आरक्षण ठेवतांना कोणते निकष लावतो व वगळण्यासाठी शिफारस करता येत का?

**उपसंचालक नगररचना :** शासनाचे निर्देश आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होत आहे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** शासनाचे निर्देष १५ जानेवारी १९९८ चे आहे. २ वर्षे पूर्ण होऊ गेले. आताच ही जागा शैक्षणिक झोन मधून वगळून निवासी झोन मध्ये करण्याची का गरज पडली.

**उपसंचालक नगररचना :** १५.१.१९९८ ला शासनाचे निर्देष असून, त्यांचे दालन केलेले नाही आणि यास २ वर्षे झाले माझ्या अगोदरच ही कार्यवाही व्हावयास पाहिजे होती ती केलेली नाही कार्यवाही का झाली नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही. या संदर्भात कपील वास्तू सहाकरी गृहनिर्माण संस्थेच्या काही लोकांनी पत्र देऊन कळविले की, शासनाचे आदेश असतांना कार्यवाही का होत नाही. म्हणून हा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** केवळ तेथील नागरिक सांगतील म्हणून जमिन शैक्षणिक झोन मधून वगळून निवास वापरसाठी समाविष्ट करणे बरोबर नाही. इतर ठिकाणावरचे नागरिकांच्या सांगण्यानुसार आरक्षण वगळणार काय?

**श्री. दानवे अंबादास :** शैक्षणिक क्षेत्रातून जागा वगळून निवासी क्षेत्रात घेण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला असून, मागील सर्वसाधारण सभेत असे प्रस्ताव ठेवतांना नगररचना विभागातर्फे एकूण जमिन किती, क्षेत्रफळ किती, जागा कोणत्या एरिया मध्ये आहे. याची सविस्तर माहिती प्रस्तावामध्ये देणे गरजेचे आहे. असे रुंलींग दिलेले आहे. तसा उल्लेख कुठेही प्रस्तावात केलेला दिसत नाही. तसेच प्रस्ताव ठेवतांना नगरसेवकांना विश्वासात घेऊन प्रस्ताव ठेवावा त्यामुळे नगरसेवक अडचणील येणार नाही. असे मत मांडले होते. परंतू तसे काही केलेले दिसत नाही. साडेतीन वर्षापूर्वी शासनाकडून आलेल्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव सादर झालेला आहे. प्रस्तावात नमुद केल्यानुसार कपील वास्तू सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या रहिवाशांची यादी मी आणलेली आहे. त्यात ६० सदस्यांपैकी दोनच माजी सैनिक असून, हयात नाही. स्वातंत्र्य सैनिक एकही नसतांना स्वातंत्र्य सैनिकांचा उल्लेख केलेला आहे. मागासवर्गीय फक्त ६० पैकी २० सदस्य (३३%) व कामगार सदस्यांपैकी १ सदस्य आहे. म्हणून हा प्रस्ताव चुकीचा वाटतो. या संस्थेच्या बाजूला १४ संख्या होत्या आता फक्त ग्रामोद्योग संस्था या संस्थेच्या बाजुला आहे. आताच संबंधित अधिकारी यांनी उल्लेख केला की, कुण्यातरी संस्थाच्या आग्राहाखातर शैक्षणिक झोन केला असावा. आता शैक्षणिक मधून वगळून निवास झोनमध्ये करायचे असल्यास पुन्हा त्या संस्थेचा आग्रह करायचा सुध्दा शोध घेणे गरजेचे आहे. १४ संस्थापैकी सर्व संस्था शैक्षणिक मधून निवासी झोनमध्ये झालेले आहे. फक्त कपील वास्तू सहकारी गृहनिर्माण संस्थेचे निवासी झोन झालेले नाही. आताच कोतवालपुरा येथील शाळेसाठी बाजूला जागा नसतांना दुसरीकडे जागा घेत

आहोत अशा पध्दतीची अडचण या भागात येऊ शकते. आता निवासी क्षेत्र केल्यास उदया शैक्षणिक क्षेत्र करण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. म्हणून हा प्रस्ताव पुढील सर्वसाधारण सभेत संपूर्ण माहितीसह ठेवावा.

**श्री. अफसरखान** : स. सदस्य श्री. दानवे यांनी या प्रस्तावासंबंधी सविस्तर खुलासा केला. प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने मांडण्यात आला. म्हणून सविस्तर माहितीसह प्रस्ताव पुढील बैठकीत मंजूरी साठी सादर करावा.

**मा. महापौर** : सभागृहाच्या भावना लक्षात घेता, सदर प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४११/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका, प्रशासकीय इमारत टप्पा क्र. ३ चे बांधकाम जवळ जवळ ६०% पेक्षा जास्त झालेले असून, उर्वरित काम प्रगती पथावर आहे. मुळ अंदाजपत्रकात काही बाबींचा समावेश करण्यात आला नव्हता परंतू ती कामे करणे गरजेचे असल्याने सदरील प्रकल्पाचे वास्तू विशारद यांचे कडून कुंपन भिंत, साईट डेव्हलपमेंट, इमारतिस पोच रस्ता व पार्किंगमध्ये फरशी ऐवजी कॉक्रेटिंग करणे इत्यादीसाठी सन १९९८-९९ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दराप्रमाणे रक्कम रुपये १७,८२,२००/- चे अतिरिक्त अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून, त्यानुसार त्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर कामाच्या मंजूरी प्रशासकीय रक्कमे रु. २९,४६,९०६/- ची बचत रक्कमेतून यापूर्वी रु. १०,१४,२७०/- चे अतिरिक्त बाबीस प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, उर्वरीत १९,३२,३३६/- मधून वाढीव कामासाठी म्हणजेच कुंपन भिंत परिसर सुधारणा इमारतीस पोच रस्ता व पार्कींगमध्ये फरशी ऐवजी कॉक्रेंटींग इत्यादीसाठी रुपये १७,८२,२००/- खर्च (अपेक्षित) प्रस्तावित आहे. ज्याचा तपशिल येणे प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | नविन अतिरिक्त बाब | रू. ४,१५,१६०/- अ |
| २ | मंजूरा अतिरिक्त बाब | रु. ६,०२,००५/- ब |
| ३ | रेग्युलर टेडंर बाब | रु. ७,६४,८१५/- क |
| | | **१७,८२,२००/-** |

उपरोक्त पैकी (क) चे काम हे रेग्युलर टेंडर बाबतचे आहे व ही कामे शेडयुल "ब" दराप्रमाणे करुन घेण्याचे प्रस्तावित असून, शिवाय हे काम मंजूर दरावर १०.८% कमी दराने करणे आहे. रेग्युलर टेंडरच्या अटी प्रमाणे भाववाढ फरक देयक लागू राहील रेग्युलर टेंडरच्या वाढीव बाबी तसेच अतिरिक्त बाबी मध्ये होणाऱ्या वाढीव बाबींसाठी नंतर सुध्दा बी-१ निविदाच्या कलम ३८ अन्वये संविधा प्रमाणे अपेक्षित कायदा गुत्तेदारास देय होणार नाही. या अटीवर वाढीव अतिरिक्त अदांजपत्रक रक्कम रुपये १७,८२,२००/- च्या प्रस्तावास मंजूरी देण्यास्तव प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**चर्चा :**

**श्री. शेख ईसाक शे. जैनाद्यीन :** प्रस्तावामध्ये " भाववाढ फरक देयक लागू राहील " असे दिले ते वगळण्यास यावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** प्रशासकीय इमारतीचे जास्तीचे काम करण्याबाबत नविन अंदाजपत्रक सादर झाले ज्यावेळी वास्तू उभी करायची त्यावेळी ती कशी करायची कोणकोणत्या बाबीची आवश्यकता आहे. याचा विचार करुनच पहिल्यांदा अंदाजपत्रक तयार करण्यात येते. वाढीव कामासाठी अंदाजपत्रकानुसार ५ ते ७% इतका बदल होऊ शकतो. परंतू यात जास्तीचे काम दाखवले अशी कोणती तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. सरंक्षीत भिंत बांधण्याचा सुध्दा उल्लेख प्रस्तावात दिलेला आहे. या संबंधी सविस्तर खुलासा करण्यात यावा. सुरुवातीस अंदाजपत्रक तयार केले त्यात या खर्चाचा समावेश का करण्यात आलेला नाही.

**अति शहर अभियंता :** इमारतीचे ६०% काम झाले असून, कुंपन भिंत, पोच रस्ता व पार्किंग मध्ये फरशी ऐवजी कॉक्रटिंग करणे इ. कामासाठी १७.८२ लक्षचे अदांजपत्रक तयार करण्यात आले व सदरचे काम १०.८% कमी दराने आहे. म्हणून रक्कम रु. १९.३२ लक्षची आपल्याकडे बचत होत आहे. त्या बचतीपेक्षा जास्त खर्च या कामास येत नाही जी बचत आहे. त्यातून हे काम करणे आपल्याला जरुरी आहे म्हणून हे काम मंजूर करण्यात यावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आताच संबंधित अधिकारी यांनी खुलासा केली की, सदरचे काम १०.८% कमी दराने असून, १९.३२ लक्ष बचत झालेली आहे व त्यातून हे काम करत आहोत. हे काम कोणत्या रक्कमेतून करायचे हा माझा प्रश्न नाही. सुरुवातीस जे अंदाजपत्रक केले. त्यात या कामाचा समावेश का केला नाही, आपल्याकडे जवळपास ४५% कमी दराने कमी दिली जातात. संजयनगर भागात ४० ते ३८% कमी दराने कामे दिली. एकाच टाईपचे काम वेगवेगळे अंदाजपत्रक होते हे बरोबर नाही. अशी सुध्दा कामे झालेली आहे. नविन टेंडर काढले तर, यापेक्षा सुध्दा बिलो मध्ये काम जाऊ शकते. एखादे ५० हजाराचे काम करायचे असेल तर, त्यास शॉर्ट नोटीस पाहिजे निविदा काढणे जरुरी आहे. असे दाखविले जाते आणि असे प्रस्ताव कसे येतात.

**अति शहर अभियंता :** सदरील काम एम. पी. डब्ल्यु मॅनुअल परिच्छेद १३४ प्रमाणे नियमानुसार बरोबर आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** हे काम कायदेशीर होत असेल तर, सभागृहात प्रस्ताव कशासाठी सादर केला. असा प्रश्न निर्माण होतो.

**मा. महापौर** : १७-८२ लाखाचे काम नियमात बसते का?

**श्री. काशिनाथ कोकाटे :** इमारतीचा पहिला टप्पा पूर्ण केला दुसरा केला. त्यावेळेस आता या पुढे काय काम करावे लागणार ते समजले नाही का? आर्कीटेक्ट कडून नकाशा घेतल्यानंतर प्रमाणपत्र दिल्यानंतर खर्च केल्यानंतर पुन्हा अतिरिक्त काम करायचे म्हणून प्रस्ताव येतो. हे धोरण चुकीचे आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** या अगोदर अशा प्रकारे ठराव पास करुन कामे झालेली आहेत काय याचा सुध्दा खुलासा करावा.

**मुख्यलेखापरिक्षक :** ऑडीटच्या दृष्टीने जो आक्षेप आहे तो आपल्यासमोर मांडण्यात येत आहे. अशा प्रकारची मोठया स्वरुपाची कामे या अगोदर रिवाईजड करुन मान्यता घेऊन करुन घेतलेली आहे. जी कामे बीलामध्ये जातात. त्या

कामाची बचत असते. ती पूर्ण बचत वापरण्याचा आपला कल असतो. बचत झाली म्हणून ती कामे करुनच घेतली पाहिजे असे काही बंधनकारक नसते. नुकतेच नागपुरच्या अधिकाऱ्यांनी ऑडीट केले त्यांनी नेहरुनगर येथे २० खाटाचा दवाखाना झाला त्याबद्दल ऑब्जेक्शन घेतलेले आहे की, १७ लक्षचे काम विना निविदा काढता त्याच ठेकेदाराला दिले व त्याचा फायदा केला. वाढीव कामांना स्वतंत्र टेंडर करुन मंजूरी घेऊन ते काम करावयास पाहिजे होते असे म्हटले आहे. यापूर्वी सुध्दा या कामात १०.१४ लक्षचे वाढीव काम झालेले आहे. म्हणजे आताचे १७.८२ लक्षचा विचार केल्यास जी पूर्ण बचत होते ती संपविण्याचा उद्देश यामागे आहे. असे दिसून येते. तत्कालीन मा. आयुक्तांनी या प्लॅनमध्ये काही ॲडीशलन नको म्हणून सांगितले तरी सुध्दा वाढीव कामाचे अंदाजपत्रक मंजूर करुन कामे केलेली आहे. कुंपन भिंत साईट डेव्हलपमेंट, पोचरस्ता व पार्कींगमध्ये फरशी ऐवजी कॉक्रेटींग करणे ही कामे मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट करावयास पाहिजे होती, या कामाचे स्वतंत्र टेंडर काढून कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. ती करण्यात आलेली नाही आणि अशा प्रकारे वेगळा प्रस्ताव सादर करुन ही कामे करणे बरोबर होणार नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** टप्पा क्र. ३ बद्दल प्रशासनाचे इमारत बांधण्याचा प्रस्ताव सादर झालेला आहे. या अगोदर मुळ अंदाजपत्रका व्यतिरिक्त रु. १०,१४,२७०/- च्या अतिरिक्त काम करण्याचे असल्याने मंजूरी घेवून काम केलेले आहे. मुळ निविदेमध्ये १०.८% कमी दराची निविदा प्राप्त झालेली होती. या महानगरपालिकेमध्ये तांत्रिक सल्लगार म्हणून श्री. वर्दे यांची आपण नियुक्ती केलेली होती. त्यांनी या इमारतीच्या बाबतीत सल्ला दिली की, ज्या आवश्यकत बाबी आहेत. त्या करणे गरजेचे आहे. यात अतिरिक्त बाब म्हणून फक्त ४,१५,१६०/- एवढाच खर्च आहे. यापुर्वी १० लक्ष १४ हजार अतिरिक्त काम करण्याचे असल्याने मंजूरी दिली. त्यामध्येच ६ लक्षची वाढ झालेली आहे. तांत्रिक सल्लागार आणि मुख्यलेखा परिक्षक यांच्या सल्यानुसार केलेली आहे. रेग्युलर टेंडर बाब ७.३४ लक्ष दाखवले आहे ते मुळ शेडयुल मध्ये ज्या बाबी दिलेल्या आहेत ते काही सुधारणा म्हणून प्रत्येक कामामध्येच वाढ होते व २५% पेक्षा जास्त रक्कम वाढ होत असेल तर, त्यास मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने हा प्रस्ताव आलेला आहे. आताच मुख्यलेखा परिक्षक यांनी सांगितले कुंपनभिंत व इतर कामे मुळ अंदाज पत्रकात समाविष्ट करावयास पाहिजे होते. परंतू या कामासाठी सुध्दा टेंडर काढून आयुक्त स्तरावर कार्यवाही झाली असती अतिरिक्त बाब म्हणून एम. पी. डब्ल्यू मॅनुअलचे परिच्छेद १३४ प्रमाणे हा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मा. आयुक्तांना फक्त १० लक्ष पर्यंतचे अधिकार आहे. व आयुक्तांच्या कक्षेत हा प्रस्ताव येत नाही. म्हणूनच सभागृहात मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला याची जाणीव सर्वांना आहे. वेळोवेळी वाढीव कामाचे प्रस्ताव ठेवून त्यास मंजूरी देणे बरोबर होणार नाही. कारण यामुळे ज्या वेळी टेंडर काढले जाते. त्यावेळी स्पर्धा होणार नाही. या अगोदर सुध्दा ३५-३५ लक्ष रुपयाचे वाढीव कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. आता ही पध्दत बंद करावी. तशा सूचना अधिकाऱ्यांना द्याव्यात असे माझे मत आहे.

**श्री. अंबादास दानवे :** मागच्या वेळी ऐववेळी हा प्रस्ताव घेण्यासाठी आला होता आपण तो विषयपत्रिकेवर घेण्यात यावे असे सुचविले होते.प्रशासकीय इमारतीचे काम रेंगाळले आहे. नियमात बसत असेल तर या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** सदर प्रस्तावाने प्रकल्प पूर्ण व्हावे. म्हणून माहिती देण्यात येत आहे. कॉन्ट्रक्टरची बाजू म्हणून नाही. मा. आयुक्तांना १० लाखापर्यंतचे अधिकार आहे. परंतू मुळ बोलण्याचा उद्देश असा की, या इमारतीचे मुळ अंदाजपत्रक १ कोटी ९६ लाखाचे होते. या रक्कमेवर १०% पर्यंत प्रशासकीय अधिकारानुसार वाढीव काम करुन घेता येते. यापेक्षा जास्त खर्च होत असेल तर, एम. पी. डब्ल्यु, चे परिच्छेद क्र. १३४ प्रमाणे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने हा प्रस्ताव सादर झालेला आहे. या अगोदर मौलाना अबुल कलाम संशोधन केंद्र, छत्रपती शिवाजी म्युझियम २० खाटी दवाखाना ई. कामे यापूर्वी केली आहे. यामागे उद्देश हाच की, दोन एजन्सी मध्ये भांडणे होऊ नये व कामास विलंब होऊ नये. ज्या एजन्सीला अगोदर काम दिले ते करण्यास तयार असेल व टेंडर काढून पुन्हा वादविवाद होऊ नये या दृष्टीकोनातून हा प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रशासकीय दृष्टीने मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी सुध्दा प्रस्तावित केलेले होते.

**अति शहर अभियंता :** एम. पी. डब्ल्यू. परिच्छेत १३४ प्रमाणे देय आहे व कामाची गरज आहे.

**मा. महापौर** : आपल्या महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे काम प्रगती पथावर चालू आहे. महानगरपालिकेतील अधिकारी / पदाधिकारी काही गट नेते यांना कॅबीन पाहिजे व तशी मागणी सुध्दा आहे. अति. शहर अभियंता व मुख्यलेखाधिकारी यांनी सांगितल्यानुसार हे काम करण्याची गरज असून, नियमानुसार आहे म्हणून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे अतिरिक्त कामाचे अंदाजपत्रक रु. १७,८२,२००/- च्या कामात सर्वानूमते मंजूरी देण्यात येते. तसेच सदरचे काम मंजूर निविदा धारकांकडून प्रस्तावित केल्याप्रमाणे १०.८ टक्के कमी दराने व नियमित निविदेच्या अटीप्रमाणे भाववाढ फरक देयक लागू राहील व वाढीव बाबीसाठी बी-१ निविदाच्या कलम ३८ अन्वये संविदेप्रमाणे अपेक्षित फायदा गुत्तेदारास देय होणार नाही या अटीवर सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१२/५ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांची मंजूरी नूसार प्रस्ताव सादर केला आहे की, पिरबाजार आठवडी बाजार पूर्णपणे भाजीवालीबाई चौक ते मुथीयान कॉर्नर रोड वर भरत असल्यामुळे तेथील नागरिकांना आठवडी बाजाराच्या रोजी जाण्या येण्यासाठी त्रास होत असल्यामुळे सदर आठवडी बाजार वेदांन्त हॉटेल रोड ते आनंद गाडे-चौक या रोडवर स्थलांतर करणे बाबत सदर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**चर्चा :**

**श्री. विकास जैन :** कुणाच्या तक्रारी वरुन हा बाजार स्थलांतर करीत आहोत. संबंधित प्रभागाचे नगरसेवकांना विश्वासात घेतले का?

**मा. महापौर** : सध्या भरत असलेला बाजार या भागातील काही नागरिकांच्या तक्रारी होत्या ४-५ वेळा नागरिकांचे डेलीगेशन माझ्याकडे आले होते, नगरसेवकांनी सुध्दा सूचना केलेल्या होत्या व त्यानुसार मी स्वत: व नगररचना विभाग, अति. शहर अभियंता व इतर संबंधित अधिकारी यांचे समवेत पाहणी केली म्हणून हा प्रस्ताव या सभागृहात सादर केलेला आहे.

**श्री. विकास जैन :** पीर बाजार येथील नागरिकांना त्रास होतो त्यांचा विचार केला तर, तेथील नागरिकांना सुध्दा त्रास होईल याचा का विचार केला नाही संबंधित वार्डाचे नगरसेवक यांना विश्वासात घेतले काय? खुलासा दयावा

**मा. महापौर** : सध्या भरत असलेला बाजार जागा लहन असून, कोणतीही सुविधा आपण देऊ शकत नाही. या प्रस्तावात कुणी विरोध करणे बरोबर होणार नाही. प्रस्तावित ठिकाणी रस्ता मोठा आहे. विक्रेत्यांना ओटे करुन देऊ शकतो तशी चर्चा स. स. निकाळजे यांचेबरोबर मी केलेली आहे व स्वच्छता राहील. कुणासही त्रास होणार नाही व या रस्त्यावर फक्त सरकारी कार्यालय आहे. त्यामुळे जास्त रहदारी सुध्दा नाही.

**श्री. विकास जैन :** हा किती फुटाचा रस्ता आहे.

**उपअभियंता (नगररचना) :** वेदांत हॉटेल ते पीरबाजार हा ८० फुट (२४मी.) रुंद रस्ता आहे.

**श्री. विकास जैन :** टपरी कमीटी स्थापन झाली त्यावेळी असा निर्णय घेण्यात आला की, ८० ते १०० फुट रुंद रस्त्यावर कोणतेही अतिक्रमण किंवा टपऱ्या होऊ नये. मागील सर्वसाधारण सभेने सुध्दा तसा निर्णय घेतलेला आहे.

**श्री. अंबादास दानवे :** जेथे बाजार स्थलांतर करायचा तेथील आजूबाजूच्या जनतेचे मत घ्यावे लागेल असा प्रस्ताव घेऊन योग्य होणार नाही.

**श्री. राधाकृष्ण गायकवाड :** पीरबाजार येथील जनतेला त्रास होतो म्हणून प्रस्ताव आणला परंतू शहागंज भागात सुध्दा रस्त्यावर दुकानासमोर खूप हातगाडया उभ्या असतात. रस्त्यावर घाण पडलेली असते. पायी चालता येत नाही. तक्रार केली परंतू अदयाप काहीही कार्यवाही नाही. तेथील सुध्दा टपऱ्या, गाडया काढाणार का?

**मा. महापौर** : या विषयावर बोलावे. शहागंज भागात सुध्दा आपण केलेल्या सुचनेनुसार पाहणी करुन कार्यवाही करता येईल.

**श्री. राधाकृष्ण गायकवाड :** शहागंज भागातील व्यापाऱ्यांनी तक्रारी देऊन दुकान समोरील रस्त्यावर उभ्या असलेल्या गाडया हटविण्यात याव्यात म्हणून तक्रारी केलेल्या आहे. अदयाप काहीही कार्यवाही केली नाही. संबंधित अधिकाऱ्यांना तसे आदेश देवून त्वरीत गाडया रस्त्यावर उभ्या राहणार नाही याची दक्षता घ्यावयास लावावी.

**मा. महापौर** : आपला विषय वेगळा आहे. तेथे पाहणी करण्यासाठी आपण वेळ निश्चित करावी व संबंधित विभागाचे अधिकारी यांना बरोबर घेऊन जाऊन प्रत्यक्ष त्यांच्या नजरेस आणून दयावे तशी कार्यवाही संबंधित अधिकारी करतील.

**श्री. विकास जैन :** हा डी. पी. रोड भविष्यात स.स.श्री. निकाळजे यांच्या वार्डातून पुढे जाणार व या रस्त्यावर रहदारी सुध्दा आहे. या रस्त्यावर ३-४ शैक्षणिक

महाविद्यालये आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अडचण होणार आहे व तेथील नागरिकांना सुध्दा त्रास होईल व कुणालाही विश्वासात न घेता प्रस्ताव कसा ठेवला. नगरसेवकांना विश्वासात घेतलेले नाही.

**सौ. विजया रहाटकर :** पीर बाजार येथील सध्या भरत असलेल्या बाजारामुळे नागरिकांना जाण्यायेण्यास त्रास होतो. रस्ता अरुंद व सुविधा देणे शक्य नव्हते म्हणून हा बाजार स्थलांतर करत आहोत याची जाणीव ठेवून हा प्रस्ताव मंजूर करणे गरजेचे आहे.

**श्री. विकास जैन :** कुठेतरी जागा भूसंपादन करुन हा बाजार स्थलांतरी करावा. मागे सुध्दा घुलाचे काम चालू होते. तेथील टपऱ्या माझ्या वार्डात स्थलांतरीत केल्या. काम झाल्या नंतर पुन्हा या टपऱ्या काढण्यात येतील असे आश्वासन तत्कालीन आयुक्त यांनी दिले होते. अदयाप त्या टपऱ्या जशाच्या तशा आहेत. माझा वार्ड केवळ स्थलांतर करीता नाही.

**श्री. भगवान घडामोडे :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हा बाजार तात्पुरता स्थलांतर करावा. स. सदस्या सौ. रहाटकर, श्री. जैन यांचे मत बरोबर आहे. दोन्ही स. सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्यात व भविष्यात येथे बाजार भरण्यासाठी जागा मिळेल तेथे हा बाजार स्थलांतरीत करावा. तात्पुरती तशी मान्यता देण्यात यावी.

**श्री. विकास जैन :** हा विषय मंजूर करु नये. माझा यास विरोध आहे. चाणक्यपुरी येथे बाजार भरावा. (याच वेळी सभागृहात स. सभासद मोठमोठयाने बोलातात.)

**मा. महापौर** : प्रस्तावानुसार तात्पुरते स्थलांतर करण्यात यावे. चाणक्य पुरी येथे मोठा रस्ता आहे. तेथे बाजार स्थलांतर करणे सोयीचे होईल. पीर बाजार कुठे असावा या संदर्भात स. सदस्य श्री. माणिक साळवे, श्री. प्रकाश निकाळजे, सौ. विजया रहाटकर, श्री. विकास जैन व स.स.श्री. प्रशांत देसरडा (सभापती) यांनी येथे बाजार भरणे योग्य आहे. किंवा काय व इतर सर्व पाहणी करुन जागा घोषित करावी व तसा अहवाल ८ (आठ) दिवसात सादर करावा. या प्रस्तावाबाबत अहवालानंतर निर्णय घेतला जाईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पीरबाजार येथील आठवडी बाजार स्थलांतरीत करण्याबाबत व पीरबाजार येथील आठवडीबाजार कोठे असावा किंवा या ठिकाणी बाजार भरणे योग्य आहे किंवा काय या व इतर सर्व बाबींची पाहणी करुन जागा घोषित करण्याबाबत स. सदस्य श्री. माणिक साळवे, श्री. प्रकाश निकाळजे, सौ. विजया रहाटकर, श्री. विकास जैन, स्थायी समिती सभापती, श्री. प्रशांत देसरडा यांनी वरील बाबी बाबत पाहणी करुन आठ दिवसांच्या आजा आपला अहवाल दाखल करावा. त्यानंतर या प्रकरणी निर्णय घेतला जाईल असे सर्वानुमते ठरले. प्रस्तावानुसार तात्पुरते स्थलांतरास मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ४१३/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन आदेश क्र. डी. पी.टी. ११/२००१/प्र.क्र.१२६/ई-१ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १८.४.२००१ नुसार श्री. बी. एन. गुट्टे निवासी उप जिल्हाधिकरी, परभणी यांची उप-आयुक्त, औरंगाबाद

महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नेमणुक करण्यास आली आहे.

करीता श्री. बी. एन. गुट्टे यांची रुजू झाल्याचे तारखेपासून म्हणजे दिनांक २७ एप्रिल २००१ रोजी मध्यान्हानंतर उप-आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या पदावर एक वर्षासाठी प्रतिनयुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री. नंदकुमार घोडेले :** उप-आयुक्त-१ श्री. गुट्टे साहेब यांना १ वर्षे ऐवजी २ वर्षासाठी त्यांची प्रतिनियुक्ती करण्यास मान्यता दयावी.

**मा. महापौर** : उपआयुक्त पदावर रुजू झालेले श्री. गुट्टे साहेब यांची १ वर्ष ऐवजी २ वर्षासाठी या महानगरपालिकेमध्ये रुजू झाल्याच्या तारखेपासून प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन आदेश क्र. डी. पी. टी. ११/२००१/प्र.क्र.१२६/ई-१ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १८.४.२००१ नुसार औरंगाबाद महानगरपालिका उपआयुक्त पदावर दि. २७ एप्रिल २००१ रोजी रुजू झालेले परभणी येथील निवासी उपजिल्हाधिकारी श्री. बी. एन. गुट्टे यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या उपआयुक्त पदावर १ वर्षाऐवजी २ वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नुसार प्रतिनियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१४/७ :**

औरंगाबाद मध्यवर्ती बसस्थानक समोरिल न.भु.क्र. २०६६६,२८३३ व २८३४ असेलेली जमीन प्रारुप विकास योजनामध्ये आरक्षण ९०,९१ व ९२ ने एससीपी दुकान केंद्र व वाहन तळाकरिता आरक्षीत आहे. सदरील विकास योजनास शासनाने मंजुरी दिली असुन विकास योजना मंजुरीची अधिसुचना प्रसिध्द झालेली आहे.

औरंगाबाद शहर व परिसराच्या नजीकच्या काळातील वाढत्या औद्योगिकरणामुळे शहरातील नागरिकांचे दळणवळणाचे साधनात व इतर शहराचे संपर्काकरीता वाहनास झालेल्या लक्षणीय वाढीमुळे तसेच शासनाने मुक्त धोरण, कर्जाची सहज उपलब्धता इत्यादीमुळे खाजगी वाहतुकीची बरीच वाहने उपलब्ध झाल्याने मध्यवर्ती बसस्थानक परिसरात नहेमीच दिवसभर वाहनाची वर्दळ असते व बऱ्याच वेळा वाहनाची कोंडी होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होता. यामुध्ये या वाहनाचे पार्किंग हा एक महत्वाचा प्रश्न असुन यावाहनाचे पार्किंग हा एक महत्वाचा प्रश्न असुन ती एक गंभीर समस्या झालेली आहे. यासोबतच भागांचे वाढते व्यावसायीक महत्व बाहेरुन येणारे प्रवासी इ. सहवर नमुद पार्किंग समस्या सोडविण्याकरिता पुरेशी पार्किंग व्यवस्था करण्याचे दृष्टीने सदरील तिन्ही आरक्षणांचा विकास करणे आवश्यक वाटत असल्याने या आरक्षणांचा विकास करणे आवश्यक वाटत असल्याने या आरक्षणाने बाधित होत असलेल्या न.भु.क्र.२०६६,२८३४,२८३३ चे क्षेत्र भुसंपादन कायद्यातहत रितसर भुसंपादन कार्यावाहीस लागणाऱ्या खर्चासाठी लागणाऱ्या खर्चासही मान्यता व्हावी. उपरोक्त तीनही आरक्षण खालील एकुण जमीन क्षेत्र अंदाजे १.१९ हेक्टर ऐवढे असुन, १९९५ चे

प्रारुप विकास योजना अहवालानुसार या क्षेत्र संपादनाकरीता अंदाजीत खर्च रक्कम रु. २०७.० लक्ष अपेक्षित आहे.

या आरक्षण विकासामुळे या भागात पार्किंग सुविधा उपलब्ध होऊन वाढत्या व्यावसायिक महत्वाचा (Commercial Potntial) फायदा होऊन विकसित होणाऱ्या दुकानाकेंद्रामुळे महानगरपालिकास कायमस्वरुपी आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध होईल.

करिता वर नमुद भुसंपादनाचा प्रस्ताव भुसंपादनास लागणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर प्रस्ताव मान्यतेनंतर भुसंपादन कार्यवाही साठी प्रकरण या जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येईल.

**संवाद**

**श्री. सुदाम सोनवणे :** आरक्षण क्र. ९०,९१ व ० मधील जागा ही विकास योजना आरक्षणांमध्ये वाहनातळाकरिता आरक्षीत असुन हा महत्त्वपुर्ण ठराव आहे. सध्या बस स्थानकासमोर व रस्त्यावर वाहनाची खुपच वर्दळ असुन या प्रस्तावानुसार एकुण जमीन ३ एकर जमीन भुसंपादन करुन त्यासाठी २.०७ कोटी रुपये खर्च येणार असे दाखवले व बांधकाम करण्यासाठी ३ ते ४ कोटी रुपये लागणार आहे. खर्चाचा तपशील देण्यात आलेला नसुन किती खर्च येणार खर्च प्रमाणकानुसार महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल का? दुकान व पार्किंग कोणत्या पध्दतीने काढणार यांची माहिती देण्यात आलेली नाही. मोठे व्यावसायीक धारक काही प्रमाणात सवलतीवर व्यापारी संकुलन बाधुन देण्यास तयार असेल तर महानगरपालिकेला फायदा होइल या प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी असे माझे मत आहे.

**श्री. नंदकुमार घोडेले** : जागा भुसंपादनासाठी ६.२५ कोटी रक्कम बजेट मध्ये ठेवलेली आहे. त्याचा विचार करता बजेट दरवर्षी ३० ते ३५% कमी करण्यात येते. बजेटनुसार वसुली कमी आल्यास भुसंपादनाची रक्कम सुध्दा कमी हाऊ शकते. यावर विचार व्हावा व मुख्यलेखाधिकारी यांचा या ठराव बद्दल अभिप्राय घ्यावा.

**मा. महापौर :** आपण जागा भंसपादनासाठी ६.२५ कोटी रक्कम बजेट गर्भने ठेवलेली आहे. हा प्रस्ताव मंजुर केल्यानंतर सुध्दा ३.४ वर्षाची कार्यवाही होते याची कल्पना आपणास आहे म्हणुन आपण सर्वाच्या एकमताने निर्णय घेवुन याची रक्कम नंतर द्यावी लागणार आहे तपुर्वी उपसंचालक नगर रचना या संबंधी माहिती देतील.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** एकदम रक्कम दिली जाणार नाही म्हणुन टप्प्या टप्प्याने रक्कम अदा करण्यात येईल या अटीवर ठराव मंजुर करावा.

**उपसंचालक नगररचना :** नुकत्याच मंजुर झालेल्या औरंगाबाद विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र. ९०,९१ व ९२ एससीपी दुकान केंद्र व वाहन तळाकरिता आरक्षित आहे. प्रस्ताव महानगरपालिकेच्या फायदयाचे व वाहनतळ व दुकान केंद्र उभारण्याबाबतचे आहे. आज जागा संपादन न केल्यास दिवसेंदिवस याचा खर्च वाढतच जाणार आहे. तात्काळ भुसंपादनाबाबत निर्णय घेतल्यास महानगरपालिकेच्या हिताचे ठरेल. या जागेच्या बाजुला मोठा रस्ता असुन वणिज्य वापरासाठी योग्य अशी जागा आहे. खालच्या मजला(अंडर ग्रांऊड) मध्ये पार्किंग तसेच पहिला मजला सर्व दुकाने करुन दुकाने विक्री करतांना संबंधीताकडुन डिपॉसिट घेऊन आपण केलेला खर्च सर्व वसुल होऊ शकतो

सध्या या जागेला फार महत्व असुन पार्किंगसाठी कमतरता पडणार नाही त्यातुन सुध्दा महानगरपालिकेस मोठया प्रमाणात रक्कम येऊ शकते भुसंपादनाची रक्कम आताच भरणे गरजेचे नाही जेव्हा निवाडा तयार होतो त्यावेळी दयावे लागतात. यावर्षीच्या बजेट व पुढील वर्षीची काही बजेट यामधुन आपण तरतुद केली तर तीनही जागा आपल्या ताब्यात येतील. या जागेची मालकी औरंगाबाद मिलची असुन जागा भुसंपादनास काही अडचण येणार नाही.

**श्री. सुदाम सोनवणे :** बोल्ट पध्दतीने केल्यास आपणांस काही फायदा होईल काय?

**उप संचालक नगररचना :** बोल्ट पध्दतीने करता येईल. भुसंपादनावर झालेला खर्च जमीनीची किंमत व व्याज व २५% दुकानांचे उत्पन्न मिळाले तर फायदाच होईल.

**श्री. जगदिश सिध्द :** विकास आरखडा मंजुर झालेला आहे काय?

**उपसंचालक नगररचना :** विकास आराखडयाची प्रत नगररचना विभागात पाहावयास मिळेल, नकाशा फार मोठा असुन भिंतीवर लावलयास पाण्याने ओला होऊन फाटु शकतो.

**श्री. नंदकुमार घोडेले :** बोल्ट पध्दतीने कार्यवाही करावी अशी विनंती आहे. तसे आदेश दयावे.

**मा. महापौर :** जागा भुसंपादन करुन टप्प्या टप्प्याने रक्कम देण्याबाबत कार्यवाही करुन बोल्ट पध्दतीनुसार विकास करावा हा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वाढते औद्योगिकरण शासनाचे मुक्त धोरण कर्जाची सहज उलब्धता इत्यादी मुळे शहरातील नागरीकांचे दळवणळण साधात आणि इतर शहरांचे संपर्काकरीता खाजगी वाहनात झालेल्या लक्षणीय वाढीमुळे मध्यवर्ती बस्थानक परिसरात वाहनांची कोंडी होऊन वाहतुकीस निर्माण होणारा अडथळा विचारात घेता आणि पुरेशी पार्किंग व्यवस्था करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद प्रारुप विकास योजनेमधील आरक्षण क्र. ९०, ९१, व ९२ मध्ये एससीपी दुकानकेंद्र व वाहन तळाकरीता आरक्षीत असलेली औरंगाबाद मध्यवर्ती बसस्थानक समोरील न. भू.क्र. २०६६६, २८३४, २८३४ व २८३३ चे क्षेत्र भूसंपादन कायदयातहत संपादित करण्यात आणि भूसंपादनाच्या कार्यवाहीस लागणाऱ्या खर्चासह संपादित करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१५/८ :**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, नगारिकांच्या सोयीसाठी बन्सीलाल नगर व ज्योतीनगर या ठिकाणी अनुक्रमे सांस्कृतिक क्रिडा संकुल व बॅडमिटंन हॉल तयार करण्यात आला आहे. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९०/१ दि. ४.२.२००० अन्वये बन्सीलालनगर येथील बॅडमिटंन व टेबल टेनिस खेळासाठी मान्य शुल्क आकारण्यात येत होते. देखभाल, दुरुस्ती व इतर खर्च लक्षात घेता आवश्यकतेनुसार याठिकाणी शुल्क वाढ प्रस्तावित करण्यात येत आहे. ( पहा पुरवणी ) या शुल्क वाढीस मान्यता प्रदान करण्यात यावी. तसेच ज्योतीनगर बॅडमिंटन हॉलचे नियमित तास वापर व देखभाल दुरुस्ती आदी बाबी लक्षात घेऊन आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत

संलग्नित प्रस्ताव प्रपत्र अ, ब, क, व पुरवणी सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**प्रपत्र - " अ "**
**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**
**सांस्कृतिक क्रिडा संकुल**
**ज्योतीनगर औरंगाबाद**

**सर्वसाधारण नियम व अटी :**

१) खेळांसाठी विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल.

२) हॉलमध्ये प्रवेश करण्यापुर्वी आरक्षण पावती अथवा ओळखपत्र दाखविणे बंधनकारक आहे.

३) सभासदाने सरावासाठी स्वत:चे आवश्यक ते क्रिडा साहित्य सोबत आणणे आवश्यक आहे.

४) सभासदाने खाजगी / सरकारी संस्था यांना स्पर्धेकरिता आरक्षण करतांना एक महिना अगोदर आरक्षण करणे आवश्यक आहे.

५) सभासद होण्यासाठी किमान चार ८४ अथवा सहा (६) अशी नेमकी संख्या नेमक्या खेळासाठी सभासद संख्या असणे आवश्यक आहे.

६) सभासदांना महानगरपालिकेने नेमून दिलेल्या निर्धारित वेळीच सराव करणे बंधनकारक राहील.

७) कोणत्याही सभासदास खेळा दरम्यान दुखापत अथवा जिवीत हानी झाल्यास त्याची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

८) हॉलमध्ये प्रवेश करतांना कोणत्याही व्यक्तीने मौल्यवान वस्तू सोबत आणू नयेत अशा वस्तू चोरीस गेल्यास त्या जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

९) सभासदाचा निर्धारित कालावधी संपल्यानंतर पुढील कालावधीचे शुल्क संबंधित महिन्याच्या ५ तारखेच्यापुर्वी जमा करणे आवश्यक राहील.

१०) हॉलमध्ये मद्यपान, धुम्रपान आदींना बंदी आहे.

११) हॉलमधील साहित्यांची नासधूस व मोडतोड झाल्यास त्यांची संपूर्ण भरपाई स्वखर्चाने सभासदास करुन द्यावी लागेल.

१२) खेळतांना स्पोर्टचे शुज, कॅनव्हॉस शुज वापरणे व स्वच्छ ठेवणे हे बंधनकारक आहे.

१३) गैरवर्तन व गैरकृत्य अथवा नागरिकांना खेळांडूकून त्रास होईल असे वर्तन होणार नाही याची सभासदाने दक्षता घ्यावी.

१४) ज्यांचे नावावर आरक्षण आहे. त्यांनीच सराव करण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

१५) साप्ताहीक सुटीच्या कारणास्तव आठवडयातून एक दिवस हॉल बंद राहील.

१६) मनपा अधिकारी व कर्मचारी यांना निम्मे शुल्क आकारले जाईल.

१७) वेळा निश्चितीचे अधिकार व्यवस्थापनास राहतील.

१८) औरंगाबाद महानगरपालिकेने दिलेलया सूचना अथवा नियम/अटींचा भंग केल्यास सभासदत्व त्यावेळी रद्द होईल.

१९) अटी, नियमामध्ये बदल करण्याचे तसेच अपरिहार्य कारणास्तव हॉल बंद ठेवण्याचे व आरक्षण रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, उप आयुक्त (म) महानगरपालिका अथवा प्राधिकृत अधिकारी यांना राहतील.

**प्रपत्र - " ब "**

**शुल्क आकरणी : बॅडमिटंन हॉल ज्योतीनगर**

**टिप : सदरील नियमावली १ एप्रिल २००१ पासून अंमलात आणली जाईल.**

**अ) सर्वसाधारण गट :**

| | |
|---|---|
| मासिक शुल्क : | एस संच ( कमाल मर्यादा ६ सभासद )<br>रु. ७५०/- प्रतितास<br>रु. १५०/- प्रतिसंच प्रवेश शुल्क |
| रात्रवेळा | - सकाळी ५.०० ते १०.०० व सायंकाळी ७.०० ते १०.०० |
| **ब) महिलांसाठी मासिक शुल्क** | एक संच (कमाल मर्यादा ६ सभासद)<br>रु. ४५०/- प्रतितास<br>रु. १५०/- प्रतिसंच प्रवेश शुल्क |
| समावेश | - सकाळी १०.०० ते १२.०० व<br>- सकाळी २.०० ते ४.०० |

क) प्रशिक्षणासाठी राखीव : सांघीक (शालेय विद्यार्थ्यांसाठी)

| | |
|---|---|
| **मासिक शुल्क** | एक संच (कमाल मर्यादा १ विद्यार्थी)<br>रु. ६००/- प्रतितास<br>रु. १५०/- प्रतितास संघ प्रवेश शुल्क |
| रात्रवेळा | सायंकाळी ५.०० ते ७.०० |

कमाल मर्यादेनंतरच्या प्रत्येक जादा विद्यार्थ्यांसाठी रु. ५०/- प्रती विद्यार्थी

असोसिएशन / संख्या यांचे मार्फत मोठया कार्यक्रमाच्या स्पर्धेच्या आयोजनासाठी हॉलचे भाडे एक दिवसासाठी रु. १५००/- राहील,

अनामत रु. २०००/-

साफसफाई शुल्क रु. ३००/-

वेळेबाबत वा शुल्काबाबत प्रासंगिक बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मनपा अथवा प्राधिकृत अधिकारी यांना असतील.

**वेळापत्रक**

सत्र-१ सकाळी ५.०० ते १०.००
सत्र-२ दुपारी २.०० ते ०४.००
सत्र-३ संध्या ५.०० ते १०.००

**प्रवेश :**

प्रत्येक वर्गणीदार सभासदास प्रवेश पत्रिका कार्ड देण्यात येईल. त्याशिवास हॉलमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

प्रवेश कार्ड शुल्क रु. १०/-

## पुरवणी

**वाचा :** विषय क्र. १९०/1 दिनांक ४.२.२००० रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावा अन्वये सांस्कृतिक सभागृह बन्सीलालनगर येथे मंजूर करण्यात आलेल्या शुल्क आकारणीची अंमलबजावणी करण्यात येत होती. मान्य शुल्क आकारणीत आवश्यकते प्रमाणे शुल्क वाढत प्रस्तावित करण्यात येत आहे.

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
### सांस्कृतिक क्रिडा संकुल
### बन्सीलालनगर औरंगाबाद

### शुल्क आकारणी
### बॅडमिटंन / टेबल टेनिस

| मान्य शुल्क आकारणी | प्रस्तावित दरवाढ |
|---|---|
| अ) मासीक : एका संचास (सहा)<br>रु. ४५०/- + रु. ५०/-<br>प्रवेश शुल्क प्रतिसंच | अ) मासीक : एका संचास (सहा)<br>रु. ६००/- + रु. १००/-<br>प्रवेश शुल्क प्रतिसंच |
| **महिला व विद्यार्थ्यांसाठी केवळ** | **महिला व विद्यार्थ्यांसाठी केवळ** |
| अ) मासीक : एका संचास (सहा)<br>रु. २५०/- + रु. ५०/-<br>प्रवेश शुल्क प्रतिसंच | अ) मासीक : एका संचास (सहा)<br>रु. ३५०/- + रु. ७५/-<br>प्रवेश शुल्क प्रतिसंच |

१) टेबल टेनिस - एक संच (सहा खेळाडू) शुल्क आकारणी वरील प्रमाणे

सरावासाठी व इतर कार्यक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेचे दैनिक / मासीक शुल्क परवानगी घेतांना भरण्यात यावे.

**टिप :** असोसिएशन संस्था मार्फत मोठया कार्यक्रमाच्या आयोजनासाठी हॉलचे भाडे एका दिवसासाठी रु. १०००/- प्रति कोर्ट राहील.

अनामत रु. २०००/-

साफसुाई शुल्क रु. ३००/-

वेळेबाबत वा शुल्काबाबात प्रासंगिक बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त महानगरपालिका अथवा प्राधिकृत अधिकारी यांना राहतील.

सुधारित शुल्क आकरणीचा प्रस्ताव सर्वसाधरण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**प्रपत्र - " क "**
**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**

**ज्योतीनगर - बॅडमिंटन सभागृह**

- **: प्रवेश अर्ज :-**

१) अर्जदारचे नांव :
२) स्थानिक पत्ता :
३) दूरध्वनी :
४) कोणत्या सत्रात प्रवेश घेवू इच्छिता :
५) किती व्यक्तीसाठी :
६) वेळ : सकळी संध्याकाळी
मी या बाबतचे सर्व नियम वाचलेले असून, ते मला मान्य आहेत.

-------------------------------------- नाव व स्वाक्षरी
---------------------------------------------------- श्री. / श्रीमती -----------
----------------- यांना ------------------ या वेळेसाठी बॅडमिटंन खेळण्याची परवानगी देण्यात येते.
शुल्क जमा पावती क्र.
दिनांक : / /

सांस्कृतिक अधिकारी / शिक्षणाधिकारी
महानगरपालिका औरंगाबाद.

उपरोक्त नुसार बन्सीलालनगर शुल्क वाढ व ज्योतीनगर बॅडमिटंन सभागृह शुल्क आकारणीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**सौ. विजया रहाटकर :** महानगरपालिका ही ना तोटा ना नफा या तत्वावर चालावी अशी आपली धारणा असते. प्रस्तावात दर्शविलेले बॅडमिटंन हॉल शुल्क सर्वसाधारण गटा एक संच रु. ७५०/- ठेवले आहे. जास्त होतात ते ५०० रु. करावे तसेच महिलांसाठी एका संचास प्रति तास ४५०/- रु. दिली त्या ऐवजी रु. ३००/- करावे तसेच १५०/- प्रति संच प्रवेश शुल्क दिले ती सुध्दा रु. १००/- करावी. येथे येणाऱ्या महिलांची संख्या फार कमी आहे. प्राधान्य दिल्यास संख्या वाढेल.

**श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन :** शिक्षणाधिकरी यांनी प्रस्ताव ठेवला आपल्याकडे शिक्षणाधिकारी आहे काय? खुलासा दयावा.

**मा. महापौर :** शिक्षणाधिकरी पदाचा चार्ज उपआयुक्त यांचेकडे आहे. याची कल्पना आपणास आहे. त्यांचे मार्फत हा प्रस्ताव सादर झालेला असून, स. सदस्य

यांनी केलेल्या सूचनेनुसार या प्रस्तावात " अ " मध्ये सर्वसाधारण गट यामध्ये एक संच प्रति तास ७५०/- रु. ऐवजी ५००/- रु. करावे तसेच " ब " मध्ये महिलांसाठी एक संच प्रति तास ४५०/- रु. ऐवजी ३००/- रु. व प्रति संच प्रवेश शुल्क महिलांसाठी १५०/- रु. ऐवजी १००/- करण्यास मान्यता देऊन हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** क्रिडा विभागाचा प्रस्ताव असतांना शिक्षणाधिकारी कसे टाकण्यात आले.

**मा. महापौर** : सध्या शिक्षणाधिकरी यांचे अंतर्गत क्रिडा अधिकारी काम परत असल्याने शिक्षणाधिकारी असे देण्यात आले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योतीनगर बॅडमिंटन हॉलचे नियमित तास, वापर व देखभाल दुरुस्ती आदी बाबी लक्षात घेऊन प्रपत्र " अ " मधील सर्वसाधारण नियम व अटी (अ. क्र. १ ते १९) सह दिनांक १ एप्रिल २००१ पासून खालील दर्शविल्याप्रमाणे शुल्क आकारणी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. करीता, आरक्षण करतांना एक महिना अगोदर आरक्षण करणे आवश्यक आहे.

**प्रपत्र - " ब "**
**बॅडमिंटन हॉल ज्योतीनगर - शुल्क आकारणी**

| | प्रस्तावित शुल्क आकारणी | सर्वसाधारण सभेने मान्य केलेली शुल्क आकारणी |
|---|---|---|
| **अ) सर्वसाधारण गट : मासिक शुल्क - एक संच** | | |
| (कमाल मर्यादा ६ सभासद) प्रतिसंच प्रवेश शुल्क | रु. ७५०/- प्रतितास<br>रु. १५०/- | रु. ५००/- प्रतितास<br>रु. १५०/- |
| रात्रवेळा - सकाळी ५.०० ते १०.०० त सायंकाळी ७.०० ते १०.०० | | |
| **ब) महिलांसाठी मासिक शुल्क-** | | |
| एक संघ ( कमाल मर्यादा ६ सभासद ) प्रतिसंच प्रवेश शुल्क | रु. ४५०/- प्रतितास<br>रु. १५०/- | रु. ३००/- प्रतितास<br>रु. १००/- |
| रात्रवेळा - सकाळी १०.०० ते १२.०० व दुपारी २.०० ते ४.०० | | |
| **क) प्रशिक्षणासाठी राखीव :** सांघीक ( शालेय विद्यार्थ्यासाठी )<br>मासिक शुल्क | | एक संघ (कमाल मर्यादा १२ विद्यार्थी)<br>रु. ६००/- प्रतितास<br>रु. १५०/- प्रतितास संघ प्रवेश शुल्क |
| रात्रवेळा - सायंकाळी ५.०० ते ७.०० | | |

कमाल मर्यादेनंतरच्या प्रत्येक जादा विद्यार्थ्यांसाठी रु. ५०/- प्रती विद्यार्थी

असोसिएशन / संस्था यांचे मार्फत मोठया कार्यक्रमाच्या स्पर्धच्या योजनासाठी हॉलचे भाडे एका दिवसाकाळी रु. १५००/- राहील.

अनामत रु. २०००/-

साफसफाई शुल्क रु. ३००/-

वेळेबाबत वा शुल्कबाबत प्रासंगिक बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त महानगरपालिका अथवा प्राधिकृत अधिकारी यांना असतील.

**वेळापत्रक**

सत्र-१ सकाळी ५.०० ते १०.००
सत्र-२ दुपारी २.०० ते ०४.००
सत्र-३ संध्या ५.०० ते १०.००

प्रवेश प्रत्येक वर्गीणीदार सभासदास प्रवेश पत्रिका कार्ड देण्यात येईल. त्याशिवास हॉलमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. प्रवेश कार्ड शुल्क रु. १०/-

याशिवाय बन्सीलालनगर येथील सांस्कृतिक सभागृहासाठी सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १९०/१ दिनांक ४.२.२००० अन्वये मंजूर झालेल्या शुल्क आकारणीमुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे शुल्क आकरणीमुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे शुल्क वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**बन्सीलालनगर सांस्कृतिक क्रिडा संकुल**

बॅडमिटंन / टेबल टेनिस शुल्क आकारणी

| **मान्य शुल्क आकारणी** | **प्रस्तावित दरवाढ** |
|---|---|
| अ) मासीक : एका संचास (सहा)<br>रु. ४५०/- + रु. ५०/-<br>प्रवेश शुल्क प्रतिसंच | अ) मासीक : एका संचास (सहा)<br>रु. ६००/- + रु. १००/-<br>प्रवेश शुल्क प्रतिसंच |
| महिला व विद्यार्थ्यांसाठी केवळ | महिला व विद्यार्थ्यांसाठी केवळ |
| अ) मासीक : एका संचास (सहा)<br>रु. २५०/- + रु. ५०/-<br>प्रवेश शुल्क प्रतिसंच | अ) मासीक : एका संचास (सहा)<br>रु. ३५०/- + रु. ७५/-<br>प्रवेश शुल्क प्रतिसंच |

टेबल टेनिस - एक संच ( सहा खेळाडू ) शुल्क आकारणी वरील प्रमाणे

सरावासाठी व इतर कार्यक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेचे दैनिक / मासीक शुल्क परवानगी घेतांचा भरण्यात यावे.

टिप : असोसिएशन / संस्था यांच्या मार्फत मोठया कार्यक्रमाच्या आयोजनासाठी हॉलचे भाडे एका दिवसाकाठी रु. १०००/- प्रति कोर्ट राहील.

अनामत रु. २०००/-

साफसफाई शुल्क रु. ३००/-

वेळेबाबत वा शुल्काबाबत प्रासंगिक बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त महानगरपालिका अथवा प्राधिकृत अधिकारी यांना राहतील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१६/९ :**

उपसंचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कैसर कॉलनी येथील प्राथमिक शाळा सध्या कैसर कॉलनी येथील समाज मंदिरात भरविण्यात येत असून, या परिसरात महानगरपालिकाची जागा नसल्याने व विकास योजन आरक्षण नसल्याने या कॉलनीतील सदर शाळेसाठी पुरेसे बांधकाम क्षेत्र उपलब्ध व्हावे व शाळेकरीता पुरेशा खोल्या उपलब्ध व्हाव्यात ही मागणी विचारात घेता शाळेकरीता भूसंपादन करणे आवश्यक ठरत असल्याने या कॉलनी परिसरातील न.भू.क्र. ९४६५ क्षेत्र ४१२.४ चौ. मी. प्राथमिक शाळेकरीता नॉन डी. पी. प्रस्ताव म्हणून संपादीत करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येतो. सदरील भूसंपादीत करावयाची जमीन / न.भू.क्र. हा वार्ड क्र. ७६ मध्ये आहे. नभूक्र ९४६५ चे आखीव पत्रिकेनुसार या जमिनीचे जमीन मालक श्री. स. ईरफान स. हसन हे आहेत. व त्यांनी उपरोक्त क्षेत्र देण्यांत सहमती दर्शविलेली आहे.

उक्त जमीन खाजगी मालकीचे असून, भूसंपादन प्रस्ताव मान्यतेनंतर सदर नभुक्रचे वर नमुद क्षेत्र संपादीत करण्याची कार्यवाही रितसर भूसपादन कायदयाहत करण्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात येईल.

सबब उक्त मिळकत संपादन करण्यासाठी व त्याकरीता लागणाऱ्या भूसंपादन खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**मा. महापौर** : विषय क्र. ९ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी येथील प्राथमिक शाळेकरीता या परिसरात महानगरपालिकेची जागा नसल्याने आणि प्राथमिक शाळेकरीता विकास आराखडयात आरक्षण नसल्याने या शाळेसाठी पुरेसे बांधकाम क्षेत्र उपलब्ध होण्यासाठी वार्ड क्र. ७६ मधील श्री. स. इरफान स. हसन यांच्या मालकीची नभुक्र. ९४६५ चे ४९२.४ चौ. मी. चे क्षेत्र कैसर कॉलनी महानगरपालिकाची प्राथमिक शाळेकरीता नॉन डी.पी. प्रस्ताव म्हणून भूसंपादन कायदयाहत रितसर कार्यवाही करुन संपादीत करण्यास व भूसंपादन खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७/१० :**

उपसंचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराचे मंजूर व प्रारुप विकास योजनेनुसार मुजीब कॉलनी कडून सिडकोकडे ( कटकट गेट मार्गे ) जाणारा १०० फुट विकास योजना रस्ता हा कटकट गेट या जुन्या ऐतिहासिक गेटला संपूर्णतः बाधित करुन जातो. हा रस्ता विकसित करावयाचे झाल्यास हे गेट पाडावे लागेल. तरी सदर गेट ऐतिहासिक असल्यामुळे ते पाडणे ऐवजी रोशनगेट, रंगीनगेट, दिल्लीगेट इ. गेटच्या दोन्ही बाजूने ज्या प्रमाणे रस्ते विकसित केले आहेत, त्यानुसार वरील कटकट गेटच्या बाजूने सदन १०० फुट रुंद रस्ता प्रत्येकी ५०-५० फुट रुंद करणे बाबत संबंधित वार्डाचे सन्माननीय सदस्य यांनी सुचविले असून, या संदर्भात

अशासकीय प्रस्ताव क्र. ७९/५ सर्वसाधारण सभा दिनांक ३०.९.२००० अन्वये मंजूर झालेला आहे. सदरील रस्ता वार्ड क्र. ७१ मध्ये आहे. या रस्त्याची वरील प्रमाणे तेवढया भागाची आखणी बदलून नॉन डी. पी. प्रस्ताव म्हणून मान्यता देऊन त्यानुसार भूसंपादन कार्यवाही करावी. लागेल.

सदर भूसंपादन प्रस्ताव हा प्रभाग क्र. ७१ मधील असून, प्रस्तावित संपादीत करावयाचे क्षेत्र सुमारे ५५०० चौ. मी. एवढे असून, त्यास सध्याचे सिध्दशिघ्र गणकाचे दरानुसार या भागातील जमिनीचा दर रु. ३७७०/- प्रति. चौ. मी. एवढा आहे. त्यानुसार भूसंपादनास अंदाजे रु. ५५.०० लक्ष खर्च येणार आहे. सन २००१-२००२ साठी अदांजपत्रकात तरतुद रु. ६.२५ कोटी एवढी आहे.

बांधित होणाऱ्या क्षेत्रापैकी काही क्षेत्र हे महानगरपालिका नभूक्र. ११३१५ करीता मंजूर केलेल्या रेखांकनातील खुल्या जागेपैकी असून, या रस्ता विकासाकरीता ते क्षेत्र वापरल्यास विहित खुल्या जागेचे तेवढे क्षेत्र कमी होईल. प्रस्ताव मान्यतेनंतर नगररचना विभागाच्या वाहतुक व परिवहन विभागाकडून या संदर्भाने वाहतुक बेटाचे डिझाईन करुन घेण्यात येईल व त्यानुसार भूसंपादन करुन वाहतुक बेट विकसित करण्यात येईल.

प्रस्ताव मान्यतेनंतर मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे रितसर भूसंपादन कार्यवाहीस्तव पाठविण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**सौ. नुसरत बानो फिरोजखान :** या प्रस्तावानुसार यात दोन वार्डाचा समावेश होतो यात फक्त एकच वार्डाचे नांव दिले. वार्ड क्र. ४६ नेहरुनगर किराडपुरा असा समावेश करावा.

**मा. महापौर** : स. सदस्या यांनी सूचना केल्यानुसार दोन वार्डातून या रस्त्याचे विकास होत आहे. म्हणून एकाच स. सदस्यांना त्याचे श्रेय न जाता नियमानुसार दोन्ही वार्डाचा समावेश करणे योग्य ठरेल प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचे मंजर व प्रारुप विकास योजनेनुसार मुजीब कॉलनीकडून सिडकोकडे जाणाऱ्या १०० फुट विकास योजना रस्त्यात बाधित होत असलेले जुन ऐतिहासिक कटकट गेट पाडणे ऐवजी गेटचे दोन्ही बाजूस ५०-५० फुट रुंद करण्यासाठी या रस्त्याची वरील प्रमाणे जेवढया भागाची आखणी बदलून सिध्दशिघ्र गणक दरानुसार म्हणजेच प्रति चौमी रक्कम रु. ३७७०/- या दराने ५५०० चौ. मी. एवढे क्षेत्र संपादीत करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>पुरवणी विषय पत्रिका</u>

**विषय क्र.४१८/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शांतीपुरा वार्ड क्र.३७ मध्ये व जवळ शाळा कॉलेज विद्यापीठ व अन्य शिक्षणाचे केंद्र असल्याने बाहेर गावातील व जिल्ह्यातील विद्यार्थी शिक्षण

घेण्याकरिता या मोहल्ल्यामध्ये भाड्याने जास्त प्रमाणात राहतात. व त्यांना शौचालय नसल्याने ना ईलाजाने बाहेर पटांगणात बसावे लागते. तसेच या परिसरामध्ये सुलभ शौचालय व्हावे ही शिक्षक विद्यार्थी नागरिकांची प्रामुख्याची मागणी असून सदरील (सुलभ शौचालय) ची मागणी विचारात घेऊन नागरिकांची सोय होण्याकरिता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सुनिल वडागळे,
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब वाघ,
श्री.भगवान घडामोडे,
श्री.राजु आर.शिंदे.

**मा.महापौर :** मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीपुरा वार्ड क्र.३७ मध्ये शाळा, कॉलेज विद्यापीठ व अन्य शिक्षणाचे केंद्र असल्याने बाहेर गावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या परिसरामध्ये सुलभ शौचालयाची सोय करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१९/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नंदनवन कॉलनी वार्ड क्र.३७ या ठिकाणी मनपाच्या खुल्या असलेल्या जागेवर टेबल टेनिस हॉल बांधणे बाबत तेथील नागरिकांनी विशेष मागणी केली असून त्या ठिकाणी टेबल टेनिसचा हॉल बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सुनिल वडागळे,
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब वाघ,
श्री.भगवान घडामोडे,
श्री.राजु आर.शिंदे.

**मा.महापौर :** मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीपुरा वार्ड क्र.३७ येथील महानगरपालिकेचया खुल्या जागेवर टेबल टेनिसचा हॉल बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२०/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पीरबाजार उस्मानपुरा या ठिकाणी तीन अति महत्वाचे रोड येऊन मिळतात. या रस्त्यावर इंजिनियरींग कॉलेज देवगिरी कॉलेज, पॉलिटेक्नीक कॉलेज व वस्तीगृह, नागसेन विद्यालय इत्यादी महाविद्यालयाची रहदारी आणि सातारा व शहानूरवाडी परिसरात नव्याने उदयास आलेल्या नवीन वसाहती, आठवडी बाजार यामुळे मोठ्या प्रमाणावर रहदारी नेहमीच असते. या बाबींचा विचार करुन पीरबाजार चौक

(डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील चौक) शहर विकास योजनेनुसार विकसीत करुन या चौकाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सुचक :** श्री.प्रकाश निकाळजे,

**अनुमोदक :** श्री.दलबिरसिंग जबिंदा,

श्री.रतनकुमार पंडागळे.

**मा.महापौर :** सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पीरबाजार उस्मानपुरा या ठिकाणी येऊन मिळणाऱ्या अति महत्वाचा तीन रोडवर नेहमीच मोठ्या प्रमाणावर रहदारी असल्यामुळे पीरबाजार चौक (डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील चौक) शहर विकास योजनेनुसार विकसीत करुन या चौकाचे सौंदर्यीकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२१/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मयुरनगर वार्डात एन-११, सी-४ गजानन नगर, येथे महानगरपालिकेच्या मालकीची जवळपास दोन एकर खुली जागा मनपाच्या ताब्यात आहेत. त्या ठिकाणी काही भागात मनपा शाळा असून अर्ध्या पेक्षा जास्त जागा खाली पडून आहेत. त्या ठिकाणी मंगल कार्यालय आवश्यक आहेत. व त्या वार्डात सर्वसाधारण नागरिक राहत असून व जास्तीत जास्त कामगार वस्ती आहेत. सांस्कृतिक कार्यक्रम व लग्न व अन्य कामासाठी मंगल कार्यालय कमी दराने उपलब्ध नसल्यामुळे तसेच त्या ठिकाणी वाचनालय पण नाही अनेक सुविधा नाही व त्यामुळे नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागतो.

करिता वरील दर्शविलेल्या खुल्या जागेवर ६,०००/- पेक्षा जास्त नागरिक मंगल कार्यालय व दुसऱ्या मजल्यावर मोठे व भव्य वाचनालय व्यायामशाळा व अभ्यास वर्ग व खेळ खेळण्यासाठी हॉल नागरिकांच्या सोई व उपयोगासाठी बांधून द्यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.भाऊसाहेब ताठे,

**अनुमोदक :** श्री.सुनिल वडागळे,

श्री.विकास जैन, श्री. भाऊसाहेब वाघ,

श्री.रावसाहेब औताडे, सौ.जयश्री मोरे.

**चर्चा :**

**श्री.स.अली मिरा सलामी :** मंगल कार्यालय व इतर इमारती बांधणे बाबतचे प्रस्ताव येतात. यासाठी बजेट आहे काय याचा खुलासा करावा.

**मा.महापौर :** ज्यावेळेस पुरवणी विषय पत्रिका काढण्यात येते. त्यावेळी स.सदस्य माझ्याकडे प्रस्ताव घेवून येतात व बजेट नाही म्हणून त्यांना सांगण्यात येते व असे प्रस्ताव मंजूर करुन उपयोग नाही. अशा सूचना करुन सुध्दा सही घेतल्याशिवाय जात नाही. या अगोदर बऱ्याच वेळा विभाग प्रमुखांकडून अशा प्रस्तावावर अभिप्राय घेतले. ते नामंजूर होऊन आलेले आहे. त्यामुळे स.सदस्यांचा जो आग्रह असतो तो टाळता येत नाही. याची कल्पना आपणा सर्वांना आहे. बजेट नाही हे सर्वांना माहिती आहे. फक्त स.सदस्याच्या

समाधानीसाठी हे प्रस्ताव मंजूर होत आहे. जेव्हा बजेट येईल तेव्हा कामे होतील.

**श्री.स.अली मिरा सलामी :** सर्वसाधारण कामाचे इस्टीमेट तयार होत नाही. मागील कामे मंजूर होत नाही. रेट लिस्टची कामे सुध्दा मंजूर होत नाही.

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. नियमाने प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मयुरनगर वार्ड क्र.११ सी-४ गजानन नगर येथे असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर पाहिल्या मजल्याचे भागात ६००० पेक्षा जास्त नागरिक बसतील असे मंगल कार्यालय, आणि दुसऱ्या मजल्यावर वाचनालयाची भव्य इमारत बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२२/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीसाठी मंजूर झ ालेल्या विकास योजनेतील मौजे पडेगांव येथील विकासपुरी ते भावसिंगपुरा ४५ मी.डी.पी. रोडसाठी बाधीत होणारी संपूर्ण जागा संपादित करणे व येणाऱ्या भूसंपादन खर्च मंजूरी देणे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.शेख ईसाक शेख जैनोयीन,
श्री.सय्यद सलीम सय्यद युसूफ,
श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ,
**अनुमोदक :** श्री.सलीम पटेल,
श्री.गाजी सादोद्दीन.

**मा.महापौर :** सर्वानुमते प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीसाठी मंजूर झालेल्या विकास योजनेनुसार विकासपुरी ते भावसिंगपुरा या ४५ मी.डी.पी. रोडसाठी बाधित होणारी संपूर्ण जागा संपादित करण्यास व भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२३/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विद्यापीठ गेट समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविणे बाबत मान्यता मिळालेली असून सदरील पुतळ्याच्या सभोवती विद्युत रोषणाई व सौंदर्यीकरण करणेसाठी रु.५० लाखाची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. सदरील पतुळ्याच्या सौंदर्यीकरणात भर टाकणेच्या दृष्टीने व विद्युत व्यवस्थेच्या दृष्टीकोनातून सदरील ठिकाणी एक हायमास्ट बसविण्यांत यावे. सदरचा खर्च सदरील पुतळ्या करिता ठेवण्यात आलेल्या ५० लाखाच्या आर्थिक तरतूदी मधून करण्यांत यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** श्री.गणेश तांबे,

**अनुमोदक :** श्री.विकास जैन,
श्री.प्रशांत देसरडा,
श्री.अंबादास दानवे.

**मा.महापौर :** सर्वानुमते प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे. तसेच याच आर्थिक तरतूदीमधून गजानन महाराज चौक व सिटी चौक येथेही हायमास्ट दिवे लावण्यास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्यापीठ गेट समोर बसविण्यांत येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या भोवती करण्यात येणाऱ्या विद्युत रोषणाई व सौंदर्यीकरणात भर टाकण्यासाठी करण्यात आलेल्या ५० लाखाच्या तरतूदीमधून हायमास्ट लाईट बसविण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

तसेच याच आर्थिक तरतूदीमधून गजानन महाराज चौक व सिटी चौक येथे ही हायमास्ट दिवे लावण्यास मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२४/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये प्रथमच प्रभाग समिती कार्यान्वित झालेली आहे. त्यामुळे प्रभाग समितीच्या कामकाजाची रुपरेषा ठरविणे आवश्यक आहे. सर्व प्रभाग समितीच्या सभापतींनी पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक महानगरपालिकेच्या अभ्यास दौरा केला. त्यामध्ये पुणे महानगरपालिकेचे प्रभाग समितीची कार्यपध्दती सर्वात उत्कृष्ट आहे. तीच कार्यपध्दती औरंगाबाद महानगरपालिकेने अवलंबवावी. त्यात खालील बाबींचा समावेश आहे.

१. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियममाधील तरतूदीनुसार रु.५ लाखा पर्यंतचे सर्व कामे क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यांत यावी. त्यामध्ये रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य सफाई, विद्युत, अतिक्रमण इत्यादी देखभाल दुरुस्तीची व इतरही कामे करण्यांत यावी. तांत्रिक/अतांत्रिक पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देणे. व पुणे महानगरपालिकेप्रमाणे स्टॉफ पॅटर्न ठरविणे.
२. प्रभाग समिती निहाय कामाना अग्रक्रम देवून प्रभाग समितीने शिफारस केलेल्या कामाची अर्थसंकल्पत तरतूद करणे व कामाच्या नावासह प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्प अंदाजपत्रक तयार करणे, त्याची अंमलबजावणी करणे.
३. प्रभाग समिती सभापतीसाठी वाहन व्यवस्था, व दुरध्वनी व्यवस्था करणे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सुचक :** श्री.भाऊसाहेब वाघ,
श्री.सय्यद सलिम सय्यद युसूफ
**अनुमोदक :** सौ.विजया रहाटकर,
श्री.शेख ईसाक जैनोद्दीन शेख.

**संवाद :**

**मा.महापौर :** आपल्याकडे नव्याने प्रभाग समितीची स्थापना झालेली असून ४ प्रभाग समितीचे सभापती पदाच्या निवडणुका घेतल्या व ४ ही सभापती यांनी नुकताच पुणे, पिंपरी चिंचवड तसेच नाशिक महानगरपालिकेच्या दौरा केलेला आहे व आपल्या महानगरपालिकेमध्ये प्रभाग समितीचे कामकाज कशा पध्दतीने कार्यान्वित करायचे यासाठी ४ ही सभापती यांनी हा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** प्रभाग समितीचे सभापती यांनी दौऱ्यामध्ये काय माहिती घेतली थोडक्यात सभागृहात देण्यात यावी.

**मा.महापौर :** स.सभापती श्री.शेख इसाक शेख जैनोद्दीन थोडक्यात माहिती देत आहे.

**श्री.शेख ईसाक जैनोद्दीन :** प्रभाग समिती अ,ब,क,ड, चे सर्व सभापती यांनी दि.६,७,८/६/२००१ या तीन दिवसांत महानगरपालिका पुणे, पिंपरी चिंचवड, व नाशिक येथील महानगरपालिकेचा दौरा करुन या ठिकाणी प्रभाग समितीचे कार्य कोणत्या पध्दतीने चालते याची सर्व माहिती प्राप्त करुन घेतली. त्यानुसार आम्ही या मतांवर येऊन ठेवलो की, या महानगरपालिकेत प्रभाग समितीचे कामकाज पुणे प्रभाग समितीचे कामकाज प्रमाणे कार्यान्वित व्हावे, या मतावर आलो आहोत.

**** पुणे महानगरपालिकेतील प्रभाग समितीचे कामकाज पध्दती बाबत ****

पुणे महानगरपालिकेमध्ये लोकसंख्येंच्या दृष्टीकोनातून १२ प्रभाग समिती स्थापन झालेल्या आहेत. १२ प्रभाग समितीमध्ये प्रत्येक प्रभाग समितीला प्रभारी अधिकारी म्हणून १२ क्षेत्रीय अधिकारी नेमलेले आहे. व या १२ क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर प्रत्येक २ प्रभाग समितीला येणे प्रमाणे ६ क्षेत्रीय आयुक्त यांची नियुक्त झालेली आहे. क्षेत्रिय कार्यालयात ड्रेनेज, पाणी, घनकचरा, भूमिगत गटार, तुंबलेल्या पाण्यातील कचरा, पथदिवे, दुरुस्ती, गलिच्छ वस्ती निर्मूलनाचे काम, टॅक्स वसुली, कर वसुली घरे दुरुस्ती, विद्युत मीटर घेण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र, साफसफाई, रस्ते दुरुस्ती अतिक्रमण दुर करणे, हि कामे करण्यात येतात. या कामासाठी त्यांचेकडे खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी आहेत.

अ) क्षेत्रीय आयुक्त, ब) क्षेत्रिय अधिकारी, क) सहाय्यक अभियंता (रस्ते, ड्रेनेज, विद्युत इ.) तसेच मुख्य लिपीक, जकात निरिक्षक, जकात लिपीक, विभागीय स्वच्छता निरिक्षक व आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग पुरविण्यांत आलेला आहे.

रोज सकाळी ६.०० वाजेपासून क.अभियंता मिश्री, मुकारदम, संबंधित स्टाफ हे प्रभागात फिरतात व देखभाल दुरुस्तीची व इतर सर्व कामाची माहिती घेतात. व सकाळी क्षेत्रीय कार्यालयात येतात. क्षेत्रीय अधिकारी, सहाय्यक अभियंता व इतर अधिकारी यांचे समक्ष एक नोंदवहीमध्ये नोंदी करण्यात येतात. ही नोंद वही सर्व संबंधित विभागांना कळविण्यांत येते. त्यानंतर सर्व विभाग प्रमुखाची नोंद वहीवर स्वाक्षरी घेतली जाते. व त्याचा अहवाल तयार करुन अहवालावर सही घेतली जाते. त्यात जनतेकडून अल्प प्रमाणात तक्रारी येतात. तक्रारीची पाहणी मनपा कर्मचारी सकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत करुन क्षेत्रिय अधिकारी यांचे समक्ष सर्व कामाचा आढावा घेण्यांत येतो. तसेच क्षेत्रिय कार्यालयात कर्मचाऱ्यांचा पगार वाटप, सेवापुस्तक, रजा मंजूर,

त्याचप्रमाणे विविध कामाच्या निविदा काढणे व निविदा मंजूर करणे ही कामे देखील केली जातात. प्रभाग समिती ५ लाखापर्यंतच्या कामांना मंजूरी देते. ही मंजूरी झाल्यानंतर क्षेत्रिय अधिकारी हे क्षेत्रीय आयुक्त यांचे मंजूरीने ५ लाखापर्यंत च्या निविदा काढून ५ लाखा पर्यंतच्या निविदांना प्रभाग समितीच्या कार्यालयातून देऊन कार्यादेश देण्यात येतात. कामाची बिले सुध्दा क्षेत्रिय कार्यालयातून देण्यात येतात. क्षेत्रिय अधिकारी यांना ५० हजार पर्यंतच्या कामास मंजूर करुन संविदका काढण्याची व १ लाखापर्यंत पुर्वजकपत्रक (अंदाजपत्रक) मंजूर करण्यांचे अधिकारी आहे. तसेच क्षेत्रिय आयुक्त यांनी १ लाखापर्यंत दर मूंजर करण्याचे व २ लाखापर्यंतचे पुर्वजकपत्रक (अंदाजपत्रक) मंजूर करण्याचा अधिकार आहे. व त्या पुढील ५ लाख पर्यंतच्या कामांना प्रभाग समितीची मंजूरी घेऊन अंतिम करण्यात येते. व प्रभागातच निविदा काढणे, दर पत्रकांना मंजूरी देणे, देय अदा करणे, ई. कार्यवाही करण्यात येते.

प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात पाणी, ड्रेनेज, रस्ते देखभाल दुरुस्ती, विद्युत देखभाल दुरुस्ती करणे, तसेच लहान मोठी कामे, अतिक्रमण पुर करणे, गलिच्छ वस्त्या निर्मूलन ही कामे केली जाते. सहाय्यक अभियंता यांना प्रत्येक कामासाठी एक कनिष्ठ अभियंता (जसे ड्रेनेज, पाणी पुरवठा, विद्युत ई.) दिलेले आहे. व त्यांचेकडून प्रभागामध्येच काम करुन घेतले जाते. व मोठ्या व भांडवली स्वरुपाची कामे मुख्य कार्यालयात केली जाते. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध इमारतीचे देखभाल दुरुस्तीचे काम व त्यापासून मिळणारे उत्पन्न याची वसुली सुध्दा प्रभागामध्ये होते.

अत्यंत महत्वाची बाब म्हणजे तेथील अर्थसंकल्पात क्षेत्रिय कार्यालयाच्या कामाप्रमाणे तरतूद केली जाते. पर्यायीने क्षेत्रीय कार्यालयासी स्वतंत्र अंदाजपत्रक अर्थसंकल्पात स्वातंत्ररित्या तरतूद करण्यात येते व अर्थसंकल्पात मध्ये कामाची यादी जोडण्यात येते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये देखील जवळपास वरील प्रमाणे कार्यवाही होते व नाशिक महानगरपालिकेमध्ये मात्र या ठिकाणी ५ लाखापर्यंत कामाचे मंजूरी दिल्यानंतर कार्यादेश देण्यापुर्वी प्रस्ताव प्रभाग समितीकडे पाठविण्यांत येतो. तसेच नाशिक महानगरपालिकेमध्ये देखील प्रभाग समितीस कार्यालयामध्ये वरीलप्रमाणे कामे करण्यात येतात. व दर मंजूर, स्थायी समिती मार्फत केले जातात.

वरील तीनही महानगरपालिकेमध्ये ७४ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे सत्तेचे पूर्ण विकेंद्रीकरण झालेले असून त्याचप्रमाणे आपल्या महानगरपालिकेमध्ये देखील कार्यवाही व्हावी ही अपेक्षा आहे.

वरील तीनही महानगरपालिकेमध्ये प्रभाग समितीचे कार्यालय व सभागृह क्षेत्रिय कार्यालय संलग्न असून सभापतीसाठी स्वतंत्र कक्ष, स्वतंत्र सभागृह उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सभापतीसाठी वाहनाची व्यवस्था म्हणून कार देण्यात आलेली आहे. कार्यालयात दुरध्वनी व्यवस्था व मोबाईल सुविधा देण्यात आलेले असून तसेच निवासस्थानी देखील दुरध्वनी व्यवस्था पुरविण्यांत आलेली आहे. या संदर्भात देखील या महानगरपालिकेने विचार करावा.

तरी आपणांस विनंती की, वरीलप्रमाणे प्रभाग समितीचे कामकाम संबंधीची रुपरेषा ठरविण्यांत यावी.

५ लक्षचे अधिकार प्रभाग समितीस देण्यात यावे पुणे महानगरपालिकेत ५ लक्षचे अधिकार देण्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला असून प्रभाग समिती मार्फत ५ लक्ष रुपयापर्यंतची सर्व कामे चालू आहे. त्या प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकामध्ये सुध्दा त्या पध्दतीने काम करावे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** पंचायत राज पध्दतीने महानगरपालिकेच्या कामाचे विभागणी करुन त्यासाठी विषय समित्या कार्यान्वित कराव्यात. पुण्याच्या धरतीवर करावे शिक्षण व आरोग्य समित्या कार्यान्वित करण्यात यावे. महानगरपालिकेच्या शाळेंना सुधारण्याचा प्रयत्न होईल व इतर विकास कामे सुध्दा होतील.

**मा.महापौर :** आपल्या महानगरपालिकेमध्ये ४ प्रभाग समित्या स्थापन झालेल्या असून ४ ही प्रभाग समितीचे सभापती यांनी पुणे, पिंपरी, चिंचवड आणि नाशिक महानगरपालिकेत अभ्यास दौरा केलेला आहे. पुणे महानगरपालिकेचे प्रभाग समितीचे काम उत्कृष्ट असल्याने त्या धर्तीवर या महानगरपालिकेने प्रभाग समितीचे कामकाज करावे. यावर्षी प्रभाग समितीसाठी अंदाजपत्रकात तरतूद केलेली नाही. तरी सुध्दा प्रभाग समिती अ,ब,क,ड चे सभापती यांना नवीन वाहन व्यवस्था करावी व नगर सचिव यांना सुध्दा नवीन वाहन अर्थसंकल्पातील आकस्मिक खर्च या तरतूदीतून वळती करुन खरेदी करण्यास मंजूरी देण्यात येते. तसेच सभापती दालन व सभागृहाची व्यवस्था करावी. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ५ लाखापर्यंतचे अधिकार देण्यास मंजूरी देण्यांत येते. परंतू एजन्सी फिक्सींगचे अधिकारी फक्त पुणे महानगरपालिकेस आहे. ते द्यावयाचे किंवा नाही हे ठरावे लागेल.

याबद्दल प्रशासनाचे पुणे महानगरपालिकेकडून माहिति घ्यावी. तोपर्यंत प्रस्तावित अ.क्र.१,२,३ यास वरील दुरुस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेत प्रभाग समितीचे कामकाम पुणे महानगरपालिकेच्या धरतीवर कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच प्रभाग समिती, कार्यालय, सभागृह व दुरध्वनी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यास आणि प्रभाग समिती अ,ब,क,ड ची सभापती व नगर सचिव यांना नवीन वाहन देण्यासाठी अर्थसंकल्पीय अकस्मिक खर्च तरतूदीतून वळती करुन खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

तसेच प्रभाग समितीस पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर प्रस्तावित अ.क्र.१ ते ३ प्रमाणे कामे करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच पुणे महानगरपालिकेकडून प्रशासनाने दर निश्चिती (एजन्सी फिक्सींग) बद्दलची माहिती देण्याबाबत सर्वानुमते ठरले त्यास मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र.४२५/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कारगिल युध्दामध्ये शहीद झालेल्या जवानांच्या स्मृति पित्यर्थ विवेकानंद उद्यान (मजनूहील) येथे हॉल बांधणे करिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०००-२००१ च्या जिल्हा दर सुचीनुसार रक्कम रु.२२,१४,९५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च प्राप्त होणारे शासकीय अनुदानातून व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.२२,१४,९५०/- या प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**मा.महापौर :** हा ऐनवेळचा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कारगील युध्दात शहीद झालेल्या जवानाच्या स्मृतिप्रित्यर्थ विवेकानंद उद्यान (मजनूहील) येथे व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखाशिर्षकांतर्गत शासकीय अनुदानातून हॉल बांधण्यासाठी रक्कम रु.२२,१४,९५०/- च्या अंदाजपत्रकीय सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विषय क्र.२३०/४, दि.१६.०२.२००१ अन्वये मा.सर्वसाधारण सभेने प्रभाग समिती करिता कार्यालय स्थापने करिता मान्यता दिलेली आहे. सदरील ठरावात प्रभाग समिती "क" करिता रेल्वे स्टेशन झोन क्र. ६ व प्रभाग समिती "ड" करिता झोन क्र.५ येथे समिती कार्यालय स्थापने करिता मान्यता दिलेली आहे. तथापि, सदरील बैठकीचे इतिवृत्त कायम करित असतांना मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.३३९/१, दि.२०.०३.२००१ अन्वये प्रभाग समिती "क" चे कार्यालय रेल्वे स्टेशन झोन क्र.६ ऐवजी झोन क्र.४ क्रांतीचौक व प्रभाग समिती "३" चे कार्यालय चिकलठाणा झोन क्र.५ ऐवजी एन-७ झोन कार्यालय अशी मंजूरी देण्यात आलेली आहे.

परंतू, सदरील ठिकाणी जागे अभावी प्रभाग समिती "क" व "ड" चे समिती कार्यालय स्थापने शक्य होत नाही. त्यानुसार प्रभाग समिती "क" चे कार्यालय झोन क्र.४ ऐवजी त्याच्याच पाठीमागे रमानगर येथील आरोग्य केंद्राच्या शेजारी अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या दुमजली इमारतीत तळ मजल्यावर प्रस्तावित करण्यांत येत आहे. तसेच प्रभाग समिती "ड" येथे नव्याने बांधण्यात आलेल्या व्यापारी संकुलाच्या पहिल्या मजल्यावर प्रस्तावित करण्यांत येत आहे.

त्यानुसार उपरोक्त सादर केल्याप्रमाणे प्रभाग समिती "क" व "ड" चे कार्यालय स्थापनेचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**मा.महापौर :** सदरील प्रस्तावातील प्रभाग समिती "क" चे कार्यालय सभापती यांचे दालन झोन क्र.४ येथेच असावे व प्रभाग समिती सभागृह रमानगर येथील महानगरपालिकेच्या इमारतीत ठेवण्यास दुरुस्ती करुन मंजूरी देण्यांत येते. प्रभाग समिती "ड" चे कार्यालय आहे तेथेच राहील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा ठराव क्र.३३९/१ दिनांक २०.०३.२००१ च्या दुरुस्तीप्रमाणे प्रभाग समिती "क" करिता झोन क्र.४ येथे प्रभाग समितीचे कार्यालय स्थापन करणे शक्य नसल्याने प्रभाग समिती "क" करिता सभापती दालन हे झोन क्र.४ येथे आणि समिती सभागृह हे झोन क्र.४ ऐवजी याच झोन मागे असलेल्या रमानगर येथे आरोग्य केंद्राच्या शेजारी असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या दुमजली इमारतीत तळमजल्यावर समिती सभागृह प्रस्तावित करण्याच्या दुरुस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र.४२७/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र जा.क्र./राप्रौशि/रासाके/औरंगाबाद/नियुक्ती/११२८/का-४, दि.०४.०६.२००१ अन्वये डॉ.(सौ) ज्ञानदा भाग्यरवी कुलकर्णी, सांस्कृतिक अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांची संचालक, राज्य साधन केंद्र औरंगाबाद पदासाठी निवड केलेली आहे. सदरील नियुक्ती ही प्रतिनियुक्ती दोन वर्षाचे कालावधीसाठी करण्यांत आलेली आहे.

करिता महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (पदग्रहण अवधी, स्वियेतर सेवा ई.) मधील तरतूदीस अधिन राहून डॉ.(सौ) ज्ञानदा कुलकर्णी, सांस्कृतिक अधिकारी यांना संचालक, राज्य साधन केंद्र औरंगाबाद या पदावर दोन वर्षासाठी प्रति नियुक्तीने पाठविणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेचे विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**श्री.भगवान घडामोडे :** शिक्षणाधिकारी पद कधी भरणार या पदाचा चार्ज अदलून बदलून दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे देण्यात येतो. शिक्षणा सारख्या क्षेत्रात व्यत्यय येत आहे. जवळपास ३० ते ३५ हजार विद्यार्थी आपल्या शाळेत शिक्षण घेत आहेत. महानगरपालिकेच्या शाळेत गरीब व मध्यम वर्गातील लोकांची मुले असतात. महानगरपालिकेच्या शाळेचा दर्जा कमी होऊ नये म्हणून शिक्षणाधिकारी नेमावेत. एकूण ८१ शाळा असून दुरावस्था थांबवावी. व गरीब लोकांच्या मुलांना न्याय मिळावा अशी विनंती आहे.

**मा.महापौर :** डेपूटेशन वर कोणी शिक्षणाधिकारी न आल्याने सध्या आपल्याकडे शिक्षणाधिकारी नाही. शिक्षणाधिकारी पदा बरोबरच उपशिक्षणाधिकारी हे पद सुध्दा असावे. म्हणून ठराव मंजूर केला. शिक्षणाधिकारी पदावर शासनाचे कुणी आलेले नाही ते येईपर्यंत शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज प्रकल्प संचालक यांचेकडे देण्यात येत आहे. त्यांनी उद्यापासूनच शिक्षणाधिकारी पदाचे काम

करावे. दोन उपशिक्षणाधिकारी म्हणून शिक्षकांमधून भरण्या बाबत कार्यवाही केली जाईल.

**श्री.भगवान रगडे :** जे जेष्ठ मुख्याध्यापक असतील त्यांना चार्ज देण्यात यावा.

**श्री.स.अली मिरा सलामी :** प्रकल्प संचालक, यांना शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज देत आहे ते सक्षम आहे परंतू जे शिक्षण विभागातील बी.ए.एड व जेष्ठ जे मुख्याध्यापक आहे. त्यांनी संधी देण्यात यावी. त्यांनी निवेदन ही दिलेले आहे. त्यांचा विचार होत नाही.

**मा.महापौर :** या अगोदर या पदाचा चार्ज सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांचेकडे द्यावा. काही सदस्यांनी जेष्ठ शिक्षक जे असतील. त्यांचेकडे द्यावा. अशी सूचना केली. त्यामुळे सभागृहात गोंधळ निर्माण झाला होता. त्यामुळे उपआयुक्त (प्र.) यांचेकडे आपण चार्ज दिलेला आहे. शिक्षणामध्ये सुध्दा दोन गट आहे. म्हणून वाद निर्माण होत आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** जे जेष्ठ मुख्याध्यापक पदावर काम करतात. त्यांना देण्यांत यावे. शिक्षकांमध्ये गेट वगैरे आहे अशी भावना ठेऊन वेगळा निर्णय घेऊ नये.

**श्री.अफसरखान :** जे जेष्ठ मुख्याध्यापक आहे. त्यांना शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज देण्यात यावा. चुकीचा निर्णय आपण घेत असतील तर मी निषेध करुन सभागृहाबाहेर जात आहे. (याचवेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालू असावे काहीही ऐकू येत नाही. स.सदस्य श्री.अफसरखॉन, यासीनखॉन यांनी निषेध करुन सभागृहा बाहेर जातात.)

**मा.महापौर :** सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**श्री.शे.ईसाक शे.जैनोद्दीन :** नियमाचा भंगन करता जेष्ठ मुख्याध्यापक यांना शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज देण्यात यावा.

**मा.महापौर :** शाहेत ३० ते ३५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सभागृहात नेहमी चर्चा होते. महानगरपालिकेच्या शाळेची परिस्थिती चांगली आहे. विद्यार्थ्यांना गणवेश दिला जातो. वह्या पुस्तके दिली जातात. गरीब लोकांची मुले आपल्या शाळेत आहे याची जाणीव सर्वांना आहे. शिक्षणाधिकारी तात्काळ मिळावे म्हणून शासनाककडे मागणी केलेली आहे. मी स्वत: या संदर्भात पाठक म्हणून सचिव आहे. त्यांची भेट घेतलेली आहे. तत्कालीन आयुक्त यांनी सुध्दा पत्र देऊन विनंती केलेली आहे. तरी शिक्षणाधिकारी दिलेले नाही. आणि तात्काळ या पदावर अधिकारी आले नाही. तर पुढील वर्षी आणखी विद्यार्थ्यांची संख्या कमी होईल. म्हणून मागील एका सभेत शिक्षणाधिकारी सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांना काढून जेष्ठ मुख्याध्यापकांना पद द्यावे म्हणून ठराव घेतला त्यानुसार कार्यवाही होऊन शिक्षकामध्ये सुध्दा ३ ते ४ संघटना असून प्रत्येक संघटनेचे शिक्षक मला येऊन भेटले. त्यामुळे चार्ज नेमका कुणास द्यायचा असा प्रश्न निर्माण होत होता. म्हणून आपण पुन्हा सर्वसाधारण सभेत चर्चा करुन उपआयुक्त (प्र.) यांचेकडे चार्ज दिला. परंतू त्यांना त्यांचे पद सांभाळून या पदावर काम करणे शक्य होत नाही. म्हणून डेप्युटेशनवर जोपर्यंत शिक्षणाधिकारी येत नाही. तोपर्यंत अधिकाऱ्या मधूनच घ्यावे असा निर्णय आपण घेतलेला आहे. व या बाबत प्रशासनाकडून सुध्दा मी माहिती घेऊनच प्रकल्प संचालक यांना शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज देण्यात येत आहे. त्यांनी त्या पदावर अगोदर काम केलेले आहे व तसा रिपोर्ट प्रशासनाचा आहे. म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात येते. तसेच यापुढे

एक उर्दू व एक मराठी माध्यम मधून शिक्षकातून तात्पुरते उपशिक्षणाधिकारी पद भरणे आवश्यक आहे व त्या उपशिक्षणाधिकारी यांनी ८-८ शिक्षकामधून केंद्र प्रमुख नेमावे. आपल्याकडे एकूण ४० पदे मुख्याध्यापक पदाची रिक्त आहेत. व त्यांच्या जेष्ठतेनुसार नियुक्त्या करणे व त्यांचे सर्व कामे हाताळणे उपआयुक्त यांना दोन्ही चार्ज सांभाळून शक्य नाही. म्हणून अधिकाऱ्यांमधून शिक्षणाधिकारी पदावर नेमणूक करणे आवश्यक होते. त्यासाठी प्रकल्प संचालक यांची या पदावर नियुक्ती केलेली आहे. आणखी कुणाचे नाव सुचवायचे असेल तशी सभागृहात स.सदस्यांनी चर्चा करावी.

**श्री.स.अली मिरा सलामी :** जेथे वाद निर्माण होईल अशा कर्मचाऱ्यांची नियुक्त करु नये. सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांचेकडे चार्ज दिला होता. त्यांचेकडून काढून जेष्ठ शिक्षक यांची नियुक्तीचा ठराव पास केला. त्यानंतर त्यांचा चार्ज काढून उपआयुक्त (प्र.) यांचेकडे देण्यात आला. किती संघटना असून शकतील कुणाचा विरोध असेल तर भाग वेगळा परंतू जे जेष्ठ शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून पदावर कार्यरत आहे. २ ते ३ महिन्याने एक मुख्याध्यापक निवृत्त होणार अशा कर्मचाऱ्यांना या पदाचा चार्ज दिल्यास त्यांचेवर अन्याय होणार नाही. त्यांनी काम केल्याचे समाधान होईल. त्यांचे सेवापट पुस्तकात नोंद होईल. मुख्याध्यापक या पदावर काम करु शकत नाही काय? पद देता येत नाही का? तसे असेल तर खुलासा करावा. शिक्षण विभाग सोडून इतर अधिकाऱ्यांना हे पद देऊन सभागृहात वादविवाद होत आहे. व महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांचे यात नुकसान होत आहे. ते टाळायचे नसेल तर कुणालाही द्यावे आमचा विरोध नाही.

**श्री.नंदकुमार घोडेले :** प्रशासनाने ज्या नावाची शिफारस केली त्यांची शिफारस आपण केलेली आहे. यास विरोध करणे बरोबर नाही.

**श्री.स.अली मिरा सलामी :** प्रशासनाने ज्या अधिकाऱ्यांची आपल्याकडे शिफारस केली हे काम प्रशासनाने होते. सभागृहात त्यावर चर्चा करण्याची गरज नाही.

**सौ.निखत परवीन ईजाज :** जे व्यवस्थित काम करतील त्यांची नियुक्ती करावी. आजची परिस्थितीत महानगरपालिकेच्या शाळेचे शिक्षक आहे. परंतू मुले कमी येतात. मुलांना कपडे, वह्या, पुस्तके देण्यांत येतात. परंतू जे शिक्षक आहे ते शिकवत नाही. मुलांना नाव सुध्दा लिहिता येत नाही. व इतर शाळेत मुले गेल्यास ॲडमिशन देत नाही.

**श्री.भगवान रगडे :** शिक्षणाधिकारी व शिक्षक नियमित असावे म्हणून सभागृहात चर्चा झालेली १ वर्षापासून अशा प्रकारे सभागृहात नेहमीच चर्चा होते. आतापर्यंत का कार्यवाही झालेली नाही. मुख्याध्यापकांमध्ये जे जेष्ठ आहेत. त्यांना या पदावर तात्पुरता चार्ज देण्यात यावा. श्री.शिर्के आहेत. त्यांना देण्यास हरकत नाही. शासनाचे कडून शिक्षणाधिकारी येण्यास वेळ लागत असेल तर मुख्याध्यापकामधून या पदावर कायम स्वरुपी शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती करावी. अशी आमची मागणी आहे. श्री.जावरे यांचेकडे गलिच्छ वस्ती सर्वे घरकुल योजना ई.अनेक कामे दिलेले आहेत. प्रकल्प संचालक यांचेकडे या पदाचा चार्ज देत असतील तर इतर सर्व चार्ज काढून घ्यावेत. ज्येष्ठ शिक्षकांमधून शिक्षण अधिकारी नेमावा.

**मा.महापौर :** ज्याप्रमाणे रस्ते, लाईट, पाणी या सर्व सुविधा असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणात शिक्षण हे सुध्दा महत्वाचे आहे. शिक्षणाधिकारी या पदावर तात्पुरता

चार्ज शिक्षकामधून जे ज्येष्ठ असतील त्यांना द्यावा म्हणून निर्णय आपण घेतलेला होता परंतू बैठक संपल्यानुसार किमान ३-४ संघटनेचे कर्मचारी निवेदन घेऊन येतात. मलाच चार्ज द्यावा अशी मागणी करतात असे अंतर्गत वाद आहे हे काही बरोबर नाही. वेगळे राजकारण चालू झालेले म्हणून डेप्युटेशनवर जो पर्यंत अधिकारी शासनाकडून येत नाही दुसरे अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल. आपण २-३ अधिकाऱ्यांची नावे द्यावी.

**श्री.गायकवाड राधाकृष्ण :** श्री.शिंक्रेचे नांव आले होते. सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांनी १४ महिन्यात चांगले प्रकारे काम केले. त्यांनाच कायम स्वरुपी या पदावर नेमणूक द्यावी अशी माझी मागणी आहे. ही कार्यवाही होत नसेल तर आताच आपण प्रकल्प संचालक श्री.जावरे यांचे नाव सुचवले ते योग्य असून त्यांचेकडे हे पद द्यावे. शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा असे तर सक्षम अधिकारी देणे गरजेचे आहे. आजची परिस्थिती पाहता महानगरपालिकेच्या शाळेत ४ ते ५ वर्गात शिक्षण घेत असलेल्या मुलांना नांव लिहिता येत नाही तर आपले शिक्षक काय करतात. मागे जवळ म्हणून शिक्षक यांना चार्ज दिला त्यांनी फार चुका केल्या होत्या. ते सुध्दा जिल्हा परिषद मधून येथे आलेले होते. आणि श्री.शिक्रे हे सुध्दा जिल्हा परिषदेमधून आपल्याकडे आलेले आहे. परत काही वाद होऊ नये. म्हणून आपण उपआयुक्त (प्र.) यांचेकडे चार्ज दिला होता. सौ.कुलकर्णी या सक्षम आहे. त्यांचेकडे चार्ज द्यावा नसता प्रकल्प संचालक यांना या पदावर नियुक्ती द्यावी.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** प्रकल्प संचालक यांना शिक्षणाधिकारी पद देण्यास आमचा विरोध नाही परंतू ज्यांनी १४ महिने या पदावर काम केले. अशा सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांना २-४ नगरसेवकांचे काही खाजगी रित्या काम केले. नसेल म्हणून ऐनवेळी प्रस्ताव घेऊन त्याची पात्रता नाही म्हणून काढून टाकले आता जावरे साहेब यांना चार्ज देणार तर त्यांची पात्रता आहे काय. तसेच त्यांचे विषयी कुणी तक्रार केल्यास त्यांना सुध्दा त्या पदावरुन काढून टाकणार का? याचा खुलासा द्यावा. तीच परिस्थिती निर्माण होईल म्हणून पात्र कर्मचाऱ्यांमधून शिक्षणाधिकारी पदावर नेमणूक करावी.

**श्री.जयवंत ओक :** शिक्षणाधिकारी या पदासंदर्भात नेहमीच सभागृहात आरोप प्रत्यारोप होतात. एखाद्या नगरसेवकांचे पर्सनल काम झाले नाही. म्हणून अधिकाऱ्यांवर आरोप करणे बरोबर नाही. नेहमीच सभागृहात जातीवादावर चर्चा होते. त्याबद्दल मी सभागृहात निषेध करतो. सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांना शिक्षणाधिकारी पदावर ठेवण्याबाबत दखल घेतली नाही. परंतू शासनाने त्यांना उपसंचालक केले. त्यांचे विषयी सभागृहात मागील इतिहास बघितला तर महापौर, आयुक्त, सभापती यांना हाताशी धरुन कर्मचाऱ्यांनी वाटेल त्या खुर्च्या बळकावलेल्या आहे. याची जाणीव आपण सर्वांना आहे. केवळ कुलकर्णी होते. म्हणून विरोध होता. प्रकल्प संचालक यांना आपण चार्ज द्यावा आमचा विरोध नाही. परंतू २-४ नगरसेवकांचा विरोध दर्शवून आपण त्यांना काढून टाकले. त्यांच्या कामाचा विचार केलेला नाही. परंतू शासनाने विचार करुन त्यांना उपसंचालक पदावर नेमणूक केली ठीक आहे. त्यांना दोन वर्षासाठी पाठवावे. प्रस्ताव मंजूर करावा. आपण मुंबईला जाणार आहेत. महानगरपालिकेच्या शाळेची परिस्थिती मुख्यमंत्र्यांना सांगावी. १ ते ७ पर्यंत शिक्षण घेणारे किती विद्यार्थी गुणवत्ता यादीत आहे. १ ते ५ पर्यंत

मुलांना १,२,३ पर्यंत पाढे येत नाही. गोरगरीबांची मुले शिक्षण घेतात. त्यांना वाचता लिहिता येत नसून झोपडपट्टीच्या मुलांना शिक्षण देण्याची गरज आहे.

**श्री.पंडागळे रतनकुमार :** स.सदस्य मा.उपमहापौर वसंत नरवडे पाटील व मी स्वतः त्यांचे बरोबर शाळेच्या अडीअडचणी काय आहे म्हणून भेटी दिल्या. त्यावेळी मी प्रत्येक शाळेतील शिक्षकांना विचारणा केली की या शाळेत शिक्षकांपैकी त्यांची किती मुले महानगरपालिकेच्या शाळेत आहे. यावर असे उत्तर मिळाले की, शिक्षकांचे महानगरपालिकेच्या शाळेत मुले नाही. हे शिक्षक महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांना चांगले वळण लावू शकत नाही. कालच प्रगती कॉलनी येथील शाळेत भेट दिली तेथे बालवाडी शिक्षीका होत्या. त्यांचे शाळेत भांडण चालू होते. अशी परिस्थितीत मुलांवर परिणाम होऊ शकतो. म्हणून या पदावर शिक्षकामधून भरती करायची असेल तर तसे गुण शिक्षकांमध्ये सुध्दा असले पाहिजे. त्यांनी किती गुण प्राप्त केले. याचा सुध्दा विचार व्हावयास पाहिजे. जे नांव प्रशासनाने सुचवले याबाबत विचार व्हावा. परंतू शिक्षणाचा दर्जा कसा उंचावेल. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. प्रगती कॉलनी येथील शाळेत शिक्षक नाही म्हणून १ ली च्या वर्गात फक्त ८ ॲडमिशन झाले. अशी परिस्थिती असेल तर यात महानगरपालिकेची बदनामी होत आहे. व जो विश्वास आहे. तो जनतेच्या मनातून निघून जाईल.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** शिक्षणाधिकारी पदाचा ६ महिन्यापासून वाद चालू आहे. सक्षम अधिकारी असावे म्हणून चर्चा झालेली आहे. या अगोदर सुध्दा चर्चा झालेली होती. सौ.ज्ञानदा कुलकर्णी याची बदली करावयाची नव्हती केली आता प्रकल्प संचालक यांना कार्यभार देण्याबाबत घेतलेला निर्णय कायम करावा.

**श्री.तकी हसन खान :** प्रश्न शिक्षणाचा असून कोणत्याच अधिकाऱ्यांवर १००% विश्वास नाही. एका अधिकाऱ्यांची तात्पुरती नियुक्ती केली. पुन्हा दुसरे अधिकाऱ्यांना चार्ज दिला तरी सुध्दा वाद निर्माण झाले. त्यामुळे काम करणे अवघड झाले आहे. सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांचे संदर्भात जातीवाद झाला म्हणून चर्चा झाली. त्यावेळी आम्ही सुध्दा त्यांचे विरोधात नव्हतो. त्यांचे जवळ शिक्षण पदवी नव्हती. श्री.जावरे यांना तात्पुरते शिक्षण अधिकारी करावे किंवा शिक्षक मुख्याध्यापकांमधून करावे असे सभागृहात सुचविण्यांत आले. दुःखाने सांगावे लागते. मुख्याध्यापकच जर आज कर्तबगार असते तर शिक्षणावर बरे वाईट कोणीही बोलले नव्हते. मुख्याध्यापक सक्षम असते तर महानगरपालिकेच्या शाळेचा दर्जा खालावला नसता. शिक्षण नसेल तर शाळा चालू शकत नाही. आपण प्रकल्प संचालक यांना या पदावर देणार हा निर्णय घेत आहोत. यास आमची मान्यता आहे. तसेच दोन उपशिक्षणाधिकारी जेष्ठ शिक्षकांमधून तात्पुरते नेमण्यात यावे. असे आपण म्हटले हे करित असतांना नुसती जेष्ठता न पाहता त्यांची गुणवत्ता सी.आर. सचोटी तपासूनच कार्यवाही व्हावी. व आपण सुचलेल्या नावात कुणाचा विरोध होणार नाही. व २-३ महिन्यात शाळेची परिस्थिती काय लक्षात येईलच. श्री.जावरे यांना या पदावर देण्यात यावे. व गरीब मुलांवर शिक्षणाच्या बाबतीत अन्याय होणार नाही. याची सभागृहानेच काळजी घेणे गरजेचे आहे.

**सौ.राहटकर विजया :** शिक्षणाधिकारी पदावर श्री.जावरे यांची नियुक्ती करण्याचा आपण निर्णय घेतला ते सक्षम आहेत. या पदावर काम करु शकतात यात शंका

नाही. हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष आहे. महानगरपालिकेमध्ये केवळ २-३ महिला अधिकारी पदावर आहे. सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांनी या पदाव सक्षमरित्या काम केलेले होते. परंतू दुर्देवाने सांगावेसे वाटते की, या सभागृहात निर्णय होऊन त्यांना पदावरुन कमी करण्यात आले. एका महिला अधिकाऱ्यांवर अन्याय झाला आहे. त्यांनी त्यांचे पदावर आवश्य जावे आमची मान्यता राहील. परंतू महिला अधिकारी पदाच्या संदर्भात यापुढे वाद निर्माण होऊ नये अशी अपेक्षा करते.

**श्री.भगवान रगडे :** मिसारवाडी स्लम घोषित केले. तेथे काही कामाचे आपण उद्घाटन केले. अद्याप कामे तशीच पडून आहे. केव्हा होणार खुलासा करावा.

**मा.महापौर :** या सभागृहाने ठराव मंजूर केला म्हणून सर्व कार्यवाही होते असे मानता येणार नाही. आपण मान्यता दिलेली प्रस्ताव शासनाकडे जातात. शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाते. या संदर्भात आपणास मी सूचना केली होती. प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यांत येईल. तेथे जाऊन आपणांस पाठपुरावा करावा लागेल. तसे प्रयत्न आपण करावे प्रशासनामार्फत कार्यवाही केली जाते या संदर्भात आपणास मी सूचना केली होती. प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यांत येईल. तेथे जाऊन आपणांस पाठपुरावा करावा लागेल. तसे प्रयत्न आपण करावे प्रशासनामार्फत कार्यवाही केली जाईल.

**श्री.भगवान रगडे :** शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज डॉ.देशपांडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडे द्यावा. अशी माझी विनंती आहे. मुलांचे आरोग्य चांगले राहील. मुले डॉक्टर होतील. किंवा उपआयुक्त यांचेकडेच चार्ज ठेवावा.

**मा.महापौर :** शिक्षणाधिकारी डेप्युटेशनवर आपल्याकडे येतात परंतू ते न आल्याने या विभागाचा दर्जा खालावत असून कायम शिक्षणाधिकारी असावे म्हणून मागणी होत आहे. यासाठी आपल्याकडे जी निवड समिती आहे. त्यांनी योग्य रितीने कार्यवाही करावी. उपआयुक्त यांचेकडे चार्ज दिल्यास त्यांना कामे करता येत नाही. त्यांचकडे चार्ज दिल्यास त्यांना कामे करता येत नाही. त्यांचेकडे वेळ नसतो म्हणून या पदावर दुसऱ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

**श्री.जयवंत ओक :** स.स.श्री. पंडागळे यांनी केलेली सूचना बरोबर आहे. महानगरपालिकेच्या शाळेतील कार्यरत शिक्षकांची मुले महानगरपालिकेच्या शाळेत नाही. ती शाळेत असली पाहिजे असे सक्तीचे करावे त्यामुळे शाळेचा दर्जा उंचावेल.

**मा.महापौर :** कोणत्या व कुणाच्या मुलांना कुठे शिक्षण द्यायचे याची सक्ती करण्याचा निर्णय सभागृहात येता येणार नाही. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी सभागृहाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. जर शिक्षणाचा दर्जा सुधारला तर सर्वांचीच मुले महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेतील. सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांना उपसंचालक या पदावर जाण्यासाठी या मनपातून २ वर्षासाठीचा ठराव मंजूर करण्यात येतो. सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात येते. व प्रकल्प संचालक यांनी शिक्षणाधिकारी पदावर काम करावे.

**श्री.जयवंत ओक :** सिध्दार्थ उद्यान मधील एका वाघाचे कॅन्सर चा रोगावर डॉ.रझवी यांच्या सहकार्याने औषधोपचार करण्यात येऊन ते यशस्वी केले त्या डॉक्टरांचे या सभागृहातर्फे अभिनंदन केले पाहिजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (पदग्रहाण अवधी स्वियेत्तर सेवा इ.) मधील तरतूदीस अधिन राहून शिक्षण संचालक प्रौढ शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक राप्रौशि/रासाके/औरंगाबाद/नियुक्ती/११२८/का-४, दि.०४.०६.२००१ अन्वये डॉ.सौ.ज्ञानदा भाग्यरवी कुलकर्णी यांना शिक्षण संचालक, प्रौढ शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्रानुसार संचालक, राज्य साधन केंद्र औरंगाबाद या पदावर दोन वर्षाच्या प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र.४२८/४ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, शासनामार्फत महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.पी.एफ.ए/२५८६/२९५/१३७६/एम-३-डी-८/दि.१२.०१.१९९० द्वारे हॉटेलचा दर्जा व परवाना फिस बाबत अधिसूचना प्रसिध्द केली असून त्यात खालीलप्रमाणे दर्जा दर्शविलेला आहेत.

१. पाच व चार तारांकित.
२. तीन तारांकित.
३. हॉटेल व रेस्टॉरंट.
४. भोजनालय, घरगुती खानावळ व धाबा.
५. चहा स्टॉल.

वरीलप्रमाणे हॉटेलचे ग्रेडींग (दर्जा) शासनामार्फत ठरविण्यांत आलेला आहे. तथापि संबंधित दर्जा बाबत वेळोवेळी पाहणी करणे, सूचना देणेसाठी खालील प्रमाणे महानगरपालिका मार्फत एक कमिटी स्थापन करण्यात यावी. त्यासाठी खालील प्रमाणे पदाधिकारी राहतील.

**<u>ग्रेडेशन कमिटी</u>**

१. आरोग्य वैद्यकीय अधिकारी
२. मुख्य लेखा परिक्षक
३. शहर अभियंता
४. अन्न निरिक्षक
५. दोन सन्माननीय नगरसेवक
६. हॉटले असोसिएशेनचे पदाधिकारी

वरीलप्रमाणे पदाधिकारी नेमण्यात येवून ज्याप्रमाणे नाशिक महानगरपालिकेने हॉटेलचा दर्जा बाबत अवलंब केला आहे. त्याधर्तीवर मनपा मार्फत वरील योजना राबविण्यांत यावी. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**मा.महापौर :** शहरातील वेगवेगळ्या हॉटेल्स यांना दर्जा देण्याचे शासनाचे परिपत्रक आलेले असून दर्जा देण्याचे काम ग्रेडेशन कमिटी मार्फत करण्यात येणार आहे. यात मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, अन्न निरिक्षक, दोन स.सदस्य आणि हॉटेल्स असोशिएशनचे पदाधिकारी हे शहरातील यासाठी आपणांस दोन सदस्यांची निवड करायची आहे. त्यात स.सदस्य श्री.शेख सलीम शेख युसूफ तसेच स.सौ.सुवर्णा चंद्रात्रे, स.श्री.दत्तात्रय थोरात यांचा समावेश करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन राजपत्र क्र.पी.एफ.ए./२५८६/२९५८/१३७६/एम.इ.डी.-८, दि.१२.०१.१९९० अन्वये हॉटेलचा दर्जा व परवाना फीस ठरविण्याबाबत प्रसिध्द इ ाालेल्या अधिसूचनेप्रमाणे दर्जा बाबत वेळोवेळी पाहणी करणे, सूचना देणे यासाठी खालील प्रमाणे कमिटी स्थापन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**<u>ग्रेडेशन कमिटी</u>**

१. आरोग्य वैद्यकीय अधिकारी
२. मुख्य लेखा परिक्षक
३. शहर अभियंता
४. अन्न निरिक्षक
५. सन्माननीय सभासद
१) श्री.शे. सलीम शे. युसूफ, २) सौ.सुवर्णा चंद्रात्रे ३) श्री.दत्तात्रय थोरात
६. हॉटले असोसिएशेनचे पदाधिकारी

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२९/५ :**

विद्यापीठ गेटपासून पी.ई.एस.सोसायटीच्या जागेतून पानचक्की कडे जाणारा ६० फुटाचा रस्ता विकास आराखड्यातून वगळण्यात यावा. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.गणेश तांबे,
**अनुमोदक :** श्री.प्रकाश निकाळजे,
श्री.राजु शिंदे,
श्री.रतनकुमार पंडागळे.

**मा.महापौर :** हा प्रस्ताव मंजूर करुन त्वरीत मॉयनर बॉडीफिकेशनचा प्रस्ताव शासनास पाठवावा सदरील रस्ता वगळण्यात यावा व त्याची प्रत पिपल्स एज्युकेशन सोसायटीस देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्यापीठ गेट पासून पी.ई.एस.सोसायटीच्या जागेतून पानचक्कीकडे जाणारा ६० फुटाचा रस्ता विकास आराखड्यातून वगळण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३०/६ :**

भिमनगर भावसिंगपुरा वार्ड क्र.२ मधील सर्वे नं.३२ मध्ये नियोजित विकास आराखड्याप्रमाणे गार्डन १४६, खेळाचे मैदान १४७, प्रा.शाळा या करिता जागा आरक्षित करण्यात आली आहे.

परंतू या आरक्षित भागात काही लोकांनी २०X३० चे प्लॉट विक्री केले आहेत. व त्या ठिकाणी काही प्लॉटधारक घर बांधण्याच्या तयारीत आहे. करिता सदरील आरक्षित जागा

ताब्यात घेऊन मनपा मालकीचा बोर्ड लावावा व सदरील ठिकाणी कंपाऊंड वाल बांधावे. जेणेकरुन सदरील जागेवर अतिक्रमण होणार नाही. करिता ठराव सर्वसाधारण सभेत मांडण्यात येतो.

**सुचक :** श्री.गणेश तांबे,

**अनुमोदक :** श्री.माणिक साळवे.

**मा.महापौर :** सर्वानुमते हा विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२ भिमनगर भावसिंगपुरा येथील सर्वे नं.३२ मधील आरक्षण क्र.१४६ गार्डन व आरक्षण क्र.१४७ खेळाचे मैदान यासाठी आरक्षित असलेल्या जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणून या जागेवर महानगरपालिकेच्या मालकीचा बोर्ड लावून सदरील जागेस कंपाऊंड वॉल बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३१/७ :**

भिमनगर भावसिंगपुरा सर्वे नं.४६ ला लागून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची जागेची बॉंड्री आहे. या ठिकाणी भिमनगर येथील नागरिकांचे १९७० पासून घरे आहेत व त्यांना भिमनगर मधील मुख्य रस्त्याकडे येण्याकरिता आपल्या विद्यापीठाच्या जागेतून यावे जावे लागते. करिता दक्षिणोत्तर विद्यापीठ जागेतून पाच मीटर रुंदीचा रस्ता भिमनगर, भावसिंगपुरा येथील नागरिकांना देणे आवश्यक असल्यामुळे सदरील ठराव या बैठकीत मंजूर करावा.

**सुचक :** श्री.गणेश तांबे,

**अनुमोदक :** श्री.माणिक साळवे.

**मा.महापौर :** हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर, भावसिंगपुरा येथील सर्वे नं.४६ ला लागून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची बॉंड्री आहे. भिमनगर येथील नागरिकांना मुख्य रस्त्याकडे येण्यासाठी विद्यापीठाच्या जागेतून जावे यावे लागते. याबाबींचा विचार करता विद्यापीठाच्या जागेतून दक्षिणोत्तर पांच मीटर रुंदीचा रस्ता या नागरिकांसाठी देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३२/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, फाजलपुरा येथील नाल्यावर संरक्षण भिंत बांधणेसाठी येथील नागरिकांची आग्रहाची मागणी केलेली असून पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षण मिळण्यासाठी सदरील नाल्यावर संरक्षित भिंत बांधणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी सदरील कामासाठी आवश्यक असलेला पुरेसा बजेट येत्या सर्वसाधारण सभेत सदरील प्रस्ताव ठेवण्यांत यावा व बजेट मंजूर करण्यात यावे.

**सुचक :** श्री.बाळासाहेब थोरात,

**अनुमोदक :** श्री.भरत लकडे,
श्री.आनंद तांदुळवाडीकर

**मा.महापौर :** हा प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे. सिडको भागात नाट्यगृह बांधणे या लेखा शिर्षातून रु.१४ लाख पर्यंत रक्कम वळती करावी. मुख्य लेखाधिकारी यांनी बजेट मध्ये तशी तरतूद करुन हे संरक्षित भिंतीचे काम करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे फाजीलपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे आवश्यक असल्यामुळे या कामासाठी आवश्यक बजेट सिडको भागात नाट्यगृह बांधणे या लेखाशिर्षातून रु.१४ लाख पर्यंत रक्कम वळती करुन उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३३/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती स्थापन झालेली असल्याने इतर पदाधिकारी यांच्या प्रमाणे सभापती व उपसभापती यांना कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतासाठी चहापाणी व्यवस्था करण्याकरिता पाहूणचार भत्ता म्हणून प्रत्येकी रु.१,०००/- प्रति महा मंजूर करण्यांत यावे आणि सभापती व उपसभापती यांच्या निवासस्थानी महानगरपालिकेतर्फे दुरध्वनी व्यवस्था उपलब्ध करुन देण्यांत यावी.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.जयश्री कुमारराव मोरे,
**अनुमोदक :** सौ.सुवर्णा चंद्रात्रे.

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महिला व बालकल्याण समितीचे सभापती व उपसभापती यांचे कार्यालयात येणाऱ्या अभ्यंगतासाठी चहापान व्यवस्था प्रतिमहा रु.१,०००/- पाहूनचार भत्ता आणि सभापती व उपसभापती यांचे निवासस्थानी दुरध्वनी व्यवस्था उपलब्ध करुन देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३४/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५२ अविष्कार कॉलनी साईनगर येथील शॉपींग सेंटरचे पाठीमागे महानगरपालिकेची खुली जागा आहे. त्या ठिकाणी मंगल कार्यालयाचे बांधकाम करण्यात यावे.

त्यामुळे साईनगर व अविष्कार कॉलनीतील नागरिकांची सुविधा होईल व महानगरपालिकेस फायदा होईल.

**सुचक :** श्री.नारायण अण्णा सुरगोणीवार,
श्री.काशिनाथ कोकाटे,

**अनुमोदक :** श्री.किशोर तुळशीबागवाले,
श्री.मिर हिदायत अली.

**मा.महापौर :** सर्वानुमते हा विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५२ अविष्कार कॉलनी साईनगर येथील शॉपींग सेंटरचे पाठीमागे महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर मंगल कार्यालय बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३५/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.१२ संजय नगर येथील उद्यानास डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान महानगरपालिका असे नांव देण्यांत यावे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** सौ.लिलावती घायतिलक,
श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी.
**अनुमोदक :** श्री.कैसर खान बद्रोद्दीन.

**मा.महापौर :** सर्वानुमते हा विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१२ संजय नगर येथील उद्यानास "डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, महानगरपालिका" असे नांव देण्यांत सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३६/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वार्डाच्या शेजारी जळगांव रोड वरती मोंढा चौक आहे. व त्या चौकास पुर्वीचे "अहिल्याबाई होळकर" नांव देण्यांत आलेले आहे. परंतू अधिकृत नाव नाही. अहिल्याबाई हया जनतेला चांगल्या शिकवण्यासाठी धडाधडीच्या कार्यकर्त्या होत्या व सर्वसाधारण समाजाला चांगल्या प्रकारे शिकवण देणारी आदर्श महिला होत्या तरी चांगले शिकवण देणारी महिला होत्या. तरी चांगले शिकवण देणारी महिला होती.

त्यासाठी त्या महिलांचे नांव अधिकृत नांव देण्याची मंजूरी सर्वसाधारण सभेत ठेवावा.

**सुचक :** सौ.जयश्री कुमारराव मोरे,
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे,
श्री.सुदाम सोनवणे.

**मा.महापौर :** सर्वानुमते हा विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४८ येथील जळगांव रोडवर असलेल्या चौकास "अहिल्याबाई होळकर चौक" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३७/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.६४ मधील नेहरु पॅलेस आवारात मनपाची प्रशस्त अशी जागा असून वार्डातील गोरगरीब, अल्पसंख्यांक मुस्लीम, ओ.बी.सी. व मागासवर्गीय समाजाकरिता महागाईच्या परिस्थिती मध्ये लग्नासाठी व विविध सांस्कृतिक कार्यक्रमासाठी निरंजन कॉलनी श्री.दत्त मंदिरासमोर असलेल्या सभागृहासारखे सांस्कृतिक सभागृह बांधण्यात यावे व त्याठिकाणी विविध महिला प्रशिक्षण केंद्र अंगणवाडी अशी कार्यक्रम राबवावे. करिता वरील सभागृह बांधणीस सर्वसाधारण सभेत मंजूरीसाठी ठराव सादर करीत आहे.

**सुचक :** सौ.चंद्रभागाबाई दाणे,
**अनुमोदक :** श्री.माणिक साळवे,
श्री.गणेश तांबे.

**मा.महापौर :** सर्वानुमते हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६४ मधील नेहरु पॅलेस आवारातील महानगरपालिकेच्या प्रशस्त जागेवर निरंजन कॉलनी दत्त मंदिरासमोर असलेल्या सभागृहासारखे सांस्कृतिक सभागृह चालू वर्षात बांधण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३८/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.नंदनवन कॉलनी येथे महानगरपालिकेची खुली जागा फार मोठी आहे. ज्याचा सि.टी.एस.नं. ---------------- असा असून या जागेवर कोणत्याही इतर व्यक्तीने अतिक्रमण करु नये. म्हणून त्या ठिकाणी सध्या महानगरपालिकेतर्फे संरक्षण भिंत बांधण्याची कार्यवाही होत आहे. तथापि सदरील जागा ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रिडांगण म्हणून येथील नागरिक वापर करित आहेत. तेव्हा त्या जागेची पाहणी करुन त्या ठिकाणी सभोवती गोल आकाराने दुकाने काढून "नंदनवन व्यापारी संकुल" उभारणी करावे व येथील नागरिकांच्या सोयीसाठी समाज मंदिर नाही. करिता या खुल्या जागेत एका बाजुला समाज मंदिर १५० x १५० चे मनपातर्फे बांधून द्यावे जेणेकरुन तेथील नागरिकांना त्या समाज मंदिराचा अधिकाधिक वापर सार्वजनिक रित्या करण्यांत येईल.

करिता अंदाजपत्रकात तशी तरतूद करुन उपरोक्त प्रस्ताव मंजूर करावा.

**सुचक :** श्री.सुनिल बी.वडागळे,
**अनुमोदक :** श्री.गणेश तांबे,
श्री.साहेबराव कावडे.

**मा.महापौर :** सर्वानुमते हा विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नंदनवन कॉलनी येथील संरक्षित भिंत बांधण्यात येत असलेल्या महानगरपालिकेच्या जागेची पाहणी करुन त्या ठिकाणी नंदनवन कॉलनी व्यापारी संकुल या नावाने गोल आकाराने दुकाने काढण्यास आणि १५० X १५० चे समाजमंदिर बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३९/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गेल्या वर्षापर्यंत स्वेच्छानिधीतून गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्याची तरतूद होती. पण या वर्षापासून साहित्य देणे बंद केले आहे. असे समजले. त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांचे खूप नुकसान होईल. आपल्या शहरामध्ये (मनपा हद्दीमध्ये) शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. आपण त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन स्वेच्छा निधीमधून शालेय साहित्य देण्याच्या ठराव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.नुसरत बानो फिरोज खान,

**अनुमोदक :** श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहमद.

**मा.महापौर :** मनपा शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नगरसेवक स्वेच्छानिधीतून शालेय साहित्य वाटप करण्यांत नियमाप्रमाणे सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता या विद्यार्थ्यांना नगरसेवक स्वेच्छानिधीतून शालेय साहित्य वाटप करण्यास नियमाप्रमाणे सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४०/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, साईनगर (म्हाडा कॉलनी) एन-६ मनपा शॉपिंग सेंटर चा पाठीमागे मनपाची खुली जागा आहे. तरी साईनगर हे एक मोठी वस्ती आहे आणि या भागामध्ये एकही समाज मंदिर व सांस्कृतिक सभागृह नाही. तरी आपणांस विनंती की, साईनगर येथील नागरिकांना सुविधा व त्या प्रभागाचे नागरिकांची मागणी लक्षात घेऊन या खुल्या जागेस एक समाजमंदिर बांधण्यांत यावा.

तरी प्रस्ताव सर्व सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सुरजितसिंह खुंगर

**अनुमोदक :** श्री.शेख ईसाक शेख जैनोद्दीन,

श्री.सलीम पटेल.

**मा.महापौर :** हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईनगर येथील नागरिकांसाठी एन-६ येथील महानगरपालिका शॉपींग सेंटरच्या मागील महानगरपालिकेच्या जागेवर समाज मंदिर बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४१/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कटकट गेट दरवाज्याचे नांव इस्लाम दरवाजा असून तेथे राहणाऱ्या नागरिकांचे असे मत आहे की वरील चौकास "इस्लाम चौक" नांव देण्यांत यावे.

**सुचक :** सौ.नुसरत बानो फिरोज खान,

**अनुमोदक :** श्री.स.सलीम स.युसूफ,

श्री.शेख मुनाफ शेख यासीन.

**मा.महापौर :** हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इस्लाम दरवाजा (कटकटगेट) येथील चौकास "इस्लाम चौक" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४२/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका कार्यालयात पदाधिकारी (महापौर, सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता) यांचेकडे प्रतिष्ठित नागरिकअभ्यगत व्यक्ती यांचे आगमन व पदाधिकारी यांचे दालनात वेळोवेळी होणाऱ्या बैठका या वेळी चहापान करावा लागतो. या चहापाना प्रित्यर्थ दरमहा तीन ते चार हजारा पर्यंत चहापान खर्च होतो. तथापि महापौर दालनात वेळावेळी जास्त प्रमाणात बैठका होत असल्यामुळे सहाजिकच सदरचा खर्च जास्त प्रमाणात होतो. तथापि या खर्चावर प्रशासनामार्फत मर्यादा घालून देण्यात आल्यामुळे देयके अदा करणेस अडचण निर्माण होत आहे.

करिता पदाधिकारी यांचेकडील दालनावर होणाऱ्या चहापान खर्चाबाबत मर्यादा वाढवून देणेचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.गणेश तांबे,

श्री.संजय शिरसाट,

**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे,

श्री.राजु आर. शिंदे,

श्री.सुदाम सोनवणे.

**मा.महापौर :** पुर्वी ज्या पध्दतीने खर्च होत होता त्याप्रमाणे मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका पदाधिकारी (महापौर, सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता) यांच्याकडे प्रतिदिन नागरिक, अभ्यंगत व वेळोवेळी होणाऱ्या बैठका यामुळे चहापानावरील खर्च जास्त प्रमाणात होत असल्यामुळे पदाधिकाऱ्यांच्या दालनावरील

चहापान खर्च पूर्वी ज्या पध्दतीने खर्च होत होता त्याप्रमाणे वाढवून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४३/१९ :**

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करण्यांत येतो की, पैठणगेट संबंधित नगर सेवक सय्यद अली सलामी यांचे स्वेच्छा निधी मधून (आर्थिक वर्ष २०००-२००१) रु.२,००,०००/- रुपये दोन लाख वापरुन पैठणगेट लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांच्या पुतळ्या समोर लाईटींग टॉवर लावण्यांत यावे. जास्तीच्या खर्चासह सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सय्यद अली सलामी,

**अनुमोदक :** श्री.शेख मुनाफ शेख यासीन.

**मा.महापौर :** हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट येथील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुतळ्या समोर नगरसेवक श्री.स.अली सलामी यांच्या स्वेच्छानिधीतून (२०००-२००१) रु.२,००,०००/- (दोन लाख रुपये) वापरुन लाईटींग टॉवर (हायमास्ट) लावण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.महापौर :** मोंढा नाका ते जाफर गेट पर्यंत रस्ता रुंदीकरण व्हावा म्हणून ठराव मंजूर केलेले कार्यवाही काय झाली संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता, नगररचना :** मा.आयुक्त सध्या नाही. प्रपोजल तयार आहे. आयुक्त आल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

याचबरोबर जन-गण-मन या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३०.०६.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक ३०-६-२००१ रोजीची सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " येथे मा.महापौर, श्री.डॉ. भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली विशेष सर्वसाधारण सभेची "वंदेमातरम्" या गिताने सुरुवात झाली.

या सभेत महानगरपालिकेतील अधिकारी वर्गासह सन्माननीय नगरसेवक उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | स.स.श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | स.सभासद |
| २. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र | स.सभासद |
| ४. | स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहमद | स.सभासद |
| ५. | स.स.श्री. शिंदे राजु रामराव | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | स.सभासद |
| ८. | स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार | स.सभासद |
| ९. | स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | स.सभासद |
| १०. | स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | स.सभासद |
| ११. | स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन | स.सभासद |
| १२. | स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | स.सभासद |
| १३. | स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | स.सभासद |
| १४. | स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | स.सभासद |
| १५. | स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु | स.सभासद |
| १६. | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | स.सभासद |
| १७. | स.स.सौ. साधना गणेश सुरडकर | स.सभासद |
| १८. | स.स.सौ. विजया किशोर रहाटकर | स.सभासद |
| १९. | स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर | स.सभासद |
| २०. | स.स.सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | स.सभासद |
| २१. | स.स.श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | स.सभासद |
| २२. | स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | स.सभासद |
| २३. | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | स.सभासद |
| २४. | स.स.श्री. अय्युबखान सरदारखान | स.सभासद |
| २५. | स.स.श्री. अ. रशीद अ. सत्तार | स.सभासद |
| २६. | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | स.सभासद |
| २७. | स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | स.सभासद |
| २८. | स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | स.सभासद |
| २९. | स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन | स.सभासद |
| ३०. | स.स.श्री. नासेरखान सरदारखान | स.सभासद |
| ३१. | स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव | स.सभासद |

| | | |
|---|---|---|
| ३२. | स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत | स.सभासद |
| ३३. | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स.सभासद |
| ३४. | स.स.सौ. नुसरत बानो फिरोजखान | स.सभासद |
| ३५. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | स.सभासद |
| ३६. | स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय | स.सभासद |
| ३७. | स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | स.सभासद |
| ३८. | स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | स.सभासद |
| ३९. | स.स.श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स.सभासद |
| ४०. | स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम | स.सभासद |
| ४१. | स.स.सौ. संगिता बाळू मैंद | स.सभासद |
| ४२. | स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे | स.सभासद |
| ४३. | स.स.सौ. शाहीन जफर महमुद जफर | स.सभासद |
| ४४. | स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भागीरथ | स.सभासद |
| ४५. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स.सभासद |
| ४६. | स.स.श्री. तकीहसनखान कासीमहसन खॉन | स.सभासद |
| ४७. | स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | स.सभासद |
| ४८. | स.स.श्री. लकडे भरत श्रीमती | स.सभासद |
| ४९. | स.स.श्री. स.अली मिरा सलामी | स.सभासद |
| ५०. | स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज | स.सभासद |
| ५१. | स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली | स.सभासद |

**स्विकृत सदस्य**

१. स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास
२. स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
३. स.स.सौ. सलमाबानो मिर मोहमद अली

**संवाद :**

**श्री.अंबादास दानवे :** सभेला सुरुवात होण्यापुर्वी थोर साहित्यीक स्व.प.ना.काळे यांचे नुकतेच निधन झाले तसेच गंगापूर तालुक्यातील गाजगाव गावे जवान स्व.सोमनाथ जाधव हे नुकतेच भारत सीमेवर शहीद झाले. त्यांना सभागृहातर्फे ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :** ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजलीसाठी ०२ मिनीटे उभे रहावे. याचवेळी सभागृहातर्फे थोर साहित्यीक स्व.प.ना.काळे तसेच गाजगाव येथील संरक्षण दलातील सीमेवर शहीद झालेले स्व.सोमनाथ जाधव यांना ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**श्री.संजय शिरसाट :** औरंगाबाद नांव संभाजीनगर करण्या संदर्भात या सभागृहाने ठराव पास करुन शासन मंजूरीसाठी पाठवलेला होता. पुर्वीच्या शासनाने संभाजीनगर नांव देण्यासंदर्भात कार्यवाही सुरु केल्याने न्यायालयीन प्रकरण झाले. मा.सर्वोच्च न्यायलयाने स्थगिती दिली. सरकारकडे महानगरपालिका

आयुक्तांच्या मागणीसाठी गेले काही झाले नाही. लोकशाही आघाडीच्या शासनाने औरंगाबादचे नांव संभाजीनगर करण्याबाबत च्या ठरावाची विल्हेवाट लावली. म्हणून आम्ही सर्व भाजपा-सेना नगरसेवक या लोकशाही आघाडी सरकारचा निषेघ करतो. आमचा निषेघ नोंदविण्यांत येतो.

**श्री.अंबादास दानवे :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :** निषेध करण्यात येते.

याचवेळी सभागृहात सेना-भाजप स.सदस्य लोकशाही आघाडी सरकारचा विरोधात घोषणाबाजी करतात. फलक फडकवतात. सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही व निषेधाच्या घोषणा देत असतांनाच.

**मा.महापौर :** आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
## दिनांक ०६.०७.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक ३०-६-२००१ रोजीची तहकुब सभा शनिवार दिनांक ०६-०७-२००१ रोजी मा. महापौर श्री. डॉ. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात दुपारी ३.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेत महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील स. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| ५२. | स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष | स.सभासद |
| ५३. | स.स.श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | स.सभासद |
| ५४. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | स.सभासद |
| ५५. | स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग | स.सभासद |
| ५६. | स.स.श्री शे. इलियास किरमाणी शे. ऊमर | स.सभासद |
| ५७. | स.स.श्री औताडे रावसाहेब ममतु | स.सभासद |
| ५८. | स.स.सौ. शकुंतला सांडूजी इंगळे | स.सभासद |
| ५९. | स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी | स.सभासद |
| ६०. | स.स.श्री. शिंदे राजु रामराव | स.सभासद |
| ६१. | स.स.श्री. कावडे साहेबराव रणुबा | स.सभासद |
| ६२. | स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | स.सभासद |
| ६३. | स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार | स.सभासद |
| ६४. | स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | स.सभासद |
| ६५. | स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | स.सभासद |
| ६६. | स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन | स.सभासद |
| ६७. | स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | स.सभासद |
| ६८. | स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | स.सभासद |
| ६९. | स.स.श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | स.सभासद |
| ७०. | स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | स.सभासद |
| ७१. | स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु | स.सभासद |
| ७२. | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | स.सभासद |
| ७३. | स.स.सौ. साधना गणेश सुरडकर | स.सभासद |
| ७४. | स.स.सौ. विजया किशोर रहाटकर | स.सभासद |
| ७५. | स.स.सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | स.सभासद |
| ७६. | स.स.श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | स.सभासद |
| ७७. | स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण | स.सभासद |
| ७८. | स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | स.सभासद |
| ७९. | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | स.सभासद |
| ८०. | स.स.श्री. अय्युबखान सरदारखान | स.सभासद |
| ८१. | स.स.श्री. अ. रशीद अ. सत्तार | स.सभासद |
| ८२. | स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | स.सभासद |
| ८३. | स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | स.सभासद |

| | | |
|---|---|---|
| ८४. | स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन | स.सभासद |
| ८५. | स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब | स.सभासद |
| ८६. | स.स.श्री. नासेरखान सरदारखान | स.सभासद |
| ८७. | स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव | स.सभासद |
| ८८. | स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास | स.सभासद |
| ८९. | स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत | स.सभासद |
| ९०. | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स.सभासद |
| ९१. | स.स.सौ. नुसरत बानो फिरोजखान | स.सभासद |
| ९२. | स.स.श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | स.सभासद |
| ९३. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | स.सभासद |
| ९४. | स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | स.सभासद |
| ९५. | स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय | स.सभासद |
| ९६. | स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | स.सभासद |
| ९७. | स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | स.सभासद |
| ९८. | स.स.श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स.सभासद |
| ९९. | स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम | स.सभासद |
| १००. | स.स.सौ. संगिता बाळू मैंद | स.सभासद |
| १०१. | स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे | स.सभासद |
| १०२. | स.स.श्री. नासेरखान अ. रहेमान खान कुरैशी | स.सभासद |
| १०३. | स.स.सौ. शाहीन जफर महमुद जफर | स.सभासद |
| १०४. | स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भागीरथ | स.सभासद |
| १०५. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स.सभासद |
| १०६. | स.स.श्री. स. सलीम स. युसूफ | स.सभासद |
| १०७. | स.स.श्री. तकीहसनखान कासीमहसन खॉन | स.सभासद |
| १०८. | स.स.श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहमद | स.सभासद |
| १०९. | स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | स.सभासद |
| ११०. | स.स.श्री. लकडे भरत श्रीमती | स.सभासद |
| १११. | स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन | स.सभासद |
| ११२. | स.स.श्री. सलिम पटेल समशेर पटेल | स.सभासद |
| ११३. | स.स.श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान | स.सभासद |
| ११४. | स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | स.सभासद |
| ११५. | स.स.सौ. कागडा बबीता सुभाष | स.सभासद |
| ११६. | स.स.श्री. स.अली मिरा सलामी | स.सभासद |
| ११७. | स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज | स.सभासद |
| ११८. | स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली | स.सभासद |

**<u>स्विकृत सदस्य</u>**

४. स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास

५. स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण

६. स.स.सौ. सलमाबानो मिर मोहमद अली

**श्री. राधाकृष्ण गायकवाड :** भारताच्या गायन कोकीळा म्हणून नावाजलेल्या श्रीमती लता मंगेशकर यांना फडके पुरस्कार देऊन गौरविण्यात आले व पुरस्कार देण्यात आला. त्यांचे औरंगाबाद महानगरपालिका सभागृहातर्फे अभिनंदन करावे.

**मा. महापौर** : अभिनंदनास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**विषय क्र. ४४४/१ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत खाजगी जमीनीची अधिकृतपणे पोट विभागणी करुन भूखंड तयार करणे आणि निवासी गाळयांचे बांधकाम करण्याकरीता ते गरजू व्यक्तींकडे हस्तांतरीत करणे प्रवृत्ती अलीकडे वाढीस लागली आहे. असे उपविभाग बहुधा गुंठयाच्या पटीत असतात म्हणून असा विकास हा बेकायदेशीर असून त्यास पायबंद घालणे अत्यंत गरजेचे असेले तरी, अश्या भूखंडावर मोठया प्रमाणात अस्तित्वात असलेली जूनी व दीर्घकालीक बांधकामे पाडून टाकणे व्यवहार्य होणार नाही. समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या निवाऱ्याच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने शासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून गुंठेवारी विकास नियमाधीन करणे श्रेणीवाढ करणे बाबत निर्णय घेतला आहे. जमीन मालकी खाजगी असल्यावरच सदर अध्यादेश लागू होईल. सदर अध्यादेश दिनांक ३०-४-२००१ रोजी प्रख्यावित करण्यात आला असल्याने यापूर्वी याच बाबतीत देण्यात आलेले परंतू सदर अध्यादेशाशी विसंगत असलेले सर्व शासन आदेश व निर्णय रद्द ठरविण्यात आले आहेत. त्यांची जागा सदर अध्यादेश घेत आहे. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत वसाहतींचे सर्वेक्षण करण्यात आले असून, तक्ता पूढील प्रमाणे आहे.

| **अनाधिकृत वसाहतीचे सर्वेक्षण** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **वसाहतीचे नांव** | **कुटूंबाची संख्या** | **लोकसंख्या** |
| प्रभाग क्र.१ | | | |
| १. | वाणीनगर | १२६ | ५७८ |
| २. | सैनिक कॉलनी | १३१ | ६१३ |
| ३. | मिरानगर | ४० | २१३ |
| ४. | शिवपुरी कॉलनी | ७२ | ३५९ |
| ५. | न्यु नंदनवन कॉलनी | ९७ | ५४५ |
| ६. | जहागीर कॉलनी | १५९ | ७८८ |
| ७. | शांतीपूरा | ८१ | ३९६ |
| ८. | अण्णाभाऊ साठेनगर | ५० | २७२ |
| ९. | मुजफरनगर | १०३ | ६२१ |
| १०. | कुतुबपुरा | ८४ | ३०५ |
| ११. | एकतानगर | १७० | ८७९ |
| १२. | श्रावस्तीनगर | ५१ | २७८ |
| १३. | आशानगर | २५ | १२० |
| १४. | सुनिलनगर | २५ | २६० |
| १५. | नुरकॉलनी (प) | ४५ | २७२ |
| १६. | आम्रपालीनगर | १६ | ९९ |
| १७. | किलेअर्क | १५ | ८६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८. | नारायणनगर | १६ | ७९ |
| १९. | प्रगती कॉलनी | ४० | २०५ |
| २०. | भिमराजनगर | ६८ | १९४ |
| २१. | भुजबळनगर | ३४ | १७० |
| २२. | अलहिलाल कॉलनी | १०६ | ६४६ |
| २३. | महमुदपुरा | २५ | १३३ |
| २४. | तक्षशीलनगर | ३० | १५९ |
| २५. | वानखेडेनगर | १५२ | ७६६ |
| २६. | नवयुग कॉलनी | | सर्वेक्षण प्रगतीपथावर |
| | **विभाग क्र. २** | | |
| २७. | धनमंडी | ५३ | २३८ |
| २८. | पुष्पनगरी | १९ | ९२ |
| २९. | कोतवालपुरा | २८० | १६६८ |
| ३०. | नारळीबाग | २७५ | १००७ |
| ३१. | भोईवाडा | ६९७ | ३४४० |
| ३२. | सुंदरनगर (नागेश्वरवाडी) | ९३ | ३३९ |
| | **विभाग क्र.३** | | |
| ३३. | गणेश कॉलनी | १८१ | ८०८ |
| ३४. | फाजलपुरा | १४ | ७० |
| ३५. | हिनानगर | १९८ | १०९४ |
| ३६. | भोईवाडा | ३६९ | १९२७ |
| ३७. | सदफ कॉलनी, राहत कॉलनी | ९६ | ९२२ |
| ३८. | चेतनानगर | १४९ | ६१६ |
| ३९. | चिश्तीयाय कॉलनी | ४१६ | १८४१ |
| ४०. | बोरीबाग | ३० | १३१ |
| ४१. | खत्रीनगर | ४३ | १६० |
| ४२. | नेहरुनगर/कटकट गेट | १२६६ | ५९८१ |
| ४३. | काचीवाडा | २८२ | १३५१ |
| ४४. | हत्तेसिंगपुरा | २१३ | १०७३ |
| ४५. | रशिदपुरा | १०५ | ५८२ |
| ४६. | दत्तनगर | ४४६ | २०६४ |
| ४७. | दादा कॉलनी | ३२२ | १५०९ |
| ४८. | भवानीनगर | ६३२ | २८३१ |
| ४९. | निजामगंज | | सर्वेक्षण प्रगतीपथावर |
| ५०. | कैलासनगर | | सर्वेक्षण प्रगतीपथावर |
| ५१. | तेलंगवाडा | | सर्वेक्षण प्रगतीपथावर |
| ५२. | नाईकवाडा | | सर्वेक्षण प्रगतीपथावर |
| | **विभाग क्र. ४** | | |
| ५३. | शंभूनगर | २४८ | ११०९ |
| ५४. | वसंतनगर | ८० | २९२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५५. | सिल्लेखाना | १०३ | ६०९ |
| ५६. | शिवनगर | ८६ | ४०१ |
| ५७. | शम्सनगर | ११६ | ६७० |
| ५८. | भिमपुरा | ११२ | ५६७ |
| ५९. | नवाभाता | २५ | १३३ |
| ६०. | न्यायनगर | ३३८ | १७०२ |
| ६१. | हुसेन कॉलनी | २१० | ११९८ |
| ६२. | भारतनगर | २५५ | १२९८ |
| ६३. | जयभवानीनगर | २३७७ | ८६९५ |
| ६४. | पुडंलीक नगर | ७०५ | २५२० |
| ६५. | विष्णुनगर | १४०३ | ५६९१ |
| ६६. | विजय नगर | २६२ | ९९ |
| ६७. | नेताजीनगर | ८५ | ३३६ |
| ६८. | गजानन नगर | १७७ | ७७४ |
| ६९. | भानुदासनगर | ५११ | १९०९ |
| ७०. | न्यु शांतीनिकेतन कॉलनी | २४३ | ७१० |
| ७१. | हनुमाननगर | २०७ | ८८५ |
| ७२. | विश्रांतीनगर व न्यु मोतीनगर | १७० | ६३१ |
| ७३. | भाग्य नगर | २३ | १०८ |
| ७४. | महुनगर | | सर्वेक्षण प्रगतीपथावर |
| ७५. | श्रीकृष्णनगर | ८० | ३५० |
| | **विभाग क्र. ५** | | |
| ७६. | लायन्स क्लब कॉलनी | ७८ | ३०३ |
| ७७. | रिठे कॉलनी | ६० | २१० |
| ७८. | लोकशाही कॉलनी | १३० | ४९८ |
| ७९. | अंबिकानगर | ५६० | २१२२ |
| ८०. | संतोषीमातानगर | ३८५ | १६३९ |
| ८१. | माणिकनगर | २४५ | ८३१ |
| ८२. | शाहानगर | २६७ | ११७९ |
| ८३. | राजीव गांधीनगर | २८२ | ८५० |
| ८४. | मिसारवाडी | ११८७ | ३९५४ |
| ८५. | राजेद्रं नगर | ६८ | २६६ |
| ८६. | चौधरी कॉलनी | ४१७ | ८७२ |
| ८७. | जाधववाडी | ३२६ | १२४३ |
| ८८. | साठेनगर | ११२ | ४६० |
| ८९. | कामगार कॉलनी | | सर्वेक्षण प्रगतीपथावर |
| ९०. | शिवाजीनगर | | सर्वेक्षण प्रगतीपथावर |
| ९१. | पावरलून | १२४ | ७६० |
| ९२. | प्रकाशनगर | ३७० | १६८५ |
| ९३. | रमाबाई आंबेडकरनगर | १३६ | ६३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९४. | शाहूनगर एन-२ | ६९ | ३४९ |
| ९५. | बजरंग एन-२ | ४२ | २३६ |
| ९६. | संघर्षनगर | २३ | १०८ |
| ९७. | चौधरी कॉलनी | १६६ | ७३१ |
| ९८. | रामनाथ कॉलनी | ९७ | ४८६ |
| ९९. | मोतीवाला कॉलनी | ८० | ४९८ |
| | **विभाग क्र. ६** | | |
| १००. | गाडगेनगर | १५० | ७९४ |
| १०१. | मिलिंदनगर | ४८० | २५२९ |
| १०२. | नागसेननगर (व) | २११ | ११९० |
| १०३. | कबीरनगर | ३२७ | १६६८ |
| १०४. | नवीवस्ती (पद्मपुरा) | ११० | ६०५ |
| १०५. | क्रांतीनगर | ४३२ | २४५२ |
| १०६. | धनगरवाडा | १८४ | १४८३ |
| १०७. | अबरार कॉलनी | १९३ | १०२४ |
| १०८. | काश्मीरनगर | १९५ | १००७ |
| १०९. | कोकाणवाडी | ३९७ | १७५२ |
| ११०. | कोकाणवाडी (काली मस्जिद) | १२० | ६५० |
| १११. | महूनगर | ५७ | ३०९ |
| ११२. | अमान कॉलनी | ९० | ४३० |
| ११३. | बनेवाडी | १८१ | ८२५ |
| ११४. | जहागीरदार कॉलनी | १५३ | ७४९ |

उपरोक्त अध्यादेशाची प्रत या प्रस्तावासोबत माहिती व अभ्यासपुर्ण वाचनासाठी सादर करण्यात येत आहे. दिनांक १ जानेवारी १९९५ रोजी अस्तित्वात असलेले सर्व गुंठेवारी विकास हे भूखंडधारकाने कलम ४ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे नियोजन प्राधिकरणाकडे या बाबतीत अर्ज केल्यावर नियमामधील करण्यासाठी विचारात घेण्यास पात्र असतील.

**नियमाधीन करण्याची कार्यपध्दती :** महानगरपालिकेने अधिकारी बहाल केलेल्या अधिकाऱ्याने निश्चित करीत त्या मुदतीत संबंधित भूखंडधारक गुंठेवारी विकास नियमाधिन करण्यासाठी अर्ज करील.

भूखंड धारकाने विहित नमुन्यातील अर्जासोबत खालील कागदपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

३. भूखंडाच्या मालकीचा किंवा कायदेशीर कब्जा बाबतचा कागदोपत्री पुरावा.
४. विद्यमान रेखांकनाचा आराखडा
५. अशा भूखंडावरील विद्यमान बांधकामाचा आराखडा
६. दुरुस्ती आराखडा
७. आपसात मिटविण्याजोगे नसेल अशा उल्लघनाचे दोष निरसन करण्याबाबत अर्जदाराने दिलेले अभिवचन
८. प्रशमन फी आणि विकास आकार यापोटी देय असलेल्या अनुसूचित बँकेवर काढलेला दर्शनी धनकर्ष (डी. डी.)

९. मनपा आपसात न मिटविण्याजोग्या उल्लंघनाच्या पुराव्यासह पोट कलम (२) खालील नमुद केलेल्या करारनिविष्ट आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी प्रकरणांची छाननी करील. त्यानंतर त्या बाबत सर्व प्रकारे समाधान नियमाधीन केल्याचे प्रमाणपत्र देईल.

१०. कुटूंब प्रमुखाचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र

११. १९९५ विधानसभा मतदार यादीत अर्जदाराचे नाव असल्याची साक्षांकित छायाप्रत

महानगरपालिकेच्या वतीने वरील अध्यादेशाच्या अंमलबजावणीसाठी निर्णय, नोटीसेस आणि इतर दस्तऐवज हे अधिप्रमाणित करण्याचे अधिकार उपसंचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. राजपत्रात तशी नियुक्ती झाल्याचे प्रकाशीत करण्यात येईल.

खाजगी जमिनीवरील अधिनियमानुसार पात्र ठरणाऱ्या अशा भूखंडधारकाकडून प्रशमन शुल्क विकास शुल्क किती आकारण्यात यावे याबाबत निर्णयार्थ प्रस्ताव सादर.

<u>संवाद :</u>

**मा. महापौर** : आजची सभा यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत अनाधिकृत वसाहती आहेत. या वसाहतीसाठी नागरी सुविधा प्राप्त करुन देण्यासाठी व विकास कामे करायची म्हणून या संदर्भात सध्या महाराष्ट्र शासनाचे परिपत्रकानुसार महानगरपालिका हद्दीतील ज्या अनाधिकृत वसाहती वाढल्या आहेत. त्या महानगरपालिका झोननिहाय जवळपास ११४ वसाहतीचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून, याबाबत शासन परिपत्रकानुसार प्रशासनान कार्यवाही करीत असतांना अवलंबविण्यात येणारे धोरणाबाबात या सभागृहात सन्माननीय सदस्यांनी चर्चा करावयाची आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या सभागृहामध्ये प्रथमतः शासन परिपत्रकाचे अभिनंदनाचा प्रस्ताव मंजूर करावा.

**श्री. अविनाश कुमावत :** शासनाने जे परिपत्रक काढलेले आहे ते चुकिचे धोरणासाठी आहे.

**मा. महापौर** : सन्माननीय सदस्यांना सूचना करण्यात येते की, शासनाने काढलेल्या परिपत्रकावर सभागृहात चर्चा करावयाची आहे.

**श्री. प्रकाश निकाळजे :** शासनाने जे परिपत्रक काढलेले आहे की, महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत वसाहती बाबत ज्या नागरी सुखसुविधा पुरवावयाच्या आहेत. त्यासाठी परिपत्रकातील काही मुद्यांवर चर्चा करावयाची आहे.

**मा. महापौर** : शासनाने पाठविलेल्या जी. आर. मधील सभागृहात चर्चेद्वारे काही दुरुस्ती सुचवायची असल्यास त्या सांगाव्या व तशी चर्चा करावी.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** मी सूचना केल्याप्रमाणे शासनाने पाठविलेल्या जी. आर. बाबत अभिनंदन करावे.

**मा. महापौर** : सभागृहात मी सांगू इच्छितो की, सन्मानीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या असतील त्या सूचनांची याठिकाणी नोंद घेण्यात येईल. (याचवेळी सभागृहात सन्मानीय सदस्यांचे आपसात आवाज होत असतो. काहीही ऐकू येत नाही.)

**श्री. भगवान घडामोडे :** हे सर्वसामान्यासाठी नसून, काहींचे हितसंबंध गुंतले आहे. त्यांचेसाठी आहे.

**श्री.जयवंत ओक :** सदरील जी. आर. या शहराला लाज नाही. या शहरातील लोकांच्या भावना शासनास कळवावे. जनतेची फसवणूक करण्यासाठी शासनाने हे परिपत्रक काढलेले आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सन्मानीय सदस्यांनी आपले मत मागे घ्यावे. शासन लोकांच्या भावनेशी खेळत नाही तर, लोकहिताच्या दृष्टीने विकासात्मक धोरण अवलंबिते.

**मा. महापौर** : सर्वांनी शांतता बाळगावी. सभागृहात प्रत्येक सन्मानीय सदस्यांनी विचारपुर्वक मत मांडावे.

**श्री.प्रकाश निकाळजे :** मित्र पक्षांना प्रश्न सुटू नये असे वाटते. त्यामुळे अशा प्रकारे बोलण्यात येते. सदरील परिपत्रक शासनाने अनाधिकृत बोलण्यात येते. सदरील परिपत्रक शासनाने अनाधिकृत वसाहती मधील विकास कामे करण्यासाठी व फायदयासाठी याचा उपयोग आहे.

**श्री. जयवंत ओक :** शासनाने पाठविलेला अशा परिपत्रकांचा आम्ही निषेध करतो. माझे म्हणणे असे आहे की, या ठिकाणी जनतेची कामे केली पाहिजे. शहराच्या विकास कामांसाठी लागणारा खर्च हा खासदार, आमदार व नगरसेवकांचा या स्वेच्छा निधीतून होणे महत्वाचे आहे. या ठिकाणी परिपत्रक पाहिले असता, १५% व १०% सोडणे, १० मी., १२ मीटर रस्ता सोडणे, सदरील जी. आर. हा मोठमोठया लोकांसाठी आहे. गोरगरीबांसाठी काहीही उपयोगाचा नाही.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** गेली ४ १/२ वर्ष शासन हे मंबुईतील बिल्डर्स हित जोपासण्याचे काम केले. याचा आम्ही निषेध करतो. (याचवेळी काही सन्मानीय सदस्यांचे एकमेकांमध्ये जोरजोरात बोलण्याचे आवाज होतो. त्यामुळे काहीही ऐकू येत नाही.)

**मा. महापौर** : सभागृहास विनंती की, सन्मानीय सदस्यांनी एक वेळी एकाच सदस्यांनी बोलावे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण नोंदविण्यासाठी आहे काय? या ठिकाणी शहरातील जनतेचे विकास कामे लक्षात घेऊन कामे करण्यासाठी या ठिकाणी चर्चा होणे आवश्यक आहे.

**श्री. जयवंत ओक :** मी शासनाच्या परिपत्रकाबाबत निषेध व्यक्त करतो.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** गेली ४ १/२ वर्षात मागील सरकारने काहीही काम केलेले नाही. सन्मानीय सदस्य श्री जयवंत ओक यांनी उच्चारलेले शब्द इतिवृत्तातून वळवावे. महानगरपालिकेची तिजोरी त्या शासनाने दिवाळखोरीत काढली.

**मा. महापौर** : सन्मानीय सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे. सन्मानीय सदस्य श्री. जयवंत ओक यांनी शासनाच्या निषेधाचा शब्दप्रयोग केला तो इतिवृत्तातून वगळण्यात येतो.

**श्री. जयवंत ओक :** प्रस्तावामध्ये काही सुधारणा करावयाच्या असून, त्यानुसार चर्चा व्हावी.

**मा. महापौर** : या शहरात अनाधिकृत वसाहती फार आहेत. शासनाने पाठविलेला हा गुंठेवारीचा जी. आर अनाधिकृत वसाहतीसाठी असून, या जी. आर. मध्ये काही सूचना करावयाचे असल्यास त्याबाबत सन्मानीय सदस्यांनी सूचना कराव्यात कारण हा जी. आर. या महानगरपालिकेत तंतोतत लागू होत नाही. या शहरात जवळपास १.२५ ते १.५ लाख नागरीक अनाधिकृततिरत्या वस्ती करुन राहतात. त्यांचेसाठी हा जी. आर आहे. सन्मानीय सदस्यांनी

सभागृहात ज्या सूचना करतील त्या सूचना शासनाकडे पाठविण्यात येतील व शासन विधान सभा व विधान परिषदेत मांडून त्यावर अंतीम निर्णय होऊन पून्हा दुरुस्तीसह परिपत्रक निघेल मौलीक सूचनांचा विचार होईल. नंतरच शासनाचे अभिनंदन करण्यात येईल.

**श्री. अविनाश कुमावत :** या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे जवळपास ११४ वस्त्यांचे सर्व्हेक्षण केलेले आहे. महाराष्ट्र शासनाने हा जी. आर. ज्या वसाहती अनाधिकृत आहेत. त्या अधिकृत करण्यासाठी काढण्यात आलेला आहे. या जी. आर. मध्ये ७७ नंबर वर (क) रेखांकनातील भूखंडावरील १०% भूखंड हे नियोजित जागेवर मोफत करण्यात येतील ज्या ठिकाणी १००% बांधकाम झालेले असेल त्याठिकाणीच ही अट रद्द करण्यात यावी. याठिकाणी गुंठेवारी पध्दत लावावयाचे धोरण आहे. त्याऐवजी आपल्या महानगरपालिकेत स्केअर फुट पध्दत असावी. याबाबत एखादी समिती नेमून समितीने ज्या ज्या भागामध्ये रस्ते झालेले असेल त्या भागात जाऊन पाहणी करुन रस्ते करावेत सुधारणा करावी.

**मा. महापौर** : अनाधिकृत वसाहतीचा सर्वेक्षण करते वेळी काही कर्मचारी / अधिकारी यांची नेमणूक केलेली होती. त्यांनी संबंधित वार्ड सदस्यांना विचारणा करुन सर्वेक्षण केलेले आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** माझ्या वार्डात शिवशंकर कॉलनीत सर्वेक्षण झालेले नाही. ज्याठिकाणी खुल्या जागांवर अनाधिकृत वसाहती झालेल्या आहेत त्या त्या कशा बसल्या त्याची पाहणी करावी व सोबत सन्माननीय सदस्यांना घेऊन फिरावे.

**श्री. प्रकाश निकाळजे :** औरंगाबाद शहर हे औद्योगिक वसाहतीचे शहर झाल्यामुळे या शहरातील आजुबाजूस रोजगार बरेचसे बेरोजगार व कामगार वर्ग याठिकाणी आला व छोटे छोटे वसाहतीमध्ये सरकारी जागेवर अनाधिकृतरित्या घरे बांधून राहू लागला. त्यामूळे महानगरपालिकेने सहानुभूतीचा मानव दृष्टीकोन ठेवून तेथील नागरिकांना सुखसोयी दिलेल्या आहेत. याठिकाणी अनाधिकृत वसाहतीचा अर्थ दोन प्रकारचा लावण्यात आलेले आहे. जसे की, नविन शहर व जुने शहर हे दोन भाग आहे. सिडकोने या शहरात जमीन घेऊन ज्या जागा संपादीत केलेल्या आहेत. त्या जागेवर शेती चालकांनी तेथील भूखंड विकून जागा विक्रीचा प्रकार केलेला आहे. परंतू जुन्या शहरामध्ये सरकारी जमिनीवर लोकांनी ताब्यात घेऊन घरे अनाधिकृत बांधून राहत आहेत. तेव्हा अशा वसाहतीसाठी शासनाने या परिपत्रकामध्ये अंमलबजावणी करण्याचे ठरविले आहे की, ही वसाहत नियमित करण्यासाठी रु. १६/- प्रती स्केअर फुट याप्रमाणे फिस आकरणी करावी. म्हणून मी या ठिकाणी तेथील जमीन मालकांनी स्वतःच्या फायदा सिडको कडूनही व खरेदी करणाऱ्याकडूनही केलेला आहे. अशा जमीन मालकाकडून हे पैसे वसुल करण्यात यावे जर ती देत नसेल तर त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी आणि जर संबंधित मालक देत नसेल तर, शासन परिपत्रकात असेही म्हटलेले आहे की, त्यांचेवर गुन्हा नोंदवावा. दुसरे असे की, जी अनाधिकृत वसाहत शासनाच्या जागेवर बसलेल्या आहेत. त्याबाबतचा महसुल जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत रु. १६/- प्रती स्केअर फुटप्रमाणे घेण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे ज्या वसाहती व इ

ोपडपट्टया झालेल्या आहेत. त्यातील १०% भूखंड हा महानगरपालिकेला देऊन विकसीत करण्यात यावा असे आहे. परंतू या शहराची वाढती लोकसंख्या व नियोजन असावे कोणत्याही प्रकारे योजना आखता आलेली नाही. तेव्हा १०% आरक्षित जागा घेणे बाबत आक्षेप राहणार नाही. परंतू शिल्लक नसल्यास तेथील वसाहतीवर विरोध करुन किंवा बळजबरी करुन घेऊ नये. अशा वसाहतीमध्ये ९.०० मी. चा रस्ता तयार करण्यात यावा आणि हे रस्ते तयार करण्यासाठी काही लोकांचे घरे बाधीत होणार आहेत. अशा व्यक्तींच्या महानगरपालिकेतर्फे पर्यायी व्यवस्था म्हणून भिंत बांधून दरवाजे लावून देण्याची व्यवस्था करावी. या शहरातील ११४ वसाहतींचा सर्वेक्षण झालेले आहेत. त्यातील बहुतांश भागाचा विकास झालेला आहे आणि विकास झाल्यानंतर त्या वसाहती या ठिकाणी अनाधिकृत म्हणून दाखविण्यात आलेला आहे. ज्यामध्ये उदा. भिमपुरा, न्यायनगर, गाडगेबाबानगर, मिलिंदनगर, नागसेननगर, कबीरनगर, क्रांतीनगर इ. वसाहती विकसीत झालेल्या आहेत. त्यामुळे शासनाने जो जी. आर. काढलेला आहे. त्यात शासकीय जमिनीवर झालेल्या वसाहतीत फुलेनगर, कबीरनगर, या स्लम घोषित आहेत व या विकसीत करण्यासाठी म्हाडा तर्फे दरवर्षी अनुदान देते. त्यामुळे शासकीय जी. आर. प्रमाणे रु. १६/- चा दंडक या वसाहती मधून वगळण्यात यावे.

**श्री. राजु शिंदे** : सन १९९५ च्या पुर्वीच्या ज्या अनाधिकृत वसाहती आहेत. त्यांना शासकीय सुख सुविधा पुरविण्यात याव्यात तसेच ज्या वसाहतीत ५०% पेक्षा अधिक दलित लोक राहतात. त्यांचेकडून विकास शुल्क घेण्यात येऊ नये. ज्याठिकाणी १०% खुली जागा नाही. त्याठिकाणीतील वसाहतीची अट रद्द करावी. तसेच रस्त्यांचे ९.०० मिटरचे बाबतीत ज्या भागात तज्ञ प्रकारचे रस्ते देण्यासाठी जागा उपलब्ध नाही ते कसे करता येईल तेव्हा सदरील अट रद्द करावी.

**श्री. जयवंत ओक** : माझी सभागृहाला विनंती आहे की, या शहराच्या विकास आराखडा बाबत सन १९७५ व २००१ चा नगररचना विभागाकडून नकाशे मागवावे. त्याठिकाणी काय आहे याची सर्व स्थिती मी सभागृहाला सांगू शकतो.

**मा. महापौर** : संबंधित अधिकाऱ्यांनी सन १९७५ व २००१ आराखेडा घेऊन यावे.

**श्री. भगवान घडामोडे** : या शहरात ११४ अनाधिकृत वसाहती आहेत. असे सर्वेक्षण अंती दाखविलेले आहे. परंतू त्याही पेक्षा जास्त असून त्यातही १००% वसाहती या दलितांच्याच आहेत. शासनाच्या परिपत्रकान्वये रु. १६/- प्रती फुट कर आकारण्यात येणार आहे. तेव्हा झोपडपट्टया व अनाधिकृत वसाहतीमध्ये राहणारे होतकरू व गरीब लोक २० x ३० किंवा २० x १० चे प्लॉटवर घरे बांधून राहतात त्यांना ही कर आकरणी परवडेल काय? याचा विचार व्हावा व हा शासकीय जीआर ची अट रद्द करावी व ज्या वसाहती हया १००% दलित म्हणून आहेत. त्या स्लम घोषित कराव्यात मिसारवाडी साठेनगर, शाहूनगर, रमाबाईनगर या वसाहतीत १००% लोक दलितच राहतात. तेव्हा अशा दलित, शोषित पिडीत लोकांना रु. १६/- प्रमाणे कर भरणे शक्य नसून, ज्यांचेकडे घरी मोटर सायकल आहे, रंगीन टी व्ही व स्लॅपचे घर २० x ३० चे आहे. त्या लोकांकडून शासनाचे जी. आर. प्रमाणे रु. १६ प्रती स्केअर फुट प्रमाणे कर आकारणी करावी.

**श्री. स. अली सलामी :** ज्या विषयांवर ही सर्वसाधारण सभा बोलविण्यात आलेली आहे. याबाबत योग्य ती चर्चा होऊन चांगला निर्णय होणे आवश्यक आहे. कारण या शहरातील जवळपास २ १/२ लाख लोकसंख्येचा प्रश्न आहे व त्यामुळे त्या सर्व लोकांचा प्रश्न सुटू शकेल. या ठिकाणी प्रकल्प संचालकांनी ज्या शासनाच्या योजनेनुसार सविस्तर माहिती देणे आवश्यक आहे. शासन परिपत्रकानुसार झालेल्या वसाहतीमधून १०% जागा चा सोडावे लागणार आहेत. तेव्हा वसाहती झालेल्या आहे. त्यातून जागा कशी सोडणार कोणाचे घरे पाडणार भूसंपादन करते वेळी लोक तयार होतील काय? याचा सर्व नागरिक तयार होतील काय याचा प्रथम खुलासा व्हावा. त्याचप्रमाणे रस्ते तयार नसल्यास ९,०० मिटरचा रस्ता त्या वसाहतीत करुन देण्यात येईल. त्यासाठी रस्ते नविन करावयाची झाल्यास लोकांची घरे तोडण्यात येईल काय? किंवा पर्यायी व्यवस्था कशी करणार किंवा दुसरा एखादा रस्ता आणणार काय? याचीही माहिती द्यावी. जेणे करुन नंतर सविस्तर चर्चा करता येईल. त्याचप्रमाणे लोकांकडून रु. १६/- स्केअर फुट प्रमाणे फिस आकारणी केल्यास त्या पैशांचा विनियोग प्रशासन कोणत्या व कशासाठी करणार आहे. सध्या शहरातील ८०% वसाहतीत शासनाच्या सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. फक्त छोटे छोटे रस्त्यांना खांडकी बसविण्यासाठी अनाधिकृत वस्ती म्हणून योजना राबवण्याचे थांबलेले आहे. तेव्हा शासनाच्या नियमाप्रमाणे विकास कामे करीत असतांना या वसाहती मधील लोकांसाठी आपण कोणते धोरण अवलंबिणार याचा सर्व खुलासा प्रकल्प संचालकांनी द्यावा. त्याबाबत निकष काय राहणार आहेत. याची सविस्तर मांडणी सादर करावी. यासाठी लोकांच्या जिवन मरणाचा प्रश्न असून, याचा सविस्तर खुलासा मिळणे आवश्यक आहे.

**श्री. तकीहसन खान :** शासकीय जमिनीवर लोकांनी वसाहती करुन राहता आहेत. तेव्हा १०% जागा कोणाची घेणार व कशा पध्दतीने घेणार रस्ते ९.०० मीटर प्रमाणे कसे काढणार बरेच ठिकाणी आरक्षण आहेत ती कसे काढणार आरक्षणावर घरे त्याचा मोबदला देणार याची तरतुद नाही. ६ महिन्यात द्यावे. ले आऊट सादर करावा. त्यासाठी आर्किटेक्ट कडे जावे. आर्किटेक्टचे त्या लोकांनी कधी तोंड पाहिले नाही. पी आर कार्ड नाही. त्यांनी रु. १०.२० चे बाऊडवर घेतलेले आहे ते काय देणार त्यांना मालक समजण्यात यावे. याची माहिती मिळावी.

**मा. महापौर** : मी यापूर्वीच सांगितलेले आहे की, शासनाने जी आर मध्ये जरी दर्शविलेले असले तरी, १०% आरक्षित जमिनी घेणार, रस्ते ९ मीटरचे करणार हे सर्व शक्य नाही. या बाबतचे तंतोतंत पालन करता येणार नाही. यासाठी सन्माननीय सदस्यांना विनंती की, त्यांनी फक्त सूचना करावेत त्या सूचनांप्रमाणे शासनाकडे दुरुस्ती बाबत विनंती करण्यात येईल.

**श्री. तकीहसन खान :** १०% जमीन लोकांच्या कसे घेणार याचा खुलासा व्हावा कारण सध्या लोक वसाहती करुन राहतात. त्याचा जिव्हाळयाचा प्रश्न उपस्थित होणार आहे. काहींनी प्लॉट पाडून अनेकांना विकलेले आहेत व त्याचे वेगवेगळे मालक बनलेले आहेत. त्यांचे बाबतीत कसे करणार अनाधिकृत वसाहतीत ९.०० मिटरचे रस्ते कशा पध्दतीने पाडण्यात येणार. अशा वस्तीतील घरे लोकांनी रु. १०/- च्या स्टँप पेपरवर जागा विकत घेतलेल्या आहेत व पक्की

घरे आता झालेली आहेत. त्या सर्वांना मालकी हक्क मिळणे आवश्यक आहे. बऱ्याचशा ठिकाणी आरक्षित जागांवर वस्ती झालेल्या आहेत मग काय त्या जागा डिलीट करणार. या वसाहतीतील लोकांना संपूर्णपणे मालकी हक्क मिळण्यासाठी एन ए, पी. आर कार्ड, मिळवून देणार काय? आणि त्यानुसार कार्यवाही होणार आहे काय?

**मा. महापौर** : शहरामध्ये अनाधिकृत वसाहती आहेत. शासनाने जरी पी आर पाठविलेला असला तरी, त्यावर चर्चा करुन काही दुरुस्ती सूचना असल्यास कराव्यात म्हणजे फेरबदल करुन शासनाकडे प्रस्ताव पाठविता येईल.

**श्री. भगवान घडामोडे** : शासनाने पाठविलेल्या पी आर प्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले आहे. परंतू अनाधिकृत वसाहती व शासकीय जागांवर घरे बांधून राहू लागलेलया वसाहती बाबत सभागृहात काही दुरुस्ती सूचना करावयाच्या असतील तर, त्या सदस्यांनी कराव्यात त्या दुरुस्त्या शासनास कळविण्यात येतील.

**मा. महापौर** : अनाधिकृत वसाहतीबाबत शासनाने जी. आर. पाठविलेला आहे. परंतू सदरील जी. आर. या शहरातील तंतोतंत लागू होऊ शकत नाही आणि या जी. आर. प्रमाणे आपण पुन्हा कामे करु शकत नाही. यासाठी सदस्यांच्या सूचनांची आवश्यकता आहे.

**प्रकल्प संचालक** : मागील सर्वसाधारण सभेमध्ये असा निर्णय घेण्यात आलेला होता की, औरंगाबाद शहरातील अनाधिकृत वसाहती सर्वेक्षण करण्यात यावा. त्यानुसार ११८ अनाधिकृत वसाहतीपैकी १०७ वसाहतींचे सर्वेक्षण पुर्ण झ ाालेले आहे आणि अजून ११ वस्तींचे सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे. आणखी २४ वस्तींचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. असे काही सदस्यांनी नविन प्रस्ताव दिलेले आहेत. आता पर्यंत सुमारे २५००० कुटूंबाचे सर्वेक्षण झालेले आहे आणि आणखी जे २४ वसाहतींचे सर्वे करण्यासाठी आठ दिवसापुर्वी सदस्यांनी प्रस्ताव दिलेत त्यामध्ये साधारणतः आठ ते दहा हजरांची आणखी भर पडण्याची शक्यता आहे. यासाठी आर्थिक तरतुद सुध्दा वाढवून देणे गरजेचे आहे. पुर्वी आम्ही सदरील कामाचे अंदाजीत खर्च १.५० लाखात होईल. तथापि हे काम वाढण्याची शक्यता आहे.

दिनांक ३०-०४-२००१ या दिवशी राजपत्रात प्रसिध्द झालेले अध्यादेशानुसार महाराष्ट्र शासनाने अनाधिकृत वसाहतींना नियमीत करण्यासाठी काही अटी व शर्ती टाकलेल्या आहेत. अशा प्रकारचे अध्यादेश इतर राज्यांनी लागु केलेला आहे व आता महाराष्ट्र शासन सुध्दा लागू करीत आहे. सर्वप्रथम अनाधिकृत वसाहतींसाठी जशी वस्ती असेल तशा स्थितीतील ले-आऊट करणे गरजेचे आहे आणि त्यामध्ये १०% जागा खुली आहे असे दाखविणे गरजेचे आहे. या ठिकाणी सभागृहात चर्चा झाली की, १०% जागा सरेंडर करावयाची आहे किंवा महानगरपालिकेकडे विनामुल्य जागा देणे आवश्यक आहे. तसेच ९.०० मीटर रस्ता होणेही आवश्यक आहे. महानगरपालिकेचा विकास आराखडा जो प्रस्तावित केलेला आहे. त्यानुसार ४.५० मिटरचा जरी रस्ता अपेक्षीत असला तरीही तो करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. २ मध्ये महानगरपालिका किंवा प्राधीकरण नगररचना विभाग या क्षेत्रामध्ये ९.०० मीटर आवश्यक असेल तेथे नियोजित आराखडयानुसार आवश्यक अशा रस्त्यांच्या रुंदी एवढी आणि इतर क्षेत्रामध्ये ४.५० मीटर किंवा

नियोजीत आराखडयानुसार आवश्यक रस्त्यांची रुंदी एवढी खुली सामाजिक अंतरे सोडून देण्यात येतील. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. ३ मध्ये गुंठेवारी विकास नियमाधिन करणे राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेली कंपाऊडींग फिस व विकास आकार फिस किंवा दोन्हीही निर्धारित करण्याचा अधिकार महानगरपालिकेला आहे. तो किती असावा याचाही अधिकार महानगरपालिकेला आहे. यासाठी प्रत्येक बाबींवर नियोजन करणे गरजेचे आहे. त्यासाठी चतु:सिमा ठरविणे, जमीन मोजणी करणे त्यानंतर ले-आऊट तयार करणे, जशी वस्ती असेल तशाच प्रकारचे स्थान नकाशात दर्शविणे इ. बाबी गरजेचे आहेत. सर्वात महत्वांचे असे आहे की, गुंठेवारी विकास योजना ही फक्त खाजगी जमिनीवर ज्या वसाहती आहेत. अशाच वसाहतींना लागू राहणार आहे आणि त्यानुसार आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. यामध्ये विशिष्ट कालावधी आपण लागू राहणार आहे आणि त्यानुसार आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. यामध्ये विशिष्ट कालावधी आपण लोकांना देणार आहोत. उदा. लोकांनी अध्यादेश प्राप्त झाल्यानंतर साधारणत: सहा महिन्यांपर्यंत ते अर्ज करु शकतात. यासाठी आपणास विनंती की, आपण जर शासन निर्णयाप्रमाणे अनाधिकृत बांधकामे नियमीत करावयाचे प्रस्तावित केल्यास नागरिकांना विशिष्ट मुदतीत अर्ज करण्यासाठी सर्वसाधारण सभेने निर्णय घ्यावयाचा आहे की, सहा किंवा तीन महिन्याच्या मुदतीत मी वाचून दाखविल्यानुसार ले-आऊट, पी. आर. कार्ड व रजिष्ट्री अशी एकुण ९ प्रकारचे कागदपत्रे नियम व अटीनुसार दाखल करणे आवश्यक आहे आणि त्यानंतरच दुरुस्ती आराखडा ज्या वस्तीचा आवश्यक आहे. त्यानुसार आताच मिटण्याजोगे नसेल अशा उल्लंघनाचे दोष म्हणजे बांधकाम परवानगी बाबतचे जे काही नियम आहेत. ते अर्जदाराने त्या नियमांचे पालन करावे जे की, प्राथमिक स्वरुपातील नियमान्वये तसेच कंपाऊडींग फिस ज्याला विकास आकार फिस या पोटी देय असलेला महानगरपालिकेस आगाऊ देणे आवश्यक आहे. त्यानंतर महानगरपालिका आणि जमीन मालक यांचे न मिटण्याजोगे उल्लघंनाच्या पुराव्यासह मुद्दा क्र. २ मध्ये नमुद केल्यानुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन छाननी करुन घेतल्या जाईल व प्रशासनाचे समाधान झाल्यानंतर त्यास नियमाप्रमाणे प्रमाणपत्र महानगरपालिकेतर्फे देता येईल. त्यानंतर कुटूंब प्रमुखांचा पासपोर्ट आकाराचा फोटो, सन १९९५ च्या पुर्वी वस्तीतील घरांचे अधिकृत करण्यासाठी निर्णय शासनाने घेतला असल्याने विधानसभेतील मतदार यादीमध्ये नांव असणे गरजेचे आहे. तो यासाठी की, १९९५ च्या पुर्वीपासून तो या ठिकाणी राहतो. असे मानले जाते आणि दुसरे म्हणजे शासनाचे नविन एक परिपत्रक दोन दिवसापुर्वी प्राप्त झाले त्यात नमुद केल्यानंतर साधारणत: ४० कुटूंबे एकत्र राहत असतील त्यांना भौतिक सुविधा पुरविण्यात येतील आणि साधारणत: २५० चौ. मी. या व्याप्त जागेवरच ती वसाहत असेल तरच महानगरपालिकेला प्राप्त असलेल्या सुविधा द्यावयाचे आहेत. काही अशा वसाहती आहेत की ज्या महानगरपालिका हद्दीत जरी असतील तरी, तशा व्यक्तींना विद्युत पुरवठा सोडून इतर सुविधा दिलेल्या आहेत व आदेशीत केलेले आहेत अशा व्यक्तीसाठी आराखडा आकार विकास शुल्क आगाऊरित्या महानगरपालिकेकडे जमा करावे अशी अट

शासनाने टाकलेली आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिा हद्दीतील अतिशय लांब अशा प्रकारची वस्ती असेल व इतक्या लांब सुविधा पुरविणे शक्य नसेल तर, अशा वसाहतींना सुध्दा नियमीत / अधिकृत करुन नये. हा अधिकार महानगरपालिकेकडे राखुन ठेवलेला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** अनाधिकृत वसाहतींना अधिकृत करण्याचा प्रस्तावावर चर्चा चालू आहे. त्या अनुषंगाने २७ जानेवारी २००१ रोजी महराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. विलासरावजी देशमुख यांचा सत्कार महानगरपालिकेतर्फे केलेला होता. त्यावेळेस महानगरपालिकेतर्फे एक निवेदन दिलेले होते की, औरंगाबाद शहर हे औद्योगिकरित्या प्रगत होत असून आशिया खंडात हे शहर झ ापाटयाने वाढत आहे. त्यामुळे या शहराकडे ग्रामीण भागातून येणारा लोंढा शहरीकरणाकडे वळत असल्याने लोकांनी सभोवती अनाधिकृत घरे बांधून राहतात यासाठी अशा अनाधिकृत वसाहती अधिकृत करण्यासाठी शासनातर्फे लवकरच अध्यादेश काढण्यात येईल असे आश्वासन मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेले असल्याने सदरील जी. आर. महानगरपालिकेसाठी काढण्यात आला व तो प्राप्त झाला आणि त्याच अनुषंगाने ही बैठक बोलविण्यात आलेली आहे. मा. मुख्यमंत्री महोदय, यांनी घोषणा केली व शासनाने अध्यादेश काढला त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो व धन्यवाद देतो. या ठिकाणी प्रकल्प संचालकांनी सविस्तरपणे खुलासा केलेला आहेच. शिवाय त्यांचे मार्फत विविध भागामध्ये सर्वेक्षण सुध्दा झालेले आहे. १४० पैकी ११४ अनाधिकृत वसाहतींचा सर्वे झाला आहे व काही विभागांचा बाकी आहे असा उल्लेख प्रकल्प संचालकांनी केलेला आहे. वसाहती हया दोन प्रकारच्या जमीनीमध्ये बसलेल्या आहेत. हयामध्ये शासनाचे जमिनीवर एक वसाहत झालेली आहे तर, दुसरी वसाहत जे छोटे-मोठे प्लॉट धारक आहेत ज्यांनी जमीन मालकाकडून २० x ३० चे प्लॉट पाडून जमीन खरेदी केलेली आहे. त्यामुळे या दोन भागामध्ये विभागणी करावी असे मला वाटते. शासनाच्या जमिनीवर ज्या अनाधिकृत वसाहती बसलेल्या आहेत. त्यांना शासनाच्या सर्व सुविधा देणे बाबत फारशा काही अडचणी येतील. असे मला काही वाटत नाही आणि दुसरे जमिन मालकांनी इतरांना २० x ३० चे जे प्लॉट पाडून विक्री केली त्या ठिकाणी १०% जागा ही आरक्षित असावी. असे एक बंधनकारक आहे. परंतू मुळातच आपण आज प्रस्ताव घेत आहोत की, अशा अनाधिकृत वसाहतींना निवारा देण्याचे काम आपण करीत आहोत आणि म्हणून अशा परिस्थितीमध्ये जैसे थे परिस्थिती आहे. ज्या परिस्थितीवर जागा आहे. त्यावर अनाधिकृतपणे बांधकाम होऊ देऊ नये अशी आपण सभागृहात संमती घ्यावी. प्रत्येक वसाहतीचा स्वतंत्रपणे ले-आऊट तयार करावा व संपुर्ण माहितीसह नकाशा तयार करावा. शासनाने जसे महानगरपालिका हद्दीतील काही भाग स्लम म्हणून घोषित करुन सर्व सुविधा पुरविल्या जातात. त्याचप्रमाणे शहरातील सर्व भागांचा सर्वेक्षण करुन ज्या ज्या भागामध्ये अनाधिकृत वसाहती असतील तो भाग हा अधिकृत म्हणनू संमत करावा. शासनाने जो गुंठेवारी पध्दत बाबत निर्देष केलेले आहेत. त्यावर महानगरपालिकेने कशा प्रकारचा विकास करायचा आहे. त्याप्रमाणे निधी आकारावा. महानगरपालिका आर्थिक बोजा पेलवेल काय त्यानुसार विकास कर लावायचा आहे आणि हाच

विकास कर आकारण्यासाठी शासनाने १६/- रुपये स्क्वयेर फुट घ्यावयाचे आदेश काढले आहेत. परंतू आपण आपली कुवत पाहून रु. ५/- सुध्दा आकारणी करु शकतो.

यावर शासनाचे बंधन राहणार नाही. या विकास फि आकारणीचे अधिकार हा संपूर्णपणे सभागृहाला आहे. तिसरी बाब म्हणजे अनाधिकृत वसाहतीमध्ये रस्ते ९.०० मीटर असावे या ऐवजी काही भागात मुख्य रस्ते असु शकतील पंरतू आतील रस्ते हे लहान असतील तेव्हा ३.०० मीटर, ५ मीटर किंवा ७.५० मीटर असे करण्यास हरकत नाही. सर्वेमध्ये काही वसाहतीचा उल्लेख आलेला नाही. उदा. जाधववाडी, मिसारवाडी, सुरेवाडी या भागाजवळचा काही भाग हा विकसित झालेला आहे. त्यांचाही उल्लेख होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सिडको एन-५ मधील काही भाग इ. बाबींची नोंद घ्यावी. चिश्तीया कॉलनीचा भाग व इतर काही सिडको भागातील अनाधिकृत वसाहती ज्यांचा विकास होणे आवश्यक आहे. त्याबाबतचा सर्वे करुन उल्लेख व्हावा. यापुर्वी ज्या भागामध्ये लाईट, रस्ते, पाणी व ड्रेनेज या सुविधा मिळवून देण्यासाठी त्या त्या भागातील जनतेकडील २५% लोकवर्गणी घेऊन सुविधा देण्याचा प्रस्ताव झालेला आहे. त्यावेळेस काही ठिकाणी २५% लोकवर्गणी द्यावयास तयार होती. तर काही ठिकाणी लोकवर्गणी जमा सुध्दा केलेली होती, वेगवेगळया भागांचा सर्वेक्षण स्वतंत्र्यरित्या करुन त्यांना सुविधा देण्यात काम करावे.

**श्री. घडामोडे भगवान :** शहरातील २ ते २.५० लाख लोकसंख्या ही अनाधिकृत वसाहतीत राहते. त्यांना अधिकृत करुन सर्व सुविधा प्राप्त करुन देण्याचा हा शासनाचा जी. आर. आहे. यामध्ये १०% ची अट रद्द करावी. परंतू ज्या भागात उपलब्ध असेल त्या ठिकाणी करु नये. रस्ता १.०० मिटरचा करीत असतांना त्या भागातील नागरिकांची मानसिकता असेल तर, त्यांना मोबदला देऊन करावे. जेणे गरुन त्यांच्या भागाचा विकास होईल. त्याचप्रमाणे अनाधिकृत घरांना विकास कर रु. १६/- न लावतो. आपण महानगरपालिकेतर्फे जसा कर लावतो वर्गवारी अ, ब, क, ड त्याप्रमाणे लावण्यात यावा. कारण २० x ३० चे प्लॉट धारक हे सर्वसामान्य व गरीबीतला असून, या दराप्रमाणे १५.२० हजार भरणे परवडणारे नाही. तेव्हा वर्गवारी लावून हप्ता-हप्त्याने लावावे. विकास आराखडयाप्रमाणे ज्या ठिकाणी आरक्षणे आहेत. त्या भागात घरे बांधलेली आहेत. उदा. नागेश्वरवाडी हा भाग संपुर्णतः विकसीत झालेला आहे. जो भाग आपण पाडणार आहेत काय? यामध्ये सुधारणा करुन सन १९९५ च्या पुर्वीची जी अट आहेत. ती रद्द करुन माझ्या मते २००१ पर्यंतची करावी. गुंठेवारी पध्दत ही पश्चिम महाराष्ट्रात फक्त पुणे/मुंबई ला लागू आहेत. औरंगाबादला लावून काही याचा फायदा नाही.

**सौ.संगिता मैद** : माझ्या प्रभागातील वसाहत ही १९९५ च्या पुर्वीची असून, गेली. २५-३० वर्षापासूनची आहे आणि जी. आर. नुसार १९९५ च्या पुर्वीची अशी अट आहे. तेव्हा माझ्या प्रभागातील वसाहती २५-३० वर्षापासूनच्या असल्याने त्यांना विकास शुल्क आकारु नये. १९९५ नंतरच्या अनाधिकृत झालेल्या वसाहतीस आकरणी करावी.

**श्री.जगताप मोतीलाल :** १९९५ पुर्वीच्या ज्या वसाहती आहेत. त्या वसाहतींना शासनाने अधिकृत करण्याचे निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करणे

यात काही गैर नाही. परंतू जी. आर. मध्ये ज्या अटी टाकलेल्या आहेत. त्या अटी जाचक असून, चुकीच आहे. ज्यामुळे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तींना ते परवडणारे नाही. " अ, ब, क, ड " वर्गवारी प्रमाणे विकास फी आकारणी करावी. जसे रु. ५/- प्रमाणे आकारणी करावी व रस्त्यांचे बाबतीत कोणताही बदल करु नये.

**श्री. थोरात दत्तात्रय :** काही वस्त्या अशा आहेत की, ज्यावर आरक्षणे होती. काही वर्षानंतर त्या वस्त्यांचे आरक्षण उठले व ते रहिवासी झोन झाला. तोपर्यंत बहुतांशी जागेवर अधिकृत बांधकामे झालेली होती. आता ज्या जागेवर काही प्लॉट रिकामे होते. त्या मालकांनी महानगरपालिकेकडे बांधकाम परवानगी घेवून बांधकामे केली. अशा भागात काही घरे परवानगी घेऊन आहेत तर, काही घरे अनाधिकृत आहेत. जेव्हा की, आरक्षण झोन उठल्यानंतर त्या ठिकाणी महानगरपालिका बांधकाम परवानगी तो भाग अनाधिकृत कसा समजावा. जेव्हा अशा वस्त्यांना आपण अधिकृत करुन सर्व सुविधा घ्याव्यात.

**श्री.स. अली सलामी :** शहरातील अनाधिकृत वस्त्यांचे बाबतीत अधिकृत करण्यासाठी या सभागृहात चर्चा चालू आहे. कुणी निषेध करीत आहे तर, कुणी कौतुक करायला पाहिजे मात्र गेल्या वर्ष भरापुर्वी मुंबई येथे लाखो झोपडया अनाधिकृत बसल्या होत्या त्या तेथील महानगरपालिकेने व शासनाने तातडीने तोडण्याची कार्यवाही केली. ज्यामुळे ४ १/२ हजार लोकांना रस्त्यावर येणे भाग पडले आणि या संदर्भातील शासनाने जे परिपत्रक (जी. आर.) काढला त्याच अनुषंगाने काढलेला आहे. सदरील नियम औरंगाबादला लागू करण्याची आवश्यकताच नाही. सध्या औरंगाबादचा प्रश्न वेगळा आहे. या शहरातील अनाधिकृत वस्त्यांना अधिकृत करण्यासाठी सभागृहातच चर्चा करुन सोडविता येऊ शकते. शासनाने जी. आर. मध्ये नमुद केल्याप्रमाणे कशा प्रकारचा शुल्क आकारणी करावी हे सभागृहाने ठरवावयाचे आहे नियमाप्रमाणे प्लॉटचे ले-आऊट करुन विकास शुल्क आकारले जाते त्याप्रमाणे करावयाचे आहे. परंतू यामध्ये असे दर्शविलेले नाही की, याबाबत किती शुल्क आकारावे आज नियमाच्या अधिन राहून रु. १६/- स्कवेअर फुट आणि त्यामध्ये अनाधिकृत म्हणून काही प्रमाणात दंड आकारणी केल्यास जवळपास रु. २०/- प्रमाणे स्कवेअर फुट शुल्क होते आणि आजच्या घडीला २० X ३० या म्हणजे ६०० स्कवेअर फुटला रु. २०/- प्रमाणे ठरविल्यास जवळपास प्रत्येकी रु. १०,०००/- महानगरपालिका फंडात जमा होतात. शहरामध्ये बऱ्याचशा लोकांनी ज्या जागा खेरदी केलेल्या आहेत त्या १२ ते १५ हजारापर्यंत स्टॅप पेपरवर खरेदी केलेली आहेत. मागील ४-५ वर्षापूर्वी सभागृहाने पुंडलिकनगर वसाहतीबाबत मानवी दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून तेथील लोकांना पाणी देण्याचा प्रस्ताव होता. ज्यामध्ये २५% लोकवर्गणी आपण आजपर्यंत घेऊ शकलो काय? पाणी प्रश्न हा लोकांचा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. पिण्याचे पाण्यासाठी त्या भागात टेंकरखाली अनेकदा मृत्युमुखी झालेले आहेत. तरीही लोकांनी विकास निधी भरणा केलेली नाही तेव्हा या नागरिकांकडून आपण विकास निधी लावल्यास ते भरणा करुन शकतील काय? आजच्या परिस्थितीत पिण्याचे पाण्याचे पाणीपट्टी जे अधिकृत नळधारकांकडून १००% वसुल करतो काय? ३. प्रश्न आज डोळयासमोर उभे राहतात. तेव्हा माझे असे मत आहे की, शासन जी.

आर. पेक्षा जी. आर. हा मुंबई/पुणे शहरासाठी लागू असून तो या शहरासाठी नाही आणि या शहरातील अनाधिकृत वसाहतींचा सर्वेक्षण प्रकल्प विभागामार्फत करण्यात आला त्यामध्ये फार जुन्या वसाहती असून, त्यांना आपण आज अनाधिकृत वसाहती संबोधतो. ज्या वसाहतींना ८० ते ९०% सुविधा महानगरपालिकेने पुरविल्या आहेत या ठिकाणी किलेअर्क वस्तींचे नांव आहे. या किलेअर्क वसाहतीत काम करण्यास जागा नाही. तेव्हा या लोकांकडून आपण पैसे वसुल कसे करणार? ज्या भागामध्ये रस्ता आहे. त्या ठिकाणी ९.०० मिटरचा रस्ता तयार करता येईल. परंतू ज्या भागात जागाच उपलब्ध नाही तर, तेथील आपण घरे तोडणार? काय जर आजच्या घडीला शासन जी. आर. लोमान्यता दिल्यास त्याची अंमलबजावणी आपणांस करणे भाग पडेल. १०? वसाहतीतील जागा आरक्षीत करावयाची आहे. जोपर्यंत त्याबाबतची अंमलबजावणी आपण करणार नाही. तोपर्यंत सुविधा देणार नाही. अशा प्रकारचे या शासन जी. आर. चा निष्कर्ष आमच्या समोर आहे. स. स. वारंवार त्यांच्या वार्डातील पाणी ड्रेनेज, लाईट व रस्ते इ. सुविधासाठी ओरडतात व विकास कामे करवून घेतात तेव्हा गांभीर्याने लक्ष घातल्यास विकास घडवून आणावयाचे असल्यास या शासन जी. आर. ला मंजूरी न देता सभागृहाने या संदर्भात वेगळी समिती नेमावी. या समितीमध्ये तांत्रीय अधिकारी स्थायी समितीचे २-३ सदस्य घेऊन सर्वे करावा व कोणती वसाहत अनाधिकृत आहे. कोणत्या वसाहतीस सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. किती प्रमाणात झालेल्या आहे. याचा सर्वेक्षण करुन गंभीररित्या प्रस्ताव पुन्हा सभागृहासमोर ठेवावा. शहरातील अशा काही अनाधिकृत वसाहती आहेत की, ज्या ७५% पेक्षाही जास्त प्रमाणात महानगरपालिकेच्या सुविधा देऊ केल्या आहेत. अशा वसाहतींना नियमाप्रमाणे अधिकृत नियम लागु करावे व अशा वसाहतींना दंडात्मक म्हणून रु. १००० ते १२००/-, ५००/- प्रमाणे दंड ठेवून टॅक्स रुपाने महानगरपालिकेने आकारणी करावी तेव्हाच या बाबतचे धोरण स्पष्ट होईल. अथवा सदरील जी. आर. जरी मंजूरही झाला तरी वेगवेगळया वस्तीतील नागरिक गटगटाने मोर्चा, निदर्शने, उपोषने व घेराव घालतील यामधून काहीही तथ्य होणार नाही. अनाधिकृत वसाहतीतील लोकांना समाज असे समजले की, याबाबत अधिकृत वसाहती बाबतचा जी. आर. शासनाकडून आला व महानगरपालिकेकडे तो मंजूरही झाला तर, तशा वसाहतीत विकास कामे सुरु झाल्यास या नियमामध्ये येथील नागरिक बांधलेले आहेत. असे समजावे. या ठिकाणी नेमके काय निकष आहेत ते या ठिकाणी अधिकारी सांगत नाही. जर समजा आज हा प्रस्ताव मंजूर झाल्यास अनेक सदस्य मा. महापौर यांच्या समोर जाऊन बसतील व म्हणतील की, प्रस्ताव मंजूर झालेला आहे. आता माझ्या वार्डात रस्ता तयार करुन द्या, ड्रेनेज लाईन टाकून द्यावे, पाण्याची पाईप लाईन टाकून द्यावी तेव्हा या सर्व अडचणीवर संपूर्णपणे सभागृह येणार आहे. तेव्हा औरंगाबाद शहराची व्युहरचना लक्षात घेता सभागृहाने स्वतंत्ररित्या नियम तयार करुन शासन मंजूरी आणावी. जेणे करुन मुंबई / पुणे शहराचा प्रश्न वेगळा आहे व औरंगाबाद शहराचा प्रश्न वेगळा आहे. कारण या शहरामध्ये सालजंग व वक्फ बोर्डच्या जमीनीवर चुकीचे पेपर्स तयार करुन लोक प्लॉट पाडून विक्री करीत आहेत व त्यानुसार त्या जागेवर लोकवस्ती तयार झालेली आहे.

औरंगाबाद शहर हे संपूर्ण आशिया खंडात जलद विकसित झालेले शहर आहे. येथील डेव्हलपमेंटची मुंबई सारख्या शहराशी तुलना करता येणार नाही. तेव्हा अशा प्रकारच्या शासनाने पाठविलेल्या जी. आर. ची अंमलबजावणीसाठी सभागृहाने प्रस्ताव मंजूर करु नये. थोडेसे हलक्या मनाचा विचार करुन निर्णय घ्यावा. यासाठी लागल्यास वेळेचे पाबंद करुन निर्णय देण्यासाठी समिती गठीत करावी. सदरील समितीने अहवाल द्यावा. या समितीने असा निष्कर्ष द्यावा की, या शहरासाठी अनाधिकृत बांधकाम बाबत कोणत्या पध्दतीचा अललंब करता येईल जसे महानगरपालिकेचा फायदा व नागरिकांचा सुध्दा यामध्ये फायदा कसा होईल. याचे भाग या समितीने ठेवावे. गेल्या ३० ते ४० वर्षापासूनच्या अशी काही अनाधिकृत वसाहती आहेत. त्यांना सर्व सुविधा प्राप्त आहेत. परंतू अनाधिकृत आहेत. या शहरामध्ये बऱ्याचशा वसाहती सन १९७३ च्या वेळेसच्या आहेत. कारण या कालावधीत या शहरात औद्योगिकरण होऊन नागरिक वेगवेगळया ठिकाणी राहत होते. त्या वेळेपासून शहराचा फार मोठया प्रमाणात विकास होत राहिला व अनाधिकृत वसाहती झाल्या समजा आपण सन १९९५ पुर्वीच्या अनाधिकृत वस्तींना आपण अधिकृत करु असे आहे तेव्हा १९८५ च्या पुर्वीच्या म्हणजे दहा वर्षा आधीचे वसाहती अधिकृत समजून कायम करावे. यासाठी पुणर्प सर्वेक्षण करुन नागरिकांचे हिताचे कार्य व्हावे. यासाठी एकतर्फी निर्णय होऊ नये. मा. महापौरांना विनंती की, लोकांचे कार्य करीत असतांना चांगले काम पाठिशी घेऊन जावे. त्यांची नाराजगी आपल्याला घातक ठरेल असे कृत्य आपणाकडून होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**श्री. शे. इलियास किरमानी :** काही वसाहती १०४० पासून आहे. आता महमुदपुरा येथे अनाधिकृतरित्या प्लॉट पाहून विक्री होत आहेत त्याचे काय? नविन वसाहती होत आहेत त्याची जबाबदारी कोणावर राहिल माझ्या वार्डातील कॉलनीच्या सर्वे करावा. तसेच वार्ड क्र. ४ येथे अनाधिकृत घरे होत आहेत. त्या बाबत कार्यवाही करावी.

**मा. महापौर :** यासाठी प्रशासकीय अधिकारी व झोन अधिकारी हे जबाबदार राहणार आहेत असा शासनाचे परपित्रक आहे. वार्ड क्र. ४ मध्ये स.स.नी. सूचना केल्याप्रमाणे अनाधिकृत घरे होत आहेत. त्यांचे बाबतीत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** माझ्या वार्डाती वस्ती ही गेली २५ वर्षापासून अनाधिकृतरित्या आहे. सध्या महानगरपालिकेच्या सर्व सुविधा मिळत आहेत. यासाठी महानगरपालिकेचे टॅक्स येथील सर्व लोक भरतात. आता प्रशासन वार्डातील समस्या सोडविण्यासाठी हयगय करीत आहे. तेव्हा लोकांची ओरड होते. मग आम्ही कामे कशी करणार. तेव्हा विनंती की, आमच्या वार्डात जोपर्यंत सर्व सुविधा देत नाही तोपर्यंत येथील नागरिक महानगरपालिकेचा कोणताही टॅक्स भरणार नाहीत असे लोकांना सांगू संध्या आमचा स्वेच्छा निधी सुध्दा खर्च करता येत नाही. आता शासनास हे कधी कळविणार व शासन मंजूरी कधी मिळणार आम्ही नगरसेवकांनी कोणते कामे करायचे याचही माहिती द्यावी. सन १९८५ च्या वेळेपासूनची झालेल्या वसाहतीचेसाठी महानगरपालिकेच्या सुविधा द्याव्यात व १९९५ पासूनचे आपण सर्वेक्षण करीत

राहा. आता वर्षभर आम्ही कोणते काम करणार नागरिक आम्हाला दररोज विचारतात काय उत्तर द्यावे.

**श्री. रगडे भगवान :** भूखंड धारकाने आपले अर्ज विहीत नमुण्यात करावे असे आहे. ज्या अटी शर्ती नियमान्वये लावलेल्या आहेत. त्यानंतरच संबंधित मालकास अधिकृतरित्या घर होणार आहे. भूखंडाच्या मालकीचा किंवा कायदेशीर कब्जा याबाबत कागद पत्राचा पुरावा. यासाठी बरचशे नागरिकांनी विविध भागामध्ये रु. १०/- च्या स्टॉपवर जागा घेतलेले आहेत. यामध्ये एकंदर ९ (नऊ) अटी लावलेल्या आहेत. पैकी विद्यमान रेखांकन आराखडा व नकाशा त्यानंतर विद्यमान भूखंडावरील बांधकामाची आराखडा कोणत्या कालावधीत घर बांधले वगैरे तसेच दुरुस्ती आराखडा ज्यांचे कडून जमीन विकास घेतलेली आहे. त्याचा पुरावा याशिवाय १९९५ च्या मतदार यादीत नांव समाविष्ट आहे काय? या सर्व अटी पाहता नागरिकांना जाचक आहेत. कारण बरेचसे नागरिक काही ठिकाणी भाडयाने राहत होते व जशी जागा मिळाली त्या भागात जागा घेऊन घर बांधकाम केलेले आहे.

**मा. महापौर** : या जाचक अटींना सवलती देण्यात येतील व शिथीलता मिळेल.

**श्री. भगवान रगडे :** सन १९९५ च्या पुर्वी ज्या वसाहती आपण स्लम घोषित करणार आहोत त्या वसाहतींना " अ, ब, क, ड " निहाय विकास शुल्क आकरावी व १९९५ च्या नंतरही ज्या वसाहती आपण स्लम घोषित करणार आहोत. त्यांना या सर्व सवलती मिळणार आहोत काय? याचा खुलासा व्हावा.

**श्री.अ. रशिद अ. सत्तार :** जहागीरदार कॉलनी यामधून वगळण्यात यावे.

**श्री. जयवंत ओक :** अनाधिकृत वसाहतीबाबत प्रथमतः गेल्या १४ वर्षानंतर या सभागृहात प्रस्ताव आला व त्यावर सविस्तर चर्चा होत आहे. त्या संदर्भात मी मा. महापौरांचे अभिनंदन करतो. या शहराचा विकास आराखडा आपण जर पाहिले तर हे शहर औताफ बोर्ड, सालारजंग जमिनी, अनाधिकृत वसाहती जमिनी, सरकारी जमिनी अशा प्रकारच्या जमिनीवर हे शहर अनाधिकृतरित्या बसलेले आहे. या शहरात गेल्या ४०-४५ वर्षापासून लोकवस्ती करून राहत आहेत. मी ज्यावेळेस सुरुवातीला नगरसेवक होतो. त्यावेळेस सन १९८८ ला ६० अनाधिकृत वसाहती होत्या. आज ११४ अनाधिकृत वसाहती सर्वेक्षणात अंती दिसून आल्या व आणखीही काही भाग राहिलेला आहे. प्रकल्प विभागाने जो सर्वे केलेला आहे व सर्वेमध्ये जी घरे दाखवून यादी तयार केलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे ती चुकिची आहेत. ज्या ज्या भागातील याचा वार्ड निहाय दाखविला. जसे वाणीनगर या ठिकाणी २६ घरे दाखविली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे त्या ठिकाणी एकंदर ३०० ते ४०० घरे आहेत. ज्यामध्ये दोन मजली घरे तीन मजली घरांचा समावेश आहे. याबाबत मी पुराव्यासहित दाखवू शकतो. त्यांचा या ठिकाणी सर्वे झालेला नाही. यासाठी पुन्हा एकदा सर्वेक्षण त्या ठिकाणी करावे. मी काही मुद्दे उपस्थित करणार आहे त्याची नोंद घ्यावी.

१. सर्वेक्षण केलेल्या ११४ अनाधिकृत वसाहतीबाबत शासनाकडे कोणत्या प्रकारे पाठपुरावा केला व महानगरपालिकेने विकास आराखडया संदर्भात संपूर्ण माहिती शासनास दिली आहे काय? या ठिकाणी नगररचना विभाग जबाबदार आहे. शासनास आराखडा निहाय संपूर्ण माहिती का दिली नाही. सालारजंग, औकाफ बोर्ड, शासकीय जमिनीवर अनाधिकृत घरे गेल्या

३०-४० वर्षापासून बसलेले आहेत हे का? दाखविलेले नाही. या ठिकाणी किती बरे आहेत. किती रस्ते आहेत. किती मजली इमारती आहेत. हे दाखविलेले नाही.

२. या शहरात ९०% वसाहती म्हणून ११४ चा सर्वेक्षण झालेले आहे. या वसाहतीमध्ये नगरपालिका असतांना व आता महानगरपालिका असतांना सर्व सुविधा पुरविलेल्या आहेत. यासाठी आमचा महत्वाचा मुद्दा असा आहे की, नागरिकांना पाणी, ड्रेनेज, रस्ते व लाईट या सुविधा पुरविलेल्या असल्याने ती अनाधिकृत घरे आता अधिकृत करावे. याबाबतची नोंद इतिवृत्तामध्ये घ्यावी कारण या संदर्भात मी कोर्टामध्ये धाव घेणार आहे.

३. सिडको-हडको हा भाग ही नोटीफाईड आहे. याबाबत शासनाकडे काय पाठपुरावा केला. यासाठी नगररचना विभागाने माहिती द्यावी. त्याचप्रमाणे शहरातील अधिकृत व अनाधिकृत तसेच म्हाडा वसाहतीमध्ये ९.०० किंवा १५.०० मिटरचे रस्ते आहेत काय? हे मुद्दे माझे आहेत की, नगररचना विभागाने या शहरात जे परवानगी दिलेली आहेत. त्यामध्ये नियमाप्रमाणे सर्व झालेले आहे काय? याची माहिती शासनास दिलेली आहे काय?

४. सिडको हडकोने बांधकाम परवानगी १० X १५ व १२ X २५ प्रभाग परवानगी देते. मात्र महानगरपालिकेला २० X ३०, ३० X ४०, १० X १५ ला बांधकाम परवानगी देत नाही, हे शासन त्यानुसार ही बाब निदर्शनास आणुन दयावी.

५. सभागृहामध्ये १९७५ ते २००१ पर्यंतचे विकास आराखडयाने दोन्हीही नकाशे आज सभागृहात आणलेले आहेत. शहरामध्ये अनाधिकृत वसाहती का वाढल्या त्याची कारणे काय आहेत. यास जबाबदार कोण. राजकीय पुढारी की अधिकारी / कर्मचारी ते पहावे.

६. ज्या ११४ अनाधिकृत वस्त्यांचे सर्वेक्षण झालेले आहे. त्या आरक्षण झोन मध्ये येतात काय? या आरक्षणात किती वसाहती आहेत त्या अधिकृत आपण करणार आहात काय? यासाठीच मी सभागृहमध्ये नकाशे आणावयास सांगितले ते बोर्डवर लावणे आवश्यक होते. कारण या वसाहती बसलेल्या आहेत. त्या जागेचे आरक्षण उठणार आहे काय? या शहरात वेगवेगळया भागामध्ये अनाधिकृत बांधकामे होतच राहणार यास कुणीही थांबवु शकणार नाही. कारण हे शहरच एक आगळ वेगळ शहर आहे. या शहरात जवळपास ७० ते ९०% अनाधिकृत बांधकामे झालेले आहेत. कारण २० X ३० चे प्लॉट धारक आहेत. ते आजही अनाधिकृत बांधकाम करणार कारण संबंधित प्लॉटधारक हे महानगरपालिकेकडे चकरा मारतात. मात्र त्यांना बांधकाम परवानगी मिळत नाही. संबंधित जागा ही आरक्षित मध्ये येते. त्यामुळे परवानगी मिळत नाही असे सांगितल्या जाते. या शहरात एकंदर किती झोपडपट्टया आहेत. मिती स्लम अनाधिकृत आहेत. स्लमचा अर्थ काय याबाबतचा खुलासा सभागृहात द्यावा. सरकारी जमिनीवर स्लम घोषित करतांना महानगरपालिका कशा पध्दतीने शासनाकडे पाठपुरवा करते. त्यास कोणता नियम व निकष लावल्या जातो, याबाबतचे उत्तर महानगरपालिकेतर्फे द्यावे. सर्वेक्षणा अंती ११४ वसाहती अनाधिकृत दाखविले तेथील नागरिक गरीब नाही काय? महानगरपालिका हद्दीतील ज्या खुल्या

जमिनी आहेत तेथे सूचना फलके लावलेले आहेत काय? किती महानगरपालिकेच्या जमिनीवर तार फेन्सींग केलेले आहे. नगररचना विभाग व मालमत्ता विभागाने याबाबत कार्यवाही केलेली आहे काय? सन १९७५ व २००१ च्या विकास आराखडयानुसार महानगरपालिकेच्या सरकारी, आरक्षित जागा, खुल्या जागांवर महानगरपालिकेने बोर्ड लावून दर्शविलेले आहेत काय? या जागांवर घरे झालेली आहेत काय? ज्याप्रमाणे महानगरपालिकेने वाटाघाटी धरुन आतापर्यंत १४-१५ महापौर होऊन गेलेले आहेत. ६० x ४०, ७० x ३०, ७५ x २५ या प्रमाणे वाटाघाटी करुन सोसायटीमध्ये ज्या परवानगी दिल्या त्या जागा महानगरपालिकेने आपल्याकडे ताब्यात घेतल्या काय? हा महत्वाचा व वादाचा मुद्दा आहे. त्याचप्रमाणे शहर आराखडया प्रमाणे रस्ते १२०, १००, ८०, ५०, ३० फुटाचे आहेत. त्यामध्ये घरे झालेले नाहीत काय? जर घरे झालेले असतील तर त्यास प्रशासन जबाबदार नाही काय? याची माहिती नगररचना विभागाने द्यावी. शहरातील ११४ वसाहती अनाधिकृत आहेत जे मालकीचे प्लॉट शिल्लक राहिलेले आहेत. त्यांना महानगरपालिका बांधकाम परवाना देणार आहे काय?

७. बॉंडवर/स्टॅम्प पेपरवर जे घरे आहेत. त्यांना आपण मालकी हक्क दिला पाहिजे. आरक्षणावरील जागेवर घरे झाले असतील त्याचे काय करणार. प्रकल्प संचालक म्हणतात सदरील जी. आर. खाजगी जागेसाठी आहे. तेव्हा मी म्हणतो. आपण सर्वच्या सर्वच अनाधिकृत वसाहती स्लम घोषित करावे. कारण महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून, निर्णय महानगरपालिकेनेच घ्यावयाचा आहे व निर्णय घेऊन शासनाकडे पाठवावा. सध्या ५३ स्लम घोषित आहेत. सध्या गुंठेवारी पध्दत औरंगाबादला लागू करु नये. अनाधिकृत वसाहतीतील रस्ते ९.०० मीटर १२.०० मीटर ही अट रद्द करावी. जी १०% जागा आरक्षीत करण्याची अट आहे. त्याबाबतीत जागा उपलब्ध असल्यासच करावी. अन्यथा नाही. या सर्व सूचनांचा योग्य तो विचार करुनच निर्णय व्हावा. राज्यपालांनी जो वटहुकूम काढला त्यांचे मी अभिनंदन करीन त्यानंतर दुरुस्तीसह पून्हा विधीमंडळात यावर निर्णय होणार आहे. नंतरच कार्यवाही होईल. तेव्हा वरील सूचनांचा विचार व्हावा.

**मा. महापौर** : अनाधिकृत वस्तीला अधिकृत करण्यासाठी आणि अनाधिकृत वस्तीत राहणाऱ्यांना नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आपण विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन केलेले होते. या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सर्वच स.स.नी. ज्या सूचना केलेल्या आहेत. गुंठेवारी पध्दतीचा जी. आर. या शहरासाठी कितपत योग्य आहे. याबाबतचा उहापोह केलेला आहे. या शहरामध्ये दाखल केलेल्या अहवालानुसार ११४ अनाधिकृत वसाहतींचा सर्वे व आणखी त्यामध्ये काही राहिलेल्या वसाहतींचा समावेश होणार आहे आणि आजपर्यंत अशा अनाधिकृत वसाहतीमध्ये प्रशासनातर्फे स. स. च्या सुचनेवरुनही कामे करण्यात आलेली नाही. आपल्या महानगरपालिकेतर्फे अनाधिकृत वसाहतींचा सर्वेक्षण करण्यात आला व सर्वेक्षण संपल्यानंतर शासनाचा जी. आर. सुध्दा उपलब्ध झाला आहे. या आपल्या शहराच्या दृष्टीने सदरील जी. आर. कितपत फायदयाचे आहे. त्याबाबत काही स.स.नी दुरुस्ती सुचविलेल्या आहेत. त्या समाविष्ट या ठिकाणी करता येतील.

१.	ज्या ठिकाणी अनाधिकृत वसाहती झालेली आहे. या वसाहतीमध्ये १०% ओपनस्पेस असावी अशी अट आहे. तेव्हा अशा वसाहतीमध्ये १०% जागा उपलब्ध नसल्यास ती अट रद्द करावी.

२.	अनाधिकृत वसाहतीमध्ये ९.०० मिटरचे रस्ते असावे असे आहे. परंतू या वसाहतीत ९.०० मिटरचे रस्ते असणे शक्य नाही. तेव्हा आहे त्याच स्थितीतील रस्ते सर्वेक्षणा अंती सामावून घ्यावे.

३.	गुंठे ऐवजी चौरस फुट घेण्यात यावे.

४.	अनाधिकृत वसाहतीत प्रत्येक ठिकाणी पी. आर. कार्ड असेलच असे नाही. काही ठिकाणी रजिष्ट्री असेल काही ठिकाणी स्टॅम्प पेपरवरती खरेदी केलेले असेल तर, ती पडताळणी करुन घ्यावी आणि पी. आर. कार्ड नसेल त्यांना मान्यता द्यावी. एन.ए. नसेल तरीही त्यांना मान्यता द्यावी. तसेच काही स.स.नी. सांगितले की, या अनाधिकृत वसाहतील अधिकृत करीत असतांना त्यांना विकास कर लावण्यात यावा. पण हा विकास कर १६/- रु. प्रति स्केवर फुट असेल किंवा नगररचना विभाग किंवा समिती निर्णय देईल त्या ठिकाणी प्रत्यक्षात पाहणी करेल. ज्या ठिकाणची वस्ती दलित आहे व ज्या ठिकाण्चे नागरिक दारिद्रय रेषेखाली राहत असतात अशा वस्तींना स्लमचा दर्जा देऊन त्या स्लम वस्तीसाठीचे अनुदान शासनाकडून महानगरपालिकेने मागणी करावे. तसेच काही ठिकाणी मागासवर्गीय व दुर्बल घटक असतील त्यांच्याकडे रंगीत टि. व्ही. नसेल आर. सी. सी. स्लॅपचे घर नसेल. दुचाकी गाडी नसेल किंवा टेलीफोन नसेल अशा नागरिकांना सुध्दा यामधून वगळण्यात यावे पण ज्या ठिकाणी या नागरिकांचे रंगीत टि. व्ही. दुचाकी वाहन, टेलीफोन व स्लॅपचे घर असेल अशा नागरिकांकडून विकास शुल्क आकारणी करावी. यामध्ये नगररचना विभाग व प्रकल्प संचालक व एका समितीने प्रत्यक्षात पाहणी करुन निर्णय घ्यावयाचा आहे व सदरील समितीने आपला अहवाल सभागृहात द्यावयाचा आहे. यासाठी सदरील समिती पाच सदस्यीय असावी. सर्वश्री १ स. अली सलामी स. मिरा सलामी २ श्री. भगवान रगडे, ३ श्री. राजू शिंदे ४. सौ. साधना सुरडकर ५. सौ. निखत परविन ईजाज अली. या समितीने प्रत्यक्षात अनाधिकृत वसाहतीमध्ये जाऊन पाहणी करुन किती दर विकास शुल्क आकारायचा त्याची माहिती १५ दिवसात सभागृहाला देईल. या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाच्या आलेल्या जी. आर. च्या अटीमध्ये दुरुस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येतो व इतिवृत्त कायम करुन शासनाकडे पाठविण्यात यावे.

**श्री. तकीहसन खान :** मो. किराडपूरा येथील रहिमननगर भागाचा अनाधिकृत वस्तींचा सर्वेक्षण होणे बाकी आहे तो करावा.

**श्री. जबिंदा दलबिरसिंग :** मो. उस्मानपुरा भागातील भीमपुरा, महेमुदपुरा भाग वगळण्यात यावे.

**मा. महापौर** : ज्या अनाधिकृत वस्तींचा सर्वे अद्याप झालेला नसेल, त्या त्या भागातील स. सदस्यांनी केलेल्या सूचनाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या निवाराच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने गुंठेवारी विकास

नियमाधीन करणे व श्रेणीवाढ करण्याच्या संदर्भात अनाधिकृत वस्त्यांच्या केलेल्या सर्वेक्षणात व ते नियमाधीन करण्याच्या कार्यपध्दतीस मंजूरी देण्यात येते. महानगरपालिकेच्या वतीने प्रस्तावित अध्यादेशांच्या अमलबजावणीसाठी निर्णय, नोटीसेच व इतर दस्तऐवज अधिप्रमाणीत करण्याचे अधिकार उपसंचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यात मान्यता देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या प्रत्यक्ष चर्चेप्रमाणे ज्या वसाहतीचे सर्वेक्षण करण्याचे शिल्लक आहे. त्यांचे सत्वर सर्वेक्षण करण्यातही मंजूरी देण्यात येते. नियमाधिन करण्याच्या कार्यपध्दतीत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यासाठी शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१. अनाधिकृत वसाहतीत प्रत्येक ठिकाणी आखीवपत्रिका (पी. आर. कार्ड) असलेच असे नाही. खरेदीखत किंवा स्टॅप कागदावर खरेदी असते तरी त्यास मालकी बाबत व कायदेशीर कब्जा असल्याचे मानण्यात यावे.

२. ज्या अनाधिकृत वसाहतीत १०% खुली जागा उपलब्ध असेल तेथे सोडण्यात यावी व जेथे नसेल त्यास ही अट लागू करु नये व ९ मी. रुंदीचे रस्ते उपलब्ध होणार नाही. अशा ठिकाणी आहे तेच रस्ते सर्वेक्षण अंती सामावून घेण्यात यावे. तसचे आकृषि परवानगी घेतलेली नसेल त्यांना ही या योजनेचा लाभ व्हावा.

३. गुंठे ऐवजी चौरस फुट असावे व ज्या ठिकाणी मागासवर्गीय व दुर्बल घटकातील लोक असतील व त्यांचेकडे आर.सी.सी. चे घर नसेल रंगीत टी. व्ही. नसेल, दुचाकी वाहीन, दुरध्वनी नसेल अशा नागरिकांना विकास शुल्क (विकास आकार) मधून वगळण्यात येते व यासंबंधी नगररचना विभाग व प्रकल्प संचालक व सन्मानीय सदस्य स. अली. सलामी. श्री. भगवान रगडे, श्री. राजू शिंदे, सौ. साधना सुरडकर, व सौ. निखत परविन एजाज अली यांची समिती नेमण्यास व या समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन विकास शुल्क (विकास आकार) व प्रशमन शुल्क किती आकारवयाचा याची माहिती १५ दिवसात सभागृहास देण्यास सर्वानमुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरा "जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |